धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक १६/०२/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची पहिली सभा आज **गुरुवार दिनांक १६/०२/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ.किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती,मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह धरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. देविदास टेकाळे	आयुक्त
२	श्री.विजय सनेर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्रीमती पल्लवी शिरसाठ	प्र.नगरसचिव तथा मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी
५	श्री. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी

६	श्री. राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
७	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
८	श्री. किशोर सुडके	प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख
९	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पाणीपुरवठा विभाग
१०	श्री. गितेश सोनार	विद्युत विभाग
११	श्री. प्रकाश पवार	लिपीक आस्थापना विभाग
१२	श्री. राजेश गायकवाड	व.स. मनपा शिक्षण मंडळ
१३	श्रीमती कल्पना जाधव	अभिलेखापाल
१४	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१५	श्री. आजंदेकर	औषध भांडारपाल

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.प्र.नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

मा. सभापती — महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखरजी बावनकुळे सो.राज्यांचे उपमुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस सो.वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा धुळेचे पालकमंत्री मा. श्री. गिरीषभाऊ महाजन सो. मा. खा. श्री.सुभाषबाबा भामरे सो.,माजी पर्यटन मंत्री मा.श्री.जयकुमारभाऊ रावल सो. मा. आ.श्री. अमरीशभाई पटेल सो. जिल्हा बॅकेचे चेअरमन मा. श्री. बाबासो.राजवर्धनजी कदमबांडे, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. भैय्यासो. अनुपजी अग्रवाल तसेच सर्व पदाधिकारीह यांच्या सहकार्याने मला स्थायी समिती सभापती पदाच्या माध्यमातून सेवेची संधी मिळाली आहे. यासाठी सर्वांचे आभार मानते. शहराची लोकसंख्या व विस्तार वाढल्याने नागरीकांना मुलभूत सेवा सुविधा पुरविण्यांचे आव्हान महानगरपालिकेपुढे आहे.शहराला नियमितपणे व शुध्द पाणीपुरवठा करता येईल याबाबत अधिका-यांशी संवाद साधुन याबाबत नियोजन करता येईल तसेच स्वच्छता अभियानातही शहराने आघाडी घेतली आहे.याबाबतही स्थायी समितीच्या माध्यमातून आवश्यकते सहकार्य करण्यांत येईल. शहरातील सर्व विकास कामे करण्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून सहकार्य करण्यांत येईल या कामी सर्वांना बरोबर घेवून व वरिष्ठांचे मार्गदर्शन घेवून विकास कामे करण्यांत येतील असे आश्वासन देते.

म.प्र. नगरसचिव — **सौ.कुलेवार किरणताई राकेश यांची स्थायी समिती सभापती पदी निवड झाल्याबद्दल प्रशासनाच्या वतीने व सन्मा.सभागृहाच्या वतीने सभापती महोदयांचे मा.आयुक्त सो. यांचे हस्ते बुके देऊन स्वागत करण्यांत येत आहे.**

विषय क्रमांक :- ०२ — स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करणे.

म.प्र. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. फातमा अन्सारी — सभागृहातर्फे आपले अभिनंदन आपण चांगले काम कराल अशी अपेक्षा आहे. सभेचा वार गुरुवार हाच निश्चीत करण्यात यावा.

म. नाजिया पठान — आपले अभिनंदन सभेसाठी गुरुवारच निश्चीत करण्यात यावा.

म.सुनिल बैसाणे	प्रथमत:प्रथम सभेच्या बैठकीप्रसंगी३-४वर्षापासून अभ्यासपूर्ण काम करणाऱ्या आमच्या भगीनी सन्मा. किरणताई कुलेवार यांची स्थायी समिती सभापती पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन व स्वागत.आजचा सभागृहातील विषय क्र.२वर सन्मा. सदस्यांनी गुरुवार निश्चीत करण्याची सुचना या ठिकाणी दिली आणि प्रथम महिला सदस्यांना बोलण्याची संधी दिली मी स्वाभिमानाने सांगतो आपण चांगली सुरुवात या ठिकाणी केली आहे२ ते ३ वेळा निवडून येणारे नगरसेवक सुध्दा बोलतांना घाबरत असतात.येणाऱ्या काळात धुळे शहराच्या मनपाच्या इतिहासात महिला प्रतिनिधी म्हणून सन्मा. किरणताई कुलेवार आहे. या ठिकाणी वार वेळ निश्चीत करतांना कर्मचारी व नागरिकांच्या भावना व मागण्यांची पूर्तता होत नसल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नागरिक दुपारच्या वेळेस कामे घेऊन येतात व काही अधिकारी सभागृहात सुध्दा वेळेवर येत नाही. सभापती महोदयाना विनंती आहे की, यापुढे होणारी प्रत्येक सभा वेळेवरच झाली पाहिजे. सभागृहात ५ मिनिटेअगोदरच हजर पाहिजे. येणाऱ्या ७ ते ८ महिन्यांत आपल्याला पालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीला सामोरे जावे लागणार आहे. आपल्याकडे कालावधी कमी आहे. कमी कालावधीत जास्त काम करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. तुमच्या कडून सर्वांच्या खूप अपेक्षा आहे. प्रशासन व वेळेचा समन्वय साधून सर्वांचे मत घेऊन निर्णय घ्यावा. सभेसाठी गुरुवार निश्चीत केला तर सर्वांसाठी चांगले राहिल.सभागृहाच्या बहुमतावर कामकाज चालणार आहे. सभागृह सर्व तुमच्या सोबत आहे. धन्यवाद.
म.आयुक्त	कार्यालयीन वेळेची चर्चा केली. यामध्ये अधिकाऱ्यांची संख्या कमी व कामाचा व्याप जास्त आहे. आम्हाला अधिकारी म्हणून सुटी नसते. २४ तास अधिकारी म्हणून आम्ही बांधील आहोत. बरेचशे कर्मचारी सुटीच्या दिवशीही काम करत असतात.जे कर्मचारी हजर नसतील त्यांना समज देण्यात येईल.आरोग्य विभाग व बांधकाम विभागातील कर्मचारी कामावर हजर असतात. फक्त लिपिक वर्ग कार्यालयीन वेळेत सुटी असते. तुमच्या सुचनांचा आदर करुन चांगल्या पध्दतीने काम करु.
म.हर्षकुमार रेलन	भाजपाच्या जेष्ठ नेत्यांनी प्रभाग क्र.७ च्या नगरसेविका सन्मा. किरणताई कुलेवार यांना बिनविरोध सभापती केले.सर्वप्रथम आपले स्वागत करतो. आपल्याला शहराला वेगळा दृष्टीकोन देता येईल. आपल्याला सर्व आर्थिक विषय हाताळावयाचे आहे.आम्ही सर्व आपल्या बरोबरच आहोत. बजेट करतांना फक्त रस्त्यांकडे लक्ष न देता इतरही तरतूदीकडे लक्ष द्यावे. गुरुवार आणि ११ ची वेळ निश्चीत करावी. धन्यवाद.
म.साबिर खान	आपणांस सभापती पदी निवड झाल्याबद्दल खूप खूप शुभेच्छा चांगले काम कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.माझी सूचना आहे, आपल्याकडे खूप कमी कालावधी आहे. ठराव व वर्क ऑर्डर लवकर होत नाही.तसेच इस्टीमेट तात्काळ झाले पाहिजे. निधीचे वाटप योग्य रितीने झाले पाहिजे. सभेसाठी शुक्रवार सोडून कोणताही वार बैठकीसाठी निश्चीत करावा. पुन्हा एकदा शुभेच्छा धन्यवाद.
म.अन्सारी वसीम	सभापती निवडीसाठी शुभेच्छा सभेसाठी गुरुवार किंवा बुधवार निश्चीत करावा.
म.नरेंद्र चौधरी	सभापतीपदी निवड झाल्याबद्दल सर्वांच्या वतीने व आमच्या प्रभागच्या वतीने अभिनंदन.ताईंकडे अपेक्षा व्यक्त करतो की, आमच्या ग्रामीण भागाकडे जास्त लक्ष देऊन बजेटमध्ये कामे घ्यावी. सभेचा वार गुरुवार व सभेची वेळ सकाळी ११-०० वाजेची ठेवण्यांत यावी.
म.सभापती	नक्कीच धुळे शहर व हद्दवाढीचे भागांकडे लक्ष देऊ.
म.कल्याणी अंपळकर	सभेसाठी वार गुरुवार निश्चीत करावा. तसेच आपण जो निर्णय घ्याल तो मान्य राहिल.

म.सभापती

अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांचे पालन करावे. दिलेली सुचना पहिली व शेवटची समजावी. आणि आयुक्तांना विनंती करते आपण ही सभेस उपस्थित रहावे. कारण कालावधी थोडा आणि कामाचा व्याप भरपूर आहे. सर्वांच्या सहकार्याने मार्गदर्शनाने विकास कामे मार्गी लावू सभेसाठी वार गुरुवार व वेळ सकाळी ११-०० वाजेची निश्चीत करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.तसेच अन्य दिवशीही आवश्यकते नुसार व तांतडीच्या प्रसंगी स्थायी समिती सभापती यांच्या आदेशाने बैठक आयोजन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. धुळे शहराच्या स्वच्छतेचा, आरोग्याचा, पाणीप्रश्नाच्या बाबतीत सर्वांच्या सहकार्याने मार्गदर्शनाने पुढे जाणार आहोत पुन्हा एकदा सर्वांचे आभार.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०१ दिनांक १६/०२/२०२३

धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक दिनांक ०८/०२/२०२३ रोजी होऊन स्थायी समिती सभापती पदी श्रीमती कुलेवार किरण राकेश हया निवडून आलेल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ महानगरपालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्यादीचे कामकाज यामध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

स्थायी समितीचे कामकाज

३) स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी—

अ) स्थायी समितीची सभा आठवड्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरवण्यांत आली पाहिजे.

ब) प्रत्येक स्थायी समितीची पहिला सभा आयुक्त ठरवील अशा दिवशी व वेळी भरवण्यात आली पाहिजे आणि जर ती त्या दिवशी भरवण्यात आली नाही तर ती आयुक्त ठरवील अशा नंतरच्या एखादया दिवशी भरवण्यात आली पाहिजे आणि स्थायी समितीची त्यानंतरची प्रत्येक सभा उक्त समिती वेळोवेळी ठरवील अशा दिवशी अशा वेळी भरवण्यात आली पाहिजे अशी तरतूद आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार गुरुवार ठेवण्यांस व सभेची वेळ सकाळी ११-०० वाजेची ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच अन्य दिवशीही आवश्यकते नुसार व तांतडीच्या प्रसंगी स्थायी समिती सभापती यांच्या आदेशाने बैठक आयोजन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच धुळे शहराच्या स्वच्छतेचा, आरोग्याचा,पाणीप्रश्नाच्या बाबतीत सर्वांच्या सहकार्याने मार्गदर्शनाने पुढे जाणार आहोत पुन्हा एकदा सर्वांचे आभार.

सुचक :- श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम

अनुमोदक:- श्री. चौधरी नरेंद्र रुपला

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय,

स्थायी समिती सभा क्रमांक ३ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २३/०२/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं. ३ आज **गुरुवार दिनांक २३/०२/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ. किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती**, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. देविदास टेकाळे	आयुक्त
२	श्री.नितीन कापडणीस	अति. आयुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
५	श्रीमती पल्लवी शिरसाठ	प्र.नगरसचिव तथा मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी

६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
७	श्री.कैलास शिंदे	अभियंता
८	श्री. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
९	श्री. किशोर सुडके	प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख
१०	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
११	श्री.संजय मोरे	आस्थापना प्रमुख
१२	श्री.चंद्रकांत मोरे	लेखापाल
१३	श्री.मधुकर निकुंभ	वसुली अधिक्षक
१४	श्री. राजेश गायकवाड	व.स. मनपा शिक्षण मंडळ
१५	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१६	श्री.दुष्यंत महाजन	अग्निशमन विभाग
१७	श्री.सुक्राम राऊत	वाहनविभाग प्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मो स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.प्र.नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म.सभापती — आजच्या बैठकीस अनेक अधिकारी अनउपस्थित असल्याचे निर्देशास येत आहे. सदरबाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. बैठकीस अनउपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना याबाबत सुचित करण्यात यावे व यापुढे सर्वांनी वेळेवर बैठकीस उपस्थित राहावे व अत्यआवश्यक काम असल्यास पुरवपरवागनी घेण्यात यावी.

म.नगरसचिव — आपल्या स्थायी समितीचे सदस्य सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी व सौ.सारीकाताई प्रविण अग्रवाल यांची अनुक्रमे महापौर व महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदी नियुक्ती झाल्याने त्यांनी आपल्या स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा मा.आयुक्त सो.यांच्याकडे दि.२२/०२/२०२३ रोजी सादर केलेला आहे. सदर राजीनामा पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी नगरसचिव विभागाकडेस प्राप्त झालेला आहे. त्यानुसार राजीनामा दिलेल्या सदस्यांच्या रिक्त झालेल्या पदावर नियमाप्रमाणे त्याच्या पक्षामार्फत सदस्य नियुक्त करणेकामी मे.महासभेत प्रस्ताव ठेवण्यात येणार असून त्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. सदरबाब सभागृहाच्या माहितीस्तव सादर.

म.सुनिल बैसाणे — रिक्त झालेल्या सदस्य पदावर नविन नियुक्ती करणेबाबत तातडीने कार्यवाही करावी.

म.सभापती — नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरू करावे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३	मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.९/१२/२०२२, २७/१२/२०२२, १६/२/२०२३)
म. नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. सुनिल बैसाणे	विषय पत्रीकेवरील विषय क्र. ३ सभापती महोदय विषय पत्रीकेवरील विषय वाचून आपल्याला कायम करावयाचे आहे, माझ्या काही सूचना आहे. इतिवृत्तामधील विषय क्र. २३० तहकूब झालेला आहे. तो दिनांक ९/१२/२२ रोजी तहकूब केला होता. दिनांक २७/१२/२२ रोजी विषय क्र.२३८ म्हणून आला तो विषय मंजूर करण्यात आला जर यात काही प्रश्न उपस्थित करावयाचे आहे. महानगरपालिका अधिनियमामध्ये असे काही दिले आहे का हा विषय पुन्हा विषयपत्रीकेवर चर्चेसाठी घेता येऊ शकतो?
म.नगरसचिव	इतिवृत्त वाचून कायम करणे म्हणजे त्यात बदल करणे, ठरावाच्या आशयात बदल करणे , नामंजूर किंवा मंजूर करणे असा होत नाही. ठरावात बदल करावयाचा असेल तर पुनश्च विषयपत्रिकेवर घेऊन त्याविषयी निर्णय घेता येईल.इतिवृत्त फक्त कायम करण्यासाठी विषयपटलावर ठेवण्यात येते.
म.सुनिल बैसाण	मला या संदर्भात काही शंका आहे. इतिवृत्त मंजूरच करावयाचे आहे. परंतु धुळे शहराच्या स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत हा विषय आला आहे. आणि धुळे शहराचे मानांकन या विषयावर अवलंबून आहे. आणि याचा डिपीआर ११ कोटी ८४ लाख ८८ हजार ९९२ रुपये इतिवृत्ताच्या या विषयाला मंजूर करावयाचे आहे. हा विषय किती टप्पयामध्ये आपण करणार आहे? यात ३ टप्पे आहे माझ्या माहिती नुसार तर पहील्या टप्प्यासाठी ११ कोटी ८४ लाख आहे का? अशी माझी शंका आहे.
म.अति. आयुक्त	हा प्रकल्प ११ कोटी ८४ लाख ८८ हजार रुपयाचा आहे. त्यात आपण १०-१०-१० टीपीडीचे ३ टप्पे करत आहोत. आपल्याकडे मटेरियल येत नाही. त्या अनुषंगाने ३ टप्पे केले आहे. हे पोल्युशन कंट्रोल बोर्डाने बनवले आहे.
म.सुनिल बैसाणे	यात पहिल्या टप्पयात काय करणार आहोत? आपला उद्देश काय आहे. त्या प्रकल्पाचा ? तो उद्देश साध्य होत आहे का? धुळे शहराच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून बायोगॅस प्रकल्प कशासाठी करतोय ? निधी परत जायला नाही पाहिजे त्या निधीचा पुरेपुर वापर झाला पाहिजे आपण अटी शर्ती व करारनामा करतो तो स्थायी समिती समोर येणं गरजेचे आहे. प्रशासनाने काय चांगले केले आहे काय उणीवा बाकी आहे? याची स्थायी समिती सदस्यांना त्याचे ज्ञान असेल तर ते सूचवून तो करारनामा दुरुस्ती करु शकतात त्या करारनाम्याची पूर्तता व मान्यता स्थायी समिती समोर आली पाहिजे. ते आमच्या समोर आले पाहिजे. ज्या वेळेस विषय मंजूर झाला त्या वेळेस सभागृहात आम्ही नव्हतो. इतिवृत्ताच्या विषयाला मंजूरी द्यायची अंतिम जबाबदारी आमची देखील आहे. हा आमचा अधिकार आहे. येणारी जी स्थायीची सभा असेल मा. सभापतींचे पत्र देऊन चर्चेसाठी हा विषय पुन्हा आणावा ही विनंती करतो.
म.नगरसचिव	याबाबत आपण लेखी पत्र द्यावे त्यानंतर म.सभापती महोदयांच्या आदेशानुसार चर्चेसाठी विषय घेण्यात येईल.

म.नरेंद्र चौधरी — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. किरण अहिरराव — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०२ दिनांक २३/०२/२०२३

मागील स्थायी समिती सभा दिनांक दि.९/१२/२०२२ च्या सभेतील ठराव नं.२३९ ते २४७ तसेच दिनांक २७/१२/२०२२ च्या सभेतील ठराव नंबर २४८ ते २५६ व सभेत झालेली चर्चा तसेच दि. १६/२/२०२३ च्या सभेतील ठराव नंबर १ क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ४ — मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५लाख ते २५लाखापर्यंत बांधकाम विभागा कडील विकास कामांची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि. ११/११/२०२२ ते २३/१२/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती — मा. आयुक्त सो. यांनी त्यांचे अधिकारात रु. 5 लाख ते 25 लाखापर्यंत मंजुरीचे दिलेल्या कार्यादेशाच्या यादीचे अवलोकन करण्यांत आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०३ दिनांक २३/२/२०२२

मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५लाख ते२५लाखापर्यंत बांधकाम विभागा कडील विकास कामांची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि. ११/११/२०२२ ते २३/१२/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर

दि:- दि. ११/११/.२०२२ ते दि२३/१२/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

अ. क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	३९५	११/११/२०२२	प्र.क्र.१३ मध्ये शाळा क्र.२० च्या परिसरातील दिलदार नगर व भंगार बाजार मधील श्री.उमेश महाले यांच्या घरापासून ते बेबीबाई यांचे घरापर्यंत बंदिस्त गटार करणे.	१९,९२,३९५/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत
२	३९७	१७/११/२०२२	मनपा निधी अंतर्गत नकाणे रोड येथील सर्व्हे नं. ६९/७,६९/८, ६९/३+४+५येथील मोकळ्या जागेवर नाना-नानी पार्क करणे.	२१,१५,९१४/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३
३	३९८	२४/११/२०२२	प्र.क्र.११ मध्ये वाखारकर नगर मध्ये मनोचा हाउस ते निखिल जैन यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९८,३९८/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२
४	३९९	२४/११/२०२२	आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत प्र.क्र.१७ मध्ये शांती नगर राजपूत ते चौधरी घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,९७,२९०/-	आर्थिक दुर्बल घटक योजना अंतर्गत सन २०२२-२३

५	४००	२४/११/२०२२	प्र.क्र.१४ मध्ये पवन नगर भागात शेवतकर यांच्या घरापासून ते दशामाता मंदिर पावेतो अंडरग्राउंड गटार करणे.	१२,४८,२८४/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत
६	४०१	२४/११/२०२२	प्र.क्र.१४मध्ये पवन नगर भागात चौधरी किराणा पासून ते फौजी यांच्या घरापर्यंत व किरण परदेशी ते श्री.पाटील यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट व बंदिस्त पाईप गटार करणे.	१९,९९,४४०/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
७	४०२	२४/११/२०२२	आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत प्र.क्र.१७ मध्ये शांती नगरबिडकर घर ते राजपूत घर पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,९३,७३७/-	आर्थिक दुर्बल घटक योजना अंतर्गत सन २०२२-२३
८	४०३	२८/११/२०२२	प्र.क्र.६ मध्ये श्री.फारूक अन्वर शाह, आमदार धुळे शहर यांचे निधीतून प्र.क्र.६ विजयसिंग गिरासे ते सुदाम सोनवणेयांच्या घरापावेतो रस्ताकाँक्रीट करणे.	१४,९९,२५७/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
९	४०४	२८/११/२०२२	धुळे मनपा हद्दीतील मौजे वलवाडी यशोधन कॉलनी गट नं.१७०येथे सभामंडप बांधणे व पेव्हिंग ब्लॉक करणे.	१४,९९,३५०/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
१०	४०५	२८/११/२०२२	प्र.क्र.५ मध्ये नकाणे रोड वरील काटे सर्व्हिस सेंटर ते दत्त मंदिरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९७,१२३/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
११	४०६	२८/११/२०२२	प्र.क्र.१६ मध्ये नगरसेवक निधीतून जोरावर्ली सोसा.येथे विविध ठिकाणी गटार करणे.	१९,४६,०७४/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
१२	४०७	२८/११/२०२२	प्र.क्र.५ मध्ये अनमोल नगर भागात श्री.मिलिंद देसले यांच्या घरापासून ते शेखर शिंदे यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१७,४९,८७२/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२
१३	४०९	२८/११/२०२२	प्र.क्र.५मध्ये संभाजी नगर भागात वर्षा बिल्डींग पासून ते श्री.भामरे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१४,९७,५९६/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत
१४	४११	२९/११/२०२२	प्र.क्र.७ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत कुमार नगर भागात श्री.वासुदेव गोगीया घर ते रामचंद्र मामा गोधवानी घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,४७,३८२/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
१५	४१२	२९/११/२०२२	प्र.क्र.५ मध्ये प्रमोद नगर, नकाणे रोड येथील मारोती मंदिर ते गिरासे सर यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२४,७३,०११/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३
१६	४१३	२९/११/२०२२	प्र.क्र.१९ मध्ये फरीद ड्राइवर ते कलीम डॉक्टर यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१६,९९,१३१/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
१७	४१५	२९/११/२०२२	प्र.क्र.१मध्ये अंबाजी नगरच्या बोर्डापासुन ते ठाकरे सर यांच्या घराजवळील ओपनस्पेस पावेतोरस्ता डांबरीकरण करणे.	१२,४८,४६८/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत
१८	४१६	२९/११/२०२२	प्र.क्र.१५मध्ये नगरसेवक निधीतून अरुण कुमार वैद्यनगर श्री. नारायणमालपुरेघरते वाघघरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	११,७३,७४२/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
१९	४१७	२९/११/२०२२	प्र.क्र.७ मध्ये कुमार नगर भागात नारी शाळा ते मनोहर मेघानी यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२१,९८,३४८/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२
२०	४१८	२९/११/२०२२	प्र.क्र.७ मध्ये कुमार नगर मध्ये डॉ.सैंदाणे पासून ते श्री.लखमीचंद पर्यानी यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२२,९४,९८५/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत
२१	४१९	२९/११/२०२२	प्र.क्र.६ मध्ये आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत महिंदळे येथे सुरत बायपास ते सिंचन नगर पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,९८,५६१/-	मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक योजना अंतर्गत सन २०२२-२३

२२	४२०	२९/११/२०२२	प्र.क्र.६मध्ये आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत सुरज हौस.सो सा.येथे निंबा मराठे ते मोतीलाल बागले घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,९८,०३१/-	आर्थिक दुर्बल घटक योजना अंतर्गत सन २०२२-२३
२३	४२१	२९/११/२०२२	प्र.क्र.१९ मध्ये आयेशा नगर मध्ये ४० गाव रोड पासून ते अल्लाफभंगारवाले घरापर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकणे.	९,९७,४१०/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
२४	४२२	२९/११/२०२२	प्र.क्र.६ मध्ये आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत श्रीहरी कॉलनी येथे निर्मल ठाकूर घर ते महावीर भदाणे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,९६,६५१/-	आर्थिक दुर्बल घटक योजना अंतर्गत सन २०२२-२३
२५	४२३	२९/११/२०२२	प्र.क्र.६ मध्ये श्रीहरी कॉलनी येथील प्रशांत मोरे घर ते श्री.बी. महाजन घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,९५,९६१/-	मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक योजना अंतर्गत सन २०२२-२३
२६	४२४	०२/१२/२०२२	प्र.क्र.१ मध्ये संकल्प कॉलनी भागात स्वामी अपार्टमेंट ते कछवे यांचे रोहाउस पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे.	१०,४६,६५७/-	मनपा निधी (हद्दवाढ गावांसाठी) अंतर्गत सन २०२२-२३
२७	४२५	०२/१२/२०२२	प्र.क्र.१० मध्ये वरखेडी रोड,गायकवाड चौक पासून ते श्री.साळवे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२१,९९,६७९/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत
२८	४२६	०२/१२/२०२२	प्र.क्र.१० मध्ये गायकवाड चौक व्यायाम शाळा शशी वाघ यांचे घर ते दगडी गल्ली कैलास नवल सूर्यवंशी परीसरा पावेतो रस्ता सिमेंट काँक्रीट करणे.	२१,९९,०२९/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२०-२१
२९	४२७	०२/१२/२०२२	प्र.क्र.१० मध्ये गायकवाड चौक भागात १)श्री.कपूर ते नाल्या पावेतो २)रुईकर ते नाला ३)श्री.शेवगेकर ते संतोष मिस्त्री ४)शिवाजी मिस्त्री ते शेवगेकर ५)किरण ठाकूर ते सायकलवाले ६)कुंदन खरात यांच्या घरापासून ते उत्तरेस बडगुजर (चक्की) ७)श्रीराम अहिरे ते गोकुळ चव्हाण ८)विठ्ठल साळवे ते अशोक करडक पर्यंत बंदिस्त पाईप गटार (ड्रेनेज लाईन) करणे.	१९,९९,४६०/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत
३०	४२८	०२/१२/२०२२	प्र.क्र.९ मध्ये गायकवाड चौक भागात प्रकाश अहिरे ते भाऊसाहेब देवरे ते जैनुद्दीन शेख ते मन्या बिचू ते सुरेश जाधव,बजरंगवाडी ते डॉ.लहामगे ते भूषण सुर्वे ते सुरेश जाधव ते अशोक सांगळे ते शिवनेरी किराणा पावेतो बंदिस्त आर.सी.सी. गटार करणे.	२१,९५,८२०/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत
३१	४२९	०५/१२/२०२२	प्र.क्र.१६ मध्ये राऊळवाडी येथे पाटणा देवी मंदिर ते बायपास हायवे रस्ता करणे.	९,९७,३२१/-	भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२१-२२ अंतर्गत
३२	४३०	०५/१२/२०२२	प्र.क्र.१५ मध्ये उदय कॉलनी ते लक्ष्मीकांत चव्हाण यांचे घरापासून ते अहिरे यांचे घरापावेतो आणि राज वानखेडे यांचे घरापावेतो रस्ता करणे.	९,९९,३९१/-	भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२१-२२ अंतर्गत
३३	४३१	०५/१२/२०२२	प्र.क्र.१३ मध्ये शबनम बेकरी ते सेवा डिस्पोजल आणि सहारा ट्रॉली पार्टस ते सुभानी मस्जिद पर्यंत काँक्रीट रस्ता व गटार तयार करणे.	१६,९८,०१४/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
३४	४३३	०५/१२/२०२२	प्र.क्र.१३ मध्ये शाह इंजिनियरिंग वर्क्स ते अस्लमभाई यांचे घरापर्यंत रस्ता तयार करणे.	१९,९८,८४९/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
३५	४३४	०५/१२/२०२२	प्र.क्र.४ मध्ये जयहिंद कॉलनी भागात श्री. संजय मोरे यांच्या घरापासून ते क्लासिक टेलर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	७,१७,६३४/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२
३६	४३५	०५/१२/२०२२	धुळे मनपा हद्दीतील वाडीभोकर रोडवरील उत्तरमुखी मारोती मंदिरा जवळील पुलावरील पाईपलाईन शिफ्टिंग करणे.	५,८९,७८८/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (नवीन पाईपलाईन टाकणे)

३७	४३७	०५/१२/२०२२	प्र.क्र.३ मध्ये इंदिरा कॉलनी भागात श्री.जे. एस. पाटील यांच्या घरापासून ते श्री.बी. बी. महाजन यांच्या घरापर्यंत श्री.वाणी यांच्या घरापासून ते गोंदूर रोड पर्यंत श्री.माळी यांच्या घरापासून ते श्री.चौधरी यांचे घरापर्यंत व बाविस्कर ते निकुंभ यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९७,३८२/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (देवपूर भागातील रस्ते , गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत)
३८	४३८	०५/१२/२०२२	प्र.क्र.३ मध्ये नेहरू हौ.सोसा. भागात श्री.शेखर जडे यांच्या घरापासून ते डॉ.बिर्ला यांच्या घरापर्यंत ते श्री. ब्राम्हणकर यांच्या घरापासून ते नांदोडे यांचे घरापर्यंत श्री.कछवे ते देसले व अविनाश लोखंडे ते चौधरी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९४,२४७/ -	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (देवपूर भागातील रस्ते , गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत)
३९	४३९	०५/१२/२०२२	प्र..क्र.३ मध्ये संत गाडगेबाबा सोसा. भागात तुषार बेहरे ते आर.टी.निकम यांचे घरापर्यंत सुनील पाटील ते पी.बी.पाटील घरापर्यंत व पंडीत सर यांचे घरापासून ते नरेंद्र बोरसे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९६,३१८/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (देवपूर भागातील रस्ते , गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत)
४०	४४०	०५/१२/२०२२	प्र.क्र.१७ मध्ये सुरतवाला बिल्डींग ते जाधव घर ते गुलशन यांचे घरापावेतोचा रस्ता काँक्रीट करणे.	१९,९३,७९४/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
४१	४४१	०७/१२/२०२२	प्र.क्र.१६ मध्ये लालबहादुर शास्त्री नगर येथे निलिमा बडगुजर यांचेघरापासून अर्चना दुसाणे यांचे घरा पावेतो रस्ता काँक्रीट व गटार करणे.	१०,०२,३१७/-	भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने २०२२-२३ अंतर्गत
४२	४४३	०७/१२/२०२२	प्र.क्र.६मध्ये महिंदळे येथे आप्पा काळे ते प्रशांत सोनवणे तेचौधरी यांचे घरापर्यंतरस्ता काँक्रीट करणे.	२४,९५,८६७/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (हद्दवाढ गावांसाठी अंतर्गत)
४३	४४४	०७/१२/२०२२	श्री.फारूक अन्वर शाह आमदार धुळे शहर यांचे निधीतूनफाशिपुल पोलीस लाईन समोरील महात्मा ज्योतिबाफुलेस्मारकाच्याआवारातसुशोभिकरण करणे.	१५,९८,१२८/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
४४	४४५	०७/१२/२०२२	प्र.क्र.१५मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत सर्व्हे नं.८३/२, ८५/१ अ येथील जागेस वॉल कंपाऊंड करणे.	१९,९५,४४५/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
४५	४५०	१२/१२/२०२२	प्र.क्र.१३ मध्ये फिरदोस नगर भागात स्वेसस्कूल कलाम शेठ यांचे घराजवळील रस्ता काँक्रीटी करण करणे.	६,०४,२१४/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
४६	४५२	१२/१२/२०२२	प्र.क्र.१२ मध्ये सलीम लंबू यांच्या घरापासुन ते फलदारायण मदरसा पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	८,४९,६१९/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
४७	४५३	१२/१२/२०२२	प्र.क्र.१२ मध्ये मिल्लत नगर भागात जफर खिलावाले यांच्या घरापासून ते अन्सारी कुलरवाले यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट व रोड क्रॉस करणे.	८,४९,५०९/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
४८	४५४	१४/१२/२०२२	प्र.क्र.८ मध्ये अकबर चौकात अन्सारी किराणा ते हमीद पुड्डेवाले यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१७,९७,३६५/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
४९	४५५	१४/१२/२०२२	प्र.क्र.७ मध्ये समता नगर हनुमान मंदिर ते आधार भगवान पाटील घरापावेतो काँक्रीट रस्ता करणे.	९,९७,६३३/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
५०	४५८	१४/१२/२०२२	प्र.क्र.६ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत नकाणे येथील गारुडी वाडा येथे सभा मंडप बांधकाम करणे.	१५,९९,५२६/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
५१	४५९	१४/१२/२०२२	प्र.क्र.१५ मध्ये यशवंत नगर राजीव गांधी नगर समाज कल्याण ऑफिस जवळील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे.	६,१३,४८३/-	मनपा निधी अंतर्गत (शौचालय दुरुस्ती)
५२	४६१	१४/१२/२०२२	प्र.क्र.१६ मध्ये लालबहादुर शास्त्री नगर येथे पी.जी. पाटकर यांच्या घरापासून ते बाजीराव खैरनार यांच्या नवीन घरापावेतो काँक्रीट रस्ता व गटार करणे.	१०,०२,३१७/-	भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत

५३	४६४	१४/१२/२०२२	प्र.क्र.२ मध्ये दोंदे कॉलनी भागात गॅस ऐजेन्सी पासून ते बी.एस.पाटील यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	२४,९४,१५२/-	मनपा निधी (देवपूर भागातील रस्ते व गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत सन २०२२-२३)
५४	४६५	१४/१२/२०२२	प्र.क्र.२ मध्ये टागोर कॉलनी भागात आशिष पाटील यांचे घरापासून ते बकुळ अपार्टमेंट पावेतो काँक्रीट रस्ता करणे.	२४,९२,०६७/-	मनपा निधी (देवपूर भागातील रस्ते व गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत सन २०२२-२३)
५५	४६७	१६/१२/२०२२	प्र.क्र.११ मध्ये सर्व्हे नं.४१३/१, २२अ/१, २अ /२ व ६१६ मधील धुळे मनपा धुळे च्या मालकीच्या मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे.	१४,९६,२९१/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत
५६	४६८	२३/१२/२०२२	प्र.क्र.५ मध्ये आनंद नगर भागात श्री.प्रवीण महाले यांचे घरापासून ते श्री. विजय भदाणे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	११,८८,२६१/-	मनपा निधी (देवपूर भागातील रस्ते व गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत सन २०२२-२३)
५७	४६९	२३/१२/२०२२	प्र.क्र.५ मध्ये शिवाजी नगर भागात श्री.गोविंद चौधरी यांच्या घरापासून ते श्री. रनाळकर यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	९,९१,३३१/-	मनपा निधी (देवपूर भागातील रस्ते व गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत सन २०२२-२३)
५८	४७०	२३/१२/२०२२	प्र.क्र.५ मध्ये प्रमोद नगर भागात श्री.एम.डी.पाटील यांच्या घरापासून ते देशमुख यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१२,९८,७४०/-	मनपा निधी (देवपूर भागातील रस्ते व गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत सन २०२२-२३)
५९	४७१	२३/१२/२०२२	प्र.क्र.५ मध्ये देवपूर भागातील डॉ.देवरे यांच्या घरापासून ते श्री.एन.आर.देवरे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	९,९७,६७१/-	मनपा निधी (देवपूर भागातील रस्ते व गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत सन २०२२-२३)
६०	४७२	२३/१२/२०२२	प्र.क्र.५ मध्ये राजीव गांधी नगर भागात श्री.अरविंद जाधव यांच्या घरासमोरील रस्ता डांबरीकरण करणे.	२०,२६,६६८/-	मनपा निधी (देवपूर भागातील रस्ते व गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत सन २०२२-२३)
६१	४७३	२३/१२/२०२२	प्र.क्र.११ मध्ये शांती नगर येथील श्री.हिरामण देवरे ते दिपक जाधव व राजू चौधरी यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	२४,९५,५९८/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५ धुळे मनपा पाणीपुरवठा विभागाकडील **रसायन तज्ञ (केमिस्ट)** या संवर्गातील पदे मानधन तत्वावर ६ महिन्यासाठी मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे मानधन तत्वावर जे इतर विभागात कर्मचारी कार्यरत आहेत. उदा. व्हॉलमन, फिटर, विद्युत विभागातील कर्मचारी अशा कर्मचा-यांचे मानधनावरील कर्मचा-यचांचा मुदतवाढीचा प्रस्ताव समितीपुढे येणे आवश्यक आहे. संबंधित कर्मचा-यांची२ महिने अगोदर आस्थापना विभागाकडेस अर्ज दिलेले आहे. मुदत संपण्याच्या पूर्वी ८-१५ दिवस अगोदर विषय मान्यतेसाठी समितीपुढे येणे आवश्यक आहे. तो विषय पुढील बैठकीत समिती सादर करावा. सदर विषय मंजुर करण्यांत यावा.

म.किरण अहिरराव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. आस्थापना विभागाने ज्या मानधनावरील कर्मचा-यांची मुदत संपत आहे. अशा कर्मचा-यांची मुदत संपण्याच्या ८ -१० दिवस अगोदरच प्रस्ताव समितीपुढे सादर यांची दक्षता घ्यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०४ दिनांक २३/०२/२०२३

पाणीपुरवठा विभागाकडील रसायन तज्ञ (केमिस्ट) यांना ०६ महिने करीता एकत्रित मानधनावर फेर नियुक्ती देण्यात आली होती. खालील मानधनावरील कर्मचा-यांची नियुक्तीची मुदत दि २३/१२/२०२२ रोजी संपुष्ठात आलेली आहे. खालील मानधनावरील रसायन तज्ञ(केमिस्ट) यांनी पुढील०६ महिने करीता मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने संदर्भीय क्र. ३ अन्वये अभियंता यांनी व कनिष्ठ अभियंता यांनी उक्त मानधनावरील कर्मचा-यांना फेर नियुक्ती देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रुपये
१	श्री विशाल अशोक गोसावी	रसायत तज्ञ	२३/१२/२०२२	२०,०००/-
२	कु. श्रध्दा मधुकर पाटील	रसायत तज्ञ	२३/१२/२०२२	२०,०००/-

तसेच मा.सभापती, स्थायी समिती यांनी दि.२०/१२/२०२२ रोजी समक्ष त्यांच्या दालनात बोलावून उक्त दोन्ही कर्मचारी रसायन तज्ञ यांना मानधन वाढी बाबत प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

त्याअनुषंगाने धुळे महानगरपालिकेतील सर्व मानधनावरील कर्मचा-यांना इकडील कार्यालया कडील आदेश क्रमांक धुमपा/आस्था/ १०९७ दि २५/११/२०२२ अन्वये मानधन वाढ करण्यात आलेली आहे. तथापी सदर आदेशात व ठरावामध्ये उक्त रसायन तज्ञ यांचा समावेश नाही.

उक्त दोन्ही मानधनावरील कर्मचारी यांचे तरी अभियंता यांनी केलेल्या शिफारशीनुसार श्री. विशाल अशोक गोसावी व श्रध्दा म मतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील कर्मचारी यांचे तरी अभियंता यांनी केलेल्या धुकर पाटील यांना रसायन तज्ञ (केमिस्ट) या पदावर ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सह शिफारशीनुसार श्री. विशाल अशोक गोसावी व श्रध्दा मधुकर पाटील यांना रसायन तज्ञ (केमिस्ट) या पदावर ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर मानधनावरील कर्मचारी यांच्या मानधनात प्रत्येकी रू.५०००/- मात्र वाढ करणेस मान्यता देण्यात येत आहे. या प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. आस्थापना विभागाने ज्या मानधनावरील कर्मचा-यांची मुदत संपत आहे. अशा कर्मचा-यांची मुदत संपण्याच्या ८ -१० दिवस अगोदरच प्रस्ताव समितीपुढे सादर यांची दक्षता घ्यावी.

सुचक :- श्री.बैसाणे सुनिल तुळशीराम
अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र

सर्वानुमते मंजूर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६ धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र.३ मधील स.नं.३३/३ गुलाब हाजी नगर भागांत रस्ता काँक्रीट करणेचे एस्टीमेट रु.२८,६१,३३७/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे बाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नाजियाबानो पठाण विषय मंजुर करण्यांत यावा.

म. फातमा अन्सारी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०५ दिनांक २३/२/२०२३

देवपूर भागांतील प्रभाग क्र.३ मधील सर्व्हे नं.३३/३ गुलाब हाजी नगर भागांत रस्ता कॉक्रिट करणे बाबत संदर्भीय पत्रानुसार मागणी करण्यात आली आहे.उक्तबाबत समक्ष पाहणी केली असता सध्यस्थितीत सदर ठिकाणी भुयारी गटार योजने अंतर्गत भुयारी गटारीचे काम झाल्याने सदरचा रस्ता मोठ्या प्रमाणात खराब झाला असून नागरिकांना रहदारीस अडचणी येत असल्याने उक्त काम करणे गरजेचे आहे.

सदर कामास शासकीय दरसूची सन २०२१-२२ नुसार रु.२८,६१,३३७/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२२-२३ च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून देवपूर भागांतील प्रभाग क्र.३ मधील सर्व्हे नं.३३/३ गुलाब हाजी नगर भागांत रस्ता कॉक्रिट करणेचे रु.२८,६१,३३७/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- श्रीमती पठाण नाजियाबनो नासीर खा

अनुमोदक:- श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन

सर्वानुमते मंजूर,
सही /-xxx
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-७ म.न.पा पाणीपुरवठा केंद्र येथील मोटर्स.पंप सेट, इतर switch गियर, असेसेरीजची द्वी-वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेचे (२०२२-२३ ते २०२३-२४) निविदा दर (आयटम रेट नुसार) मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म.किरण अहिरराव विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०६ दिनांक २३/२/२०२३

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.187.दि.29-9-2022 अन्वये उक्त कामाबाबत रक्कम आयटम रेट नुसार खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./विवी/234दि.20-10-2022 अन्वये व दि. 21-10-2022 च्या पुण्यनगरी व धुळे महानगपालिका /महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www. mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा प्रसिद्ध करणेत येवून दि.10-11-2022. रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/ लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे नाव	दिलेले निविदा दर (एकत्रित)	शेरा
1	मे.पंडित इलेक्ट्रिकल धुळे	सोबतच्या आयटम दर तक्ताप्रमाणे	
2	मे.अंबिका इलेक्ट्रिकल धुळे	सोबतच्या आयटम दर तक्ताप्रमाणे	
3	मे.ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक	सोबतच्या आयटम दर तक्ताप्रमाणे	L1

उक्त बाबत दि. दु. ५ वाजता म.अति आयुक्त तथा निविदा समिती यांच्या दालनात निविदेची वित्तीय छाननी बैठक संपन्न झाली.सदर बैठकीतील समिती सद्स्थायांनी निविदेमध्ये तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे.ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक यांची निविदा आयटम रेट नुसार सर्वात न्यूनतम दराची असून अंदाजपत्रकीय दराची आहे. उक्त कामी अंदाजित खर्च रु.35 लक्ष वार्षिक इतका अपेक्षित आहे.

ठेकेदार मे.ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक यांचे आयटम रेट नुसार दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक यांनी सर्वात कमी आयटम रेट नुसार दर तुलनेत सर्वात कमी आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर.तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाणा रक्कम परताव्यास मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार मे.ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक यांनी सर्वात कमी आयटम रेट नुसार दर तुलनेत सर्वात कमी आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नरेश रूपला चौधरी

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र

सर्वानुमते मंजूर,
सही /-x x x
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८ संस्था कर विभागातील नोंदणीकृत व्यापाऱ्यांचे वार्षिक विवरण तपासणी व कर निर्धारणा करण्या कामी संस्था नियुक्त करण्यासाठी निवीदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन यातून आपल्याला किती रुपये उत्पन्न अपेक्षित आहे?

म.अति आयुक्त यातून आपल्याला अंदाजे ५ कोटी रुपये उत्पन्न मिळू शकेल.

म.हर्षकुमार रेलन यात ३ लोकांनी टेंडर भरले आहे. आपण सर्वांची मिटींग घेतली आणि सर्व त्याच दराने १४३ रु प्रतिविवरण व मेहनताना शुल्क ०.९९% काम करण्यास स्विकृती पत्र प्राप्त झाले यावर आपण काय करणार आहोत?

म.अति.आयुक्त यात आपण तीघांना नियुक्त करणार आहोत.

म.हर्षकुमार रेलन ते तिनही निविदा धारक जॉईन्ट व्हेंचर करणार आहेत का? किंवा कसे करणार आहे?

म.अति आयुक्त आपण तिनही निविदा धारकांना एरिया वाटून देऊ किंवा केसेस वाटून देऊ

म.हर्षकुमार रेलन या पूर्वीचा ठेकेदार चेनानी ने ५ वर्षाचा वेळ घेतला आणि फक्त ७९२ केसेस त्याने केलेल्या आहे. तरीही त्याचे टेंडर आपण का स्विकारले आहे?

म.अति.आयुक्त सदर संस्थेने स्पर्धेत भाग घेतलेला असल्याने नियमाप्रमाणे टेंडर आपल्याला स्वीकारावे लागते.

म.हर्षकुमार रेलन ५ कोटी रुपये हे ३ ही निविदाधारक आपल्याला वसूल करुन देतील. ५ लाख रुपयांत ३ निविदाधारक दुसऱ्या राज्यातून येणार ४-४,५-५ लोकांचा स्टाफ ठेवणार लाख-लाख महिना खर्च करणार पूर्ण वर्ष झाल्यानंतर त्यांना बिल अदा होतील हे कसं शक्य आहे. आपण यावर विचार केला पाहिजे. तो ठेकेदार ८०% बिलो ने निविदा भरत आहे.शासनाचा काही नियम आहे की नाही? यात धुळे शहरातल्या व्यापाऱ्यांचा छळ होणार आहे. १ लाख रुपये महिन्याला त्याचा खर्च आहे. १२ महिन्यांनंतर १.७५ लाख रुपये त्याला मिळणार आहे. आपण कसा त्याचा टेंडर स्विकार केला. हा टेंडर फक्त छळ ,भ्रष्टाचार, त्रास देण्याच्या हेतूने केले आहे. कोणत्याही विभागात आपण ८०% बिलो ने टेंडर मंजूर केलेले आहे का? यात अनेक उदाहरणे आहेत. या ठेकेदाराने डिमांड केल्या होत्या त्याच्या अगेंनस्ट ऑर्डर केली होती. एका व्यापाऱ्याला त्याने नोटीस दिली होती २२ लक्ष भरण्याची. नोटीस दिली गेली आणि भरणा मात्र शून्य. एका व्यापाऱ्याला नोटीस दिली २ कोटी रुपये आणि ३ हजार रुपये भरण्यास सांगितले. एका व्यापाऱ्याला ८ कोटीची नोटीस होती हे फक्त छळ करत आहे. हे चुकीचे आहे. वसुली फक्त ५ कोटी येणार आहे. टेंडर ८०% बिलोचे स्विकारतोय. ५ लाखात ३-३ ठेकेदार बाहेर राज्यातून येत आहेत. आपल्याकडे आयुक्त साहेबांनी ठाणे मनपा, नवि मुंबई मनपा, मालेगांव मनपा फोन केला होता त्यांनी सर्वांनी रिटायर्ड सेल्स टॅक्स ऑफिसर ३५०००/- मानधनावर नियुक्त केले. ५५००० केसेस ६ महिन्यांत विवरण पत्रे भरुन दिली. मग चेनानी या ठेकेदाराने ६ वर्षात ८०० केसेस केल्या ,चुकीच्या नोटीसा दिल्या, विवरण पत्रासाठी व्यापाऱ्यांना दिवस-दिवसभर बसून ठेवले. माझी विनंती राहील हा विषय तहकूब ठेवावा.

म.कल्याणी अंपळकर ३ निविदाधारकांपैकी चेनानी हा मागच्या वर्षी सुध्दा आला होता. त्याने आपल्या व्यापाऱ्यांचा कसा छळ केला हे आपण पाहीलेच आहे. माझे स्पष्ट मत आहे की ज्या व्यक्तीने आपल्या व्यापाऱ्यांचा छळ केला आहे त्या व्यक्तीला हे टेंडर देण्यात येऊ नये.

म.सुनिल बैसाणे आपल्याला धुळे मनपाचे हित जपले गेले पाहिजे उत्पन्नात देखील वाढ झाली पाहिजे. धुळे शहरातील व्यापारी हे मोठया प्रमाणावर करदाते आहे. त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहीजे. २ लाख रुपये निविदाधारकाला मिळणार आहे आणि ५ कोटी रुपये तो

मनपाला मिळवून देणार आहे तो जास्तीची नोटीस देऊन चर्चेअंती तो ठरवतो किती भरणा करायचा यात व्यापारी व धुळे मनपाची सुध्दा फसवणूक आहे. त्यावर आपले मनपाचे नियंत्रण असले पाहिजे. आपण त्या ठेकेदाराला सगळे अधिकार देतोय. २ कोटीची नोटीस देऊन ३००० रुपये भरणा करतो याचा अर्थ काय समजावा? त्याला अधिकार देण्यापेक्षा टक्केदारी नेमून द्यावी. हा विषय चर्चे अंती जी नोटीस दिली जाईल एक नोटीस व्यापाऱ्याला , एक नोटीस आयुक्त म्हणून संबंधीत अधिकाऱ्याला निगोशिएशन करतांना त्याचे रिपोर्टींग झाले पाहिजे. पुढच्या सभेत सव्वीस्तर उहापोह करून निर्णय घ्यावा ,व्यापाऱ्यांचेहि हित जपले गेले पाहिजे. व्यापाऱ्यांची पिळवणूक होणार नाही याचीही दक्षता घ्यावी.

म.आयुक्त — यामध्ये अधिकार उपायुक्त व अति.आयुक्त यांना आहे. यामध्ये जे असेसमेंट होते त्यामध्ये निर्णय घ्यायचे होते कंपनी ही आपल्याला मदत करण्यासाठी आहे. कंपनीने परस्पर कुठलेही निगोशिएशन करणार नाही. आणि त्याचे ऑडीट पण होणार आहे.

म.अति.आयुक्त — सुनावनीच्या पावर ते वापर करीत होते. आम्ही ते बंद केले आणि प्रॉपर सिस्टीम इस्टॅब्लीश केली आहे. सदस्यांनी या विषयी आश्वस्त व्हावे.

म.सभापती — याबाबत आयुक्त साहेब व संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करुन माहिती घेऊन पुनश्च विषय सभागृहासमोर आणू तोपर्यंत सदर विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०७ दिनांक २३/२/२०२३

संस्था कर विभागातील नोंदणीकृत व्यापाऱ्यांचे वार्षिक विवरण तपासणी व कर निर्धारणा करण्या कामी संस्था नियुक्त करण्यासाठी निवीदा दर मान्यतेसाठी प्रस्ताव मे.स्थायी समितीसमोर सादर झाला असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व सहमतीने सदर प्रस्तावाबाबत आयुक्त साहेब व संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करुन माहिती घेऊन पुनश्च प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर करावा तोपावेतो सदरचा विषय तहकूब ठेवणेस मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन,
अनुमोदक:- सौ.कल्याणीताई सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजूर
सही /-x x x
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९ — धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील घंटागाडया तातडीने दुरूस्ती करणे कामी टाटा अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना रूपये रक्कम ₹.10,63,635/-अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — विषय क्र.९,१० व ११ आरोग्य विभागाशी संबंधीत आहे. धुळे मनपातील घनकचरा व्यवस्थापन याच्याशी निगडीत असल्याकारणामुळे हा अत्यंत महत्वपूर्ण व गंभीर विषय आहे. त्यामध्ये आपल्याला साधारणत: ३१ ते ३२ लक्ष रुपये या घंटागाडयांवर खर्च करण्यासाठी हा विषय

आला आहे. परंतु विषय आल्यानंतर सव्वीस्तर चर्चा होणे गरजेचे आहे. आपल्याला विनंती आहे. या विषयाशी संबंधीत अधिकारी आहे त्यांनी याचे स्पष्टीकरण द्यावे.

म.वाहन विभाग प्रमुख — एकूण ७५ घंटागाडयांचे देयक कार्योत्तर मंजूरीसाठी विषय आला आहे तात्कालीन स्थायी समितीने निर्देशित केल्याप्रमाणे आपण उज्वल ऑटोमोटीव्ह कडून गाडयांची दुरुस्ती करुन घेतली आहे.

म.सुनिल बैसाणे — या विषयाचे संपूर्ण स्पष्टीकरण द्यावे.

म.अति.आयुक्त — प्रस्तुत विषय अनन्य साधारण परिस्थितीमध्ये देयकं अदा करण्या संदर्भातला आहे. त्या परिस्थितीमध्ये वॉटर ग्रेसचे काम बंद केले होते. आणि गाडया दुरुस्ती साठी पडलेल्या होत्या त्या गाडयांची दुरुस्ती करुन त्याचे हस्तांतरण करण्याची जबाबदारी वॉटरग्रेस कंपनीची होती त्यांनी जबाबदारी स्विकारलेली नाही. परंतु शहरातील स्वच्छतेची परिस्थिती अत्यावश्यक सेवा आहे आणि ते सुरु ठेवण्याची जबाबदारी धुळे मनपाची असल्यामुळे आपण त्या गाडया स्वत:च्या ताब्यात घेतल्या आणि दुरुस्ती साठी उज्वल ऑटोमोटीव्हजकडे पाठवल्या या गाडयांचा दुरुस्तीचा खर्च कोणी घ्यावा यासंबंधी प्रशासनाने निर्णय घेतला. वॉटरग्रेस कंपनीचे बिले प्रलंबित आहे ते आपण रोखून ठेवले आहे. त्यामधून या गाडयांचा खर्च करणार आहोत. यात आपल्याला फक्त औपचारीक मंजूरी स्थायी समितीची घ्यायची आहे.

म.सुनिल बैसाणे — वॉटरग्रेस कंपनीच्या अनियमितता या मुळे त्या गाडया दुरुस्ती साठी पडून होत्या. धुळे शहरातील घनकचरा व्यवस्थापन होऊ शकले नसते. परंतु धुळे मनपातील संबंधीत आरोग्याधिकारी होते. त्या संस्थेवर नियंत्रण नसल्याकारणामुळे त्या बाबतीत माझ्यामध्ये व आयुक्त साहेबांमध्ये पत्रव्यवहार चालू आहे. मी याबाबत धोक्याची घंटा आजही देत आहे. आणि याची सर्व जबाबदारी आयुक्त सो. सर्वस्वी तुमची राहणार आहे. कामाच्या व्यापामुळे असो किंवा दूर्लक्ष झाले असो त्या संस्थेला वेळोवेळी वेठीस धरत नाही. नोटीस देत नाही. त्यामुळे संबंधीत ठेकेदार मुजोर होतो. तो वॉटरग्रेस निविदाधारक औरंगाबाद उच्च न्यायालयात गेला आहे आपण त्याच्या डिपॉझिट मधून पैसे वर्ग करणार आहे. त्याने आपल्या विरुध्द दावा केला आहे. त्या दाव्याचे स्टेटस काय आहे? एखाद्या एजन्सीच्या बाबतीत तक्रारी नागरिकांच्या, लोकप्रतिनिधींच्या होत्या आणि लेखी स्वरुपात आहे. तरी त्याची देयके अदा करण्यात आली आहे. देयके देत असतांना त्याच वेळी अदा करण्यात आले असते तर आज ही परिस्थिती उद्भवली नसती. जर उद्या कोर्टामध्ये आपल्या विरुध्द निकाल लागला तर या देयकाची जबाबदारी प्रशासन घेईल का? आणि त्या दिलेल्या खर्चासाठी मंजूरी साठी हा विषय आला आहे. या ठिकाणी विचार करुन निर्णय घेतला पाहिजे. आपण जो उज्वल ऑटोला दुरुस्ती साठी पैसे दिले आहे त्याचा ऑडीटमध्ये कुठेही उल्लेख होत नाही. ते पैसे आपण फंडातून दिले आहे, १४ व्या वित्त अयोगातून दिला आहे. याबाबत टिपनीमध्ये सव्वीस्तर नाही. बिले पण आपण द्यायचे गाडया दुरुस्तीचे पैसे आपण द्यायचे एखाद्या लोकप्रतिनिधी पोटतिडकीने बोलतो आपण त्याकडे दुर्लक्ष करतात. मी न्यायालयात गेलो तर तुम्हाला येणाऱ्या काळात अनेक अडचणी येऊ शकतात. आयुक्त सो. स्वयंभू वाल्याला आपण गाडया दिल्या गेल्या आहे. त्या संबंधी एक बैठक घ्यावी. भारतीय जनता पार्टीला बदनाम करण्यासाठी प्रशासन ठेकेदारला

पाठीशी घालत आहे, असा आमचा आरोप आहे. टिपनीमध्ये कुठे सव्वीस्तर उल्लेख नसल्या कारणामुळे हे तिनही विषय तहकूब करावे व यावर संयुक्त बैठक घ्यावी. येणाऱ्या काळात धुळे मनपावर कुठल्याही प्रकारचा आर्थिक भार पडायला नको. अशी विनंती करतो.

म.आयुक्त — सन्मा. सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित केले या आगोदर या ठेकेदाराबद्दल सर्वांनाच माहित आहे. गाडयांची दयनीय अवस्था होती. पेपरमध्ये रकानेचे रकाने छापून येत होते. आपण या सर्व गाडया टाटा मोटर्स चे अधिकृत डिलर उज्वल ऑटोमोटीव्ह यांच्याकडे दुरुस्तीसाठी पाठवल्या ७९ गाडयांपैकी जेम तेम २०-२२ गाडया ऑन रोड होत्या. त्या सुध्दा नादुरुस्त होत्या. वॉटरग्रेस वाले तात्पुरत्या दुरुस्ती करत होते. प्रायव्हेटमधून दुरुस्ती करत होते. इतर सुध्दा स्पेअर पार्ट जुने टाकण्याचे निर्दशनास आले होते. त्यानंतर त्याचा ठेका रद्द केला त्यानंतर काय परिस्थिती झाली आपल्याला माहित आहे. आपण त्याचे शेवटचे बिले थांबवले आणि असा निर्णय घेतला की बिलांमध्ये दुरुस्तीचे कामे करुन घ्यायचे बँक गॅरंटी द्यायची नाही. सिक्युरिटी डिपॉझिट द्यायचे नाही. आज मितीला ७९ घंटागाडया अधिकृत कंपनीकडून चांगल्या स्थितीत हस्तांतरीत केल्या. तसेच स्वयंभु सोबत आपण करारनामा करण्यापूर्वी स्थायीची परवानगी घेतली २-२ वेळा बैठका घेतल्या. त्यानंतर करारनामा केला. आणि त्यामध्ये काही त्रुटी असतील आम्ही कोणीही त्याला पाठीशी घालणार नाही. घनकचऱ्याचे कलेक्शन चांगल्या प्रकारे होत आहे. विलगीकरणामध्ये आपल्याला सुधारणा करावयाची गरज आहे. यंत्रणा सुधारण्यासाठी प्रयत्न करु.

म.सुनिल बैसाणे — हा विषय प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्यास सुधारणा होणार नसेल तर जनतेच्या दरबारात जावे लागेल चौथ्या स्तंभाचा आधार घ्यावा लागेल. परंतु त्याने मनपाची बदनामी होणार आहे.हे मला मान्य नाही आहे. सुधारणा झाली पाहिजे.

म.आयुक्त — आपण जे मुद्दे मांडले त्यावर चर्चा करुन योग्य तो निर्णय घेऊ.

म.सभापती — सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार सदर विषयावर चर्चा करुन माहिती घ्यावी तोपावेतो हा विषय तहकूब करण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०८ दिनांक २३/२/२०२३

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील घंटागाडया तातडीने दुरूस्ती करणे कामी टाटा अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना रूपये रक्कम ₹.10,63,635/-अदा करणेबाबत प्रस्ताव मे.स्थायी समितीसमोर सादर झाला असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व सहमतीने सदर प्रस्तावाबाबत कार्यालयीन अहवालात स्पष्टता नाही. याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करुन सविस्तर माहिती सादर करावी तोपावेतो सदरचा विषय तहकूब ठेवणेस मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे
अनुमोदक:- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजूर,
सही /-xxx
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १० धुळे मनपा मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७(३) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२) नुसार दुरुस्ती खर्च रु.१४,३९,४६६/-अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे वरील विषयाप्रमाणेच सदर विषय तहकूब करावा.

म.सभापती सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार सदर विषयावर चर्चा करुन माहिती घ्यावी तोपावेतो हा विषय तहकूब करण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०९ दिनांक २३/२/२०२३

धुळे मनपा मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७(३) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२) नुसार दुरुस्ती खर्च रु.१४,३९,४६६/-अदा करणेबाबत प्रस्ताव मे.स्थायी समितीसमोर सादर झाला असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व सहमतीने सदर प्रस्तावाबाबत कार्यालयीन अहवालात स्पष्टता नाही. याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करुन सविस्तर माहिती सादर करावी तोपावेतो सदरचा विषय तहकूब ठेवणेस मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे
अनुमोदक:- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजूर
सही /-xxx
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११ धुळे मनपा मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७(३) व प्रकरण २ अनुसूची ड५(२)(२) नुसार दुरुस्ती खर्च रु.७,३२,११९/-अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे वरील विषयाप्रमाणेच सदर विषय तहकूब करावा.

म.सभापती सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार सदर विषयावर चर्चा करुन माहिती घ्यावी तोपावेतो हा विषय तहकूब करण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १० दिनांक २३/२/२०२३

धुळे मनपा मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७(३) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२) नुसार दुरुस्ती खर्च रु.७,३२,११९/-अदा करणेबाबत प्रस्ताव मे.स्थायी समितीसमोर सादर झाला असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व सहमतीने सदर प्रस्तावाबाबत कार्यालयीन अहवालात स्पष्टता नाही. याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करुन सविस्तर माहिती सादर करावी तोपावेतो सदरचा विषय तहकूब ठेवणेस मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे
अनुमोदक:- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजूर
सही/- xxx
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१२ धुळे मनपा शिक्षण मंडळाकडील बंद पडलेल्या व चालू असलेल्या शाळांची पाणीपट्टी निर्लेखित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे .

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय क्रमांक १२ हा आपल्याशी संबंधीत आहे तर विषय क्रमांक १३ आपल्याशी संबंधीत नाही. यावर वेगळी चर्चा व्हावी. काही शाळा बंद आहे त्या ठिकाणी पेट्रोल पंप सुरु आहे मग आपण त्यांना पण पाणीपट्टी माफ करावी लागणार का?

म.कर.निरधा.अधिकारी या विषयामध्ये शाळांच्या नावाने असलेली पाणीपट्टी निर्लेखित करतो. पेट्रोल पंपाची निर्लेखित नाही करत आहोत. पेट्रोल पंपाला आपण वेगळी पाणीपट्टी बिले देत आहोत.

म.हर्षकुमार रेलन ४-५ वर्षापासून आपण पाणीपट्टीची बिलं वेगळी देतो. मी मुख्यलेखाधिकारी साहेबांकडे चर्चा सुध्दा केली, वेगळी बिले का देत नाही म्हणून? मालमत्ता करातून पाणीपट्टी वेगळी केली आहे. आणि प्रिंट केलेली ३ वर्षाची बिले लोकांना दिलेली नाही. आणि लोकांना थकबाकीदार ठरवले आहे. आणि त्यावर शास्ती लावली आहे.

म.कर.निरधा.अधिकारी आपण पाणीपट्टी वर थकबाकी लावत नाही.

म.हर्षकुमार रेलन मग थकबाकीदार का ठरवले आहे. आपल्या यंत्रणेमध्ये चूक झाली आहे. यापुढे एकच बिल देण्यात यावे सर्व कर एकत्र करुन पाणीपट्टीच का वेगळी केली? त्यामध्ये पाणीपट्टीचे थकबाकीदार वाढले आहे. पूर्वी एवढे थकबाकीदार कधीच नव्हते जेवढे आज दिसत आहे. यापुढे बिले एकत्रच देण्यात यावे हि विनंती.

म.सुनिल बैसाणे हा विषय धोरणात्मक विषय आहे. आपल्याला फक्त मंजूरी देण्याचा अधिकार आहे. आर्थिक बाबींना धोरणात्मक निर्णय असल्याने निर्णय घेण्याचा अधिकार महासभेला आहे. सदरचे दोन्ही विषयाची शिफारस महासभेसाठी करण्यात यावी.

म.कर.निरधा.अधिकारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ अन्वये वसुल न होण्या जोगा जो कर असतो तो निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीचा आहे. म्हणून स्थायी समितीपुढे सादर केला आहे.

म.सुनिल बैसाणे जर अशा प्रकारची नियमावली असेल तर कर्यालयीन टिपणी नुसार मंजूर करण्यात यावा. नसेल तर तपासून महासभेला पाठवावा.

सभापती कार्यालयीन अहवालास अधिन राहून व अधिनियमानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११ दिनांक २३/२/२०२३

म.न.पा शिक्षण मंडळ, धुळेकडील म.न.पा शाळा क्र.१ ते ३० या शाळा म.न.पा च्या प्रशसकीय इमारतीसाठी पाडण्यात आलेल्या आहेत तसेच म.न.पा.शाळा क्र.१५,१८ च्या जागेवर पोलीस पेट्रोल पाप कार्यान्वित आहेत व म.न.पा शाळा क्र.५१,५२ शिवजी नगर झोपडपट्टी येथे म.न.पा दवाखाना बाधण्यात आलेला आहे.तसेच इतरही खालीलप्रमाणे शाळा बंद आहेत.तरीही म.न.पा च्या शाळाना पाणीपट्टी आकरण्यात येत आहे.म.न.पा शिक्षण मंडळाकडे कुठल्याही उत्पनाचे साधन नसल्याने म.न.पा शिक्षण मंडळ,धुळे कार्यालयाकडून सदर पाणीपट्टी टॅक्स भरणे शक्य नाही व शासनाकडून देखील शाळेसाठी वेतना व्यतिरिक्त

कुठलेही वेतनेत्तर अनुदान मिळत नसल्याने म.न.पा.शिक्षण मंडळ,धुळे सदर टँक्स भरू शकत नाही.तसेच संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकानुसार धार्मिक आणि शैक्षणिक संस्थाच्या इमारतीवर कर माफ करण्यात आलेला असल्याने आपल्या शहरी भागातील म.न.पा शाळाना कर माफ होणेस विनती. तरी म.न.पा.च्या बंद पडलेल्या व कार्यरत शाळाचा पाणीपट्टी टँक्स हा कायम स्वरूपी माफ होणेस विनंती. सद्यस्थितीत बंद असलेल्या शाळा या बाबत म.न.पा शिक्षण मंडळ यांनी पत्र जा/क्र.आस्था/२०२२-२३/१९१ दि.२-११-२०२२ नमूद नुसार म.न.पा च्या सद्यस्थितीत बंद असलेल्या एकूण १२ शाळा त्यांची रक्कम रु. २२६५३४ व चालू असलेल्या एकूण ७ शाळा त्यांची रक्कम रु.७१००० पाणीपट्टी माफ होण्यास विनंती केली आहे.

अ .क्र	शाळा क्र	पाणीपट्टी नं	पाणीपट्टी रक्कम
१	म.न.पा शाळा क्र.1	W2ZAB370000019	१३०३६
२	म.न.पा शाळा क्र.1	W W2ZAB370000268	४४०८७
३	म.न.पा शाळा क्र.४	W2ZAB370000223	६७६०
४	म.न.पा शाळा क्र.१५	W2ZAB370000224	२११३५
५	म.न.पा शाळा क्र.२९	W2ZAB370000262	१०९६०
६	म.न.पा शाळा क्र.६	W1ZAB10000359	६७६०
7	म.न.पा शाळा क्र.६	W1ZAB10000360	५२०००
८	म.न.पा शाळा क्र.२३		
९	म .न.पा शाळा क्र.५-२४	W1ZAB10000228	१३०३६
१०	म.न.पा शाळा क्र.११,३९, १६,४२	W4ZCB1340000006	६७६०
११	म.न.पा शाळा क्र.२	W1ZAB30000134	२६०००
१२	म.न.पा शाळा क्र.१३,३३	W1ZAB30000133	२६०००
		एकूण	२२६५३४
१४	म.न.पा शाळा क्र.९	W1ZBB10000102	२२८६०
१५	म.न.पा शाळा क्र.8	W2ZAB370000222	६७६०
१६	म.न.पा शाळा क्र.१०	W3ZAB10000074	१३०३६
१७	म.न.पा शाळा क्र.१०	W3ZAB10000075	१०९६०
१८	म.न.पा शाळा क्र.४४	W2ZCB960000081	६७६०
१९	म.न.पा शाळा क्र.२०	W2ZCB960000080	६७६०
	म.न.पा शाळा क्र.२6,४०	W4ZCB1050000119	३८६४
		एकूण	७१०००

याबाबत पाणीपट्टी कायमस्वरूपी माफ करण्याबाबत मुंबई प्रांतीं अधिनियम १९४९ चे कलम १५२वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणे.मा.आयुक्तास स्थायी

मान्येतेने,कोणत्याही कारावद्दल किवा कोणतेही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चावद्दल येणे असलेली जि कोणतही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवळी निर्लेखितकरता येईल. या बाबत मा.आयुक्त सो यांनी दि .०८/१२/२०२२ रोजी च्या टिपणीस मंजूरी दिली असून सदर चा विषय मे स्थायी समिती पुढे ठेवण्याबाबतसादर सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा शिक्षण मंडळाकडील बंद पडलेल्या व चालू असलेल्या शाळांची पाणीपट्टी निर्लेखित करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ अन्वये मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजूर,
सही /-xxx
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३ महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ यांच्या वसाहती पाडण्यात आलेल्या मालमत्तावर आकारण्यांत आलेली

पाणीपट्टीच्या रक्कमा निर्लेखित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मनपा अधिनियमानुसार विषय मंजूर करावा.

म.कल्याणी अंपळकर सदरचा विषय मंजूर करावा.

सभापती कार्यालयीन अहवालास अधिन राहून व अधिनियमानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२ दिनांक २३/२/२०२३

म. अति आयुक्त सो यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ यांच्या कडून जागा पाडल्या बाबत पुरावा सादर करावा या बाबत अभिप्राय दिला होता.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ यांची वसाहत पडण्या बाबत पुरावा मागितला असता त्यांनी जागा पाडनी बाबत कार्य आदेश क्र.NO.ST/DCD/DE/WO/122 OFFICE OF THE DIVI.CONTROLLER,S.T.DHULE,DATE:-03/02/2017 नुसार जागा बखळ करण्यात आली असे. तरी या बाबत सदर चे बिल देयक रु.७००००० रद्द करण्या बाबत योग्य त्या आदेसास्तव सादर. म. अति आयुक्त यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महा मंडळ यांचे टिपणी सादर केली असता रद्द करण्याचे अधिकार कोनला आहे.अधिनियमच्या तरतुदी नुसार सादर करा असे अभिप्राय दिले होते.त्यानुसार महाराष्ट्र

राज्य परिवहन महा मंडळ यांचे याबाबत पाणीपट्टी कायमस्वरूपी माप करण्या बाबत मुंबई प्रांती अधिनियम १९४९चे कलम १५२वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणे .मा.आयुक्तास स्थायी मान्यतेने,कोणत्याही काराबद्दल किवा कोणतेही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जि कोणतही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवळी निर्लेखितकरता येईल. या बाबत मा.आयुक्त सो यांनी दि . २८/११/२०२२ रोजी च्या टिपणीस मंजूरी दिली असून सदर चा विषय मे स्थायी समिती पुढे सविनय सादर.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा शिक्षण मंडळाकडील बंद पडलेल्या व चालू असलेल्या शाळांची पाणीपट्टी निर्लेखित करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२अन्वये मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे
अनुमोदक:- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजूर
सही/- xxx
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१४ श्री.विजय नरेश पवार रा.धुळे यांनी सेप्टी टॅक उपसण्यासाठी ना हरकत दाखला देणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे या विषयावर प्रशासनाने खुलासा करावा.

म.अति. आयुक्त आपण मनपा हद्दीत जे खाजगी सेफटी टँक होते ते उपसण्यासाठीची परवानगी देण्याचे धोरण अवलंबले आहे. त्या नुसार यापुर्वी आपण ३ जणांना दिले आहे. त्यानुसार २३% रॉयल्टी आपल्याला मिळत असते. यामध्ये आपण काम विनानिविदा देत असतो.

म.सुनिल बैसाणे आपल्या धुळे मनपात स्वत:च्या मालकीची व्हॅक्युम गाडी नाही. तर १५ व्या वित्त आयोगामध्ये तशा काही तरतुदी असतील तर पहावे माझ्या माहितीनुसार ८-१० गाडया लागणार आहे. किमान ५ गाडयांचे येणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये त्या पध्दतीने नियोजन करा. मनपाच्या फायद्याचा विषय आहे मंजूर करण्यास हरकत नाही.

म.हर्षकुमार रेलन यामध्ये ४१ घरे प्रति दिवस एवढी गरज आहे. मागे कापडणीस सो. पण सांगितले होते नगरपालिकेची पावती घेऊन दिड महिन्यामध्ये उपसा करण्यासाठी लागतात. आणि त्वरीत करायचे असेल तर पावती लागणार नाही. तुम्ही आता सुध्दा फोन करुन बघा महापालिकेचे माणसे जातात, मनपाची गाडी जाते पण ते २३% रॉयल्टी देत नाही. रोजचे ४१ घरे होत असतील किंवा ३० घरे होत असतील परंतु २५ घरांची रॉयल्टी सुध्दा येत नाही. नगरपालिकेला

डावलून ते ठेकेदार कामे करत आहे. कुठेही त्याची नोंद होत नाही. महिन्याला किती घरे होत आहे हे तपासले पाहिजे. त्यावर कार्यवाही करावी.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३ दिनांक २३/२/२०२३

आपल्या धुळे महानगरपालिकेच्या हद्दीतील खाजगी व सरकारी, शासकीय व निमशासकीय तसेच सार्वजनीक प्रसाधन गृहाचे सेप्टीक टँक खाली करण्यासाठी मी स्वत: सेप्टी टँक क्लिनींग व्हॅक्युम लोडर ३ KFC (मैला टँकर वाहन) घेतले असुन मी अनुसुचीत जाती मधील वाल्मीक मेहतर समाजाचा (SC-१२) आहे. वंशपरंपरागत मानवी मलमुत्र साफ करण्याचे काम करणाऱ्या समाजा मधील आहे. तरी मी बेरोजगार असुन मला आपल्या मार्फत ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यास रोजगार मिळुन मला शासनाच्या नियमानुसार न्याय मिळेल. त्यानुसार त्यांनी सेप्टीक टँक क्लिनींग व्हॅक्युम लोडर ३ KFC (मैला टँकर वाहन) चे संपुर्ण कागदपत्र व फोटो सोबत सादर केलेले आहे. व तसेच सदर पत्रासोबत मा.जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मार्गदर्शक यांच्या दि.२०/१/२०१८ च्या पत्रात शासन निर्णयानुसार साफसफाई व स्वच्छतेची कामे स्थानीक जिल्ह्यातील वाल्मिकी मेहतर (SC-१२) समाजाच्या बेरोजगार लोकांना / संस्थांना कामे देवुन त्या संवर्गातील बेरोजगार उमेदवारांना विकास कामाचा प्रवाहात आणावे असे नमुद केले आहे व तसे सदर प्रस्ताव सोबत सदर कार्यालयाचे पत्र जोडलेले आहे.

शासन निर्णयानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत शहर हागणदारी मुक्त करतांना शहरातील ज्या भागात मलनि:सारण व्यवस्था अस्त्विात आहे अशा भागातील शौचालये मैला व्यवस्थापनाच्या दृष्टीने मलनिस:रण व्यवस्थेस जोडण्यात आली आहेत व ज्या भागात मलनि:सारण व्यवस्था नाही अशा भागातील शौचालय सेप्टीक टँकला जोडण्यात आलेली आहेत. शहरातील शौचालयाच्या सेप्टीक टँक मधील मैलाचे सुरक्षित व नियमीत व्यवस्थापन व प्रक्रिया करणे आवश्यक असल्याने शासनाने याबाबत ज्या शहरामध्ये मलनि:सारण प्रक्रिया (STP) आहे परंतु काही भागात मलनि:सारण व्यवस्था नसल्याने जी शौचालये सेप्टीक टँकला जोडण्यात आली आहेत अशा भागातील शौचालयाच्या सेप्टीक टँक मधील मैलाचे सुरक्षित व नियमीत व्यवस्थापन व प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने या शौचालयाच्या सेप्टीक टँक ठरावीक कालावधीनंतर व्हॅक्युम ऐम्प्टीयरने रिकाम्या करुन त्या मैल्यावर शहरात उपलब्ध असलेल्या प्रक्रिया केंद्रावर १००% व्यवस्थापन करुन प्रक्रिया करण्यात यावी.धुळे महानगरपालिका ड वर्ग महानगरपालिका असुन एकुण क्षेत्रफळ १०१.०८ sqkm एवढे आहे. धुळे शहराची सद्याची लोकसंख्या ४५८२९४ असुन रहिवाशी घरांची संख्या ८५७३२ आहे. यापैकी ६५९४५ घरांची शौचालय आहेत. त्यापैकी २१०४७ मलनि:सारण व्यवस्थेस जोडण्यात आली आहेत व ४४८९८ घरांची शौचालय सेप्टीक टँकला जोडलेली आहेत.तसेच शहरातील सार्वजनीक शौचालय संख्या १४० असुन त्यापैकी ४० शौचालय मलनि:सारण व्यवस्थेस जोडण्यात येणार आहेत.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या मैला व्यवस्थापन मार्गदर्शन सुचनेनुसार दर तीन वर्षांनी एकदा सेप्टीक टँक खाली करणे आवश्यक असल्याने दररोज ४१ घरांची सेप्टीक टँक खाली करणे

अपेक्षीत आहे. सद्या शहरात ३ व्हॅक्युम एम्प्टीयर कार्यरत आहेत. दररोज ५ घरांची सेप्टीक टँक जरी खाली केल्यात तरी एकुण शहरासाठी ८ व्हॅक्युम एम्प्टीयरची आवश्यकता आहे.

यापुर्वी सेप्टीक टँक खाली करण्याकामी सन २०१२ मध्ये रॉयल्टी बेसवर जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेत सर्वात जास्तीचे २३% रॉयल्टीदर श्री.राजेश महुकर यांचे प्राप्त झाल्याने त्यांना धुळे मनपा कार्यक्षेत्रात व्हॅक्युम गाडीद्वारे सेप्टीक टँक खाली करण्याकामी ना हरकत दाखला देण्यात आला होता. त्यानुसार नागरीक इकडील कार्यालयात सेप्टीक टँकची फी भरणा केल्यानंतर संबंधीत ठेकेदारास सेप्टीक टॅक उपसण्याचे काम देण्यात येत असते. त्यानुसार सदर संस्था एकत्रीत खाली केलेल्या सेप्टीक टँकचे जमा झालेल्या रक्कमेवर २३% रॉयल्टी मनपा कपात करुन उर्वरीत रक्कम अदा करण्यात येत असते.

त्यानुसार धुळे मनपा हद्दीतील खाजगी सेप्टी टँक उपसणेकामी महानगरपालिके मार्फत खालील व्यक्तींना ना हरकत दाखला देण्यात आलेला आहे.

१) श्री.देवेंद्र बाळकृष्ण बियाणी:-जा.क्र./धुमपा/आरोग्य/३५७दि.२७/९/२०१८अन्वये ३ वर्षाकरीता

२) श्री.प्रशांत गोपाल अग्रवाल:-जा.क्र./धुमपा/आरोग्य/५९४ दि.७/११/२०१९ अन्वये ३ वर्षाकरीता

३) श्री.अक्षय संजय अंपळकर :- जा.क्र./धुमपा/आरोग्य/६९ दि.२/८/२०२१ अन्वये ३ वर्षाकरीता

उक्त तीघांपैकी अ.क्र.१ व २ हे त्यांनी करुन दिलेल्या करारनाम्याच्या अटी शर्तीनुसार शहरातील खाजगी सेप्टी टँक उपसण्याचे काम करीत आहे.

त्याअनुषंगाने अर्जदार श्री.विजय नरेश पवार यांना उक्त प्रमाणे २३% रॉयल्टी कपातीच्या धर्तीवर शहरातील खाजगी सेप्टी टँक उपसण्याचा ना हरकत दाखला देण्यास पुढील योग्य त्या निर्णयास्तव अहवाल सादर करण्यात आला असता सदर अहवालावर मा.अति.आयुक्त सो. यांनी चर्चा करुन खालील प्रमाणे अभिप्राय दिला आहे.

- दर ६००/- रु. सिट
- ४१ घरांचा महसुल ६००x४१=२४६०० प्रतिदिवस
- ३० दिवसांचा =३० x२४६००=७३८०००/- रुपये
- त्यात मनपास प्राप्त होणे अपेक्षित = ७३८००० x२५=१६९७४०/-

१००

- म्हणजे वार्षिक अंदाजे = २०.३६ लक्ष

  परंतु महानगरपालिकेस अर्थसंकल्पाचे अवलोकन करता २० लक्ष इतके महसुल प्राप्त होत नसल्याचे दिसते.
- तसेच दर २०१२ चे ६००/- रुपये आहेत. आता ते वाढविणे आवश्यक असुन त्यानुसार उत्पन्नही वाढणे अपेक्षित राहील.
- तसेच शहराची हद्दवाढही झालेली आहे. म्हणजे संख्यादेखील वाढणे अपेक्षित आहे. (४१ पेक्षा जास्त) त्याअनुषंगाने उत्पन्न वाढ अपेक्षित करता येईल.

त्याअनुषंगाने मा.आयुक्त सो.यांनी सदर प्रस्तावावर धोरण ठरविणेकामी व याकामी स्थायी समितीमध्ये पाठविण्यास हरकत नसल्याचे नमुद केले आहे.तरी सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्री.विजय नरेश पवार रा.धुळे यांनी सेप्टी टॅक उपसण्यासाठी ना हरकत दाखला देणेस मान्यता देण्यात येत आहे. याबाबत आवश्यक त्या अटी व शर्तीचा करारनामा संबंधितांकडून करून घेण्यात यावा. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र

सर्वानुमते मंजूर

सही /-xxx

सभापती

स्थायी समिती

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१५ प्र.क्र.७ मध्ये मनपा निधी अंतर्गत देशमुख वाडा येथील मनपा जागेत ओपनस्पेस येथे सभा मंडप बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव सदरचा विषय मंजूर करावा. पण सुरूवातीला बांधकाम विभागचे अभिनंदन करतो, या ठिकाणी निविदा प्रसिध्द झाली ३ महिन्यापूर्वी २ महिन्यांत हा विषय दरमंजूरीला स्थायी समितीपुढे आला आनंदाची गोष्ट आहे. परंतु शहरातील दुसऱ्या वार्डातील एक फाईल आहे त्याची दर मंजूरी १३/१/२०२२ ला झाली आहे. एक वर्ष आणि दीड महिना झाला अजून दर मंजूरी नाही. त्यावर उपायुक्तांनी शेरा मारला आर्थिक वर्ष संपुष्टात आल्यामुळे दर मान्यता देता येणार नाही. पुढील निर्णयार्थ सादर. ती फाईल परत बांधकाम विभागात आली. सदरचे काम स्पिल ओव्हरमध्ये अनुक्रमांक ७८ मध्ये आहे. विषय क्रमांक १५ ची फाईल् जशी वेगाने फिरत आहे तशी याकामाची ही फिरावी.हि विनंती.

म. रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४ दिनांक २३/२/२०२३

प्र.क्र.७ मध्ये मनपा निधी अंतर्गत देशमुख वाडा येथील मनपा जागेत ओपनस्पेस येथे सभा मंडप बांधणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.20/10/2022 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.44,99,632/-मात्र रकमेसआर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./337/2022-23 दि.20/10/2022 अन्वये रक्कम रु. 44,99,848/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु..वि./761/2022-23 दि. 01/11/2022 अन्वये दि.02/11/2022 रोजी दैनिक नवराज्य/खानदेश मैदान या वृत्तपत्रात

जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.25/11/2022 रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
1	श्री.अे.के.सैफी	शे.2.00 % जास्त	
2	श्री.सौरभ संजय कदमबांडे	शे.3.00 % जास्त	
3	श्री.आनंद अहिरराव	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री.आनंद अहिरराव यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री.आनंद अहिरराव यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर मंजुरीसत्व सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी श्री. आनंद अहिरराव यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र
अनुमोदक:- श्री.रंगनाथ रतन ठाकरे **सर्वानुमते मंजूर**

सही /-xxx
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१६ मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.9 मध्ये ग.नं.7 येथे सामाजिक भवन बांधणे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.दगडू बागूल विषय मंजुर करण्यांत यावा.
म. सावीर मो.शेख विषय मंजुर करण्यांत यावा.
म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५ दिनांक २३/२/२०२३

मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.९ मध्ये ग.नं.७ येथे सामाजिक भवन बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं.२०० दि.०६/१०/२०२२ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.३०/०९/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३९,९९,०३६/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.
उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२५७/२० दि.३०/०९/२०२२ अन्वये रक्कम रु. ४१,७९,९१०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./८७/२० दि.०७/१०/२०२२ रोजी दैनिक सकाळ/श्रमराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत

येऊन दि.२८/१०/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
1	श्री.ऋषभ सतिष खिवसरा	शे.3.00 % जास्त	
2	मे.हिंद कन्सट्रक्शन	शे.2.00 % जास्त	
3	मे.एकविरा कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ४१,७९,९१०/-इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे अंदाजपत्रक दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीयआहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर मंजुरीसत्व सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागुल

अनुमोदक:- श्री. साबीर महिबुल्लाह मो. खान

सर्वानुमते मंजूर,
सही /-xxx
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७ दि.५ व ६ नोव्हेबर रोजी जामफळ तलाव मध्ये बांधित होणारी तापी पाणी पुरवठा योजनेची पाईप लाईन वरील जॉईन्टर्स व पॅचवर्कचे काम करणे तांतडीने करणेसाठी झालेला रु. १४२८१२/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७(३) प्रमाणे कर्योत्तर मंजूरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म.नाजियाबानो पठाण विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६ दिनांक २३/२/२०२३

दि.५ व ६ नोव्हेबर रोजी जामफळ तलाव मध्ये बांधित होणारी तापी पाणी पुरवठा योजनेची पाईप लाईन वरील जॉईन्टर्स व पॅचवर्कचे काम करणे करीता पाणी पुरवठा १ दिवसांसाठी बंद करण्याबाबत निश्चित करण्यात आले.

सदरच्या तापी योजना बंदच्या कालावधीमध्ये या पाईप लाईन जॉईन्टर्स व पॅचवर्कचे काम करणे बाबत आदेशीत करण्यात आले असल्याने या उपलब्ध वेळेमध्ये खालीलप्रमाणे कामे करणे आवश्यक आहे.

१) बाबाजी हॉटेल नरडाणा जवळील एक्पॉन्शन पॉईन्ट.
२) नरडाणा रेल्वे पुलाजवळील बंद डेअरी जवळीलभुमिगत पाईप पॅच वर्क करणे.
३) दभाशी फाटा येथील भुमीगत पाईप लाईन पॅचवर्क करणे.
४) सोनगीर फाटा पुला जवळील दक्षिणेकडील बाजुस लिकेज दुरूस्ती करणे.
५) सुखवद रस्त्यावरील भुमिगत पाईपलाईन दुरूस्ती करणे.
६) सुखवद पंपीग स्टेशन जॉईन्ट दुरूस्ती करणे.
७) देवभाने सागर हॉटेल समोर पॅचवर्क करणे.

वरील प्रमाणे कामे पाणी पुरवठा बंदस्थिती मध्ये करून घेणे गरजेचे असुन उक्त प्रमाणे कालावधीत सदरची कामे करणे शक्य आहे.करीता सदरची कामे करण्यासाठी तातडीची बाब म्हणुन तातडीचे व या उपलब्ध कालावधीत करून घेणे गरजेचे असल्याने मे.सम्राट थोरात या मक्ते दाराकडुन तात्काळ करून घेण्यात आले. उक्त प्रमाणे झालेल्या कामाकरीता शासन दर सुची प्रमाणे व 18 % जी.एस.टीकरासहखर्चरू.१४२८१२/- मात्र आहे.

वरील प्रमाणे पाणीपुरवठा योजनेच्या काममध्ये उपलब्ध असलेल्या वेळेत सदरचे काम तातडीने व गरजेचे असल्याने करून घेण्यात आले असुन सदरच्या कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) क नुसार खर्च रक्कम रूपये १४२८१२/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी होण्यास मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदरच्या कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) नुसार खर्च रक्कम रू. १४२८१२/- मात्र खर्चास कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक:- श्रीमती नाजियाबानो नासिर खा पठाण **सर्वानुमते मंजूर,**

सही /-xxx

सभापती

स्थायी समिती

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८ दि ०५नोव्हेबर तापी पाणी पुरवठा योजनेच्या पाईप लाईन वरील सोनगीर गावाजवळ पाईप बदलणे कामी झालेला रु. २,३६,०७३ /- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७(३) प्रमाणे कार्योत्तर मंजूरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. खान मो. साबीर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७ दिनांक २३/२/२०२३

दि.०५ नोव्हेंबर रोजी जामफळ तलाव मध्ये बांधित होणारी तापी पाणी पुरवठा योजनेची पाईप लाईन काढुन टाकणे साठी नविन उभारणी करण्यात आलेली पाईप लाईन जुने पाईप लाईनशी जोडणी करणे करीता पाणी पुरवठा 1 दिवसांसाठी बंद करण्याबाबत निश्चित करण्यात आले.

सदरच्या तापी योजना बंदच्या कालावधी मध्ये या पाईप लाईन वरील मोठे पॅच वर्क, खराब पाईप बदलणे व लिकेजेस दुरूस्तीचे कामे करणे बाबत आदेशीत करण्यात आले असल्याने या उपलब्ध वेळे मध्ये तातडीचे काम पुर्ण करण्यात आले.

सोनगीर गावाजवळ बोहरी चुना फॅकट्री लगत भुमिगत पाईप लाईन अत्यंत जिर्ण झाली असुन वारंवार लिकेज होत असल्याने तसेच सदरील लिकेजेस भुमिगत असल्याने या भुमिगत कामासाठी दिर्घ वेळ पाणी पुरवठा बंद करावा लागतो.या कारणाने पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेत वारंवार अडथळा येत असल्याने व सदरच्या जागेवर पाईप लाईन मध्ये सुमारे 4 ते 5 मीटरचा भाग हा जिर्ण झालेला व वेल्डींग होण्यासाठी सुध्दा शक्य नसल्याने बदलण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

सदरचे काम अंत्यत तातडीचे व या उपलब्ध कालावधीत करून घेणे गरजेचे असल्याने मे.सम्राट थोरात या मक्तेदाराकडुन तात्काळ करून घेण्यात आले.सदरच्या कामी 4 मीटर लांबीचा 9.65 एम.एम व्यासाचा पाईप बदलण्यात येऊन खोदकाम बुजुन सदरच्या पाईप लाईन वर सिमेंट क्रॉक्रीट ब्लॉक टाकण्यात आला. उक्त प्रमाणे झालेल्या कामाकरीता शासन दर सुची प्रमाणे व 18 % जी.एस.टी करासह खर्च रू.२,३६,०७३/- मात्र आहे.वरील प्रमाणे जामफळ पाणी पुरवठा योजनेच्या कामामध्ये उपलब्ध असलेल्या वेळेत सदरचे कामतातडीने व गरजेचे असल्याने करून घेण्यात आले असुन सदरच्या कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) नुसार खर्च रक्कम रू.२,३६,०७३/-मात्र खर्चास कार्यात्तर मंजुरी होण्यास म.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदरच्या कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) नुसार खर्च रक्कम रू.२,३६,०७३/-मात्र

खर्चास कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. चौधरी नरेंद्र रुपला

अनुमोदक:- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह **सर्वानुमते मंजूर**

सही /-xxx

सभापती

स्थायी समिती

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-१९ छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पुतळ्याचे सुशोभिकरण करणेकामी झालेला खर्च रु. २,३४०५९/-मात्रला तांतडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये व ५ (२) (२) अन्वये विना निविदा करणेस मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८ दिनांक २३/२/२०२३

महाराष्ट्रात किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव आदराने घेतले जाते. ज्यांची साहस कथा, विचार तत्वज्ञान आजही सर्वांना प्रेरणा देतात, अशा छत्रपती शिवाजी महाराज यांची दि. १९/०२/२०२३ रोजी जगभरात मोठ्या उत्साहाने साजरी केली जाणार आहे. त्याअनुषंगाने शहरातील मनोहर टॉकीज येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची तात्काळ पाहणी करून सदर पुतळा रंगरंगोटी, आजूबाजूच्या परिसराचे आवश्यक असलेली सुशोभिकरण करणे व तत्सम आवश्यक कामे करणे बाबत संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार सदरील ठिकाणी रंगरंगोटी व सुशोभिकरण करणे कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु. २,३४,०५९/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम तात्काळ करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा मे. शहीद अंजुम शकील अहमद, ठेकेदार,धुळे यांचे कडुन करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७(३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु. २,३४,०५९/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पुतळ्याचे सुशोभिकरण करणेकामीझालेला खर्च रु. 2,34059/-मात्रला तांतडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67

(3) क अन्वये व 5 (2)(2) अन्वये विना निविदा करणेस कार्यात्तेर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. चौधरी नरेंद्र रुपला

अनुमोदक:- श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम

सर्वानुमते मंजूर

सही/- xxx

सभापती

स्थायी समिती

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- २० धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.महापौर सो.यांचे सेवेतील मनपा वाहन क्र. एम.एच.१८बी.जी. ००१९ वाहनांचे नविन बॅटरीचे दरपत्रक मागविणेस व अंदाजीत खर्च रक्कम ₹.८३००/-मात्रला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म.नाजियाबानो पठाण विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९ दिनांक २३/२/२०२३

धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.महापौर सो.यांचे सेवेतील मनपा वाहन क्र.एम.एच.१८बीजी.००१९वाहनांचे वाहन चालक व हेल्पर म.महापौर यांचे अहवाल सादर केल्या नुसार वाहन विभागाकडुन योगेश ॲटो स्टोअर्स, धुळे यांना जा.क्र./ धुमपा/ वा.वि./ दि.१६/०९/२०२२ अन्वये वाहनांची तपासणी करुन त्यांचे अहवाला नुसार वाहनांची बॅटरी डिस्चार्ज झालेली आहे. त्यामुळे बॅटरी तपासणी केली असता सेल निकामी झालेला असल्यामुळे बॅटरी डिस्चार्ज होत आहे. खालील प्रमाणे नविन बॅटरी खरेदी करावी लागेल. असे हेल्पर व विभागप्रमख यांनी तांत्रीक अहवाल तपासुन अहवाल सादर केला आहे वाहन हे म.महापौर सेवेतील असल्यामुळे नविन बॅटरी नग-१ खरेदी करणे आवश्यक आहे. इस्टिमेट येणेप्रमाणे

अ.क्र.	साहित्य तपशील	नग	दर	एकुण रक्कम
१	एक्साईड ,एक्सप्रेस १० SD३१ L बॅटरी	0१	९५३७	९५३७=00
	जुनी स्क्रॅप बॅटरी रक्कम वजा	0१	१२३७	१२३७=00
			सर्व करासहित रक्कम	८३००=00

सदर नविन बॅटरी खरेदी खर्च रक्कम ₹.८३००/- नविन साहित्याची नॉंद प्रमाणितकेल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल. सदर दुरूस्ती कामे ही पुर्व मान्यतेसाठीच ठेवण्यात आले आहे. म.न.पा. हेल्पर व विभाग प्रमुख यांनी तांत्रिक अहवाल दिलेला आहे.

सामान्य प्रशासन विभाग (वेतनेत्तर खर्च) वाहन दुरूस्ती सन २०२२-२३आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकीय तरतुद १) ₹.१०,००००००/- २) पुर्वीचा खर्च- ₹.१,४८,६१६ ३) या बिलातील खर्च ₹.८३००/- आहे.४) २ व ३ ची बेरीज ₹.१,५६,९१६/- आजपावेतो उपलब्ध शिल्लक ₹.८,४३,०८४/- मात्र आहे. त्यानुसार अंदाजपत्रकीय तरतुद मधुन खर्च करता येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार खर्च रक्कम ₹.८३००/- मात्रला मा. आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत. म.आयुक्त सो. यांनी मनपा अधिनियम कलम ६६ (२) व ६९ नुसार रक्कम ₹.५,००००००/-(पाच लक्ष) पर्यंत खर्चाचे अधिकार आहेत त्यानुसार जा.क्र./धुमपा/आस्था/७७७ दि:२९/९/२०२१ नुसार आर्थिक बाब प्रदानापुर्वी म. आयुक्त सो यांची पुर्व मान्यता घेण्यात येऊनच पुढील कार्यवाही करावी. असे नमुद आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन (मुख्यकार्यालय) विभागाकडील महापौर सेवेतील वाहन क्र. एम.एच.१८ बीजी.००१९ वाहनांस बॅटरी नग-१ खरेदी खर्च सर्व करासहित रक्कम ₹.८३००/- (अक्षरी-आठ हजार तीनशे रूपये) मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक तसेच आर्थिक वर्ष दुरूस्ती खर्च मर्यादा ओलांडत असल्यामुळे मे. स्थायी समितीकडे मंजुरी मिळणेस व दरपत्रक मागविणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.महापौर सो.यांचे सेवेतील मनपा वाहन क्र. एम.एच.18बी.जी. 0019 वाहनांचे नविन बॅटरीचे दरपत्रक मागविणेस व अंदाजीत खर्च रक्कम ₹.8300/-मात्रला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक:- श्रीमती नाजियाबानो नासिर खा पठाण

सर्वानुमते मंजूर,
सही/- x x x
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- २१ अमृत अभियानांतर्गत धुळे पाणीपुरवठा योजना अक्कलपाडा धरण उद्भव येथे विद्युत पुरवठा उपलब्ध करण्याबाबत असलेल्या कामाच्या अंदाजपत्रकास अतिरिक्त बाब म्हणून S.L.T C. च्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे धुळे मनपाच्या इतिहासामध्ये प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या संबंधामुळे जर मनपाची हिताची गोष्ट होत असेल तर प्रशासनाचे कौतुक केले गेले पाहिजे. पाणी पुरवठयाच्या योजनेमध्ये चांगले काम केले असेल तर आयुक्त सो. आणि तुमच्या सोबत असलेल्या सर्व यंत्रणेचे अभिनंदन आणि आभार व्यक्त करणार आहे. कारण स्वतंत्र उपकेंद्र त्या ठिकाणी होणार आहे. या ठिकाणी सभागृहाला अवगत व्हावे म्हणून या विषया संबंधी स्पष्टीकरण द्यावे.

म.विद्युत अभियंता — अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेसाठी महावितरण कंपनीशी आपली चर्चा झाली. त्यावेळचे अधिक्षक अभियंता यांनी स्पेशल केस म्हणून अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना ३३ KVA वरुन नेता येईल असा अभिप्राय दिला. मा. आयुक्त व उपायुक्त सो. यांच्याशी चर्चा झाल्याप्रमाणे आपण विशेष बाब म्हणून प्रस्ताव पाठवला महावितरण कंपनीने त्यांचे मुख्य कार्यालय बांद्रा यांनी स्वतंत्र उपकेंद्र मंजूर केले. आपल स्वतंत्र उपकेंद्र असणार आहे. त्यासाठी टेंडर मध्ये फेरबदल झाले त्यासाठी हा विषय मंजूरीसाठी आला आहे. आणि आपण शासनाची मान्यता घेणार आहोत.

म.विजय जाधव — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रसतावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २० दिनांक २३/२/२०२३

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांनातर्गत धुळे पाणी पुरवठा योजना ता. जि. धुळे योजनेस मान्यता प्राप्त आहे. सदरचे काम प्रगतीत असुन अंतिम टप्यात आहे. अक्कलपाडा उदभव येथे नविन विज कनेक्शन घेण्यासाठी अर्ज सादर करण्यात आलेला होता.

विशेष बाब म्हणून केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत धुळे पाणी पुरवठा योजना अक्कलपाडा धरण येथे नविन विज जोडणी घेणे बाबत अक्कलपाडा धरणाच्या लगत 33 के.व्ही विज वाहिनी वरून विज जोडणी साठी मुख्य अभियंता (टेस्टिंग) प्रकाशगड बांद्रा मुंबई कार्यालय व म. अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि कं. धुळे कडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे.

म. अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि कं, धुळे यांच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रमाणे सदर प्रस्तावाच्या अतिरिक्त बाब म्हणून सदर प्रस्ताव मान्यता करणेसाठी कार्य अभियंता (या) यांना देण्यात आले. मुख्य अभियंता मजिप्रा नाशिक संबधित वाढीव अतिरिक्त बाब च्या कामासाठी (जि.एस.टी करासह) मात्र च्या खर्चास तांत्रिक मान्यता दिलेली आहे. सदरील अतिरिक्त बाब म्हणून खर्चासाठी मान्यता घेणे आवश्यक असल्याने कार्य, अभियंता महाराष्ट्रजीवन प्राधिकरण, विभाग जळगाव यांनी पत्र क्र / ताशा (यां)/385/2023 दि. 10/02/2023 पत्रानुसार कळविले आहे.

अक्कलपाडा पाणी पुरवठा केंद्र योजनेच्या यांत्रिकी कामाकरीता कार्यादेश धुमपा/जा.क्र. 4 दि.29/07/2022 नुसार 7,42,83623/- मात्र रक्कमे करीता शे. 9.5 % जास्त दर में बडगुजर ॲण्ड कंपनी, नाशिक यांना कार्यादेश देण्यात आलेले आहे. सदर कामाच्या निविदेतील शर्त क्र.33 प्रमाणे बी-1 निविदेमध्ये समावेशीत नसलेले बाबी करण्या बाबतची तरतुद आहे. तसेच शर्त क्र. 34 मध्ये सुध्दा कामाचे वाढ किवा बदल या प्रमाणे करण्याची तरतुद आहे. तसेच निविदेतील शर्त क्र.38 मध्ये वाढीव काम 25 % मर्यादेमध्ये करण्याबाबतची तरतुद आहे.

अक्कलपाडा पाणी पुरवठा योजनेच्या तातडीच्या कार्यान्वयन होण्यासाठी म.रा.वि. कंपनी कडुन मिळालेल्या 33 के. की विज जोडणी करण्याचे काम तातडीने अल्प काळात

करून घेणे गरजेचे आहे. सदयास्थितीत उक्त प्रमाणे बडगुजर ॲण्ड कंपनी यांना उक्त यांत्रिकी व विदयुत कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. ज्या मध्ये विज जोडणी करीता ट्रान्सफॉर्मर, व्ही. सी. बी व अन्य उपकरणे समावेशीत आहे. महावितरण कडील मान्यते प्रमाणे यामध्ये बदल होणार आहे. करीता उक्त प्रमाणे महाराष्ट्र जिवन प्राधिकरणा यांच्या पत्रानुसार अक्कलपाडा पाणी पुरवठा योजनेची विज जोडणी तसेच LILO Arrangement_ Transformarव अनुषंगीक कार्य करणे करीता निविदेतील बाब क्र. 33.34 व 38 प्रमाणे अतिरीक्त बाद म्हणून काम करण्याकरीता म.न.पा आयुक्त सो यां दि.11/01/2023रोजीच्या मान्यतेप्रमाणे मजिप्रा जळगाव यांना प्रस्ताव पाठविणेस आला.

मुख्य अभियंता मजिप्रा नाशिक यांच्या पत्रानुसार योजनेच्या आवश्यकतेनुसार सदर प्रस्ताव तांत्रिकदृष्टया योग्य असल्याचे निदर्शनास येत आहे. त्या अनुषंगाने विषयांकित योजनेच्याअक्कलपाडा धरण उद्भव येथे विद्युत पुरवठा उपलब्ध करण्याबाबतच्या कामाचे अंदाजपत्रक रु. 5,28,85,247/- ढोबळ (18% जी. एस. टी. सह) किंमतीच्या अंदाजपत्रकास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून तांत्रिक सहमती देण्यात आली आहे. सदर कामी बडगुजर ॲण्ड कंपनी, नाशिक यांनी सहमती दिली आहे. तसेच सदर प्रस्तावास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेणेबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी बाबत कळविले आहे...

सदर योजनेच्या मुळ प्रस्तावास क्र. अमृत - 2022 /प्र.क्र.२४ /नवि- ३३ नगरविकास विभाग दि.28/04/2022 नुसार SLTC मान्यता प्राप्त आहे. उक्त कामाच्या अंदाजपत्रकास अतिरिक्त बाबत म्हणून SLTC च्या मंजुरी घ्यावयाची असल्याने असल्याने याबाबत त्वरित विषय स्थायी समिती मध्ये ठेवणे आवश्यक आहे. अमृत अभियांनातर्गत धुळे पाणी पुरवठा योजना ता.जि धुळे अक्कलपाडा धरण उद्भव येथे विद्युत पुरवठा उपलब्ध करण्याबाबत चे कामाच्या अंदाजपत्रकास अतिरिक्त बाब म्हणून SLTC च्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविणेसाठी मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून अमृत अभियानांतर्गत धुळे पाणीपुरवठा योजना अक्कलपाडा धरण उद्भव येथे विद्युत पुरवठा उपलब्ध करण्याबाबत असलेल्या कामाच्या अंदाजपत्रकास अतिरिक्त बाब म्हणूनS.L.TC.च्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक:- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजूर,

सही/- x x x

सभापती

स्थायी समिती

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ४ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २४/०३/२०२३
वेळ :-दुपारी ३-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समिती सभा क्रं.०४ अंदाजपत्रकीय दि.२८/२/२०२३ रोजी तहकूब करण्यांत आलेली सभा आज **गुरुवार दिनांक २४/०३/२०२३ रोजी दुपारी ३-०० वाजतां सौ.किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती**, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. देविदास टेकाळे	आयुक्त
२	श्री विजय सनेर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी

५	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी
६	श्री. सुनिल कौतिकराव सुर्यवंशी	अंतर्गत उपमुख्य लेखापरीक्षक
७	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
८	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
९	श्री. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
१०	श्री.चंद्रकांत मोरे	लेखापाल
११	श्री. एस.व्ही. बर्गे	वरिष्ठ सहा. आस्थापना विभाग
१२	श्री. किशोर सुडके	प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख
१३	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१४	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल तथा आरोग्य विभाग प्रमुख
१५	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ
१६	श्री. कमलेश सोनवणे	नगररचना ओव्हरसिअर
१७	हेमंत पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१८	श्रीमती कल्पना जाधव	अभिलेखापाल
१९	श्रीमती मिना सातभाई	महिला बालकल्याण विभाग
२०	श्री.सुक्राम राऊत	वाहन विभाग प्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.प्र.नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-२२ — मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडील जा.क्रं.धुमपा/लेखा/६२४ दि. २३/२/२०२३ रोजीच्या पत्रानुसार सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती — महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९६ नुसार सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रक आज मी सादर करीत आहे.

आदिमाया आदिशक्ती खान्देश कुलस्वामिनी श्री. आई एकविरा मातेचे मंदिर पांझरा नदीच्या किना-यावर वसलेले आहे. साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या आदिशक्तीची ही भुमी अनेक धार्मिक स्थळांमुळे पावन भुमी मानली जात असुन या शहराचा इतिहासही खुप मोठा आहे. जयपुर व चंदिगड प्रमाणे कॅप्टन ब्रिग्ज या जिल्हाधिका-यांनी रचनाबध्द शहर म्हणुन विकसीत केलेले आहे. तथापि शहर जरी रचनाबध्द असले तरी शहरातील नागरी सुविधांचा अभाव पाहता विकासाची दिशा योग्य रितीने राखण्यासाठी शहर कमी पडले आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यातच शहरालगतची व विकास अत्यंत मर्यादित असलेली १० गावे ५ जानेवारी २०१८ रोजी शहरात समाविष्ट होवुन हदद् वाढ झाल्याने शहराच्या विकासाला आणखी मर्यादा आलेल्या आहेत. मुलत: हे ४६.४६ चौरस किलामिटर असलेले शहर १०१.०८ चौरस किलोमिटर झालेले आहे.

शहरातील बेरोजगारी, महानगरपालिकेकडे मर्यादित उत्पन्नाचे स्त्रोत आणि उत्पन्न वाढीस पडणाऱ्या मर्यादा मनपाकडेस असलेले अपुरे मनुष्यबळ,तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे अनेक विकास कामे करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. तरी सुयोग्य नियोजन करुन सर्व शासकीय योजना मार्गी लावण्यासाठी व लोकांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

दरवर्षी महानगरपालिकेचा जमा व खर्चाचा अंदाज प्रथम आयुक्तांमार्फत स्थायी समितीसमोर व नंतर महानगरपालिका सभेपुढे सादर करुन मंजर केला जातो. अर्थसंकल्पीय अंदाज हा वस्तुनिष्ठ असावा व त्यानुसार शाश्वत विकास साधला जावा ही प्रामाणिक अपेक्षा असणे अभिप्रेत आहे. त्यामुळे गैरवाजवी तरतुदी होवु नये किंवा गैरवाजवी खर्चाचा अंदाजही अंदाजपत्रकात असु नये यासाठी वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करणे ही काळाची गरज आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नासाठी एकत्रित मालमत्ता कर, दुकानभाडे, विकासशुल्क, पाणी पटटी इ. महत्वाची उत्पन्नाची साधने आहेत. वास्तविक पाहता यात वाढ करुन उत्पन्न वाढविण्यासाठी उपाय योजना करणे प्रस्तावित केले जाते. तथापी शहराची एकूण आर्थिक स्थिती व जीवनमान याचा विचार करुन या वर्षीही आपण धुळेकर नागरीकांवर कोणतीही करवाढ लादलेली नाही.

मात्र उत्पन्न वाढीसाठी आकारणी न झालेल्या मिळकतींना संकलीत कराची आकारणी करणे, दुकान गाळे भाडे पटटयामध्ये सुसुत्रीकरण करणे व वसुलीची प्रक्रिया सुलभ करणे याबाबींकडे आगामी वर्षात लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे.

धुळेकर नागरीकांना सद्यस्थितीत मोठया विकासाची अपेक्षा नाही. परंतु पथदिवे, स्वच्छता, पाणी पुरवठा,रस्ते व गटारी यासारख्या मुलभुत सेवा सुविधा सक्षमतेने पुरविणे हे प्रथम महानगरपालिकेचे प्राथमिक कर्तव्य आहे. आणि यासाठीच आम्ही खालील योजनांवर पदभार घेतल्यापासुन लक्ष केंद्रीत केलेले आहे.

१)अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना

२)घनकचरा व्यवस्थापन

३)राज्य स्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत रस्त्यांची प्रस्तवाति कामे

४)देवपूर व हद्दवाढ भागातील विकास कामे

तसेच प्रभागातील नागरीकांना व नगरसेवकांना मुलभुत सेवा सुविधांच्या अडचणींना सामोरे जावे लागते. यासाठी मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता सद्यस्थितीत प्रत्येकी १० लक्ष नगरसेवक निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

शहराच्या विकासाच्या दृष्टीने खालील तरतुदी स्थायी समितीमार्फत सुचविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम
१	नगरसेवक निधीसाठी तरतूद	८ कोटी रु.
२	मनपाचे सर्व जलशुध्दीकरण केंद्र व जलकुंभ याठिकाणी सीसीटी.व्ही कॅमेरे बसविणे	१ कोटी रुपये

३	मुलीच्या जन्मासाठी सुकन्या योजना राबविणे (स्त्री जन्माच्या स्वागतासाठी प्रत्येकी ३००० रु)	१५ लक्ष रुपये
४	१०वी व १२वी मध्ये ९०टक्केपेक्षा जास्त गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती भत्ता देणे	१० लक्ष रुपये
५	मनपा क्षेत्रात असणा-या नागरीकांचा विमा काढणे	५० लक्ष रु.
६	सांस्कृतिक कार्यक्रम राबविणे	२५ लक्ष रुपये
७	क्रिडा स्पर्धा व महिला कुस्ती स्पर्धा भरविणे	२५ लक्ष रुपये
८	धुळे शहरातील नागरीकांसाठी महाआरोग्यय शिबीर राबविणे	१५ लक्ष रु.

त्याप्रमाणे सुमारे रक्कम रु. १०.४० कोटीच्या तरतुदी सुचविण्यात येत आहे.

उत्पन्नाच्या बाबी

धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता उत्पन्नाचे स्त्रोतही बळकट व सक्षम बनविणे आवश्यक आहे. यामध्ये खालील बाबींवर प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ होवु शकते.

१) धुळे मनपा हद्दीतील मालमत्तांचे जीएसआय मॅपिंग करुन कर आकारणी करण्यात आलेली आहे.याची अंमलबजावणी व कार्यवाही झाल्यास मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. तसेच मनपाकडे उपलब्ध असलेल्या माहिती व सर्वेक्षणाच्या आधारे नविन व वाढीव बांधकाम झालेल्या मालमत्तांना तातडीने कर आकारणी प्रक्रियेमुळे उत्पन्नात वाढ होवु शकते.

२) महानगरपालिकेमार्फत धुळे शहरातील मनपा मालकीच्या व्यापारी संकुलांना अवास्तव भाडे आकारणी व अनामत निश्चीत केल्यामुळे सद्यस्थितीत सदर उत्पन्नावर फार मोठया प्रमाणावर विपरीत परिणाम झालेला आहे. तसेच सदर व्यापारी संकुलातील ४० ते ५० टक्के व्यापारी गाळे परस्पर हस्तांतरण करण्यात आलेले आहेत. त्यापासुन मिळणारे हस्तांतरण फीचे उत्पन्नही महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही. यामध्ये समन्वयाने निर्णय होवुन भाडे व अनामत तसेच हस्तांतरण फी निश्चीत झाल्यास यामधुनही मोठया प्रमाणावर उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

३) मनपामार्फत शहरात कायमस्वरुपी व तात्पुरत्या स्वरुपात लावण्यात येणाऱ्या जाहिरात होर्डींग व बॅनर वरील कर आकारणीची वसुली सक्षमतेने होत नसल्याने या उत्पन्नावरही मोठया प्रमाणावर परिणाम होत आहे. तसेच मनपा मालकीच्या इमारतीवर असलेल्या मोकळया जागेत इलेक्ट्रानिक होल्डींग्स व डिजीटल जाहिराती बसवून त्यावर कर आकारणी केल्यास मोठया प्रमाणावर फायदा होणार आहे. यासाठी खाजगी ठेकेदार निश्चीत करुन कर वसुलीची कार्यवाही देखील सुरु आहे. यामुळे उत्पन्नातही मोठया प्रमाणात वाढ होणार आहे.

४)बीओटी तत्वावरील व्यापारी संकुल बांधकाम करणे :- मनपाच्या मोकळया जागेवर बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभारणीतुन मोठया प्रमाणावर उत्पन्नात वाढ होवु शकते.

५) मनपा मालकीचे टॉवर उभारणे सुरत व इतर मोठया शहराच्या धर्तीवर शहरात मनपा मालकीचे मोबाईल टॉवर उभारुन ते भाडेपट्टयावर दिल्यास उत्पन्नात वाढ होणार आहे.

या सर्व बाबींसाठी नगरसेवक व पदाधिकारी यांचे सहकार्य तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांची मानसिकता गरजेची आहे. या शहराला विकासाकडे नेण्यासाठी यापुर्वीही शहरातील नागरीकांनी सहकार्य केलेले आहे. त्याचबरोबर शहरातील सामाजिक, सांस्कृतिक सेवाभावी संस्थांचेही योगदान राहिलेले आहे. तसेच मनपाच्या विधायक कामांना नागरीकांसमोर नेण्याचे काम सर्व प्रसारमाध्यमांनी करुन आमचा उत्साह वाढवलेला आहे. या सर्वांचे मी यानिमीत्ताने आभार व्यक्त करते.

म. नगरसचिव — आजच्या सभेसाठी प्रशासनामार्फत व सन्मा. सदस्यांमार्फत अंदाजपत्रकात तरतूदीबाबत पत्र प्राप्त झालेली आहे.सदर पत्र आवश्यक त्या कार्यवाहीसाठी मी सभापती महोदयाकडे सूपूर्द करीत आहे.

म. सुनिल बैसाणे — सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पावर सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्य अभ्यास करुन आलेले आहेत. ज्यांनी मनपाच्या प्रशासनाच्या वतीने बजेट सादर केला ते सर्व अधिकारी वर्ग या ठिकाणी उपस्थित आहे.आदरणीय सभापती मोहदया यांनी आपल्या बजेट बाबतीत तरतुदी किंवा विकासाच्या, उत्पन्नाच्या बाबी असतील याबद्दल आपल्या मनोगतातून सभागृहाला ज्ञात केले आहे. मी अर्थ संकल्पा बाबात बोलण्या इतका मोठा तज्ञ नाही. ज्या गोष्टी मला समजतात त्या मी या ठिकाणी मांडतोय. सभापती महोदया, आपण ज्या बजेटच्या तरतूदी केल्या आहे, धुळे शहराला चांगला बजेट सादर करण्यासाठी निश्चय केला आहे. धुळे मनपाला दिशा देण्यासाठी आपण बजेट सादर करीत आहोत. सभापती महोदया अर्थसंकल्प हा १ एप्रिल ते ३१ मार्च या एक वर्षाचा असतो. या एक वर्षाच्या कालावधीत महसूल उत्पन्न व आर्थिक नियोजन याचा ताळेबंद मांडत असतो. ब्रिटीश काळापासून अर्थसंकल्प हा शब्द आला आहे. अर्थसंकल्प हा गोपनिय असला पाहिजे. भारत सरकारला जो अर्थसंकल्प सादर होतो ,सादर होत असतांना १ महिना भर त्या बजेटशी संबंधीत असलेले अधिकारी / कर्मचारी यांना कुठलाही मोबाईल व कुठला संदेश जाणार याची दक्षता घेतली जाते. याचे कारण गोपनियतेचा भंग होता कामा नये. मात्र आयुक्त सो. आपण बजेट जेव्हा सादर केला त्याच्या एक दिवस आधी एका वर्तमान पत्रात बजेटचा आकडा हा प्रसिध्द झाला. आपल्या बजेटची गोपनियता या ठिकाणी भंग होत असेल तर मग अधिकाऱ्यांवर आपण काय कार्यवाही करणार आहात? जो बजेट आपण मांडला त्याला अर्थ उरत नाही. आपण कुठलीही दक्षता घेतली नाही. हे खेदजनक आहे. बजेटमध्ये खासकरुन महसुली उत्पन्न आणि खर्च भांडवली उत्पन्न आणि खर्च शासनाच्या रोजच्या व्यवहारातून येणारे उत्पन्न, जसे उत्पन्न महसुली उत्पन्न म्हणून धरले जाते तसे रोजच्या खर्चाला कर्जावरील व्याज असते. अनुदान असते त्याला महसुली खर्च असे म्हणतात. अंदाजपत्रकातील विभागणी ३ प्रकारची असते.१.शिलकीचे अंदाजपत्रक२.तुटीचे अंदाजपत्रक ३. समतोल अंदाजपत्रक शिलकीचे अंदाजपत्रक मांडलेल्या आकडेवारीच्या मनपाचे जे उत्पन्न असते होणाऱ्या खर्चा पेक्षा अधिक मांडले असते तेव्हा त्याला शिलकीचा अर्थसंकल्प म्हणतात. आपण शिलकीचा अर्थ संकल्प सादर केला आहे तो कुठल्या आधारावर केला माहित नाही. माझ्या माहिती नुसार उत्पन्नाच्या बाजु काय? होणाऱ्या खर्च काय? याबाबतचा सोक्षमोक्ष होईल असे बजेटमध्ये दाखवण्यात आलेले नाही. तुटीचे

अंदाजपत्रक हे मनपाने मांडलेल्या अर्थसंकल्पात जेव्हा खर्च जास्त असतो व मिळणारे उत्पन्न कमी असते अशा अर्थसंकल्पाला तुटीचा अर्थ संकल्प म्हणतात. समतोल अंदाजपत्रक म्हणजे महसुल खर्च उत्पन्नाचा बरोबरीचा असतो. ज्यात तुट किंवा अनुशेष नसते. असा अर्थ संकल्प सार्वजनिक क्षेत्रावर वारंवार लागू केला जातो. धुळे मनपाचा ८६० कोटी ३३ लक्ष रुपयाचा बजेट सादर केला त्यामध्ये १२ लक्ष शिल्लक दाखवण्यात आले टक्केवारी केली तर लक्षात येईल २% शिलकी बजेट धुळेकर नागरिकांना सादर केला आहे. या १२ लक्षामध्ये धुळेकर नागरिकांना कोणकोणत्या मुलभुत सुविधा देणार आहोत? बजेट शिलकीचा सादर केला पाहिजे नगरविकास विभागाच्या शासन परिपत्रकानुसार दिनांक १ जुलै १९९४ मध्ये नमुद केले आहे महिला व बालकल्याणसाठी ५% निधी एकूण बजेट मध्ये राखून ठेवण्यात यावा. असे नमुद केले आहे. मा. सभापती महोदया या बजेटमध्ये अनेक त्रुटी आहेत. याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. आर्थिक वर्षात आवक आणि जावक याचा कुठेही उल्लेख नाही. एकूण अंदाजे जमा रक्कम व मागील वर्षातील शिल्लक रक्कम अपेक्षित खर्चासाठी व त्याचप्रमाणे कायद्यातील तरतुदीनुसार अथवा नियामानुसार शिल्लक राहिलेली पाहिजे. त्यासाठी पुरेशी आहे का? याबाबतचा खुलासा झाला नाही. बजेट मध्ये तूट असेल सुरवातीची शिल्लक व जमा अशी एकूण रक्कम खर्चाच्या तुलनेत कमी असेल तर तुट कशी भरुन काढणार या बाबतचा प्रस्ताव स्वरुप निवेदन केलेले नाही. मा. आयुक्त सो. सध्याचे कर, फी नव्या वर्षात म्हणजे एप्रिलपासून नवे कर, फी, दर सुरु करणे या बजेटमध्ये कुठेही उल्लेख नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेचा खर्चाचा विभाग आपल्या प्रकल्पाचे नियोजन करतांना उत्पन्नाचे अपेक्षित रक्कम जमा करणे. याबबतचे लक्ष काय? याचा कुठेही उल्लेख नाही. आपण लक्ष उद्देशित केले नसल्यामुळे बजेटमध्ये अनेक त्रुटी आहेत. मनपाची परिस्थिती कशा पध्दतीने सुधरणार आहे याबाबत उल्लेख केला नाही. दरवर्षी आपल्याला केंद्र सरकार असेल राज्य सरकार असेल यांच्या कडून अनुदान प्राप्त होते त्यातून आपण अनेक विकास कामांमध्ये जो ३०% निधी शासन स्तरावर द्यावा लागतो त्यावर सर्व अवलंबून असते १४ वित्त अयोग होता तो सुधारित १५ वा वित्त आयोग झाला आहे १५ व्या वित्त अयोगाच्या शिफारशी वित्त मंत्रालयाने आखून दिलेल्या आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये हिशोब सादरीकरण करणे, त्याचे विवरण करणे नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी विशिष्ट प्रकारची पध्दती सुचवण्यात आली आहे. त्या पध्दतीचा अवलंब केला नाही. तर येणाऱ्या आर्थिक वर्षात मनपाला १५ व्या वित्त अयोगाचा निधी उपलब्ध होणार नाही. शासनाने पत्र देखील दिले आहे. आपण द्वीनोंद पध्दती आजतागायत अवलंबली नाही. १५ व्या वित्त आयोगाचे अनुदान प्राप्त झाले आहे की नाही? मी याबाबत माहिती घेतली महाराष्ट्रात फक्त १६ मनपांना १५ व्या वित्त आयोगाचे अनुदान प्राप्त झाले आहे. धुळे मनपाचे यात नाव नाही. ते प्राप्त नसेल तर अनेक योजनांना आपण मुकणार आहोत. तसेच द्वीनोंद पध्दत लवकरच लागू करावी. १३/३/२०२३ राजी वार्षीक लेखा प्रमाणीत करुन देण्याबाबतचा अर्ज केला होता. परंतु आजपर्यंत उत्तर मिळाले नाही. बजेटमध्ये मालमत्तेचे अवलोकन संबंधी तरतूद केल्या नाही. आपल्या प्रॉपर्टीज चे मूल्यांकन केले तर बजेटचे मूल्य वाढू शकते. आवक व जावक रकमेचा खात्रीलायक अंदाज अंदाजपत्रकात

बांधता येत नाही. शहरात शास्ती माफी केली त्यातून किती फायदा तोटा या बजेटमध्ये दिलेले नाही. शासनाकडून निधी आणतोय त्यामध्ये ३०% मनपा हिस्सा भरावा लागणार आहे. प्रभागांमध्ये कामे वारंवार झाले नाही पाहिजे. नगरसेवकांच्या फाईलींवर वेळकाढू पण करता कामा नये. दैनंदिन खर्चाचे अवलोकन झाले पाहिजे. धुळे शहरात अनेक पुरातत्व वास्तु मनपाच्या मालकीच्या आहे. यावर लक्ष देऊन काम केले पाहिजे. खुले भूखंडाचे किती मालकीचे आहे त्याची माहिती नाही. मनपाच्या एफ.डी कोणत्या कोणत्या बँकेत ठेवल्या आहे याचे अवलोकन होत नाही. त्यापासून किती उत्पन्न मिळते? धुळे मनपाचे दवाखाने चांगले कसे होतील याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. मनपांच्या शाळांचे सक्षमीकरण झाले पाहिजे. अनेक भूखंड माफीयांची त्यावर नजर आहे. नागरिकांना सुखसोई सुविधा याबाबतची माहिती दिसत नाही. प्लास्टीक बंदी साठी दंड आकारण्यात येतो. तो दंड प्रशासनाने किती जमा केला त्या जमा पैशाचा विनियोग कुठे झाला याबाबत बजेटमध्ये उल्लेख नाही. बायोगॅस प्रकल्पाचा नागरिकांना काय फायदा होणार आहे याचे धोरण निश्चीत केले नाही. अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेसाठी आमच्या वरिष्ठ नेत्यांनी दररोज पिण्याचे पाणी देण्याचे वचन दिले होते ती वचन पूर्तता झाली नाही. शहरात व्यापारी संकुल बांधले जात नाही. ते बांधले गेले पाहिजे. असे अनेक प्रश्न आहे मनपाचे कर्मचारी यांच्यासाठी वैद्यकीय भत्ता १ हजार दिला जातो. ३ हजारपर्यंत करावा आरोग्य विभागासाठी घंटागाडयांची १ लक्षची तरतूद केली आहे आपण त्या ठेकेदाराला सर्व सुविधा पुरवत मग हे १ लक्ष कशासाठी द्यावे गाडयांचे मेंटेनंस करणे हे त्याचे काम आहे. म्हणून विनंती आहे केलेली तरतूद १ टक्के करण्यात यावी. आरोग्य विभाग मलेरिया मार्फत पावसाळयात आपण एजन्सी मार्फत कर्मचारी लावतो त्यांना २५ लक्षाची वाढ करावी. अरोग्य विभागात साफसफाई ठेका ४५ लक्ष तरतूद करण्यात आली आहे. शहराचा विस्तार बघता त्यात २० लक्षाची वाढ करावी. आरोग्य विभागाच्या वाहनांची नादुरुस्ती होते दुरुस्तीसाठी ५ लक्ष तरतूद वाढवावी. ओला कचरा व सुका कचरा करणे महत्वाची बाब आहे. त्यासाठी तरतूद करावी. मनपाला व प्रशासनाला विनंती आहे. इलेक्ट्रीक व्हेहीकल धोरण आणणे गरजेचे आहे. त्यासाठी समिती गठीत करावी. कृती आराखडा तयार करावा. ई व्हेहीकल वापरास प्रोत्साहन देणे. बीओटी तत्वावर सौर उर्जा प्रकल्प राबवावे धुळे मनपाचा उत्पन्न वाढीसाठी खालीलप्रमाणे साधने सूचवत आहे याचा अवलंब करावा. उत्पन्न वाढीचे साधन या बाबत तरतूद करणे.

अ.क्रं.	उद्देश	प्रशासनाने केलेली तरतूद रु.	स्थायी समितीने सुचविलेली तरतूद रु.	एकूण उत्पन्न रु.
१.	शहरातीलमाल वाहतुक सोयीस्कर करण्यासाठी शहरातील४झोन करून ट्रंक टर्मिनस करून उत्पन्नचे साधन करणे व यातून मनपाने कर वसुली करावी	---	२ कोटी रु.	२ कोटी रु.

२.	शहरामध्ये अवैधपणे मनपाच्या जागे वरून काली–पिली प्रवासी वाहन उभे राहून प्रवासी वाहतूक करत असतात.यासाठी मनपाने कर वसुली करावी	---	१० लक्ष रु.	१० लक्ष रु.
३	शहरातील नदी किनारी प्रवासी वाहतूक (Travel Point) उभे राहतात त्यांच्याकडून कर वसुली करण्यात यावी.	----	३० लक्ष रु.	३० लक्ष रु.
४	शहरामध्ये महानगरपालिकेने पार्किंग झोन तयार करून वाहनाकडूनPay& Use या तत्वावर कर वसुली करणे	---	२५ लक्ष रु.	२५ लक्ष रु.
६	जाहिरात कर साठीशहरात विनापरवानगी अवैधपणे जाहिरात पोस्टर लावले जातात त्याच्याकडून जास्तीचे कर वसुली करण्यात यावी.	१०.०० लक्ष रु.	१५.०० लक्ष रु.	२५ लक्ष रु.
७	स्थानिक संस्था कर वाढविण्यात यावा.	१५.०० लक्ष रु.	१०.०० लक्ष रु.	२५ लक्ष रु.
८	शहरामधीलअनधिकृत टावर दंड वसुली	५.०० लक्ष रु.	५.०० लक्ष रु.	१० लक्ष रु.
९	शहरामध्ये अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे करून घरे /दुकाने बांधले जातात त्यासाठी अतिक्रमण निष्काशित करून दंड आकारण्यात यावा	००.०० रु.	२५.०० लक्ष रु.	२५ लक्ष रु.
१०	शहरामध्ये नागरिकांसाठी नव्यानेमनपा मालकीची चौपाटी विकसित करून नागरिकांना सुविधा मिळतील व कर उत्पन्न सुद्धा प्राप्त होईल.	----	३०.०० लक्ष रु.	३०.०० लक्ष रु.
११	शहरामध्ये नागरिकांसाठी नव्यानेमनपा मालकीचे प्राणी संग्रहालय उभारून नागरिकांना विरंगुळाचे साधन प्राप्त होईल व कर उत्पन्न सुद्धा प्राप्त होईल.	----	२५.०० लक्ष रु.	२५.०० लक्ष रु.
१२	शहरामध्ये विविध केबल वाहिनीच्या कामासाठी रस्त्यावर खड्डे खोदले जातात त्याच्या कडून कर वसुली करण्यात यावी.	----	१ कोटी रु.	१ कोटी रु.
१३	शहरामध्येपोलीस कल्याण निधीच्या धर्तीवर पेट्रोलपंप स्थापन केला आहे. त्याचपद्धतीने धुळे मनपाने पेट्रोल कंपनीशी करार करून मनपा मालकीचा पेट्रोल पंप स्थापन करावा यातून अपेक्षित उत्पन्न मिळेल.	----	१ कोटी रु.	१ कोटी रु.
१४	रस्त्यावर विनापरवानगी अवैधपणे मांडव टाकला जातो.त्याच्याकडून कर वसुली केली जाव	०.०० रु.	१०.०० लक्ष रु.	१०.०० लक्ष रु.
१५	शहरामध्ये नकाणे तलाव व डेडरगांव या ठिकाणी नागरिकांसाठी गार्डन अथवा वाटर पार्क विकसित करण्यात यावा.	०.०० रु.	५०.०० लक्ष रु.	५०.०० लक्ष रु.
१६	मनपाच्या जागेवर अनेक ठिकाणी लोखंडी खांबावर जाहिरात भाडे वसुली केली जाते. त्यातून अधिकची कर वसुली केली जावी.	००.०० रु.	१०.०० लक्ष रु.	१०.०० लक्ष रु.
१७	शहरातील दुकान भाडे वाढवण्यात यावे	१७.०० लक्ष रु.	२५.०० लक्ष रु.	२५.०० लक्ष रु.

१८	शहरामध्ये अनेक ठिकाणी अवैधपणे मटनविकतात त्याच्याकडून मार्केट फी व परवाना फी वसूल करण्यात यावी.	०.०० रु.	७.०० कोटी रु.	७.०० कोटी रु.
१९	BOT प्रकल्पापासून उत्पन्न	१५०.०० लक्ष रु.	२.०० कोटी रु.	२.०० कोटी रु.
२०	दुकान भाडे (IDSMT)	४६.५० लक्ष रु.	५०.०० लक्ष रु	५०.०० लक्ष रु
२१	धुळे मनपाचे कलामंदिर भाडे	१.११ लक्ष रु.	१०.०० लक्ष रु	१०.०० लक्ष रु
२२	दुकान भाडे	१७ लक्ष रु.	२५.०० लक्ष रु.	२५.०० लक्ष रु.
२३	शहरामध्येअनेक ठिकाणी पाण्यासाठी अवैधपणे बोरिंग करतात. त्यासाठी मनपाची परवानगी घेण्यात यावी. यातून मनपाला उत्पन्न प्राप्त होईल.	०.०० रु.	१०.०० लक्ष रु.	१०.०० लक्ष रु.
२४	शहरामध्ये अनेक ठिकाणी थंड पाणीचे जार मालकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व मनपाची अवैधपणे कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता व्यावसायिकपणे पाणी विक्री करून पैसा कमवीत आहे. त्याच्याकडून कर वसुली करण्यात यावी.	----	५.०० लक्ष रु.	५.०० लक्ष रु.
२५	जुने सामान भंगार विक्री	---	१.०० कोटी रु.	१.०० कोटी रु.
२६	बी.ओ.टी.तत्वावर सोलर प्रकल्प	---	१०.००रु. कोटी	१०.०० रु. कोटी
२७	अग्निशमन विभाग पाणी विक्री	---	१५.००रु. लक्ष	१५.००रु. लक्ष
२८	अवैध नळ कनेक्शन दंड	---	१.०० रु.कोटी	१.०० रु.कोटी
२९	बी.ओ.टी.व्यापारी संकुल	---	२०.०० रु.कोटी	२०.०० रु.कोटी
३०	L.B.T.	५.०० कोटी	६.०० रु.कोटी	६.०० रु.कोटी
	एकूण	**७ कोटी ३१** लक्ष **६१ हजाररु.**	**५३ कोटी रु.**	**५९ कोटी रु.**

क्रं.	**उद्देश**	**प्रशासनाने केलेली तरतूदरु.**	**स्थायी समितीने सुचविलेली तरतूद रु.**	**एकूण तरतूद रु.**
१	इंग्रजी माध्यम शिक्षिका मानधन व शाळा दुरुस्ती व पुस्तकसाठी	----	२५.०० लक्ष रु.	२५.०० लक्ष रु.
२	जुने दस्तऐवज खर्च	---	१५.०० लक्ष रु.	१५.०० लक्ष रु.

३	थोर महापुरुष पुतळा सुशोभिकरण	---	२५.०० लक्ष रु.	२५.०० लक्ष रु.
४	कायम आस्थापना वरील कर्मचारी यांना वैद्दकिय भत्ता	पूर्वी १ हजार रु. पगारमध्ये आहे.	लक्ष रु.	४००० रु.
५	आरोग्य विभाग मलेरिया विभागामध्ये इंधन तरतूद	५.०० लक्ष रु.	१५.०० लक्ष रु.	२०.०० लक्ष रु.
६	आरोग्य विभाग नवीन वाहन	१०.०० लक्ष रु.	१०.०० लक्ष रु.	२०.०० लक्ष रु.
७	अतिक्रमण विभाग नवीन वाहन	---	१५.०० लक्ष रु.	१५.०० लक्ष रु.
९	स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत इतर शहर पाहणी दौरा	---	५.०० लक्ष रु.	५.०० लक्ष रु.
१०	धुळे शहरातील चौक सुशोभिकरण करणे	---	३.०० कोटी रु.	३.०० कोटी रु.
११	मलेरिया विभाग एकात्मिक डास निर्मुलन अंमलबजावणी तरतूद	७५.०० लक्ष रु	१५.०० लक्ष रु.	९० लक्ष रु.
१२	शहर सुंदर करणे	---	२.०० कोटी रु.	२.०० कोटी रु.
	एकूण	९० लक्ष रु.	६ कोटी १० लक्ष ४ हजार रु.	७ कोटी ४०० हजार रु.

म.हर्षकुमार रेलन

प्रशासनाने आपल्याकडे चांगला बजेट प्रस्तुत केला आहे. त्यात काही दुरुस्त्या आहे. सर्व प्रथम सन्मा. सदस्य सुनिलभाऊ बैसाणे यांचे अभिनंदन त्यांनी काही चांगल्या प्रकारची उत्पन्नाची साधने सूचवले आहे. जे खरच आपल्या लक्षात नाही काही गोष्टी दूर्लक्षित झाल्या आहे. आज त्यांनी जो वेळ घेतला तो फार सत्कारणी लागणार आहे. जर आपण हे समजून घेतले तर फक्त इतिवृत्तात लिहून घेऊन फायदा नाही. त्यानंतर वाचायला वेळ मिळत असेल असे मला वाटत नाही. २०१९ च्या पहिल्याच बैठकीत मी द्वीनोंद पद्धती बद्दल सांगीतले होते. जो पर्यंत द्वीनोंद पद्धती होत नाही. तो पर्यंत या गोष्टींना काहीच अर्थ नाही. आज आपली व्हॅल्यु काय आहे. आपण समरी बनवत नाही. आज आपले ताळेबंद पत्रक नाही. त्यातुन आपल्याला कळते की आपण काय केले, काय नाही केले. धुळे मनपाचे ८०० कोटीचे बजेट असतांना ताळेबंद पत्रक नाही. आपल्याला माहित होत नाही की आपण कोणते वाहन कधी खरेदी केले आणि त्याची किंमत आजच्या घडीला किती आहे. आपल्या किती मालमत्ता आहे हे आपल्याला माहित नाही. त्या मालमत्तांची किंमत १५ वर्षापूर्वी काय होती आज किती आहे. आज ४ वर्ष झाले आणि ४ वर्षात एकदा ही माहिती मिळालेली नाही. ही द्वीनोंद पद्धती कधी सुरु होणार? तात्कालीन आयुक्तांनी सांगीतले होते द्वीनोंद पद्धतीचे काम प्रगतीपथावर आहे ते लवकरच होईल. ते आजतागायत काम झाले नाही. आपल्याकडे अकौंट संबंधी लोकं फार कमी आहे किंवा त्यांच्याकडून काम करुन घेण्यास वरीष्ठ अधिकारी पात्र नाही.यावर कुठेतरी लक्ष दिले गेले पाहिजे. रस्तयांवरील खड्डे बुजवण्यासाठी १ कोटीची तरतूद केलेली आहे. ही तरतूद फार जास्त आहे बहुतेक सर्व रस्ते होऊन गेले आहे आणि होतील. म्हणून पुढच्या वर्षात पैसे लागतील असे दिसत नाही. त्यात तरतूद कमी करावी. मनपाची महत्वपूर्ण कामांमध्ये स्वच्छता,वाहतूक,पथदिवे त्यामध्ये शाळा हा महत्वाचा भाग आहे. मनपाच्या शाळांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. तेथे कंपाउंडवाल नाही. शाळेत मुले नाही. त्यावर २० कोटीची

तरतूद करावी.आपले शहर वाढत आहे आपल्याकडे ५५ शाळा आहे. ताळेबंद पत्रक असते तर आपल्याला कळले असते आपले भूखंड किती ? बिल्डींग किती? आज कोरोनामुळे जिवन फार कठीन होऊन गेले आहे. सामान्य नागरिकांना खर्च परवडत नाही. शाळांची फी वाढलेली आहे. लोक मराठी माध्यमांच्या शाळांकडे वळत आहे.शिक्षकांना ५५ ते ६० हजार पगार आपण देत आहोत. जेव्हा विद्यार्थी आपल्याकडे येत आहे तर आपल्याकडे शाळा चांगल्या अवस्थेत नाही.याबाबत धोरण ठरवा नगरपालिकेची शाळा कोणाला देऊ नका आज आपल्याला त्या शाळा दुरुस्त करुन घ्यायच्या आहे. चांगले वातावरण तिथे निर्माण करायचे आहे.आपण अग्निशमन बद्दल ५ लाखाची तरतूद केली आहे. ती फार कमी आहे.आपल्या कर्मचाऱ्यांकडे साहित्य नाही.त्यांच्याकडे सीडी,पाईप,ग्लोव्हज नाही. आपल्याला आणखी दोन ते तीन फायर स्टेशन उभारण्याची गरज आहे.देवपूर,मिल परिसर, तसेच वलवाडीकडे याकरीता२०कोटीची तरतूद करावी.तसेच आपल्याकडे एफ.डी होत्यात्या आहेत का नाही

म.लेखाधिकारी — आपल्याकडे एफ.डी होत्या त्या एफ.डी मनपा हिस्स्यासाठी वापरल्या याबाबत मी माहिती घेऊन आपणांस कळवतो.

म. हर्षकुमार रेलन — आपल्याकडे व्यापारी गाळे आहे त्यामध्ये अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. कारण ते कोणाकडे आहे,कोण भाडे देतो, कोण भाडे देत नाही हे माहित नसते. ती आपली मालमत्ता आहे. तसेच परवाना शुल्क आपल्याला मिळणार नाही त्याची तरतूद कमी करुन टाकावी. व्यापारी गाळयांमधून उत्पन्न् शून्य आहे. आर.आर. शॉपिंग मध्ये ९ ते १० बँक आहे ते १०० दुकाने आहे. त्याचे भाडे मिळत नाही. तसेच मालकाचे नाव सुध्दा तपासून घ्यायला हवे. आपल्याकडे किती बागमाळी कमी आहे. वृक्ष समिती मध्ये समजले १ कर्मचारी आहे. तसेच आमच्या कॉलनी रस्तयांवर रात्री २० टनाचे ट्रक जातात ते रस्ते खराब होतात. नागरिक आमच्या नावाने ओरडतात तुम्ही रस्ते चांगले बनबत नाही म्हणून.हायवे जाम असतो तेव्हा साक्री रोड परिसरातून वाहतूक करतात. मागे ऑक्ट्राय पध्दत होती त्यामध्ये एस्कॉर्ट कर होता. जे ट्रक आपले आतील रस्ते वापर करता त्यांना १०० टॅक्स आपण लावयचो आणि त्या वेळी ३२ कोटी उत्पन्न आले होते. असे काहीतरी टॅक्स सुरु करावे जेणेकरुन उत्पन्नात वाढ होईल.त्यानंतर पे अँण्ड पार्क ची संकल्पना आहे. त्यातून रोजगार मिळेल. नवी दिल्ली मध्ये आम्ही पाहिले आहे. ३ ते ४ लाख प्रति माह टेंडर त्यांनी दिलेले आहे. काही विशिष्ट रस्तयांचे अनुशासीत पार्कींग पण दिसेल. तसेच धुळे शहराचे सुशोभिकरण करावे. त्यासाठी ३ कोटीची तरतूद करावी. तसेचे उद्यानांकरीता निधी वाढवावा.

म.नरेंद्र चौधरी — सन्मा. सदस्यांनी चांगल्या प्रकारे अभ्यास करुन सूचना व त्रुटी मांडल्या जे-जे उत्पन्नाचे स्त्रोत त्यांनी मांडले आहे यातून त्यांचा अभ्यास दिसून येतो. सभापती महोदया, आमच्या हद्दवाढ भागातील १० ते १५ पाण्याच्या टाक्या आहे प्रत्येक गावात २-३ पाण्याच्या टाक्या असतील परंतु त्या ठिकाणी त्यांना संरक्षक भिंत नाही. माझी विनंती आहे पाण्याच्या टाक्यांना व फिल्टर प्लांट साठी तरतूद करावी.

म.आयुक्त — आपण आमृत २ योजने मध्ये हे सर्व दुरुस्तीचे कामेसमाविष्ट केले आहे. तांत्रीक मंजूरी ही मिळाली आहे.

म.नरेंद्र चौधरी — मागच्या बजेट मध्ये हद्दवाढ साठी ७ कोटीची तरतूद केली होती परंतु पूर्ण वर्ष निघून गेले फक्त ७० लाख रुपयांच्या कामांवर सहया केल्या. कोणत्याही नगरसेवकाला त्या हददवाढ निधी मध्ये काम करता येत नाही ही खेदाची बाब आहे. त्या ठिकाणी रस्ते नाही, गटारी नाही. तरतूद वर अधिकारी सहया करत नाही.तसेच जे अनुसुचित जमातीचे नगरसेवक आहे त्यांच्या साठीही तरतूद करावी. त्यांच्या ठक्कर बाप्पा योजना, शहरी घरकुल योजना या योजनांची तरतूद करुन न्याय मिळाला पाहिजे. हद्दवाढच्या १० गावांमध्ये बरेच ठिकाणी गाळे बांधले आहे. त्यांच्याकडे कोणाचे लक्ष नाही. त्यातून नक्कीच उत्पन्न् वाढ होणार आहे. बजेट चांगल्याप्रकारे या ठिकाणी मांडला त्यांचे अभिनंदन करतो.

म.सभापती — नक्कीच आपल्या नेत्यांनी सांगीतले आहे की, जास्तीत जास्त हद्दवाढचा विचार करण्यात येईल.

म.हर्षकुमार रेलन — आपले बजेट ३५० कोटी रुपयांवरुन ८०० कोटी रुपयांपर्यत आले आहे महागाई वाढली आहे. नगरसेवक निधी २० लाख रुपये मिळतो त्यातून अर्धाच रस्ता बनतो. याबाबत तरतूद ५० लाखापर्यंत करावी.

म.नगरसचिव — महासभेत याबाबत प्रस्ताव घेऊ.

म.सुनिल बैसाणे — मनपाची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. आपल्याला सर्व बाजू पहाव्या लागतील सभापतींनी १० लक्षाची तरतूद सूचवली आहे.महासभेत मध्य साधून काहीतरी उपाययोजना करुन त्याबद्दल सभापतींनी जास्तीचा भार टाकू नये अशी विनंती करतो. बजेट मध्ये खर्चाच्या व उत्पन्नाच्या बाजूचा विचार करुन बजेट मध्ये सादर करावा.

म. दगडू बागुल — धुळे महानगरपालिकेचा २०२३-२४ चा अर्थसंकल्प हा शहराला दिशा देणारा ठरणार आहे. कारण अर्थसंकल्प हे आर्थिक नियोजन करण्यासंदर्भात अंदाजित वर्षभरमध्ये आपण काय काम करणार आहे. याविषयी तरतूद करीत असतो. हे वर्ष धुळे महानगरपालिकेच्या सार्वजनिक निवडणूकीचे आहे. अर्थसंकल्पामध्ये शहरासाठी विकासात्मक कामासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. या अर्थसंकल्पाच्या जोरावर आम्ही नागरिकाकडे मताचा जोगवा मागणार आहे. यासाठी शहरातील नागरिकांनी भारतीय जनता पार्टीला एक हाती सत्ता दिली आहे. आमचे नेते मध्यंतरी महाराष्ट्र राज्यात आमचे अडीच वर्ष सरकार नसल्याने विकासकामे थंडावली होती. मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेब पालकमंत्री श्री गिरीशभाऊ महाजन मा. खासदार श्री सुभाष भामरे साहेब आमदार श्री जयकुमार रावल साहेब माजी आमदार श्री राजवर्धन कदमबांडे साहेब माजी मंत्री श्री अमरीशभाई पटेल साहेब पक्षाचे अध्यक्ष श्री अनुपभैय्या अग्रवाल साहेब व सर्व पदाधिकारी आणि शासनाकडून भरघोस निधी शहरांसाठी प्राप्त करुन दिला आहे. येणाऱ्या दिवसांत आपल्याला अक्कलपाडा धरणातून पिण्यासाठी एक दिवसाआड पाणी पुरवठा होणार आहे. शहरातील सर्व रस्ते हे चकाचक होणार आहे. त्याचप्रमाणे विकास कामे हे सर्व प्रभागामध्ये करण्यात आलेले आहे. माझ्या प्रभाग क्र.१८ मध्ये दलित वस्ती अंतर्गत नागरिकांना आम्ही मूलभूत सुविधा प्राप्त करुन दिल्या आहे. यामध्ये प्रामुख्याने नव्याने समाविष्ट अवधान गावात नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची टाकी बांधून देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे विकासापासून दुर्लक्षित असलेल्या भागामध्ये

माझे प्रभागातील सर्व सहकारी नगरसेवक यांनी सुध्दा प्रयत्न केले आहे. तरी मा. आयुक्त महोदय तसेच प्रशासनातील सर्व अधिकारी यांनी येणारे भांडवली उत्पन्न, सरकारी अनुदान व खर्च यांचे ताळमेळ करुन या अर्थसंकल्पाची शहरांसाठी अंमलबजावणी करावी. जेणेकरुन यांचा फायदा हा शहरातील नागरिकांना होणार आहे. प्रशासन अर्थसंकल्पामध्ये तरतूद करते मात्र अंमलात लवकर येत नाही. याउ सर्व गोष्टीचा आपण देखील अभ्यास करावा. १. मनपामध्ये कायम आस्थापनेवर कार्यरत सर्व अधिकारी कर्मचारी यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. मात्र या कर्मचारी यांना महिन्याचा फरक देण्यात आलेला नाही. यासाठी आपण या अर्थसंकल्पामध्ये १० कोटी रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. मागील वर्षीसुध्दा १० कोटी रु यांची तरतूद करण्यात आलेली होती. मात्र देण्यात आलेले नव्हते. तरी सर्व कर्मचारी यांना यावर्षी ७ व्या वेतन आयोगाचा फरक देण्यात यावा. २. त्याचप्रामणे आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी ज्यांच्या जीवावर आपण स्वच्छ भारत अभियानामध्ये नामांकन प्राप्त करीत आहे. त्यांचे आरोग्य सुरक्षित आहे का? यांचा देखील आपण विचार केला पाहिजे. त्यांना गणवेश, साहित्य, तसेच आरोग्य बाबत शिबीर घेण्यात यावे यासाठी पुरेशी तरतूद करण्यात यावी. ३. त्याच प्रमाणे हद्दवाढ गांव अवधान सह सर्व ११ गावातील घरपट्टी कमी करण्यात यावी. ४. वर्षभरामध्ये अनेक महापुरषांचे जयंती पुण्यतिथी असतात. त्यासाठी येणाऱ्या पिढीला इतिहास कळावा. यासाठी व्याख्यान माला आयोजित करण्यात यावा यासाठी भरीव तरतूद करण्यात यावी. ५.सार्वजनिक शौचालयाची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. त्यासाठी आपण तरतूद केली आहे. मात्र त्याचा वापर लवकर करण्यात यावा. कारण आज शहरातील सर्व सार्वजनिक शौचालय जीर्ण अवस्थेत आहे. ६. कुत्रयांची संख्या आज शहरामध्ये इतकी वाढली आहे. व यांचा त्रास नागरिकांना होत आहे. यासाठी जीवितहानी देखील झाली आहे. तसेच कुत्रे निर्बिजीकरण करुन प्रश्न सुटणार आहे का? व तशी तरतूद अर्थसंकल्पात पुरेशी आहे का यांचा देखील अभ्यास आपण करावा.७.महानगरपालिकेतील कर्मचारी यांची कामाची क्षमता वाढवण्यासाठी बायोमेट्रीक हजेरी घेण्यात यावी.८.महानगरपालिकेचे जे ओपन स्पेस आहे ते मुलांना मैदानी खेळ खेळता यावे यासाठी विकसित केले पाहिजे. जेणेकरुन शहरामध्ये चांगले खेळाडू तयार होतील यासाठी तरतूद केली पाहिजे.

म.सभापती

सर्व सन्मा.सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना मांडल्या आहे.या सूचना नक्कीच शहराच्या विकासाला चालना देणाऱ्या आहे. प्रशासनाने प्रसतावित केलेल्या अंदाजपत्रकात नगरसेवक निधीसाठी कोणतीही तरतूद केली नाही.तथापि अनेक प्रभागामध्ये मुलभुत सेवा सुविधा व विकास कामे प्रलंबीत आहेत. यासाठी प्रत्येक १०लक्ष मात्र तरतूद प्रस्तावित करण्यांत येत आहे. तसेच मुलीच्या जन्मासाठी सुकन्या योजना,जलशुध्दीकरण केंद्र व जलकुंभ येथे सी.सी व.टी.व्ही कॅमेरे बसविणे,क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम, नागरीकांसाठी महाआरोग्य शिबीर,शहर व चौक सुशोभिकरण,शहरात विविध थोर पुरुषांचे पुतळे व चबुतरे सुशोभिकरण,या विकास कामांसाठी आवश्यक ती तरतूद प्रस्तावित करण्यांत येत आहे.

मनपा मार्फत सक्षमतेने व प्रभावीपणे कार्यवाही झाल्यास मनपा उपत्पन्नात निश्चितपणे मोठया प्रमाणावर भर पडणार आहे. यांत अनाधिकृत बांधकाम दंड वसुली, बी.ओ.टी. तत्वावर शॉपींग उभारणी, शॉपींग सेंटर हस्तांतरण फी वसूल करणे,अवैध नळ कनेक्शन दंड वसुली, स्थानिक संस्था कराबाबत व्यापा-यांशी समन्वय साधून कर वसुली शहरातील व्यावसाईक जागांना व्यावसाईक दरानुसार मालमत्ता कर आकारणी याव्दारे महानगरपालिकेस मिळणारे संभाव्य उत्पन्न लक्षांत घेऊन त्यानुसार ठोस अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच शहरातील व नवीन हद्दवाढ भागातील विनापरवानगी झालेले बांधकामधारकांकडून मोठया प्रमाणावर विकास शुल्क प्राप्त होणार आहे. तसेच अभिन्यास मान्यतेचेही अनेक प्रस्ताव प्रलंबीत आहे त्याव्दारेही मोठया प्रमाणावर उत्पन्न प्राप्त होणार आहे.या उत्पन्नातून शहरातील विविध विकास कामे प्रस्तावित करता येतील. त्याअनुषंगाने विकास शुल्क या लेखाशिर्षात उत्पन्न व खर्चात तरतूद प्रस्तावित करण्यांत येत आहे. तसेच विविध कंपनी व संस्थाकडून रस्ता दुरुस्तीबाबत नुकसान भरपाई घेण्यांत येते. सदरच्या रकमेतूनही शहरातील रस्ता दुरुस्तीची कामे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान -२ अंतर्गत धुळे शहरातील हद्दवाढ गावांच्या आणि शहरातील उर्वरित भागातील पिण्याच्या पाईपलाईन टाकणेकामी रूपये १७७ कोटी व शहरातील भूमिगत गटार योजनेसाठी रूपये ७१७ कोटीचा अशा एकूण ८५४ कोटीचा भरघोस निधी धुळे महानगरपालिकेचा विकास कामांसाठी मंजूर करून दिले आहे. या प्रकल्पामुळे शहरातील पाणी व मलनिस्सारण समस्यांचा कायमस्वरूपी प्रश्न निकाली निघण्यास मदत होणार आहे. मनपा हद्दवाढ व शहरातील इतर भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघणार आहे.या कामासाठी धुळे मनपाला भरघोस अशा निधी उपलब्ध झालेला आहे. तसेच तसेच राज्यस्तरीय नगरोत्थान योजनेतही मोठया प्रमाणावर रस्ते व विकास कामासाठी निधी प्राप्त झालेला आहे.याकामी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथरावजी शिंदे,उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडवणीस, पालकमंत्री मा.ना. श्री.गिरीषजी महाजन,खासदार डॉ.सुभाषजी भामरे, माजी मंत्री तथा आमदार मा.ना.श्री.जयकुमार रावल,आमदारमा.ना.श्री.अमरीशभाई पटेल, माजी आमदार श्री.राजवर्धनजी कदमबांडे, भाजपा जिल्हाध्यक्ष श्री.अनुपभैय्या अग्रवाल महापौर सौ.प्रतिभाताई चौधरी,आयुक्त श्री.देविदास टेकाळे, माजी महापौर श्री.चंद्रकांत सोनार, श्री.प्रदिप नाना कर्पे, माजी उपमहापौर श्री.नागसेन बोरसे यांनी मार्गदर्शन व सहकार्य केलेले आहे तथापी या सर्व योजनामध्ये मनपाचा लोकवर्गणीचा हिस्सा वर्ग करावा लागणार आहे. यासाठी मनपाच्या दैंनदिन उत्पन्नातून ठराविक रक्कम दैंनदिन स्वंतत्र खात्यात जमा करण्यात यावी व त्याव्दारे सदर योजनेच्या मनपा हिस्सा अदा करण्यात यावा.

येणारे उत्पन्न व खर्च यांचा ताळमेळ पाहून तरतूदी प्रस्तावित केलेल्या आहेत. आपल्या सूचनांचा विचार करुन तसेच प्रशासनाशी तरतूदी बाबत चर्चा करुन सन २०२२-२३ चे सुधारित व सन २०२३-२४ चे मूळ अंदाजपत्रक तसेच वृक्षप्राधीकरण समितीचे अंदाज पत्रक अंतीम करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर * दिनांक २४/०३/२०२३**

धुळे महानगरपालिका प्रशासनाने स्थायी समितीस रु.८६०कोटी ३२ लक्ष ६४ हजार चा अर्थसंकल्प सादर केला होता. त्यात स्थायी समितीने उत्पन्नात रु. ६२ कोटी ७५ लक्ष वाढ सुचविली आहे व रु. ५८ कोटी ५० लक्षच्या तरतूदी सुचविल्या आहेत. व त्या अनुषंगाने

महिला व बालकल्याण, अपंग कल्याण व मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक याबाबी मध्ये नियमाप्रमाणे होणारी वाढ समाविष्ट करण्यांत येत आहे.

याप्रमाणे उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घेवून मे. स्थायी समिती मार्फत खालील प्रमाणे तरतूदी तथा उत्पन्नाच्या बाबी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

अ.क्र.	लेखाशिर्षक	प्रशासनाने केलेल्या तरतूदी	मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी	वाढ	घट
	जमा बाजू				
१	अनाधिकृत बांधकाम दंड वसूली	०.००	५.००	५.००	०.००
२	बीओटीपासून उत्पन्न	१५.००	२०.००	५.००	०.००
३	शॉपिंग सेंटर हस्तांतरण	०.२४	५.२४	५.००	०.००
४	अवैध नळ कनेक्शन	०.५०	५.५०	५.००	०.००
५	स्थानिक संस्था कर	०.१५	१०.१५	१०.००	०.००
६	व्यावसायीक दरानुसार मालमत्ता कर आकारणी	०.००	१०.००	१०.००	०.००
७	जमिन विकास शुल्क	१०.००	३०.००	२०.००	०.००
८	रोड डॅमेज अनुषंगीक कामे	०.०५	२.८०	२.७५	०.००

अ.क्र.	लेखाशिर्षक	मे.आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी	मे. स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी	वाढ	घट
	खर्च बाजू				
१	नगरसेवक निधीसाठी तरतूद	०.००	८.००	८.००	०.००
२	मनपा सर्व जलशुध्दीकरण केंद्र व जलकुंभ येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे.	०.००	१.००	१.००	०.००
३	मुलीच्या जन्मासाठी सुकन्या योजना राबविणे.	०.००	०.१५	०.१५	०.००
४	१० वी व १२ वी मध्ये ९० % पेक्षा जास्त गुण मिळाविणाऱ्यांना शिष्यवृत्ती भत्ता देणे	०.००	०.१०	०.१०	०.००
५	मनपा क्षेत्रातील नागरीकांचा विमा काढणे	०.००	०.५०	०.५०	०.००
६	सांस्कृतिक कार्यक्रम व जनजागृतीपर उपक्रम राबविणे.	०.०५	०.३०	०.२५	०.००
७	क्रिडा स्पर्धा व महिला कुस्ती स्पर्धा भरविणे.	०.०५	०.३०	०.२५	०.००

८	धुळे शहरातील नागरीकांसाठी महाआरोग्य शिबीर राबविणे.	०.००	०.१५	०.१५	०.००
९	शहरात विविध भागात प्रवेशव्दार उभारणे.	०.००	३.००	३.००	०.००
१०	शहर सौंदर्यीकरण व भिंती रंगविणे.	०.००	१.००	१.००	०.००
११	चौक सुशोभिकरण करणे.	०.००	१.००	१.००	०.००
१२	छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा	०.००	१.००	१.००	०.००
१३	छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चबुतरा बांधणे.	०.००	१.२५	१.२५	०.००
१४	राजेश्री छत्रपती शाहू महाराज पुतळा चबुतरा बांधणे.	०.००	१.००	१.००	०.००
१५	स्वातंत्रयवीर सावरकर पुतळा सुशोभिकरण	०.००	०.५०	०.५०	०.००
१६	पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुतळा/बसवेश्वर महाराज पुतळा/संभाजी महाराज पुतळा/ डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा / वरखेडी येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा/ वीर एकलव्य पुतळा व अन्य पुतळे सुशोभिकरण व चबुतरा बांधणे.	०.००	३.००	३.००	०.००
१७	शहरातील विविध विकास कामांसाठी तरतूद	०.००	५.००	५.००	०.००
१८	नविन हद्दवाढ भागातील विकास कामांसाठी तरतूद	०.००	२.००	२.००	०.००
१९	सन २०२२-२३ मधील कामांसाठी तरतूद (स्पिल ओव्हर)	०.००	३.००	३.००	०.००
२०	महिला व बालकल्याण निधीतील प्रलंबीत कामांसाठी तरतूद (स्पिल ओव्हर)	०.००	१.००	१.००	०.००
२१	विकास शुल्का वाढील उत्पन्नातून अनुषंगीक कामे	६.००	२६.००	२०.००	०.००
२२	रोड डॅमेज अनुषंगीक कामे	०.०५	२.८०	२.७५	०.००
२३	इंधन व इतर कामे	०.०५	०.२०	०.१५	०.००

२४	डास निर्मुलन अंमलबजावणी	०.७५	१.००	०.२५	०.००
२५	मनपा इमारत दुरूस्ती करणे.	०.०२	०.२०	०.१८	०.००
२६	आर्किटेक्ट फी देणे	०.२५	०.५०	०.२५	०.००
२७	नविन वाहन खरेदी करणे.	०.५०	१.००	०.५०	०.००
२८	वाहन रिपेअरींग करणे. (स्पिल ओव्हर)	०.००	०.२०	०.२०	०.००
२९	अपंग सहाय्यक अनुदान	०.००	०.१३	०.१३	०.००
३०	घनकचराव्यवस्थापनप्रकल्प आवश्यक कामे	०.०५	०.७५	०.७०	०.००
३१	आरएफआयडी यंत्रणा	०.०१	०.२५	०.२४	०.००

उक्त नमूद केलेल्या बाबीसाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात दर्शविण्यांत आलेली तरतूद ही प्राथमिक स्वरुपाची तरतूद असून संबंधित विभागांनी याबाबत मार्च २०२३ अखेर प्रत्यक्ष होणा-या रकमेचे पुर्नविनियोजन अथवा पुरक मागणी करुन सुधारित अंदाजपत्रकात माहे डिसेंबर २०२३ च्या सुधारित अंदाजपत्रकात करुन घेणे आवश्यक असेल या अटीवर नमूद तरतूदी करण्यांत येत आहेत.

सदर अंदाजपत्रकात नव्याने हददवाढ झालेल्या गावातील विकास कामांसाठी तरतूद, शहरातील विविध विकास कामांसाठी तरतूद, सन २०२२-२३ मधील कामांसाठी तरतूद(स्पील ओव्हर) रोड डॅमेज अनुषंगीक कामे, प्रवेशव्दार उभारणे, चौक सुशोभिकरण, पुतळा सुशोभिकरण व चबुतरा बांधणे तसेच स्थायी समिती मार्फत नव्याने सुचित करण्यात आलेल्या कामांसाठी आर्थिक तरतूद करण्यात येत आहे. सदर लेखाशिर्षात प्रशासनाने अत्यावश्यक स्वरुपाचीच कामे पाहणी करुन प्रस्तावित करावीत तसेच सदर लेखाशिर्षातील कामांना तरतूद लावण्यापूर्वी सदर कामांचे प्रस्ताव प्रथमत: निश्चितीसाठी मा. सभापती स्थायी समिती यांचेकडेस सादर करावे.

शासनामार्फत मान्यता प्राप्त विविध योजनामधील लोक वर्गणीचा हिस्सा भरणे आवश्यक असल्याने यासाठी मनपाच्या दैंनदिन उत्पन्नातून ठराविक रक्कम दैंनदिन स्वतंत्र खात्यात वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षांत घेवून तसेच उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ करुन सन २०२२- २०२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक योग्य त्या फेरबदलासह अंतिम करुन मे. महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सन २०२३-२४ चे वृक्ष प्राधिकरण समिती अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ५ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक ०९/०३/२०२३
वेळ :-सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं. ५ आज **गुरुवार दिनांक ०९/०३/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ.किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती**, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य
१०	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री.नितीन कापडणीस	अति. आयुक्त
२	श्री. विजय सनेर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
५	श्रीमती पल्लवी शिरसाठ	मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी

६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
७	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
८	श्री. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
९	श्री. राजेश वसावे	सहा. आरोग्याधिकारी
१०	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
११	श्री. चंद्रकांत मोरे	लेखापाल
१२	श्री.संजय मोरे	आस्थापना प्रमुख
१३	श्री. किशोर सुडके	प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख
१४	श्री. कमलेश सोनवणे	ओव्हरसिअर नगररचना विभाग
१५	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१६	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ
१७	श्री. राजू माईनकर	भांडारपाल
१८	श्री.मधुकर निकुंभ	वसुली अधिक्षक
१९	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२०	श्री.दुष्यंत महाजन	अग्निशमन विभाग
२१	श्री.सुक्राम राऊत	वाहनविभाग प्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य मा. अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- २३ — मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५लाखापर्यंत बांधकाम विभागा कडील विकास कामांची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि. २३/१२/२०२२ ते १५/०२/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन — सदर यादीतील अ.नं.२कार्यादेशक्रं.४७७ मध्ये पाईप लाईन दुरुस्ती अंतर्गत प्रभाग क्रं. ६,७,१५, १६,१७,१८, या भागातील विविध ठिकाणी वितरण वाहिनीवरील पाईपलाईन वॉल , नळ कनेक्शन दुरुस्ती केल्याचे नमूद केले आहे. तरी माझ्या ७ मधील लिकेज कुठले काढले कोणी काम केले त्या यादी मला पाहिजे आहे.

म.सभापती — श्री.पी.डी.चव्हाणआपण सन्मा.सदस्यांना त्यांच्या भागातील लिकेजेस काढल्याची यादी तांतडीने देण्यांत यावी.

म. सभापती — मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५लाखापर्यंत बांधकाम विभागा कडील विकास कामांची यादीचे अवलोकन करण्यांत आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२ दिनांक ०९/०३/२०२३

मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५लाखापर्यंत बांधकाम विभागा कडील विकास कामांची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि. २३/१२/२०२२ ते १५/०२/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

दिनांक :- दि.२३/१२/२०२२ ते दि.१५/०२/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

अ.क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	४७५	२३/१२/२०२२	प्र.क्र.१८ मध्ये नगरसेवक निधीतून धनदाई नगर येथील ओपनस्पेस मध्ये काँक्रीटीकरण करणे.	१९९९७४३	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
२	४७७	२३/१२/२०२२	पाईपलाईन दुरुस्ती अंतर्गत प्र.क्र.६,७, १५,१६,१७,१८, या भागातील विविध ठिकाणी वितरण वाहिनीवरील पाईपलाईन वाल, नळ कनेक्शन दुरुस्ती करणे.	९०७९०९	मनपा निधी अंतर्गत (पाईपलाईन दुरुस्ती अंतर्गत)
३	४८२	०७/०२/२०२३	प्र.क्र.४ मध्ये जयहिंद कॉलनी भागात १)श्री.अभिजित साळुंखे यांच्या घरापासून ते श्री.अरुण साळुंखे २) मारुती मंदिरापासून ते श्री.समर्थ क्लासेस पर्यंत ३)श्री.ईशी यांच्या घरापासून ते श्री.अर्थेकर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१९९८२८८	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
४	४८३	०९/०२/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये महिला बालकल्याण निधी अंतर्गत नकाणे आदिवासी वस्तीत श्री.मगन मातंग घराजवळ महिलांसाठी १० सिट सार्व. शौचालय बांधणे.	१९९८८७८	महिला बालकल्याण अंतर्गत सन २०२१-२२
५	४८५	०९/०२/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये महिला बालकल्याण निधी अंतर्गत नकाणे गावात उत्तम कोळी घरा जवळ महिलांसाठी सार्व. शौचालय बांधणे.	१९९८८७८	महिला बालकल्याण अंतर्गत सन २०२१-२२
६	४८६	०९/०२/२०२३	प्र.क्र.०३ मध्ये गौसिया मस्जिद ते शेरू मिस्तरी यांच्या घरापर्यंत सुशी नाल्यावर छोटापूल बांधणे व मदनी नगर बोर्डा पासून ते शब्बीर ड्रायव्हर यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	१४८६२८२	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
७	४८८	०९/०२/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये मनपा निधी अंतर्गत पारिजात कॉलनी येथे वाघ घर ते जगताप घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	९७५४४९	नगरसेवक निधी (मनपा निधी)अंतर्गत सन २०२२-२३
८	४८९	०९/०२/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये इब्राहीम व्यापारी यांच्या घरापासून ते मुन्ना अन्सारी आणि जुना वडजाई रोड ते हाफिज इस्तेयाक यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१४९९७५१	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
९	४९०	०९/०२/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये वडजाई रोड पासून ते हजरत अली मुस्तफा दर्गा पावेतो (बोरसे कॉलनी) काँक्रीट रस्ता व गटार करणे.	१९९४०२३	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
१०	४९१	०९/०२/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये मनपा निधी अंतर्गत सुरत बायपास ते रोहित मोरे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४९७९८२	मनपा निधी (हद्दवाढ गावांसाठी अंतर्गत सन २०२२-२३)
११	४९२	०९/०२/२०२३	प्र.क्र.११ मध्ये पवन नगर येथील श्री.किशोर बोरसे ते श्री.भगवान मिस्तरी यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	१७४१९२७	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२
१२	४९३	०९/०२/२०२३	प्र.क्र.१३ मध्ये मुन्ना डॉन यांचे घरापासून ते जाहिद सर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	९०४८९७	मनपा निधी अंतर्गत (रस्ता नुकसान)
१३	४९४	०९/०२/२०२३	प्र.क्र.१३ मध्ये फिरदोस नगर भागात अब्बास हाफीजजी यांच्या घरापासून ते रईस प्रतापगढी यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१३९४२१५	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
१४	४९५	०९/०२/२०२३	प्र.क्र.११ मध्ये वाखारकर नगर मध्ये श्री.बाफना यांचे घरापासून ते मरिमाता मंदिरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४९६२८८	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत

१५	४९६	१३/०२/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये तुळजाई सोसा.येथे श्री.सोनकांबळे ते डी.पी. रस्ता पावेतो रस्ता डांबरीकरण व दोन्ही बाजूस बंदिस्त गटार करणे.	२४९७१७७	साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२
१६	४९७	१३/०२/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये प्रभाकर लोंढे ते बुधा नागमल घर ते अंगणवाडी पासून ते गाव विहीर पावेतो तसेच हरिओम नगर चौक येथे रस्ता काँक्रीट करणे.	१९९३५२८	नगरसेवक निधी (मनपा निधी)अंतर्गत सन २०२२-२३
१७	४९८	१३/०२/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये मनपा निधी अंतर्गत मोराणे गावात दादाभाई मिस्तरी घर ते सुनील पारधी घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१२९९३५५	नगरसेवक निधी (मनपा निधी)अंतर्गत सन २०२२-२३
१८	४९९	१३/०२/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये मनपा निधी अंतर्गत मोराणे गावात आसारा दुबा येथे १० सिट सार्व.शौचालय बांधणे.	२४९०१४८	मनपा निधी अंतर्गत (हद्दवाढ गावांसाठी अंतर्गत सन २०२२-२३)
१९	५००	१३/०२/२०२३	प्र.क्र.१३ मध्ये पुरुष शौचालय परिसरात रस्ता काँक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे.	९९९४१०	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
२०	५०१	१३/०२/२०२३	प्र.क्र.०४ मध्ये प्रकाश पवार यांच्या घरापासून ते रवी वाघ यांचे घरापर्यंत काँक्रीट गटार करणे.	१९९४८७६	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२
२१	५०२	१३/०२/२०२३	प्र.क्र.०४ मध्ये महूकर यांचे घरापासून ते दगडू शिंदे यांचे घरापर्यंत ते डॉ.नवगाळे यांचे दवाखान्यापावेतो बंदिस्त गटार करणे.	१४९२०७२	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२
२२	५०३	१३/०२/२०२३	प्र.क्र.५ मध्ये संतोषी माता कॉलनी ते लक्ष्मी फरसाण ते दिंगबर चौधरी यांचे घर ते श्री.शांताराम माळी यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४८८८२७	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३
२३	५०४	१३/०२/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये उत्कर्ष कॉलनी भागात बिराडे यांचे घरापासून ते कुलकुले यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४९०५३५	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२
२४	५०६	१३/०२/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये बिजली नगर हरिचंद्र मिसाळ घर ते विरेंद्र गिरासे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१५६४४३८	१४ व्या वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३
२५	५०७	१३/०२/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये श्री.फारूक अन्वर शाह , आमदार धुळे शहर यांचे निधीतून वसुंधरा नगर भागात वसुंधरा बोर्ड ते सुरेश पवार ते प्लॉट नं.१६ ते शरद कासार घरापावेतो बंदिस्त गटार करणे.	९९९३०६	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
२६	५०८	१३/०२/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये श्रीवीर एकलव्य पुतळ्यापासून ते नदी किनार पावेतो बंदिस्त पाईप गटार करणे.	८६१८१९	नगरसेवक निधी (मनपा निधी) अंतर्गत सन २०२१-२२
२७	५०९	१५/०२/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये वेडू माता चाळ भागात पवार घर ते भैय्या पाटील घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४९१७१५	मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत सन २०२२-२३
२८	५१०	१५/०२/२०२३	प्र.क्र.१८ मध्ये जयशंकर कॉलनी भागात किशोर तोटे ते श्रीधर आव्हाळे घर व तोटे ते लोटन पाटील घरापावेतो पाईप गटार करणे.	९९३५४७	मनपा निधी (नगरसेवक निधी) अंतर्गत सन २०२२-२३
२९	५११	१५/०२/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये प्रसन्न हौ.सोसा.मधील विविध भागात रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे	२४९१६०४	मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत सन २०२२-२३

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२४ पाणी पुरवठा विभागाकडील व्हॉलमन या संवर्गातील १ ते १३ पदे मानधन तत्वावर ६ महिन्यासाठी मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म.कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्ताव मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३ दिनांक ०९/०३/२०२३

पाणीपुरवठा विभागाकडील खालील नमुद १ ते १३ एकत्रित मानधनावरील व्हॉलमन यांना पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत सदर ठरावानुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. १ ते १३ व्हॉलमन यांना एकत्रित मानधनावर पुढील ६ महिनेकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांची दि ३०/१२/२०२२ रोजी मुदत संपुष्ठात येत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	एकत्रित मानधन दरमहा	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक
१	दिपक छगन बागुल	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
२	सैय्यद इमरान अली जाफर अली	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
३	तुषार गिरीश चौधरी	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
४	शिंदे दिनेश रामसिंग	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
५	चंद्रकांत मोतीलाल फुलपगारे	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
६	हेमराज भाईदास कोळी	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
७	प्रमोद विठठल सोनवणे	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
८	गणेश शंकर बिरारी	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
९	किरण राजेंद्र फुलपगारे	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
१०	योगेश भानुदास वाखारकर	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
११	ज्ञानेश्वर तुकाराम सैंदाणे	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
१२	प्रणय राजेंद्र लहामगे	रु. १४०००/-	३०/१२/२०२२
१३	रणदिवे राहुल अरुणराव	रु. १४०००/-	३०/१२/२०२२

कनिष्ठ पाणीपुरवठा विभाग यांनी उक्त १ ते १३ मानधनावरील व्हॉलमन यांचे कामाचे कोणतीही तक्रार नसून त्यांचे काम समाधानकारक असल्याने व कामाची निकड पाहता त्यांना पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

उपरोक्त व्हॉलमन (मानधनावरील) कर्मचा-यांना ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमातील ५३ (३) नुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त अ क्र १ ते १३ मानधनावरील व्हॉलमन कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर (नविन प्रस्तावित मानधनवाढीनुसार) पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- २५ मानधन तत्तवारील जे.सी.बी.वरील वाहन चालक १ यांना मानधन तत्तवावर ६ महिन्यासाठी मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म.कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्ताव मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४ दिनांक ०९/०३/२०२३

आरोग्य विभागाकडील एकत्रित मानधनावरील जेसीबी वाहन चालक श्री राहुल नाना देसले यांना पुढील ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणेबाबत ठराव झालेला होता. श्री राहुल नाना देसले, मानधनावरील जेसीबी वाहन चालक यांना पुढील ६ महिनेकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देण्यात आली होती. त्यानुसार त्यांची दि २९/१२/२०२२ रोजी नियुक्तीची मुदत संपुष्ठात आलेली आहे.

श्री राहुल नाना देसले, मानधनावरील जेसीबी वाहन चालक यांनी पुढील ६ महिनेकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	हुददा	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रुपये
१	श्री राहुल नाना देसले	मानधनावरील जेसीबी वाहन चालक	२९/१२/२०२२	रु. १५,५००/-

श्री राहुल नाना देसले, मानधनावरील जेसीबी वाहन चालक यांना मुदत संपल्याच्या दिनांका पासून ०५दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधन रु.१२,०००/- मात्र मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उक्त श्री राहुल नाना देसले, मानधनावरील जेसीबी वाहन चालक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार में. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्री. राहुल नाना देसले,मानधनावरील जेसीबी वाहन चालक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२६ देवपूर भागातील राजे संभाजी उद्याने बि.ओ.टी.तत्वावर चालवणे कामी निविदा दर मागविण्यात आले त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नाजिया पठाण देवपूर भागातील राजे संभाजी उद्यान जे आहे हे किती वर्षापासून बि.ओ.टी तत्वावर चालवण्यास दिलेले आहे ? यातून मिळणारे उत्पन्न किती आहे ? आतापर्यंत किती उत्पन्न यातून मिळाले आहे? याची माहिती मिळावी.

म.ओव्हरसिअर यापूर्वी मे. आदिशक्ती हिंगलाज माता ट्रस्ट यांना ५ वर्षाकरीता चालवण्यासाठी दिले होते. २,१२,०००/- प्रति वर्ष प्रमाणे त्याची मुदत संपल्यावर फेर निविदा काढली त्यात आलेले दर मंजूर करायचे आहे. आता आपण ३ वर्षाकरीता ई निविदा मागविण्यात आलेली आहे.

म.नाजिया पठान त्या उद्यानामध्ये २ पाणीपुरीचे स्टॉल लावण्यात आले आहे.

म.ओव्हरसिअर आपण त्यांना फूड स्टॉलसाठी सुध्दा काउंटर दिले होते.

म.नाजिया पठान या गार्डनची झाडांची खराब परिस्थिती आहे. तेथे छाटणी व सफाई केले जात नाही. तेथील नागरिकांची तक्रार आहे. कचराही इतरत्र टाकला जातो.

म.ओव्हरसिअर ते बाहेरच्या रस्त्यांवर आले आहे ते ठेकेदाराला सांगून साफ करुन घेऊ. उद्यानात कचरापेटी ठेवल्या आहे. मी स्वत: चेक करुन घेतो.

म.हर्षकुमार रेलन हा विषय आपल्याला मंजूर करायचाच आहे. ठेकेदाराकडून ज्याकाही त्रुटी राहील्या असतील त्या दुरुस्त करुन घ्याव्या. त्याला लगेच वर्क ऑर्डर द्यावी. आता मूलांच्या शाळेला सुध्दा लागणार आहे. परिक्षा संपणार आहे. तेथे चांगल्या सुविधा निर्माण व्हाव्यात तेथे चांगल्या प्रकारे निर्मिती करावी. खेळणी सुस्थितीत करुन घ्याव्या. विषय मंजूर करावा.

म.कल्याणी अंपळकर या ठेकेदारांचे सर्व डॉक्युमेंट पूर्ण आहेत का?

म.ओव्हरसिअर मी मुळ कागदपत्राची तपासणी करुन घेतो

म.कल्याणी अंपळकर याबाबत डॉक्युमेंटची पूर्ण चौकशी करा. कागदपत्रांची छाननी करुनच विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५ दिनांक ०९/०३/२०२३

देवपूर भागातील राजे संभाजी उद्यान बिओटी तत्वावर चालवणे कामी ३ वर्ष मुदतीत ई-निविदा मागविण्यात आली असता ई-निविदा सुचना क्र.४८ निविदा क्र.२०२२ DMCD_८१३५७६_१ सदर निविदेत एकुण ६ निविदा धारकांनी निविदा भरलेली आहे. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.रामेश्वर ट्रेडर्स	५,४०,०००/-	L 6
२	मे.आदिशक्ती हिंगलाज माता ट्रस्ट	६,७५,०००/-	L 5
३	मे.न्यु राजेंद्र शॉपिंग सेंटर	७,५३,०००/-	L 4
४	मे.एकविरा कन्स्ट्रक्शन	७,५७,३६५/-	L 3
५	मे.केशर कन्स्ट्रक्शन	७,८६,०००/-	L 2
६	**मे.गौरव मजुर सह सोसा लि.निशाने जि.धुळे**	**८,०९,९९७/-**	**L 1**

वरील अहवालानुसार सर्वात जास्त दराची निविदा मे.गौरव मजुर सह सोसायटी,धुळे यांची दर प्रती वर्ष रुपये २,६९,९९९/- मात्र असून एकुण ३ वर्षासाठीची रक्कम ही रुपये ८,०९,९९७/- एवढी असून ती सर्वात जास्त आहे. उक्त प्रमाणे **मे.गौरव मजुर सह सोसायटी,धुळे** यांचे सर्वात जास्त दर आले असून दरमंजुरी करणे कामी सदरचा प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे.गौरव मजुर सह सोसायटी,धुळे यांची दर प्रती वर्ष रुपये २,६९,९९९/- मात्र असून एकुण ३ वर्षासाठीची रक्कम ही रुपये ८,०९,९९७/- एवढी असून ती सर्वात जास्त आली असल्याने त्यास मान्यता देण्यांत येत आहे.या बाबत संबंधित ठेकेदारांचे मुळ कागदपत्राची तपासणी करुन पात्र असल्यास कार्यादेश द्यावा.

तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक:- श्रीमती नाजियाबानो नासीर खॉ पठाण

सर्वानुमते मंजूर

सही/-x x x

सभापती

स्थायी समिती

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२७ आदिशक्ती कुलस्वामीनी आई एकविरा मंदिर परिसरात यात्रोत्सव कालावधीत विहित मुदतीकरीता यात्रा फी वसुलीसाठी सरकारी अंक निश्चित करणे व जाहिर लिलाव काढणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. किरण अहिरराव विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २६ दिनांक ०९/०३/२०२३

सालाबादाप्रमाणे यावर्षी धुळे जिल्ह्याचे आराध्यदैवत आई एकविरा देवी यात्रानिमित्त एकविरा देवी मंदिराजवळील परिसरात चैत्र शुद्ध पोर्णिमेपासुन दि.०६ एप्रिल ते १८ एप्रिल २०२३ या काळात सदर उत्सवानिमित्त विविध प्रकारचे दुकाने, स्टॉल, पाळणे व मनोरंजनाचे कार्यक्रम इ. लागत असतात.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्र.३० दि.२४/०३/२०१५ नुसार १०X१० च्या जागेस जागाभाडे रु.१४०/- मात्र प्रति दिवस व दै.बाजार फी मे.स्थायी समिती ठराव क्र.१४८ दि.०९/०१/२०२० नुसार (४X६ फुट साठी) रु. १५/- व त्यापेक्षा जास्त क्षेत्रास रु३०/- मात्र प्रमाणे वसुल करण्यास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.

बाजार विभागात नियमित कामे करणेसाठी देखील पुरेसे कर्मचारी नाही म्हणुन सन २०२२-२३ या वर्षाकरिता मे. स्थायी समितीने रु.५,७४,०४४ मात्र सरकारी अंकास मंजुरी दिली होती त्यानुसार जाहिर लिलाव काढण्यात आला. प्रत्यक्ष मात्र ५,९०,०००/- मात्र जास्तीची अंतिम बोली (अधिक १८% GST) रक्कम प्राप्त झाली.

उक्त रकमेवर ह्या वर्षी १०% नैसर्गिक वाढ रु.६,४९,०००/- मात्र अशी येत आहे. (अधिक १८% GST कर वेगळा असेल.)

तरी देवपुर मोठ्या पुलापासुन ते आई एकविरा देवी मंदिर परिसरापर्यंत स्टॉलधारक, पाळणाधारक, रसवंतीधारक व इतर दुकानदार तसेच रस्त्याच्या मध्यभागी उभे राहुन किंवा रस्त्याच्या कडेला किरकोळ माल विक्री करणारे व्यावसायिक यांचे कडुन जागा भाडे व

दै.बाजार फी वसुली मक्ता रु.६,४९,०००/- मात्र सरकारी अंक ठरवुन मिळणेस व त्या रकमेवर अल्प कालावधी करिता जाहिर लिलाव काढुन वर्तमानपत्रातुन जाहिरात प्रसिद्ध करणेस म.आयुक्त सो. दि.२४/०२/२०२३ रोजी यांनी मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ३३२ अन्वये सदरचा विषय मंजुरीस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून देवपुर मोठ्या पुलापासुन ते आई एकविरा देवी मंदिर परिसरापर्यंत स्टॉलधारक, पाळणाधारक, रसवंतीधारक व इतर दुकानदार तसेच रस्त्याच्या मध्यभागी उभे राहुन किंवा रस्त्याच्या कडेला किरकोळ माल विक्री करणारे व्यावसायिक यांचे कडुन जागा भाडे व दै.बाजार फी वसुली मक्ता रु.६,४९,०००/- मात्र सरकारी अंक ठरवुन मिळणेस व त्या रकमेवर अल्प कालावधी करिता जाहिर लिलाव काढुन वर्तमानपत्रातुन जाहिरात प्रसिद्ध करणेस मान्यता देण्यांत येत आहे. यात्राउत्सव कालावधीत स्टॉल, पाळणे, व मनोरंजनाच्या खेळासाठी उभारणी करतांना काही जीवित व वित्तहानी झाल्यास त्यांच्या सर्वस्वी जबाबदारी मक्तेदार,स्टॉलधारक,संबंधितावर असेल याबाबत करारनाम्यात नमूद करावे. तसेच संबंधित मक्तेदारास कार्यादेश देण्यापुर्वी आवश्यक त्या अटी व शर्तींचा करारनामा करण्यात यावा.

सुचक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

अनुमोदक:- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:-२८ प्र.क्र.१९ मध्ये ८० फुटी रस्ता सुफी झेरॉक्स जवळ नविन बोअरिंग करणे बाबतचा आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन पुढे उन्हाळा सुरु होत आहे. विषय मंजूर करणे गरजेचे आहे. याची सुधारित बजेटमध्ये तरतुद केली आहे का? आपल्याकडे पैसे आहेत का?

म.अति. आयुक्त प्रशासनाकडून तरतूद झालेली आहे. स्थायी समिती पुढे येईलच. स्थयी समिती करु शकते. सुधारित मध्ये बजेटचे कंम्पोझिशन चेंज करु शकता.बजेट हे प्रोजेक्टेड असते.तुम्ही फक्त मंजूरी द्यायची आहे. पैसे येणार आहेत.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करा. ज्याही भागात सुविधा होत असेल चांगली गोष्ट आहे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्ताव सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २७ दिनांक ०९/०३/२०२३

धुळे महानगरपालिका प्र.क्र.१९ मध्ये ८० फुटी रस्ता सुफी झेरॉक्स जवळ नविन बोअरिंग करणेची मागणी सन्मा.सदस्य मदिना समशेर पिंजारी यांनी केलेली होती.

त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास अंदाजित खर्च रु.1,03,814/- मात्र अपेक्षित असून सदरचा खर्च हा म.जि.प्राधिकरण यांचे दर सूची नुसार असून तो खर्च योग्य व वाजवी असून सदरचा खर्च हा विंधन विहीर दुरुस्ती या लेखा शीर्षकातून सन 2022-23 च्या अर्थसंकल्पातून करण्यात येणार आहे.

तरी उक्त प्रमाणे काम सुधारित यादीत नसल्यामुळे त्याबाबतचा विषय मे.स्थायी समितीकडे पाठवून त्याबाबतची तरतूद करून घ्यावीअसे अहवालात नमूद आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्र.क्र.१९ मध्ये ८० फुटी रस्ता सुफी झेरॉक्स जवळ नविन बोअरिंग करणेस व त्याबाबतची तरतूद सुधारीत अर्थसंकल्पात करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन

अनुमोदक:- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका, धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ६ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
सोमवार दिनांक १३/०३/२०२३
वेळ :- दुपारी ४-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं. ६ आज **सोमवार दिनांक १३/०३/२०२३ रोजी दुपारी ४-०० वाजतां सौ.किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती**, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री.देविदास टेकाळे	आयुक्त
२	डॉ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
३	श्रीमती पल्लवी शिरसाठ	मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी
४	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव

५	श्री. के. एन. शिंदे	अभियंता
६	श्री. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
७	श्री. राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
८	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
९	श्री. चंद्रकांत मोरे	लेखापाल
१०	श्री.सुनिल बर्गे	वरिष्ठ सहा. आस्थापना
११	श्री. किशोर सुडके	प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख
१२	श्री. प्रकाश सोनवणे	ओव्हरसिअर नगररचना विभाग
१३	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१४	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१५	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१६	श्री.राजेश गायकवाड	वरिष्ठ लिपीक मनपा शिक्षण मंडळ
१७	श्री. राजू माईनकर	भांडारपाल
१८	श्रीमती कल्पना जाधव	अभिलेखापाल
१९	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२०	श्री.दुष्यंत महाजन	अग्निशमन विभाग
२१	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२२	श्री. सौदागर सुडके	लिपीक मुख्य लेखा परीक्षक विभाग

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. सुनिल बैसाणे — आदरणीय आयुक्त साहेब यांनी मा. सभापती महोदया यांना बजेट सादर केला होता त्या बजेट संदर्भात काही चर्चा करायची होती. त्या अनुषंगाने प्रशासकीय अधिकाऱ्यांना विचारणा केली त्या प्रसंगी स्वत: मी उपस्थित होतो.हे अधिकारी रजेवर जात असतांना कुठल्या अधिकाऱ्यांना विचारुन रजेवर गेले आहे. मा.सभापतीच्या नियंत्रणात प्रशासकीय अधिकारी येतात. मा. सभापती यांनी त्यांना २ ते ३ वेळा बजेट संदर्भात माहिती घेणेसाठी बोलावले होते ते आले नाही. जे कोणी प्रशासकीय अधिकमारी त्यांच्या अधिकारांचा दुरुपयोग करत असतील तर त्याच्यावर आयुक्त म्हणून आपण कारवाई केली पाहिजे सभापतीच्या आदेशाचे पालन करण्यात यावे. अशी आपल्याकडून अपेक्षा व्यक्त करतो.

म. आयुक्त सो. — लेखाधिकारी यांचा मला मोबाईलवर रजेसंदर्भात मेसेज आलेला आहे.

म.उपायुक्त — लेखाधिकारी यांचा रजेचा अर्ज आस्थापना विभागाकडे प्राप्त झालेला आहे.

म. सभापती यापुढे अधिका-यांनी रजेवर जातांना सभापती यांचेकडेस कळविले पाहिजे.आयुक्त सो.आपण जे अधिकारी कळविणार नाही त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी असे आदेशित करीत आहे.

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,

विषय क्रमांक :- २९ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दिनांक २३/२/२०२३)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.किरण अहिरराव इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २८ दिनांक १३/०३/२०२३

मागील स्थायी समिती सभा दिनांक २३/०२/२०२३ चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०२ ते २० अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत असून तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय कायम करण्यांत येत आहे.

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- ३० मोराणे गाव विहीरवर ७.५ एच. पी. ओपनवेल मोटर स्टार्टर पॅनेल केबलसह बसविणेचे काम तांतडीने करण्यांत आले. सदर कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचारकरणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २९ दिनांक १३/०३/२०२३

मोराणे येथील गाववहीरीवरील मोटर शोर्ट सर्किटमुळे जळाली असून गावातील पाणी बंद झाले आहे.सदर ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली असता सदर ठिकाणीची ७.५एच.पी. मोटर शोर्ट सर्किटमुळे जळाली आहे व वायर सुद्धा जळाली आहे.

सदर ठिकाणीची मोटर बसविणे अत्यंत गरजेचे आहे. सद्यस्तियोत वापरात असलेली मोटर सेंट पूर्वापार मोराणे ग्रा. पं.च्या मालकीची होती. सदरची मोटर मागील चार वर्षात वारंवार दुरुस्त करण्यात आली आहे. तथापि मोटर अत्यंत खराब असल्याने सदर मोटर पुन्हा दुरुस्ती करणे योग्य नसल्याने तातडीने पाणी पुरवठा विषयक बाब असल्याने नवीन मोटर पंपसेट बसविणे गरजेचे आहे. मोराणे गावातील ३० % पाणी पुरवठा या मोटर द्वारे होत असल्याने दोन दिवसा पासून पाणी पुरवठा बंद आहे. प्रभाग क्र. ०६ चे नगरसेवक श्री नांद्रे यांनी हे सदर काम तातडीने करणे बाबत पत्र दिले आहे.

सदरचे कामी सदरचे ७.५ एच. पी. मोटर बसविणे,DOL स्टार्टर बसविणे, नवीन वायर बसविणे इत्यादी कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू. ६४८९१/- मात्र आहे.

सन२०२२-२०२३च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाणी पुरवठा निगा दुरुस्ती कामा साठी रू १.६३कोटी मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रू.**६४८९१/-** चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम हे विना निविदा मे.अंबिका इलेक्ट्रिकल्स, धुळे यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७(३) प्रमाणे कार्यात्तर मंजुरी होण्यास म.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मोराणे गाव विहीरवर ७.५ एच. पी. ओपनवेल मोटर स्टार्टर पॅनेल केबलसह बसविणेचे काम मे.अंबिका इलेक्ट्रिकल्स, धुळे यांच्या कडुन करून घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रू.**६४८९१/- मात्र खर्चास** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७(३) प्रमाणे कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३१ धुळे तापी पाणी पुरवठा योजनेच्या बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथील फिल्टर बेडचे नूतनीकरण करणेसाठी सदर कामास शासकीय दरसूची सन२०२१-२२ नुसार रु.७८,४४,१२८/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव विषय मंजुर करण्यांत यावा.

म. कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३० दिनांक १३/०३/२०२३

धुळे तापी पाणीपुरवठा योजना हि सन १९९१-९२ पासून कार्यरत असून योजनेच्या बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथे ६ फिल्टर बेड आहेत.सदरील जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता सुमारे ४८ MLD आहे. बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथील फिल्टर मेडिया हा सन २०११-१२

मध्ये बदलण्यात आलेला आहे.सध्यस्थितीत बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथील फिल्टर बेडचे नूतनीकरण करणे आवश्यक असल्याबाबत त्याठिकाणी कार्यरत असलेले मनपा केमिस्ट यांची मागणी आहे.सदरील ठिकाणी सध्यस्थितीत काही बेड नादुरुस्त झाल्याने पाणीपुरवठा कमी दाबाने होत आहे.त्यामुळे सदरील फिल्टर बेडचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसूची सन २०२१-२२ नुसार रु.७८,४४,१२८/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२२-२३ च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार असून सदरच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव सदरचा विषय मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे तापी पाणी पुरवठा योजनेच्या बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथील फिल्टर बेडचे नूतनीकरण करणेसाठी सदर कामास शासकीय दरसूची सन२०२१-२२ नुसार रु.७८,४४,१२८/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत असून सदर कामी ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

अनुमोदक :- सौ. कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-३२ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान रस्ते विकास प्रकल्प अंतर्गत (सन २०२२-२३) एकूण १ ते ३३ कामांचे दर मंजुरीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसणे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३१ दिनांक १३/०३/२०२३

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्य स्तरीय) अंतर्गत धुळे शहराच्या रस्ते विकास प्रकल्पास शासन निर्णय क्रं. नगरो-२०२२/प्र.क्र. ३४८ नवि-३३ मंत्रालय मुंबई दि.८ डिसेंबर २०२२ अन्वये देवपूर विभागातील १ ते ३३ कामांना अंदाजे रक्कम रु.२७.७५ कोटी मात्रला प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यात राज्य शासन अनुदान (७०%) १९.४२ कोटी व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (३०%) म्हणजे ८.३२ कोटी मात्र मंजुरी प्राप्त आहे. सदर १ ते ३३ कामांना मुख्य अधियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,नाशिक यांनी दिनांक १०/११/२०२२ रोजी तांत्रिक मंजुरी प्रदान केलेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ धूमपा/ बा.वि./१२२/२०२२-२३ दि. ९/१२/२०२२ अन्वये दैनिक मिड डे मुंबई व दैनिक लोकमत या वृत्तपत्रात ई निविदा सुचना क्रं

१६४ अन्वये जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन निविदा दर मागविण्यात आले होते. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.उक्त ई निविदेत खालील कंत्राटदारांनी सहभाग नोंदविला आहे.

अ.क्र.	ठेकेदाराचें नांव	आलेले निविदा दर	शेरा
१)	**मे. सुंदर माधव कन्स्ट्रक्शन धुळे**	**अंदाजपत्रकीय दराने**	**L१**
२)	श्री. एस. बी. देशमुख, धुळे	शे.५.००% जास्तीने	L२

सदर निविदेतील पात्र निविदाधारकांचे दर पत्रक उघडण्यास दिनांक १/३/२०२३ रोजीच्या निविदा समितीने दर पत्रक उघण्यांस मान्यता दिलेली आहे.वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले दोन्ही ठेकेदार पात्र असून मे. सुंदर माधव कन्स्ट्रक्शन धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.सुंदर माधव कन्स्ट्रक्शन धुळे यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे.सुंदर माधव कन्स्ट्रक्शन धुळे यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ३३ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान रस्ते विकास प्रकल्प अंतर्गत (सन 2022-23) एकूण 1 ते 31 कामांचे दर मंजुरीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले

म.सुनिल बैसाणे धुळे शहराच्या विकासासाठी रस्त्यांची झालेली दुरावस्था हे सर्व पाहता मा. खासदार असतील मा. आमदार असतील सन्मा. नगरसेवक असतील व प्रशासनातील सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याने व सर्वाचा एकच उद्देश असतो की, विकास कामे झाली पाहिजे. विकासकामांकडे राजकारणाचा भाग नाही. विकास झाला पाहिजे हे जरी खरे असले तरी, विकास करीत असतांना रस्तयांचे इस्टीमेट त्या रस्त्यांचा दर्जा, त्या रसत्यांची गुणवत्ता आणि निविदा प्रक्रीयेत दिलेल्या गोष्टी आहे त्यांचे अवलोकन बांधकाम विभागाकडून होते की नाही याची सर्व जबाबदारी बांधकाम विभागाची आहे. कधी नव्हे इतकी विकास कामे शहरात होत आहे. विकास कामे होत असतांना रस्ता झाला तर बिले अदा करतांना घाई करता कामा

नये.रस्त्यांमुळे बाहेरुन येणाऱ्या नागरिकांना शहरांबद्दल आकर्षण निर्माण होत असते. क्वॉलिटी कंट्रोलच्या माध्यमातून ती तपासणी केली पाहिजे. धुळे मनपामध्ये ठेकेदांच्या कामाचा दर्जा व ठेकेदारांनी हे कामे यापूर्वी केले आहेत का नाही हे पण तपासून पाहिले पाहीजे. त्या निविदा प्रकियेत भाग घेतला आहे का हे पण तपासले जावे. माझ्या प्रभागात दलित निधी मध्ये ठेकेदारांनी स्पर्धेत भाग घेऊन कामे केली. परंतु ते काम बरोबर झाले नसल्यामुळे नागरिकांच्या रोषाला नगरसेवकांना सामोरे जावे लागते. त्यावेळेस लोकप्रतिनिधी हा बदनाम होत असतो. काम झाल्यानंतर त्या कामाची पहाणी आयुक्त, बांधकाम विभागाचे संबंधीत अधिकारी यांनी पाहणी करुनच त्यानंतरच धनादेश देण्यात यावे. मनपाच्या आर्थिक परिस्थितीचे भान ठेवले गेले पाहिजे. दर मंजूर करीत असतांना ज्या ठेकेदारांच्या कामाबाबत लोकप्रतिनिधींची तक्रार आली तर त्याच वेळी तिचे निवारण झाले पाहिजे. दर मंजूरी केल्यानंतर सुध्दा कामे चांगली झाली आहेत की नाही याची स्थायी समितीच्या समोर सर्व कामांचा उहापोह झाला पाहिजे. त्यानंतरच धनादेश देण्यात यावा. अशी विनंती करतो जेणेकरुन कामाचा दर्जा चांगला होईल धन्यवाद.

म.नरेंद्र चौधरी — सन्मा.सदस्य श्री सुनिल भाऊनी हा महत्वाचा मुद्दा मांडला आहे. मागच्या काळात अडीच वर्ष महाविकास आघाडीचे सरकार होते. काही शिवसेनेचे पदाधिकारी यांनी त्यावेळेस निधी आणला त्यांनी वर्क ऑर्डरवर कामाच्या निविदा घेतल्या. आणि निकृष्ट दर्जाचे कामे केली. त्यात भारतीय जनता पार्टीची नाव बदनाम झाले. प्रशसनातील अधिकाऱ्यांना विनंती आहे. काम दर्जेदार झाले पाहिजे. नागरिकांनी समाधान व्यक्त केले पाहिजे अशी विनंती करतो.

म.राजिनाबानो पठाण — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. फातमा अन्सारी — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनाचा समावेश करुन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३२ दिनांक १३/०३/२०२३

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान रस्ते विकास प्रकल्प अंतर्गत सन २०२२-२३ एकूण १ ते ३१ कामे करणे बाबतच्या कामास उपसचिव नगर विकास यांचे प्रशासकीय मान्यता दि.२०/०९/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२९,३९,२४,०६५/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. उक्त कामाबाबत कार्यकारी अभियंता सा.बां.वि. धुळे यांचे पत्र क्र./ ४९४७ दि.१९/०८/२०२२ अन्वये रक्कम रु.२६,१६,६९,१११/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./१२६/२०दि.१५/१२/२०२२ रोजी दैनिक मिड डे/लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२०/०१/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.जय कन्सट्रक्शन	शे.०.०५० % जास्त	
२	मे.एस.बी.देशमुख	शे.५.००० % जास्त	
३	मे.रामेश्वर ड्रिम जे.व्ही.	**अंदाजपत्रकीय दराने**	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.रामेश्वर ड्रिम जे.व्ही.** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे १७,९२,८८,८२६/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.रामेश्वर ड्रिम जे.व्ही.** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम धरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.रामेश्वर ड्रिम जे.व्ही.** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीसत्व सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदस्यांनी केलेल्या सुचनांचा समावेश व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.रामेश्वर ड्रिम जे.व्ही.** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच कामाचा दर्जा व गुणवत्ताबाबत प्रशासनाने काम पूर्ण झाल्यावर पहाणी करावी तसेच सदरचे काम क्वालिटी कंट्रोल संस्था, नाशिक यांच्याकडून प्रमाणित करण्यात यावे व याबाबतचा अहवाल मे.स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर करावा व तदनंतरच संबंधित कामाचे देयके अदा करण्यांत यावे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती नाजियाबानो नासीरखॉ पठाण

अनुमोदक :- श्रीमती फातमाबी नुरुल अन्सारी

सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३४ मुलभूत सोईसुविधा निधी २०२१-२२ अंतर्गत एलपीजी शवदाहिनी (फरनेस) त्याचाशी सलग्न ३० मी उंचीची चिमणी व स्क्रबर तसेच इतर उपकरणे व शेडचे बांधकाम करणे (देवपूर व चित्तोड रोड अमरधाम) निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — या विषयाचे स्वरुप काय आहे त्याबद्दल माहिती सदस्यांना अवगत करावी.

म. विद्युत अभियंता — मुलभुत सोईसुविधा निधी २०२१-२०२२ अंतर्गत आपण चौथ्यांदा निविदा केली आहे. यामध्ये १ कोटी २८ लाखाची मंजूरी झाली आहे यामध्ये देवपूर अमरधाम शेडचे बांधकाम झाले आहे. त्या ठिकाणी श्री अग्रवाल यांनी शवदाहिनी डोनेट केली आहे त्याच रांगेमध्ये ही एक शवदाहिनी आपण बसविणार आहोत. तसेच चितोड रोड येथे बांधकाम करुन एलपीजी शवदाहिनी बसविणार आहोत. त्यासाठी मंजूरीस्तव हा विषय स्थायी समिती समोर आला आहे.

म.सुनिल बैसाणे — या शवदाहिनीमुळे धुळेकर नागरिकांना काय फायदा होणार आहे? काय बचत होणार आहे? मनपा यात काय सोई सुविधा उपलब्ध करुन देत आहे.

म.विद्युत अभियंता — या शवदाहिनीमध्ये एलपीजी गॅसचा वापर होणार आहे. यात कमर्शिअल सिलेंडर कंपनीकडून गॅस सिलेंडर घ्यावा लागणार आहे. साधारणत: लाकडाच्याच दरात ही सेवा मिळेल हया गॅस कंपन्याकडून अशा योजनांसाठी सबसिडी मिळते ते सिलेंडर कमी दरात मिळेल यात नागरिकांच्या खर्चाचा भार पडणार नाही. ही सुविधा मोफत नाही. लाकडांच्या किमतीच्या तुलनेत हा खर्च कमी होईल्.

म.सभापती — मा. आयुक्त सो. याबाबत नागरीकांच्या माहितीसाठी सविस्तर प्रेस नोट करावी. जेणे करुन नागरिकांना कळले पाहिजे. व त्यांची जनजागृती झाली पाहिजे.

म.नाजियाबानो पठाण — मागच्या वेळेस कारोना काळातील सर्व परिस्थिती आपल्याला माहित आहे. त्यावेळेस लाकडे मिळत नव्हते. यातून प्रदूषण ही कमी होणार आहे. हा फायदा पाहून मा. आमदारांनी हे काम आणले आहे. हा विषय मंजूर करण्यात यावा.

म.किरण अहिरराव — हया शवदाहिनीतील अस्थि विसर्जित करण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांना मिळतात का ?

म.विद्युत अभियंता — आस्थि मृतच्या नातेवाईकांना दिल्या जातात.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कामाची विस्तृती माहिती असलेली प्रेस नोट नागरीकांना माहितीसाठी प्रसिध्द करावी जेणे नागरीकांमध्ये जनजागृती होईल.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३ दिनांक १३/०३/२०२३

मुलभूत सोईसुविधा निधी २०२१-२२ अंतर्गत एलपीजी शवदाहिनी (फरनेस) त्याचाशी सलग्न ३० मी उंचीची चिमणी व स्क्रबर तसेच इतर उपकरणे व शेडचे बांधकाम करणे (देवपूर व चित्तोड रोड अमरधाम) वित्तीय लिफाफा उघडणे बाबत प्राप्त निवदेची तांत्रिक छाननी साठीच्या निविदा समितीच्या बैठकीचे इतिवृत्त" (4th call).

उक्त कामाबाबत टिप्पणी/जिल्हाधिकारी सो यांची प्रशासकीय मान्यता/ दि.१०-३-२०२२ रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम **रु.१,२८,७३,५३१/-** मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवी/३६३ दि.८-२-२०२३** अन्वये व **दि.९-२-२०२३** च्या **दै.पुण्यनगरी** व धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा /कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून

दि.२०-२-२०२३ रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	**Kalyani Enterprizes,Pune**	**अंदाजपत्रकीय दराने**	**L१**

उक्त बाबत दि.८-३-२०२३ दु. ५ वाजता म.अति आयुक्त तथा निविदा समिती यांच्या दालनात निविदेची वित्तीय छाननी बैठक संपन्न झाली.सदर बैठकीतील समिती सद्स्थायांनी निविदेमध्ये तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **Kalyani Enterprizes,Pune** यांची निविदा सर्वात न्यूनतम दाराचे म्हणजेच **१,२८,७३,५३१/-** इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा. आयुक्त यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

करिता ठेकेदार **Kalyani Enterprizes,Pune** यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **Kalyani Enterprizes,Pune** यांनी सर्वात कमी म्हणजेच **अंदाजपत्रकीय दराची** आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती कडे सादर झालेली आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **Kalyani Enterprizes,Pune** यांचे दर तुलनेत सर्वात कमी असल्याने त्यांचे आलेल्या निविदा दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मंजुरी देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. तसेच सदर कामाची विस्तृती माहिती असलेली प्रेस नोट नागरीकांना माहितीसाठी प्रसिध्द करावी जेणे नागरीकांमध्ये जनजागृती होईल.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ७ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह

गुरुवार दिनांक २३/०३/२०२३

वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं. ७ आज **गुरुवार दिनांक २३/०३/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ.किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती**, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री.नितीन कापडणीस	अति.आयुक्त
२	श्री. व्ही. आर. सनेर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
५	श्रीमती पल्लवी शिरसाठ	मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी
६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव

७	श्री. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
८	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
९	श्री. चंद्रकांत मोरे	लेखापाल
१०	श्री.सुनिल बर्गे	वरिष्ठ सहा. आस्थापना
११	श्री. किशोर सुडके	प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख
१२	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१३	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१४	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१५	श्री.महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ
१६	श्री. शिरीष जाधव	मालमत्ता कर अधिक्षक
१७	श्री. मधुकर निकुम	मालमत्ता कर अधिक्षक
१८	श्री. राजू माईनकर	भांडारपाल
१९	श्रीमती कल्पना जाधव	अभिलेखापाल
२०	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२१	श्री.दुष्यंत महाजन	अग्निशमन विभाग
२२	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग

म. सभापती — सन्मा.सदस्य मा. अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

मा. सभापती — आपणा सर्वांना गुढीपाडवा म्हणजेच हिंदु नववर्षाची सुरुवात तसेच मुस्लीम बाधवाचा पवित्र रमजान मास व प.पु.भगवान झुलेलाल यांचा अवतरण दिवस सिंधी बांधवांचा चेट्रीचंड यानिमित्त सर्व बांधवांना पत्रकार व प्रेस फोटोग्राफर यांना शुभेच्छा

विषय क्रमांक :- ३५ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दिनांक ०९/०३/२०२३)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सुनिल बैसाणे — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३४ दिनांक २३/०३/२०२३

मागील स्थायी समिती सभा दिनांक ०९/०३/२०२३ चे स्थायी समिती ठराव नंबर २२ ते २७ अखेर तसेच सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३६ मा.महापौर सो.यांच्याकडील वाहन क्रमांक एम.एच. १८ बी. जी. ००१९ वाहनासाठी नविन टायर खरेदी करणेकामी येणारा खर्च रू.१६,९७६/- मात्रला मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव विषय मंजुर करण्यांत यावा.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३५दिनांक २३/०३/२०२३

धुळे महानगरपालिका म.महापौर सो यांच्या सेवेतील वाहन क्र. एम.एच.१८ बी.जी.००१९ टाटा सफारी वाहन सुस्थीतीत असणे आवश्यक आहे.वाहनांचे एकुण धावसंख्या १,००००० कि.मी. मात्र झालेली आहे.त्यानुसार वाहन चालक यांनी अहवाल सादर केल्यानुसार वाहन विभागाकडून श्री बन्सल टायर हाऊस, धुळे यांना पत्र देऊन नविन टायर नग-२ दरपत्रक मागविणेत आले. येणेप्रमाणे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

अ.क्र.	साहित्याचा तपशील	नग	दर /रुपये	रक्कम
१	अेपटर एच ७ -टायर टयुबलेस (२३५/७० आर १६)	०२	८४८८ (Included GST-28%)	₹.१६९७६/-
			एकुण (सर्व करासहित)	₹.१६९७६/-

देखभाल दुरूस्ती शासन निर्णय ३० सप्टेंबर २०११ महसूल व वन विभाग वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-एक उप विभाग दोन नियम ६९, पृष्ठ क्र.३० नुसार डिझेल वाहनास ₹.७५,०००/- पर्यंत दुरूस्ती खर्चास वार्षीक मर्यादा आहे.

आर्थीक वर्ष	खर्च रक्कम	आर्थीक वर्ष	खर्च रक्कम
२०१९-२०	₹.१३००/-	२०२१-२२	₹.२८१३७/-
२०२०-२१	₹.१,०२,९६६/	२०२२-२३ या वर्षात दुरूस्ती खर्च आजपावेतो	₹.८१४०३/-

महानरपालिका मेकॅनिक यांनी तांत्रिक तपासणी केलेली आहे. वाहनांची आजपावेतो एकुण धावसंख्या १,००,००० कि.मी. मात्र झालेली आहे.

म.आयुक्त सो. यांनी मनपा अधिनियम कलम ६६ (२) व ६९ नुसार रक्कम ₹.५,००००/-(पाच लक्ष) पर्यंत खर्चाचे अधिकार जा.क्र./धुमपा/आस्था/ ७७९/दि.१९/०७/२०२१ अन्वये म.उपायुक्त सो यांना परावर्तीत केलेले आहे. तरी सदर नविन टायर टयुबसह नग-२ खरेदी खर्च ₹.१६,९७६/-मात्र खर्चास प्रशासकीय व आर्थीक तसेच दरपत्रक मागविणेस व आर्थिक वर्षातील खर्च मर्यादा ओंलाडत असल्याने मे. स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मा.महापौर सो.यांच्याकडील वाहन क्रमांक एम.एच. १८ बी. जी. ००१९ वाहनासाठी नविन टायर ट्युबसह नग-२ खरेदी खर्च ₹.१६,९७६/-मात्र खर्चास प्रशासकीय व आर्थीक तसेच दरपत्रक मागविणेस व आर्थिक वर्षातील खर्च मर्यादा ओलांडत असल्याने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

अनुमोदन:- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजुर,

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३७ देवपूर राम नगर जलकुंभ येथे ४०० एम.एम.पाईपलाईन टाकणे व व्हॉल बसविणेकामी झालेला खर्च रू.७,३१,०६९/- मात्रला कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे हा खर्च कुठल्या निधीतून करणार आहे?

म. ओव्हरसिअर हा खर्च मनपा निधी अंतर्गत करणार आहे.

म.सुनिल बैसाणे आपण मनपा निधीतून करत आहात पण कोणत्या वित्तीय वर्षातून २१-२२ की २२-२३ मधून करत आहात हे सांगावे?

म. ओव्हरसिअर वित्तीय वर्ष २२-२३ मधून आपण देखभाल दुरुस्ती अंतर्गत करत आहोत. यामध्ये ६ कोटी ८८ लाख तरतूद केली होती. याचा खर्च वजा जाता ५ कोटी ३० हजार ७४४ आहे. हा फक्त मंजूरीचा खर्च आहे.

म.सुनिल बैसाणे पाईपलाईन कुठुन कुठपर्यंत याबाबत उल्लेख नाही. सभापती महोदय, या छोटया मोठया कामांमध्येही लक्ष द्यावे अशी विनंती करतो. प्रशासनाच्या टिपणी नुसार मंजूर करावा. त्यात काही त्रुटी आढळल्यास प्रशासन त्याला जबाबदार राहील.

म. सभापती कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत प्रस्तावातील त्रुटीसंदर्भात प्रशासनाने खात्री करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३६ दिनांक २३/०३/२०२३

धुळे शहर पाणीपुरवठ्याच्या रु.१३६ कोटी योजने अंतर्गत नवीन एमबीआर ते राम नगर जलकुंभापावेतो पाईपलाईन टाकण्यात आली असून सदरची पाईपलाईन राम नगर जलकुंभ भरणाऱ्या पाईपलाईनला जोडली नसल्याने सदरची पाईपलाईन उपयोगात येत नाही.सदरची पाईपलाईन राम नगर जलकुंभ भरण्याच्या पाईपलाईनला जोडल्यास सदरचे जलकुंभ एमबीआर वरून भरता येईल.त्यामुळे सदर जलकुंभावरून होणारा पाणीपुरवठा १ ते २ दिवसांनी कमी करता येईल व त्या भागांतील पाणी पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.तसेच हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्र व तापी पाणी पुरवठा योजने वरून देखील जलकुंभ भरण्याची पर्यायी व्यवस्था होणार आहे.

उक्त बाबत सदरची पाईपलाईन राम नगर जलकुंभ भरणाऱ्या पाईपलाईनला जोडली आहे किंवा नाही याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडुन अहवाल मागविण्यात आला होता.त्यानुसार त्यांनी सदरची पाईपलाईन जोडली नसून सदरची पाईपलाईन मनपामार्फत जोडण्यात यावी असा अहवाल दिला आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास मजिप्रा विभागाकडील शासकीय दरसूची सन २०२१-२२ नुसार रु.७,३१,०६९/-मात्र खर्च अपेक्षित आहे.

उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.संजय गायकवाड ठेकेदार मनपा,धुळे यांच्या कडुन करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती सादर झालेले आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून देवपूर राम नगर जलकुंभ येथे ४०० एम.एम.पाईपलाईन टाकणे व व्हॉल बसविणेकामी झालेला खर्च रू.७,३१,०६९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (क) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत प्रस्तावातील त्रुटीसंदर्भात प्रशासनाने खात्री करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. दगडू भिमा बागुल

सर्वानुमते मंजुर,

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३८ पाणी पुरवठा व आरोग्य विभागाकडील मानधनावरील तांत्रिक कर्मचारी तसेच वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म.विजय जाधव विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३७ दिनांक २३/०३/२०२३

कार्यालयीन टिपणीनुसार खालील मानधनावरील १ ते २२ पंप ऑपरेटर , विजतंत्री , गाळणी निरीक्षक , गाळणी चालक , पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	हुददा	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रुपये
१	कल्पतरु स. वाघ	पंप ऑपरेटर	२७/१/२०२३	१४०००/-
२	अमित अनिल पोतदार	पंप ऑपरेटर	२७/१/२०२३	१४०००/-
३	योगेश साहेबराव देवरे	पंप ऑपरेटर	२७/१/२०२३	१४०००/-
४	चेतन भानुदास सुडके	पंप ऑपरेटर	२७/१/२०२३	१४०००/-
५	दिपक वसंत माळी	पंप ऑपरेटर	२७/१/२०२३	१४०००/-
६	अमोल नरेंद्र अंपळकर	पंप ऑपरेटर	२७/१/२०२३	१४०००/-
७	इश्वर विठ्ठल बडगुजर	पंप ऑपरेटर	२७/१/२०२३	१४०००/-
८	रुपेश महेंद्र खैरनार	पंप ऑपरेटर	२७/१/२०२३	१४०००/-
९	देवेंद्र नामदेव सोनवणे	विजतंत्री	२७/१/२०२३	१४०००/-
१०	रमन भिकु पाटील	विजतंत्री	२७/१/२०२३	१४०००/-
११	केशव मधुकर महाजन	विजतंत्री	२७/१/२०२३	१४०००/-
१२	विश्वजीत विजय गुर्जर	विजतंत्री	२७/१/२०२३	१४०००/-
१३	वराडे अक्षय राजेंद्र	विजतंत्री	२७/१/२०२३	१४०००/-
१४	अमोल मधुकर पाटील	गाळणी निरीक्षक	२७/१/२०२३	१४०००/-
१५	गणेश दिगंबर शेलार	गाळणी निरीक्षक	२७/१/२०२३	१४०००/-
१६	खैरनार अरुण राजाराम	गाळणी निरीक्षक	२७/१/२०२३	१४०००/-
१७	रमेश वेडु बोरसे	गाळणी चालक	२७/१/२०२३	१४०००/-
१८	साळुंखे विनायक जगन	गाळणी चालक	२७/१/२०२३	१४०००/-
१९	बडगुजर राहुल अंबादास	गाळणी चालक	२७/१/२०२३	१४०००/-
२०	महाजन उमेश रविंद्र	गाळणी चालक	२७/१/२०२३	१४०००/-
२१	निलेश पंढरीनाथ करनाळे	गाळणी चालक	२७/१/२०२३	१४०००/-
२२	किरण गोविंदा चव्हाण	गाळणी चालक	२७/१/२०२३	१४०००/-

तसेच मंजुर कार्यालयीन टिपणी नुसार खालील मानधनावरील लिपीक टंकलेखक कर्मचारी यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अक्र	संगणक ऑपरेटरचे नाव	पदाचे नाव	कार्यरत विभाग	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रु
१	श्री. पवन किशोर कानडे	लिपीक टंकलेखक	ऑडीट	१७/२/२०२३	१५,०००/-
२	श्री. मिलींद रविन्द्र नगराळे	लिपीक टंकलेखक	अभिलेख विभाग	१७/२/२०२३	१५,०००/
३	श्री. भाग्यश्री प्रकाश मोरे	लिपीक टंकलेखक	एलबीटी विभाग	१७/२/२०२३	१५,०००/

मंजुर कार्यालयीन टिपणी नुसार खालील मानधनावरील कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अक्र	उमेदवाराचे नाव	पदाचे नाव	कार्यरत विभाग	मुदत संपुष्ठात आल्याचा दि.	मानधन
१	पाटील वर्षा गंगाधर	कनिष्ठ अभियंता	बांधकाम / पा पु विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
२	कु चंदाबी शेख जाफर शेख	कनिष्ठ अभियंता	बांधकाम / पा पु विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
३	शिंदे प्रणव किशोर	कनिष्ठ अभियंता	बांधकाम / पा पु विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
४	मयुर राजेंद्र निकम	कनिष्ठ अभियंता	बांधकाम / पा पु विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
५	भुषण मनोज ढवळे	कनिष्ठ अभियंता	बांधकाम / पा पु विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
६	मोहनीश दिलीप पाटील	कनिष्ठ अभियंता	बांधकाम / पा पु विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
७	स्वप्नील सुनिल थोरात	कनिष्ठ अभियंता	बांधकाम / पा पु विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
८	पाटील अक्षय राजेंद्र	कनिष्ठ अभियंता	नगररचना विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
९	ठाकरे पराग प्रदिप	कनिष्ठ अभियंता	विदयुत विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
१०	गितेश दिलीप सोनार	कनिष्ठ अभियंता	विदयुत विभाग	२६/३/२०२३	२३०००/-
११	श्री निखील टकले	कनिष्ठ अभियंता	बांधकाम / पा पु विभाग	२६/३/२०२३	२३०००/-

मंजुर कार्यालयीन टिपणी नुसार खालील मानधनावरील वैदयकीय अधिकारी व इतर मानधनावरील कर्मचारी यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदनाम	मुदत संपुष्ठात आल्याचा दि.	मानधन रुपये
१	डॉ. पिंगला देसाई	वैदय. अधिकारी	१९/२/२०२३	६०,०००/-
२	डॉ. श्री. योगेश पाटील	वैदय.अधिकारी (आयुर्वेदीक)	१५/१/२०२३	३०,०००/-
३	श्री. संकेत जैतपुरे	औषध निर्माता	१९/२/२०२३	१५,७००/-
४	श्रीमती विजया लाखा राऊत	एएनएम	११/१२/२०२२	१५,५००/-
५	श्री.इमरान शेख इब्राहिम अत्ताफीटर		१९/२/२०२३	१४,०००/-

तरी वरील मानधन तत्वावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता त्यांच्या नावासमोर नमुद एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उक्त मानधन तत्वावरील वरील कर्मचारी यांना मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार में. स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सवर् सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त मानधन तत्वावरील वरील कर्मचारी यांना मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी
अनुमोदक :- श्री. विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३९ मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.४ श्री.शिवाजीराव चौधरी यांच्या घरापासून ते इंदिरा गार्डनपावेतो रस्ता डांबरीकरण करणेसाठी निविदा दर मागविण्यात आले त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.विजय जाधव सदर प्रस्ताव हा दर मंजूरीसाठी आलेला आहे. सदरचे काम इतर शासनाचा निधिमध्ये असल्यास तपासून पुन्हा सादर करावा तो पर्यंत विषय तहकूब ठेवावा.

म. दगडू बागुल — विषय तहकूब ठेवावा.

म.सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदरचा प्रस्ताव सद्यस्थितीत तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३८ दिनांक २३/०३/२०२३

मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.४ श्री.शिवाजीराव चौधरी यांच्या घरापासून ते इंदिरा गार्डनपावेतो रस्ता डांबरीकरण करणेसाठी निविदा दर मागविण्यात आले असून सदरचा प्रस्ताव मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झाला असता या प्रस्तावातील काम इतर शासन निधीमध्ये समाविष्ठ आहे किंवा कसे याबाबत प्रशासनाने खात्री करावी तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक श्री. विजय बापू जाधव

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागुल

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ४० — हद्दवाढ निधी अंतर्गत प्र.क्र. ६ मध्ये सुयोग हौसिंग सोसायटी व सुरज हौसिंग सोसायटी मधील रस्ते कॉक्रीटकरण व भूमिगत गटार करणेबाबत निविदा दर मागविण्यात आले त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — विषय मंजुर करण्यांत यावा. हद्द वाढ गांवातील कामासाठी स्वतंत्र निधीचे खाते उघडण्यांत यावे.

म. सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३९ दिनांक २३/०३/२०२३

प्र.क्र.०६ मध्ये हद्दवाढ अंतर्गत सुयोग हौ.सोसा. व सुरत हौ.सोसा.विसावे घर ते तुळशीराम शिंदे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे व भूमिगत गटार करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती क्र.२१६ दि.२०/१०/२०२२ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२९/०९/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**७६,२५,९६७/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /२६९/२०२२-२३ दि. ०६/१०/२०२२ अन्वये रक्कम रु.**७६,२५,९६७/-**(जीएसटी सह)मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/ पा.पु.वि/ १०२१/ २०२२-२३ अन्वये दि.२१/१२/२०२२ अन्वये दि.२२/१२/२०२२ रोजी दैनिक **दिव्य मराठी/ सप्ता खान्देश शिंदखेडा** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०२/०१/२०२३ पर्यंत निविदा दर

मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	अे.के.सैफी	शे.१ % जास्तीने	
२	श्री.सौरभ संजय कदमबांडे	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**
३	श्री.अभिषेक विजय चिंचोले	शे.२ % जास्तीने	

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.सौरभ संजय कदमबांडे** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.सौरभ संजय कदमबांडे** यांची **अंदाजपत्रकीय दराने** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे पाठविणे आवश्यक असल्याने उक्त कामी श्री.सौरभ संजय कदमबांडेयांचे अंदाजपत्रकीय दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **श्री. सौरभ संजय कदमबांडे**यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव
अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-४१ मुलभूत सेवा सुविधा योजने अंतर्गत प्र.क्र.५ मध्ये प्रयाग अपार्टमेंट ते विकास माळी ते संजय भदाणे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणेबाबत निविदा दर मागविण्यात आले त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.रंगनाथ ठाकरे विषय मंजुर करण्यांत यावा.

म.कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४० दिनांक २३/०३/२०२३

मुलभूत सोई सुविधाचा विकास योजने अंतर्गत प्र.क्र.५ मध्ये प्रयाग अपार्टमेंट ते विकास माळी ते संजय भदाणे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे बाबतच्या कामास म.आयुक्त सो. धुळे

महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०२/०२/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३९,९२,१७८/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /८२०/२०२२-२३ दि. १४/०३/२०२२ अन्वये रक्कम रु.**३९,९२,१७८/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि/११८५/२०२२-२३ दि.१७/०२/२०२३ अन्वये फेर ई-निविदा ३ री वेळ दि.१७/०२/२०२३ रोजी दैनिक **दिव्य मराठी/समाज सारथी** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२१/०२/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.रामेश्वर ट्रेडर्स	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे. व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाना रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर निविदा समितीने मंजुरी दिली असून मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर करण्यांत आलेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

अनुमोदक :- सौ. कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ४२ मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये आग्रारोड सावता बिल्डींग मटेरियल श्रीराम मंदिर ते डा्रयव्हशन सर्व्हिस रोडपावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत निविदा दर मागविण्यात आले त्याबाबत कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म. वसीम अन्सारी विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४१ दिनांक २३/०३/२०२३

मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये आग्रारोड सावता बिल्डिंग मटेरियल श्रीराम मंदिर ते ड्रायव्हर्शन सर्व्हिस रोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास म.आयुक्त सो. धुळे

महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.१३/०४/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३७,५१,७३७/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२५२/२० दि.२२/०९/२०२२ अन्वये रक्कम रु.**३७,५१,७५७/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/१२७/२०अन्वये दि. १६/१२/२०२२ रोजी दैनिक **देशदूत / वार्ता** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. ०२/०१/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.राहुल पंचम मोरे	**अंदाजपत्रकीय दर**	**सर्वात कमी दर**
२	श्री.मनोज वसंत बागुल	शे.२.०० % जास्त	
३	श्री.दिनेश गुजर	शे.५.०० % जास्त	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.राहुल पंचम मोरे** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **३७,५१,७५७/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.राहुल पंचम मोरे** यांचे दर **अंदाजपत्रकीय**आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.राहुल पंचम मोरे** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर करण्यास तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **श्री. राहुल पंचम मोरे** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक :- श्री. वसीम खलील अन्सारी

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-४३ मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.२ मधील भामरे यांच्या घरापासून ते सर्व्हे नं.४१/१ प्लॉट नं.२ व प्लॉट नं.३३ ते प्लॉट नं.१ पावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत निविदा दर मागविण्यात आले त्याबाबत कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म.किरण अहिरराव विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४२ दिनांक २३/०३/२०२३

मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये भामरे यांच्या घरापासून ते स.नं.४४/१ प्लॉट नं.२ पर्यंत व प्लॉट नं.३३ ते प्लॉट नं.१ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास म.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.१३/०९/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३८,३९,९८०/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /२५३/२० दि.२२/०९/२०२२ अन्वये रक्कम रु.**३७,२६,७८९/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/९४/२० अन्वये दि.१३/१०/२०२२ रोजी दैनिक **देशदूत/वार्ता** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०३/११/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.राहुल पंचम मोरे	**अंदाजपत्रकीय दर**	**सर्वात कमी दर**
२	श्री.मनोज वसंत बागुल	शे.३.०० % जास्त	
३	श्री.दिनेश गुजर	शे.५.०० % जास्त	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.राहुल पंचम मोरे** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **३७,२६,७८९/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.राहुल पंचम मोरे** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.राहुल पंचम मोरे** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **श्री.राहुल पंचम मोरे** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.**सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.**

सुचक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

अनुमोदक :-श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ४४ विकास शुल्क निधी अंतर्गत प्र.क्र.१९ मध्ये वडजाई रोड मायक्रो जलकुंभ परिसरात गटार करणे १०० फुटी रस्ता ते अरिहंत भुवन पर्यंत गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अब्दुल लतीफ अन्सारी विषय मंजुर करण्यांत यावा.

म.नाजियाबानो पठाण विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४३ दिनांक २३/०३/२०२३

विकास शुल्क निधी अंतर्गत प्र.क्र.१९ मध्ये वडजाई रोड मायक्रोजलकुंभ परिसरात गटार करणे १०० फुटी रस्ता ते अरिहंत भुवन पर्यंत गटार करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.१५ दि.२५/०३/२०२१ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३४,६४,१११/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /२४/२० दि.०७/०४/२०२१ अन्वये रक्कम रु.**३४,४८,९४६/-** खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/८३/२० अन्वये दि. १५/०६/२०२१ अन्वये रोजी वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०५/०७/२०२१ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	अ.के.सैफी	अंदाजपत्रकीय दराने	**सर्वात कमी दर**
२	शेख मोइनोद्दिन अजीमोद्दिन	अंदाजपत्रकीय दराने	**सर्वात कमी दर**
३	सुकन्या सुरेश चौधरी	शे.२.०० % जास्त	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **अे.के.सैफी / शेख मोइनोद्दिन अजीमोद्दिन** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे . तरी वरील दोन्ही ठेकेदार यांना वाटाघाटी करीता बोलावले असता **अे.के.सैफी** यांनी **शे.२.०० %** कमी दराने काम करण्यास पत्र दिलेले असून कमी दराने काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.तरी मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **अे.के.सैफी** यांनी **शे.२.०० %** कमी दराने काम करण्यास पत्र दिलेले असून कमी दराने काम

करण्यास तयारी दर्शविलेली असल्याचे निगोसिएशन अंती आलेल्या शे. २.०० % कमीने आलेल्या दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. अब्दुल लतीफ अब्दुल हमीद अन्सारी

अनुमोदक :-श्रीमती नाजियाबानो नासीर खां पठाण **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-४५ स्टेशनरोड अतिक्रमण व पाझंरा नदी चौपाटी येथील मालमत्ता कर व पाणीपट्टी कर निलेर्खीत करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन हा जो विषय आलेला आहे यावर आपण किती मालमत्ता कर रकमेची नोटीस दिलेली आहे? किती थकबाकी आहे?

म.नगरसचिव टिपनीमध्ये नमुद केले आहे. यादीप्रमाणे १ ते १७२ मालमत्ता होत्या त्यांचा एकूण कर रु ५१,६५,३६९/- आणि पाणीपट्टी रु ३,६०,९०६/- व चौपाटी येथील मालमत्ता कर रु १,६६,४३८/- आणि पाणीपट्टी रु ३०००/- असा कर थकीत होता.

म.हर्षकुमार रेलन आज जे स्टेशन रोडचे अतिक्रमण आहे ते काढले आहे परत त्यावर अतिक्रमण झालेले आहे का? आज ती जागा प्रशासनातील कोणी अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे का? किंवा एखादी समिती तिथे गेलेली आहे का? चौपाटी कोणी बांधली होती? व्यक्तीने किंवा संस्थेने? तेथील नागरिकांना आपण सुविधा दिलेल्या आहे आणि आपण एवढया मोठया रक्कमा सोडून द्यायच्या का? या विषयावर अभ्यास करावा. त्यावेळेला आपण त्यांना पाणी दिलेले आहे. रस्ते बनवून दिलेले आहे. यावर मनपाने नुकसान का करावे? ते लोकं आजपण तिथे राहत आहेत. या विषयावर वेळ घ्यावा. किंवा याबाबत एखादी समिती गठीत करावी. आपण कर निर्लेखित करत आहोत हे चुकीचे आहे.

म.अति. आयुक्त स्थायी समिती सक्षम प्राधीकरण आहे. याबाबत वस्तुस्थितीचा अहवाल पुढच्या सभेत घेऊ.

म.सुनिल बैसाणे सन्मा. सदस्य हर्षभैय्यांनी जे प्रश्न उपस्थित केले ते खऱ्या अर्थाने क्रमप्राप्त आहे. स्थायी समिती पुढे विषय आणत असतांना प्रशासनाने सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. ज्यावेळी सन्मा. सदस्य शंका व प्रश्न उपस्थित करतात आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांना खुलासा करतांना अडचणी येतात आणि सभागृहाचा वेळ वाया जात असतो. आम्ही वेळ घालवण्यासाठी या ठिकाणी आलेलो नाही. माझ्या देखील काही शंका आहे. याठिकाणी न्यायालयाच्या याचीका क्र. ४१५ आणि ८५२०१५ अन्वये नमुद केले आहे. याबाबत न्यायालयाने काय निकाल दिला आहे. याचा सव्वीस्तर अहवाल दिला नाही. तसेच लाभार्थ्यांच्या याद्या दिलेल्या नाही. आता तिथे नेमके तेच लोक राहत आहे याचे देखील अवलोकन होत नाही. जर आधिचे लाभार्थी तेथे राहत नसतील

तर त्याबाबतचा आपण सखोल विचार करु शकतो. परंतु दुसरे अतिक्रमण होत असेल त्यांनाही माफी देऊ आणि पुन्हा पुन्हा असे विषय येत असतील तर याबाबत आपण अभ्यास केला पाहिजे. टिपणी मध्ये वकीलाचा सल्ला घेतला आहे किंवा नाही हे नमुद नाही. आपण धुळे मनपाच्या पॅनेलवर वकील नियुक्त केले आहे. वकीलांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. आणि यासारखे आणखी किती विषय आहे? ते विषय एकत्रित करणे गरजेचे आहे. आणि महासभेपुढे हे धोरण ठरवले गेले पाहिजे. माफी द्यावी की नाही द्यावी याचे धोरण महासभेपुढे ठेवावे. आणि त्यानंतर हा विषय स्थायी समिती पुढे घ्यावा तोपर्यंत विषय तहकू करावा.

म.सभापती

सन्मा. सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आणि हा विषयावर विचार व अभ्यास करुन प्रशासनाने फेर प्रस्ताव सविस्तर सादर करावा तो पावेतो सदर विषय तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४४ दिनांक २३/०३/२०२३

स्टेशनरोड अतिक्रमण व पाझंरा नदी चौपाटी येथील मालमत्ता कर व पाणीपट्टी कर निलेर्खीत करणेबाबत मे.स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झाला असता सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दया बाबत सविस्तर माहिती सादर झालेली नसल्याने प्रशासनाने याबाबत सविस्तर फेर प्रसताव पुनश्च: स्थायी समितीपुढे सादर करावा तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

सर्वानुमते मंजुर,

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ८ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक ०६/०४/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं. ०८ आज **गुरुवार दिनांक ०६/०४/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ.किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१२	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१३	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री.नितीन कापडणीस	अति.आयुक्त
२	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
३	श्री. व्ही. आर. सनेर	उपायुक्त
४	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी

५	श्रीमती पल्लवी शिरसाठ	मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी
६	श्री. सुनिल कौ. सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
७	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
८	श्री. के. एन. शिंदे	अभियंता
९	श्री. एम. आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
१०	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री. चंद्रकांत मोरे	लेखापाल
१३	श्री.सुनिल बर्गे	वरिष्ठ सहा. आस्थापना
१४	श्री. किशोर सुडके	प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख
१५	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१६	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१७	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१८	श्री.महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ
१९	श्री.प्रकाश सोनवणे	ओव्हरसियर नगररचना विभाग
२०	श्री. मधुकर निकुम	मालमत्ता कर अधिक्षक
२१	श्रीमती कल्पना जाधव	अभिलेखापाल
२२	श्री.अमोल सोनवणे व राजन महाले	अग्निशमन विभाग
२३	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२४	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभागप्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य मा. अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस धुळे महानगरपालिकेत नुकतेच नियुक्त झालेले उपमुख्य लेखापरीक्षक श्री.सुनिल कौ.सुर्यवंशी यांचे स्थायी समितीमध्ये सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत आले.

मा. सभापती — मुलभुत सेवा आणि सुविधा बरोबरच शहरातील धगधगणारे प्रश्न आणि समस्यांचे निसरण करतांनाच शहरातीली मुख्य बाजार पेठेसह मुख्य रस्ते, शैक्षणिक चौक, प्रशासकीय इमारती आणि मैदानांच्या भिंती यांच्या माध्यमातून शहरातील अनेकभिंती बोलक्या झालेल्या आहेत. शहराच्या सौदर्यीकरणात भर पडलेली असून भाजपाचे नेते मा. श्री.अनुपभैय्या अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाने व माध्यमातून शहरातील भिंतीवर लोक संस्कृती, लोककला, नैसर्गिक जनजागृती आणि अन्य प्रबोधनात्मक रंगीत चित्रे रंगविणेत आलेली आहेत. अनुपभैय्या अग्रवाल यांनी अख्खे शहर बोलके आणि उत्साही करण्याचा प्रयत्न केला आहे.याबद्दल श्री.अनुपभैय्या अग्रवाल यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करावा. अशी मी सभागृहात विनंती करते.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४५ दिनांक ६/४/२०२३

मा.सभापती सो.स्थायी समिती यांच्या यादीनुसार मुलभुत सेवा आणि सुविधा बरोबरच शहरातील धगधगणारे प्रश्न आणि समस्यांचे निसरण करतांनाच शहरातीली मुख्य बाजार पेठेसह मुख्य रस्ते, शैक्षणिक चौक, प्रशासकीय इमारती आणि मैदानांच्या भिंती यांच्या माध्यमातून शहरातील अनेकभिंती बोलक्या झालेल्या आहेत. शहराच्या सौदर्यीकरणात भर पडलेली असून भाजपाचे नेते मा.श्री.अनुपभैय्या अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाने व माध्यमातून शहरातील भिंतीवर लोक संस्कृती, लोककला, नैसर्गिक जनजागृती आणि अन्य प्रबोधनात्मक रंगीत चित्रे रंगविणेत आलेली आहेत. अनुपभैय्या अग्रवाल यांनी अख्खे शहर बोलके आणि उत्साही करण्याचा प्रयत्न केला आहे.

याबद्दल श्री.अनुपभैय्या अग्रवाल यांचे स्थायी समितीच्या माध्यमातून अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- सौ किरणताई राकेश कुलेवार

अनुमोदक :- सौ. कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-४६ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दिनांक १३/०३/२०२३)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.किरण अहिरराव इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४६ दिनांक ०६/०४/२०२३

मागील स्थायी समिती सभा दिनांक १३/०३/२०२३ रोजीच्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३४ ते ४४ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय देखील वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ४७ मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि. २१/०२/२०२३ ते दि. २०/०३/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बेसाणे

आज भारतीय जनता पार्टीचा वर्धापन दिवस आहे. आपण भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कार्यक्रम आणि समाजाला दिशा देण्याचे काम आदरणीय पंतप्रधान मोदी साहेब आणि सर्वच पदाधिकारी कार्यकर्ते करत असतात. सभापती महोदया आज आपण आयुक्त यांच्या मान्यतेने ५ लाख ते २५ लाख रुपये पर्यंतचा बांधकाम आणि संबंधित असलेल्या कार्यादेशाच्या अवलोकनार्थ यादी आलेली आहे. सभापती महोदया मी आंपणांस विनंती करतो आणि प्रशासनाला देखील एक सूचना आहे, स्वातंत्रपूर्व व स्वातंत्रयानंतर ज्या ज्या महापुरुषांनी आपल्या समाजासाठी काम केले आहे त्या महापुरुषांचे आपण धुळे मनपाच्या वतीने जयंती उत्सव साजरा करतो. मला या ठिकाणी अपेक्षित होते की, महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती आहे त्यानंतर डॉ.बाबासाहेब अंबेडकर यांची जयंती देशपातळीवर नव्हेतर विश्व पातळीवर ती साजरी करण्यात येते. या ठिकाणी त्या महापुरुषांचे पुतळे सुशोभिकरणाचे , दुरुस्तीचे काम असेल याबाबतची या ठिकाणी मा. आयुक्तांच्या मान्यतेने कार्यादेशाच्या यादी मध्ये समावेश झाला असता तर मला आनंद झाला असता. प्रशासनाने सदस्यांच्या सूचना देण्यासाठी आणि त्या महापुरुषांच्या कार्याची दखल म्हणून केले असते तर आनंद झाला असता या यादीमध्ये महापुरुषांचा कुठेही उल्लेख केला नाही. या ठिकाणी विनंती करतो की स्थायी समितीच्या बजेटमध्ये सुध्दा माझ्या मागणीनुसार डॉ. बाबासो आंबेडकर व महात्मा फुले यांच्या जयंती उत्सवा निमित्ताने समता व बंधुत्व पंधरवाडा राबवावा अशी विनंती केली होती. त्या विनंतीला मान देऊन माहिती सादर केली असती तर आनंद झाला असता. याबाबत मा. सभापती मा. आयुक्तांना पत्र देखील दिले आहे. जर महापुरुषांच्या बाबतीत एवढी उदासिनता असेल तर आपल्याला अधिकार नाही त्यांना पुष्पमाला अर्पण करण्याचा. आपण त्यांच्या शपथा घेऊन त्यांच्या आदर्शावर चालण्याचा प्रयत्न करतो. ज्या महात्मा फुलेंनी महिला शिक्षणासाठी अनेक चांगले कामे देशपातळीवर केले आपल्याला विनंती करतो आपण मनपाच्या वतीने समता बंधूत्व पंधरवाडा राबवावा. कुठल्याही महापुरुषांची जयंती असो,तया पध्दतीने विकासाच्या दृष्टीकोनातून बजेटमध्ये जी तरतूद करतो त्या अनुषंगाने माहितीस्तव यादीमध्ये समावेश करावा. अशी विनंती करतो. आणि अति. आयुक्त साहेब प्रशासनाला सूचीत करुन द्यावी. आणि उत्सहात महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या कराव्या आणि अवलोकनार्थ आलेल्या यादीला मंजूरी द्यावी ही विनंती.

म. नगरसचिव

या ज्या याद्या अवलोकनार्थ सादर झाल्या 21/02/2023 ते 20/3/2023 या कालावधीत मा. आयुक्तांनी मान्यता दिलेल्या याद्या आहेत. सुशोभिकरणासाठी बांधकाम विभागामार्फत काय कार्यवाही करण्यात आली व काय करणार आहोत याबाबत अभियंता बागुल साहेबांनी सभागृहास माहिती द्यावी.

म.अभियंता

आपण दरवर्षी शहराच्या मध्यवर्ती जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्मारक पुतळा आहे पोलिस मुख्यालयाजवळचा त्या ठिकाणी आपण तेथील तिनही रस्तयांवर दुतर्फा विद्युत रोषणाई करतो. तेथे साउंउ सिस्टीम, जनरेटरची व्यवस्था करतो. तसेच पुतळयावर फुलांची सजावट व फ्रंट लाईट अशी सगळी व्यवस्था करतो. यावर्षी महात्मा फुले पुतळयाचे ठिकाणी सजावट करीत आहोत. हा सगळा खर्च 2023-2024 च्या बजेटमध्ये समावेश केलेला आहे.

म.सभापती सर्व स्वच्छता निरिक्षकांना आदेशित करण्यात येते की, पुतळयाच्या काही डागडुजी असेल ती करुन घ्यावी. केवळ जयंती पुण्यतिथीच्या दिवशी न करता दैनंदिन सर्वच महापुरुषांच्या पुतळयाच्या ठिकाणी स्वच्छता व देखरेख ठेवावी.

मा. आयुक्त सो. यांनी त्यांचे अधिकारात ५ लाख ते २५ लाखा पर्यत मंजुरी दिलेल्या विकास कामाची यादीचे अवलोकन करण्यांत आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४७ दिनांक ०६/०४/२०२३

मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण७ (ड)अन्वये दि.२१/०२/२३ ते दि.२०/०३/२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ

धुळे महानगरपालिका धुळे (बांधकाम विभाग)

दिनांक :- दि.२१/०२/२०२३ ते दि.२०/०३/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशाची यादी

अ.क्र	कार्या. क्रं	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	५१२	२१/०२/२०२३	नगरसेवक निधी अंतर्गत (श्री.मोगलाईकर) वलवाडी सर्व्हे नं.१२६/१ येथील जागेस पेव्हर ब्लॉक बसविणे.	९६४२०८	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
२	५१३	२१/०२/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये भारत नर्सरी सचिन देवरे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१४९९३१५	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २२-२३ अंतर्गत
३	५१३(अ)	२१/०२/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये राजाराम नगर भागात दत्तु पाटील यांचे घरापासून ते विसपुते यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२१९४७५७	साहित्यरत्नलोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२
४	५२०	२२/०२/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये तुळशीराम नगर भागात रायगड निवास ते बाळकृष्ण जाधव यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४८४४८५	मनपा निधी (देवपूर भागातील रस्ते व गटारी दुरुस्ती व नूतनी करण अंतर्गत सन२२-२३)
५	५२१	२२/०२/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये वलवाडी भागात श्री.चौधरी यांचे घरापासून ते साईबाबा मंदिरा पावेतो बंदिस्त पाईप गटार करणे.	९९७१०८	साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२
६	५२३	२४/०२/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये देवचंद नगर मध्ये बुरा भाऊ पवार ते दिपकगुलाले यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण व काँक्रीट गटार करणे.	२४९७३३४	साहित्यरत्नलोकशाहीर अण्णा भाऊसाठे नागरी दलित वस्ती सुधारयोजनाअंतर्गतसन २१-२२
७	५२५	२४/०२/२०२३	प्र.क्र.७ मध्ये मनपा निधी अंतर्गत जगदीश नगर येथील मनपा जागेत ओपनस्पेस येथे मेडिटेशन ध्यान हॉल बांधणे.	१५९९७८७	मनपा निधी अंतर्गत सन २०२२ - २३ (मेडिटेशन सेंटर उभारणे अंतर्गत)
८	५२७	०२/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये जितेंद्र नगर भागात खुल्या जागेत सभा मंडप बांधणे.	१९९०९८७	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
९	५२८	०३/०३/२०२३	प्र.क्र.०४मध्ये जयहिंद कॉलनी भागात मधुकर चप्पल मार्ट ते श्री.सी.व्ही.पाटील यांचे घरा पर्यंत रस्ता दुरुस्त करणे प्रोफेसर कॉलनी भागात अंतर्गत रस्ता दुरुस्त करणे व मुनिसिपलकॉलनी भागातरस्ता काँक्रीट करणे.	१९९८१५१	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
१०	५२९	०३/०३/२०२३	प्र.क्र.०३ मध्ये शारदा नगर भागात श्री. हरिचंद्र वानखेडे यांचे घरापासून ते श्री.भाटकर यांचे	१४२४५२८	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)

			घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.		
११	५३०	०३/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये केशर नगर भागात श्री.भरत नेरकर यांचे घरापासून ते सुभाष सनेर यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१७१०९३७	मनपा निधी रस्ते, गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत सन २०२२-२३
१२	५३१	०३/०३/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये ग.द.माळी सोसायटी भागात श्री. संदीप फुलपगारे यांच्या घरापासून ते श्री.विजय पाटील यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९९८००७	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
१३	५३२	०३/०३/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये ग.द.माळी सोसायटी भागात श्री.पाटील यांच्या घरापासून ते बोरसे यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	९९४२३७	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
१४	५३४	०८/०३/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये बोरसे कॉलनी येथे वडजाई रोडपासून ते ओपनस्पेस पर्यंत गटार करणे व रस्ता काँक्रीटीकरण करणे.	६९९४७०	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
१५	५३७	०८/०३/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये कबीरगंज भागात रस्ता काँक्रीटीकरण करणे,सर्व्हे नं.३९२ हाजीनगर येथील इमरान शेठ यांचे घराजवळील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.	२०७३८७६	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
१६	५३८	१४/०३/२०२३	धुळे मनपा हद्दीतील अवधाना येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरण करणे.	१४९३६७४	मनपा निधी (रमाई आंबेडकर भागातडो.बाबासाहेब आंबेडकर पुतळा तथा अवधान येथील शिवस्मारकचबुतरा सुशोभिकरण करणे) अंतर्गत सन २०२२-२३
१७	५३९	१४/०३/२०२३	प्र.क्र.१८ मध्ये हद्दवाढ निधी अंतर्गत मुंबई-आग्रा हायवे ते धनदाई माता मंदिर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४८१००८	हद्दवाढ गावांसाठी निधी अंतर्गत सन २०२२-२३
१८	५४०	१४/०३/२०२३	प्र.क्र.१८ मध्ये हद्दवाढ निधी अंतर्गत मुंबई-आग्रा हायवे ते रुपेश पाटील घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४५२३०९	हद्दवाढ गावांसाठी निधी अंतर्गत सन २०२२-२३
१९	५४१	१४/०३/२०२३	प्र.क्र.१८ मध्ये हद्दवाढ निधी अंतर्गत अवधान मेन रोड ते सप्तश्रृंगी मंदिरा पावेतो १२ मी. डी.पी. रस्ता काँक्रीट करणे.	२४४२३३९	हद्दवाढ गावांसाठी निधी अंतर्गत सन २०२२-२३
२०	५४२	१४/०३/२०२३	प्र.क्र.१८ मध्ये हद्दवाढ निधी अंतर्गत अवधान गावात श्री.बाळा पहेलवान घराजवळील रस्ता काँक्रीट करणे.	२४४२३३९	हद्दवाढ गावांसाठी निधी अंतर्गत सन २०२२-२३
२१	५४३	१४/०३/२०२३	प्र.क्र.१८ मध्ये हद्दवाढ निधी अंतर्गत मुंबई-आग्रा हायवे ते गणपती मंदिर पावेतो घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४३२२८८	हद्दवाढ गावांसाठी निधी अंतर्गत सन २०२२-२३
२२	५४४	१४/०३/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये अजय नगर व पाटकर नगर मधील बंदिस्त ओपनस्पेस मध्ये नाना नानी पार्क विकसित करणे.	२४८५९४६	नाना नानी पार्कतयार करणे अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
२३	५४५	१४/०३/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये कबीरगंज भागात रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१४९३६११	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
२४	५५१	१७/०३/२०२३	प्र.क्र.०८ मध्ये सलीम किराणा ते राजू पहेलवान ते शमीर ते मोहीन खाटिक यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९९३३०८	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (अल्पसंख्यांक भागातील प्रस्तावित तरतूद)
२५	५५२	१७/०३/२०२३	प्र.क्र.०८ मध्ये मिरच्या पारोती ग.नं.५ रामभाऊ दाढीवाला खुंट ते मक्का मस्जिद ते डॉ.जाकीर अन्सारी यांचे घरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे.	२०८१७२३	मनपा निधी (मनपा हद्दीतील रस्ते गटारी व अनुषंगिक अंतर्गत सन २०२२-२३)

२६	५५३	१७/०३/२०२३	प्र.क्र.०७ मध्ये श्री.हर्षकुमार रेलन नगरसेवक यांचे निधीतून कुमार नगर सौ.आशा गाबडा घर ते नारी शाळा पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९९८५७३	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
२७	५५४	१७/०३/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये हद्दवाढ अंतर्गत सुरत बायपास हायवे ते किशोर ओतारी यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४७३११६	आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत (हद्दवाढ गावांसाठी अंतर्गत सन २०२२-२३)
२८	५५६	२०/०३/२०२३	देवपूर भागातील नवीन नवरंग जलकुंभासाठी कुंपन भिंत बांधणे.	१२१९१२३	विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३
२९	५५७	२०/०३/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये रस्ते व गटारी लेखाशिर्ष अंतर्गत गोकुळ नगर बोर्ड ते वाघ चक्की पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४८९८०६	मनपा निधी (मनपा हद्दीतील रस्ते गटारी व अनुषंगिक अंतर्गत सन २०२२-२३)
३०	५५८	२०/०३/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये रस्ते व गटारी लेखाशिर्ष अंतर्गत गोकुळनगर बोर्ड ते वाघ चक्की पावेतो आर. सी. सी. गटार करणे.	१४९३५०५	मनपा निधी (मनपा हद्दीतील रस्ते गटारी व अनुषंगिक अंतर्गत सन २०२२-२३)
३१	५५९	२०/०३/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये मोहम्मद प्लंबर ची गल्ली ते मोहम्मद मन्सुरी ची गल्ली पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९९७४१७	अल्पसंख्याकभागासाठी प्रस्तावित कामासाठी अंतर्गत सन २०२२-२३
३२	५६०	२०/०३/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये अंबिका नगर भागात जुना वडजाई रोड पासून ते इब्राहिम मस्जिद ते मिस्बाह मजीद पावेतो HDPE पाईपलाईन टाकणे.	१९५९४७४	मनपा निधी (नविन पाईप लाईन टाकणे अंतर्गत सन २०२२-२३)
३३	५६१	२०/०३/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये मिल्लत नगर भागात मोसिन खान यांचे घरापासून ते अज्जू भाई यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१९९८४७२	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (नगरसेवक निधी)

सदर यादीचे अवलोकन करण्यांत आले. सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-४८ धुळे मनपा हद्दीतील ९ मध्ये मनपा शाळा क्र.९ जवळ ड्रेनेज लाईन चोकप काढून दुरुस्ती करण्याच्या कामास कार्योत्तर मान्यता देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे .

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. दगडू बागुल विषय मंजुर करण्यांत यावा.

म. कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४८ दिनांक ०६/०४/२०२३

धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र.९मध्ये शाळा क्र.९जवळ ड्रेनेज लाईन चोकअप झाल्याने सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने त्या भागात दुर्गंधी पसरल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने सदरच्या ड्रेनेज लाईनचे चोकअप काढून ड्रेनेज लाईनची आवश्यक दुरुस्ती करण्याचे काम करणे, नवीन पाईप लाईन टाकणे, चेंबर बांधणे इ. आवश्यक कामे करण्याचे निदर्शनास आलेले आहे.

ज्या अर्थी सदर चे काम आरोग्य विभागातील नागरी आरोग्याशी संबंधित अत्यावश्यक सेवेतील असल्याने त्वरित अतितातडीच्या परीस्थितीत करणे आवश्यक आहे.व ज्याअर्थी अश्या अतितत्काळ परिस्थितीत काम करून घेण्यासाठी उक्त संदर्भ क्र. १ अन्वये आयुक्त महानगरपालिका यांना काही अधिकार प्रदान केलेले आहेत.त्याअर्थी मी आयुक्त महानगरपालिका,धुळे मला उक्त संदर्भ क्र.१नुसार प्राप्तअधिकारान्वये धुळे महानगर पालिकेच्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात आरोग्य विभागाकडील निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षकातून उक्त काम मक्तेदार श्री. हेमंत बागुल, धुळे यांच्या कडून अंदाजपत्रकीय दराने तात्काळ करून घेण्यासाठी रु.१,५९,२४५/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सद कामी मक्तेदार श्री. हेमंत बागुल, धुळे यांच्या कडून अंदाजपत्रकीय दराने तात्काळ करून घेण्यासाठी रु.१,५९,२४५/-मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. दगडू भिमा बागुल

अनुमोदक :- सौ. कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-४९ धुळे मनपा हद्दीतील मनोहर टाकी समोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्य कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. विजय जाधव विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती **सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणयांत येत आहे**

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४९ दिनांक ०६/०४/२०२३

धुळे मनपा हद्दीतील मनोहर टाकी समोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो.धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.९९,९२,५४०/मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे मार्फत रक्कम रु.९९,९२,५४०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/९९८/२०२२ दि. १२/१२/२०२२ अन्वये रोजी दैनिक लोकमत / साप्ता. खान्देश जलसंग्राम या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.३०/१२/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.राम सुतार आर्ट क्रिअशन प्राय. लि.	शे.४.००% कमीने	सर्वात कमी दर
२	मे. व्ही.एस. इंजिनीअरिंग	शे.१०.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.राम सुतार आर्ट क्रिअशन प्राय. लि.यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.राम सुतार आर्ट क्रिअशन प्राय. लि.यांची शे. ४.००% कमीने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समितीपुढे पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा..सदस्यांच्या सहमतीने व कर्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार मे.राम सुतार आर्ट क्रिअशन प्राय. लि. यांची शे. ४.००% कमीने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.**

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक :- श्री. विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५०

धुळे मनपा निधी अंतर्गत राजेश्री छत्रपती शाहू महाराज नाट्य मंदिर (कला मंदिर) आवारात दर्शनी भागात राजेश्री छत्रपती शाहू महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे कामी चबुतरा बांधकाम करणे बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. नरेंद्र चौधरी — विषय मंजुर करण्यांत यावा.
म. किरण अहिरराव — विषय मंजुर करण्यांत यावा.
म. सभापती — **सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणयांत येत आहे**

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५० दिनांक ०६/०४/२०२३

धुळे मनपा निधी अंतर्गत राजेश्री छत्रपती शाहू महाराज नाट्य मंदिर (कला मंदिर) आवारात दर्शनी भागात राजेश्री छत्रपती शाहू महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे कामी चबुतरा बांधकाम करणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी

मंजुरीने उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.८९,९९,१९६/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे मार्फत रक्कम रु.८९,९९,१९६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/११७२/२०२२ दि. ०८/०२/२०२३अन्वये रोजी दैनिक देशदूत/आपला नवराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२२/०२/२०२३रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदारयांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.आशिष एम. पटवारी	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर
२	मे. श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.३.५०% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.आशिष एम. पटवारी यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईनबयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार मे.आशिष एम. पटवारी यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार मे.आशिष एम. पटवारी यांची अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.**

सुचक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५१ विकास शुल्क अंतर्गत राधाकृष्ण शॉपिंग ते बारापत्थर पर्यंत रस्ता व गटार कॉंक्रीटकरण करणे बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. दगडू बागुल विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणयांत येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५१ दिनांक ०६/०४/२०२३

विकास शुल्क अंतर्गत राधाकृष्ण शॉपिंग ते बारापत्थर पर्यंत रस्ता व गटार कॉंक्रीटी करण करणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने

उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.७,५१,७९,६५४/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता , मनपा धुळे यांचे पत्र क्र. ८१० दि.२१/०२/२०२३ अन्वये रक्कम रु.७,५१,७९,६५४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/ पापुवि/ १४६/२०२२ दि. २२/०२/२०२३ अन्वये रोजी दैनिक पुण्य नगरी / मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. १४/०३/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.जय कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर
२	मे. एन.एम. सोनवणे	शे.३.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.जय कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.जय कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समितीपुढे पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे.जय कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणेस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- श्री. दगडू भिमा बागुल

सर्वानुमते मंजुर,

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ९ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक १३/०४/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.०९ आज गुरुवार दिनांक **१३/०४/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ.किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह धरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य
१०	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. वेविदास टेकाळे	आयुक्त
२	श्री.नितीन कापडणीस	अति.आयुक्त
३	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
४	श्री. व्ही. आर. सनेर	उपायुक्त
५	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
६	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
७	श्रीमती पल्लवी शिरसाठ	मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी

८	श्री. सुनिल को. सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
९	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
१०	श्री. के. एन. शिंदे	अभियंता
११	डॉ. श्री. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
१२	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१३	श्री. राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१४	श्री. चंद्रकांत मोरे	प्र. लेखापाल
१५	श्री. संजय मोरे	प्र. कार्यालयीन अधिक्षक
१६	श्री. किशोर सुडके	प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख
१७	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१८	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१९	श्री.पराग प्र. ठाकरे	विदयुत विभाग
२०	श्री. सुर्यवंशी	लिपीक, मनपा शिक्षण मंडळ
२१	श्री.प्रकाश सोनवणे	ओव्हरसियर नगररचना विभाग
२२	श्री. मधुकर निकुम	मालमत्ता कर अधिक्षक
२३	श्री. राजू माईनकर	भांडारपाल तथा प्र. आरोग्य विभाग प्रमुख
२४	श्रीमती कल्पना जाधव	अभिलेखापाल
२५	श्री.अमोल सोनवणे	अग्निशमन विभाग
२६	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२७	श्री.एस.एस. धोत्रे	A.E. II उपविभागीय अधिकारी मजिप्रा. उपविभाग धुळे

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

मा.सभापती धुळे ते मुंबई अशी रेल्वे सेवाआपले आदरणीय खासदार डॉ.बाबासाहेब सुभाषजी भामरे यांच्या प्रयत्नाने सुरु झालेली आहे.व्यापारी रुग्ण, विदयार्थी व नागरीकांना या सेवेचा मोठया प्रमाणावर लाभ होणार आहे. व्यापारी वर्गालाही या सेवेचा मोठया प्रमाणावर उपयोग होणार आहे. ही रेल्वे सेवा धुळेकर जनतेसाठी व दळण वळणासाठी मोठा आधार आहे.याबद्दल माननीय खासदार महोदय डॉ. बाबासाहेब सुभाषजी भामरे यांचा सभागृहामार्फत अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

सुचक :- सौ. किरणताई राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५२ दिनांक १३/०४/२०२३

धुळे ते मुंबई अशी रेल्वे सेवाआपले आदरणीय खासदार डॉ.बाबासाहेब सुभाषजी भामरे यांच्या प्रयत्नाने सुरु झालेली आहे. व्यापारी रुग्ण, विदयार्थी व नागरीकांना या सेवेचा मोठया प्रमाणावर लाभ होणार आहे. व्यापारी वर्गालाही या सेवेचा मोठया प्रमाणावर उपयोग होणार आहे. ही रेल्वे सेवा धुळेकर जनतेसाठी व दळणवळणासाठी मोठा आधार आहे याबद्दल माननीय खासदार महोदय डॉ. बाबासाहेब सुभाषजी भामरे यांचा सभागृहामार्फत अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-५२ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दिनांक २३/०३/२०२३)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५३ दिनांक १३/०४/२०२३

मागील स्थायी समिती सभा दिनांक २३/०३/२०२३ रोजीच्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३४ ते ४४ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय देखील वाचून कायम करण्यांत येत आहे. **सही/-x x x**

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५३ प्रभाग क्र.०९ सुभाष पुतळा मागे ग.नं.७ येथे नव महाराष्ट्र विजय व्यायाम शाळेची इमारतींचे बांधकाम करणेचे खर्च रु.३३,८८,३८०/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. विजय जाधव विषय मंजुर करण्यांत यावा.

म. दगडू बागुल विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणयांत येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५४ दिनांक १३/०४/२०२३

प्रभाग क्र.०९ मध्ये सुभाष पुतळा मागे ग.नं. ७ येथे नव महाराष्ट्र विजय व्यायाम शाळेची इमार्तीचे बांधकाम करण्याची मागणी सन्मानीय माजी महापौर श्री. चंद्रकांत मधुकर सोनार सो. यांनी केलेली होती त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर कामास अंदाजीत खर्च रु.३३,८८,३८०/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार उक्त कामा बाबत मा. अति. आयुक्त सो. यांनी त्या मालमत्ता पत्रकावर धुळे मनपा आयुक्त यांचे नाव लावणे बाबत आदेशीत केले त्यानुसार उक्त मालमत्ता पत्रकावर दि १३/०३/२०२३ रोजी आयुक्त मनपा धुळे यांचे नाव लावण्यात आले व उक्त कामाची तरतुद बाबत मा. आयुक्त सो. यांनी दि १७/०३/२०२३ रोजी बजेट तरतुद करणे बाबत आदेशीत केले आहे.

तरी उक्त नगरभुमापन क्र. २१/४४/A२ या मालमत्तेच्या ठिकाणी अद्यावत व्यायाम शाळा बांधणे कामी रु. ३३,८८,३८०/- मात्रच्या खर्चास आर्थिक प्रशासकिय मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रभाग क्र.०९ सुभाष पुतळा मागे ग.नं.७ येथे नव महाराष्ट्र विजय व्यायाम शाळेची इमार्तीचे बांधकाम करणेचे खर्च रु.३३,८८,३८०/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व

कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.विजय बापू जाधव

अनुमोदक :- श्री. दगडू भिमा बागुल

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:५४ संस्था कर विभागातील नोंदणीकृत व्यापाऱ्यांचे वार्षिक विवरण तपासणी व कर निर्धारण करण्या कामी संस्था नियुक्त करण्यासाठी निवीदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन हा विषय आपल्याकडे फेर विचारासाठी आला आहे. यामध्ये आपल्याकडी अधिकाऱ्यांनी काही चांगले खुलासे दिलेले आहे. विवरण पत्र तापसणीचे काम ठेकेदार करेल. असेसमेंट उपायुक्त करतील ही एक चांगली सूचना आपण केली आहे. या शहरातील जे व्यापारी आहे जे करदाते आहे तेपण वसुली द्यायला तयार आहे. मागचा ठेका आपण का रद्द केला, कारण ठेकेदार शहरातील व्यापाऱ्यांना त्रास द्यायचा आपण त्याला असे अधिकार दिले होते की तो बँक अकौंट सिल करु शकत होता. यामुळे व्यापारी वर्ग हादरुन गेला होता. आपण भाजपाच्या माध्यमांतून मा. अनुपभैयाच्या मार्गदर्शनाखाली समाजातील प्रत्येक वर्गाला आपण न्याय दिला आहे. मग व्यापाऱ्यांवर अन्याय का करत आहोत? या विषयावर मी १५ वेळा बोललो आहे. तरी पण तोच विषय पुन्हा पुन्हा येत आहे. ही गोष्ट मा. आयुक्त सो. च्या दालनात सुध्दा मांडली आहे. आपल्याकडे फक्त ४८०० असेसमेंट हाते. म्हणजे रजिस्टर व्यापारी होते. ६ महिन्यांत त्यांच्या सर्व गोष्टी पूर्ण व्हायला पाहिजे होत्या. असे कायद्यामध्ये दिलेले आहे. ६ महिन्यांत हया गोष्टी संपुष्टात आल्या पाहिजे होत्या. आपण ठेकेदार नेमले मात्र ठाणे मनपा, वसई-विरार मनपाने, कल्याण डोंबीवली मनपाने ज्यांच्याकडे ६० हजार ते १ लाखंहून अधिक असे नोंदणीकृत व्यापारी होते त्यांचे असेसमेंट ६ महिन्यांत पूर्ण झाले. आपला ठेकेदारीचा हा पर्याय चुकीचा होता. त्या मनपांनी विवरण पत्र तपासणीसाठी निवृत्त विक्रीकर अधिकाऱ्यांना मानधनांवर नियुक्त केले. फक्त ४ ते ४.५ महिन्यांत त्या मनपांनी ५० हजारांहून अधिक विवरण पत्रे पूर्ण करुन घेतलेले आहे. आपण ४८०० केसेस पैकी ६ वर्षांत ७०० केसेस पूर्ण केल्या. ठेकेदाराने कसे अन्याय केला व्यापाऱ्यांवर याबद्दल मी पत्र सुध्दा दिले होते एल.बी.टी. विभागाला. नोटीस कितीची दिली व ठेकेदाराने भरणा किती केला याची माहिती उपलब्ध झालेली नाही. दोन लाखाची नोटीस देऊन २३० रुपये, ९३० रुपये असा भरणा केला आहे. यातून भ्रष्टाचार होत आहे. त्या ठेकेदाराने ८०% बिलो ने टेंडर भरले आहे. ते वैध असते का? जी.एस.टी वसुली मध्ये व्यापाऱ्यांचा फार मोठा रोल आहे. कुठलाही मोबदला न भरता ते आपल्याला जी.एस.टी वसुल करुन देतात. ही वसुलीची पध्दत सुध्दा चुकीची आहे. शहरातील सर्व व्यापारी ओरडत आहे. व्यापाऱ्यांना नाहक त्रास दिला जात आहे. ही ठेकेदारी पध्दतीची वसुली रद्द करावी. आणि निवृत्त विक्री निरिक्षक नियुक्त करावे. ६

महिन्यांत हे काम होण्यासारखे आहे. हा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रात आहे. ज्या-ज्या मनपांची ठेकेदारी पध्दतीने दिलेले आहे त्या करीता आम्ही मा. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कडे गेलो होतो. त्यांना पण ही भूमिका पटली होती. आपण यावर निर्णय घेउ असे त्यांनी मत मांडले होते. त्यानंतर सरकार बदलले त्यामुळे निर्णय झाला नाही. आम्हाला अपेक्षा आहे मा. देवेंद्रजी या विषयावर मार्गदर्शन करतील त्याबाबतीत आम्ही त्यांची भेट घेणार आहोत. मात्र तो पर्यंत हा विषय तहकूब ठेवा. यापूर्वीही या विषया बाबतीत बोललो आहे. त्या ठेकेदाराने ६ वर्ष आपले मनपाचे ऑफिस वापरले उलट आपण त्याच्या कडून वसुली करावी. वसुली ही व्हायलाच पाहिजे यासाठी सेवानिवृत्त विक्रीकर अधिकारी मानधनावर नियुक्त करा.

म.सुनिल बैसाणे — हा विषय आपण मागील सभेत तहकूब केला होता. मा. सदस्य हर्षभैय्या यांनी त्यावर चांगला अभ्यास केलेला आहे. त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्याचे उत्तर प्रशासनाच्या माध्यमातून द्यावे लागेल. धुळेकर नागरिकांचे हित व व्यापाऱ्यांचे हित लक्षात घेता मा. आयुक्त सो. सदरच्या विषयाबाबत सव्वीस्तर चर्चा करावी. चर्चा करुन यामध्ये मनपाचे नुकसान होणार नाही जे अक्षेप घेतले आहे त्याचे निराकरण करुन आपल्याला अडचण होणार नाही. त्यापध्दतीचा निर्णय घ्यावा. चर्चा करुन दुरुस्तीचा काही विषय असेल तो करुन तो पर्यंत हा विषय तहकूब करावा. चर्चेतून काही नवा पर्याय येत असेल त्याचा अवलंब करावा. सन्मा. हर्षभैय्या यांचे ठरावामध्ये नामोल्लेख करुन विषय तहकूब करावा. याबाबत आयुक्तांनी खुलासा करावा.

म.आयुक्त — आपण बऱ्याचशा मनपा अधिकाऱ्यांकडून या विषयाबाबत माहिती आणि निविदा तयार केली निविदा माहितीसाठी ठेवली आहे. यामध्ये आणखी माहिती घेणे आवश्यक असेल तर माहिती घ्यायला हरकत नाही. असेसमेंटची संख्या फार कमी आहे जे पाचशे – सहाशे असेसमेंट झाले आहे. ते पण किरकोळ स्वरुपाचे झाले आहे. उरलेले असेसमेंट करुन आपल्याला उत्पन्नात कशी भर पडेल ते बघून हा विषय मार्गी लावला पाहिजे. जी काही उपाययोजना करायची असेल ती करायला प्रशासनाची काही अडचण नाही. मागे जो प्रशासनामार्फत विषय ठेवलेला आहे तो मंजूर करावा अशी आमची विनंती होती. या विषयात आणखी काही माहिती घ्यायची असेल तर घेऊ शकता.

म. सभापती — सन्मा. सदस्य हर्षभैय्या यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामुळे हा विषय स्थायी समितीपुढे दुसऱ्यांदा आलेला आहे. यावर आपण संयुक्त बैठक घेऊ. सर्व सदस्यांना विचारात घेऊन चर्चा करु. सद्यस्थितीत हा विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५५ दिनांक १३/०४/२०२३

स्थानिक संस्था कर विभागातील कर निर्धारणा करणेकामी C.A. नियुक्ती करण्या करिता मे.स्थायी समितीत विषय क्र.८ दि.२०/०२/२०२३ रोजी विषय पत्रिकेत घेण्यात आला असुन सदरील बैठक संपन्न झाली असुन मा. सदस्य यांनी काही प्रश्न उपस्थित केले त्याबद्दल म.सभापती सो.यांनी संयुक्त बैठक घेऊन सदर विषयावर चर्चा करावी याप्रमाणे आदेशित केले.

त्यानुसार फेर टिपणी सादर करण्यात आली. त्याप्रमाणे म. आयुक्त सो. यांनी म.सभापती सो. यांचे समवेत सदर विषयावर चर्चा करण्यात आली. मा.सदस्य यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या स्पष्टीकरणात शासनाच्या आदेशान्वये अभय योजनेत भाग घेणाऱ्या नोंदणीकृत व्यापारी संस्थांचे ३१ मार्च २०१८ अखेर पावेतो निर्धारणा तपासणी होणे आवश्यक होते. सदरील

अभय योजनेत भाग घेणाऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्यांची कर निर्धारणा करणे ही बाब कालमर्यादीत स्वरुपाची होती. या करिता वेळोवेळी नियमानुसार अभिलेख सादर करण्याकरिता नोटीसा देऊन उपस्थित न राहील्याने त्यामुळे अभय योजनेत भाग घेणाऱ्या व्यापाऱ्यांची एकतर्फी निर्धारणा तपासणी करणे धुळे महानगरपालिकेस बंधनकारक होते. त्यामुळे एकतर्फी निर्धारणा झालेल्या व्यापाऱ्यांनी आवश्यक ते कागदपत्र सादर करुन पुन:श्च निर्धारणा होऊन मागणी कर रक्कम कमी अधिक स्वरुपाची कर निर्धारणा अंती मागणी कर रक्कम निर्धारणा तपासणी आदेशान्वये कळविण्यात येते.यापुढील काळात व्यावसायिकांना संपुर्ण सहकार्य करण्यात येईल. तसेच निर्धारणा तपासणी करणारे ठेकेदार यांचे संपर्क होण्यास करारनामा शर्तीमध्ये योग्य ते सुधारणा करुन समन्वयाने कामकाज करण्यात येईल. तसेच लेखा आक्षेप येणार नाही तसेच म.न.पा. कराचे नुकसान ही होणार नाही याची देखील काळजी घेतली जाईल. तरी सदरची माहिती म. सभापती सो.. यांना बैठकीत देण्यात आली. तरी सदरचा तहकुब विषय पुन:श्च विषय पत्रिकेत घेण्यास मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार सदर प्रस्तावाबाबत साशंकता असून याबाबत सखोल माहिती घेवून निर्णय घेणे गरजेचे आहे. मनपाचेही आर्थिक नुकसान होणार नाही व विवरण पत्र तपासणी व करनिरार्धारणात सुलभ कार्यपध्दती असावी यासाठी पुश्न:च अधिकारी व सदस्यांची एकत्रित बैठक घेवून निर्णय घेण्यात येईल तो पावेतो सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक:-श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५५ धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील घंटागाडया तातडीने दुरूस्ती करणे कामी टाटा अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना रूपये रक्कम ₹.१०,६३,६३५/-अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजुर करण्यांत यावा. मात्र घंटागाडी दुरुस्तीचा झालेला खर्च संबंधित ठेकेदाराच्या अनामत रक्कम तथा प्रलंबीत देयकातून वसुल करण्यांत यावा.

म. नरेंद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणयांत येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५६ दिनांक १३/०४/२०२३

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहनांचे संदर्भीय पत्रात नमुद नुसार आरोग्य विभागाकडून वॉटरग्रेस प्रोडक्टसस, नाशिक-कचरा संकलन अभिकर्ता यांच्याकडेस मनपा मालकीची वाहने कचरा संकलनकामी देण्यात आली होती.सदरील वाहने

त्यांच्याकडून ताब्यात घेऊन अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. धुळे यांचेकडुन दुरूस्ती करून वाहने व स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे या कचरा संकलन अभिकर्तास हस्तांतरीत करणे नमुद आहे. त्यासाठी साहित्याची निकड/आवश्यकता तपासता सदरचे साहित्य तात्काळ अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांचेकडून घंटागाडयांच्या दुरूस्ती करून घेणे आवश्यक आहे. त्याकामी घंटागाडया तातडीने दुरूस्ती करणे कामी टाटा अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना ₹.२०,००००० /-(वीस लक्ष) अग्रीम अदा करण्यात आलेले होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा.आयुक्त सो यांना असलेल्या अधिकारात घंटागाडया तातडीने दुरूस्ती करण्यात आलेल्या आहेत.

सदरील वाहनांचा दुरूस्ती खर्च आर्थिक मर्यादा ओलांडत असल्याने जरी सदरील खर्च ठेकेदाराच्या देयकातुन अथवा डिपॉझिट मधुन वसुल अदा करावयाचा असला तरी सध्या सदरील खर्च हा मनपा कडून अदा होत असल्याने मे.स्थायी समितीपुढे कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील असल्याने वाहनांचे तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक होते.वाहन दुरूस्ती करण्यात आलेली संस्था हि जी.एस.टी. नोंदणी कृत आहे.

सदरील वाहने हि कचरा संकलन अभिकर्ता वॉटरग्रेस प्रोडक्टस, कन्मवार ब्रिज जवळ, मुंबई आग्रा रोड, व्दारका, नाशिक यांना देण्यात आलेली होती. करारातील अटी-शर्ती आर्टिकल ३ -३.१ मधील (९) नुसार वाहनांची दुरूस्ती हि वॉटग्रेस या ठेकेदाराने करावयाची होती.. त्यानुसार वाहनांची ठेकेदाराचे देयकातुन अथवा डिपॉझिट मधुन टाटा अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा. लि. यांना वाहने दुरूस्तीकामी अग्रीम रक्कम ₹.२०,००००० /- (वीस लक्ष) मात्र अदा करण्यात आलेले आहे. त्यानुसार उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांनी देयक सादर केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२) तरतुदनुसार सदर एकुण वाहनांचा खर्च रक्कम ₹.३१,९१,२८६/-(अक्षरी-ऐकतीस लक्ष ऐक्यानव्व् हजारदोनशे छेऐंशी रूपये)मात्रला मा.आयुक्त सो.यांना मंजुरीचे अधिकार आहेत. त्यानुसार संबधीय आदेशानुसार घंटागाडयाची/वाहनांची दुरूस्ती करुन टाटा अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) व प्रकरण २ अनुसूची ड नुसार ५ (२) (२) नुसार जीएसटी व आयकर ₹.९८,९३२/- वजा जाता निव्वड देय ₹.३०,६३,६३५/-मधुन अग्रीम ₹.२०,००००० /-(बीस लक्ष) मात्र समायोजन करून टाटा अधिकृत वितरक- उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना अदा उर्वरीत रक्कम ₹.१०,६३,६३५/-मात्र अदा करण्यात आले आहे. व देयक अदायगी नंतर मे.स्थायी समिती कडेस कार्योत्तर मंजुरीसाठी ठेवणेस मान्यता दिल्यानुसार मे.स्थायी समितीकडेस फेर मंजुरीस्तव सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील घंटागाडया तातडीने दुरूस्ती करणे कामी टाटा अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना रूपये रक्कम ₹.१०,६३,६३५/-अदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२) तरतुदीनुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. घंटागाडी दुरुस्तीचा झालेला खर्च संबंधित ठेकेदाराच्या अनामत रक्कम तथा प्रलंबीत देयकातून वसुल

करण्यांत यावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीसुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५६ धुळे मनपा मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७(३) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२) नुसार दुरुस्ती खर्च रु.१४,३९,४६६/- अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजुर करण्यांत यावा. मात्र घंटागाडी दुरुस्तीचा झालेला खर्च संबंधित ठेकेदाराच्या अनामत रक्कम तथा प्रलंबीत देयकातून वसुल करण्यांत यावा.

म. नरेंद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती **सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणयांत येत आहे**

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५७ दिनांक १३/०४/२०२३

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहनांचे संदर्भीय पत्रात नमुद नुसार आरोग्य विभागाकडुन वॉटरग्रेस प्रोडक्टसस, नाशिक-कचरा संकलन अधिकर्ता यांच्याकडेस मनपा मालकीची वाहने कचरा संकलनकामी देण्यात आली होती. सदरील वाहने त्यांच्याकडुन ताब्यात घेऊन अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा. लि. धुळे यांचेकडुन दुरूस्ती करून वाहने व स्वयंभु ट्रान्सपोर्ट,पुणे या कचरा संकलन अधिकर्तास हस्तांतरीत करणे नमुद आहे.त्यासाठी साहित्याची निकड / आवश्यकता तपासता सदरचे साहित्य तात्काळ संदर्भ क्र.१,२,३नुसार अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांचेकडुन घंटागाडयांच्या दुरूस्ती करून घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा.आयुक्त सो यांना असलेल्या अधिकारात घंटागाडया तातडीने दुरूस्ती करण्यात आलेल्या आहेत.

शासन निर्णय महसुल व वन विभाग दि.३० सप्टेबंर २०११ वित्तीय अधिकार नियमपुस्तीका १९७८, भाग-एक उपविभाग दोन नियम ६९, पृष्ठ क्र.३० सुधारणा नुसार प्रचलीत ₹.६०,०००/- सुधारणा करून ₹.७५,०००/- मात्रची आर्थीक वर्षात दुरूस्ती खर्च मर्यादा नमुद आहे. व सदरील वाहनांचा दुरूस्ती खर्च आर्थिक मर्यादा ओलांडत असल्याने जरी सदरील खर्च ठेकेदाराच्या देयकातुन अथवा डिपॉझिट मधुन वसुल अदा करावयाचा असला तरी सध्या सदरील खर्च हा मनपा कडुन अदा होत असल्याने मे.स्थायी समितीपुढे कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील असल्याने वाहनांचे तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक होते. वाहन दुरूस्ती करण्यात आलेली संस्था हि जी.एस.टी.नोंदणीकृत आहे.

सदरील वाहने हि कचरा संकलन अधिकर्ता वॉटरग्रेस प्रोडक्टस, कन्मवार ब्रिज जवळ, मुंबई आग्रा रोड, व्दारका, नाशिक यांना देण्यात आलेली होती. करारातील अटी-शर्ती आर्टिकल ३ -३.१ मधील (९) नुसार वाहनांची दुरूस्ती हि वॉटरग्रेस या ठेकेदाराने करावयाची होती. परंतु सदरील ठेकेदार यांनी घंटागाडयाची/वाहनांची दुरूस्ती केली नसल्यामुळे संदर्भीय पत्रानुसार आरोग्य विभागाकडील पत्रानुसार घंटागाडयाची दुरूस्ती वाहन विभागाकडुन टाटा-अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. दुरूस्ती कामे करण्यात आली आहे.

आजपावेतो मनपाकडून एकुण ५४ घंटागाडया दुरूस्ती करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२) तरतुद नुसार सदर एकुण वाहनांचा खर्च रक्कम ₹.१४,३९,४६६/- (अक्षरी-चौदा लक्ष एकोण चाळीस हजार चारशे सहासष्ट रूपये) मात्रला मा.आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत.

त्यानुसार घंटागाडयाची/वाहनांची दुरूस्ती करुन टाटा अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) व प्रकरण २ अनुसूची ड नुसार ५ (२) (२) नुसार ₹.१४,३९,४६६/- (अक्षरी चौदा लक्ष् एकोण चाळीस हजार चारशे सहासष्ट रूपये) टाटा अधिकृत वितरक- उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना अदा करणेस व देयक अदायगी नंतर मे.स्थायी समितीकडेस कार्योत्तर मंजुरीसाठी ठेवणेस मान्यता दिल्यानुसार मे.स्थायी समितीकडेस फेर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७(३) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२) नुसार दुरुस्ती खर्च रु.१४,३९,४६६/- अदा करणेस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. घंटागाडी दुरुस्तीचा झालेला खर्च संबंधित ठेकेदाराच्या अनामत रक्कम तथा प्रलंबीत देयकातून वसुल करण्यांत यावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री किरण हरिश्चंद्र अहिरराव

अनुमोदक :- सौ. कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५७ धुळे मनपा मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७(३) व प्रकरण २ अनुसूची ड ५ (२) (२) नुसार दुरुस्ती खर्च रु.७,३२,११९/- अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म. दगडू बागुल विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणयांत येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५८ दिनांक १३/०४/२०२३

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहनांचे संदर्भीय पत्रात नमुद नुसार आरोग्य विभागाकडुन वॉटरग्रेस प्रोडक्टसस, नाशिक-कचरा संकलन अधिकर्ता यांच्याकडेस मनपा मालकीची वाहने कचरा संकलनकामी देण्यात आली होती. सदरील वाहने त्यांच्याकडुन ताब्यात घेऊन अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि.धुळे यांचेकडुन दुरूस्ती करून वाहने व स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे या कचरा संकलन अधिकर्तास हस्तांतरीत करणे नमुद आहे.त्यासाठी साहित्याची निकड/आवश्यकता तपासता सदरचे साहित्य तात्काळ अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांचेकडुन घंटागाडयांच्या दुरूस्ती करून घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा.आयुक्त सो यांना असलेल्या अधिकारात घंटागाडया तातडीने दुरूस्ती करण्यात आलेल्या आहेत.

सदरील वाहनांचा दुरूस्ती खर्च आर्थिक मर्यादा ओलांडत असल्याने जरी सदरील खर्च ठेकेदाराच्या देयकातुन अथवा डिपॉझिट मधुन वसुल अदा करावयाचा असला तरी सध्या सदरील खर्च हा मनपा कडुन अदा होत असल्याने मे.स्थायी समितीपुढे कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील असल्याने वाहनांचे तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक होते.वाहन दुरूस्ती करण्यात आलेली संस्था हि जी.एस.टी. नॉंदणीकृत आहे.

सदरील वाहने हि कचरा संकलन अधिकर्ता वॉटरग्रेस प्रोडक्टस, कन्मवार ब्रिज जवळ, मुंबई आग्रा रोड, व्दारका, नाशिक यांना देण्यात आलेली होती. करारातील अटी-शर्ती आर्टिकल ३ -३.१ मधील (९) नुसार वाहनांची दुरूस्ती हि वॉटरग्रेस या ठेकेदाराने करावयाची होती. परंतु सदरील ठेकेदार यांनी घंटागाडयाची/ वाहनांची दुरूस्ती केली नसल्यामुळे संदर्भीय पत्रानुसार आरोग्य विभागाकडील पत्रानुसार घंटागाडयाची दुरूस्ती वाहन विभागाकडुन टाटा-अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. दुरूस्ती कामे करण्यात आली आहे.

मागील कालावधीत एकुण टाटा एसीई ६९ घंटागाडयांची दुरूस्ती करण्यात येऊन कचरा संकलन अधिकर्ता स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे या कचरा संकलन अधिकर्ता यांना ६९ घंटागाडया हस्तांतर करण्यात आलेल्या आहेत. ६९ घंटागाडया व या बिलातील एकुण ६ घंटागाडया असे एकुण ७५ घंटागाडया आजपावेतो हस्तांतर करण्यात आलेल्या आहेत. आजपावेतो एकुण ६९ घंटागाडयाचे ₹.४६,३०,७५२/- मात्रच दुरूस्ती खर्चाची देयके ॲग्रीम, सीजीएसटी, एसजीएसटी व आयकर वजा करून अदा करण्यात आलेली आहे.

एकुण ६ घंटागाडया दुरूस्ती देयके येणेप्रमाणे देयक सादर केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) तरतुद नुसार सदर एकुण वाहनांचा खर्च रक्कम ₹.७,३२,११९/- (अक्षरी- सात लक्ष बत्तीस हजार एकशे एकोणावीस रूपये) मात्रला मा.आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत.

त्यानुसार संदर्भीय आदेशानुर घंटागाडयाची/वाहनांची दुरूस्ती करुन टाटा अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार

₹.७,३२,११९/- (अक्षरी- सात लक्ष बत्तीस हजार एकशे एकोणावीस रूपये) मात्र टाटा अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना अदा करणेस व देयक अदायगी नंतर ममनपा अधिनियम प्रकरण २ अनुसूची ड नुसार ५ (२) (२) नुसार मे.स्थायी समितीकडेस कार्योत्तर मंजुरीसाठी ठेवणेस मान्यता दिल्यानुसार मे.स्थायी समितीकडेस फेर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७(३) व प्रकरण २ अनुसूची ड ५ (२) (२) नुसार दुरुस्ती खर्च रु.७,३२,११९/- अदा करणेबाबत संबंधित ठेकेदाराच्या अनामत रक्कम तथा प्रलंबीत देयकातून वसुल करण्यांत यावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन

अनुमोदक :- श्री. दगडू भिमा बागुल

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १० चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २७/०४/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१०आज गुरुवार दिनांक **२७/०४/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ.किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिचंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१२	श्री.अन्सारी वसीम खलील	सदस्य
१३	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. देविदास टेकाळे	आयुक्त
२	श्री.नितीन कापडणीस	अति.आयुक्त
३	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
४	श्री. व्ही. आर. सनेर	उपायुक्त
५	श्री. सुनिलकुमार सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरिक्षक

६	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
७	श्रीमती पल्लवी शिरसाठ	मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी
८	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
९	श्री. के. एन. शिंदे	अभियंता
१०	डॉ. श्री. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
११	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री. राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१३	श्री. चंद्रकांत मोरे	प्र. लेखापाल
१४	श्री. संजय मोरे	प्र. कार्यालयीन अधिक्षक
१५	श्री. किशोर सुडके	प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख
१६	श्री. पी.डी. चव्हाण	सहाय्यक अभियंता
१७	श्री. एच.पी. पावटे	कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग
१८	श्री.चंद्रकांत उगले	सहाय्यक अभियंता
१९	श्री.एन.के.बागुल	सहाय्यक अभियंता, विदयुत विभाग
२०	श्री. सुर्यवंशी	लिपीक, मनपा शिक्षण मंडळ
२१	श्री. प्रकाश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
२२	श्री. मधुकर निकुम	मालमत्ता कर अधिक्षक
२३	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल तथा प्र.आरोग्य विभाग प्रमुख
२४	श्री.दुष्यंत महाजन	अग्निशमन विभाग
२५	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२६	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग प्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य, मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक :-५८ — प्रभाग क्र.८ मध्ये दोन ठिकाणी बोअरिंग करणेचे काम तांतडीने करुन घेण्यांत आले, त्याबाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वसीम अन्सारी — विषय मंजूर करावा.

म.अब्दुल लतीफ — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधीन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५९ दिनांक २७/०४/२०२३

प्रभाग क्र.८ मधील १.दिगंबर विजय व्यायाम शाळा २. पावन मारुती चौक ग.न.५ चौक या दोन ठिकाणी मोटर पंपसेट सह बोअरिंग करणेत यावी.सदर भागात 8-10 दिवस पाणी येत नसल्याने सदर भागाच्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याअभावी भटकंती करावी लागते.सदर भागात सद्यस्थितीत एकही बोअरिंग व पाण्याची सोय नाही.सदर बाब अतिशय गंभीर

असून,सदरचे काम अत्यावश्यक सेवेशी निगडीत असून, सदर ठिकाणी बोअरिंग तात्काळ करणे गरजेचे आहे.असे संदर्भीय पत्रानुसार कळविलेआहे.सदरचे कामी १ एच.पी. submerisble मोटर , DOL स्टार्टर , नवीन वायर,बोअरिंग करणे इत्यादी बाबी समाविष्ट असून,सदर कामासाठी शासन दरसूची/सा.बा.विभाग/२०२२-२३ नुसार **अंदाजपत्रकीय रक्कम रू. १,५९,४९८/-** मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार नगरसेवक निधीतून कामासाठी रू.**२० लक्ष** मात्र तरतूद आहे.सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे. करिता उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम **रु.१,५९,४९८/-** मात्र खर्च अपेक्षित असून,सदरचे काम हे विना निविदा **मे. पंडित इलेक्ट्रिकल,धुळे** यांचे कडून करून घेण्यात आले.करिता सदर कामी **कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र अधिनियम ६७(३) (क) अन्वये** आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायालयीन अहवालास अधिन राहून प्रभाग क्रमांक८मध्ये दोन ठिकाणी बोअरिंग करण्याच्या कामास व खर्चास **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क)अन्वये** कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.वासिम खलील अन्सारी
अनुमोदक :- श्री.अब्दुल लतीफ अन्सारी

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-५९ धुळे महानगरपालिका रुग्णालयात रेडिओलॉजी (सी.टी स्कॅन व एक्सरे विभाग) अदयावत प्रयोग शाळा उभारणेबाबत धुळे महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीतील आयुर्वेदिक दवाखाना लगतची मोकळी जागा व उत्तरेकडील जुने आस्थापना कार्यालयापासुन जिन्यापर्यतच्या ५ खोल्या तसेच जुने लेखा कार्यालयाची जागा पॅथोलॉजी लॅबसाठी भाडे तत्वावर करारने वाढीव जागा भाडेपट्टयाने देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती याविषयाबाबत आरोग्याधिकारी यांनी माहिती द्यावी.

म. आरोग्यधिकारी कृष्णा डायग्नोसिस लि. पुणे या कंपनीने पॅथलॉजी लॅब व सिटी स्कॅन एक्सरे उभारणीसाठी आपल्याकडे प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाला अनुसरुन आर. आर. पाटील व्यापारी संकुलातील शाळा क्र. २१ व शाळा क्र.४५ जागेवर पॅथलॉजी लॅब उभारणीसाठी महासभेकडून मंजूरी मिळाली आहे. त्यावेळेस जागा त्यांनी निश्चीत केली नव्हती धुळे मनपातील जुन्या इमारतीतील आयुर्वेदिक दवाखाना लगतची मोकळी जागा व उत्तरेकडील जुने आस्थापना

कार्यालयपासुन जिन्यापर्यंत ५ खोल्या तसेच जुने लेखा कार्यालयाची जागा भाडे तत्वावर करारनाम्याच्या मंजूरीसाठी विषय स्थायी समिती समोर आला आहे.

म.हर्षकुमार रेलन — या विषयावर महासभेमध्ये पूर्ण चर्चा झाली आहे. शहराच्या दृष्टीकोनातून तसेच गोरगरीबांना जे जास्त चार्जेस द्यावे लागतात म्हणून आपण या विषयाला मंजूरी दिली होती. मा. नानासो कर्पे महापौर असतांना त्यांनी याबाबत पुढाकार घेतला होता. आपल्या सत्ताधारी पक्षातर्फे गोरगरीबांना कसा न्याय देता येईल या दृष्टीकोनातून आपण मंजूरी दिली होती. त्यांनी केलेल्या मागणी प्रमाणे त्यांना ग्राउंड फलोअर वर जागा हवी होती. त्यांना ती जागा देण्यात यावी विषय मंजूर करण्यात यावा. तसेच त्या एजन्सीला सभागृहाला बोलावून सादरीकरण करायला सांगावे अशी माझी विनंती आहे. याबाबत सदस्यांना सुध्दा अवगत होइल. लवकरात लवकर ही लॅब सुरु व्हायला पाहिजे या दृष्टीकोनातून प्रयत्न करुन विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणयांत येत आहे.सदर संस्थेमार्फत होणारी कार्यवाहीबाबत प्रात्यक्षिकाव्दारे सन्मा. सदस्यांना माहिती देणेबाबत आरोग्याधिकारी यांनी कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६० दिनांक २७/०४/२०२३

म.शहर अभियंता महानगरपालिका धुळे यांच्या पत्रानुसार क्रष्णा डायग्नोसीस लि पुणे यांना धुळे महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीतील आयुर्वेदिक दवाखाना लगतची मोकळी जागा व उत्तरेकडील जुने आस्थापना कार्यालयापासुन जिन्यापर्यंत च्या ५ खोल्या तसेच जुने लेखा कार्यालयाची जागा पॅथोलॉजी लॅब साठी जागा भाडे तत्वावर करारने देण्याबाबत प्रस्ताव खालील प्रमाणे सादर करण्यात आलेला होत.

धुळे महानगरपालिकेमार्फत स्व.आर आर पाटील व्यापारी संकुलातील वरील मजल्यावरील मोकळया जागेत पॅथोलॉजी लॅब तसेच सिटी स्कॅन एक्सरे युनिट व अदयावत प्रयोग शाळा उभारणेबाबतचा विषय आरोग्य विभागामार्फत दिनांक २७/१/२०२२ रोजीच्या मे महासभेत ठेवण्यात आलेला होता.

सदर ठरावानुसार धुळे महानगरपालिकेमार्फत BOLT तत्वावर बांधलेले स्व. आर. आर. पाटील व्यापारी संकुलातील शाळा क्रमांक २१ व शाळा क्रमांक ४५ साठी असलेले रुम सध्या वापरात नसल्याने पॅथोलॉजी लॅब तसेच सिटी स्कॅन एक्सरे युनिट व अदयावत प्रयोग शाळा उभारण्यासाठी ठरावात नमुद अटी व शर्तीनुसार भाडे तत्वावर क्रष्णा डायग्नोसीस लि पुणे यांना कराराने देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच सदर ठरावात रुगणांच्या सोईसाठी एम.आर. आय व सिटी स्कॅन सेंटर महानगरपालिका मालकीच्या बापट दवाखाना तसेच आयुर्वेदीक दवाखाना येथील उपलब्ध जागेत उभारण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

म.शहर अभियंता यांनी आरोग्यधिकारी तसेच संबधीत क्रष्णा डायग्नोसीस लि पुणे यांचे प्रतिनिधीसह पाहणी करुन आयुर्वेदिक दवाखाना लगतची मोकळी जागा व उत्तरेकडील जुने आस्थापना कार्यालयापासुन जिन्यापर्यंतच्या ५ खोल्या तसेच जुने लेखा कार्यालयाची जागा पॅथोलॉजी लॅब् साठी सुयोग्य असलयाने निश्चीत झाल्याने उक्त प्रमाणे महासभेच्या मान्यतेनुसार पॅथोलॉजी लॅब साठी जागा उपलब्धतेसाठी सुचना दिल्या आहेत.

धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्रमांक ८३ दिनांक २७/१/२०२२ च्या ठरावान्वये निर्देशीत केल्याप्रमाणे ठरावात दर्शविलेल्या जागेऐवजी संदर्भीय पत्रात नमुद जागेकरिता भाडे निश्चीती करणे व हस्तांरण करणेच्या कार्यवाही करण्याबाबत नमुद केले आहे.

शहर अभियंता यांच्या पत्रानुसार सदर संस्थेस जागा देण्याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) संदर्भीय पत्रात दर्शविलेली जागा भाडे तत्वावर देण्याबाबत मे. महासभा ठराव क्रमांक ८३ दिनांक २७/१/२०२२ मध्ये नमुद नाही.

२) संदर्भीय पत्रानुसार निश्चीत केलेल्या जागेत सदयास्थितीत आरोग्यधिकारी यांचे कार्यालय बाजार विभाग मलेरिया पर्यवेक्षक यांचे कार्यालय सुरु आहेत. तसेच आस्थापना विभागाचे जुने अभिलेख कक्ष ,विदयुत विभागाचे गोडावुन आणि लेखा विभागात लेखा विभागातील जुने अभिलेख ठेवण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे सुरु असलेलेकार्यालय इतर ठिकाणी हस्तांतरीत करण्याबाबत कार्यवाही प्रथम करणे उचित होईल. तसेच आस्थापना विभाग, लेखा विभाग व विदयुत विभागाकडील साहित्य अभिलेखे स्थांलतरीत करण्याबाबतची कार्यवाही प्रथम करणे उचित होईल.

वरील मुददा क्रमांक १ व २ बाबत प्रथम निर्णय घेणे आवश्यक आहे. तदनंतर संदर्भीय पत्रानुसार शहर अभियंता यांनी समक्ष पाहणी नुसार निश्चीत केलेल्या जागेचे क्षेत्रफळ , जागेचा स्थळ दर्शक नकाशा व त्यानुसार रेडी रेकनर प्रमाणे वार्षीक भाडे व प्रिमीयम रक्कम नगरचना विभागामार्फत निश्चीत करणे आवश्यक आहे.

उक्त प्रकरणी म.नगररचनाकार यांनी सदर जागेबाबत रेडीरेकनर दर प्रत्येक चौ.मी ला रुपये १९४.७३ पैसे तसेच प्रीमयम रक्कम प्रति चौ.मी ला रुपये १९४७३/-मात्र निश्चीत करुन दिलेली आहे.

प्रस्तावीत प्रकरणी क्रष्णा डायग्नोस्टीक पुणे यांना द्यावयाच्या जागेचे क्षेत्रफळ बांधकाम विभागामार्फत काढून देण्यात आलेले आहे त्यानुसार एकुण क्षेत्रफळ २३४.३९ असुन नगररचनाकार यांनी निश्चीत करुन दिलेल्या दरानुसार रु.४५,६४३/-मासिक भाडे असणार आहे व नगररचनाकार हे निश्चित करुन देतील त्यानुसार अनामत रक्कम वसुल करणे आवश्यक असेल. तरी वरील प्रमाणे मा आयुक्त सो यांच्या आदेशानुसार सदर प्रस्ताव मे.स्थायी सामिती पुढे सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका रुग्णालयात रेडिओलॉजी (सी.टी स्कॅन व एक्सरे विभाग) अदयावत प्रयोग शाळा उभारणेबाबत धुळे महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीतील आयुर्वेदिक दवाखाना लगतची मोकळी जागा व उत्तरेकडील जुने आस्थापना कार्यालयापासुन जिन्यापर्यतच्या ५ खोल्या तसेच जुने लेखा कार्यालयाची जागा पॅथोलॉजी लॅबसाठी क्रष्णा डायग्नोस्टीक पुणे यांना नगररचनाकार यांनी निश्चित केलेले दर व अनामत रक्कमेनुसार भाडे तत्वावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९(ब)च्या तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतूदीनुसार देणेस मान्यता

देण्यात येत आहे. याबाबत संबंधित संस्थे आवश्यक त्या अटी व शर्तींचा करारनामा करण्यात यावा.तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री.किरण हरिशचंद्र अहिरराव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६० धुळे शहर पाणीपुरवठा योजना (अक्कलपाडा धरण उद्भव) अंतर्गत ट्रान्स्फॉरमर ठेवणेसाठी जॅक्वेल जवळ प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी आवश्यक बांधकाम करणे व अनुषंगिक कामे करणेसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कल्याणी अपंळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणयांत येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६१ दिनांक २७/०४/२०२३

धुळे मनपाच्या अमृत अभियान अंतर्गत वाढीव धुळे शहर पाणीपुरवठा योजना (अक्कलपाडा धरण उद्भव) अंतर्गत ट्रान्स्फॉरमर ठेवणेसाठी जॅक्वेल जवळ प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी आवश्यक बांधकाम करणे व अनुषंगिक कामे करणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.१,४६,६४,८८०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता,मनपा धुळे यांचे मार्फत रक्कम रु.१,४६,६४,८८०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ ११६० /२०२२ दि.०६/०२/२०२३ अन्वये रोजी दैनिक मिड डे/ नवभारत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०७/०२/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.गायत्री कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर
२	मे. एकविरा कन्सट्रक्शन	शे.२.००% जास्तीने	
३	मे. ऋषभ सतिष खिवसरा	शे.३.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.गायत्री कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. गायत्री कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे शहर पाणीपुरवठा योजना (अक्कलपाडा धरण उद्भव) अंतर्गत ट्रान्स्फॉरमर ठेवणेसाठी जॅक्वेल जवळ प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी आवश्यक बांधकाम करणे व अनुषंगिक कामे करणेसाठी **मे.गायत्री कन्स्ट्रक्शन** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास **महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम कलम ७३ अन्वये** मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. कल्याणी सतिष अपंळकर

अनुमोदक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६१ जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत प्र.क्रं. १९ मध्ये सर्व्हे नं. ४४९ अविष्कारनगर मधील शासकीय मोकळया जागेवर संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. साबीर शेठ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. वासीम अन्सारी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६२ दिनांक २७/०४/२०२३

जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत प्र.क्र.१९ मध्ये सर्व्हे नं.४४९ अविष्कार नगर मधील शासकीय मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास म.जिल्हाधिकारी सो. धुळे

यांनी टिपणी मंजुरीने दि.०३/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**४९,९५,३२४/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबावत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /२९५/२०२२ दि.११/१०/२०२३ अन्वये रक्कम रु.**४९,९५,३२४/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/१७३/२० अन्वये दि.१५/०३/२०२३ अन्वये रोजी दैनिक **दिव्य मराठी/आपल नवराजय** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२८/०३/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	वृषभ सतिष खिवसरा	शे.२.०० % जास्त	
२	मे.एकविरा कन्सट्रक्शन	शे.३.०० % जास्त	
३	यासीन अब्दुल रज्जाक शेख	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **यासीन अब्दुल रज्जाक शेख** यांची निविदासर्वात न्यूनतम दराचे**४९,९५,३२४/-**इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **यासीन अब्दुल रज्जाक शेख** यांचे दर**अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **यासीन अब्दुल रज्जाक शेख** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे. स्थायी समिती समोर सादर करणेस मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्र.क्रं. १९ मध्ये सर्व्हे नं. ४४९ अविष्कारनगर मधील शासकीय मोकळया जागेवर संरक्षण भिंत बांधणेचे कामी **श्री.यासीन अब्दुल रज्जाक शेख** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास **महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम कलम ७३ अन्वये** मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक :- श्री.अन्सारी वसीम खलील

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ११ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
शुक्रवार दिनांक १२/०५/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.११ आज **शुक्रवार दिनांक १२/०५/२०२३रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ.किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
८	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
९	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१०	श्री.अन्सारी वसीम खलील	सदस्य
११	श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री.नितीन कापडणीस	अति.आयुक्त
२	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
३	श्री. व्ही. आर. सनेर	उपायुक्त
४	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
५	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
६	श्रीमती पल्लवी शिरसाठ	मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी
७	श्री. सुनिल कौ. सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक

८	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
९	श्री. के. एन. शिंदे	अभियंता
१०	डॉ. श्री. एम. आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
११	श्री. राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री. संजय मोरे	प्र. कार्यालयीन अधिक्षक
१३	श्री. पी.डी. चव्हाण	सहाय्यक अभियंता
१४	श्री.कमलेश सोनवणे	ओव्हरसियर नगररचना विभाग
१५	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१६	श्री.एन.के.बागुल	विदयुत विभाग
१७	श्री.मधुकर निकुंभे	वसुली अधिक्षक
१८	श्री. राजू माईनकर	भांडारपाल तथा प्र. आरोग्य विभाग प्रमुख
१९	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२०	श्री. राजू गायकवाड	लिपीक, मनपा शिक्षण मंडळ
२१	श्री. आर.पी. पाटकरी	वृक्ष प्राधिकरण विभाग

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म.सभापती धुळे महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता श्री.चंद्रकांत उगले, श्री.प्रदिप चव्हाण व श्री.एन.के.बागुल यांना सहाय्यक अभियंता म्हणून पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचा सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात येत आहे.

विषय क्रमांक :- ६२ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि. ०६ /०४ /२०२३)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे मध्ये कोणत्या सभेचे इतिवृत्त ठेवण्यांत आलेले आहे. त्या सभेचा क्रमांक टाकणेत यावा.

म. नगरसचिव विषयात सभेचा दिनांक नमूद करण्यांत येतो तसेच सभेच्या इतिवृत्तांत कोणत्या साप्ताहिक सभेचे इतिवृत्त आहे त्याचा क्रमांक नमूद असतो.

म. सुनिल बैसाणे मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करावे.

म सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर दिनांक १२/०५/२०२३

मागील स्थायी समिती सभा दिनांक ०६/०४/२०२३ चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५२ ते ५८ तसेच सभेस सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सभापती .

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ६३ मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि.२७/०३/२०२३ ते दि.३१/०३/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी सदर विषयांचे अवलोकन करण्यांत आले आहे.

म. सभापती मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५लाखापर्यंत बांधकाम विभागा कडील विकास कामांची यादीचे अवलोकन करण्यांत आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६३ दिनांक १२/०५/२०२३

मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि २७/०३/२०२३ ते दि. ३१/०३/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

कार्यादेशची यादी

अ. क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	५६३	२७/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये प्रमोद नगर भागात श्री.बागुल यांचे घरा पासून ते डॉ.देसाई यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२२५६६७४	मनपा निधी (विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२	५६४	२७/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये जगन्नाथ नगर भागात १)श्री.भामरे यांचे घरापासून ते श्री.पाटील यांचे घरापर्यंत २)श्री.देवरे ते श्री.देशपांडे यांचे घरापर्यंत ३)श्री.भामरे ते मयूर शाळा ४)मयूर शाळे समोर रस्ता डांबरीकरण करणे.	२४०७७८६	मनपा निधी (विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३)
३	५६७	२७/०३/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये पूर्व हुडको भागात शाह यांचे घरापासून ते मुख्तार भैय्या यांचे घरापर्यंत व पीर मोह.ते राजू वाणी व मोह.शब्बीर ते मुजाहिद शेख यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट व गटार करणे.	१९९६५४९	अल्पसंख्याक भागासाठी प्रस्तावित कामासाठी अंतर्गत सन २०२२-२३
४	५६८	२७/०३/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये सज्जू चक्कीवाले यांचे घरापासून ते मन्नान भाई यांचे घरापर्यंत व अखलाख अर्जत यांचे प्लॉट पासून ते जमील शाह यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता तयार करणे.	६९७५३०	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
५	५७०	२७/०३/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये नईम भाई यांचे घरापासून ते डॉ.आसिफ यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	१४९८२१५	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
६	५७१	२७/०३/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये रेहबर बाग येथे शब्बीर नगरच्या बोर्ड पासून साजिद मक्कू यांच्या घरापर्यंत व साजिदराव यांचे घरापर्यंत गटार व रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१९९९९३८	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
७	५७३	२७/०३/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये शरीफ शेठ यांचे घरापासून ते कल्लू भैय्या यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता तयार करणे.	७४६५२५	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
८	५७६	२७/०३/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये श्री.शशीभाऊ मोगलाईकर यांचे निधीतून सेवादास नगर श्री.शेळके घर ते वॉल कंपाऊंड पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	९९९६०९	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)

९	५७७	२७/०३/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये सौ.रेखाताई सोनवणे नगरसेविका यांचे निधीतून खुशाल बागुल घर ते डी.जी.पाटील घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९८०३२६	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
१०	५७८	२७/०३/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये हुडको कॉलनी मधील साई हार्डवेअर व परिवर्तन हायस्कूल ते लिंगायत घरापावेतो काँक्रीट गटार करणे.	२४८७३७२	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा हद्दीतील रस्ते, गटारी व अनुषंगिक)
११	५७९	२७/०३/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये रस्ते व गटारी लेखाशिर्ष अंतर्गत डॉ.साळुंखे ते परिवर्तन शाळे व वाघ घर ते खैरनार घरापावेतो काँक्रीट गटार करणे.	१४९७२३७	मनपा निधी (मनपा हद्दीतील रस्ते गटारी व अनुषंगिक अंतर्गत सन २०२२-२३)
१२	५८०	२७/०३/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये रस्ते व गटारी लेखाशिर्ष अंतर्गत डॉ.साळुंखे ते परिवर्तन शाळे व वाघ घर ते खैरनार घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१४९९१९५	मनपा निधी (मनपा हद्दीतील रस्ते गटारी व अनुषंगिक अंतर्गत सन २०२२-२३)
१३	५८१	२७/०३/२०२३	प्र.क्र.१८ मध्ये कै.वालचंद बापुजी नगर येथे पशुराम वाघ ते चव्हाण घर व कै.राजाराम भाऊ नगर येथे राजेंद्र पाटील ते दिनेश शिंदे घरापावेतो आर.सी.सी. पाईप गटार करणे.	१९८५८८२	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
१४	५८२	२७/०३/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये श्री.वसंत सखाराम सोनवणे यांच्या घरापासून ते श्री. मोहन नथू कुवर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व बंदिस्त गटार करणे.	२१९१३२०	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२
१५	५८३	२७/०३/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये श्री.मगन पुंडलिक बागुल यांच्या घरापासून ते भिलाटी बेघरवस्ती पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व बंदिस्त गटार करणे.	२१९६४१३	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२
१६	५८४	२७/०३/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये चंपा बाग ते श्री.अहिरेकर व लाँढे नाला ते साक्रीरोड पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१४८९५४९	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२
१७	५८५	२८/०३/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये स्वराज नगर रस्ता काँक्रीट करणे,गायत्री नगर, इंदिरा नगर भागात भूमिगत गटार करणे, गौतम नगर, अशोक नगर येथील मोकळ्या जागेवर हायमास्ट बसविणे.	१९८७२६४	मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ (नगरसेवक निधी)
१८	५८८	२८/०३/२०२३	प्र.क्र.१ ते ५,९ व १० मधील वितरण व्यवस्था व मुख्य लाईनवरील लिकेजेस दुरुस्त करणे.	७८३९०८	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३
१९	५९०	३१/०३/२०२३	मनपा हद्दीतील वलवाडी बागातील नवदुर्गा इलेक्ट्रिकल्स श्री.बाविस्कर यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४९३७९२	मनपा निधी (हद्दवाढ गावांसाठी अंतर्गत सन २०२२-२३)
२०	५९१	३१/०३/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये मनपा निधी अंतर्गत कल्याणी नगर , शिवशक्ती कॉलनी तसेच महिंदळे शिवारात विविध ठिकाणी पाईपलाईन टाकणे.	१७४९७४५	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२१	५९८	३१/०३/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये शहर भागाचा विकास लेखाशीर्ष अंतर्गत हुडको कॉलनी साई हार्डवेअर ते परिवर्तन हायस्कूल ते लिंगायत घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे. (फेर ई-निविदा-३ री वेळ)	२४८१४८९	मनपा निधी (मनपा हद्दीतील रस्ते,गटारी व अनुषंगिक अंतर्गत सन २०२२-२३)
२२	६०१	३१/०३/२०२३	प्र.क्र.११ मध्ये लक्ष्मीनगर येथे श्री.राजराम चौधरी ते टिनू चौधरी घर काँक्रीट गटार करणे.	१९९९८०८	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२
२३	६०२	३१/०३/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये मंगलमूर्ती व विघ्नहर्ता कॉलनी येथील खुल्या जागेत कंपाऊंड वॉल करणे.	१९९९२९३	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२४	६०३	३१/०३/२०२३	प्र.क्र.९ मध्ये पांझरेश्वर मंदिराच्या मागील बाजूस संरक्षण भिंत बांधणे.	८८४४१३	मनपा निधी (सन २०२२-२३ नगरसेवक निधी अंतर्गत नमूद आहे.)

२५	६०५	३१/०३/२०२३	प्र.क्र.०३ मध्ये विटाभट्टी भागात मलिक हवालदार ते नूर मस्जिद ते सलमान किराणा पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	५२०९१६	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२६	६०६	३१/०३/२०२३	प्र.क्र.०३ मध्ये मोहम्मदी नगर स.नं.४७९६/०२ भागातील खुल्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे व ओटा बांधणे.	१९९८८३९	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२७	६०७	३१/०३/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये भगतसिंग कॉलनीत बंदिस्त गटार बांधणे. श्री.सुबोध पाटील ते नाल्यापर्यंत.	९९७९६०	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३
२८	६०९	३१/०३/२०२३	प्र.क्र.१० मध्ये वरखेडी येथे राजेंद्र पाटील ते ईश्वर मराठे यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	५१२५५९	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२)
२९	६१०	३१/०३/२०२३	प्र.क्र.११ मध्ये भटू कानडे यांचे घर ते श्री.चौधरी यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४३१५२०	मनपा निधी (सन २०२१-२२ मनपा हद्दीतील रस्ते, गटारी व अनुषंगिक
३०	६११	३१/०३/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये स.नं.४९/१ मधील ओपनस्पेस मध्ये जेष्ठ नागरिकांसाठी सोयी सुविधा करणे.	२२७१५५१	मनपा निधी (नाना नानी पार्क करणे अंतर्गत सन २०२२-२३)
३१	६१२	३१/०३/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये हजरत अली मस्जिद जवळच्या नाल्यावरील पुलाची रुंदी वाढवून पुलाचे नूतनीकरण (दुरुस्ती) करणे.	९९५१९४	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३
३२	६५६	३१/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये एकविरा नगर येथे भावसार हॉटेल ते राजू धोबी यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२४९५५६८	मनपा निधी (देवपूर भागातील रस्ते,गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतर्गत सन २०२२-२३)
३३	६५७	३१/०३/२०२३	प्रभाग क्र.०५ मध्ये एस.आर.पी.कॉलनी येथे श्री.सी. डी. सोनार ते सुनील मोरे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२४९६२५८	मनपा निधी (सन २०२२-२३ देवपूर भागातील रस्ते, गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतगर्त नमूद केले आहे.)
३४	६५८	३१/०३/२०२३	प्रभाग क्र.०५ मध्ये एस.आर.पी.कॉलनी येथे श्री.सी. डी. सोनार ते सुनील मोरे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२४९६२५८	मनपा निधी (सन २०२२-२३ देवपूर भागातील रस्ते, गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतगर्त नमूद केले आहे.)
३५	६५९	३१/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये एस.आर.पी.कॉलनी येथे सुखलाल चौधरी ते सागर पाटील यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२४९४८७८	मनपा निधी (सन २०२२-२३ देवपूर भागातील रस्ते, गटारी दुरुस्ती व नूतनीकरण अंतगर्त नमूद केले आहे.)
३६	६६१	३१/०३/२०२३	प्र.क्र.१० मध्ये सुपर मार्बल ते झेड ग्लासेस पावेतो व फुले कॉलनी कमानी पासुन ते भापकर यांचे घरा पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,७९,९८१/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
३७	६१३	३१/०३/२०२३	प्र.क्र.१ मध्ये वलवाडी भागात भिवसन नगर येथील खुल्या वॉल कंपाऊंड बांधणे.	१९९५१२९	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ (मनपा निधी)
३८	६१४	३१/०३/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये ग.द.माळी सोसायटी भागात श्री.अनिल माळी यांचे घरापासून ते श्री.मराठे यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	९५९९१९	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (नगरसेवक निधी)
३९	६१५	३१/०३/२०२३	प्र.क्र.११ मध्ये स.नं.३३३/१ शिव कॉलनी, मार्केट वार्ड येथे सभा मंडप बांधणे.	९९९२०४	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३
४०	६१६	३१/०३/२०२३	धुळे मनपा हद्दीतील प्र.क्र.८,११,१२,१४ व १९ मधील वितरण व्यवस्था व मुख्यलाईनवरील लीकेजेस दुरुस्त करणे.	७८३९०८	मनपा निधी अंतर्गत

४१	६१७	३१/०३/२०२३	बाळापुर येथील कब्रस्थान येथे सिमेंट काँक्रीट रस्ता करणे.	९९८८६०	मनपा निधी अंतर्गत (कब्रस्थान दुरुस्ती सन २०२०-२१)
४२	६२१	३१/०३/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये आझाद नगर,छोटी बावडी येथे पाणी साठवण व्यवस्थेसाठी टाकी बांधणे.	५९६२९६	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
४३	६२२	३१/०३/२०२३	धुळे मनपा हद्दीतील वडजाई रोड भागातील कब्रस्थान येथे सिमेंट काँक्रीट रस्ता करणे.	९९९७४३	मनपा निधी अंतर्गत (कब्रस्थान दुरुस्ती सन २०२०-२१)
४४	६२३	३१/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये मुक्ताई नगर भागातील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे.	२४८९००४	मनपा निधी (विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३)
४५	६२४	३१/०३/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत वलवाडी येथील मनपा मालकीचा दवाखाना (आरोग्य वर्धनी)दुरुस्ती करणे.	१३०४६१७	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
४६	६२५	३१/०३/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत नगावबारी येथील मनपा मालकीचा दवाखाना (आरोग्य वर्धनी दुरुस्ती करणे.	१८०३३११	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
४७	६२७	३१/०३/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये वलवाडी भागातील हनुमान मंदिर चौकात पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	७४०९४६	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
४८	६२९	३१/०३/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये वलवाडी भागातील आर्या नगर ते देवमोगरा माता मंदिर पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४९८६०१	मनपा निधी (मनपा हद्दीतील रस्ते,गटारी व अनुषंगिक अंतर्गत सन २०२२-२३)
४९	६३०	३१/०३/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये शुभम कॉलनी भागातील विठ्ठल मंदिर परिसरातील खुल्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे व कंपाऊंड वॉल बांधणे.	५९६६१६	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
५०	६३१	३१/०३/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये मोहन पाटील यांचे घर ते साईबाबा मंदिर पावेतो राजेंद्र वानखेडे यांचे घर ते दुध डेअरी पावेतो गटार करणे.	२४९४५०९	मनपा निधी (मनपा हद्दीतील रस्ते,गटारी व अनुषंगिक अंतर्गत सन २०२२-२३)
५१	६३५	३१/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये भरत नगर मधील श्री.आशुतोष पाटील यांचे घराजवळील रस्ता डांबरीकरण करणे.	२४९५३७४	मनपा निधी (विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३)
५२	६३६	३१/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये नकाणे रोड श्री.पाटील यांचे घरापर्यंत उन्नती नगर येथे रस्ता डांबरीकरण करणे.	२४९७०७७	मनपा निधी (विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३)
५३	६३७	३१/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये प्रमोद नगर भागात श्री.एम.डी.पाटील यांच्या घरापासून ते श्री.बागुल यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४९६९२६	मनपा निधी (विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३)
५४	६३८	३१/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये शासकीय वसाहत भागात १)श्री.नेरकर यांचे घर ते श्री.भदाणे यांचे घरापावेतो २)श्री.भदाणे ते बी.जी.पाटील यांचे घरापावेतो डांबरीकरण करणे.	२४९६४८७	मनपा निधी (विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३)
५५	६३९	३१/०३/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये भाईजी नगर येथे संजय जयस्वाल यांचे घरापासुन ते ज्योती अग्रवाल यांचे घरापावेतो आणि दुर्गा महाजन यांचे घरापासून ते संगीता अग्रवाल यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	९९६४६६	भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत
५६	६४०	३१/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये केशर नगर बोर्ड ते श्री. पाटील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२४८४४३०	मनपा निधी (विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३)
५७	६४१	३१/०३/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत चक्करबर्डी भागातील मनपा मालकीचे दवाखाना (आरोग्य वर्धनी)दुरुस्ती करणे.	१४६७०५५	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
५८	६४२	३१/०३/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत चितोड भागातील मनपा मालकीचे दवाखान्याची दुरुस्ती करणे.	१४९८५७४	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
५९	६४४	३१/०३/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत अवधान भागातील मनपा मालकीचे दवाखाना (आरोग्य वर्धनी) दुरुस्ती करणे.	१४०३९८९	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
६०	६४५	३१/०३/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत महिंदळे येथील मनपा मालकीचा दवाखाना (आरोग्य वर्धनी) दुरुस्ती	१११११६८१	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)

			करणे.		
६१	६४६	३१/०३/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत नकाणे भागातील मनपा मालकीचा दवाखाना (आरोग्य वर्धनी) दुरुस्ती करणे.	१८६९२७१	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
६२	६४७	३१/०३/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत मोहाडी येथील मनपा मालकीचा दवाखाना (आरोग्य वर्धनी) दुरुस्ती करणे.	११६०२१३	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
६३	६५०	३१/०३/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये २००० खोली भागात नाजीमबाली यांच्या घरापासून ते इफ्तेहार टेलर पर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९९६८३१	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
६४	६५१	३१/०३/२०२३	प्र.क्र.१० मध्ये वरखेडी रोड साई ग्राम कॉलनी येथील श्री.मराठे यांचे घर ते दिलीप पाटील घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१८४३६९७	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
६५	६५३	३१/०३/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये तुळशीराम नगर मधील श्री.अहिरराव यांचे घरापासून ते श्री.बागुल यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४९१७००	मनपा निधी (विकास शुल्क निधी अंतर्गत सन २०२२-२३)
६६	६५४	३१/०३/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये सदाशिव नगर येथील महादेव मंदिर परिसरातील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे पेव्हर ब्लॉक बसविणे व बेंचेस व हायमास्ट बसविणे.	९८८०५०	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत

सही/-x x x

सभापती

स्थायी समिती

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ६४ मानधनावरील संगणक लिपीक व इतर कर्मचारी व कनिष्ट अभियंता स्थापत्य यांना ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. साबीर शेख प्रस्ताव मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६४ दिनांक १२/०५/२०२३

कार्यालयीन टिपणीनुसार खालील मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांना पुढील ६ महिने कालावधी करीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अक्र	कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांचे नाव	पदाचे नाव	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रु
१	राकेश आट्या पावरा	कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
२	ज्योती रुपसिंग पावरा	कनिष्ठ अभियंता (विदयुत विभाग)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
३	सत्यम रामचंद्र मोरे	कनिष्ठ अभियंता (पाणीपुरवठा)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
४	सुनिल गणपत थोरात	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
५	चेतन प्रदिप नवसारे	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	४/४/२०२३	रु. २०,०००/-

६	पुजा वामन चौधरी	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
७	राहुल संजय सोनवणे	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
८	गौरव विजयसिंग पाटील	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
९	राहुल आत्माराम फुलपगारे	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
१०	सायली लक्ष्मण गोराड	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
११	श्रृती ज्ञानेश्वर पवार	कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
१२	मयुर जितेंद्र भट	कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
१३	सागर संतोष कोळी	कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक)	४/४/२०२३	रु. २०,०००/-
१४	मोहित शकील मुजावर	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	३१/०५/२०२३	रु २०,०००/-

मंजूर कार्यालयीन टिपणीनुसार खालील मानधनावरील संगणक लिपीक यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अक्र	संगणक ऑपरेटरचे नाव	पदाचे नाव	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रु
१	राहुल सुभाष भावसार	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
२	कुणाल संजय दरगुडे	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
३	सरिता गंभिरराव चव्हाण	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
४	सुनिता दत्तात्रय आव्हाड	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
५	निखिल रविंद्र देशमुख	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
६	जितेंद्र सुभाष शिंदे	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
७	वर्षा छबीलाल माळी	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
८	शरद दामु मोहिते	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
९	लतेश सुरेश चौधरी	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
१०	नितीन ज्ञानेश्वर महाले	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
११	शोऐब रजा आदिल शेख	लिपीक	२३/४/२०२३	१५,०००/-

		टंकलेखक		
१२	अंजना प्रल्हाद गायकवाड	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
१३	दिलीप खुशाल शिवदे	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
१४	पल्लवी जयराम सावरकर	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
१५	सचिन विनायक शिंदे	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
१६	पुजा विठ्ठलसिंग परदेशी	लिपीक टंकलेखक	२३/४/२०२३	१५,०००/-
१७	ज्योती मोहन पुकळे	लिपीक टंकलेखक	२६/४/२०२२	१५,०००/-
१८	उमाकांत दगडु बारी	लिपीक टंकलेखक	२६/४/२०२२	१५,०००/-
१९	कैलास सत्तु गलांडे	लिपीक टंकलेखक	२६/४/२०२२	१५,०००/-
२०	निलेश भिला सोनवणे	लिपीक टंकलेखक	२६/४/२०२२	१५,०००/-
२१	विकास संतोष खलाणे	लिपीक टंकलेखक	२६/४/२०२२	१५,०००/-

मंजुर कार्यालयीन टिपणी नुसार खालील मानधनावरील औषध निर्माता, स्टाफ नर्स, एएनएम , व दाई हया कर्मचा-यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	हुददा	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रुपये
१	श्री अन्सरी अन्वरुल फारकान हुसैन	औषध निर्माता	२६/४/२०२३	१५,७००/-
२	प्रियंका वैभवकुमार जगताप	औषधनिर्माता	२६/४/२०२३	१५,७००/-
३	रिबीका गोविंद वळवी	स्टाफ नर्स	२६/४/२०२३	१९,०००/-
४	कृनिका संजय वाघमारे	स्टाफ नर्स	२६/४/२०२३	१९,०००/-
५	दिपाली हिलाल गर्दे	स्टाफ नर्स	२६/४/२०२३	१९,०००/-
६	मिरा माकल्या राहसे	ए एन एम	२६/४/२०२३	१५,५००/-
७	वंदना पुरुषोत्म निकम	ए एन एम	२६/४/२०२३	१५,५००/-
८	प्रतिभा किशोर सोनवणे	ए एन एम	२६/४/२०२३	१५,५००/-
९	शारदा दिपक वाघ	ए एन एम	२६/४/२०२३	१५,५००/-
१०	कविता युवराज भोई	ए एन एम	२६/४/२०२३	१५,५००/-
११	सोनिया अशोक तपासे	ए एन एम	२६/४/२०२३	१५,५००/-
१२	मनिषा दिलीप गायकवाड	ए एन एम	२६/४/२०२३	१५,५००/-

१३	लता किसन गवळी	दाई	२६/४/२०२३	१३०००/-
१४	सुरेखा रविंद्र वाडेकर	दाई	२६/४/२०२३	१३०००/-

मंजुर कार्यालयीन टिपणी नुसार खालील मानधनावरील स्वच्छता निरीक्षक कर्मचारी यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अ क्र	उमेदवारचे नाव	पदाचे नाव	मानधन रुपये	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक
१	श्री गौरव अशोक माळी	स्वच्छता निरीक्षक	१५,०००/-	२६/४/२०२३
२	श्री मनिष अशोक आघाव	स्वच्छता निरीक्षक	१५,०००/-	

वरील मानधन तत्वावरील विविध संवर्गातील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता त्यांच्या नावासमोर नमुद एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे. उक्त मानधन तत्वावरील विविध संवर्गातील यांना मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार में. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून वरील १ ते १४ कनिष्ठ अभियंता, १ ते २१ लिपीक टंकलेखक, १ ते १४ औषध निर्माता व इतर स्टॉफ , १ ते २ स्वच्छता निरिक्षक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर (नविन प्रस्तावित मानधनवाढीनुसार) पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- श्री.खान मो.साबीर मुहिबुल्लाह **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६५ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत धुळे मनपा हद्दीतील भूमापन क्रमांक ३१४ येथील राममंदिर परिसरातील शासकीय मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करावा.

म.वसीम अन्सारी सदरचा प्रस्ताव मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६५ दिनांक १२/०५/२०२३

जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील भूमापन क्रमांक ३१४ येथील राममंदिरपरिसरातील शासकीय मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१४/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३,००,३०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /७७४/२०२२ दि.०८/०२/२०२३ अन्वये रक्कम रु.३५,०८,१७४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/१८२/२० अन्वये दि.२३/०३/२०२३ अन्वये रोजी दैनिक देशदूत/राजरंग टाईम्स या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२८/०३/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	अे.के.सैफी	शे.१.०० % जास्त	
२	सौरभ संजय कदमबांडे	शे.२.०० % जास्त	
३	भूषण एल.चौधरी	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता भूषण एल.चौधरी यांचीनिविदा सर्वात न्यूनतम दराचे 35,08,174/-इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे.सदर निविदा धारकांचे निविदा दर हे अंदाजपत्रक दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून भूषण एल.चौधरी यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार भूषण एल.चौधरी यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर तसेच अन्य काम

न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार भूषणएल.चौधरी यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपासलिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेपनिर्माण होणार नाहीयाची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन

अनुमोदक :- श्री.वसीम खलील अन्सारी

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६६ जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत लोकरे नगर सर्व्हे नं.४९३/१ येथे शासकीय मोकळ्या जागेस संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. दगडू बागलू विषय मंजूर करण्यात यावा.

म. रंगनाथ ठाकरे सदरचा प्रस्ताव मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६६ दिनांक १२/०५/२०२३

जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत लोकरे नगर सर्व्हे नं.४९३/१ येथे शासकीय मोकळ्या जागेस संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२१/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**४९,९५,३२४/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /२९४/२०२२-२३ दि. ०६/१०/२०२२ अन्वये रक्कम रु.**४९,९५,३२४/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./१३२५/२०२२-२३ दि.२९/०३/२०२३ अन्वये दि.३०/०३/२०२३ अन्वये रोजी दैनिक **देशदूत/जागृती पर्व** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१८/०४/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	रामेश्वर ट्रेडर्स	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**
२	ऋषभ सतिष खिवसरा	शे.२.०० % जास्तीने	

३	मे.एकविरा कन्सट्रक्शन	शे.३.०० % जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे. व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाना रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समितीपुढे ठेवणे तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर सादर करणेस मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपासलिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेपनिर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. दगडू भिमा बागुल

अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ६७ १५ व्या वित्त आयोग अंतर्गत देवपूर नेहरू नगर येथे ७.५ लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधणे एवजी ४.५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे व उर्वरित रक्कमेत कंपाऊंड वॉल व पेव्हिंग ब्लॉक बांधणे कामी मे. स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे विषय क्रमांक ६७ हा १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत आलेल्या निधीच्या बाबतीत आहे. सदरच्या विषयाबाबत प्रशासनाने खुलासा करावा. या मध्ये काय दुरुस्ती केली आहे? काय दुरुस्ती करणे क्रमप्राप्त आहे? याची निविदा प्रक्रीया केली पाहिजे की नाही पाहिजे? निविदा प्रक्रीया केल्यानंतर विषय आला पाहिजे की नाही? याचा सव्वीस्तर खुलासा करावा.

म. सहा. अभियंता सदरचा विषय हा १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत देवपूर येथील पाण्याच्या टाकीच्या आवारामध्ये ७.५ लक्ष लि. ची टाकी ची जागा उपलब्ध नसल्याने ४.५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे व उर्वरित रकमेत कंपाउंड वॉल व पेव्हींग ब्लॉक बांधणे साठी अवलोकनार्थ हा विषय सादर झालेला आहे.

म. सुनिल बैसाणे वॉल कंपाउंड व पेव्हींग ब्लॉक यांची निविदा प्रक्रीया करणार आहे की नाही ? पहिली जी निविदा प्रक्रीया झाली त्यात वॉल कंपाउंड नाही. माझा विषयाच्या मंजूरीबाबत कोणताही आक्षेप नाही.

म.सहा. अभियंता — यात आपण एकत्रित सर्व करणार आहे. टाकीच्या उरलेल्या पैशातून इतर उर्वरित कामे करणार आहे. उर्वरित कामांची नविन निविदा काढाणार आहे.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास १५ व्या वित्त आयोग अंतर्गत देवपूर नेहरू नगर येथे ७.५ लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधणे एवजी ४.५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे व उर्वरित रक्कमेत कंपाऊंड वॉल व पेव्हिंग ब्लॉक बांधणे बाबत झालेला बदल सभागृहास अवगत करण्यांत आलेला आहे. याबाबत प्रशासनाने पुढील उचित कार्यवाही नियमानुसार करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६७ दिनांक १२/०५/२०२३

धुळे महानगरपालिका ठराव नं. 12 दि. 12/08/2021 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा कडील जा.क्र. 211 दि. 22/03/2022 नुसार रु.1,05,11,062/- मात्रस तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. उक्त कामास धुळे महानगरपालिका जा.क्र./ धुमपा / पापुवि / 36 दि. 13/04/2022 अन्वये दि. 14/04/2022 रोजी दै. लोकमत / समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येवून दि.18/05/2022 रोजी निविदा दर मागविण्यात आलेले होते. त्यानुसार सदर कामात L १ निविदा धारक श्री.सौरभ संजय कदमबांडे यांना या कार्यालया कडील जा. क्र. 170 दि. 08/08/2022 नुसार कार्यादेश देण्यात आलेला आहे. उक्त ठिकाणी 4.50 लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची टाकी अस्तित्वात असून सदर पाण्याच्या टाकी वरून नागरिकांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे. प्रस्तावित काम करणे 90 चौ.फुट X 90 चौ.फुट जागेची आवश्यकता आहे. सध्यस्थितीत 40 चौ. फुट X 40 चौ. फुट ची जागा उपलब्ध आहे. सदर उपलब्ध जागेत 7.5 लक्ष लिटर एवजी 4.50 लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे कामी व उर्वरित रक्कमेत कंपाऊंड वॉल व पेव्हिंग ब्लॉक करणे कामी Total Station Survey करणेत आलेला आहे. त्यात 4.50 लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधकाम करता येवू शकतो. तसेच अस्तित्वातीत जुनी टाकी वरून सुरळीत सदरील भागात पाणीपुरवठा करता येवू शकेल. तरी विषयांकित कामास अंदाजपत्रक रु.1,05,10,513/- मात्रचे सादर केलेले आहे. तरी सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे कामी बांधकाम विभागा मार्फत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. उक्त बाबत म.आयुक्त सो., यांच्या कडील अभिप्राया नुसार मे. स्थायी समितीने निविदा मंजूर केलेली आहे. तरी कामात बदल असल्याने मे स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर झालेला आहे. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून १५ व्या वित्त आयोग अंतर्गत देवपूर नेहरू नगर येथे ७.५ लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधणे एवजी ४.५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे व उर्वरित रक्कमेत कंपाऊंड वॉल व पेव्हिंग ब्लॉक बांधणे बाबत झालेला बदल सभागृहास अवगत करण्यांत आलेला आहे. याबाबत प्रशासनाने पुढील उचित कार्यवाही नियमानुसार करावी.

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ६८	नगरसेवक निधी अंतर्गत प्र.क्र. १५ मध्ये सर्वे नं, ८३/२,८५/१ अ येथील जागेत वॉल कंपाऊंड बांधणे ऐवजी भावसार कॉलनी येथील ओपनस्पेस येथेल जागेत वॉल कंपाऊंड बांधणे कामी मे. स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. सुनिल बैसाणे	हा जो विषय आला आहे यात जागेत बदल झाला याचा निर्णय घेणेचा अधिकार स्थायीला आहे का? प्रशासनाने खुलसा करावा. मंजूर झालेला रस्ता या या ठिकाणी आहे परंतु सदरचा रस्ता दुसऱ्या योजनेत झाला आहे. प्रस्तुत रस्ता दुसऱ्या ठिकाणी करण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी घेणेसाठी असे अधिनियमात आहे का? रस्तयाचे स्वरुपात बदल झाला आहे.
म.सहा. अभियंता	सदर जागेत अतिक्रमण जास्त असल्यामुळे तेथे कंपाउंड करता येत नाही. सन्मा. नगरसेवकांनी यादी दिली होती. त्यानुसार आम्ही टिपनी ठेवली ती मंजूर होऊन सदरचा विषय अवलोकनार्थ स्थायी समितीपुढे सादर केला आहे.
म. अभियंता	प्रस्तुत प्रकरणी सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. कुठल्याही कामाची निविदा प्रक्रीया केल्यानंतर त्या निविदेत तेच काम करु शकतो. तथापी एखादे काम २०० मी., ५०० मी असते त्यात सेमी. वाढल्यामुळे मंजूर निधीतून घेऊ शकतो. पंरतु जे काम बदल करायचे असेल आवश्यक त्या निविदा प्रक्रीयेतून नविन काम करण्यात येते. अशी तरतूद आहे. तथापी समितीच्या मान्यतेनुसार सदरचा प्रस्ताव त्या भागातील अभियंता यांनी सादर केल्या नुसार याबाबत निर्णय समितीने घ्यायचा आहे. किंवा वरीष्ठ स्तरावर ज्या प्राधीकरणाने मंजूरी दिली आहे म्हणजे २५ लाखा पर्यंत प्रस्ताव आयुक्त सो. मंजूर करतात. २५ लाखाच्या वरचे प्रस्ताव जो असतो स्थायी समिती मंजूरी देते. ज्या प्राधिकरणाने याला मंजूरी दिली असते. ते मंजूर करु शकतात. सक्षम प्राधिकरणाच्या मंजूरीने आवश्यक तो बदल करता येतो. याबाबत अधिनियमात तरतुद आहे.
म.सुनिल बैसाणे	आयुक्त सो. यांना अधिकार असतांना स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर केला आहे. तो स्थायी समिती समोर यायला नको होता. संबंधीत ओव्हरसिअर ने त्याबाबतची दुरुस्ती करावी. व सन्मा आयुक्त सो कडून ती मंजूरी घेण्यात यावी. ही स्थायी समिती जागा बदलासाठी नाही. याची निविदा प्रक्रीया होऊन गेली आहे. हे विकासाचे काम आहे. पंरतु विकासाचे काम करत असतांना याची काळजी घेतली पाहिजे.
म.अति. आयुक्त	यात एकाच जागेवर दोन निधी प्रयोजित झाले आहे. आपला निधी आधी प्रायोजित झाला. शासकीय निधी नंतर प्रयोजित झाला. तो नगरसेवक निधी तशाच स्वरुपाच्या दुसऱ्या कामाला वापरायचा. जागा दुसरी आहे व निविदा धारक पहील्या निविदेचा आहे. दुसऱ्या जागेवर करायचे असेल तर नविन निविदा करावी लागेल. परंतु स्थायी समितीला मनपाअधिनियमात ५(२) मध्ये विना निविदेचे काम करण्यास मान्यता देण्याचे अधिकार आहे. त्या अनुषंगाने मंजुरीसाठी सादर केला आहे.

म.सभापती

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास नगरसेवक निधी अंतर्गत प्र.क्र. १५ मध्ये सर्वे नं, ८३/२,८५/१ अ येथील जागेत वॉल कंपाऊंड बांधणे ऐवजी भावसार कॉलनी येथील ओपनस्पेस येथेल जागेत वॉल कंपाऊंड बांधणे बाबत झालेला बदल सभागृहास अवगत करण्यांत आलेला आहे. याबाबत प्रशासनाने पुढील उचित कार्यवाही नियमानुसार करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६८ दिनांक १२/०५/२०२३

नगरसेवक निधी अंतर्गत प्र.क्र. 15 मध्ये सर्वे नं, 83/2, 85/1 अ येथील जागेत वॉल कंपाऊंड बांधणे कामास या कार्यालयाकडील जा.क्र. 215 दि. 07/09/2022नुसार रु.19,95,445/- मात्रस तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. उक्त कामास धुळे महानगरपालिका जा.क्र./ धुमपा / पापुवि / 532दि. 13/04/2022 अन्वये दि. 27/09/2022 रोजी दै. सकाळ / श्रमराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येवून दि.18/10/2022 रोजी निविदा दर मागविण्यात आलेले होते. त्यानुसार सदर कामात L१ निविदा धारक श्री.चेअरमन नागसेन लेबर को ऑप. सोसा., यांना या कार्यालया कडील जा. क्र. 445 दि. 07/12/2022 नुसार कार्यादेश देण्यात आलेला आहे. परंतु सदर भागातील सन्मा. नगरसेवक श्री. संजय सुधाकर जाधव यांच्या कडील पत्रानुसार प्र.क्र. 15 मध्ये सर्वे नं, 83/2 , 85/1 अ येथील जागेत वॉल कंपाऊंड बांधणे काम मुलभूत सोई सुविधा अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले असल्याने त्या ऐवजी भावसार कॉलनी येथील ओपनस्पेस येथेल जागेत वॉल कंपाऊंड बांधणे प्रस्तावित करणेत यावी बाबत कळविले आहे. उक्त बाबत नगररचना विभागा कडील अभिप्राय नुसार , प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता मौजे महिंदळे स.नं. 83/2 , 85/ येथील मंजूर अभिन्यासातील खुल्या जागेस मनपाचे नावे क्षेत्र 6250.0 m२ येथे कुंपण भिंत बांधणेचा प्रस्ताव आहे. सदर अभिन्यास हा pwds११९८ दि. 18/03/83 मंजुरी असून UDCPR नुसार खुल्या जागेस कुंपण भिंत अनुज्ञेय होईल असे प्रस्तावित आहे. उक्त बाबत म.आयुक्त सो., यांच्या कडील अभिप्राया नुसार कामाच्या स्थळात (जागेत) बदल झालेला असल्याने मे. स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास नगरसेवक निधी अंतर्गत प्र.क्र. १५ मध्ये सर्वे नं, ८३/२,८५/१ अ येथील जागेत वॉल कंपाऊंड बांधणे ऐवजी भावसार कॉलनी येथील ओपनस्पेस येथेल जागेत वॉल कंपाऊंड बांधणे बाबत झालेला बदल सभागृहास अवगत करण्यांत आलेला आहे. याबाबत प्रशासनाने पुढील उचित कार्यवाही नियमानुसार करावी.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १२ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २५/०५/२०२३
वेळ :-सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१२ आज गुरुवार **दिनांक २५/०५/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
१२	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. देविदास टेकाळे	आयुक्त
२	श्री.नितीन कापडणीस	अति.आयुक्त
३	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त तथा कर निर्धारण अधिकारी
४	श्री. व्ही. आर. सनेर	उपायुक्त
५	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
६	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी

७	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
८	श्री. के. एन. शिंदे	अभियंता
९	श्री. राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. चंद्रकांत मोरे	प्र लेखापाल
११	श्री. के. बी. सांबळे	आस्थापना विभाग
१२	श्री. पी.डी. चव्हाण	सहाय्यक अभियंता
१३	श्री. किशोर सुडके	परवाना विभाग तथा बाजार अधिक्षक
१४	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१५	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१६	श्री.एन.के.बागुल	विदयुत अभियंता
१७	श्री. शिरीष जाधव	अतिक्रमण विभाग
१८	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी , मनपा शिक्षण मंडळ
१९	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमरण विभाग
२०	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२१	श्री. आर.पी. पाटकरी	वृक्ष प्राधिकरण विभाग

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी

धुळे मनपाचे सदस्या मा. सौ.सुशिलाताई ईशी यांचे पती व सामाजिक कार्यकर्ते श्री. योगेश ईशी यांचे वडील यशवंत ईशी यांचे दि.२३/५/२०२३ रोजी दु:खद निधन झाले. तसेच मनपा कर्मचारी अमोल तारगे यांचे हृदयविकाराने दु:खद निधन झाले आहे. तरी आजच्या सभेत त्यांना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. विजय बापू जाधव व दगडू भिमा बागुल

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार मान्यवरांना श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७० दिनांक २५/०५/२०२३

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार धुळे मनपाचे सदस्या मा. सौ. सुशिलाताई ईशी यांचे पती व सामाजिक कार्यकर्ते श्री. योगेश ईशी यांचे वडील यशवंत ईशी यांचे दि. २३/५/२०२३ रोजी दु:खद निधन झाले. तसेच मनपा कर्मचारी अमोल तारगे यांचे हृदयविकाराने दु:खद निधन झाले आहे.

वरील दोन्ही मान्यवरांच्या दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे दु:खद निधन निमित्त त्यांचे आत्मास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेली अभिनदनाची यादी

केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी अमृत योजना –२अंतर्गत धुळे शहरातील मनपा हद्द वाढ गावांच्या आणि शहरातील उर्वरीत भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी खा. डॉ. बाबासाहेब सुभाषजी भामरे व भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष मा. श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांचा केंद्र शासनाकडे सतत पाठपुरावा सुरु होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून त्यांनी केंद्र शासनाकडुन धुळे शहरासाठी रु.९०० कोटीचा निधी खेचून आणला आहे. त्यानुसार नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी नव्याने १७७ कोटी व शहरातील भूमिगत ड्रेनेज लाईन योजनेसाठी ७१७ कोटीचा निधीला मंजुरी देण्यांत आली आहे.

तरी आज रोजीच्या स्थायी समिती सभेत देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी सो. गृहमंत्री मा. श्री. अमितजी शहा सो., धुळे लोकसभेचे खा. डॉ. सुभाषजी भामरे सो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना.एकनाथजी शिंदे सो.उपमुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडवणीस सो. मा.ना. श्री. गिरीषजी महाजन सो.मा. श्री. जयकुमारभाऊ रावल सो.आ.श्री.अमरीशभाई पटेल सो. मा.आ.श्री. राजवर्धनजी कदमबांडे सो. भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष मा. श्री.अनुपभैय्या अग्रवाल,मा.महापौर चंदुबापु सोनार,मा.श्री.प्रदीपनाना कर्पे तसेच महापौर सौ.प्रतिभाताई चौधरी यांच्या हार्दीक अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत याव ही विनंती.

सुचक :- सौ. किरण राकेश कुलेवर
अनुमोदक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे , श्री. दगडू भिमा बागुल

म. सभापती सन्मा. सभापती व सदस्यांच्या यादीनुसार अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७१ दिनांक २५/०५/२०२३

सन्मा. सभापती व सदस्यांच्या यादीनुसार केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी अमृत योजना – २अंतर्गत धुळे शहरातील मनपा हद्द वाढ गावांच्या आणि शहरातील उर्वरीत भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी खा. डॉ. बाबासाहेब सुभाषजी भामरे व भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष मा. श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांचा केंद्र शासनाकडे सतत पाठपुरावा सुरु होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून त्यांनी केंद्र शासनाकडुन धुळे शहरासाठी रु.९०० कोटीचा निधी खेचून आणला आहे. त्यानुसार नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी नव्याने १७७ कोटी व शहरातील भूमिगत ड्रेनेज लाईन योजनेसाठी ७१७ कोटीचा निधीला मंजुरी देण्यांत आली आहे. त्याबद्दल देशाचे पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी सो. गृहमंत्री मा. श्री. अमितजी शहा सो., धुळे लोकसभेचे खा. डॉ. सुभाषजी भामरे सो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना.एकनाथजी शिंदे सो.उपमुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडवणीस सो. मा.ना. श्री. गिरीषजी महाजन सो. मा. श्री. जयकुमारभाऊ रावल सो. आ. श्री. अमरीशभाई पटेल सो. मा.आ.श्री. राजवर्धनजी कदमबांडे सो. भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष मा.श्री.अनुपभैय्या अग्रवाल,मा.महापौर चंदुबापु सोनार, मा.श्री. प्रदीपनाना कर्पे तसेच महापौर सौ. प्रतिभाताई चौधरी यांच्या हार्दीक अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ६९ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं. ९ दि.१३ /०४/ २०२३)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७२ दिनांक २५/०५/२०२३

मागील स्थायी समिती सभा दिनांक १३/०४/२०२३ चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५२ ते ५८ तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ७० मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि.१३/०४/२०२३ ते दि.१३/०५/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. रंगनाथ ठाकरे विषय मंजुर करावा.

म. सभापती मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५लाखापर्यंत बांधकाम भागा कडील विकास कामांची यादीचे अवलोकन करण्यांत आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७३ दिनांक २५/०५/२०२३

मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि.१३/०४/२०२३ ते दि.१३/०५/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर.

अ. क्र	कार्या. क्रं.	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	२	१३/०४/२०२३	प्र.क्र.१२ आसिफ हाजी यांच्या घरापासून ते अयाज वायरमन यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता व काँक्रीट गटार करणे.	९,९४,६८६/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत
२	३	१३/०४/२०२३	धुळे मनपा हद्दीतील मुंबई आग्रा हायवे येथील मुल्लाजी हॉटेल पासून ते वडजाई रोड शहागंजच्या पाठी मागे गट नं.१०१ पर्यंत पाईपलाईन टाकणे.	१४,८३,३२९/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत
३	४	२०/०४/२०२३	प्रभाग क्र.०४ मध्ये जयहिंद कॉलनी भागातील सं.नं.१९/१ मनपा मालकीच्या जागेत समाज भवन बांधणे.	१७,४६,११२/-	मनपा निधी

४	५	२०/०४/२०२३	संत डोंगरे महाराज नगर मुख्य प्रवेशव्दारा पासून ते पसारी यांचे घरापावेतो तसेच वरखेडी रोड पर्यंत भुवारी गटार करणे.	९,९८,७५७/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३
५	६	२१/०४/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये १०० फुटी रोड वकील शेठ यांचे घरापासून अखलाख अहमद व फिरोज ठेकेदार यांचे घरापर्यंत रस्ता व गटार काँक्रीट करणे.	१९,९९,६८२/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३
६	७	२१/०४/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये तुळशीराम नगर भागातील खुल्या जागेतील जेष्ठ नागरिकांचे सभागृह दुरुस्त करणे.	११,०५,२९५/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२२३ जेष्ठनागरिकांसाठी सभागृह बांधणे)
७	८	२१/०४/२०२३	प्र.क्र.०८ मध्ये श्री.गुळवेसर यांचे घरापासून ते बहादुर्गे यांचे घरापर्यंत मिरच्या मारोती मंदिर गल्ली नं.५पावेतोरस्ता डांबरीकरण करणे.	१९,९१,२६२/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
८	१०	०२/०५/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये पाटील नगर भागातील खुल्या जागेत जॉगिंग ट्रॅक करणे व ओटा बांधणे.	१९,९४,९४४/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
९	११	०२/०५/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये प्रमोद नगर भागातील सं.नं.६२/२ मधील ओपनस्पेसची वॉल कंपाऊंड दुरुस्त करणे.	९,९२,९७२/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३
१०	१२	०२/०५/२०२३	प्र.क्र.०५मध्येआनंद नगर भागातील उद्यान सुशोभिकरण करणे.	८,३१,५०१/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३ (शहरातील बगीचे सुशोभिकरण व निवन उद्यान विकसित करणे)
११	१३	०२/०५/२०२३	धुळे मनपा हद्दीतील संत नरहर कॉलनी नगर भूमापन क्रमांक १४३३७ येथील मारुती मंदिर परिसरातील शासकीय मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे.	२२,३०,१८७/-	जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत सन २०२२-२३
१२	१४	०२/०५/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये चामुंडा हॉटेल ते मदिना किराणा ते अंबिका नगर ते कबिर गंज भागात HDPE पाईपलाईन टाकणे.	१९,९२,९२३/-	मनपा निधी (नविन पाईपलाईन टाकणेअंतर्गत सन २०२२-२३)
१३	१५	०२/०५/२०२३	प्र.क्र.११ मध्ये माणिक नगर येथे संदीप खैरनार ते विजय चौधरी यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१४,८०,०१५/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
१४	१६	०२/०५/२०२३	प्र.क्र.०८ मध्ये आग्रारोड मोडी प्रोव्हिजन नगिना मशीद तहसील कार्यालय पर्यंत डांबरीकरण करणे.	८,२३,९४०/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
१५	१७	०२/०५/२०२३	प्र.क्र.०८ मध्ये सूर्योदय कॉलनी गुरुदत्त मंदिर ते गवळी आप्पा यांचे घरापर्यंत गटारीवर स्लॅब टाकणे.	८,९२,८४७/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
१६	१८	०२/०५/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये १)यशवंत विजय शाळे जवळ श्री.दयानंद पवार यांचे घरापासून ते राजेंद्र सोनवणे घरापर्यंत २)सूर्या नगर भागात श्री.संजय पाटील ते एस.टी.पाटील ३)विनोद नगर भागात राजेंद्र पवार ते रवी सोनवणे यांचे घरापर्यंत पाईपलाईन टाकणे.	५,५२,३८६/-	मनपा निधी (नविन पाईपलाईन टाकणेअंतर्गत सन २०२२-२३)
१७	१९	०२/०५/२०२३	प्र.क्र.१० मध्ये लालचंद मराठे ते सुदाम आबा पाटील व रमेश प्रकाश बंजारी ते गोलू चौधरी राम नगर वरखेडी येथे रस्ता काँक्रीट करणे.	१९,९७,२९४/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
१८	२०	०२/०५/२०२३	प्र.क्र.९ मध्ये क्षिरे गल्ली पांझरेश्वर मंदिर जवळ रस्ता काँक्रीट करणे.	१२,२८,७८१/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)

१९	२१	०२/०५/२०२३	प्र.क्र.१३ मध्ये मदनी झेरॉक्स पासून ते कलंदर चौकापर्यंत रस्ता काँक्रीट करणे. तसेच HDPE पाईपलाईन टाकणे.	१९,९४,९७५/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२०	२२	०२/०५/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये चाळीस गावरोड पंचवटी नगर, मिरजकर नगर येथे विविध ठिकाणी रस्ता करणे.	१९,९१,२४४/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२१	२४	०२/०५/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये अमोल नगर , श्रीकृष्ण नगर, सर्व्हेश्वर नगर,शिवाजी नगर, राम नगर,शिवप्रताप कॉलनी भागात पाईपलाईन टाकणे.	११,१२,१७४/-	मनपा निधी (नवीन पाईपलाईन टाकणे अंतर्गत सन २०२२-२३)
२२	२५	०२/०५/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये अग्रवाल नगर भागात बॅगवाले यांचे घरापासून ते पी.जी.सुतार पावेतो रस्ता काँक्रीट व ड्रेनेज लाईन तसेच ४" पाईपलाईन टाकणे.	१९,९६,८०६/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२०-२१)
२३	२६	०२/०५/२०२३	प्र.क्र.०८ मध्ये ग.नं.५/६ ची बोळ पावन मारोती मित्र मंडळ तेभाऊसाहेब चौधरी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१७,९५,३५०/-	नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३
२४	२७	०२/०५/२०२३	धुळे मनपा हद्दीतील वडजाई रोड गंगा स्टाईल पासून शादाब नगर येथे अंतर्गत काँक्रीट गटार करणे.	१९,९९,८८८/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३
२५	२८	०२/०५/२०२३	प्र.क्र.११ राजेंद्र सुशीनगर भागात किशोर बागुल ते घनश्याम सोलंकी यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९,८९,२५३/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२६	२९	०३/०५/२०२३	प्रभाग क्र.११ मध्ये नाटेश्वर कॉलनी भागात आर.सी.सी. पाईप गटार करणे. फेर ई-निविदा अंकित जैन ते संदीप गांगुर्डे , पिंटू यादव ते बंटी पाटील व गौरव ब्रेद्रे ते प्रमोद जैन	१९,०३,१७९/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२७	३०	०३/०५/२०२३	प्र.क्र.११ मध्ये भगा मोहन नगर येथे देवचंद सोलंकी राहुल ललवाणी रस्ता डांबरीकरण करणे. (४थि फेर निविदा)	९,७९,३२७/-	मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३)
२८	३३	१३/०५/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये जळगाव जनता बँक कॉलनी मधील सि.सं.नं.४७६/२बमधील शासकीयमोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे.	२४,९९,६६७/-	जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२२-२३
२९	३४	१३/०५/२०२३	धुळे महानगरपालिका हद्दीतील बोरसे कॉलनी जवळ गुलशनाबाद २००० वस्ती सिटी सर्व्हे नं.४४१/२ या रहिवाशी भागात गटारी करणे.	९,९९,७४०/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत
३०	३५	१३/०५/२०२३	धुळे शहर पाणीपुरवठा योजनेवरील water work उंच जलकुंभ व भूस्तरावरील जलकुंभातील गाळ काढून साफ सफाई करणे २ वर्ष मुदती करीता.	९,०७,९०९/-	मनपा निधी सन २०२२-२३

सही/-x x x

सभापती

स्थायी समिती

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ७१ प्रभाग क्र. ६ मधील पितांबर नगर येथील शरद पाटील यांच्या घरापासून ते निळकंठ चव्हाण ते संदीप सोंजे यांचे घरापावेतो पाईप लाईन दुरुस्ती करणेत आलेले असून सदर कामास व खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करावा.

म.रंगनाथ ठाकरे सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७४ दिनांक २५/०५/२०२३

प्रभाग क्र. ६ मधील पितांबर नगर येथील शरद पाटील यांच्या घरापासून ते निळकंठ चव्हाण ते संदीप सोंजे यांचे घरापावेतो पिण्याची पाईप लाईन जीर्ण झालेली असल्याने वारंवार गळती होत असते. त्यामुळे सदरची पाईप लाईन दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे असे संबंधीत पत्रानुसार कळविले आहे. सदर भागात पाईप लाईन दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.२,५६,०५९/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा मे.संजय गायकवाड , ठेकेदार, धुळे यांचे कडून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.२,५६,०५९/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे.संजय गायकवाड , ठेकेदार, धुळे यांचे कडून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.२,५६,०५९/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७२ धुळे महानगरपालिका मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७ (३) (क)दुरूस्ती खर्च ₹.७,१४,५३३/- मात्र अदा करणे व अदा केल्यानंतर मनपा अधिनियम प्रकरण २ अनुसूची ड ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे .

म. नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. हर्षकुमार रेलन	या विषयाला कार्योत्तर मंजूरी द्यायची आहे. या गाडया आपल्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. म्हणून आयुक्त साहेबांनी जो निर्णय घेतला आहे तो बरोबर आहे. फक्त याबाबत माहिती हवी आहे. यापूर्वीचा जो ठेकेदार आहे. वॉटरग्रेस कंपनीला आपण त्याच्या डिपॉझिटमधून काढून घेणार आहोत. त्याचे डिपॉझिट आहे किती मनपाकडे? याबाबत माहिती द्यावी.
म.आयुक्त	याबद्दल कागदोपत्री संबंधित अधिकारी सांगतीलच यात माझ्या माहितीप्रमाणे त्याचे एक महिन्याचे बिल अदा केलेले नाही. त्यानंतर १० ते १५ दिवस वाढीव काम केले होते ते पण बिल अदा केले नाही. त्यानंतर आपल्याकडील बँक गॅरंटी होती व सुरक्षा अनामत आहे ती ही मनपाकडे आहे. सर्व आकडेवारी काढायला सांगीतली आहे. घंटागाडयांची जेवढी दुरुस्ती केली आहे. त्यात जीपीस असेल भोंगे असतील हया अनुषंगीक बाबींवर जेवढा खर्च झाला आहे. तो सर्व डिपॉझिट मधून वसूल करणार आहोत.
म.हर्षकुमार रेलन	मग स्थायी समितीने या विषयाला मंजूरी कशी काय द्यायची? आपल्याकडून रक्कम जास्त खर्च होत असेल तर ? त्या ठेकेदाराचे पैसे आपल्याकडे एकूण पैसे आहेत किती?
म.आयुक्त	आपण त्याकडून मोठया प्रमाणावर अमाउंट काढली आहे. आणि जर कमी पडली तर रिकव्हरी करण्याचा आपल्याला अधिकार आहे.
म.सुनिल बैसाणे	आदरणीय आयुक्त सो. सभागृहाचा सन्मान राखून आपण उपस्थित झाले त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो. या आधी या विषयाबाबत दुरुस्ती खर्चाबाबत समतीने सहमती दिली होती. वारंवार घंटागाडया दुरुस्ती होण्याचा विषय सभागृहासमोर येत असतो. जर आपण स्वयंभू ट्रान्सपोर्ट या संस्थेला हस्तांतरीत केलेल्या गाडया आहे. त्याचे देखभालचे व दुरुस्ती खर्चाचा विषय आहे. तुम्ही यापूर्वीच्या ठेकेदार वॉटरग्रेस कडून कोणत्या आधारावर करत आहात. आता स्वयंभूवाल्याकडे सर्व गाडया दिलेल्या आहे.
म.आयुक्त	या गाडया आपण हस्तांतरीत करण्यापूर्वी खर्च आहे हा.
म.सुनिल बैसाणे	सद्यस्थितीत स्वयंभू ट्रान्सपोर्ट ठेकेदाराला किती गाडया हस्तांतरीत केल्या आहे. यापूर्वीचा ठेकेदाराची किती डिपॉझिट शिल्लक आहे? याबाबत खुलासा करावा.
म.सभापती	संबंधीत अधिकारी यांनी या विषयाची माहिती द्यावी.
म.अति. आयुक्त	वॉटरग्रेस कंपनीचे शेवटचे बिल ३५ लाखाचे अदा केलेले नाही. तसेच वॉटरग्रेस सेक्युरिटी डिपॉझिट १ टक्के आपल्याकडे जमा होते. त्याची बँक गॅरंटी आहे. मे महिन्यात एक्सपायर होणार होती आपण आगोदरच एन्कॅश केली आहे. त्याचे जवळ जवळ १ कोटी ६० लाख शिल्लक आहे.त्यात हा खर्च नमूद केला आहे. त्याकडून आपण वसूल करणार आहोत. त्या व्यतीरिक्त करारनाम्यातील अटी शर्तीनुसार कर्मचारी न पुरवल्यामुळे १००० पर डे प्रमाणे आपण त्याला ४ ते ५ कोटीची नोटीस दिली आहे. तो लवादाकडे गेला होता. त्यातही हायकोर्टाने आपले म्हणने ऐकले आहे. कोर्टाने आयुक्त सो. कडे अधिकार दिले आहे.
म.सुनिल बैसाणे	आता या घंटागाडयांचा जो विषय आहे त्याच्याकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे. विरोधक या विषयाला धरुन विनाकारण पत्रक काढतात. पत्रक काढून सत्ताधारी पक्षाला बदनाम करण्याचा त्यांचा हेतु असतो. तो हेतु सफल होतो कारण प्रशासनाच्या वतीने सभगृहात खुलासा होत नाही. जर सभागृहात खुलासा झाला तर नागरिकांनाही कळेल धुळे मनपा पारदर्शकपणे काम करत आहे. या गोष्टी प्रसिध्द झाल्या पाहिजे. येणारे प्रश्न उपस्थित होणार नाही. आयुक्त सो. त्यासाठी तुम्हाला बोलवले आहे. प्रशासकीय निर्णय प्रक्रीयेत आयुक्त प्रमुख असतो. आयुक्तांनी याठिकाणी भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

म.आयुक्त — यामध्ये आपण पहिल्या पासुन भूमिका घेतली होती की, १००% घंटागाडया ऑन रोड करायच्या त्या अधिकृत डिलर यांच्याकडून दुरुस्त करायच्या आणि मगच हस्तांतरीत करायच्या आपण ७९ घंटागाडया सुस्थितीत व त्यांचे फिटनेस घेऊन कायदेशिर प्रक्रीया राबवून १००% गाडया हस्तांतरीत केल्या आहे. त्यांचे शेडयुल असते १०% गाडया राखीव ठेवतात.

म.हर्षकुमार रेलन — आमच्या प्रभाग क्र. ७ मध्ये रोजच्या ३ गाडया चालतात आणि २ ट्रॅक्टर चालतात पण फार दिवसापासून गाडी २ दिवसाआड येते. काल आम्ही सर्व विभागांआढावा घेतला त्याने मान्य केले एकच गाडी प्रभागात सुरु आहे. २ ट्रॅक्टरही बंद आहे. कचरा संकलन होत नाही. लोकांचा असंतोष आहे.

म. आयुक्त — घंटागाडयांचे जे वेळापत्रक आहे ते व्हॉटसअप ग्रुपवर सर्व सदस्यांना टाकावे. नियमानुसार साधारणत: १०% घंटागाडया कोणतीही कंपनी राखीव ठेवते.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. सदरचा खर्च संबंधित वॉटरग्रेस संस्था,नाशिक यांच्याकडून वसूल करणेबाबत कार्यवाही प्रशासनाने करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७५ दिनांक २५/०५/२०२३

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडीलअत्यावश्यक सेवेतील वाहनांचे संदर्भीय पत्रात नमुद नुसार आरोग्य विभागाकडून वॉटरग्रेस प्रोडक्टस, नाशिक-कचरा संकलन अभिकर्ता यांच्याकडेस मनपा मालकीची वाहने कचरा संकलनकामी देण्यात आली होती. सदरील वाहने त्यांच्याकडून ताब्यात घेऊन अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि.धुळेयांचेकडुन दुरूस्ती करून वाहने व स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे या नविन कचरा संकलन अभिकर्तास हस्तांतरीत करणे नमुद आहे. त्यासाठी साहित्याचीनिकड/ आवश्यकता तपासता सदरचे साहित्यतात्काळ संदर्भ क्र.1,2,3 नुसार अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांचेकडून घंटागाडयांच्या दुरूस्ती करून घेणे आवश्यक होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67 (3) (क) नुसार मा.आयुक्त सो यांना असलेल्या अधिकारात घंटागाडया तातडीने दुरूस्ती करण्यात आलेल्या आहेत.

सदरील वाहने हि कचरा संकलन अभिकर्ता वॉटरग्रेस प्रोडक्टस, कन्मवार ब्रिज जवळ, मुंबई आग्रा रोड, व्दारका, नाशिक यांना देण्यात आलेली होती. करारातील अटी-शर्ती आर्टिकल 3 -3.1 मधील (9) नुसार वाहनांची दुरूस्ती हि वॉटरग्रेस या ठेकेदाराने करावयाची होती. परंतु सदरील ठेकेदार यांनी घंटागाडयाची/वाहनांची दुरूस्ती केली नसल्यामुळे संदर्भीय पत्रानुसार आरोग्य विभागाकडील पत्रानुसार घंटागाडयाची दुरूस्ती वाहन विभागाकडुन टाटा-अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. दुरूस्ती कामे करण्यात आली आहे.

आज पावेतोमनपाकडून एकुण 75 घंटागाडया दुरूस्ती करण्यात आल्या आहेत. त्यातील खालील प्रमाणे देयक आजपावेतो उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना देयक अदा करण्यात आले आहे. येणेप्रमाणे

त्यानंतर अ.क्र.1 ते 54 असे एकुण 54 घंटागाडयांचे एकुण ₹.31,91,286/- मात्रचे देयके उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना अदा करण्यात आलेले आहे.

त्यानंतर अ.क्र. ५५ ते ६९ असे एकुण १५ घंटागाडयांचे एकुण ₹.१४,३९,४६६/- मात्रचे देयके उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना अदा करण्यात आलेले आहे. त्यानंतर अ.क्र. ७० ते ७५ असे एकुण ०६ घंटागाडयांचे एकुण ₹.७,३२,११९/- मात्रचे देयके उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना अदा करण्यात आलेले आहे.

मागील कालावधीत एकुण टाटा एसीई ७५ घंटागाडयांची दुरूस्ती करण्यात येऊन कचरा संकलन अभिकर्ता स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे या कचरा संकलन अभिकर्ता यांना ७५ घंटागाडया हस्तांतर करण्यात आलेल्या आहेत. ७५ घंटागाडया व या बिलातील एकुण ४ घंटागाडया असे एकुण ७९ घंटागाडया आजपावेतो हस्तांतर करण्यात आलेल्या आहेत. आजपावेतो एकुण ७५ घंटागाडयाचे ₹.५३,६२,८७१/- मात्रच दुरूस्ती खर्चाची देयके, अग्रीम , सीजीएसटी, एसजीएसटी व आयकर वजा करून अदा करण्यात आलेली आहे.

धुळे महानगरपालिका मालकीच्या आरोग्य विभागाकडील घंटागाडया मनपा अधिनियम ६७ (३) (क) —दुरूस्ती खर्च ₹.७,१४,५३३/- मात्र अदा करणे व अदा केल्यानंतर मनपा अधिनियम प्रकरण २अनुसूची ड५(२)(२) नुसार मे.स्थायी समिती कडेस कार्योत्तर मंजुरीसाठी ठेवणेस मंजुरी बाबत...या बिलातील मधील एकुण ४ घंटागाडया दुरूस्ती देयके येणेप्रमाणे देयक सादर केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियमकलम ६७ (३) (क) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२)तरतुदनुसार सदर एकुण वाहनांचा खर्च रक्कम ₹.७,१४,५३३/- (अक्षरी-सात लक्ष बत्तीस हजार एकशे एकोणावीस रूपये) मात्रला मा.आयुक्तसो. यांनामंजुरीचेअधिकारआहेत.

त्यानुसार संदर्भीय आदेशानुसार घंटागाडयाची/वाहनांची दुरूस्ती करुन टाटा अधिकृत वितरक- उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार ₹.७,१४,५३३/- (अक्षरी-सात लक्ष चौदा हजार पाचशे त्रेपन्न रूपये) मात्र टाटा अधिकृत वितरक- उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. यांना अदा करणेस व देयक अदायगी नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ अनुसूची ड नुसार ५ (२) (२) नुसार मे.स्थायी समिती कडेस कार्योत्तर मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियमकलम ६७ (३) (क) व प्रकरण २ अनुसूची ड ५(२) (२)तरतुदनुसार सदर एकुण वाहनांचा खर्च रक्कम ₹.७,१४,५३३/- (अक्षरी-सात लक्ष बत्तीस हजार एकशे एकोणावीस रूपये) मात्रला खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. सदरचा खर्च संबंधित वॉटरग्रेस संस्था,नाशिक यांच्याकडून वसूल करणेबाबत कार्यवाही प्रशासनाने करावी. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-७३ श्री.दिपेश दामोदर पटेल, रा.धुळे यांनी धुळे मनपाच्या आर्किटेक्ट पॅनलवर नियुक्ती मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन या विषयात संबंधीत माणसाने लेटर दिले आहे म्हणून आपण नियुक्ती करत आहोत. यात काही नियुक्तीची प्रक्रीया राबवली होती का? याबाबत खुलासा करावा.

म.सहा. अभियंता — श्री दिपेश दामोदर पटेल यांना संबंधीत कामाचा अनुभव आहे त्यांनी मनपाच्या आर्कीटेक्ट पॅनेलवर नियुक्ती मिळणे बाबत पत्र सादर केले आहे. त्यानुसार टिपणी मंजूर करुन हा विषय स्थायी समितीपुढे आला आहे.

म.हर्षकुमार रेलन — कोणही त्रयस्थ व्यक्तीने मनपाला पत्र देऊन टाकले हा हा रस्ता मी बनवतो आपण त्याला बनवण्यासाठी देतो का? यात काही प्रक्रीया राबवली का? संबंधीत व्यकती कोण आहे?

म.नगरसचिव — शासनाने दर ठरवून दिलेले आहेत. तसेच शासनाने आर्कीटेक्टला टप्पे आणि रेट हे सगळे ठरवून दिले आहे. त्या रेटच्या बाहेर आपण त्यांना पैसे देऊ शकत नाही.

म. हर्षकुमार रेलन — कोणत्या प्रक्रीयेत त्यांना नियुक्त करीत आहोत? याच्यापेक्षा अधिक कोणी अनुभवी असेल हे पाहिजे का? आम्हाला मान्यता द्यायची आहे आणि आम्हालाच काही याबाबत माहिती नाही.

म.सभापती — त्यांनी यापूर्वी केलेल्या कामाचा खुलासा करावा.

म.नगरसचिव — सन्मा. सदस्य श्री राजेश पवार यांच्या प्रभागात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक त्यांनी डिझाईन बनवून सादर केले होते. परंतु ते अर्कीटेक्ट पॅनेल वर नसल्यामुळे त्यांना काम देऊ शकत नाही. त्यामुळे त्यांनी रितसर अर्ज सादर करुन नियुक्तीसाठी सादर केले आहे. शासन नियमाप्रमाणे रेटही सादर केले आहे.

म.हर्षकुमार रेलन — आपल्याला पुष्कळ कामे शहरात करायची आहे. कोणीही त्रयस्थ व्यक्ती येईल आणि मागणी करेल स्थायी समिती समोर विषय आणतांना माहिती द्यावी.

म.सहा. अभियंता — यापूर्वीही असे विषय आलेले आहे स्थायी समितीत आपण त्याला मंजूरी दिली आहे.

म.हर्षकुमार रेलन — प्रक्रीयेनुसार वर्तमान पत्रात जाहिरात द्यावी. दुसऱ्याही लोकांना येऊ द्या. शहरात चांगले कामे तर करायचे आहेत.

म.सुनिल बैसाणे — सभापती मोदया, सन्मा. सदस्य हर्षभैय्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्या प्रश्नांचा खुलासा प्रशासनाने केलेला नाही. महापुरषंचा आपल्या आस्थेचा विषय असतो. आपल्या सद् सद् विवेक बुध्दीचा विचार केला पाहिजे. विषय मंजूर किंवा नामंजूर करणे हे सभागृहाच्या संख्येवर व सभापतीच्या निर्णयावर असते. या प्रश्नाचा अभ्यास करुन स्थायीपुढे विषय आला पाहिजे होता. हा प्रश्न विकासाचा असल्यामुळे आपण प्रशासनाच्या खुलाशानुसार सभापर्तीनी विचार करुन निर्णय घेण्यात यावा.

म.हर्षकुमार रेलन — महापुरुषांच्या नावाखाली चुकीचा निर्णय घेऊ नका. याची प्रक्रीया राबवावी. या विषयाला माझा विरोध आहे.

म.नरेश चौधरी — सदरचा विषय मंजूर करावा.

म.दगडू बागुल — विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती — सन्मा. सदस्यांच्या मागणीनुसार शहरात महापुरषांच्या संबंधीत असल्यामुळे मंजूर करणे गरजेचे आहे. यापुढे याची दक्षता घेण्यात येईल. सन्मा. सदस्य हर्षकुमार रेलन यांचा विरोध नोंदवून मान्यता देणेत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७६ दिनांक २५/०५/२०२३

श्री.दिपेश दामोदर पटेल, रा.धुळे यांनी धुळे मनपाच्या आर्किटेक्ट पॅनलवर नियुक्ती मिळणे बाबत पत्र सादर केलेले आहे. त्यानुसार त्यांना जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./२७

दि.१७/०४/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात दरा बाबत माहिती मागणी केली असता श्री.दिपेश दामोदर पटेल यांनी दि.२६/०४/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात पुढील प्रमाणे दर सादर केलेले आहे.

अ.क्र.	प्रकल्पाच्या /कामाच्या प्रगतीचा टप्पा	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापना सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात)	
	मा . आ यु	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अं तर्गत प्रकल्पांसाठी	इतर सर्व कामांसाठी
१	प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर यां	०.७५% (डीपीआर ०.५०% + प्र.मा.-०.२५%)	०.५० (डीपीआर ०.३३% + प्र.मा.-०.१७%)
२	प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर	०.२५%	०.१६
३	प्रकल्पाचे २५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.४०%	०.२७
४	प्रकल्पाचे ५० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.४०%	०.२७
५	प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.६०%	०.४०
६	प्रकल्पाचे १०० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.६०%	०.४०
	अ **एकूण**	**३.००%**	**२.००%**

र्जदार यांनी सादर केलेले दरपत्रक तपासले असता शासन निर्णय- सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्याच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सूचना दि.०४जून,२०१८ च्या शासन निर्णयातील दरानुसार बरोबर असल्याचे अंती दिसून येत आहे.

अर्जदार श्री.दिपेश पटेल यांनी सादर केलेले दर हे शासन निर्णय दि. ०४ जून, २०१८ नुसार बरोबर असल्याने श्री.पटेल यांना आर्किटेक्ट पॅनलवर नेमणूक करणे कामी मे.स्थायी समिती समोर सादर करण्यास मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून अर्जदार श्री.दिपेश पटेल यांना आर्किटेक्ट पॅनलवर शासन निर्णयातील दरानुसार नेमणूक करणेस मान्यता देण्यांत येत आहे. **तसेच श्री.पटेल यांना शहर सौदर्यीकरण प्रस्तावाबाबतच नियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे. सदरच्या प्रस्तावास श्री.हर्षकुमार रेलन यांनी विरोध नोंदविलेला असून त्यांचा विरोध नोंदविण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.**

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- श्री. दगडू भिमा बागूल

बहुमताने मंजुर,
सही/-x x x
सभापती,

स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ७४ शासन निर्णयानुसार धुळे शहरातील बायोमायनिंग (Legacy Waste remediation) प्रकल्प राबविण्या साठी ई- निविदा मागविण्यात आली. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे या विषयाबाबत सविस्तर माहिती द्यावी.

म.सहा. अभियंता दि.१०/८/२०२२ रोजीचा शासन निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने एकूण २८ शहरांना बायोमाईनिंग प्रकियेसाठी (Legacy Waste remediation) प्रशासकीय मंजूरी दिली आहे. त्यात धुळे शहराचा समावेश आहे. एकूण ७५ हजार ६५० क्यु. मीटर परीणामाकरीता ३.२२ कोटी मात्र शासनाने मंजूर केले होते. त्यात केंद्र शासनाचा हिस्सा १.०६ कोटी व राज्य शासनाचा हिस्सा १.१९ कोटी व मनपा हिस्सा ०.९७ कोटी आहे. या प्रस्तावास आपण महाराष्ट्र जिवन प्राधिकरणकडून तांत्रीक मान्यता मिळवली आहे. . तसेच महासभेचा ठराव पण मंजूर घेतला आहे. त्यानुसार ई-निवीदा काढून ३ निविदा धारकांनी त्यात सहभाग घेतला होता. त्यात L१ निविदा दर १६.२०% ने कमीने आहे. त्याची नियमाप्रमाणे ४० लक्ष १२ हजार ४७६ मात्रची अतिरिक्त सुरक्षा रक्कम बँक गॅरंटीच्या स्वरुपात कार्यालयात जमा केली आहे. आणि सदरचा विषय स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर केला आहे. वरखेडी रोड येथे जे बायोमाईनिंग प्रकल्प आहे तेथे मोजमाप केले होते. त्यात १ लाख ८० हजार क्यु.मिटर कचरा आपल्याला आढळून आला होता. याआधी ८९ हजार क्यु. .मिटर कचऱ्याचे बायोमाईनिंग मंजूर केले होते. त्याचा ठेका १०% बिलो ने दिला होता. तो २०% आहे त्याचे काम सुरु आहे. आता ७५ हजार क्यु. मिटर क्वाँटिंटीला शासनाने मंजूर केली आहे. आत जवळ जवळ ७० हजार क्यु. मी. क्वाँटिंटी शिल्लक आहे. त्याची ही शासनाकडे मागणी करावी लागेल. या कचऱ्यामध्ये आपल्याला ५० ते ६० वर्षापूर्वीचा कचरा आहे त्याला बायोकल्चर केमिकल शिंपडून त्याची व्हॅल्युम करुन कमी करतो. बायोकल्चर केमिकलमध्ये बॅक्टेरिया असतात ते त्याचे विघटन करतात. त्यात मोठे ढिग करतो त्याचे चाळणी द्वारे गाळूणी करुन त्यात माती, प्लास्टीक, दगड हे बाजूला करुन त्याची विल्हेवाट लावतो.

म.सुनिल बैसाणे याआधी यावर खर्च झाला आहे का?

म.सहा. अभियंता ८९ हजार क्यु. मी. बायोमाईनिंग केले त्यावर जवळ जवळ ८०% खर्च झाला आहे. २०% खर्च बाकी आहे. मोजणीनुसार १ लाख ८० हजार क्यु.मी. क्वांटीटी होती पहिल्या फेजमध्ये ८९ हजार क्यु.मी. त्यांनी मंजूर केली आता ७५ हजार क्यु. मी. चे बायोमाईनिंग करायचे बाकी आहे.

म.सुनिल बैसाणे पहिल्या फेजमध्ये जे काम झाले त्यात काय काय केले? त्या कामाचे मनपाला काय फायदा झाला आहे?

म.सहा. अभियंता पहिल्या कामात जवळ जवळ ७ एकर होती जवळ जवळ ४.५ एकर जागा मोकळी झाली आहे. उरलेल्या जागेत प्लास्टीक आहे ते रिसायकल साठी जाईल व बाकी लॅन्ड मोकळी होईल.

म.सुनिल बैसाणे सभापती महोदया, विषय मंजूर करत असतांना त्याचे सादरीकरण होणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी काम चालू आहे. त्या ठिकाणी पाहणी करणे गरजेचे आहे. या सर्व योजनांचा स्वच्छ

भारत अभियाना मध्ये मानांकनासाठी ही ते आवश्यक आहे. हे काम करत असतांना शासनाच्या पैशाचा विनियोग चांगल्या रितीने झाला पाहिजे. फक्त कागदावर किंवा विषय अजेंडयावर घेऊन हे विषय संपणार नाही. धुळेकर जनतेच्या ६ लाख लोकांच्या जिवनाशी निगडीत हा प्रश्न आहे. या विषयाचे पहिल्या फेजचे व दुसऱ्या फेजचे सादरीकरण व्हायला पाहिजे. आणि अनुदानाचे विनियोग योग्य पध्दतीने होतो किंवा नाही ही तपासणी करण्यात यावी. अशी विनंती करतो.

म. हर्षकुमार रेलन — या विषयाला विरोध करायचे कारण नाही. चांगले काम होत आहे. चांगल्या कामाला आमचा नेहमी पाठींबा राहणार आहे. या विषयाला मंजूरी द्यावी.

म. सभापती — सन्मा.सदस्यांचे सूचनांचे पालन करुन सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्ताव मंजुरी देण्यांत येत आहे. सदर प्रकल्पाबाबत झालेल्या व होणा-या कार्यवाहीचे सादरीकरण स्थायी समिती समोर करण्यांत यावे तसेच सदर प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या अनुदानाचा विनियोग योग्य रितीने होईल याबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७७ दिनांक २५/०५/२०२३

शासन निर्णयानुसार धुळे शहरातील बायोमायनिंग (Legacy Waste remediation) प्रकल्प राबविण्यासाठी धुळे शहरासाठी एकूण 75,650 Cum परिमाणाकरीता रक्कम रु.3.22 कोटी मात्र रक्कमेस प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.त्यात केंद्र शासन हिस्सा रक्कम रु.1.06 कोटी,राज्य शासन हिस्सा रक्कम रु.1.19 कोटी व मनपा हिस्सा 0.97 कोटी मात्र मनपास अदा करावा लागणार आहे. धुळे शहरातील बायोमायनिंग (Legacy Waste remediation) प्रकल्प राबविणेस व त्याबाबतचा मनपा हिस्सा भरणेस तसेच उक्त बाबत सुधारीत अर्थसंकल्पात आवश्यक त्या रकमेची तरतुद करण्यांस मान्यता देण्यात आली आहे. तसेच मा. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ जळगांव यांनी दि. 25/11/2022 रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

उक्त वरील मंजुरी प्रमाणे इकडील कार्यालयामार्फत सदर कामाची ई- निविदा सुचना क्र.158 – 2022-23 अंतर्गत ई- निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेत एकुण03 निविदा धारकांनी सहभाग घेतला होता त्यानुसार मंजुरीप्रमाणे सदर निविदा धारकांचे दर उघडण्यात आले असून दर खालील प्रमाणे.

अ.क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर	शेरा
1	Samarth Softech Solutions Pvt. Ltd.	L१ – 16.20 % कमीने	L१
2	Shivprasad Shamrao Bandal	L२ – 14.99 % कमीने	
3	E. B. Enviro Biotech Pvt. Limited	L३ – 12.00 % कमीने	

उक्त प्रमाणे L१, Samarth Softech Solutions Pvt. Ltd. यांचे 16.20 % यांचे सर्वात कमी दराने निविदा सादर केली आहे. तसेच L१ यांनी नियमाप्रमाणे रक्कम रु. 40,12,476/- मात्रची पंजाब नॅशनल बँक, मुंबई यांची अतिरिक्त सुरक्ष रक्कम बँक गॅरंटीच्या स्वरुपात इकडील कार्यालयात जमा केलेली आहे. तरी सदर कामाची दर मंजुरी चे अधिकार मे.स्थायी समितीला असल्याने सदरचा विषय मे.स्थायी सामिती पुढे दर मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व केलेल्या सुचनांचा विचार करुन तसेच कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी Samarth Softech Solutions Pvt. Ltd. यांचे 16.20 % यांचे सर्वात कमी दराने आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रकल्पाबाबत झालेल्या व होणाऱ्या कार्यवाहीचे सादरीकरण स्थायी समिती समोर करण्यांत यावे तसेच सदर प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या अनुदानाचा विनियोग योग्य रितीने होईल याबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील

सुचक :- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री.हर्षकुमार राध्येश्याम रेलन

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १३ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २५/०५/२०२३
वेळ :-दुपारी १२-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१३ आज गुरुवार **दिनांक २५/०५/२०२३ रोजी दुपारी १२-०० वाजतां सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
१२	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. देविदास टेकाळे	आयुक्त
२	श्री. नितीन कापडणीस	अति.आयुक्त
३	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त तथा कर निर्धारण अधिकारी
४	श्री. व्ही. आर. सनेर	उपायुक्त
५	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
६	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी

७	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
८	श्री. के. एन. शिंदे	अभियंता
९	श्री. राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. चंद्रकांत मोरे	प्र लेखापाल
११	श्री. के. बी. सांबळे	आस्थापना विभाग
१२	श्री. पी.डी. चव्हाण	सहाय्यक अभियंता
१३	श्री. किशोर सुडके	परवाना विभाग तथा बाजार अधिक्षक
१४	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१५	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१६	श्री.एन.के.बागुल	विदयुत अभियंता
१७	श्री. शिरीष जाधव	कर अधिक्षक
१८	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी , मनपा शिक्षण मंडळ
१९	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२०	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२१	श्री. आर.पी. पाटकरी	वृक्ष प्राधिकरण विभाग

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

विषय क्रमांक :- ७५ जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये आयकर भवन पासून ते दत्तमंदिर पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे बाबतच्या आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे सदर भाग प्रभाग क्रं. १४ मध्ये येतो.सदर विषयात प्रभाग क्रं. १७ नमूद आहे तरी प्रभाग क्रं. १४ अशी दुरुस्ती करण्यांत यावी. विषय मंजुर करण्यांत यावा.

म.कल्याणीताई अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्ताव मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७८ दिनांक २५/०५/२०२३

जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये आयकर भवन पासून ते दत्तमंदिर पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१५/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**८३,९०,५७८/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /७६७/२० दि. ०८/०२/२०२३ अन्वये रक्कम रु. **८३,९०,५७८/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/०१/२० अन्वये दि.०६/०४/२०२३ रोजी दैनिक **लोकमत/आपल नवराज्य** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन

दि.२५/०४/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.गणेश बोरसे	शे.३.००% जास्त	
२	श्री.प्रकाश पांडव	शे.२.००% जास्त	
३	श्री.वृषभ सतिष खिवसरा	शे.२.००% जास्त	
४	श्री.कुणाल जयकर पवार	शे.२.००% जास्त	
५	मे.हिंद कन्सट्रक्शन	शे.-३.२२% कमी	
६	मे.एकविरा कन्सट्रक्शन	शे.३.००% जास्त	
७	मे.गायत्री कन्सट्रक्शन	**शे.-४.१५% कमी**	**सर्वात जास्त दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **८०,४२,३६९/-** इतक्या रक्कमेचे असून **शे.-४.१५% कमी** दराने आहे.सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-४.१५% कमी** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.-४.१५% कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. गायत्री कन्सट्रक्शन** यांची **शे.-४.१५% कमी** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर व शासन निर्णयानुसार सुरक्षा अनामत रकमेचा D.D. जमा करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्य सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांची **शे.-४.१५% कमी** दराने आलेले निविदादरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्रीमती कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७६ जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये १०० फुटी रस्त्यापासून ते जैन संस्थान ते कोयल यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे व गटार करणे बाबतच्या आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कल्याणीताई अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्ताव मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७९ दिनांक २५/०५/२०२३

जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये १०० फुटी रस्त्यापासून ते जैन संस्थान ते कोयल यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे व गटार करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१५/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**६४,४४,९८२/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /७६८/२० दि. ०८/०२/२०२३ अन्वये रक्कम रु. **६४,४४,९८२/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/०१/२० अन्वये दि.०६/०४/२०२३ रोजी दैनिक **लोकमत/आपल नवराज्य** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२५/०४/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.गणेश बोरसे	शे.३.००% जास्त	
२	श्री.प्रकाश पांडव	शे.२.००% जास्त	
३	श्री.वृषभ सतिष खिवसरा	शे.२.००% जास्त	
४	श्री.कुणाल जयकर पवार	शे.२.००% जास्त	
५	मे.हिंद कन्सट्रक्शन	शे.-३.२२% कमी	
६	मे.एकविरा कन्सट्रक्शन	शे.३.००% जास्त	
७	मे.गायत्री कन्सट्रक्शन	**शे.-४.१५% कमी**	**सर्वात जास्त दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **६१,७७,५१६/-** इतक्या रक्कमेचे असून **शे.-४.१५% कमी** दराने आहे.सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-४.१५% कमी** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.-४.१५% कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली

आहे. सबब कंत्राटदार **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांची **शे.-४.१५% कमी** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर व शासन निर्णयानुसार सुरक्षा अनामत रकमेचा D.D. जमा करणे बाबत मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्य सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे. गायत्री कन्सट्रक्शन** यांची **शे.-४.१५% कमी** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १४ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक ०१/०६/२०२३
वेळ :-सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१४ आज गुरुवार **दिनांक ०१/०६/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
१२	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१३	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. देविदास टेकाळे	आयुक्त
२	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
३	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
४	डॉ. एम.आर. शेख	प्र. आरोग्याधिकारी
५	श्री. राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी

६	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
७	श्री. सुनिल कुमार सुर्यवंशी	उपमुख्य लेखा परीक्षक
८	श्री.कमलेश सोनवणे	ओव्हरसिअर नगररचना विभाग
९	श्री. चंद्रकांत मोरे	प्र लेखापाल
१०	श्री. संजय मोरे	कार्यालय अधिक्षक आस्थापना
११	श्री. पी.डी. चव्हाण	सहाय्यक अभियंता
१२	श्री. सी.एम. उगले	सहाय्यक अभियंता
१३	श्री. किशोर सुडके	परवाना विभाग तथा बाजार अधिक्षक
१४	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१५	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१६	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्या अधिक्षक
१७	श्री.पराग ठाकरे	कनिष्ठ अभियंता विद्युत विभाग
१८	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी , मनपा शिक्षण मंडळ
१९	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२०	श्री. आर.पी. पाटकरी	वृक्ष प्राधिकरण विभाग
२१	श्री.आंजवेकर	औषध भांडारपाल

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

सभेच्या सुरुवातीस दिनांक १जून या तारखेनुसार आज मा. आयुक्त सो. तसेच सन्मा.सदस्य श्री. नरेंद्र रुपला चौधरी व श्री. रंगनाथ रतन ठाकरे यांचा वाढ दिवस असल्याने सन्मा. सभागृहाच्या वतीने या सर्वांचे बुके देऊन अभिनंदन करण्यांत येवून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यांत आले.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज.

सन्मा.सदस्य श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८० दिनांक ०१/०६/२०२३

सन्मा. सदस्य श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेला जाहीर निषेधाचा प्रस्ताव

म.नगरसचिव सन्मा. सदस्यांच्या पत्रानुसार दिनांक २७/०५/२०२३ रोजी अल्हासनगर येथे राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एका कार्यक्रमात बोलतांना सिंधी समाजाबद्दल अपशब्द वापरले. राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या वतीने उल्हासनगर कॅम्प -५ प्रभातगार्डन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते या कार्यक्रमासाठी पुर्व गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड व माजी आमदार आनंद परांजपे मुख्य अतिथी होते. कार्यक्रमात भाषण करतांना एका व्यक्तीबद्दल निशाणा साधतांना काही म्हणी सांगत असतांना आव्हाडांची जीभ घसरली व त्यांनी समाजाच्या अपमानास्पद शब्दाचा वापर केला अशा विधानाने सर्व सिंधी समाजात संताप पसरला आहे. अशा प्रकारे संपूर्ण सिंधी समाजाचा अपमान करत आहे. असा अपमान सिंधी समाज सहन करू शकत नाही. सिंधी समाजाचा भावना दुखावल्या गेल्या आहेत. अशा प्रकारे अपशब्द उदगारल्याबद्दल व सिंधी समाजाचा अपमान केल्याबद्दल आज रोजीच्या स्थायी समिती सभेत जितेंद्र आव्हाड यांचा जाहिर निषेध करण्यात येवून तसा ठराव पारीत करण्यात यावा हि विनंती.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार निषेधाचा ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८१ दिनांक ०१/०६/२०२३

सन्मा. सदस्यांच्या पत्रानुसार दिनांक २७/०५/२०२३ रोजी अल्हासनगर येथे राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एका कार्यक्रमात बोलतांना सिंधी समाजाबद्दल अपशब्द वापरले. राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या वतीने उल्हासनगर कॅम्प -५ प्रभातगार्डन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते या कार्यक्रमासाठी पुर्व गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड व माजी आमदार आनंद परांजपे मुख्य अतिथी होते. कार्यक्रमात भाषण करतांना एका व्यक्तीबद्दल निशाणा साधतांना काही म्हणी सांगत असतांना आव्हाडांची जीभ घसरली व त्यांनी समाजाच्या अपमानास्पद शब्दाचा वापर केला अशा विधानाने सर्व सिंधी समाजात संताप पसरला आहे. अशा प्रकारे संपूर्ण सिंधी समाजाचा अपमान करत आहे. असा अपमान सिंधी समाज सहन करू शकत नाही. सिंधी समाजाचा भावना दुखावल्या गेल्या आहेत. अशा प्रकारे अपशब्द उदगारल्याबद्दल व सिंधी समाजाचा अपमान केल्याबद्दल आज रोजीच्या स्थायी समिती सभेत जितेंद्र आव्हाड यांचा जाहिर निषेधाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन

सर्वानुमते मंजुर,

सही/-X X X

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-७७ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं.१० दि. २७/०४/२०२३)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८२ दिनांक ०१/०६/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं. १० दिनांक २७/०४/२०२३ च्या सभेतील ठराव नंबर ५९ ते ६२ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-७८ सन २०२३-२४ या वर्षाकरीता धुळे मनपा आरोग्य विभागाकडील ११ ॲलोपॅथी दवाखाने,३ सुतिकागृह,१ कुटूंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्य केंद्रासाठी लागणारी ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी अंदाजित खर्च रू.६३,८६,५६९/- मात्रला आर्थिक प्रशासकीय मान्यतेसाठी व स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळणेसाठी ई-निविदा प्रसिध्द करणेस आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. नरेद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच जी औषधे खरेदी करण्यांत येणार आहे त्याची यादी सन्मा. सदस्यांना उपलब्ध करुन द्यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८३ दिनांक ०१/०६/२०२३

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील ११ ॲलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह व १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्र (एकुण १६ दवाखाने)साठी सन २०२३-२४ या वर्षासाठी लागणारी औषध भांडार विभागातुन पुरवठा होणेबाबत संबधीत दवाखान्यांचे वैद्यकिय अधिकारी यांनी मा. आरोग्य अधिकारी यांचे मार्फत भांडार विभागात रिपोर्ट सादर केला आहे.. सदर औषधांची यादी शासन निर्णयाप्रमाने Generic आहे.

भारत सरकारचे औषध मंत्रालयाने दि.३०/०३/२०२२ पासुन ८७२ औषधांचे निर्धारीत केलेले दर (DPCO) यादी जोडली आहे. DPCO वर उपलब्ध नसलेली औषधांचे धुळे मनपाने शेवटचे खरेदी दरांप्रमाणे सर्व ॲलोपॅथी दवाखान्यांचे मागणी रिपोर्ट प्रमाणे ९९ प्रकारचे औषध

खरेदीसाठी एकुण खर्च रु.१,०२,१६,०१३/- मात्र येणार आहे. सध्यस्थीतीत एकही शासकीय दरकरार अस्तीत्वात नाही. तांत्रीक मान्यता जोडली आहे.

सन २०२३-२४ या वर्षासाठी औषधाची ई-निविदा तयार करुन वृत्तपत्रात प्रसिध्द केल्यास ई-निविदा प्रणालीव्दारे स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळेल व प्राप्त झालेल्या ई-निविदा दरांप्रमाने तुलनात्मक सर्वात कमी दरांनुसार औषधी खरेदी होतील, तसेच बाबवार गुणवत्ता व दर यानुसार अनुक्रमे उत्कृष्ट व कमी असलेल्या दरांप्रमाणे औषध खरेदी होतील व मनपाचा आर्थीक फायदा होउन रुग्णांसाठी चांगल्या प्रतिची औषधी उपलब्ध होतील. गुणवत्तेबाबत शंका राहु नये यासाठी पुरवठा केलेल्या औषधाचे ॲनालिसीस टेस्ट रिपोर्ट सादर करण्याबाबत पुरवठादारास बंधणकारक राहील.

शासनाकडून राष्ट्रीय आरोग्य अभीयान (NUHM)अंर्तगत सदर औषधी पुरवठा होण्याची शक्यता विचारात घेऊन रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव दरांना मंजुरी घेऊन कार्यादेश आवशक्तेनुसार विभागुन देण्याची दक्षता घेण्यात येईल.सन २०२३-२४ या वर्षात जर शासनाकडून मागणी प्रमाणे औषधांचा पुरवठा झाला नाही तर रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव ई-निविदा प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या तुलनात्मक कमी दरांप्रमाने आवश्यक औषध खरेदी करने सोयीचे होणार आहे. यासाठी आर्थीक व प्रशासकीय मंजुरी व ई-निविदा प्रसीध्द करणेआवश्यक आहे

धुळे मनपा चे ११ ॲलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्य केंद्रासाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी लागणारी ९९ प्रकारचे औषध खरेदीसाठी DPCO दरांप्रमाने तसेच स्थानिक बाजारभावाप्रमाने अंदाजीतखर्च रु.१,०२,१६,०१३/- मात्र येणार आहे.२०२३-२४ या वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात औषध खरेदीसाठी प्रशासनाने सुचवलेले तरतुद एकुण रु.६५,००,०००/-मात्र आहे. त्यापैकी आयुर्वेद पंचकर्म रुग्णालयासाठी लागणारी आर्युवेद औषधी खरेदीसाठी रु.१,१३,४३१/-मात्रचा प्रस्ताव सादर केलेला आहे. ॲलोपॅथी औषध खरेदी साठी रु.६३,८६,५६९/- शिल्लक राहात आहेत.

ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार रु. ६३,८६,५६९/- मात्र खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यास विषय मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०२३-२४ या वर्षाकरीता धुळे मनपा आरोग्य विभागाकडील ११ ॲलोपॅथी दवाखाने,३ सुतिकागृह,१ कुटूंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्य केंद्रासाठी लागणारी ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी अंदाजित खर्च रू.६३,८६,५६९/- मात्रला आर्थिक प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे व स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळणेसाठी ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच जी औषधे खरेदी करण्यांत येणार आहे त्याची यादी सन्मा. सदस्यांना उपलब्ध करुन द्यावी.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. नरेद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-७९ अल्पसंख्यांक क्षेत्रविकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत ४० गाव रोड येथील समस्थ मोमीन कब्रस्थान येथे अंतर्गत काँक्रीट रस्ते, नवीन पोल पथदिवे, हायमास्ट व उर्वरित संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वसीम अन्सारी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. नाजियाबानो पठाण विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८४ दिनांक ०१/०६/२०२३

अल्पसंख्यांक क्षेत्रविकास कार्यक्रम सन 2022-23 अंतर्गत 40 गाव रोड येथील समस्थ मोमीन कब्रस्थान येथे अंतर्गत काँक्रीटरस्ते, नवीन पोल पथदिवे, हायमास्ट व उर्वरित स्नक्षर्ण भिंत बांधणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.15/03/2023 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.49,99,158/-मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./826/2022दि 22/02/23 अन्वये रक्कम रु.49,99,158/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/05/20अन्वये दि. 12/04/2023 अन्वये रोजी दैनिक **सकाळ/मर्डर** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.28/04/2023 पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
1	अे.के.सैफी	शे.1.00 % जास्त	
2	चेतनकुमार भगवान सूर्यवंशी	शे.2.00 % जास्त	
3	खालिद शेख	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **खालिद शेख** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 49,99,158/-इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **खालिद शेख** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **खालिद शेख** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार खालिद शेख यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.अन्सारी वसीम खलील

अनुमोदक :- श्रीमती पठाण नाजियाबानो नासीरखॉ

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-८० धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील १ ते १३ वाहन चालक यांना ६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. नरेद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८५ दिनांक ०१/०६/२०२३

१ ते १३ मानधनावरील वाहन चालक यांना नवीन नियुक्ती देणेबाबत मंजुरी देणेत आलेली होती.

त्यानुसार खालील वाहन चालक यांना ०५ दिवसाचा सेवा खंड देवून ६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेत आलेली होती. तसेच विभाग प्रमुख यांनी खालील १ ते १३ वाहन चालक यांना नवीन नियुक्ती देणे बाबत सादर केलेला आहे.त्यानुसार खालील वाहन चालक यांची मुदत त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या दिनांकास संपुष्ठात येत आहे.

अ क्र	कर्मचारीचे नाव	पद	मानधन रु.	मुदत संपुष्ठात आल्याची दिनांक
१	निलेश रामभाऊ सोनवणे	वाहन चालक	१५५००/-	२१/५/२०२३
२	विजय दिलीप माळी	वाहन चालक	१५५००/-	२१/५/२०२३
३	राहुल जिजाबराव पाटील	वाहन चालक	१५५००/-	२१/५/२०२३
४	विनोद प्रल्हाद थोरात	वाहन चालक	१५५००/-	२१/५/२०२३
५	चित्ते ईश्वर राजेश	वाहन चालक	१५५००/-	२१/५/२०२३
६	अविनाश दाजी कुवर	वाहन चालक	१५५००/-	२१/५/२०२३
७	प्रशांत राजेंद्र बाबर	वाहन चालक	१५५००/-	३१/५/२०२३
८	प्रशांत नामदेव मुर्तडक	वाहन चालक	१५५००/-	३१/५/२०२३

९	शाम भटू खंदरकर	वाहन चालक	१५५००/-	३१/५/२०२३
१०	प्रदिप श्रीकिसन कांबळे	वाहन चालक	१५५००/-	३१/५/२०२३
११	गोपाल सिताराम माळी	वाहन चालक	१५५००/-	३१/५/२०२३
१२	सिध्दार्थ महेशराव खैरनार	वाहन चालक	१५५००/-	३१/५/२०२३
१३	आबासाहेब रमेश नेरकर	वाहन चालक	१५५००/-	३१/५/२०२३

तरी वरील मानधन तत्वावरील वाहन चालक संवर्गातील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता त्यांच्या नावासमोर नमुद एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत खालीलप्रमाणे अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उक्त मानधन तत्वावरील विविध संवर्गातील यांना मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार में. स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील १ ते १३ वाहन चालक यांना ६ महिने मुदतवाढ देण्यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव त्यानुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. नरेद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-८१ जिल्हा स्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत (सन २०२२-२३) देवपूर भागातील धान्य गोडावून पासून बिलाडी रोड पावेतो रस्ता खडीकरण करणे व पाईप मोरी बांधणे कामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबातच्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म. रंगनाथ ठाकरे विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८६ दिनांक ०१/०६/२०२३

जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत (सन २०२२-२३) देवपूर भागांतील धान्य गोदामपासून ते बिलाडी रोड पावेतो रस्ता खडीकरण करणे व पाईपमोरी बांधणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१५/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **१,६१,५९,५१२/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. /७६९/२०२२ दि.०८/०२/२०२३ अन्वये रक्कम रु. **१,६१,५९,५१२/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/०१/२०२३ अन्वये दि.०६/०४/२०२३ अन्वये रोजी दैनिक **लोकमत/आपलं नवराज्य** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२५/०४/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१)	हिंद कन्स्ट्रक्शन	शे-१७.०० कमीने	**सर्वात कमी दर**
२)	गणेश बोरसे	शे ३.०० जास्तीने	
३)	प्रकाश पांडव	शे २.०० जास्तीने	
४)	प्रवीण चौधरी	शे-१.८६ कमीने	
५)	अभिनय गीते	शे २.०० जास्तीने	
६)	मिलिंद मुडावदकर	अंदाजपत्रकीय दराने	
७)	कुणाल जयकर पवार	शे-१६.८० कमीने	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **हिंद कन्स्ट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **१,३४,१२,३९५/-** इतक्या रक्कमेचे असून **शे-१७.००% कमी** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे-१७.००% कमी** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले. वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **हिंद कन्स्ट्रक्शन** यांचे दर **शे-१७.००% कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **हिंद कन्स्ट्रक्शन** यांची **शे-१७.००% कमी** दराने आलेले निविदा दर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कंत्राटदार हिंद कन्स्ट्रक्शन यांची शे-१७.००% कमी दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राध्येश्याम रेलन

अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-८२ धुळे मनपा हद्दीतील खड्डे बुजविणे तसेच रस्ते क्रॉसींग व ड्रेनेज दुरुस्ती व अनुषांगिक कामे करण्याबाबत वार्षिक निविदा दर मागविण्यात आले त्या बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे प्रशासनाने याबाबत माहिती द्यावी.

म.सहा. अभियंता दि.१४/१०/२०२२रोजी पीएलआय ७१२०१३अवमान याचीका १०/२०१९ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयावर धुळे शहर मनपा हद्दीतील रस्तयांतील खड्डे बुजवण्यावर टिपणी ठेवली होती. स्थायी समिती ठराव क्र. २२२ दि. १०/११/२०२२ रोजी निविदा मागवण्याबाबत ठराव मंजूर झाला होता. मनपा महासभा ठराव १६२ दि. ३१/१०/२०२२ रोजी मा. उच्च् न्यायालय पीआयएल

७१२०१३मध्ये राज्यातील नगरपालिका ,महानगरपालिका हद्दीतील रस्तयांच्या दुरुस्तयांबाबत झालेला होता. त्यानुसार महासभेच्या ठरावानुसार यामध्ये पी.डी चव्हाण प्र. क्र. १ते ५ व ९,१० व त्यांचे मोबाईल नंबर, सीएम उगले प्रभाग क्र. ६,७,१५,१६,१८ व त्यांचा मोबाईल नंबर, एच.पी पावटे त्यांच्याकडील प्रभाग व मोबाईल नंबर दिले होते. या ठरावानुसार टिपणी ठेवली होती. आयटम रेटनुसार निविदा काढण्यात आलेली आहे. यामध्ये प्रशासनाने बजेट तरतूद १ कोटी रुपये केली आहे.

म.हर्षकुमार रेलन — सभापती महोदया, हा विषय हायकोर्टाच्या पीआयएल नुसार आलेला आहे. २५/११/२०२२ रोजी तांत्रीक मान्यता मिळाली आहे. हा विषय जेवहा हायकोर्टात गेला असेल त्यावेळी कदाचित खड्डे असतील ही वर्ष २०२१ ची गोष्ट आहे. जे २०२१ मध्ये खड्डे होते त्या अनुषंगाने पीआयएल दाखल झाली होती. हायकोर्टाचा निकाल लागेपर्यंत यात मोठा कालावधी गेला आहे. आपण रस्तयांची कामे यापूर्वीच करुन टाकली आहे. ते खड्डे आता नाहीत. ते खड्डे अस्तित्वात नसतील तर निविदा काढून फायदा काय? २ वर्षानंतर आपण त्याची निविदा काढतोय त्यावर आपण अनेक रस्ते बनवून टाकले आहे. तसेच आपण चांगले काँक्रीटचे रस्ते बनवत आहोत आमच्या नेत्यांनी फार मोठया रकमा रस्तयांसाठी आणल्या आहे. त्यानंतर पुष्कळ मंजूऱ्या देखील झाल्या आहे. कुमार नगरच्या पुलाच्या रस्तयांवर खड्डे होते मी ८५ लाख मंजूर करुन आणले. आता खड्डे बुजवण्याचे टेंडर देऊन काय फायदा? मग का हा विषय स्थायीपुढे आला? हा विषय रद्द करावा अशी माझी विनंती आहे.

म.सुनिल बैसाणे — खड्डे बुजवण्याचा विषय या ठिकाणी आला आहे. आपले प्रशासन पारदर्शकपणे काम करते हे टिपणीवरुन लक्षात येते. स्थायी समितीच्या दर मंजूरीच्या घेतलेल्या सभेमध्ये किती रकमेला मंजूरी द्यावी हे दिले नाही. किती रक्कम मंजूर करुन घेत आहोत? ही टिपणी तुम्हीच सादर केली आहे. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून देवपूर मध्ये एवढे मोठे विकास कामे तसेच रस्तयांसाठी चालू आहे.आपण किती खड्डे बुजवले याचा खुलासा केला पाहिजे. सदरची टिपणी ही दिशाभूल करणारी आहे. सभापती महोदया याकडे आपण गांभिर्याने पहावे. तांत्रिक मंजूरी होत असतांना निविदा समितीची मंजूरी घेतली होती का? निविदा समितीने या ठिकाणी काय निर्णय घेतला आहे? लेखा विभागाने काय खुलासा केला आहे? याचा खुलासा करावा.

म.सहा.अभियंता — सदरचे इस्टीमेट आयटम रेटनुसार दिले आहे. प्रशासकीय मंजूरी देतांना १ कोटी रुपयाची तरतूद बजेटमध्ये आपण केली आहे. आणि ही वार्षीक निविदा आहे यात खड्डे बुजवण्याचे काम आहे, पाईपचे कामे आहे, चेंबर दुरुस्तीचे कामे आहे. आयटम घेतलेले असल्यामुळे यात रकमेचा उल्लेख

आलेला नाही. यात कनिष्ठ अभियंता, अभियंता, उपायुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक आणि अति. आयुक्त या सर्वांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

म.सुनिल बैसाणे — जर या ठिकाणी लेखा समितीचे प्रमुख म्हणून अति. आयुक्त कापडणीस साहेबांची सही केलेला कागद असेल तर तो मा. आयुक्त सो ना दाखवावा. त्यांची सही टिपणी पाहिजे तसेच तारीख पण द्यावी.

म.सहा. अभियंता — दर मंजूरीच्या कागदावर अति. आयुक्त कापडणीस साहेबांची स्वाक्षरी नाही.

म.सुनिल बैसाणे — हा विषय तुम्ही काल आणलेला नाही. हा विषय ३ दिवस आधी स्थायीसाठी आलेला आहे. दरमंजूरीवर अति. आयुक्तांची सही नसेल हा विषय कायदेशिर आहे का? हा विषय ग्राहय धरावा की नाही धरावा हे सांगा.

म.सहा. अभियंता — सदर विषय कायदेशिर आहे. आपल्याकडे विषय मंजूर करणे तसेच नामंजूर करण्याचा अधिकार आहे.

म.सुनिल बैसाणे — यावर डायरेक्ट साहेबांची सही आहे प्रशासकीय मंजूरीला. म्हणून सदरचा विषय नामंजूर करण्यात यावा. यापुढे पारदर्शक पध्दतीने काय करावे. माझ्या समोर खड्डयांच्या बाबतीत लाखो रुपयांचे बिले दिले गेले आहे. पावसाळा सुरु होत आहे पावसाळयात कोणते कामे करणार आहे?

म.आयुक्त — यामध्ये प्रशासनाच्या प्रत्येक वेळी असा अनुभव येतो की, गणपती उत्सव, आंबेडकर जयंती , शिवजयंती येताता त्यात मग खड्डे भरण्याचा विषय येतो तेव्हा टेंडर मंजूर नसते. यावेळेस प्रशासनाने वर्षभारात जे जे उत्सव ,सण येतील त्यावेळी खड्डे भरणे. यासाठी बजेटमध्ये वर्षभरासाठी १ कोटीची तरतूद केली आहे. त्यासाठी स्के. मी. वर रेट मागवले आहे. यामध्ये पुन्हा निविदा काढण्याची गरज नाही. तसेच पाहणी करणे जीओ टॅगचे फोटे काढणे, रेकॉर्ड करणे असे अनुषांगिक कामे राहतील.मागच्या वेळची अडचण व यापूर्वीचे अनुभव लक्षात घेता कायस्वरुपी उपाय केलेले आहे. सर्व कायदेशिर बाबी यात झाल्या आहे. आता अॅग्रीमेंट तसे करता येतील अटी शर्ती त्यात टाकता येईल. जिथे नविन कामे मंजूर झाले नाही आणि आवश्यक ठिकाणी ते आपण करणार आहोत. तसेच त्याची माहिती स्थायी समितीला वेळोवेळी देऊ.

म.सुनिल बैसाणे — विषयाबाबत साशंकता आहे. टिपणी स्वयंस्पष्ट नाही.

म.सभापती — या विषयाबाबत माहिती घेऊन प्रथम कामाच्या आवश्यकतेबाबत प्रशासनाकडून चर्चा करण्यात येईल सदस्यांच्या मागणीनुसार हा विषय तहकूब करण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८७ दिनांक ०१/०६/२०२३

धुळे मनपा हद्दीतील खड्डे बुजविणे तसेच रस्ते व क्रॉस ड्रेनेज ची दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. २२२ दि.१०/११/२०२२ म. आयुक्त सो., धुळे महानगरपालिका यांच्या कडील दि. २८/१०/२०२२

रोजीच्या टिपणी मंजुरीने उक्त कामाच्या खर्चास ०१ वर्षा साठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४०१/२०-२०२१ दिनांक २५/११/२०२३ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/ १३४ /२०२२-२३ दि.०३/०२/२०२३ अन्वये दि.०४/०२/२०२३ रोजी दैनिक आपला महाराष्ट्र / नवराष्ट्र या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२१/०१/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	गायत्री कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी
२	एकविरा कन्सट्रक्शन	शे.२% जास्तीने	
३	ऋषभ सतिष खिवसरा	शे.३% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे गायत्री कन्सट्रक्शन** यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे गायत्री कन्सट्रक्शन** सदर काम **अंदाजपत्रकीय दराने** आलेले असल्याने यांच्या दरास मान्यते साठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झाला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षांत घेवून सदर या विषयाबाबत माहिती घेऊन प्रथम कामाच्या आवश्यकतेबाबत प्रशासनाशी चर्चा करण्यात येईल तोपावेतो सदस्यांच्या मागणीनुसार प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. हर्षकुमार राध्येश्याम रेलन

सर्वानुमते मंजुर,
सही/-X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १५ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक १५/०६/२०२३
वेळ :-सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१५ आज गुरुवार **दिनांक १५/०६/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
३	श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य
९	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
१२	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१३	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. विजय रघुनाथ सनेर	अति. आयुक्त
२	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री. गजानन पाटील	मुख्यलेखाधिकारी
५	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक

६	श्रीमती पल्लवी शिरसाठ	कर मुल्य निर्धारण अधिकारी
७	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
८	डॉ. एम.आर. शेख	प्र. आरोग्याधिकारी
९	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. प्रकाश सोनवणे	ओव्हरसिअर नगररचना विभाग
११	श्री. चंद्रकांत मोरे	प्र लेखापाल
१२	श्री. सावळे	आस्थापना लिपीक
१३	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१४	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१५	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१६	श्री.गितेश सोनार	कनिष्ठ अभियंता विद्युत विभाग
१७	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी , मनपा शिक्षण मंडळ
१८	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
१९	श्री. भुषण ढवळे	कनिष्ट अभियंता
२०	श्री. निखील टकले	कनिष्ठ अभियंता
२१	श्री. आर.पी. पाटकरी	वृक्ष प्राधिकरण विभाग
२२	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण प्रमुख
२३	श्री. मधुकर निकुंभ	वसुली अधिक्षक

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म.सभापती आज प्रथमच नुकताच पदभार मिळालेले अति.आयुक्त श्री.विजय सनेर आजच्या बैठकीस उपस्थित आहेत. स्थायी समिती मार्फत एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांच्या नावाची शिफारस करण्यांत आलेली होती.आज ते बैठकीच्या निमित्ताने उपस्थित आहेत. त्यांना शुभेच्छा देण्यांत येत असुन त्यांचे सभागृहाच्या वतीने स्वागत करण्यांत येत आहे.

विषय क्रमांक :- ८३ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं.१२ दि. १२ /०५/२०२३

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे मागील स्स्थायी समिती सभा क्रं. ११ मध्ये बायो मेडिकल वेस्ट बाबत ई निविदा पक्रिया राबविणेबाबत सभापती महोदयांनी आदेशित केलेले होते. त्याबाबत तांतडीने कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

म. सभापती संबंधित विभागाने याबाबत पुढील कार्यवाही त्वरीत करावी.

म. हर्षकुमार रेलन सदर इतिवृत्तात सभा क्रं.१२ चूकीने नमूद झालेला आहे.

म. नगरसचिव सदर सभा क्रं. ११ असून याबाबत दुरुस्ती करण्यांत आलेली आहे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८८ दिनांक १५/०६/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं. ११ दिनांक १२/०५/२०२३ च्या सभेतील ठराव नंबर ६३ते ६९ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ८४ मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये **दि.१७/०५/२०२३ ते दि.०६/०६/२०२३** अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे आयुक्तांनी मान्यता दिलेल्या यादीत अ.क्रं. १४ वर नकाणेरोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सुशोभिकरण करणेबाबत मान्यता दिलेली आहे. यापूर्वी मनपा निधी अंतर्गत सदर काम घेण्यांत आलेले होते. त्या कामाव्यतिरिक्त त्याठिकाणी कोणते काम करण्यांत येत आहे याची माहिती मिळणे आवश्यक आहे.

म. सभापती संबंधित अभियंता यांनी सदर अंदाजपत्रकात कोणत्या बाबी प्रस्तावित आहेत याची माहिती सन्मा. सदस्यांना देण्याबाबत कार्यवाही करावी.

मा.आयुक्तांनी त्यांचे अधिकारात मंजुरी दिलेले 5 ते 25 लाखापर्यंतच्या बांधकाम विभागातील विकास कामाची यादी अवलोकन करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८९ दिनांक १५/०६/२०२३

मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये **दि.१७/०५/२०२३ ते**

दि.०६/०६/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

अ. क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	३६	१७/०५/२०२३	आग्रारोडराजू टेलर ते अन्वर बेग यांचे घरापर्यंत व अन्वर बेग यांचे घरापासून तेबिस्मिल्लामिस्तरी यांचे घरापर्यंतपाईप लाईन टाकणे.	९,१९,७३०/-	मनपा निधी (निवन पाईपलाईन त्याक्ने)
२	३९	२४/०५/२०२३	मौजे भोकर ता.जि.धुळे येथे गांव अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे.श्री.विशालसोनार यांचे घरापासून ते श्री.रावसाहेबजाखाणेकर यांचे घरापर्यंत	९,९८,३५०/-	खासदारस्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन२०२२-२३
३	४१(अ)	२६/०५/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत धुळे मनपाच्या शाळा क्र.४ येथील दवाखान्याची (आरोग्यवर्धनी) दुरुस्ती करणे.	१८,६९,२७१/-	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
४	४२	२६/०५/२०२३	धुळे महानगरपालिका हद्दीतील जिल्हा कारागृहातील अधिकारी वसाहतपासून ते गेट पर्यंत संरक्षण भिंत	९,९९,६३८/-	आमदार स्थानिकविकास कार्यक्रम सन २०२२-२३अंतर्गत
५	४३	२६/०५/२०२३	प्र.क्र.०५मध्ये उन्नती नगर भागातील रस्ते डांबरीकरण करणे.	२४,९८,६६३/-	विकासशुल्क निधीअंतर्गत सन २०२२-२३
६	४५	३०/०५/२०२३	प्र.क्र.०४ मध्ये मयुर कॉलनी, जयहिंद कॉलनी भागात रस्ता डांबरीकरण करणे.	१९,८८,३८६/-	महाराष्ट्रसुवर्ण जयंती जिल्हा स्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत
७	४६	३०/०५/२०२३	धुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं.३७७ वडजाई रोड येथील खुल्या जागेस कुंपण भिंत बांधणे व सुशोभिकरण करणे.	९,९९,७७२/-	आमदारस्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३अंतर्गत
८	४७	३०/०५/२०२३	प्र.क्र.१३ मध्ये नाजम शेठ यांच्या सायझिंग पासून ते रहमानमलिकयांच्या घरापावेतो रस्ताकाँक्रीटीकरण करणे.	१९,९२,९१७/-	महाराष्ट्रसुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतसन २०२२-२३
९	४८	३०/०५/२०२३	प्र.क्र.१३ मध्ये फिरदोस नगर भागात अहमद बिल्डर यांच्या घरापासूनतेशाहीद चक्की पर्यंत रस्ता काँक्रीटकरणे.	९,९६,६८८/-	महाराष्ट्रसुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतसन २०२२-२३
१०	४९	३०/०५/२०२३	प्र.क्र.१३मध्ये अन्सार नगर भागात अकिज खाटीक अब्दुल गफ्फार रस्ता गटार व पिण्याचीपाईपलाईन करणे.	१९,९४,९७५/-	महाराष्ट्रसुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतसन २०२२-२३
११	५०	३०/०५/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये सैनिक कॉलनी मध्ये खुल्या जागेपासून ते दाजीबाबानखेडेयांचे घरापर्यंत रस्ताडांबरीकरण करणे.	१९,८९,९९२/-	महाराष्ट्रसुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतसन २०२२-२३
१२	५१	३०/०५/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये १०० फुटी रोड ते कादरीया अश्रफिया मस्जिदपर्यंतरस्ता काँक्रीटीकरण करणे.	१९,९३,५४७/-	महाराष्ट्रसुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतसन२०२२-२३
१३	५२	३०/०५/२०२३	प्र.क्र.१२मध्ये मिल्लत नगर पासून गरीब नवाज नगरपर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९०,९४७/-	महाराष्ट्रसुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतसन २०२२-२३
१४	५३	३०/०५/२०२३	धुळेमहानगरपालिका हद्दीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर नकाणे रोडयेथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सुशोभिकरण करणे.	१९,९९,९७५/-	आमदारस्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३अंतर्गत
१५	५४	०६/०६/२०२३	प्र.कर.११ मध्ये संत नरहरी नगर माणिक नगर येथे जावीद भाई यांचे घरापासून ते अत्तर मेडिकलते शब्बीर यांचे घरापर्यंत व हाफिज सलीम ते मासूम पिंजारी यांचे घरापर्यंत कॉंक्रीट गटार करणे.	१९.९९.०९०/-	आमदारस्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३अंतर्गत

१६	५५	०६/०६/२०२३	प्र.कर.३ जमील अन्सारी ते जाकीर वेल्डिंग यांचे घरापावेतो रता कॉंक्रीटकरणे.	९,९१,३२०/-	महाराष्ट्रसुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतसन २०२२-२३

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-८५ धुळे मनपा पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील १ ते ६ व्हॉलमन कर्मचा-यांना ६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे सभापती महोदया, हा पाणी पुरवठयासंबंधी विषय आहे. आणि पाणी अत्यावश्यक सेवेमध्ये येते माझा एक प्रश्न आहे. आपल्याला किती व्हॉल्वमनची आवश्यकता आहे धुळे शहराच्या हद्दवाढीसह ? आणि सध्या किती कर्मचारी काम करत आहे? आस्थापनावर व्हॉल्वमन यांची किती पदे मंजूर आहे? आणि वाढीव पदे असतील तर स्थायी समितीची मंजूरी घेतली आहे का?

म.आस्थापना लिपिक आस्थापनावर आकृतीबंधानुसार व्हॉल्वमन ३८ पदे मंजूर आहे. सद्यस्थितीत कायमचे ३१ कर्मचारी कार्यरत आहे आणि मानधनाचे १७ कर्मचारी कार्यरत आहे.

म.सुनिल बैसाणे कायम कर्मचारी ३१ व मानधनावर १७ असे एकूण ४८ कर्मचारी आहे. ३८ पदे मंजूर आहे तर १० वाढीव पदांसाठी स्थायी समितीची मंजूरी घेतली आहे का? वाढीव पदे कोणाच्या मंजूरी घेतली आहे? हे वाढीव पदे जाहिरात काढून भरले का मा.आयुक्तांच्या आदेशाने भरले? किंवा पाणीपुरवठयाची विनंती वरुन भरले ?

म. आस्थापना लिपिक व्हॉल्वमन पदे १५ ते १६ ते भरले गेले होते. त्यावेळेस रोजंदारी मधले व हद्दवाढ मधले यांचे कायम पदावर समावेशन झाले नव्हते. त्यावेळेस व्हॉल्वमनची पदे रिक्त होते. तेव्हा ही पदे मानधनावर भरले. समावेशन करायचे होते तर हे वाढीव पदे भरायला नको होते. त्यावेळच्या प्रशासनाने शासनाची मान्यता घेऊन समावेशन केले आहे.

म.सुनिल बैसाणे सर्वांत चांगले काम हे व्हॉल्वमन यांचे आहे. त्यांच्यामुळे धुळेकर नागरिकांना पाणी मिळत आहे. जर आस्थापनावर पदे भरतांना या पदांना मंजूरी घेणे क्रमप्राप्त आहे किंवा नाही आम्ही मुदतवाढ कुठल्या आधारावर द्यायची तुम्ही परवानगी घेतली नसेल परवानगीला मंजूरी दिली नसेल आणि स्थायी समितीपुढे मुदतवाढ घेत आहेत उद्या शासनाने सांगितले किंवा

ऑडिटमध्ये निघाले तर या मानधनावर कर्मचाऱ्यांचे दायीत्व कोणी करायचे? या पदांना कायदेशिर मंजूरी नाही कायदेशिर निविदा नाही. मुदतवाढ कुठल्या आधारावर द्यायची याचा खुलासा करा?

म.अति. आयुक्त — आपला मुद्दा लक्षात आला आहे. याबाबतीत यापूर्वीही चर्चा झाली आहे. मी आस्थापना प्रमुखांना सूचना पण दिल्या आहे.

म.सुनिल बैसाणे — याचे सर्व दायीत्व तुमच्यावर येऊ शकते. याबाबत विचार करावा.

म. दगडू बागुल — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. रंगनाथ ठाकरे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर मानधनावरील १ ते ६ व्हॉलमन कर्मचा-यांना ६ महिने मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९० दिनांक १५/०६/२०२३

मे स्थायी समिती ठराव क्र २२४ दि १०/११/२०२२ अन्वयेच्या ठरावानुसार पाणीपुरवठा विभागाकडील खालील नमुद १ ते ६ एकत्रित मानधनावरील व्हॉलमन, पंप ऑपरेटर यांना पुढील ६ महिने करीता नविन नियुक्ती देणेबाबत सदर ठरावानुसार मंजुरी देण्यात आली होती.

जा क्र /धुमपा/ आस्था /१११३ दि २८/११/२०२२ च्या आदेशानुसार १ ते ६ व्हॉलमन, पंप ऑपरेटर यांना एकत्रित मानधनावर पुढील ६ महिनेकरीता नविन नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांची दि ५/६/२०२३ रोजी मुदत संपुष्ठात येत आहे.

१ ते ६ व्हॉलमन, पंप ऑपरेटर यांना नविन ६ महिनेकरीता नियुक्ती देणेबाबत कनिष्ठ अभियंता, पा. पु. विभाग यांचेकडील दि २१/३/२०२३ रोजीचा अहवाल.अन्वये खालील १ ते ६ एकत्रित मानधनावरील व्हॉलमन,पंप ऑपरेटर यांनी पुनश्च ६ महिने करीता नविन नियुक्ती मिळणेबाबत कनिष्ठ अभियंता यांनी अहवाल सादर केलेला आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	एकत्रित मानधन दरमहा	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक
१	श्री. आकाश कैलास बोरसे	रु. १४०००/-	५/६/२०२३
२	श्री. जमील पठाण	रु. १४०००/	५/६/२०२३

३	श्री. शशीकांत सदाशिव घोरपडे	रु. १४०००/	५/६/२०२३
४	श्री. पवार तुषार वसंत	रु. १४०००/	५/६/२०२३
५	श्री. वराडे विक्रांत जगदीश	रु. १४०००/	५/६/२०२३
६	श्री. शेळके कुणाल चंद्रकांत	रु. १४०००/	५/६/२०२३

तरी पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील व्हॉलमन कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता त्यांच्या नावासमोर नमुद एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उक्त पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील व्हॉलमन कर्मचारी यांना मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार में. स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिके तील मानधनावरील१ते६ व्हॉलमन कर्मचारी यांना ६महिने मुदतवाढ देण्यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागुल

अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-८६ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत धुळे शहरात विविध प्रभागात (१ ते २८ कामे) रस्ते डांबरीकरण करणे, काँक्रीटीकरण करणे, बंदिस्त गटार करणे, पाईपलाईन टाकणे, बैठक व्यवस्था करणे बाबतच्या आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म.विजय जाधव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९१ दिनांक १५/०६/२०२३

महाराष्ट्र सुवर्ण जायंती नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत धुळे शहरात विविध प्रभागात (१ ते २८ कामे) रस्ते डांबरीकरण करणे, काँक्रीटीकरण करणे, बंदिस्त गटार करणे, पाईपलाईन टाकणे, बैठक व्यवस्था करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२५/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**१०,३९,८२,३८८/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ५००/५५५/ ५५६/ ५५७/ ५५८/५५९/५६०/५६१/५६२/५६३/५६४/५६५/५६७/५७०/५७२/५७३/५८०/५८१/५८३/ ५८४/५८६/५८९/५९१/९१८/९२०/९२१/९३६/९३७/२०२२दि.२६/१२/२०२२ अन्वये रक्कम रु. **१०,३९,८२,३८८/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बांवि/१२/२० अन्वये दि. १७/०४/२०२३ रोजी दैनिक **दिव्य मराठी/श्रमराज** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. २२/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.जय कन्सट्रक्शन	शे.७.००% जास्त	
२	श्री.एन.एम.सोनवणे	शे.-०.००१% (कमी)	
३	डी.आर.पाटील कन्सट्र. प्रा.लि.	शे.१.००% जास्तीने	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.एन.एम.सोनवणे** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **१०,३९,८१,३४९/-** इतक्या रक्कमेचे असून **शे.-०.००१% कमी**

दराने आहे.सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-०.००१% कमी** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.एन.एम.सोनवणे** यांचे दर **शे.-०.००१% कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.एन.एम.सोनवणे** यांची **शे.-०.००१% कमी** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर सादर करणेत आलेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत धुळे शहरात विविध प्रभागात (१ ते २८ कामे) रस्ते डांबरीकरण करणे, काँक्रीटीकरण करणे, बंदिस्त गटार करणे, पाईपलाईन टाकणे, बैठक व्यवस्था करणेकामी कंत्राटदार **श्री.एन.एम.सोनवणे** यांची **शे.-०.००१% कमी** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- श्री. विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १६ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
सोमवार दिनांक १९/०६/२०२३
वेळ :-दुपारी ४-३० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१६ आज सोमवार दिनांक **१९/०६/२०२३ रोजी दुपारी ४-३० वाजतां सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह धरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
४	श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. विजय रघुनाथ सनेर	अति.आयुक्त
२	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री. गजानन पाटील	मुख्यलेखाधिकारी
५	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक

६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
७	श्री. पी.डी. चव्हाण	सहा.अभियंता
८	डॉ. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
९	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री. मोहनीश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१२	श्री. के.डी. साबळे	आस्थापना लिपीक
१३	श्री. राजकुमार सुर्यवंशी	प्र.बाजार विभाग
१४	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१५	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१६	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१७	श्री.गितेश सोनार	कनिष्ठ अभियंता विद्युत विभाग
१८	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी , मनपा शिक्षण मंडळ
१९	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२०	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग प्रमुख
२१	श्री.आर.पी. पाटकरी	वृक्ष प्राधिकरण विभाग
२२	श्री.शिरीष जाधव	मालमत्ता कर अधिक्षक
२३	श्री. रितीक गोयर	परवान विभाग

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

विषय क्रमांक:-८७ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.(सभाक्रं.१२व१३ दि. २५/०५/२०२३)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. नरेंद्र चौधरी मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९२ दिनांक १९/०६/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं. १२ व १३ दिनांक २५/०५/२०२३ च्या सभेतील ठराव नंबर ७० ते ७९ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-८८ कर , पाणीपट्टी कर व चेक स्विकारणेसाठी मनपा नवीन इमारत येथील पार्किंग ठिकाणी स्वतंत्ररूम तयार करणेच्या कामास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे या विषयावर प्रशासनाने खुलासा करावा या विषयावर माझ्या काही शंका आहे हा विषय आणण्याचे प्रयोजन काय?

म.अति. आयुक्त हा विषय ज्या अधिकाऱ्यांनी सादर केला आहे. ते अधिकारी मुंबईला बैठकीला गेले आहे.

म.सुनिल बैसाणे या विषयाशी संबंधीत अधिकारी उपस्थित नाही जो पर्यंत प्रशासकीय अधिकारी समिती समोर येत नाही तो पर्यंत सदरचा विषय तहकूब ठेवावा. याबाबत माझे काही गंभिर प्रश्न आहे त्यात नगररचना विभागाचे अधिनियम आहे,मनपा अधिनियम आहे तसेच फंडाचा विषय आहे, लेखा विभागाचे आक्षेप असतील, नगररचना विभागाचे आक्षेप असतील, आयुक्तांचे आक्षेप असतील त्याचे निरसन झाले पाहिजे. म्हणून तो पर्यंत सदरचा विषय तहकूब ठेवण्यात यावा.

म. किरण अहिरराव विषय तहकूब ठेवावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सुचनेनुसार सदर प्रस्ताव तूर्तास तहकूब ठेवण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९३ दिनांक १९/०६/२०२३

कर ,पाणीपट्टी कर व चेक स्विकारणेसाठी मनपा नवीन इमारत येथील पार्किंग ठिकाणी स्वतंत्र रूम तयार करणेच्या कामाबाबत कार्यालयीन टिपणीत असलेल्या बाबीबाबत सविस्तर माहिती विभागाकडून मिळणे आवश्यक आहे.सदर विषयाच्या संदर्भातील अधिकारी आज बैठकीत उपस्थित नसल्याने व आवश्यक ती माहिती उपलब्ध नसल्याने सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-८९ प्रभाग क्र. ४ मध्ये विविध ठिकाणी बोरिंग दुरुस्ती करणे बाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी हा बोरिंगचा विषय जो आहे तो मी माजी महापौर प्रदीप कर्पे यांच्या महासभेत ते महापौर असतांना मांडला होता. आमच्या प्रभागात ८ ते १० बोअरवेल आहे हॅण्डपंप आहेत. मी त्यावेळी हा विषय

पोटतिडकीने मांडला होता. असे कामे करतांना मागच्या कोणाच्या तक्रारी, प्रश्न उपस्थित केले का? हे पाहिले जात नाही का? २ वर्ष झाले प्रभागातील हॅण्डपंप नादुरुस्त आहे. सन्मा सदस्य रंगनाथ ठाकरे यांनी सुध्दा याबाबत विचार मांडले होते. परंतु त्यावर कुठलीच कार्यवाही आजपर्यंत झाली नाही. अधिकारी लोकांचे हे काम नाही का? आदिवासी वस्तीची पाईपलाईन लिकेज झाली होती. त्या ठिकाणी पाण्याच्या टाक्या सुध्दा नाही. या गंभिर विषयावर दखल घेतली पाहिजे. प्रभागातील सर्व हॅण्डपंप दुरुस्त व्हावे अशी विनंती करतो.

म. रंगनाथ ठाकरे — विषय मंजुर करावा.

म.सभापती — बांधकाम विभागाला आदेशित करते की, सन्मा.सदस्यांनी जे हॅण्डपंप दुरुस्तीचा विषय मांडले आहे.त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीला सादर करावे.सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९४ दिनांक १९/०६/२०२३

धुळे महानगरपालिका ,धुळे प्रभाग क्र. ०४ मधील खालील ठिकाणी प्रभाग क्र. ०४ मधील **१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर law कॉलेज जवळ सिद्धार्थ कॉलनी.२) विष्णू नगर देवपूर, धुळे,३) रमाबाई आंबेडकर चौक डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल जवळ**

सदर ठिकाणीचे बोअरिंग नादुरस्त असल्यामुळे नागरिकांची पाणी टंचाई निर्माण होते.त्यामुळे मा. उपमहापौर श्री नागसेन बोरसे यांनी सदर ठिकाणीचे काम तातडीचे करणे बाबत पत्र दिले आहे.

सदरच्या कामी Complete Opening, Erecting of Pumpset, Rewinding, Rotor Cutting, 3Core Flate Cable बदलणे, Gun Metal Bushing बदलणे,पंप डीफ्युजर बदली करणे,Thrust Bearingबदलणे, इत्यादी कामासाठी अंदाजपत्रकीय **रक्कम रु.२३,७५०/-**मात्र आहे.सदरचे काम शासकीय दरसूची व बाजारभाव दराप्रमाणे योग्य व उचितआहे.सन२०२३-२४च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार **दिवे व साहित्य खरेदी कामासाठी रु. ०१ कोटी मात्र** तरतूद आहे.तरतुदिनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. **२३७५०/-** चे काम करण्यात आले आहे असून सदरचे काम विना निविदा **मे.भारत इलेक्ट्रिक वर्क्स, धुळे** यांच्या कडुन करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७(३) (क)** प्रमाणे कार्यात्तर मंजुरी होण्यास मे. स्थायी समिती पुढे मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी प्रभाग क्र. ४ मध्ये विविध ठिकाणी बोरिंग दुरुस्ती करणेसाठी झालेल्या खर्चास **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७(३) (क)** प्रमाणे कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

तसेच सन्मा.सदस्यांनी जे हॅण्डपंप दुरुस्तीचे विषय मांडले आहे.त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावे.

सुचक :- श्री.नरेंद्र रुपला चौधरी

अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-९० दलीतवस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत धुळे शहरात विविध प्रभागात (१ ते १७ कामे) रस्ते डांबरीकरण करणे, काँक्रीटीकरण करणे, बंदिस्त गटार करणे नागरी कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे सभापती महोदया मी संबंधीत विभागाचे अभिनंदन करेल व माझ्या मनात काही प्रश्न आहे माझ्या माहितीनुसार दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत १ ते ४८ कामे होते अंदाजपत्रकीय खर्चानुसार १३,४६,३६,६५९ रुपयाच्या रकमेचे होते. त्या अंतर्गत प्रशासकीय मान्यता देखील मिळाली होती. त्या अंतर्गत प्रथम एक निविदा प्रकाशित झाली त्या निविदेत सर्व प्रभागातील सुचवलेल्या कामांची निविदा प्रसिध्द झाली. त्यानंतर ही दुसरी क्लब निविदा प्रसिध्द करण्यात आली. यामागे कामाची सुसुत्रता, व्यवस्थतीत कामे, दजा टिकला पाहिजे असा उद्देश विभागाचा आहे. करत असलेल्या कामांना चांगला न्याय मिळावा, वेळेचा अपव्यय होऊ नये या उद्देशाने प्रशासनाने ही क्लब निविदा केली असेल. असा माझा अंदाज आहे. माझ्या मनात काही प्रश्न आहे त्यांचे निरसन करावे. पावटे सो. तुमचे अभिनंदन करतो. दलीत वस्तयांमध्ये चांगली कामे होत आहे. हे तुमच्या कामाचे फलीत आहे. हे क्लब टेंडर करण्याचे कारण काय? क्लब टेंडर दोन प्रकारचे असतात, पहिल्या प्रकारात १ ते जेवढे कामे असतील त्या कामात एकच निविदा धारक एकच ठेकेदार असतो. आणि दुसऱ्या प्रकारात त्याच क्लब टेंडर मध्ये एक जरी निविदा धारक असला तरी अनेक निविदा धारकांचा समावेश करुन वेगवेगळया जबाबदारी देता येतात. याबाबत मला माहित नाही तर हे क्लब निविदा करण्याचे कारण काय?

म.ओव्हरसिअर नागरी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत १ ते ४८ कामांना प्रशासकीय मान्यता भेटली होती. त्यात सन्मा. सदस्यांच्या वार्डातील कामांचे वेगळे टेंडर केले आणि अतिरिक्त निधी होता त्याचे क्लब टेंडर केले आहे.

म.सुनिल बैसाणे तुम्हाला जेव्हा शासनाकडून निधी येतो तो निधी अतिरिक्त येतो का स्वतंत्र येतो?

म.ओव्हरसिअर हा निधी एकत्र आला आहे.

म.सुनिल बैसाणे तुम्ही अतिरिक्त निधी चे टेंडर वेगळे का घेतले?

म.ओव्हरसिअर फाईल वेगळया असल्यामुळे व कामाची सुसुत्रता रहावी याकरीता वेगळे केले आहे. व आपल्या वर्क ऑर्डर करुन लगेच कामास सुरुवात करायची आहे त्यामुळे एकत्र केले.

म.सुनिल बैसाणे मी याकरीता तुमचे अभिनंदन केले आहे. याआधी दलीत निधी अंतर्गत क्लब टेंडर केले होते का?

म.ओव्हरसिअर यापूर्वी क्लब टेंडर केले नव्हते. ज्या ठेकेदाराचे व्हॅल्यूएशन जास्ता आहे.व त्यांचीकामाची क्षमता आहे. त्यांचे मार्फत गुणवत्ता पूर्वक काम व्हावे. त्यासाठी क्लब टेंडर केले आहे.

म.सुनिल बैसाणे मग बाकीचे एकत्र का नाही केले ? क्लब टेंडर करण्याचे काही नियम आहे का? त्याची निविदा विभाग स्तरावर किंवा राज्य स्तरावर निघायला पाहिजे? त्यासाठी ही प्रक्रीया राबवली आहे का?

म.ओव्हरसिअर ही प्रक्रीया राबवली आहे.

म.सुनिल बैसाणे आम्ही धुळे शहराचा विकास करण्याकरीता कामे करतो. अजेंडयावर दुसराही विषय आहे. हे बोलण्यामागे माझा उद्देश हाच आहे. मला जाणकार पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर व भाजप कार्यकर्ता व नगरसेवक म्हणून याचे स्पष्टीकरण करुन घेणे माझे कर्तव्य आहे. माझ्या उपस्थित शंकाचे निरसन झाले पाहिजे ही निविदा आपण राजय स्तरावर दिली होती का?

म. ओव्हरसिअर ही निविदा राज्यस्तरावर काढली होती. मिड डे या वर्तमान पत्रात दिली होती. तसेच स्थानिक वर्तमान पत्रात दिली होती.

म.सुनिल बैसाणे तो कोणता पेपर होता?

म.ओव्हरसिअर आमच्या विभागामार्फत निविदा काढली जाते पेपर चे सिलेक्शन रेकॉर्ड विभागामार्फत होते.

म.सुनिल बैसाणे आदरणीय सभापती महोदया, मा. आयुक्त महोदय आपल्याला या गोष्टी रेकॉर्डवर नोंद करुन घेणे गरजेचे आहे. नगरविकास विभाग दलीत निधी मार्गदर्शन तत्वाचे पालन करण्याबाबत शासन निर्णय १६ एप्रिल २०१४ चे तंतोतंत पालन या ठिकाणी करण्यात आले आहे का?

म. ओव्हरसिअर होय पालन करण्यात आले आहे.

म.सुनिल बैसाणे जर तंतोतंत पालन झाले नसेल त्याची जाबाबदारी आयुक्तांची राहिल का?

म.ओव्हरसिअर प्रशासनाची राहील व माझ्या अख्त्यारित कर्मचाऱ्यांची राहील.

म.सुनिल बैसाणे हे क्लब टेंडर करण्याचे कारण कामाची सुसुत्रता राहते. कामाचा दर्जा राखला जावा म्हणून असते. महाराष्ट्र स्तरावरील ठेकेदारांनी यात भाग घेतला पाहिजे. यात प्रशासनाची बाजू चांगली मांडली गेली पाहिजे. हे होण्यासाठी धुळे शहरातील छोटे छोटे बेरोजगार इंजिनिअर आहे त्यांच्यावर अन्याय करतो आहे की नाही? क्लब टेंडर करतांना धुळे शहरातला ठेकेदार असेल या विषयाला अनुसरुन म्हणून आपण सबका साथ सबका विकास म्हणतो लोकांनी आपल्यावर विश्वास ठेवला आहे. म्हणून उहापोह करावा लागतो. यात सर्व नियम अटी शर्तींचे पालन झाले पाहिजे. जर याचे पालन झाले नसेल तर याची सर्वस्वी जबाबदारी आयुक्तांची राहिल व प्रशासनाची राहिल. सर्व स्पष्टीकरणाचा खुलासा झाला आहे. स्थायी समिती यावर निर्णय घेऊन कार्यालयीन अहवालावर अधिन राहून विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९५ दिनांक १९/०६/२०२३

नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत धुळे शहरात विविध प्रभागात (१ ते १७ कामे) रस्ते डांबरीकरण, काँक्रीटीकरण व गटार करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२८/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**६,३६,८८,५८५/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ६९२/६९८/७०४/ ७०५/ ७०६/ ७१४/ ७१५/७१६/८८९/८७९/८९०/८८०/८८१/८८४/८८२/८८३/९१२दि.२६/१२/२०२२,दि.०८/०३/ २०३, दि.१०/०३/२०२३ अन्वये रक्कम रु. **६,३६,८८,५८५/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/०९/२०अन्वये दि.१७/०४/२०२३ रोजी दैनिक **मिडे मुंबई** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२३/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	डी.आर.पाटील प्रा.लि.	शे.१.०२०% जास्त	
२	मे.सानिका कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रक दर**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.सानिका कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **६,३६,८८,५८५/-**इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक दर** दराने आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक दर** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.सानिका कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रक दर** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.सानिका कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक दर** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून दलीत वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत धुळे शहरात विविध प्रभागात (१ ते १७ कामे) रस्ते डांबरीकरण करणे, काँक्रीटीकरण करणे, बंदिस्त गटार करणेचे कामी कंत्राटदार **मे.सानिका कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-९१ नागरी दलीतेतर सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत धुळे शहरात विविध प्रभागात (१ ते १५ कामे) रस्ते डांबरीकरण करणे, काँक्रीटीकरण करणे, बंदिस्त गटार करणे, पाईपलाईन टाकणे,

नाल्यावर पुल बांधणे,सभागृह बांधणे,हायमास्ट/पथदिवे बसविणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. व या विषयासंदर्भात सूचित करण्यांत येते की, सदर प्रस्तावासोबत यापूर्वी दिलेली कामाची यादी बांधकाम विभागाकडून अनावधानाने चूकीची सादर झालेली होती . सदर चूक निदर्शनास आल्यानंतर तांतडीने दुरुस्त १ ते १५ कामांची यादी सन्मा.सदस्यांना पाठविण्यांत आलेली आहे.व वॉट्अप ग्रुपवर देखील सादर करण्यांत आलेली आहे. सदर चूक अनावधानाने झालेली असून कृपया त्याप्रमाणे बदलाची नोंद घेणेस विनंती आहे.

म.सुनिल बैसाणे — ही मोठी चूक आहे की नाही? आपण टिपनीच्या आधारावर दरमंजूरी करतो. यात टिपनीमध्ये काय असते हे आपल्याला माहित नसते. १ ते १५ कामे हे दलीत वस्तीच्या कामांची यादी तशीच टाकून दिली आहे. या गंभीर गोष्टी आहे. या गोष्टींचे समर्थन मीपण व प्रशासनही करणार नाही. यावर बोलणे गरजेचे आहे. आम्हाला प्रशासकीय दुरुस्ती करण्याचा अधिकार नाही ठराव दुरुस्तीचा अधिकार नाही. हा अधिकार महासभा व आयुक्तांना आहे. यापुढे असा प्रकार घडता कामा नये. नगरसचिव महोदय, हा विषय तुमच्या नजरेआड झाला म्हणून मला या ठिकाणी बोलावे लागले. त्या गोष्टीची दुरुस्ती करण्यात यावी व जे जबाबदार आहे त्यांची जबाबदारी निश्चीत करावी. जेणे करुन असा प्रकार यापुढे होणार नाही. आणि कार्यालयीन अहवाल, महासभा ठराव, जिल्हाधिकारी महोदया यांच्या टिपनी निविदा प्रक्रीया हे सर्व तपासणी करुन यावर निर्णय घ्यावा. अशी विनंती करतो. आमच्या प्रभाग क्र. ७ मध्ये विकास कॉलनी त्या अंतर्गत असणाऱ्या रमापतीचौक चे मंदीर आहे त्याचा उल्लेख करुन घेण्यात यावा तो ठराव यापध्दतीने करण्यात यावा.

म.नगरसचिव — जो ठराव होईल त्यात यादी येणार नाही. यादीची प्रशासकीय मान्यता यापूर्वीच आली आहे.यादी फक्त माहिती करीता आहे.

म.सभापती — दुरुस्तीचे पत्र दिले आहे तेच विषय त्यात घ्यावे.

म.नगरसचिव — दुरुस्ती पत्रकाप्रमाणे विषय येतील.

म.सुनिल बैसाणे — प्रशासकीय टिपनीनुसार आपण मंजूरी देतो. त्यानुसार कार्यालयीन अहवालानुसार विषय मंजुर करावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९६ दिनांक १९/०६/२०२३

नागरी दलितेत्तर सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत धुळे शहरात विविध प्रभागात (१ ते १५ कामे) रस्ते डांबरीकरण करणे , काँक्रीटीकरण करणे, पाईपलाईन टाकणे,नाल्यावर पूल बांधणे,सभागृह बांधणे,हायमास्ट बसविणे, पथदिवे बसविणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२४/०३/२०२३/दि.२८/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**४,३३,८३,०२९ व २,७१,५१,६८८/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ६५१/ ६५३/ ९१७/९२४/९२३/ ९१६/ ९१४/ ९२६/९३९/९१३/९३४/९३८/ ६५८/९२७/७६८/ १२९/ ९३२/ ९३१/ ९२८/ ९१९/ दि.२६/१२/२०२

दि.०८/०२/२०२३ दि.१७/०३/२०२३ अन्वये रक्कम रु.**७,०५,३४,७१७/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बांवि/११/२०अन्वये दि.१७/०४/२०२३ रोजी दैनिक **लोकमत/ पथदर्शी** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२३/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	डी.आर.पाटील कन्सट्रक्शन प्रा.लि.	शे.१.०२०% जास्त	
२	मे.सानिका कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रक दर**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.सानिका कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **६,८२,४५,२८५/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक दर** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक दर** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.सानिका कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रक दर** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.सानिका कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक दर** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर नागरी दलीतेतर सुधार योजना सन 2022-23 अंतर्गत धुळे शहरात विविध प्रभागात (१ ते १५ कामे) रस्ते डांबरीकरण करणे, काँक्रीटीकरण करणे, बंदिस्त गटार करणे, पाईपलाईन टाकणे, नाल्यावर पुल बांधणे,सभागृह बांधणे,हायमास्ट/पथदिवे बसविणे कामासाठी कंत्राटदार **मे.सानिका कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रक** दराने आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागुल

अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९२ जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन२०२२-२३ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागातील सं.नं. २८/२ मधील मनपा मालकीच्या आरक्षित जागेस संरक्षण भिंत बांधणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.कल्याणी अंपळकर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. विजय जाधव विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९७ दिनांक १९/०६/२०२३

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)सन२०२२-२३ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागातील सं.नं.२८/२मधील मनपा मालकीच्या आरक्षित जागेस संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.३०/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**४६,४४,०००/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./९६०/२०दि. २९/०३/२०२३ अन्वये रक्कम रु.**४६,४४,८११/-**मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./१५/२० दि.२४/०४/२०२३ रोजी दैनिक सकाळ/सा.खान्देश जन या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१२/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	सौरभ संजय कदमबांडे	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**
२	रोहित टकले	शे.२.००% जास्त	
३	उमेश राजेंद्र चौधरी	शे.१.०० % जास्त	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **सौरभ संजय कदमबांडे** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **४६,४४,८११/-**इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **सौरभ संजय कदमबांडे** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **सौरभ संजय कदमबांडे** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव

स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन२०२२-२३ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागातील स.नं. 28/2 मधील मनपा मालकीच्या आरक्षित जागेस संरक्षण भिंत बांधणे कामी कंत्राटदार **सौरभ संजय कदमबांडे** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- श्री. विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९३ शासनच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अंतर्गत धुळे शहरात विविध भागात सन २०२३ -२४ अंतर्गत ०१ ते ४१ कामे करणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९८ दिनांक १९/०६/२०२३

शासनच्या महारष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अंतर्गत धुळे शहरात विविध भागात सन २०२३-२४ अंतर्गत ०१ ते ४१ कामे करणे बाबत बाबतच्या कामास शासन निर्णय क्र. नगरो -२०२३ / प्र.क्र.२२७/नवि- ३३ दि.०८/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.५८,७८,५७,६३०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत म.मुख्य अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग , नाशिक यांच्या कडील जा.क्र./ रस्ते -१ / धुळे मनपा दि. ०९/०२/२०२३ अन्वये रक्कम रु.४९,५३,६६,८१०/- (GST व Insurance वगळून) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ १३६ / २०२३-२४ दि.१२/०५/२०२३ अन्वये दि.१३/०५/२०२३ रोजी दैनिक मिड- डे , लोकमत , आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१२/०६/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात

आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.एस.बी. देशमुख	शे.५.००% जास्तीने	
२	मे. विकास जे.व्ही.	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. विकास जे.व्ही.** यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. विकास जे.व्ही.** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती पुढे सदर करणेस मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून शासनच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अंतर्गत धुळे शहरात विविध भागात सन २०२३ - २४अंतर्गत ०१ ते ४१ कामे करणे कामी कंत्राटदार **मे. विकास जे.व्ही.** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम७३नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन

अनुमोदक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १७ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक ०६/०७/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.**१७** आज गुरुवार **दिनांक ०६/०७/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
३	श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
१२	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१३	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. विजय रघुनाथ सनेर	अति.आयुक्त
२	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री. गजानन पाटील	मुख्यलेखाधिकारी
५	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक

६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
७	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरधारण अधिकारी
८	श्री.कैलास शिंदे	अभियंता
९	श्री. पी.डी. चव्हाण	सहा.अभियंता
१०	डॉ. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
११	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१३	श्री. मोहनीश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१४	श्री.संजय मोरे	कार्यालयीन अधिक्षक
१५	श्री. राजकुमार सुर्यवंशी	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१६	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१७	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१८	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१९	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
२०	श्री.चंद्रकांत उगले	सहाय्यक अभियंता (पाणी पुरवठा)
२१	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी , मनपा शिक्षण मंडळ
२२	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२३	श्री. कल्पना जाधव	अभिलेखापाल
२४	श्री.आर.पी. पाटकरी	वृक्ष प्राधिकरण विभाग
२५	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
२७	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी

संपूर्ण देशभर गाजणाऱ्या मुंबई समृध्दी महामार्गांवर बुलढाणा नजीक विदर्भ ट्रॅव्हल्सची बस व्हायडरला ठोकून पुर्णत: जळाली त्यात सुमारे २५ जणांचा आगीमध्ये होरपळून दु:खद निधन झाले तसेच मुंबई आग्रा महामार्गांवर मध्यप्रदेशकडून महाराष्ट्रात येणाऱ्या १४ चाकी कंटेनरचे पळासनेरचे आधी असणाऱ्या उतारावर ब्रेक फेल होवून या कंटेनरचे विविध गाडयांना टक्कर देवून एका हॉटेलमध्ये घुसून मोठे नुकसान केले या अपघातात ९ जण जागीच ठार व २८ जण गंभीर जखमी झाले आहेत. तसेच धुळे महानगरपालिकेचे वसूली विभागातील शिपाई स्व.गजानन वराडे यांचे हदयविकाराच्या तीव्र झटाक्याने दु:खद निधन झालेले आहे. तरी आजच्या सभेत त्यांना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- सौ.किरणताई राकेश कुलेवार, सभापती,स्थायी समिती

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार मान्यवरांना श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९९ दिनांक ०६/०७/२०२३

संपूर्ण देशभर गाजणाऱ्या मुंबई समृध्दी महामार्गांवर बुलढाणा नजीक विदर्भ ट्रॅव्हल्सची बस व्हायडरला ठोकून पुर्णत: जळाली त्यात सुमारे २५ जणांचा आगीमध्ये होरपळून दु:खद निधन झाले तसेच मुंबई आग्रा महामार्गांवर मध्यप्रदेशकडून महाराष्ट्रात येणाऱ्या १४ चाकी कंटेनरचे पळासनेरचे आधी असणाऱ्या उतारावर ब्रेक फेल होवून या कंटेनरचे विविध गाडयांना टक्कर देवून एका हॉटेलमध्ये घुसून मोठे नुकसान केले या अपघातात ९ जण जागीच ठार व २८ जण गंभीर जखमी झाले आहेत. तसेच धुळे महानगरपालिकेचे वसूली विभागातील शिपाई स्व.गजानन वराडे यांचे हदयविकाराच्या तीव्र झटाक्याने दु:खद निधन झालेले आहे.

वरील दोन्ही अपघातात मृत्यमुखी पावलेल्या निष्पाप नागरीक तसेच मनपाचे वसुली विभागचे कर्मचारी स्व.गजानन वराडे यांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे दु:खद निधन निमित्त त्यांचे आत्मास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

मा.सभापती यांच्याकडून आलेली अभिनंदनाची यादी

म.सभापती मागील सभेत स्थायी समिती सभापती सौ.किरणताई कुलेवार यांनी पाचकंदील परिसरात रात्रीच्या वेळेस साफसफाई करण्याचे निर्देश दिले होते त्याप्रमाणे त्या प्रभागातील स्वच्छता निरिक्षक श्री.विकास साळवे व त्यांच्या सर्व टिमने उत्तम नियोजन करून सदर परिसरातील रात्र पाळीतील स्वच्छता मोहिम सुयोग्यरितीने राबविलेली आहे.त्यामुळे भागातील स्वच्छता निरिक्षक व सफाई कर्मचारी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

तसेच बकरी ईद व आषाढी एकादशी च्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने केलेले सुयोग्य नियोजन व कार्यवाहीमुळे धुळे शहरातील एकूणच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यास मदत झालेली आहे. या कामी आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली अति.आयुक्त श्री.विजय सनेर, तसेच सर्व स्वच्छता निरिक्षक, मुकादम, सफाई कर्मचारी यांनी अतिशय मेहनतीने केलेले काम अभिनंदनीय व कौतूकास पात्र आहे. यामुळे यासर्वांच्या अभिनंदनाचा ठराव आजच्या सभेत पारीत करण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०० दिनांक ०६/०७/२०२३

पाचकंदिल परिसर व त्या प्रभागातील स्वच्छता निरिक्षक श्री.विकास साळवे व त्यांच्या सर्व टिमने उत्तम नियोजन करून सदर परिसरातील रात्र पाळीतील स्वच्छता मोहिम सुयोग्यरितीने राबविलेली आहे.त्यामुळे भागातील स्वच्छता निरिक्षक व सफाई कर्मचारी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

तसेच बकरी ईद व आषाढी एकादशी च्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने केलेले सुयोग्य नियोजन व कार्यवाहीमुळे धुळे शहरातील एकूणच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यास मदत झालेली आहे. या कामी आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली अति.आयुक्त श्री.विजय सनेर, तसेच सर्व स्वच्छता निरिक्षक, मुकादम, सफाई कर्मचारी यांनी अतिशय मेहनतीने केलेले काम अभिनंदनीय व कौतूकास पात्र आहे. यामुळे यासर्वांच्या अभिनंदनाचा ठराव आजच्या सभेत पारीत करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-९४ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.(सभाक्रं.१४ दि. ०१/०६२०२३)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.कल्याणी अंपळकर मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०१ दिनांक ०६/०७/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.१४ दिनांक ०१/०६/२०२३ च्या सभेतील ठराव नंबर ८० ते ८७ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९५ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त जेल रोड संतोषी माता मंदिर ते मामलेदार कचेरी पावेतो रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे झालेल्या कामास व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.दगडू बागूल सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०२ दिनांक ०६/०७/२०२३

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लवकरच भीमजयंती उत्सव- २३ हा येत आहे. सदर भीम जयंती उत्सवाला हजारोंच्या संख्येने भीम अनुयायी महामानव डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांना मानवंदना देण्यासाठी जेल रोडवरील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ जमत असतो. सदर बाब लक्षात घेता १४ एप्रिल २०२३ रोजी येणाऱ्या भीम जयंतीच्या उत्सवात येणारे रथ , वाहने व होणारे विविध कार्यक्रम प्रचंड समुदाय जमत असतो. त्यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त मामलेदार कचेरी ते संतोषी माता मंदिर येथील रस्त्यावरील खड्डे बुजविणे अत्यंत आवश्यक आहे. उक्त बाबत सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात रस्ता दुरुस्ती करिता रु.१.०० कोटी मात्रची तरतूद केलेली आहे.

तरी सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकिय खर्च रु.९,९६,६४६/- मात्र येणार आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा मे.हेमंत राजाराम बागुल, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेणेस सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास तसेच झालेल्या खर्चास कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागूल

अनुमोदक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९६ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त पुर्णाकृती पुतळा पॉलिशिंग व दुरूस्ती करण्याचे झालेल्या कामास व खर्चास कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.विजय जाधव विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०३ दिनांक ०६/०७/२०२३

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लवकरच भीमजयंती उत्सव- २३ हा येत आहे. सदर भीम जयंती उत्सवाला हजारोंच्या संख्येने भीम अनुयायी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यासाठी जेल रोडवरील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ जमत असतो. सदर बाब लक्षात घेता १४ एप्रिल २०२३ रोजी

येणाऱ्या भीम जयंतीच्या उत्सवात येणारे रथ , वाहने व होणारे विविध कार्यक्रम प्रचंड समुदाय जमत असतो. त्यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त त्यांना मानवंदना म्हणून पूर्णाकृती पुतळ्याचे पॉलिशिंग , दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. उक्त बाबत सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात शहराच्या मध्यवरती ठिकाणी पोलीस अधीक्षक कर्यालय जवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्याचे नूतनीकरण व सुशोभिकरण करणे करिता रु.७५.०० लक्षची तरतूद केलेली आहे

तरी सदर भागात समक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकिय खर्च रु.१,५०,५५७/- मात्र येणार आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा मे.हेमंत राजाराम बागुल, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेणेस सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.१,५०,५५७/- मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-९७ कर,पाणीपट्टी कर व चेक स्विकारणेसाठी मनपा नवीन इमारत येथील पार्किंग ठिकाणी स्वतंत्ररूम तयार करणेच्या कामास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेरविचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे हा विषय मागच्या बैठकीत तहकूब केला होता. मा. नगरसचिव साहेब आपण कर्तव्यदक्ष आहात त्याबद्दल आमच्या मनात कोणतीही शंका नाही. परंतु आतापर्यंत जे तहकूब विषय आहे ते एकूण किती व कोणते आहे? ते विषय पुन्हा फेर विचारासाठी काही अडचण असेल तर ती अडचण सांगावी आणि नसेल तर ते पुढच्या बैठकीत येतील का याबाबत खुलासा करावा.

म. नगरसचिव विषय मंजूर, नामंजूर, तहकूब झाल्यानंतर सदर प्रस्ताव संबंधीत विभागाकडे सादर करण्यात येतात. संबंधीत विभागाने सदर प्रस्ताव पुनश्च सादर केले तर विषय अजेंडयावर घेण्यात येतात.

म.सुनिल बैसाणे तहकूब झालेले विषय आलेले नसतील , प्रशासनाने त्याबाबतचा सव्वीस्तर दुरुस्ती किंवा कार्य अहवाल पाठवला विषय पत्रीकेवर घेतला नसेल तर पुन्हा त्या विषयाचे अधिकार

प्रशासनातील अधिकाऱ्यांकडे प्राप्त होतात. त्याबाबतचे काही विषय येत असतील किंवा राहिले असतील ते पुढच्या सभेत अवगत करावे. जेणेकरुन आम्ही तहकूब केलेले विषय फेर विचारासाठी का विलंब झाला याबबद्दल आम्हाला विचार करता येईल.

म.नगरसचिव — याबाबत तपास करुन पुढच्या बैठकीत सादर करतो.

म.सुनिल बैसाणे — हा जो विषय क्र. ९७ आहे याचा प्रशासनाच्या वतीने खुलासा करावा, की हा विषय आणत असतांना काही विचार असतील किंवा हे करणे का क्रमप्राप्त आहे याबद्दल सव्वीस्तर खुलासा करावा.

म.चंद्रकांत उगले — मनपाच्या बेसमेंटमध्ये खालच्या बाजूला करमुल्य निर्धारण अधिकारी शिरसाठ मॅडम यांनी पत्र दिले होते. धुळे मनपामध्ये १ ते ११ गावांचा समावेश झाल्याने व त्या गावातील मालमत्ता कर लिपीक यांची नेमणूक मालमत्ता कर विभागात झालेली आहे सदर कर्मचाऱ्यांना गावनिहाय डिमांड देण्यात आलेले आहे. वसुलीच्या कामासाठी मालमत्ता कर विभागात सदर कर्मचारी यांना बसण्यासाठी जागा उपलब्ध नाही. तरी १ ते ११ गावांचे लिपिक यांना घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीसाठी स्वतंत्र रुम बांधकाम करुन मिळावा. असे कळविले होते त्यानुसार आम्ही टिपनी तयार केली. या ठिकाणी बांधकाम करणे आवश्यक होते. मा. आयुक्त सो नी नगररचना विभागाला अभिप्राय मागविण्याचे सांगितले होते. की खालच्या बाजूला बेसमेंट मध्ये नियमानुसार बांधकाम करुन शकतो का? नगररचना विभागाच्या अभिप्रायानुसार सदर ठिकाणी बांधकाम करु शकतो असा अहवाल प्राप्त झाल्यानुसार सदरचा विषय स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला आहे.

म.सुनिल बैसाणे — उगले सो. आपण नगररचना विभागाच्या माध्यमातून धुळे शहरात अपार्टमेंट आहेत त्यात खालच्या भागात वाहनतळ असते. त्या वाहन तळात नगररचनाच्या काही नियम अटी शर्ती असतात. त्यात बांधकाम झाले नाही पाहिजे जेणे करुन वाहनांसाठी पार्कींगची जागा उपलबध व्हावी. मनपाने ही इमारत उभारली नगररचना विभागाने त्यावेळेस विचारपूर्वक काम केले असेल या ठिकाणी कुठलेही बांधकाम झाले नाही पाहिजे. जर त्या वेळी त्यांनी विचार केला नव्हता तर या विषयावर कार्यालयीन टिपनीमध्ये हे कायदेशिर आहे का? यावर चर्चा न करता याला मंजूरी दिली तर येणाऱ्या काळात आपल्याला सुध्दा अडचणी येऊ नये जर आल्याच त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल हा प्रशासनाने आणलेला विषय आहे. इतिवृत्तात सर्व उहापोह झाला पाहिजे. हा माझा उद्देश आहे. अधिकाऱ्यांना माझा प्रश्न आहे. लेखा विभागाचे काही आक्षेप आहे. ते असे ,सदरकाम खरोखर विना निविदा देण्यासारखे तात्काळ स्वरुपाचे दिसून येत नाही. तसेच निविदा का केली नाही? हे काम इतके अत्यावश्यक होत का? मुंबई प्रांतिक अधिनियम ६७(३) याला लागू होतो का? होत असेल तर कसा होतो? याबाबतचा ही या ठिकाणी विचार झाला पाहिजे. कामाची आवश्यकता असेल तरच मंजूरी दिली गेली पाहिजे. हे उपस्थित मुद्दे प्रशासनाचे आहे. जर मुंबई महानगरपालिका नगररचना अधिनियमानुसार जर बेसमेंटला अशा पध्दतीच्या बांधकामाला मान्यता देत असाल तर धुळे शहरात कितीतरी लोकांना असे ऑफिस उघडायचे असेल तर काय? नगररचना विभागाने प्रश्न उपस्थित त्यांनीच केला आहे व त्याचे उत्तर पण त्यांनीच दिले आहे. नगररचना

विभागाचा अभिप्राय आहे तो असा, प्रशासकीय इमारतीचा भूखंड त्यासाठी आवश्यक पार्कींग क्षेत्र किती लागेल? अतिरिक्त क्षेत्र किती आहे? याबाबतचा अहवाल सादर करणे. असे प्रश्न नगररचना विभागाच्या अभियंत्यांनी उपस्थित केले आहे. तसेच याचे उत्तर ही त्यांनीच दिले आहे. करण्यास हरकत नाही म्हणून याबाबत नगररचना विभागाने खुलासा द्यावा. सभापती महोदया, या ठिकाणी सदर विषय फेर विचारासाठी आणला या ठिकाणी परत पाठवला यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, महापौर सो. यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार नगररचना विभागाच्या अहवालानुसार काम करणे आवश्यक असल्यानुसार कामाच्या मंजुरी हरकत नाही. हे आयुक्त सो. यांचे म्हणने आहे. मी जे मुद्दे उपस्थित केले त्यासाठी नगररचना विभाग,त्यानंतर लेखाधिकारी वअति.आयुक्तांनी खुलासा करावा.

म.चंद्रकांत उगले — यापूर्वीच्या सांगीतलेल्या कारणानुसार टिपनी ठेवण्यात आली होती. प्रशासकीय इमारतीचा भूखंड मंजूर आराखडयानुसार ८४६० चौ.मी. आहे त्यात्या बांधकाम क्षेत्र ४६३० चौ.मी. आहे. पार्कींगसाठी २३७३ चौ.मी. जागा आवश्यक आहे. तसेच मंजूर आराखडयानुसार ३३२९ चौ.मी. जागा सोडली आहे. त्यामुळे नगररचना विभागाने याबाबत बांधकाम करणे अनुज्ञेय असा अहवाल दिला होता.

म.सुनिल बैसाणे — हा विषय नियमानुसार आलेला आहे असे तुम्हाला म्हणायचे का? सदर कामाचे बांधकाम झाले आहे का?

म.चंद्रकांत उगले — सदरचा विषय नियमानुसार आलेला आहे. कामाचे बांधकाम झाले आहे.

म.सुनिल बैसाणे — हे नियमाला धरुन नाही. हा माझा प्रशन आहे.

म.प्रदिप चव्हाण — आपले एकूण बांधकाम क्षेत्र ते ४६३०.७५ चौ.मी. होते त्यासाठी जे पार्कींग लागते त्यासाठी त्यात १ मिनी बस व १२ स्कूटर पार्कींग होते. एरियाच्या हिशोबाने आपल्याकडे ४६ स्कूटर पार्कींग व २ मिनी बस पार्कींग होते. २३७३.७५ चौ.मी.पार्कींग आवश्यक होती. आपल्याकडे ३३२९.३३ चौ.मी.जागा सोडली आहे. त्यानुसार बांधकाम अनुज्ञेय आहे.

म.सुनिल बैसाणे — मग यावर नगररचना विभागाने आक्षेप का नोंदवले आहे. नगररचना विभागामध्ये नागरिकांना ज्या अडचणींना सामोरे जावे लागते, एखाद्या वेळेस जर आपण अपार्टमेंट मध्ये एखाद्या वॉचमेनला जर घर करावे लागले व त्यांनी परवानगी न घेता जर केले तर त्या सर्व अपार्टमेंटवर गुन्हे दाखल करण्यासाठी मनपा नोटीस बजावते. यांनी स्थायी समिती, महासभा यांची परवानगी न घेता कामाच्या सोयीसाठी केले परंतु अधिकाऱ्यांना एक नियम व नागरिकांना दुसरा नियम असे होत नाही. या गोष्टी नमुद झाल्या पाहिजे. कामाची निविदा प्रक्रीया करणे आवश्यक आहे. असे लेखा विभाग म्हणतो. सदर कामाची निविदा प्रक्रीया मंजूर झाली का?

म.चंद्रकांत उगले — विना निविदा मंजूरीसाठी विषय स्थायी समितीपुढे सादर केला आहे.

म.सुनिल बैसाणे — हे सगळे आक्षेप इतिवृत्तात येणे गरजेचे आहे. उद्या एखाद्या नागरिकाने माहिती अधिकारात पत्र दिले की धुळे मनपात असे असे काम झाले सर्व सन्मा. सदस्यांनी मंजूरी दिली त्यामध्ये त्यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग केला. अशा गोष्टी येऊ नये म्हणून या गोष्टीचा उहापोह सभेत झाला पाहिजे. हा विषय प्रशासनाने आणलेला आहे. प्रशासकीय अहवाल व लेखा विभागाने सर्व

आक्षेप नोंदवून आपण यावर विचार करावा. मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने हा विषय आलेला आहे.

म.सभापती मा. सदस्यांनी जो विषय मांडलेला आहे प्रशासनाच्या कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०४ दिनांक ०६/०७/२०२३

धुळे महानगरपालिका नवीन इमारत पार्किंग येथे धुळे मनपा हद्दीतील मालमत्ता कर , पाणीपट्टी कर व नव्याने समाविष्ठ झालेल्या १ ते ११ गणाचे मालमत्ता कर व पाणीपट्टी कर तसेच नगररचना , आरोग्य विभाग चलनद्वारे HDFC बँकेत भरणा स्विकारण्यात येतो.

धुळे महानगरपालिका मध्ये ०१ ते ११ गावांचा समावेश झाल्याने व त्या गावातील मालमत्ता कर लिपिक यांची नेमणूक मालमत्ता कर विभागात झालेली आहे. सदर कर्मचारी यांना गाव निहाय डिमांड देण्यात आलेले आहे. वसुलीच्या कामासाठी मालमत्ता कर विभागात सदर कर्मचारी यांना बसण्यासाठी जागा उपलब्ध नाही. तरी ०१ ते ११ गावांचे लिपिक यांना स्वतंत्र रूम तयार करून देणेबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे. तरी उक्त काम हे कर्मचारी तसेच कर भरणा करण्यासाठी आलेल्या नागरिकांच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा मे.यासीन जब्बार शेख , ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यास सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७(३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२)(२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.४,९९,९९८/- मात्रच्या खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समिती पुढे ठेवणेस बाबत बांधकाम विभागा मार्फत प्रस्तावित आहे. उक्त बाबत वरील प्रमाणे पुन्हा बांधकाम विभागा कडील अभिप्राया नुसार , सदरील काम वसुली विभागाशी निगडीत आहे सदरचे काम वसुली विभागातील कर्मचारी यांना घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीसाठी आवश्यक असल्याने बंधनकारक करून घेण्यात आले आहे. याबाबत म.आयुक्त सो., यांचेशी चर्चेनुसार काम करून घेण्यात आले आहे.

उक्त बाबत सचिव विभागाकडील अभिप्राया नुसार , सदर कामा बाबतची आवश्यकता व निकड लक्षात घेवून सबंधित विभागा मार्फत प्रस्ताव मे. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सदर करण्यात येतात. याबाबत सक्षम मान्यता घेणेत आले नंतर सदर प्रस्ताव मे स्थायी समितीचा विषय सूचीवर घेण्याची कार्यवाही करण्यात येते. म.अति. आयुक्त , धुळे मनपा यांच्या कडील अभिप्राया नुसार मु.ले.प. यांचे १ , २ , व ३ योग्य तथापि प्रस्तुत काम अति तात्काळ परिस्थितीत त्वरित करून घेणेची आवश्यक असल्याची वस्तुस्थिती आहे.म. आयुक्त सो., यांनी नगररचना विभागाचे अभिप्राय घेणे बाबत कळविले.

त्यानुसार नगररचना विभागा कडील अभिप्राया नुसार , उक्त नस्तीचे अवलोकन केले असता मालमत्ता , पाणीपुरवठा कर व चेक स्विकारण्यासाठी नवीन प्रशासकीय इमारतीच्या पार्किंग मध्ये स्वतंत्र -रूम तयार करण्या बाबत प्रस्ताव आहे. प्रशासकीय इमारतीच्या पार्किंग जागेत उत्तर पश्चिम बाजूस HDFC बँक, संगणकीय रूम आहे. त्यामुळे त्याच्या तात्पुरत्या स्वरूपात कर स्विकारण्यास स्वतंत्र बांधण्यास हरकत नसावी.

१) प्रशासकीय इमारतीच्या भूखंड मंजूर आराखड्यानुसार ८४६०.०० M2 आहे.

२) एकूण बांधकाम क्षेत्र :- ४६३०.७८ M2 आहे.

३) विकासनियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीतील Table No8B (Parking Requirement) नुसार प्रती १००.०० चौ.मी.चटई --१ mini bus व १२ scooter अनुज्ञेय आहे.

त्यानुसार ४६ mini Bus व ५४० scooter अनुज्ञेय होणे त्याचे क्षेत्र

Mini Bus Parking Space :- ३.७५ X ७.५ = २८.१२५ M2

Scooter Parking Space :- १.० X २.० = २ M2

२८.१४५ X ४६ = १२९३.७५ M2 mini bus

२ X ५४० = १०८०.०० M2 scooter

एकूण = २३७३.७५ M2- Parking साठी आवश्यक आहे. तसेच मंजूर आराखड्यानुसार ५४.४९ x ६१.१० = ३३२९.३३ चौ.मी. parking साठी जागा सोडली आहे.

तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीतील ४.२७ Uses Permissible in development Plan Reservations मधील 5.0) Parking / parting lot- Parking along with ancillary uses Such as public convenience drivers room, motor garage etc. on not more than 10% area. Provided further that, the Planning Authority may accomm- odate, on the willingness of the owners/ occupanty residing in the existing building's an reserved area, on the same land, on any floor of the proposed parking building.

वरील प्रमाणे तरतूद नमूद आहे. वरील अहवाला नुसार पुरेशी पार्किंग स्पेस उपलब्ध असल्याचे दिसून येते. तरी तात्पुरत्या स्वरूपात कर स्विकारण्यासातही स्वतन्त्र कक्ष , (बांधकाम नकाशा प्राप्त करून घेण्याच्या अटी वर) बांधकाम ना- हरकत देणेस हरकत नसल्याबाबत प्रस्तावित केलेले आहे. उक्त बाबत म.आयुक्त सो., धुळे मनपा यांच्या कडील चर्चे नुसार प्रथम म.महापौर यांचेकडे चर्चेसाठी ठेवणे बाबत कळविले होते. त्यानुसार दि.०९/०६/२०२३ रोजी म.महापौर सो., यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार नगररचनाकार यांचा अहवालानुसार काम करणे अनुज्ञेय असल्याने कामाच्या मंजुरीस हरकत नाही असे म.महापौर सो., यांनी सुचविले. तरी सदरचा विषय मंजूरीसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव फेरसादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या चर्चनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून **कर,पाणीपट्टी कर व चेक स्विकारणेसाठी मनपा नवीन इमारत येथील पार्किंग ठिकाणी स्वतंत्ररूम तयार करणेच्या कामास व खर्चास** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७(३) (क) अन्वये व ५(२)(२) अन्वये मान्यता देण्यात येत आहे. याबाबत मा.मुख्यलेखापरिक्षक व मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार आवश्यक ती पुर्तता व कार्यवाही करण्यात यावी .

सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर महिबुल्लाह

अनुमोदक :- श्री. विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९८ महाराष्ट्र नगरोत्थान सुवर्ण जयंती (जिल्हास्तर) अंतर्गत सर्वे नं.५४० येथील जागेत सामाजिक सभागृह बांधण्याचे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.खान मो.साबीर सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.किरण अहिरराव विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०५ दिनांक ०६/०७/२०२३

शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्वे नं. ५४० येथील जागेत सामाजिक सभागृह बांधणे बाबतच्या कामास म.जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष- ५/ नपाप्र / बांध /३८७ दि २८/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४९,९९,७४७/मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उक्त कामाबाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांच्या कडील पत्र क्र. ५९३ दि.२६/१२/२०२३ अन्वये रक्कम रु.४९,९९,७४७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ १०२ / २०२३-२४ दि.०४/०५/२०२३ अन्वये दि.०५/०५/२०२३ रोजी दैनिक देशदूत / खान्देश खबर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१९/०५/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	**आशुतोष अशोक पाटील**	**शे.१.००% कमीने**	सर्वात कमी दर
२	रमा कन्सट्रक्शन	शे.७.००% जास्तीने	
३	दिनेश गुजर	शे.१०.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. आशुतोष अशोक पाटील** यांचे दर **शे.१.०० कमी दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. आशुतोष अशोक पाटील** यांची **शे.१.०० कमी दराने** आलेले निविदा दर मे.स्थायी समिती पुढे सदर करणेस मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र नगरोत्थान सुवर्ण जयंती (जिल्हास्तर) अंतर्गत सर्व्हे नं.५४० येथील जागेत सामाजिक सभागृह बांधण्याचे कामी कंत्राटदार **मे.आशुतोष अशोक पाटील** यांचे **शे.१.०० कमी दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर महिबुल्लाह

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९९ महाराष्ट्र नगरोत्थान सुवर्ण जयंती (जिल्हास्तर) अंतर्गत प्रभाग क्रमांक ७ गुरूनानक हौसिंग सौसयटी आंनद दुवा यांचे घर ते हेमंत सोलंकी व शशीकला पोपली ते विजय रेलन यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट व गटार करण्याचे कामाचे निविदा दर मागविण्यात आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०६ दिनांक ०६/०७/२०२३

शासनच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील गुरुनानक हौ. सोसा., आनंद दुवा घर ते हेमंत सोलंकी व शशिकला पोपली ते विजय रेलन घरापावेतो रस्ता कॉंक्रीट व गटार करणे बाबतच्या कामास म.जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष-५/नपाप्र/ बांध/३६९ दि २५/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४८,५१,३०३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत शहर अभियंता , मनपा धुळे यांच्या कडील पत्र क्र. ५०५ दि.२६/१२/२०२३ अन्वये रक्कम रु.४८,५१,३०३/मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ २/२०२३-२४ दि.०३/०४/२०२३ अन्वये दि.०४/०४/२०२३ रोजी दैनिक नवभारत / वार्ता या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२४/०४/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	दिपेश सुभाषकुमार लिलवाणी	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर
२	एकविरा कन्सट्रक्शन	शे.३.००% जास्तीने	
३	ऋषभ सतिष खिवसरा	शे.२.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. दिपेश सुभाषकुमार लिलवाणी** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.दिपेश सुभाषकुमार लिलवाणी** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मे.स्थायी समिती पुढे सदर करणेस मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र नगरोत्थान सुवर्ण जयंती (जिल्हास्तर) अंतर्गत सर्वे नं.५४० येथील जागेत सामाजिक सभागृह बांधण्याचे कामी कंत्राटदार **मे.दिपेश सुभाषकुमार लिलवाणी** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१०० जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील वलवाडी भागातील सं.नं.१०७/२अ/२अ/२अ देशमुख नगर भागातील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे कामाचे निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.वसीम अन्सारी
म. सभापती

विषय मंजूर करण्यात यावा.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०७ दिनांक ०६/०७/२०२३

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील वलवाडी भागातील सं.नं.१०७/२अ/२अ/२अ देशमुख नगर भागातील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२९/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**२९,८४,०००/-**मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./ ९५८/२ दि.२७/०३/२०२३ अन्वये रक्कम रु. **२९,८४,९०६/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./८५/२० दि.०२/०५/२०२३ रोजी दैनिक सकाळ/मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१९/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.राम कन्सट्रक्शन	शे.५.००% जास्त	
२	श्री.सम्राट पृथ्वीराज थोरात	शे.१०.००% जास्त	
३	श्री.मिलिंद वासुदेव पाटील	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.मिलिंद वासुदेव पाटील** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **२९,८४,९०६/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले. वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.मिलिंद वासुदेव पाटील** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.मिलिंद वासुदेव पाटील** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणेबाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा हद्दीतील वलवाडी भागातील सं.नं.१०७/२अ/२अ/२अ देशमुख नगर भागातील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे कामी कंत्राटदार **श्री.मिलिंद वासुदेव पाटील** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता

देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

अनुमोदक :- श्री.अन्सारी वसीम खलील

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:--१०१ धुळे मनपा हद्दीतील मनोहर टॉकीज समोरील श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे बाबत कामाचे निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कल्याणी अंपळकर सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.विजय जाधव विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०८ दिनांक ०६/०७/२०२३

धुळे मनपा हद्दीतील मनोहर टॉकीज समोरील श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे बाबत च्या कामास धुळे महानगरपालिका ठराव नं.८९ दि.२८/०४/२०२२ म. आयुक्त सो.,धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३९,२१,८०४/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./ धुमपा/ पापुवि/ १९७ / २०२३-२४ दि.०७/०६/२०२३ अन्वये दि.०८/०६/२०२३ रोजी दैनिक देशदूत / साप्ता. खान्देश / शिंदखेडा टाईम्स या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१६/०६/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	कला संस्कार आर्ट स्टुडियो	शे.०.५०% कमीने	सर्वात कमी दर
२	शिवशिल्प आर्ट	शे.२.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. कला संस्कार आर्ट स्टुडियो, धुळे** यांचे दर **शे.०.५०% कमी दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. कला संस्कार आर्ट स्टुडियो** यांची **शे.०.५०% कमी दराने** आलेले निविदा दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस

मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा हद्दीतील मनोहर टॉकीज समोरील श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे कामी कंत्राटदार **मे. कला संस्कार आर्ट स्टुडियो** यांचे **शे.०.५०% कमी दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१०२ मानधनावरील रसायन तज्ञ व जेसीबी वाहन चालक कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नाजीया बानो पठाण सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.फातेमाबी अन्सारी विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०९ दिनांक ०६/०७/२०२३

मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार खालील मानधनावरील रसायन तज्ञ यांना पुढील ६ महिने कालावधी करीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अ क्र.	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रुपये
१	श्री विशाल अशोक गोसावी	रसायत तज्ञ	२३/६/२०२३	२५,०००/-
२	कु. श्रध्दा मधुकर पाटील	रसायत तज्ञ	२३/६/२०२३	२५,०००/-

त से

मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार खालील मानधनावरील जेसीबी वाहन चालक कर्मचारी यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रुपये
१	श्री राहुल नाना देसले	मानधनावरील जेसीबी वाहन चालक	२९/६/२०२३	रु. १५,५००/-

तरी वरील मानधन तत्वावरील रसायन तज्ञ व जेसीबी वाहन चालक कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता त्यांच्या नावासमोर नमुद एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहितअसणे याबाबतअधिनियमाततरतुदनमुदकेलेली आहे.

उक्त मानधन तत्वावरील रसायन तज्ञ व जेसीबी वाहन चालक यांना मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार में. स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त मानधनावरील २ रसायन जज्ञ व १ जेसीबी वाहन चालक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक :- श्री. नरेद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक १८

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक १३/०७/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१८ आज गुरुवार **दिनांक १३/०७/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
३	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१)	श्री. विजय रघुनाथ सनेर	अति.आयुक्त
२)	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
३)	श्री. गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
४)	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
५)	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
६)	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
७)	श्री.कैलास शिंदे	अभियंता
८)	डॉ. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
९)	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१०)	श्री. साबळे के.डी.	लिपीक आस्थापना विभाग
११)	श्री. कमलेश सोनवणे	नगररचनाकार
१२)	श्री. चंद्रकांत मोरे	प्र. लेखापाल
१३)	श्री. किशोर सुडके	परवाना तथा बाजार विभाग
१४)	श्री. मधुकर निकुंभे	कर निर्धारण अधिकारी
१५)	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी
१६)	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग

१७)	श्री. दुष्यंत महाजन	अग्नीशमन विभाग
१८)	श्री. सुक्राम राऊत	वाहनविभाग
१९)	श्री विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२०)	श्री. पराग ठाकरे	विद्युत अभियंता

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म.सुनिल बैसाणे आदरणीय सभापती महोदया, आपण ठरल्याप्रमाणे दर गुरुवारी स्थायी समितीची बैठकी घेत असतो. बैठकीमध्ये अनेक विषयांना मंजूरी देत असतो. मंजूरी देत असतांना सभागृहातील सदस्यांचे बहुमत व सभागृहातील सदस्यांचा विरोध नोंदवून मंजूरी देत असतो. या ठिकाणी नगरसचिवांना माझा प्रश्न आहे. या ठिकाणी सभेसाठी आवश्यक ती सदस्यांची संख्या झालेली नाही. सभेस गणपूर्ती झालेली नसेल तर मा. नगरसचिवांनी आम्हाला अवगत करावे. सभाशास्त्राच्या नियमानुसार किती सदस्य हजर राहिले तर कोरम पूर्ण होतो ? याबद्दल माहिती द्यावी.

म. नगरसचिव स्थायी समिती कामकाज नियम ३ (ड) नुसार सभेच्या सुरवातीपासून ते शेवटपर्यंत निदान ५ सदस्य उपस्थित असल्याखेरीज कोणतेही कामकाज उरकता कामा नये अशी तरतूद आहे. त्यामुळे आपल्याला ५ सदस्यांची उपस्थिती आवश्यक आहे.

म.सुनिल बैसाणे किमान ५ सदस्य या ठिकाणी उपस्थित असणे आवश्यक आहे. सभेस गणपूर्ती त्यानंतरच पूर्ण होणार आहे. सभापती महोदया आपणांस विनंती आहे, सदस्य येण्यासाठी ५ मिनिटांचा आवकाश घेऊ या. बाहेर पाऊसही चालूआहे. तसेच भाजपा नेते मनोहर भदाणे यांच्या मातोश्री यांचे ही निधन झाले आहे. कदाचित त्या कारणास्तव सदस्यांना येण्यास उशिर झाला असावा ५ सदस्यांचा कोरम पूर्ण नाही झाला तर सदरची सभा रद्द करावी. अशी विनंती करतो.

म.सभापती कोरम पूर्ण करण्यासाठी ५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे.

म.सभापती ५ मिनिटांचा अवधी पूर्ण झाला आहे. आजच्या सभेस आवश्यक ती गणपूर्ती पूर्ण न झाल्याने आजची सभा रद्द करण्यात येत आहे.

सही/- x x x

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १९ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक २०/०७/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१९ आज गुरूवार **दिनांक २०/०७/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजतां सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री. ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
१२	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१३	श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. विजय रघुनाथ सनेर	अति.आयुक्त
२	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री. गजानन पाटील	मुख्यलेखाधिकारी
५	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक

६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
७	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
८	श्री.कैलास शिंदे	अभियंता
९	श्री. पी.डी. चव्हाण	सहा.अभियंता
१०	डॉ. एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
११	श्री.चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१३	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१४	श्री.संजय मोरे	कार्यालयीन अधिक्षक
१५	श्री.शिरिष जाधव	वसुली अधिक्षक
१६	श्री. राजकुमार सुर्यवंशी	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१७	श्री. मोहनीश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१८	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१९	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२०	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
२१	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२२	श्री. गणेश सुर्यवंशी	प्रशासन अधिकारी , मनपा शिक्षण मंडळ
२३	श्री. सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग,जाहिरात दिव्यांग विभाग
२४	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२५	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल

म. सभापती सन्मा.सदस्य, मा.अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

सभेच्या सुरूवातील सन्मा.सदस्यांकडून श्रध्दांजलीची यादी सादर झालेली आहे.

धुळे शहराचे प्रथम महापौर श्री.भगवान बापूजी करनकाळ यांच्या धर्मपत्नी स्व.मीनाताई करनकाळ यांचे दिनांक १७/०७/२०२३ रोजी वयाच्या ५३ व्या वर्षी फुफ्फूसांच्या व किडनीच्या दुर्धर आजाराने दु:खद निधन झाले. दुर्धर आजारामुळे मिनाताईंचा जीवन व मृत्युशी झुंज सुरू होती या जीवन मरणाच्या संघर्षांत प्रथम महापौर भगवान बापूजी हे सातत्याने त्यांच्या सोबत भक्कमपणे उभे होते. भगवान बापूजींनी अत्यंत शर्थीचे प्रयत्न केले परंतू दुदैवाने त्यांना यश येवू शकले नाही.

तसेच एक मराठी अभिनेता आणि दिगदर्शक रविंद्र महाजनी यांचे दिनांक ११ जुले २०२३ रोजी दु:खद निधन झाले आपल्या कारकिर्दीचया सुरूवातीच्या काळा रविंद्र महाजनी यांनी टॅक्सी चालविली. महाजनी हे त्यांच्या व्यक्तीमत्वामुळे आणि लुकमुळे मराठी चित्रसृष्टीतील विनोद खन्ना म्हणून ओळखले जाते.

स्वर्गीय सौ.मिनाताई करनकाळ व मराठी अभिनेता स्वर्गीय रविंद्र महाजनी यांना आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यात यावा हि विनंती केलेली आहे.

सुचक:- श्री.नरेश रूपला चौधरी

अनुमोदक:- सौ.कल्याणीताई सतिष अंपळकर

म. सभापती सन्मा. सदस्यांनी श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११० दिनांक २०/०७/२०२३

धुळे शहराचे प्रथम महापौर श्री.भगवान बापूजी करनकाळ यांच्या धर्मपत्नी स्व.मीनाताई करनकाळ यांचे दिनांक १७/०७/२०२३ रोजी वयाच्या ५३ व्या वर्षी फुफ्फूसांच्या व किडनीच्या दुर्धर आजाराने दु:खद निधन झाले. दुर्धर आजारामुळे मिनाताईंचा जीवन व मृत्युशी झुंज सुरू होती या जीवन मरणाच्या संघर्षात प्रथम महापौर भगवान बापूजी हे सातत्याने त्यांच्या सोबत भक्कमपणे उभे होते. भगवान बापूजींनी अत्यंत शर्थीचे प्रयत्न केले परंतू दुदैवाने त्यांना यश येवू शकले नाही.

तसेच एक मराठी अभिनेता आणि दिगदर्शक रविंद्र महाजनी यांचे दिनांक ११ जुले २०२३ रोजी दु:खद निधन झाले आपल्या कारकिर्दीचया सुरूवातीच्या काळा रविंद्र महाजनी यांनी टॅक्सी चालविली. महाजनी हे त्यांच्या व्यक्तीमत्वामुळे आणि लुकमुळे मराठी चित्रसृष्टीतील विनोद खन्ना म्हणून ओळखले जाते.

सौ.मिनाताई करनकाळ व मराठी अभिनेता स्वर्गीय रविंद्र महाजनी यांच्या दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून दोन्ही मान्यवरांचे दु:खद निधन निमित्त त्यांचे आत्मास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सभेच्या सुरूवातीला सन्मा.सदस्यांकडून अभिनंदनाची यादी सादर झालेली आहे.

श्री.गजेंद्र महादेव अंपळकर (गजुशेठ) यांची भारतीय जनता पार्टीच्या धुळे शहर जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा अभिनंदनाचा ठराव आज रोजीच्या स्थायी समितीच्या सभेत पारीत करण्यात यावा हि विनंती.

सुचक:- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक:- श्री.नरेश रूपला चौधरी

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १११ दिनांक २०/०७/२०२३

श्री.गजेंद्र महादेव अंपळकर(गजुशेठ) यांची धुळे शहर जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-११४ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.(सभाक्रं.१५ दि. १६/०६२०२३)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.कल्याणी अंपळकर मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११२ दिनांक २०/०७/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.१५ दिनांक १६०६/२०२३ च्या सभेतील ठराव नंबर ८८ ते ९१ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११५ मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील प्रकरण ७ (ड) अन्वये दि.०६/०६/२०२३ ते दि.२२/०६/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे सभापती महोदया विषय क्र. ११५ मा. आयुक्त सो. यांच्या अधिकारात असलेल्या व अवलोकनार्थ आलेल्या यादी मध्ये २२ नंबरचा विषय आहे. त्यात रकमेचा कॉलममध्ये अंदाजपत्रकीय दराने म्हटले आहे. दर किती याचा उल्लेख नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा मोहाडी येथील त्यामध्ये चांगल्या दर्जाचे काम होण्यासाठी आणि अंदाजपत्रकीयमध्ये कमी दाखवण्यात आले आणि जास्त दर आला असेल त्यामुळे पुन्हा हा विषय पत्रीकेवर येऊ शकतो. म्हणून रक्कम निश्चीत केली नाही किंवा त्यामध्ये जास्त रक्कम लागण्याची शक्यता आहे याबाबत खुलासा करावा.

म.अभियंता सदरचा विषय हा आर्कीटेक्ट नियुक्तीसाठी आला होता ही जी निविदा आहे आर्कीटेक्अ नियुक्तीची निविदा आहे याचे अंदाजपत्रक तयार होऊन आपल्याकडे येईल. आणि मग मंजूरी मिळेल.

म. सभापती मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील प्रकरण ७ (ड) अन्वये दि.०६/०६/२०२३ ते दि.२२/०६/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकन करण्यांत आले. अ.क्र.२२ मधील कामाबाबत रक्कम नमुद करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११३ दिनांक २०/०७/२०२३

मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि.०६/०६/२०२३ ते

दि.२२/०६/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

अ. क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	५६	०६/०६/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये एकविरा नगर भागात जवाहर पाटील यांच्या घरापासून ते कपूरचंद ययांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,९७,२२६/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
२	५७	०६/०६/२०२३	प्र.क्र.०९ मध्ये जे.बी.रोड ते लाल बाग चौक पर्यंत बंदिस्त गटार करणे.	१९,९६,६३७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
३	५९	०६/०६/२०२३	नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) अंतर्गत प्र.क्र.०६ मध्ये अंगणवाडी ते भगवान सोनवणे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,९९,७४७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४	६२	०६/०६/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये जिभाऊ पाटील घर ते गुलाब पाटील घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,९५,९७७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५	६४	०८/०६/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये तुळशीराम नगर भागात रुणवाल यांचे घरापासून ते पंढरीनाथ पाटील यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,८४,१९९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
६	६६	१३/०६/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये न्यू एकता भागात गटार करणे.	१९,९५,३९९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
७	६८	१३/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील वरखेडी रोड येथील वर्मी कंपोस्टिंग प्लॉट मधील अस्तित्वातील कचरा उचलून मधूबापू जलकुंभाच्या मागील बाजूस कचरा स्थलांतरीत करणे.	२२,५०,७७८/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२३-२४
८	६९	१३/०६/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत देवपूर लाला सरदार भागातील मनपा मालकीचा दवाखान्याची (आरोग्यवर्धनी) दुरुस्ती करणे.	१८,६९,२७१/-	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
९	७०	१३/०६/२०२३	प्र.क्र.०३ मध्ये नोकील खाटीक ते नईम हाजी यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	९,९९,८१९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१०	७१	१३/०६/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये ताज अपार्टमेंट ते परदेशी चक्की पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,९९,७४७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
११	७२	१४/०६/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये राजगृह नगर भागात रस्ते डांबरीकरण करणे.	१९,८७,००६/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१२	७३	१४/०६/२०२३	प्र.क्र.०३ मध्ये देवपूर आग्रारोड ते अख्तर बेग यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	९,९८,५९९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३

१३	७४	१४/०६/२०२३	सं.नं.४०१ अलंकार सोसा.येथील उदयान विकसित करणे.	१९,८८,१२३/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१४	७५	१६/०६/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये श्रमसाफल्य कॉलनी भागात रस्ते डांबरीकरण करणे.	१९,८५,१९२/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१५	७६	१६/०६/२०२३	प्र.क्र.१ मध्ये वलवाडी भागातील वानखेडकर नगर येथे श्री. मनिष बैसाणे यांचे घरापासून ते कुसुमताई पाटील शाळे पावेतो व अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे.	१९,९०,८३५/-	मनपा हद्दीतील रस्ते, गटारी व अनुषंगिक क्कामे अंतर्गत
१६	७७	१६/०६/२०२३	प्र.क्र.१ देवपूर वलवाडी भागातील बोरसे नगर येथे विशाल निवास ते अड शिंपी यांचे घर ते अरुण पाटील ते तुळजाई फ्लोअर मिल ते महाजन हाउस पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,८७,१२४/-	मनपा हद्दीतील रस्ते, गटारी व अनुषंगिक क्कामे अंतर्गत
१७	७८	२०/०६/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये मुस्लिम नगर भागात कवसर भैय्या ते छोटू हाफिज यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९२,०९३/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१८	७९	२०/०६/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये १०० फुटी रोड ते शेख वायरमेन यांच्या घरापासून ते शाहीद चक्की पर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९९,७४७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१९	८०	२०/०६/२०२३	प्र.क्र.०८ मध्ये भिस्ती गल्ली ते शरद दुध डेअरी ते सलीम चक्की ते नगीना मस्जिद पर्यंत R.C.C. गटार करणे.	१९,९५,२३८/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
२०	८१	२०/०६/२०२३	प्र.क्र.०८ मध्ये लेन नं.२ अबू अन्सारी ते रमजान अन्सारी ते बाल्या चिचा यांचे घरापर्यंत R.C.C. गटार करणे.	१९,९५,२५७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
२१	८२	२०/०६/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये आशियाना कॉलनी भागात फारूक अल्युमिनियम पासून ते क्युबा मस्जिद पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	९,९६,२८७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत सन २०२२-२३
२२	८३	२२/०६/२०२३	धुळे मनपा मार्फत धुळे शहरात छत्रपती संभाजी महाराज पुतळा सुशोभिकरण करणे तसेच मोहाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक सुशोभिकरण करणे तसेच धुळे शहर सौदर्य करण बाबत नियुक्ती करण्यात येत आहे.	शासन नियमानुसार	आर्कीटिक नियुक्ती

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११६ प्रभाग क्रमांक ४ मधील कामांत बदल झाल्याने मयुर कॉलनी भागात रस्ते डांबरीकरण करणेबाबत असलेल्या कामांच्या निविदा दरास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती याबाबत सव्वीस्तर माहिती द्यावी.

म.सहा. अभियंता या विषयाचे आपण इस्टीमेट केले होते ते रु.४९,७८,३४२/- रकमेचे होते. ते मनपा निधी अंतर्गत होते. त्याची निविदा मागवली होती. ३ निविदाधारकांनी त्यात भाग घेतला होता. मागच्या बैठकीत आपण ते स्थायीपुढे ठेवले होते. आजून एक याच स्वरुपाचा रस्ता होता. तो जिल्हा नगरोत्थान मध्ये त्याचे काँक्रीट रस्तयाचे इस्टीमेट केले त्यामुळे हे दुसरे मयुर कॉलनीमधील रस्ते सुचवले १. स्वामी कोचिंग क्लासेस ते अतिथ्य बंगाला२. प्लॉट नं .१८ब ते स्पंदन बंगला ३. गिरनार बंगल्यापासून ते द्वारका बंगला पावेतो. हे डांबरी रस्ते करणार आहोत. मूळ रस्ता आपण नगरोत्थान मध्ये काँक्रीटीकरण साठी घेतला आहे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११४ दिनांक २०/०७/२०२३

धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र. ४ मधील श्री.शिवाजीराव चौधरी यांच्या घरापासून ते इंदिरा गार्डन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे बाबत मागणी करण्यात आली होती.त्यानुसार सदर कामास रक्कम रु.४९,७८,३४२/- मात्रच्या खर्चास जाक्र/धुमपा/बांवि/ ६७/ दि.१७/०८/२०२२ नुसार प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.तसेच सदर कामास मा.अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे.सदरचे काम मनपा निधी (देवपूर भागांतील मलनिःसारण योजनेमुळे खराब झालेले रस्ते व गटार नूतनीकरण करणे रु.१५ कोटी) अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार सदर कामाची ई-निविदा सूचना क्र.८० दि.१९/०८/२०२२ नुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे.त्यानुसार सदर निविदेत एकूण ३ निविदाधारकांनी भाग घेतला असून ठेकेदार श्री.सौरभ संजय कदमबांडे यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने असल्याने ठेकेदार श्री.सौरभ संजय कदमबांडे यांचे निविदा दर मंजुरीकरिता सदरचा विषय मे.स्थायी समिती समोर ठेवण्यात आला होता.तथापि सदरचे काम इतर शासन निधीमध्ये समाविष्ठ आहे किंवा कसे याबाबत प्रशासनाने खात्री करावी असे नमूद आहे.याबाबत खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

मा.अति.आयुक्त यांच्या दालनात झालेल्या बैठकीत प्रभाग क्र.४ मधील इंदिरा गार्डन ते जागृती मित्र मंडळाच्या बोर्डपावेतो रस्ता कॉक्रिट करणे काम जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत सादर करणे बाबत आदेशित करण्यात आले होते.त्यानुसार धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.१२३ दि.०१/०९/२०२२ नुसार अ.क्र.१०२ प्रभाग क्र.४ मधील इंदिरा गार्डन ते जागृती मित्र मंडळाच्या बोर्डपावेतो रस्ता कॉक्रिट करणे रक्कम रु.२,४९,९४,५०२/- मात्रच्या कामाचा प्रस्ताव जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत सादर करणे बाबत मान्यता देण्यात आली होती.त्यानुसार जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्रभाग क्र.४ मधील इंदिरा गार्डन ते जागृती मित्र मंडळाच्या बोर्डपावेतो रस्ता कॉक्रिट करणे रु.२,४९,९४,५०२/- मात्र रक्कमेस मा.जिल्हाधिकारी धुळे यांनी त्यांच्याकडील आदेश क्रमांक १२/क/कक्ष-५/ नपाप्र/ बांध/३६९/२०२३ दि.

२५/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.त्यानुसार सदर कामाची ई-निविदा सूचना क्रमांक १५ दि.१७/०४/२०२३ नुसार प्रसिद्ध करण्यात आली असून सदर कामाची निविदा दि.२४/०५/२०२३ रोजी उघडण्यात येणार आहे.

वरील दोन्ही कामे एकाच रस्त्याची आहे.तथापि धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र. ४ मधील श्री.शिवाजीराव चौधरी यांच्या घरापासून ते इंदिरा गार्डन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे या कामाची ई-निविदा दि.१९/०८/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.तसेच प्रभाग क्र.४ मधील इंदिरा गार्डन ते जागृती मित्र मंडळाच्या बोर्डपावेतो रस्ता कॉक्रिट करणे या कामाची ई-निविदा दि.१७/०४/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.तसेच मा.स्थायी समिती ठराव नंबर ३८ दि.२३/०३/२०२३ मध्ये नमूद केल्यानुसार प्रभाग क्र. ४ मधील श्री.शिवाजीराव चौधरी यांच्या घरापासून ते इंदिरा गार्डन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे हे काम दि.२३/०३/२०२३ पावेतो जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्रस्तावित होते.तथापि सदर कामास मा.जिल्हाधिकारी धुळे यांनी दि.२५/०३/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तथापि मा.आयुक्त यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार सदरचे काम प्रभाग क्र. ४ मधील श्री.शिवाजीराव चौधरी यांच्या घरापासून ते इंदिरा गार्डन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे ऐवजी प्रभाग क्र.४ मधील मयूर कॉलनी भागांतील १) श्री स्वामी कोचिंग क्लासेस ते आतिथ्य बंगला पावेतो २) प्लॉट नं.१८ ब पासून ते स्पंदन बंगला पावेतो व ३) गिरनार बंगल्यापासून ते द्वारका बंगला पावेतो सदरचे काम करणे बाबत आदेशित केले आहे.

सदर कामाच्या नावात बदल करणे बाबत व उक्त कामी श्री.सौरभ संजय कदमबांडे ठेकेदार यांचे अंदाजपत्रकीय दर मंजुरीस्तव तसेच वरीलप्रमाणे अहवाल मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रभाग क्र. ४ मधील श्री.शिवाजीराव चौधरी यांच्या घरापासून ते इंदिरा गार्डन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे ऐवजी प्रभाग क्र.४ मधील मयूर कॉलनी भागांतील १) श्री स्वामी कोचिंग क्लासेस ते आतिथ्य बंगला पावेतो २) प्लॉट नं.१८ ब पासून ते स्पंदन बंगला पावेतो व ३) गिरनार बंगल्यापासून ते द्वारका बंगला पावेतो असे कामात बदल करून सदर कामी कंत्राटदार **मे.श्री.सौरभ संजय कदमबांडे** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दरासमहाराष्ट्रमहानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर महिबुल्लाह

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११७	धुळे महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नविन वाहन (TIPPER) खरेदी करणेत आलेल्या कामास व त्यासाठी करण्यात आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.
म. नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.सुनिल बैसाणे	या विषयाबाबत सव्वीस्तर माहिती द्यावी.
म.साबिर खान	या विषयी संपूर्ण माहिती द्यावी. यापूर्वी खरेदी केलेली वाहने भंगारात पडलेले आहे.
म.भांडारपाल	धुळे महानगरपालिकेकरीता स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जो डिपीआर मंजूर झाला आहे त्या डीपीआरच्या अनुषंगाने दोन टिप्पर वाहन खरेदी करण्यासाठी रु. ३१ लाख प्राप्त झाले होते. टँकरसाठी ११ लाख रुपये असे अनुदान प्राप्त झाले होते. सदरचे अनुदान खर्च करण्यासाठी मा. आयुक्त साहेबांनी मंजूरी दिल्यानंतर याची जीईएम पोर्टलवर निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यात एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे १ डिसेंबर २०१६ च्या नियमानुसार १ कोटीच्या आत खरेदी करण्यास थेट वितरक किंवा पुरवठादार उपलब्ध न झाल्यामुळे आपल्या स्तरावर दर घेऊन मा आयुक्त सो. यांच्या मंजूरीने वाहने खरेदी केली. सदरचे वाहन अशोक लेलॅण्ड कंपनीचे आहे. पोर्टलवर स्पेसिफिकेशन होते ते स्पेसिफिकेशन अशोक लेलॅण्ड यांचेकडे असल्याने सदरचे वाहन खरेदी केले.
म.सुनिल बैसाणे	स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नविन वाहन खरेदी करणेत आले त्या बाबत माईनकर साहेबांनी माहिती दिली. जीईएम पोर्टलवर एकही निविदा प्राप्त झाली नाही?
म.भांडारपाल	एकही निविदा प्राप्त झाली नाही म्हणून आपण थेट वाहने खरेदी केली.
म.सुनिल बैसाणे	आपण यापूर्वी अशाप्रकारची वाहन खरेदी केले आहे का?
म.भांडारपाल	यापूर्वीही वाहन खरेदी केली आहे.
म.सुनिल बैसाणे	त्या वाहनाची आजची परिस्थिती काय ?
म.माईनकर	ॲब्युलन्स खरेदी केली आहे सदरचे वाहन कार्यरत आहे.
म.सुनिल बैसाणे	आता आपण कोणत्या प्रकारचे वाहने खरेदी केली?
म.भांडारपाल	आपण २ टिप्पर खरेदी केले. कचरा भरण्यासाठी मोठी गाडी असते.
म.सुनिल बैसाणे	सभापती महोदया, या मागचा अनुभव पाहिला जे वाहन खरेदी केले होते त्या वाहनांची अवस्था अशी की, ६ महिन्यांत ते नादुरुस्त झाले. हे जे नविन वाहने खरेदी केले आहे ते नादुरुस्त झाले तर याची सर्वस्वी जबाबदारी सनेर सो. तुमच्यावरही निश्चीत होऊ शकते. हा विषय मनपाच्या हिताचे आहे.सभागृहात याबाबत खुलासा करणे गरजेचे आहे. कारण धुळे मनपातील प्रशासकीय अधिकारी काम करत असतांना या सर्व गोष्टी तपासून करतात. आपण चांगले काम करत आहात परंतु आपल्याला विनंती आहे, जर वाहन खरेदी केले आहे तर त्याबाबतची खातरजमा करुनच ते ताब्यात घेण्यात यावे. विषय मनपा हिताचा असल्यामुळे याला मंजूरी देण्यात यावी.
म.साबिर खान	यापूर्वीही वाहने खरेदी करण्यात आली होती. परंतु ते ६ महिन्यांतच नादुरुस्त झाले. त्यावर खर्चही झाला. कंपन्या डिस्काउंट पण देतात तुम्ही टेंडर काढले आणि खरेदी करुन टाकली असे करुन नये. कंपनीबाबत खातरजमा करुनच खरेदी करण्यात यावी.

म.किरण अहिरराव — वाहन खरेदी होऊन गेली आहे. आणि आता हा विषय येथे आला आहे. हा आमचा अपमान आहे. आपण ही वाहने का खरेदी केली?

म.अति आयुक्त — या विषयाच्या बाबतीत सन २०१७-१८ ला मनपाला घनकचराच्या संदर्भामध्ये सरकारकडून २५ कोटीचा डीपीआर मंजूर करण्यात आला होता. त्यावेळेस मी राज्याच्या स्वच्छ भारत मिशन विभागालाच होतो. आणि पहिले १० प्रकल्प मंजूर झाले राज्याचे त्यात धुळे मनपाचाही आपण समावेश केला होता. आणि त्यात ही वाहने ही होती. तसेच ७९ घंटागाडया होता. यात आपण एमआरआय सेंटर डेव्हलप करतोय. डेव्हलप झाल्यानंतर तेथे ओला कचरा सुका कचरा ने आण करणे. त्यावर प्रोसेसिंग करणे. त्या ठिकाणी पाण्याची टँकरची गरज असते. तांत्रीक प्रक्रीया म्हणून २ टिप्पर , जेसिबी मागच्या डीपीआर मध्ये राहून गेले होत. आता आपण स्वच्छ भारत २ करतोय त्यात २ जेसीबी घेतले, एक पोकलॅण्ड घेतले आहे. आता डीपीआर मंजूरीसाठी येईल त्यावेळेस सभागृहाला मी लक्षात आणून देईन. हे तिनही विषय कार्योत्तर मंजूरीसाठी आले. ३१ मार्चच्या आत आपण हा शासन निधी खर्च केला नसता तर हा पैसा सरकार काढून घेणार होते. जीईएम पोर्टलवर जी पण खरेदी केली जाते त्या स्पेसिफिकेशन प्रमाणे सर्व नामांकित कंपन्यांना आपण कॉल केला होता. ते ऑनलाईन असते. त्या अनुषंगाने कोणतीच निविदा जीईएम पोर्टलवर आली नाही. त्याचा अर्थ असा असू शकतो. माझ्या मते नगरपालिकेची खरेदी आहे हा पैसा मिळाला नाही मिळाला असा त्यांच्या मनात संभ्रम असावा. पोर्टलवर सर्व गोष्टी टाकलेल्या असतात. शासनाला ६०% निधी होता व ४०% मनपाचा हिस्सा होता. असा १००% निधी खर्च करुन आपण ते १ कोटी पर्यंत केले आहे. सन्मा. सदस्यांनी मागचा अनुभव सांगीतला त्याबाबत माझा अनुभव सांगतो. मनपामध्ये आपण स्वतंत्र वाहन विभाग केला आहे. आज मी सदस्यांना विनंती करेन. वाहन विभागाला वाहन प्रमुख देण्यात आला आहे. तो त्या विषयात तज्ञ व्यक्ती देण्यात आला आहे असे मी ऐकून आहे. तुमच्या भावना समजून त्यांना लेखी स्वरुपात देऊन टाकू. त्या वाहनांमध्ये कुठलयाही परिस्थितीत दोन वर्षाचा कालखंडा मध्ये खर्च होणार नाही कंपनी कडून त्यांचे मेन्टेनंन्स असते. अशोक लेलॅण्ड ही राष्ट्रीय स्तरावरची नामांकित कंपनी आहे. संरक्षण मंत्रालयाला देखील ते वाहने पुरवत असतात. मेन्टेनंन्सची जबाबदारी आपण त्यांच्याकडून घेणारच आहोत. मागील वाहनांचा बाबतीत सार्वजनिक ठिकाणी बोलणे योग्य नाही. त्यासाठी आपण सभापती दालनात बसावे. त्यावर पण सव्वीस्तर माहिती मी देईन.

म.किरण अहिरराव — त्या टिप्परचा उपयोग काय होणार आहे? हे टिप्पर धुळे शहराकरता आहे का हद्दवाढ गावासाठी पण आहे?

म.अति. आयुक्त — एमआरआय साठी शहरातला ओला सुका कचरा येणार आहे आपल्याकडे वरखेडी रोडला तेथे आपले शेडचे बांधकाम सुरु आहे. कचऱ्याची ने आण व प्रोसेसिंग करता उपयोग होणार आहे. या वाहनांचा उपयोग करु शकतो. काही ठिकाणी अडचण आली तर याचा वापर होऊ शकतो. घनकचऱ्यासाठीच वापरले जातील असा काही भाग नाही. आपल्याला काही महत्वाचे काम त्या ठिकाणी कामाच्या सोईसाठी सर्व वाहने वापरु शकतो. ११ गावे वेगळी समजू नका ते पण मनपा हद्दीतच आहे.

म.किरण अहिरराव — कचरा वाहन्यासाठी आपण जे ट्रॅक्टर लावले होते माझ्या महिंदळे गावत ४.५ वर्षात एकही ट्रॅक्टर आलेले नाही. हद्दवाढ गावांना न्याय द्यावा.

म.अति. आयुक्त — तुमच्या अडचणी मला समजल्या आहे. त्याबाबत ही बैठक संपल्यानंतर मी तुम्हाला खुलासा करीन माझी विनंती आहे सर्व सन्मा. सदस्यांना आपण कचरा डेपोवर भेट द्यावी. गांडूळ प्रकल्पाला भेट द्यावी. १० वर्षापूर्वी काय होते व आता काय आहे हे लक्षात येईल. व आमची आरोग्याची टिम काय काम करते हे पण लक्षात येईल.

म.सभापती — हद्दवाढ गावांनाही प्राधान्य द्यावे. सर्वांना विचारात घेऊन त्याचा उपयोग करावा.

म.साबिर खान — कुत्रयांच्या विषयी कधी निविदा काढणार आहे? त्याबाबत कधी खरेदी होणार आहे?

म.अति. आयुक्त — सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यासाठी प्रशासन कटीबध्द आहे. काही तांत्रीक अडचणी असतात. धुळे शहरातील एनजीओ ने विनंती केली आहे. ते विनामूल्य शहरातील कुत्रयांचा बंदोबस्त करणार आहे. ती कालच फाईल आयुक्त महोदयांकडे गेली आहे. आपण त्यांना परवानगी देत आहोत.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच सदर कंपनीकडून वाहनांच्या दुरूस्तीबाबत हमी कालावधी (गॅरेंटी पिरेड) घेण्यात यावा व अटी शर्ती मध्ये समावेश करावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११५ दिनांक २०/०७/२०२३

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. स्व.म.अ.- २०१७/प्र.क्र.१०६/नवि-३४ दि. १० नोव्हे २०१७ अन्वये धुळे महानगरपालिकेच्या रक्कम रु. २५.८५१५ कोटी किमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र जिवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांनी घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्प जा.क्र./मुअ/नाशिक/ता.शा-३/ता. मा/ ९९५/२०१७ दि. २६/५/२०१७ अन्वये अटी व शर्ती नमुद करुन रक्कम रु.२५,८५,१५,२३७/- करीता तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

नगरविकास विभाग उक्त शासन निर्णय दि. १० नोव्हेंबर २०१७ मध्ये नमुद केलेल्या विवरणपत्रात अ.क्र.१६ मध्ये Tipper २ नग करीता रक्कम रु. ३१,००,०००/- मान्यता दिलेली आहे.

तरी स्पेसीफीकेशन प्रमाणे २ नग टिपर खरेदी करण्यास एकुण रु.६०,४२,६००/- मात्रचा खर्च केंद्र शासनाच्या GEM पोर्टलवरुन दर प्राप्त झालेले आहे. तरी शासन डिपीआर मधील रक्कम रु.३१,००,०००/- असुन सदर वाढीव रक्कम रु.२९,४२,६००/- मात्र धुळे मनपा फंडातुन खर्च करण्यास मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

नगरविकास विभाग उक्त शासन निर्णय १० नोव्हे २०१७ मध्ये परिच्छेद क्रं. ४.७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदी ई-मार्केटप्लेस (जी.ई.एम) पोर्टल वरुनच करणे बंधनकारक राहील. याशिवाय इतर पध्दतीचा अवलंब करुन खरेदी केल्यास, ती आर्थिक अनियमितता समजून शासनामार्फत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल. असे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय यांच्याकडील शा.नि.क्रं. संकिर्ण- २०१६/प्र.२१५/उद्योग-४ दि. २४ ऑगस्ट २०१७ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा करुन केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हरमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर नमुद केलेली कार्यपध्दती राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत केलेलीआहे. सदरच्या शासन निर्णयाचे परिच्छेद ११ अन्वये महानगरपालिका यांना ई-मार्केटप्लेसवर (GeM) खरेदी करणे बाबत निर्देश दिलेले आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग यांच्या खरेदीची सुधारीत नियमपुस्तीका दि. १/१२/२०१६ मधील परिच्छेद क्रं. ३.२.२ व ३.२.३ मध्ये उक्त शासन निर्णय दि. २४ ऑगस्ट २०१७ नुसार खरेदीदार विभागास गव्हमेंट ई-मार्केटप्लेस पोर्टलवर उपलब्ध असलेली वस्तु व सेवांची रु. ३ लाख व त्यावरील खरेदी सदर पोर्टलवरील पुरवठा धारकांकडून वस्तु व सेवांची गुणवत्ता निर्देश आणि पुरवठा कालावधी इत्यादी आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदेव्दारे (Online Bidding) किंवा रिव्हर्स ऑक्शन पध्दतीने खरेदी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्याकडील उक्त शासन निर्णय दि. १० नोव्हे. २०१७ अन्वये शासन निर्णय दि. २४/८/२०१७ अन्वये केंद्र शासनाच्या ई-मार्केटप्लेसवर ऑनलाईन बिडींग करण्यासाठी/रिव्हर्स ऑक्शन करण्यासाठी मंजूर रक्कम रु. ३१,००,०००/- मात्र तसेच मनपा फंडातील रक्कम रु.२९,४२,६००/- असे एकुण रक्कम रु. ६०,४२,६००/- करीता मान्यता देण्यात आलेली आहे.

धुळे महानगरपालिका भांडार विभाग मार्फत मा. आयुक्त यांच्या मान्यतेने GEM/२०२३/B/३२३१५५२ दि. ६/३/२०२३ अन्वये निविदा प्रसिध्द केली होती.

तरी त्यांची निविदा अंतीम मुदत १६/३/२०२३ असुन सदर निविदामध्ये एकही पुरवठाधारक यांनी भाग घेतलेला नाही. परंतु सदर वाहन म.न.पा कार्यासाठी तातडीचे असल्याने सदर वाहन खरेदी करणे गरजेचे आहे.

शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.१ डिसेंबर २०१६ नुसार कार्यवाही करावी असे नमुद आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४ दि.२४ ऑगस्ट २०१७ वरील शासन निर्णय क्र.८ गर्व्हनमेंट ई-मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवर उपलब्ध असलेली वाहने (मोटार कार) खरेदीदार विभागांना खरेदी करण्यास मुभा राहील. तथापि, दि.१/१२/२०१६ मधील सुधारित खरेदी धोरणांतर्गत ३.२.३ मध्ये वाहन खरेदीच्या संदर्भात नमुद करण्यात आलेल्या तरतुदी यापुढेही पुर्ववत राहतील. **कोणत्याही वाहनांचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरण यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि मोटारवाहन खरेदी रु.१ कोटी पेक्षा जास्त असल्यास सदर खरेदी ई निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी. अशा सर्व**

खरेदीचा तपशिल खरेदीदार विभाग त्यांच्या संकेतस्थळावर आणी ई निविदेच्या पोर्टलवर प्रसिध्द करेल.

वरील शासन निर्णयानुसार GEM पोर्टलवरील प्रसिध्द केलेल्या (Bid) निविदा मध्ये एकही विक्रेत्याने सहभाग नोंदविलेला नसल्याने सदर निर्णयानुसार मोटर वाहन खरेदी रु.१ कोटी पेक्षा कमी असल्याने मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरण यांच्या दरपत्रकामार्फत खरेदी करण्यास मुभा राहिल असे नमुद केलेले आहे.तरी सदर वाहन वितरक यांच्या कडेस बाजार भाव तपास केला असता नमुद स्पेसीफीकेशन प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

नमुद दरानुसार Ashok Leyland कंपनीचे मुळ उत्पादक Mahesh Auto Engineering Works यांचे कमीत कमीचे दर वरील स्पेसीफीकेशन प्रमाणे रक्कम रु.६५,९०,७९४/-मात्र दर्शवीलेला आहे. त्यानुसार शासन निर्णयातील DPR नुसार रु.३१,००,०००/-व मनपा फंडातील रक्कम रु.३४,९०,७९४/- असे एकुण रक्कम रु.६५,९०,७९४/- मात्र खर्च येणार आहे.

तरी यापुर्वी GeM पोर्टल वरील दर एकुण रक्कम रु. ६०,४२,६००/- मात्र खर्च येणार होता त्यामध्ये शासन रक्कम ३१,००००००/-व मनपा फंडातील रक्कम रु. २९,४२,६००/- मात्रस प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली होती.परंतु GeM पोर्टलवर निविदा (Bid) प्रसिध्द करण्यात आली असता एकही निविदा धारकाचे दर प्राप्त न झाल्यामुळे शासन निर्णया नुसार वितरका मार्फत वाहन खरेदी करण्यास निर्देश असल्याने मनपा फंडा मधुन रक्कम रु.३४,९०,७९४/- मात्रची वाढीव प्रशासकीय मान्यता घेणे गरजेचे असल्याने यापुर्वी घेण्यात आलेली रक्कम रु.२९,४२,६००/- मात्रची प्रशासकीय मान्यता रद्द करणे व वाढीव रक्क्म रु ३४,९०,७९४/- मात्रस प्रशासकीय मान्यता मिळवुन शासन निर्णयानुसार वाहन खरेदी हि थेट उत्पादकाचे वितरक **Mahesh Auto Engineering Works(Ashok Leyland)** यांचेकडुन करणेस व येणारा खर्च रक्क्म रु ६५,९०,७९४/- मान्यता मिळणेस व त्याप्रमाणे वाहन पुरवठा आदेश देवुन प्राप्त बिल रक्क्म रु. ६५,९०,७९४/- अदा करण्यास नमुना नं. २२ वर स्वाक्षरी होवुन मान्यता व्हावी.

तरी सदर शासन प्राप्त रक्कम ही ३१ मार्च च्या आत खर्च करावयाची असल्याने तातडीची बाब म्हणुन सदर प्रकीयेस महानगरपालिका अधिनियम ५(२)२ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी घेण्यासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर करण्यास मंजुरी मिळणेस्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नविन वाहन (TIPPER) खरेदी करणेत आलेल्या कामास **Mahesh Auto Engineering Works(Ashok Leyland)** यांचेकडुन घेणेस सदरचे कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५ (२) (२) अन्वये येणारा खर्च रक्क्म रु ६५,९०,७९४/- खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. तसेच सदर कंपनीकडून वाहनांच्या दुरूस्तीबाबत हमी कालावधी (गॅरेटी पिरेड) घेण्यात यावा व अटी

शर्ती मध्ये समावेश करावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागूल

अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११८ धुळे महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नविन वाहन (Tanker) खरेदी करणेत आलेल्या कामास व त्यासाठी करण्यात आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कल्याणी अंपळकर सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.किरण अहिरराव विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११६ दिनांक २०/०७/२०२३

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. स्व.म.अ.- २०१७/प्र.क्र.१०६/नवि-३४ दि. १० नोव्हे २०१७ अन्वये धुळे महानगरपालिकेच्या रक्कम रु. २५.८५१५ कोटी किमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र जिवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांनी घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्प जा.क्र./मुअ/नाशिक/ता.शा-३/ता. मा/ ९९५/२०१७ दि. २६/५/२०१७ अन्वये अटी व शर्ती नमुद करुन रक्कम रु. २५,८५,१५,२३७/- करीता तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

नगरविकास विभाग उक्त शासन निर्णय दि. १० नोव्हेंबर २०१७ मध्ये नमुद केलेल्या विवरणपत्रात अ.क्र.१५ मध्ये WATER TANKER FOR WINDROWS करीता रक्कम रु. ११,६३,०००/- करीता मान्यता दिलेली आहे.

तरी स्पेसीफीकेशन प्रमाणे वाहन खरेदी करण्यास एकुण रु.१६,१२,५०७/- मात्रचा खर्च केंद्र शासनाच्या GEM पोर्टलवरुन दर प्राप्त झालेले आहे. तरी शासन डिपीआर मधील रक्कम रु.११,६३,०००/- असुन सदर वाढीव रक्कम रु.४,५९,५०७/- मात्र धुळे मनपा फंडातुन खर्च करण्यास मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

नगरविकास विभाग उक्त शासन निर्णय १० नोव्हे २०१७ मध्ये परिच्छेद क्रं. ४.७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदी ई-मार्केटप्लेस (जी.ई.एम) पोर्टल वरुनच करणे बंधनकारक राहील.

याशिवाय इतर पध्दतीचा अवलंब करुन खरेदी केल्यास, ती आर्थिक अनियमितता समजून शासनामार्फत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल. असे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय यांच्याकडील शा.नि.क्रं. संकिर्ण- २०१६/प्र.२१५/उद्योग-४ दि. २४ ऑगस्ट २०१७ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा करुन केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हरमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर नमुद केलेली कार्यपध्दती राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत केलेली आहे. सदरच्या शासन निर्णयाचे परिच्छेद ११ अन्वये महानगरपालिका यांना ई-मार्केटप्लेसवर (GeM) खरेदी करणे बाबत निर्देश दिलेले आहे.महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग यांच्या खरेदीची सुधारीत नियमपुस्तीका दि. १/१२/२०१६ मधील परिच्छेद क्रं. ३.२.२ व ३.२.३ मध्ये उक्त शासन निर्णय दि. २४ ऑगस्ट २०१७ नुसार खरेदीदार विभागास गव्हर्मेट ई-मार्केटप्लेस पोर्टलवर उपलब्ध असलेली वस्तु व सेवांची रु. ३ लाख व त्यावरील खरेदी सदर पोर्टलवरील पुरवठा धारकांकडून वस्तु व सेवांची गुणवत्ता निर्देश आणि पुरवठा कालावधी इत्यादी आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदेव्दारे (Online Bidding) किंवा रिव्हर्स ऑक्शन पध्दतीने खरेदी करण्याबाबत निदेश दिलेले आहेत.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्याकडील उक्त शासन निर्णय दि. १० नोव्हे. २०१७ अन्वये शासन निर्णय दि. २४/८/२०१७ अन्वये केंद्र शासनाच्या ई- मार्केटप्लेसवर ऑनलाईन बिडींग करण्यासाठी/रिव्हर्स ऑक्शन करण्यासाठी मंजूर रक्कम रु. ११,६३,०००/- मात्र तसेच मनपा फंडातील रक्कम रु.४,५९,५०७/- असे एकुण रक्कम रु. १६,१२,५०७/- करीता मान्यता देण्यात आलेली आहे. धुळे महानगरपालिका भांडार विभाग मार्फत मा. आयुक्त यांच्या मान्यतेने GEM/२०२३/B/३२३१५५२ दि. ६/३/२०२३ अन्वये निविदा प्रसिध्द केली होती.

तरी त्यांची निविदा अंतीम मुदत १६/३/२०२३ असुन सदर निविदामध्ये एकही पुरवठाधारक यांनी भाग घेतलेला नाही. परंतु सदर वाहन शहरातील नागरीकांच्या सेवेसाठी घेणे तातडीचे असल्याने सदर वाहन खरेदी करणे गरजेचे आहे. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.१ डिसेंबर २०१६ महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४ दि.२४ऑगस्ट २०१७ वरील शासन निर्णय क्र.८ गर्व्हनमेंट ई-मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवर उपलब्ध असलेली वाहने (मोटार कार) खरेदीदार विभागांना खरेदी करण्यास मुभा राहील. तथापि, दि.१/१२/२०१६ मधील सुधारित खरेदी धोरणांतर्गत ३.२.३ मध्ये वाहन खरेदीच्या संदर्भात नमुद करण्यात आलेल्या तरतुदी यापुढेही पुर्ववत राहतील. कोणत्याही वाहनांचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरण यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि मोटारवाहन खरेदी रु.१ कोटी पेक्षा जास्त असल्यास सदर खरेदी ई निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी. अशा सर्व खरेदीचा तपशिल खरेदीदार विभाग त्यांच्या संकेतस्थळावर आणी ई निविदेच्या पोर्टलवर प्रसिध्द करेल.

वरील शासन निर्णयानुसार GEM पोर्टलवरील प्रसिध्द केलेल्या (Bid) निविदा मध्ये एकही विक्रेत्याने सहभाग नोंदविलेला नसल्याने सदर निर्णयानुसार मोटर वाहन खरेदी रु.१

कोटी पेक्षा कमी असल्याने मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरण यांच्या दरपत्रकामार्फत खरेदी करण्यासाठी मे.टाटा मोटर्स यांनी स्पेसीफीकेशन नुसार खर्च सादर केलेला आहे.

नमुद दरानुसार Ashok Leyland कंपनीचे मुळ उत्पादक Aparna Automotives यांचे कमीत कमीचे दर वरील स्पेसीफीकेशन प्रमाणे रक्कम रु. १८,८५,०००/- मात्र दर्शवीलेला आहे. त्यानुसार शासन निर्णयातील DPR नुसार रु. ११,६३,०००/- व मनपा फंडातील रक्कम रु.७,२२,०००/- असे एकुण रक्कम रु.१८,८५,०००/- मात्र खर्च येणार आहे.तरी यापुर्वी GeM पोर्टल वरील दर एकुण रक्कम रु.१६.१२,५०७/- मात्र खर्च येणार होता त्यामध्ये शासन रक्कम ११,६३,०००/- व मनपा फंडातील रक्कम रु. ७,२२,०००/- मात्रस प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली होती.

परंतु GeM पोर्टलवर निविदा (Bid) प्रसिध्द करण्यात आली असता एकही निविदा धारकाचे दर प्राप्त न झाल्यामुळे शासन निर्णया नुसार वितरका मार्फत वाहन खरेदी करण्यास निर्देश असल्याने मनपा फंडा मधुन रक्कम रु.७,२२,०००/- मात्रची वाढीव प्रशासकीय मान्यता घेणे गरजेचे असल्याने यापुर्वी घेण्यातआलेली रक्कम रु. ४,५९,५०७/- मात्रची प्रशासकीय मान्यता रद्द करणे व वाढीव रक्कम रु ७,२२,०००/- मात्रस प्रशासकीय मान्यता मिळवून शासन निर्णयानुसार वाहन E-खरेदी हि थेट उत्पादक **Aparna Automotives (Ashok Leyland)** यांचेकडुन करणेस व येणारा खर्च रक्कम रु. १८,८५,०००/- मान्यता मिळणेस व त्याप्रमाणे वाहन पुरवठा आदेश देवुन प्राप्त बिल रक्कम रु. १८,८५,०००/- अदा करण्यास नमुना नं. २२ वर स्वाक्षरी होवुन मान्यता व्हावी.

तरी सदर शासन प्राप्त रक्कम ही ३१ मार्च च्या आत खर्च करावयाची असल्याने तातडीची बाब म्हणुन सदर प्रकीयेस महानगरपालिका अधिनियम ५ (२) २ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी घेण्यासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नविन वाहन (Tanker) खरेदी करणेचे काम **Aparna Automotives (Ashok Leyland)** यांचेकडुन घेणेस सदरचे कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५ (२) (२) अन्वये येणारा खर्च रक्कम रु १८,८५,०००/- खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११९ धुळे महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत Fire Extinguishers खरेदी करणेत आलेल्या कामास व त्यासाठी करण्यात आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे याबाबत सव्वीस्तर माहिती द्यावी.

म.सहा. आरोग्याधिकारी वरखेडी रोड येथे मनपाचा स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्लांटचे काम सुरु आहे. १० नोव्हेंबर २०१७ रोजी २५ कोटीचा डीपीआर मंजूर झाला होता. यात काही साहित्य खरेदी केले आहे. हा सगळा डाटा अग्निशमन विभागामार्फत कुठल्या प्रकारचा खरेदी करावा याबाबत मार्गदर्शन घेऊन भांडार विभागा मार्फत खरेदी करण्यात आले आहे.

म.सुनिल बैसाणे याचा उपयोग काय आहे? हे नग कुठुन खरेदी केले आहे? त्या प्रकल्पाची आजची परिस्थिती काय आहे?

म.चंद्रकांत जाधव हे फायर एस्क्टींग्युशर मशिन जे आहे ते कंपोस्ट डोपोच्या प्लांटवर आग लागू नये, सेफटी म्हणून ठिकठिकाणी लावायचे आहे. ४० युनिट खरेदी करायचे होते. त्या संदर्भात कार्यवाहीसाठी भांडार विभागामार्फत प्रस्तावित केले होते. अग्निशमन विभागामार्फत स्पेसिफिकेशन घेऊन पोर्टलवरुन खरेदी केली आहे.

म.सुनिल बैसाणे वाहन खरेदी करतांना पोर्टलवर एकही निविदा आली नाही आणि फायर एस्क्टींग्युशर मशिन खरेदी करण्यासाठी निविदा आल्या पोर्टलवरुन खरेदी करणे हे क्रमप्राप्त आहे का?

म.चंद्रकांत जाधव पोर्टलवरुन घेणे क्रमप्राप्त आहे.

म.सुनिल बैसाणे नाही घेतले तर काय होऊ शकते?

म.अति. आयुक्त ऑडीटसाठी ऑब्जेक्शन येऊ शकते. त्याबाबत लेखापरिक्षक सांगु शकतील.

म.सुनिल बैसाणे कारण जीईएम पोर्टल वरुन आपण ट्रॅक्टर खरेदी केले होते. त्यात जर बिघाड झाला तर कुठल्या सर्व्हीस सेंटरवर टाकायचे याबाबत काहीच विषय नव्हता. त्या एजन्सीचे महाराष्ट्रात कुठेही स्टोअर नव्हते. अशा पोर्टलवर येणारी एजन्सी असेल आणि आपल्याकडे वाहनांसंदर्भात सोई सुविधा ज्या वाहन दुरुस्तीकरीता आवश्यक आहे त्या नसतील तर त्या वस्तु जीईएम पोर्टलवरुन घेणे क्रमप्राप्त नाही. तर कुठल्या आधारावर तुम्ही या गोष्टी जीईएम पोर्टलवरुन घेत आहात? यात शासनाचा निधी आहे तसेच यात मनपाचाही हिस्सा असतो. तपासणी करणे गरजेचे आहे. आपण ती तपासणी केली होती का? हे फायर एस्क्टींग्युशर नादुरुस्त झाले तर याबाबत काय करावे? याबाबतीत काही उपाययोजना आहे का? खुलासा करावा.

म.अति. आयुक्त आपण हे जे साहित्य घेतले आहे. यासाठी अग्निशमन दलाचे अधिकारी जो पर्यंत त्याचे सर्टीफिकेशन देत नाही, स्पेसिफिकेशनचा गॅरंटी पिरियड असतो, त्याने त्या कंपन्या नमुद करुन दिलेल्या आहे त्याच कंपनी आपण जीईएम पोर्टलवर दिलेल्या आहे. जीईएम पोर्टलवरुन जी खरेदी होते त्या कंपनीकडून जो पुरवठा केला जातो त्याला गॅरंटी पिरियड दिला असतो. तो त्याला बंधनकारक असतो. कचरा डेपोवर वेळोवेळी अशा अडचणी येतात की, अचानक

आग लागणे, फायर ब्रिगेड तिथे पोहचायला कालावधी लागतो त्यादृष्टीने हे साहित्य घेणे गरजेचे असते. तो डिपीआरचाच एक भाग होता. त्यांना पण आयएसआय मानांकन असते. पोर्टलवर रजिस्ट्रेशन केलेल्या कंपन्या असतात. मागच्याही अडचणी होत्या त्या तपासून हा खुलासा केला आहे.

म.सुनिल बैसाणे — मागे काय घडले हे तपासणे येणाऱ्या अधिकाऱ्याला बंधनकारक असते.त्यामुळे जे जे कुणी अधिकारी ज्या ज्या विभागाची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात येते त्या अधिकाऱ्याची जबाबदारी आहे त्याने चार्ज घेण्याआधी मागे काय काय घडून गेले आहे याचा अभ्यास करुन पुढे ती जबाबदारी स्वीकारायची असते. त्यामुळे तुम्ही हे नाकारु शकत नाही. आताची परिस्थिती काय आहे आम्ही वस्तुस्थितीवर बोलत आहोत मागील चुका होऊ नये यासाठी आम्ही बोलतोय. कचरा डेपोवर अनेकवेळा कचरा सुध्दा पेटवण्यात येतो. या सर्व गोष्टी तपासाव्या हा प्रशासनाने आणलेला विषय आहे. यात प्रशासनाची सर्वस्वी जबाबदारी राहिल. विषयाला मंजूरी द्यावी.

म.कल्याणी अंपळकर — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.किरण अहिरराव — विषय मंजूर करावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याप्रमाणे प्रशासनाने दक्षाता घ्यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११७ दिनांक २०/०७/२०२३

भारत अभियान (नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास । महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. स्व.म.अ.- २०१७/प्र.क्र. १०६/नवि- ३४ दि. १० नोव्हे २०१७ अन्वये धुळे महानगरपालिकेच्या रक्कम रु. २५.८५१५ कोटी किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांनी घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्प जा.क्र./मुअ/नाशिक/ ता.शा-३/ता. मा/ ९९५/२०१७ दि. २६/५/२०१७ अन्वये अटी व शर्ती नमुद करुन रक्कम A. २५,८५,१५,२३७/- करीता तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

नगरविकास विभाग उक्त शासन निर्णय दि. १० नोव्हेंबर २०१७ मध्ये नमुद केलेल्या विवरणपत्रात अ.नं.११ मध्ये Fire Extinguishers करिता रक्कम १,९३,०६०/- करीता मान्यता दिलेली आहे. धुळे महानगरपालिका घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्पाच्या मंजुर प्रस्तावानुसार GeM पोर्टल वरील स्पेसिफीकेशन प्रमाणे खरेदी करणे अपेक्षित आहे.

नगरविकास विभाग उक्त शासन निर्णय १० नोव्हे २०१७ मध्ये परिच्छेद क्रं. ४.७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालात नमुद उपकरणे/मशीन / यंत्रे इत्यादीची खरेदी गव्हरमेंट ई-मार्केटप्लेस (जी.ई.एम) पोर्टल वरुनच करणे बंधनकारक राहील. याशिवाय इतर पध्दतीचा अवलंब करुन खरेदी केल्यास, ती आर्थिक अनियमितता समजून शासनामार्फत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल. असे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय यांच्याकडील शा.नि.क्र. संकिर्ण- २०१६/प्र.२१५/उद्योग-४ दि. २४ ऑगस्ट २०१७ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा करुन केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हरमेंट ई- मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर नमुद केलेली कार्यपध्दती राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत केलेली आहे. सदरच्या शासन निर्णयाचे परिच्छेद ११ अन्वये महानगरपालिका यांना ई- मार्केटप्लेसवर (GeM) खरेदी करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग यांच्या खरेदीची सुधारीत नियमपुस्तीका दि १/१२/२०१६ मधील परिच्छेद क्रं. ३.२.२ व ३.२.३ मध्ये उक्त शासन निर्णय दि. २४ ऑगस्ट २०१७ नुसार खरेदीदार विभागास गव्हमेंट ई-मार्केटप्लेस पोर्टलवर उपलब्ध असलेली वस्तु व सेवांची रु. ३ लाख व त्यावरील खरेदी सदर पोर्टलवरील पुरवठा धारकांकडून वस्तु व सेवांची गुणवत्ता निर्देश आणि पुरवठा कालावधी इत्यादी आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदेव्दारे (Online Bidding) किंवा रिव्हर्स ऑक्शन पध्दतीने खरेदी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी सदर विवरण पत्रानुसार Fire Extinguishers करिता रक्कम रु. १,९३,०६०/- उपलब्ध आहेत.केंद्र शासनाच्या ई-मार्केटप्लेसवर GeM वर Fire Extinguishers ची एकाची रक्कम रु.४,९००/- निश्चित केलेली आहे. त्यानुसार सदर रक्कमे मध्ये नग ३९ खरेदी करणेस रक्कम रु.१,९१,१००/- मात्र निश्चित केलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्याकडील उक्त शासन निर्णय दि. १० नोव्हे. २०१७ अन्वये धुळे महानगरपालिकेच्या मंजुर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यता अंतर्गत Fire Extinguishers खरेदीस उद्योग व उर्जा विभागाच्या शासन निर्णय दि. २४/८/२०१७ अन्वये केंद्र शासनाच्या ई- मार्केटप्लेसवर ऑनलाईन बिडींग करुन आवश्यक असल्यास/ रिव्हर्स ऑक्शन करण्यासाठी करीता मान्यता मिळावी ही विनंती.

सदर केंद्र शासनाच्या GeM पोर्टलवर निविदा प्रसिध्द करण्यासाठी व निविदा दर प्राप्त करण्यासाठी कमीत कमी १० दिवस मुदत दयावी लागते तरी सदर निधी हा शासन निर्णया नुसार ३१ मार्च २०२३ च्या आत खर्च करण्यास मान्यता दिलेली होती तरी सदर GeM पोर्टलवर निविदा प्रसिध्द न करता थेट दरपत्रक प्राप्त केलेले असता त्यामध्ये २ पुरवठाधारक यांचे दर प्राप्त झालेले आहे तरी दरांबाबत योग्य ती तुलना होत नसल्याने सदर दरांबाबत बाजार भाव तपास करुन दर प्राप्त करण्यात आलेले आहे. त्यानुसार ३ निविदर धारक यांचे दर प्राप्त झालेले असुन दराबाबत स्पर्धात्मक तुलना करुन सदर दरपत्रक सादर करण्यात येत आहे.

उक्त निविदाधारकांमध्ये Rayon Protections Pvt. Ltd यांनी वरील स्पेसीफीकेशन प्रमाणे खर्च रु. ०१,८७,९२०/- मात्र दर्शवीलेला आहे. सदर प्राप्त निधी रक्कम रु.०१,९३,०६०/- मात्र उपलब्ध आहे त्यामध्ये येणारा खर्च रु. ०१,८७,९२०/- असल्याने सदर शासनांचा रक्कम रु.५,१४०/- मात्र रक्कम शिल्लक राहणार आहे.

तरी सदर खर्च ३१ मार्च च्या आत खर्च करावयाचा असल्याने तातडीची बाब म्हणुन सदर पुरवठा धारकास पुरवठा आदेश देवून रक्कम अदा करण्यास नमुना नं २२ वर स्वाक्षरी होवुन सदर प्रकीयेस महानगरपालिका अधिनियम ५ (२) २ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी घेण्यासाठी स्थायी समिती पुढे सादर करण्यास मंजुरी मिळणेस्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत Fire Extinguishers खरेदी करणेचे काम **Rayon Protections Pvt. Ltd** यांचेकडुन घेणेस सदरचे कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५ (२) (२) अन्वये येणारा खर्च रक्कम रु ०१,८७,९२०/- खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- १२० धुळे महानगरपालिका कडील मा.महापौर सो यांच्या करिता वाहन खरेदी करणेसाठी येणा-या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे या ठिकाणी सर्वांना वाहानांची गरज आहे. हा अन्याय आमच्यावरही झाला आहे. सभापती असतांना ज्या प्रमाणे महापौरांची वाहन खरेदी होते त्याचप्रमाणे उपमहापौर आहे,स्थायी समिती सभापती आहे. अधिकारी ज्यांना ज्यांना गाडीचा दर्जा आहे अशा सर्व अधिकाऱ्यांना आपण तरतूद यामध्ये करण्यात यावी. मध्यंतरीच्या काळात नगरसचिव साहेबांच्या ही काही मागण्या होत्या त्याही विचाराधीन करण्यात याव्या. महापौरांनी वाहन खरेदी झाल्यानंतर तात्काळ इतरांचीही वाहन खरेदी करण्यात यावी.

म.विजय जाधव विषय मंजूर करावा.

म.नरेंद्र चौधरी सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच मनपाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून इतर वाहने खरेदी करणेबाबत निर्णय घेण्यात येईल.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११८ दिनांक २०/०७/२०२३

धुळे महानगरपालिका कडील मा.महापौर सो यांच्या करिता वाहन खरेदी करावयाचे आहे. सदर वाहन खरेदी करणेस सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात प्रशासना मार्फत तरतूद करण्यात आलेली आहे. तरी मा.महापोर सो यांच्या करिता नविन वाहन खरेदी करणे कामी मा. आयुक्त सो यांचे मंजुरीने GeM पोर्टल Bid क्र. २०२३/B/३५७४२९७ दि. १५/०६/२०२३ ने प्रसिध्द करण्यात आलेली असता अंतिम मुदत दि. २६/०६/२०२३ होती.

तरी अंतीम मुदत संपलेली असुन सदर प्रक्रीया पुढे करणे करीता प्राप्त निविदाचे तांत्रिक लिफाफे (Technical Bid) उघडणेस मा. आयुक्त सो यांच्या मंजुरीने (Bid) तपासली असता एकही निविदा धारकांचे दर प्राप्त झाले नाही.

सदर बिड मध्ये एक ही पुरवठा धारक यांनी सहभाग घेतलेला नसल्यामुळे सदर वाहन खरेदी करणेस महिंद्रा & महिंद्रा, धुळे शोरुम येथे तपास केला असता सदरचे वाहनांची किंमत रु.१६.६२,९६५/-आहे व GeM पोर्टल वर सदरची वाहनांची किंमत १४,१०,१५६/- मात्र आहे तरी शोरुमची किंमत ही २,५२,८०९/- जास्तीची आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय संकीर्ण २०१६/प्र.क्र. २१५/ उद्योग ४ दि. २४ ऑगष्ट २०१७ च्या शासकीय विभागांनी करावयाच्या खरेदी साठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा केंद्र शासनाने विकसीत केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केट प्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणे बाबतच्या निर्णयात खरेदीची सुधारित नियम पुस्तीक दि.३१/१२/२०१६ मधील परिच्छेद क्र.३:२:३ वाहन खरेदीच्या संदर्भात नमुद करण्यात आलेले आहे. तसेच आलेल्या तरतुदी यापुढेही पूर्ववत राहतील असे नमूद केलेले आहे.

परंतु कोणत्याही वाहनाचे DGSRD किंवा उत्पादक/वितरक निविदेमध्ये (Bid) भाग घेतीलच असे नाही त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/वितरक यांच्याकडुन दरपत्रका मार्फत देखील खरेदी करता येईल तथापि मोटार वाहन खरेदी रु. १ कोटी पेक्षा जास्त असल्यास सदर खरेदी ई- निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यांत यावी. अशा सर्व खरेदीचा तपशिल खरेदीदार विभाग त्यांच्या संकेत स्थळावर आणि ई-निविदेच्या पोर्टलवर प्रसिध्द करेल असे नमुद आहे.

तरी सदरची खरेदी ही १ कोटी रक्कमेच्या आत असल्याने सदरचे वाहन खरेदी ही धुळे म.न.पा. रक्कमेतून करावयाची आहे. सदर वाहन थेट उत्पादक यांच्या कडुन GeM पोर्टल वर खरेदी करणेस तसा पुरवठा आदेश देण्याकरिता व त्यासाठी येणारा खर्च रुपये १४,१०,१५६/- मात्रस मान्यता मिळणेस व महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) च्या मान्यते करिता सदरचा विषय स्थायी समिती कडे सादर करण्यास मंजुरी मिळणेस्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका कडील मा.महापौर सो यांच्या करिता वाहन खरेदी करणेसाठी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्री. विजय बापू जाधव

अनुमोदक :- श्री. नरेंद्र रूपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-१२१ छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त करण्यात आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कल्याणी अंपळकर सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११९ दिनांक २०/०७/२०२३

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सालाबादा प्रमाणे मनपा मार्फत आवश्यक ती व्यवस्था करण्यात येतात तथापी म.महापौर म.न.पा धुळे तसेच सन्मा पदाधिकारी यांनी तसेच शिवप्रेमी संघटना यांनी शिवजयंती निमित वाढीव कामे, सुशोभिकरण, लेझर लाईट शो, डी.जे.साऊड व्यवस्था इ. अतिरीक्त व्यवस्था करणे बाबत सुचीत केल्याप्रमाणे सदरची कामे करण्यात आली. सदरची कामे तातडीने करणे बाबत मे. धनदाई मंडप डेकोरेटर्स ॲण्ड केटरर्स, धुळे यांना करणे बाबत आदेश आहेत. उक्त कामे करणे श्री.नागसेन बोरसे, उपमहापौर, म.न.पा धुळे यांनी लेखी पत्र दिले आहे.

ज्या अर्थी सदरचे काम महापुरूषांचे जयंती उत्सव करीता असुन त्वरीत अतितातडीच्या परिस्थितीत करणे आवश्यक आहे.

व ज्या अर्थी अतितात्काळ परिस्थितीत काम करून घेण्यासाठी म.आयुक्त महानगरपालिका यांना काही अधिकार प्रदान केलेले आहेत.

धुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) नुसार प्राप्त अधिकारान्वये धुळे महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात महापुरूषांचे जयंती उत्सव या लेखाशिर्षातून उक्त काम **धनदाई मंडप डेकोरेटर्स ॲण्ड केटरर्स, धुळे** यांच्याकडुन अंदाजपत्रकिय दराने तात्काळ करून घेण्यास रु.६,०६,९९२/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७(३) प्रमाणे कार्यात्तर मंजुरी होण्यास म.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस स.सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालीयन अहवालास अधिन राहून छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त करण्यात आलेल्या अनुषंगिक काम **धनदाई मंडप डेकोरेटर्स ॲण्ड केटरर्स,धुळे** यांच्याकडून अंदाजपत्रकिय दराने तात्काळ करून घेण्यास रु.६,०६,९९२/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७(३) प्रमाणे कार्यात्तर मंजुरी देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- श्री.नरेंद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१२२ जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना अंतर्गत सन २०२२-२३ प्र.क्र.११ मध्ये भूमापन क्र.३३६/२ ते ४ प्रीती सुधाजी इंग्लिश मेडियम स्कूल येथे शासकीय मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. साबीर शेठ सदरची जागा मनपा मालकीची आहे किंवा कसे . तसेच सदर काम कोणत्या निधीतून घेण्यांत आले आहे.

म. नगरसचिव सदर जागा मनपा मालकीची असून त्याकामासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत १०० टक्के निधी प्राप्त होणार आहे.

म. विजय जाधव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२० दिनांक २०/०७/२०२३

जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना अंतर्गत सन २०२२-२३ प्र.क्र.११ मध्ये भूमापन क्र.३३६/२ ते ४ प्रीती सुधाजी इंग्लिश मेडियम स्कूल येथे शासकीय मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२३/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३९,६५,०००/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./९५१/२० दि.२१/०३/२०२३ अन्वये रक्कम रु. **३९,६५,७७५/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./०२/२०दि. ०५/०४/२०२३ रोजी दैनिक देशदूत/समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.

१९/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.गणेश बोरसे	शे.३.००% जास्त	
२	अे.के.सैफी	**शे-२०.००% कमी**	**सर्वात कमी दर**
३	श्री.कुणाल जायकर पवार	अंदाजपत्रक दर	
४	मे.हिंद कन्सट्रक्शन	शे.१.००% जास्त	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **अे.के.सैफी** यांचे दर **शे.-२०.०० % कमी** दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. तरी **अे.के.सैफी** यांनी दि.२६/०६/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात आर्थिक परिस्थिती नसल्याकारणाने काम करण्यास नकार दिलेला आहे. सदरचे काम **L-२ श्री.कुणाल जायकर पवार** यांनी दर वाटाघाटी अंती त्यांनी दि.०४/०७/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात **शे.२०.५०%** कमी दराने काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

L-२ श्री.कुणाल जायकर पवार यांना शे.२०.५०% कमी दराने काम देणेस निविदा समितीने मंजुरी दिली असून मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर कामी अंतिम वाटाघाटी अंतीम कंत्राटदार **L-२ श्री.कुणाल जायकर पवार** यांचे **शे.२०.५०% कमी दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. विजय बापू जाधव

अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१२३ जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना अंतर्गत सन २०२२-२३ प्र.क्र.११ मध्ये गट क्र. ६० बाळापुर येथे शासकीय मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. विजय जाधव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२१ दिनांक २०/०७/२०२३

जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना अंतर्गत सन २०२२-२३ प्र.क्र.११ मध्ये गट क्र. ६० बाळापुर येथे शासकीय मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि. २३/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३९,६४,०००/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./९५०/२० दि. २१/०३/२०२३ अन्वयेरक्कम रु. **३९,६४,६८०/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्तकामाबाबतधुळेमहानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./०२/२०दि. ०५/०४/२०२३ रोजी दैनिक देशदूत/समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. १९/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.गणेश बोरसे	शे.३.००% जास्त	
२	अे.के.सैफी	**शे-२०.००% कमी**	**सर्वात कमी दर**
३	श्री.कुणाल जायकर पवार	शे.१.००% जास्त	
४	मे.हिंद कन्सट्रक्शन	शे.-१७.५०% जास्त	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **अे.के.सैफी** यांचे दर **शे.-२०.०० % कमी** दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. तरी **अे.के.सैफी** यांनी दि.२६/०६/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात आर्थिक परिस्थिती नसल्याकारणाने काम करण्यास नकार दिलेला आहे. सदरचे काम **L-२ मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी दर वाटाघाटी अंती त्यांनी दि.०४/०७/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात **शे.२०.५०%** कमी दराने काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

L-२ मे.हिंद कन्सट्रक्शन यांना शे.२०.५०% कमी दराने काम देणेस निविदा समितीने मंजुरी दिली असून मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी अंतिम वाटाघाटी आलेल्या **L-२ मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे शे.२०.५०% कमीने आलेल्या दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. विजय बापू जाधव
अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२४ मुलभूत सोई सुविधा विकास योजना कार्यक्रम अंतर्गत (सन २०२१-२२) प्र.क्र. २ मध्ये कल्याणी बंगला ते चव्हाण ते डॉ.वाढे ते केंद्रीय विदयालय पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे व पथदिवे बसविणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.साबीरशेठ सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.फातीमा अन्सारी विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२२ दिनांक २०/०७/२०२३

मुलभूत सोई सुविधा विकास योजना कार्यक्रम सन२०२१-२२ अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये कल्याणी बंगला ते चव्हाण तेडॉ.वाढे ते केंद्रीय विदयालय पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे व पथदिवे बसविणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो.धुळे यांनीटिपणी मंजुरीने दि. २१/०३/२०२३अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**१,९९,७१,२३५/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./८९८/२० दि. १५/०३/२०२३अन्वये रक्कम रु. **१,९९,७१,२३५/-**मात्र खर्चासतांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्तकामाबाबतधुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./१८४/२ दि. २४/०३/२०२३ रोजी दैनिक पुण्यनगरी/मिड डे या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१०/०४/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	समता किचन इंटिरियर प्रॉडक्ट	शे.२.५०% जास्त	
२	सिद्धीविनायक इंजिनियर्स अॅण्ड कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकदर	
३	श्री.सी.बी.सूर्यवंशी	**शे.-.०१% कमी**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.सी.बी.सूर्यवंशी** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **१,९९,६९,२३८/-** इतक्या रक्कमेचे असुन **शे.-.०१% कमी** दराने आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-.०१% कमी** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले. वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.सी.बी.सूर्यवंशी** यांचे दर **शे.-.०१% कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.सी.बी.सूर्यवंशी** यांची **शे.-.०१% कमी** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.सी.बी.सूर्यवंशी** यांची **शे.-.०१% कमी** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक :-श्रीमती अन्सारी फातिमा नुरुल अमीन **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१२५ मुलभूत सोई सुविधा विकास योजना कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.८,११,१२,१३,१९ या प्रभागात नवीन पाईपलाईन टाकणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.साबीरशेठ सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.अब्दुल अन्सारी विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२३ दिनांक २०/०७/२०२३

मुलभूत सोई सुविधा विकास योजना कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र .८,११,१२,१३,१९ या प्रभागात नवीन पाईपलाईन टाकणे बाबतच्या कामास कामास मा .जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१९/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**४९,९६,४८२/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./२१७८/२० दि.२२/०९/२०२३अन्वयेरक्कमरु.**४९,९६,४८२/-**मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./२९/२०२३-२४ दि. ३०/०५/२०२३ रोजी दैनिक सकाळ/पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२१/०६/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	इसाक शब्बीर शेख	**अंदाजपत्रकदर**	**सर्वात कमी दर**
२	सिद्धांत बागुल	शे.७.५०% जास्त	
३	यासीन अब्दुल जबर शेख	शे.४.७०% जास्त	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **इसाक शब्बीर शेख** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **४९,९६,४८२/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक**दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक**दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **इसाक शब्बीर शेख** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **इसाक शब्बीर शेख** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे अहवाल सादर झालेला आहे.

सर्व सन्मा सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **इसाक शब्बीर शेख** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक :-श्रीमती अन्सारी फातिमा नुरुल अमीन

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२६ स्थानिक संस्था कर निर्धारणा तपासणी करिता मानधन तत्वावर सेवानिवृत्त सेवाकर विभागातील अधिकारी तथा खाजगीC.A.मार्फत करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे या संदर्भाला अनुसरुन हा विषय आपल्याला मंजूर करायचा आहे. महापौर महोदया व सभापती महोदया यांनी काही विभागाच्या ऑडीट करण्यासाठी पत्र देखील मा. आयुक्त सो यांना व ऑडीट विभागाला दिले आहे. आणि त्यामध्ये मा. आयुक्त यांच्या दालनात चर्चा केली असता त्यावेळेस त्यांनी त्यांच्या काही अडचणी सांगीतल्या आहे. त्यामध्ये त्यांना काही मनुष्यबळ आवश्यक आहे जेणे करुन त्या त्या विभागातील ऑडीट होण्यासाठी बंधनकारक तर आहेच परंतु लवकर होण्यास मदत होईल. म्हणून या ठिकाणी किती रिटायर्ड अधिकारी मानधन तत्वार अपेक्षित आहे याबाबत खुलासा करावा या अनुषंगाने त्याची शिफारस मानधन तत्वावर कर्मचारी घेण्यासाठी केली ते योग्य व लवकर होईल कारण काही विभागांच्या बाबतीत अनेक वेळा नगरसेवक,नागरिक किंवा पत्रकार बंधू यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. आणि ज्या ज्या विभागाचे ऑडीट आजपर्यंत झाले नाही विभागाप्रमाणे ऑडीट झाले ते योग्य

असेल त्यासाठी किती कर्मचारी मानधन तत्वावर अपेक्षित आहे. आणि ते किती महिन्यांत करु शकतात याबाबत मुख्यलेखा परिक्षक गावडे सो. यांनी खुलासा करावा सभागृहालाही अवगत होईल.

म.मुख्यलेखापरिक्षक — आताच सन्मा. सदस्य सुनिलभाऊंनी सांगीतल्याप्रमाणे महापौर महोदयांचे पत्र प्राप्त झालेले आहे. त्याचे उत्तर ही दिले आहे. आपल्याकडे प्रॉब्लेम असा आहे की, ऑडीटसाठी वाणिज्य पार्श्वभूमि असलेले कर्मचारी असणे आवश्यक असते. आपल्याकडे वाणिज्य पदवीधर कर्मचारी उपलब्ध नाही. दुसरे असे की २०१७ चा स्थायीचा प्रि ऑडीटचा ठरावानुसार प्रि ऑडीट चालू आहे. अधिनियमानुसार पोस्ट ऑडीट करणे आवश्यक आहे. जेणे करून पर्यत पोस्ट ऑडीटची मागणी होणार नाही. तसेच पोस्ट ऑडीटसाठी ४ डिपार्टमेंटची मागणी केली आहे. विद्युत विभाग, बांधकाम विभाग, भांडार विभाग, आरोग्य विभाग असे चार विभाग आहे त्या विभागांचे ऑडीट करायचे असेल तर सेवा निवृत्त, सहाय्यक लेखाधिकारी/ लेखाधिकारी चार लोकं मिळाले तर प्रत्येक डिपार्टमेंटला एक-एक माणूस जरी म्हटला तरी साधरणत: या ऑडीटला ७ ते ८ महिन्यांचा कालावधी लागू शकतो. आपल्याला पूर्ण वर्षाचे ऑडीट करायचे आहे की ठराविक महिन्यांचे करायचे, पूर्ण विभागाचे करायचे की एका विषयाचे करायचे आहे त्यानुसार कमी जास्त् करता येईल. २ महिन्यांचे ऑडिटसाठी साधारणत: ७ ते ८ महिने लागू शकतात ठराविक विषयाचे करायचे असेल तर आपण कमी जास्त करु शकतो.

म.सुनिल बैसाणे — ऑडीट करण्याचा हेतु साध्य होणार नाही. जर आपल्याला त्या डिपार्टमेंटमध्ये याची माहिती २ महिन्यांत मिळू शकत नाही. २ महिन्यांचे ऑडिट करुन काहीच स्वारस्य नाही.

म.मुख्यलेखापरिक्षक — प्रि ऑडीटमध्ये प्रत्येक फाईलमध्ये ऑडीटचे रिपोर्ट उपलब्ध आहे. आता परत पोस्ट ऑडिट पूर्ण करायचे असेल तर अतिरिक्त मनुष्यबळ आणि त्याला वेळ जास्त लागेल एवढेच माझे म्हणने आहे.

म.सुनिल बैसाणे — ऑडीटमध्ये काही शंका उपस्थित केलेल्या असतात. काही मुद्दे उपस्थित केलेले असतात. त्या मुद्दयांचा सखोल अभ्यास करुन दुरुस्त करायचे असताता. ऑडीटमध्ये उपस्थित शंकाचे निरसन झाले आहे किंवा नाही झाल्या असतील त्या सोडून द्याव्या. झालेल्या नसतील तर त्या विषयाचे ऑडीट झाले पाहिजे. ऑडीट झाल्यानंतर जे ऑडीटरने ताशेरे मारलेले असतात ते ताशेरे फक्त त्या वर्षाच्या दफतरात असतात. येणाऱ्या वर्षात त्या ऑडीटमध्ये शंका उपस्थित केल्याचे कधीही निर्दशनास आले नाही. ळया ज्या काही गोष्टी आहे त्या गोष्टींचे ऑडीट व्हावे जेणे करुन सोपस्कार होईल. हे मनपाचे हितासाठी पण आहे. त्या विभागासाठी पण आहे. त्याचे व्यवस्थित विविरण झाले तर चांगले होईल. म्हणून तुम्हाला विनंती की, आजच्या सभेमध्ये तो ठराव पारीत करण्यात येऊन त्याची तात्काळ निविदा किंवा जाहिरात देऊन संबंधीत विषयाचे तज्ञ नियुक्त करावे. त्यांच्या मार्फत हे व्हावे जेणे करुन मनपाचे हित साध्य होईल. सभापती महोदया यावर तात्काळ कार्यवाही करावी.

म. मुख्यलेखापरिक्षक — माझी विनंती अशी आहे, आपण महानगरपालिका ॲक्ट प्रमाणे मुख्य लेखापरिक्षक व नगरसचिव यांचे कार्यक्षेत्र स्थायी समितीच्या अंतर्गत् आहे. सद्या मी प्रशासनाच्या वतीने

प्रशासनाचे काम करतोय. माझी अशी विनंती राहिल की, प्रशासकीय कामातून चिफ ऑडीटर विभाग वेगळा केला तर मला या ठिकाणी चांगले काम करता येईल.

म.सभापती — सन्मा. सदस्यांनी ज्या सूचना मांडल्या त्यावर लक्षपूर्वक कारवाई करु. मुख्यलेखाधिकारी साहेब आजच्या ३ महिन्यापूर्वी तुम्हाला सांगीतले होते की, जमा खर्चाचा अहवाल द्यायचा आहे. किती अहवाल सादर केले आहे.

म.लेखाअधिकारी — जे अकाउंट आपल्याला तयार करायचे असतात चिफ ऑडीटर यांच्या मार्फत स्थायी समिती कडे सादर करायचे असतात. फॉरमॅट नुसार आपण ते अकाउंट तयार करतो. यापूर्वी ती प्रॅक्टीस नव्हती अकाउंटचे फॉरमॅट आपण दिलेले आहे. ते काम पूर्ण झाले की दर आठवडयाचे रिपोर्ट देता येईल. ते काम सुरु केले असून शनिवारी रविवारी चालू आहे.

म.सभापती — आतापर्यंत द्यायला पाहिजे होते ३ महिने झाले.

म.लेखाधिकारी — मूळ मुद्दा म्हणजे १५ मंजूर पोस्ट आहे. त्यापैकी ६ ते ७ कर्मचारी आहे. अकाउंट ऑफिसर व कॅशिअर हे पदे रिक्त आहे. आपल्याला पत्र ही दिले आहे. साधारणत: १५ ते २० दिवसांत अहवाल देतो.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार खाजगी सी.ए. व त्या संस्थेमार्फत स्थानिक संस्था कर निर्धारण तपासणीकरिता आक्षेप असल्याने यापूर्वी काढण्यांत आलेली निविदा रद्द करुन स्थानिक संस्था कर निर्धारणा तपासणी करिता मानधन तत्वावर सेवानिवृत्त सेवाकर विभागातील अधिकारी नियुक्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनाने मनपा हिताच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व प्रशासकीय पूर्तता त्वरीत करण्यांत यावी. तसेच मनपातील विद्युत विभाग, बांधकाम विभाग, भांडार विभाग, आरोग्य विभाग असे चार विभागाचे लेखापरीक्षण करावयाचे असल्याने त्यासाठी लेखापरीक्षण विभागासाठी आवश्यक ते मनुष्यबळ (सेवा सहा.लेखाधिकारी / लेखाधिकारी) मानधन तत्वावर नियुक्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२४ दिनांक २०/०७/२०२३

स्थानिक संस्था कर विभागातील कर निर्धारणा करणेकामी C.A. नियुक्ती करण्याकरिता मे.स्थायी समितीत विषय क्र. ८ दि.२०/०२/२०२३ रोजी विषय पत्रिकेत घेण्यात आला असुन सदरील बैठक दि.२३/०२/२०२३ संपन्न झाली असुन मा. सदस्य यांनी काही प्रश्न उपस्थित केले त्याबद्दल म.सभापती सो. यांनी संयुक्त बैठक घेऊन सदर विषयावर चर्चा करावी याप्रमाणे आदेशित केले आहे.

फेर टिपणी सादर करण्यात आली. त्याप्रमाणे म. आयुक्त सो. यांनी म.सभापती सो. . यांचे समवेत सदर विषयावर चर्चा करण्यात आली. मा.सदस्य यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या स्पष्टीकरणात शासनाच्या आदेशान्वये अभय योजनेत भाग घेणाऱ्या नोंदणीकृत व्यापारी संस्थांचे ३१ मार्च २०१८ अखेर पावेतो निर्धारणा तपासणी होणे आवश्यक होते.

सदरील अभय योजनेत भाग घेणाऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्यांची कर निर्धारणा करणे ही बाब कालमर्यादीत स्वरुपाची होती. या करिता वेळोवेळी नियमानुसार अभिलेख सादर करण्याकरिता नोटीसा देऊन उपस्थित न राहील्याने त्यामुळे अभय योजनेत भाग घेणाऱ्या व्यापाऱ्यांची एकतर्फी निर्धारणा तपासणी करणे धुळे महानगरपालिकेस बंधनकारक होते.

त्यामुळे एकतर्फी निर्धारणा झालेल्या व्यापाऱ्यांनी आवश्यक ते कागदपत्र सादर करुन पुन:श्च निर्धारणा होऊन मागणी कर रक्कम कमी अधिक स्वरुपाची कर निर्धारणा अंती मागणी कर रक्कम निर्धारणा तपासणी आदेशान्वये त्यांना कळविण्यात येते की, यापुढील काळात व्यावसायिकांना संपुर्ण सहकार्य करण्यात येईल. तसेच निर्धारणा तपासणी करणारे ठेकेदार यांचे संपर्क होण्यास करारनामा शर्तीमध्ये योग्य ते सुधारणा करुन समन्वयाने कामकाज करण्यात येईल. तसेच लेखा आक्षेप येणार नाही तसेच म.न.पा. कराचे नुकसान ही होणार नाही याची देखील काळजी घेतली जाईल.

धुळे म.न.पा. स्थायी समिती ठराव क्र.५५, दि.१३/०४/२०२३ यामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांनी केलेल्या चर्चा नुसार सदर प्रस्तावाबाबत साशंकता असून याबाबत सखोल माहिती घेवून निर्णय घेणे गरजेचे आहे. मनपाचेही आर्थिक नुकसान होणार नाही व विवरण पत्र तपासणी व करनिर्धारणात सुलभ कार्यपद्धती असावी यासाठी पुन:श्च अधिकारी व सदस्यांची एकत्रित बैठक घेवून निर्णय घेण्यात येईल तो पावेतो सदर प्रस्ताव तहकुब ठेवणेत आला होता.

तसेच दि.०४/५/२०२३ रोजी म.सभापती सो. स्थायी समिती धुळे मनपा धुळे यांचे दालनात झालेल्या बैठकीमधे मा.सदस्य श्री.हर्षकुमार रेलन यांनी C.A. संस्था किंवा इतर कोणतेही संस्था नियुक्त केल्यास व्यापाऱ्यांना त्रास होणार आहे. त्यापेक्षा मानधनावरिल सेवा निवृत्त आयकर अधिकारी यांच्या माध्यमातुन असेसमेंट केल्यास योग्य हेाईल असे सुचित केलेले आहे.

मा. सभापती सो. यांच्या दालनात संपन्न झालेल्या बैठकीत मा. सभापती सो. यांनी व्यापाऱ्यांनी सादर केलेले विवरण पत्र तपासणी करणेकामी सेवानिवृत्त आयकर विभागातील अधिकारी किंवा सेवानिवृत्त सेवाकर विभागातील अधिकारी यांची नियुक्ती करणे व कर निर्धारणा कामाची सुरूवात लवकरात लवकर करावी, याप्रमाणे विभागाने करावयाची कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आले.

इतर महापालिकेची परिस्थीती पाहता निर्धारण तपासणीचे काम खाजगी C.A. मार्फत किंवा महापालिकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन होत आहे. तसेच धुळे महानगरपालिकेत स्था.सं.कर मुदतीत निर्धारण होणेचे दृष्टीने सदरचा विषय मे. स्थायी समिती पुढे योग्य तो निर्णयास्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार खाजगी सी.ए. व त्या संस्थेामार्फत स्थानिक संस्था कर निर्धारण तपासणीकरिता आक्षेप असल्याने यापूर्वी काढण्यांत आलेली निविदा रद्द करुन स्थानिक संस्था कर निर्धारणा तपासणी करिता मानधन तत्वावर सेवानिवृत्त सेवाकर विभागातील अधिकारी नियुक्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनाने मनपा हिताच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व प्रशासकीय पूर्तता त्वरीत करण्यांत यावी. तसेच मनपातील विद्युत विभाग, बांधकाम विभाग, भांडार विभाग, आरोग्य विभाग असे चार विभागाचे लेखापरीक्षण करावयाचे असल्याने त्यासाठी लेखापरीक्षण विभागासाठी आवश्यक ते मनुष्यबळ (सेवा सहा.लेखाधिकारी/लेखाधिकारी) मानधन तत्वावर नियुक्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मनपातील विद्युत विभाग, बांधकाम विभाग, भांडार विभाग, आरोग्य विभाग असे चार विभागाचे लेखापरीक्षण करावयाचे असल्याने त्यासाठी लेखापरीक्षण विभागासाठी आवश्यक ते मनुष्यबळ (सेवा सहा.लेखाधिकारी/लेखाधिकारी) मानधन तत्वावर नियुक्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच या संदर्भात इतर महानगरपालिकेतील कार्यपध्दती तपासून स्थायी समितीस अवगत करावे.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :-श्री.नरेंद्र रूपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २० चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक ०३/०८/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२० आज गुरूवार दिनांक**०३/०८/२०२३** रोजी **सकाळी ११-०० वाजतां** सौ. किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
४	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१३	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. विजय रघुनाथ सनेर	उपायुक्त
२	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री. गजानन पाटील	मुख्यलेखाधिकारी
५	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
७	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
८	श्री.कैलास शिंदे	अभियंता
९	श्री. पी.डी. चव्हाण	सहा.अभियंता
१०	श्री.चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल

१३	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
१४	श्री.मधुकर निकुंभे	वसुली अधिक्षक
१५	श्री. राजकुमार सुर्यवंशी	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१६	श्री. मोहनीश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१७	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१८	श्री.चंद्रकांत उगले	सहाय्यक अभियंता पाणी पुरवठा
१९	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२०	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
२१	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२२	श्री.राजेश गायकवाड	वरीष्ठ लिपीक , मनपा शिक्षण मंडळ
२३	श्री.के.डी. साबळे	लिपीक,आस्थापना विभाग
२४	श्री.कल्पना जाधव	अभिलेखापाल

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.उपायुक्त सो.सर्वअधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-१२७ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे (सभा क्रं.१६ दि. १९/०६/२०२३)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.कल्याणी अंपळकर मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२५ दिनांक ०३/०८/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.१६ दिनांक १९/०६/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर ९२ ते ९८ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१२८ मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि. २६/०६/२०२३ ते दि. १७/०७/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.दगडू बागूल सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सुनिल बैसाणे विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि.२६/०६/२०२३ ते दि.१७/०७/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकन करण्यांत आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२६ दिनांक ०३/०८/२०२३

मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि.२६/०६/२०२३ ते

दि.१७/०७/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

अ.क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	८६	२६/०६/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत सुलतानिया मदरसा येथील मनपा मालकीचे दवाखान्याची (आरोग्यवर्धनी) दुरुस्ती करणे.	२१,५९,६१४/-	एन.यु.एच.एम.अंतर्गत
२	८७	२६/०६/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत मौजे पिंप्री गावातील मनपा मालकीचे दवाखान्याची (आरोग्यवर्धनी) दुरुस्ती करणे.	१३,०४,६१७/-	एन.यु.एच.एम.अंतर्गत
३	८८	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील मिरजकर नगर येथे मोहन शेळके यांचे घरामोरील रस्ता काँक्रीटीकरण करणे व बंदिस्त गटार करणे.	२४,९९,९९७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
४	८९	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत कोरके नगर येथे बंदिस्त गटार बांधणे.	२४,९८,१८७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
५	९०	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील नामदेव शेळके ते जगदिश चौधरी यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९९,८३७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
६	९१	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत धनगर (सुगंध नगर) रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९८,४५७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
७	९२	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत मारुती नगर ते ४० गाव रोड जोडणारा स्लब कल्वर्ट बांधणे.	२४,९९,८७१/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
८	९३	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत कोरके नगर येथे रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,९९,४८८/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
९	९४	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील सप्तशृंगी नगर भागात प्रवीण चौधरी ते रमेश उघडे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार बांधणे.	२४,९८,६१७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१०	९५	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत विकास भोसकर ते लक्ष्मण येलपले यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे व बंदिस्त गटार करणे.	२४,९८,९८७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
११	९६	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत अशोक पाटील यांचे घरापासुन ते मनोज जाधव यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९९,२५२/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१२	९७	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील ८० गाळे श्री.साईबाबा मंदिर ते गुरव यांचे घरापर्यंत ते प्रथमेश किराणा १०० फुटी रोड पर्यंत घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे व बंदिस्त गटार बांधणे.	२४,९९,५७२/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१३	९८	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत माउली नगर येथील हरहर महादेव व्यायाम शाळे जवळ नाला.विठ्ठल नगर भागात जोडणारा पुल तयार करणे.	२४,९७,७१३/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१४	९९	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील ८० गाळे रोहित मोरे ते विसपुते यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९९,३०७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१५	१००	२६/०६/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये धुळे मनपा हद्दीत श्री.अर्जुन चौगुले यांचे घरापासुन ते ४० गाव रोड पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व रिटेन वॉल बांधणे.	२४,९८,१३३/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२

१६	१०१	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत कैलास चौधरी ते पिंटू मंगीडकर यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे व बंदिस्त गटार बांधणे.	२४,९८,९८७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१७	१०२	२६/०६/२०२३	धुळे मनपा क्षेत्रात मिरजकर नगर मधील निशा फर्निचर ते ए.बाय मोरे यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९९,०४२/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१८	१०३	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील मिरजकर नगर ४० गाव रोड ते शिवाजी चौगुले यांचे घरासमोरील रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९९,७३२/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१९	१०४	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत भानुदास पाटोळेकर यांच्या घरासमोरील रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९९,८३७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
२०	१०५	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील सप्तश्रृंगी नगर भागात मोरे यांचे घरापासून ते शेळके यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९८,६१७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
२१	१०६	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील अंबिका नगर.विठ्ठल नगर भागात श्री.भालेराव पाटील यांचे घरापासून ते श्री.गणेश लाडे यांचे घरापर्यंत तसेच श्री.दिनेश यदरव यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२४,९८,७९८/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
२२	१०७	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत छोरीया नगर भागात रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार बांधणे.	२४,९९,८३७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
२३	१०८	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत हनुमंत कृपा बंगला ते डांबरी रोड पावेतो किशोर चव्हाण यांचे घरासमोरील रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९९,५७२/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
२४	१०९	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीत अंबिका नगर, विठ्ठल नगर भागात डी.पी.रोड ते दीपक वगंवर यांचे घरापर्यंत तसेच श्री.हरल यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,९९,४८८/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
२५	११०	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील विजय हरिचंद्र सातोरे यांच्या घरापासून ते सुभाष येलमार यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार बांधणे.	२४,९९,४१२/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
२६	१११	२६/०६/२०२३	धुळे मनपा हद्दीतील प्रकाश पाटील ते फकीरा सूर्यवंशी यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व बंदिस्त गटार बांधणे.	२४,९९,१४७/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
२७	११२	०४/०७/२०२३	नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) अंतर्गत प्र.क्र.०७ मध्ये योगेश वाणी घर ते मोती नालापावेतो आर.सी.सी.गटार करणे.	१९,९९,३०७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२२-२३
२८	११३	०४/०७/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये चाळीसगाव रोड पासून मोहम्मद दादाच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९४,७१७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२२-२३
२९	११४	०४/०७/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये जी.टी.पी.कॉलनी येथे रस्ते डांबरीकरण करणे.	१९,८५,१९१/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
३०	११५	०४/०७/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये संतसेना नगर भागात मधुवन बंगल्यापासून ते बोरसे यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१९,८५,६२९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
३१	११६	०४/०७/२०२३	प्र.क्र.०७ मध्ये पाटील किराणा ते योगेश वाणी घरापावेतो आर.सी.सी.गटार करणे.	२३,५८,३८९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२२-२३

३२	११७	०४/०७/२०२३	प्र.क्र.०६ मध्ये महिंदळे येथे सूर्योदय कॉलनी मधील लोटन लोहार यांचे घर ते सूर्योदय कॉलनी पावेतो रस्ता काँक्रीट करणे व गटार करणे.	१९,६५,५७२/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
३३	११८	०४/०७/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये कबीरगंज भागात चांदभाई यांचे घरापासून ते हनीफ मुकादम अब्दुल रहीम व हनीफ मणियार यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९९,०५७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
३४	११९	०४/०७/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये जयमल्हार नगर प्रशांत पाटील घर ते झोटे घरापावेतो पाईप गटार करणे.	१९,७५,९४७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
३५	१२०	०४/०७/२०२३	प्र.क्र.०४ मध्ये वाडीभोकर रोड लगत पेव्हर ब्लॉक बसविणे.	१९,८९,८०७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
३६	१२४	१४/०७/२०२३	प्र.क्र.०७ मध्ये मोगलाई टी.व्ही.सेंटर पोलीस चौकी ते लंगोटे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,९२,०९३/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२२-२३
३७	१२५	१४/०७/२०२३	सर्व्हे नं.४०/२ येथील ओपनस्पेस जागेस संरक्षण भिंत बांधणे.	२४,९८,३०४/-	जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२२-२३
३८	१२६	१४/०७/२०२३	प्र.क्र.७ कुमार नगर येथील श्री.मुलाणी घरापासून ते श्रीकृष्ण मंदिर पावेतो आर.सी.सी. गटार करणे.	१९,७२,१३२/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२२-२३
३९	१२७	१४/०७/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये यशवंत नगर भागात बागुल घर ते सतिष मोरे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,६७,३२२/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२२-२३
४०	१२८	१४/०७/२०२३	प्र.क्र.११ मध्ये बाळापुर येथे दत्त मंदिर गेट ते श्री.गुलाब भामरे यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,९२,९४०/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४१	१२९	१४/०७/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये प्रमोद नगर भागात बोरसे यांचे घरापासून ते चौधरी यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,९८,९२४/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४२	१३०	१४/०७/२०२३	प्र.क्र.०४ मध्ये देविदास पावभाजी पासून ते ग्रीन टॉप अपार्टमेंट पावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१९,९८,२८७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४३	१३१	१४/०७/२०२३	प्र.क्र.०६ वलवाडी निंबा मिस्तरी घर ते रामकृष्ण नगर बोर्ड पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,७६,५५२/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४४	१३२	१४/०७/२०२३	प्र.क्र.१० मध्ये गुरुदत्त कॉलनी मध्ये रवी लोहाटे यांचे घरापासून ते अमोल शिसाळे यांचे घरापावेतो काँक्रीट रस्ता व गटार करणे.	२४,९९,७३६/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४५	१३३	१४/०७/२०२३	प्र.क्र.०९ मध्ये सागर किराणा ते शिवनेरी पर्यंत बंदिस्त गटार करणे.	१९,९६,६३७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४६	१३४	१४/०७/२०२३	प्र.क्र.१० मध्ये सुरेंद्र काकडे यांचे घरापासून ते सुनील कोळी ते रमेश शिंपी यांचे घरापावेतो काँक्रीट रस्ताव गटार करणे.	२४,९९,७७५/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४७	१३५	१४/०७/२०२३	प्र.क्र.१० मध्ये सुरेश माळी यांचे घरापासून ते कैलास नवगरे ते भुरा बडगुजर यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता व पाईप गटार करणे.	२४,९९,०९१/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४८	१३६	१४/०७/२०२३	प्र.क्र.१० मध्ये जगन गुरव ते समाधान पाटील पुनर्वसन कॉलनी बरखेडी पर्यंत रस्ता	१९,९२,९४०/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना

			काँक्रीटीकरण करणे.		अंतर्गत सन २०२२-२३
४९	१३७	१४/०७/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये अभियंता नगर येथे श्री.नाना दामू वाणी यांच्या घरापासून ते श्री.शशिकांत शिंपी यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,९०,१०९/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२१-२२
५०	१३८	१४/०७/२०२३	प्र.क्र.०२ मध्ये अजय नगर भागात श्री.पोपटराव सोनवणे व श्री.सिसोदे यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,९९,१२७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५१	१३९	१४/०७/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये अजळकर नगर भागात संदीप चव्हाण ते गिरमकर घरा पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,८८,०१५/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५२	१४०	१४/०७/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये पंजाबराव पाटील घर ते जितू ठाकरे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे .	१९,६२,६७८/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५३	१४१	१४/०७/२०२३	सर्व्हे नं.५६९/२ शिवशंकर कॉलनी भागात अंतर्गत रस्ते काँक्रीट करणे.	१९,८७,५६९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५४	१४२	१४/०७/२०२३	प्र.क्र.१६ हमीद खाटिक घर ते भीमवाडी पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,८७,५६९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५५	१४३	१४/०७/२०२३	प्र.क्र.०३ मध्ये सिंघल नगर भागात रस्ता व गटार करणे.	२४,८३,२१६/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५६	१४४	१४/०७/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये जगलु आखाडे ते सुभाष नामदेव तसेच विजू आत्माराम ते तुकाराम नामदेव सोनवणे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,९५,९७७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५७	१४५	१४/०७/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये शिवसागर कॉलनी विकास बाबर ते सुशांत मोरे तसेच प्लॉट नं.६अ ते ४ पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१६,६३,९९१/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५८	१४६	१४/०७/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये जगदंबा हौ.सोसा.रिक्षा स्टॉप ते मासाळ घर ते राऊत ते संजीवनी मेडिकल पावेतो बंदिस्त पाईप गटार करणे.	२०,००,०६२/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
५९	१४७	१४/०७/२०२३	मोहाडी येथील दंडेवाला बाबा नगर येथे राजू भाऊ घर ते सतिष चौधरी दुकान ते वाल्मिक सूर्यवंशी घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,६५,५७२/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
६०	१४८	१४/०७/२०२३	प्र.क्र.१८ मध्ये सुधाकर मिस्तरी ते नाना भाऊ सूर्यवंशी घरापावेतो रस्ता काँक्रीट व गटार करणे.	१९,५९,७५७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
६१	१४९	१४/०७/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये शिवाभाऊ घर ते श्रीराम नगर टेकडी पावेतो बंदिस्त पाईप गटार करणे.	२४,९८,४६०/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
६२	१५०	१४/०७/२०२३	प्र.क्र.०९ मध्ये नवरंग कॉलनी भागात लोखंडे ते मांडवी दाम यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१९,९०,९२७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
६३	१५१	१४/०७/२०२३	प्र.क्र.१७ मध्ये साने गुरुजी सोसा.रविंद्रनाथ टागोर हायस्कूल ते नेमाने घर ते पाटील घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१९,८९,७९७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३

६४	१५२	१४/०७/२०२३	धुळे शहरात सर्व्हे नं.५७४ मधील किराणा दुकान ते दर्गा पावेतो ड्रेनेज लाईन टाकणे.	२४,९८,२६९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
६५	१५३	१७/०७/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत लक्ष्मी नगर येथील मनपा मालकीचा दवाखाना (आरोग्यवर्धनी) दुरुस्ती करणे.	२१,५८,०९०/-	एन.यु.एच.एम.अंतर्गत

सही xxx/-
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१२९ धुळे मनपा हद्दीतील बडगुजर जलकुंभावरील संम्पवेल मधील गाळ काढणे,बडगुजर जलकुंभावरील १५०mm व २००mm व्हालनवीन बसवणे तसेच वरखेडी रोड जलकुंभा वरील गाळ काढणे व ३५० mm व्हाल नवीन बसविण्यात आले. सदरचे कामास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती या विषयावर माहिती द्यावी. याबाबत काम काय झाले आहे? काय खर्च झाला आहे? याबाबत सव्वीस्तर माहिती द्यावी.

म.सहा अभियंता धुळे मनपा हद्दीतील बडगुजर जलकुंभ व वरखेडी येथील जलकुंभ येथे गढूळ पाण्याबाबत तक्रारी आल्या होत्या. जलकुंभावरील संम्पवेल आहे तेथे मा. आयुक्त सो. यांनी पाहणी केली होती त्या संम्प मध्ये बऱ्याच मोठया प्रमाणावर गाळ होता. तो गाळ आपण काढला तसेच १५० एम. एम. व २०० एम.एम चे व्हॉल्व आपण नविन बसवले आहे.

म.सुनिल बैसाणे हा जलकुंभ सध्या कार्यरत आहे का? याआधी गाळ काढला होता का?

म.सहा. अभियंता आपण संम्पवेल मधील गाळ काढला आहे. आपण याआधी गाळ काढला नव्हता तसेच वरखेडी येथे ही गाळ काढण्यात आला आहे.

म.सुनिल बैसाणे गढूळ पाण्याच्या फार तक्रारी येत आहे. तक्रारी येण्याची अनेक कारणे असू शकतात. अपण सर्वच जलकुंभाचे गाळ काढले तर चांगले होईल. व पाण्याचा दर्जाही सुधारेल.

म.सहा. अभियंता आपण वार्षिक टेंडर काढले आहे. त्यात सगळया जलकुंभांचा समावेश केला आहे.

म.सुनिल बैसाणे पावसाळया नंतर काढणार आहात का?

म.सहा. अभियंता आपण आता पर्यंत १५ जलकुंभांचा गाळ काढला आहे.

म.सभापती शहरात तरी गढूळ पाणी का येत आहे?

म.सहा. अभियंता आपल्याला जलशुध्दीकरणासाठी वेळ लागतो.

म.सभापती मला गाळ काढलेल्या जलकुंभाची यादी द्यावी.

म.सुनिल बैसाणे आपण प्रत्येक जलकुंभांचे व्हॉल्व दुरुस्त करतो आपण जुन्या व्हॉल्व चे काय करतो ? पुन्हा वापरात घेतो का? किंवा भांडार विभागाकडे भंगारासाठी देतो? याबाबत माहिती द्यावी.

म.सहा. अभियंता साधारणपणे आपण दुरुस्त करुन पुन्हा वापरात आणतो. दुरुस्त होत नसतील तर बदलावे लागतात.

म.सुनिल बैसाणे हा प्रश्न विचारण्याचे कारण व्हॉल्वच्या दुरस्तीच्या कामाने कार्योत्तर मंजूरी असो किंवा मा. आयुक्तांच्या अधिकारातल्या कार्योत्तर मंजूरीमध्ये व्हॉल्व दुरुस्ती बाबत वर्षभरात कमीत कमी ५ ते ६ वेळा स्थायी समिती समोर असे विषय येताता. हे आपल्या लक्षात येत नाही. दोन महिने चार महिन्यांच्या अंतराने ते विषय येत असतात. पाणी हे अत्यावश्यक सेवेमध्ये आहे. आपण त्यावेळेस मान्यता दिली नाही तर प्रश्न उपस्थित करता येत नाही. सभापती महोदया, आपल्याला विनंती आहे आतापर्यंत व्हॉल्व दुरुस्तीचे किती देयके अदा केली आहेत? व्हॉल्व वारंवार तेच दुरुस्त करण्यात येतात हा माझा प्रश्न आहे. तसेच चव्हाण सॉ. नी सांगीतले व्हॉल्व हे पूर्णपणे उपयोगास पात्र असतात. आपण तेही तपासून घेणे गरजेचे आहे. आपण लाखो रुपयांची देयके अदा करत असतो. तसेच ज्या जलकुंभांची कालमर्यादा संपुष्टात आली आहे. त्याचे ऑडीट करावे. भविष्यात काही झाले तर नागरिकांची हानी होण्याची शक्यता आहे. पाण्याचीही नासाडी होते. अशोक नगर जलकुंभाच्या बाबतीत घडले आहे. तसे अनेक जलकुंभ असू शकतात. त्यांचा अमृत २.० मध्ये समावेश करण्यात यावा. अशोक नगर

जलकुंभाच्या बाबत स्थानिक नगरसेवकांनी देखील प्रश्न उपस्थित केला महापौरांनी देखील पाहणी केली. त्याचे देखील स्पष्टीकरण करावे. जलकुंभाच्या बाबतीत काय दुरुस्ती करणार आहे ते सांगावे. ग्रॅव्हीटीने येणारे पाणी याबाबत ही स्पष्टीकरण करावे.

म.नरेंद्र चौधरी — व्हॉल्व दुरुस्तीचा या ठिकाणी विषय आला आहे. सभापती महोदया, आमच्या प्रभागात ८ ते १० दिवसांत पाणी येते. तसेच ४ ते ५ तास पाणी सोडावे लागते. त्याचे कारण तेथे व्हॉल्व नाही. व्हॉल्व बसवण्याची मागणी केली होती. त्याचा सर्व्हे पण झाला आहे. ३० ते ४० व्हॉल्व त्या ठिकाणी लागणार आहे. हा विषय तुम्हाला महत्वाचा नाही का? तो विषय का अजेंडयावर घेण्यात आला नाही?

म.सहा अभियंता — त्याबाबत आपले इस्टीमेट झालेले आहे. लवकरच तोही विषय घेण्यात येईल.

म.सभापती — ज्या ठिकाणी गरज आहे तसेच हे सदस्यांना वारंवार बोलावे लागत आहे.त्या ठिकाणी लक्ष द्यावे.

म.किरण अहिरराव — हा विषय चांगला आहे.बांधकाम व पाणी पुरवठयाचे अधिकारी चांगले काम करत आहे. लोकांना शुध्द पाणी मिळावे त्या करता ते प्रयत्न करत आहे. आम्ही अशा गोष्टींना विरोध करत नाही. सढळ मनाने मंजूरी ही देतो. कमीत कमी २ दिवसाआड पाणी मिळावेअशी अशा व्यक्त करतो. आमच्या प्रभागातील व्हॉल्वमनची बदली करण्यात आली आहे. अक्कलपाडा येथे प्रशासकीय कारणास्तव त्याची बदली केली. व्हॉल्वमनचे काम फक्त व्हॉल्व बदलण्याचे आहे. तो अक्कलपाडा येथे कोणते प्रशासकीय काम करणार आहे? प्रभागातील नागरिकांच्या पाणी कमी मिळाल्या मुळे तक्रारी येत आहे. प्रशासनातील वरीष्ठ अधिका-यांची बदली झाली तर आम्हाला फरक पडतो. अक्कलपाडा येथे तांत्रीक मनुष्यबळाची गरज आहे. अशा तडका फडकी बदल्या करु नये. आमच्या प्रभागात मुबलक पाणी मिळत आहे. शहरात पाण्यावरुन गदारोळ चालू आहे. आम्ही तुम्हाला निवेदन दिले आहे. प्रभागात पाईपलाईन मागील वर्षी झाल्या आहे. व मागील ३ वर्षापासून पाणीपट्टी आकराण्यात आली आहे. हा जाचक कर का लावण्यात आला आहे? लोक आमच्या नावाने ओरडत आहे. यातून पक्षाची बदनामी होत आहे. नेत्यांची बदनामी होत आहे. ती बदली रद्द करण्यात यावी.

म.उपायुक्त — सन्मा.सदस्य सुनिल भाऊनी जे मुद्दे उपस्थित केले. शहरातील जलकुंभातील स्वच्छतेबाबत आपण शहरातील सर्वच जलकुंभांचे स्वच्छतेचे काम हाती घेतले आहे. गाळ काढण्याचे काम हाती घेतले आहे. साधारणत: १४ ते १५ जलकुंभ पूर्ण झाले आहे. त्यामध्ये अक्कलपाडा योजनेचे पाणी देतो ते ही जलकुंभ आहेत. ते सर्व जलकुंभ १ महिन्यांत होतील असे आमचे प्लॅनींग आहे.बहुतांशी जलकुंभांना अक्कलपाडयाचे पाणी वितरीत करण्याचे नियोजन केले आहे. जे जलकुंभ चालू नव्हते ते चालू करण्याच्या दृष्टीकोनातून स्वच्छतेचे काम चालू केले आहे. त्यात नामांकित संस्थेला ते काम देण्यात आले आहे. जलकुंभ स्वच्छ करतांना त्या पाईपात पाणी जाते त्यात फार तर एक दोन दिवस पाणी गढूळ येते. क्लोरिफिकेशन दिलेल्या निर्देशाप्रमाणे करण्यात येते. आपण अशोक नगर जलकुंभाचा प्रस्ताव तयार केला आहे. आणि शहरात असे जे जलकुंभ आहे त्यांच्या स्ट्रक्चरल ऑडीटसाठी ऑडीर नेमणेबाबत अहवाल आयुक्तांना सादर केला आहे. सन्मा.सदस्य किरण भाऊंनी बदलीच्या बाबतीत कालच मला फोन करुन कळवले आहे. जेव्हा मी बदली आदेशावर सही केली तेव्हा मी विचारले व्हॉल्वमन का काढतायेत म्हणून तेव्हा आस्थापनाने मला चुकीची माहिती दिली. यापुढे जेव्हा वरिष्ठांकडे सहीसाठी कागद येतात तेव्हा खात्री करुन घ्यावी. आणि आस्थापना विभागाने बदली रद्द करण्याबाबत आजच टिपणी सादर करा.

म.सुनिल बैसाणे — धुळे शहरातले जेवढे जलकुंभ आहे,जलशुध्दीकरण केंद्र आहे,बाभळे,सुकवद तसेच अक्कल पाडा असे सभापती महोदया, तुम्हाला नम्र विनंती आहे त्या जलकुंभावर अघटीत घटना घडू नये यासाठी सर्व ठिकाणी सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसवण्यात यावी. माथेफिरुंची कमी नाही. जलकुंभावर आज्ञात व्यक्ती कोण येतो जातो तसेच जो सुरक्षारक्षक आहे त्यांची सोई सुविधा करण्यात यावी. त्यांचे बायोमेट्रीक हजेरी तसेच २४ तास लक्ष ठेवणे गरजेचे आहे. अघटीत घटना घडण्याची शकयता नाकारता येत नाही. सी. सी. टी.व्ही कॅमेरे बसवण्यासाठी तात्काळ कार्योत्तर मंजूरी घ्यावी.अत्यावश्यक विषय आहे. काही लोक वर्तमान पत्रात बातमी येण्यासाठी टाक्यांवर चढून आंदोलन करतात. तात्काळ याबाबत उपाययोजना करावी.

म.उपायुक्त — तुमची सूचना खरोखर चांगली आहे. त्यावर मी नोंद घेतली आहे. कारवाई करण्यासाठी ज्या गोष्टी त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करु.

म.सभापती — या विषयावर मागील आर्थिक वर्षापासून ते आजतागायत जे व्हॉल्व दुरुस्त केले, पंप दुरुस्त केले आणि त्या अनुषांगिक कामाची जी देयके अदा केली व कोणती दुरुस्ती केली याचा अहवाल १५ दिवसांच्या आत स्थायी समितीपुढे सादर करायचा आहे. त्याचप्रमाणे मुदत बाह्य जे जलकुंभ आहे त्यांचा सर्व्हे करुन नविन जलकुंभ अमृत २ योजनेत किंवा १५ व्या वित्त आयोगात प्रस्तावित करावे. सन्मा. सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

म.दगडू बागूल — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. रंगनाथ ठाकरे — विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२७ दिनांक ०३/०८/२०२३

धुळे मनपा हद्दीतील बडगुजर जलकुंभावरील संम्पवेल मधील गाळ काढणे, बडगुजर जलकुंभावरील १५० mm व २००mm व्हाल नवीन बसवणे तसेच वरखेडी रोड जलकुंभावरील गाळ काढणे व ३५० mm व्हाल नवीन बसवणे आवश्यक असून तसेचजलकुंभावरील संम्पवेल मधीलगाळ काढणे असल्यामुळे तेथे अशुद्ध पाणी पुरवठा होत असल्याने व पाणी वितरणास अडचण येत असल्याने त्या ठिकाणी व्हाल टाकणे आवश्यक असल्याने ते काम त्वरित व तातडीने करणे आवश्यक आहे.

त्यामुळे सदरचे काम हे पिण्याच्या पाण्याशी निगडीत असल्यामुळे सदरचे काम विना निविदा ठेकेदार श्री.संजय दगडू गायकवाड,धुळे यांच्याकडून करून घेण्यात आलेले आहे.त्या कामास अंदाजित खर्च रु.३,६५,८४५/-मात्र खर्च अंदाजपत्रकीय करण्यात आलेला आहे.

तरी सदरचे कामास विना निविदा करण्यात आलेला खर्च रु.३,६५,८४५/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३)(क) अन्वये कार्योत्तर मंजुरीस्तव मे.स्थायी समितीपुढे ठेवणे बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा हद्दीतील बडगुजर जलकुंभावरील संम्पवेल मधीलगाळ काढणे, बडगुजर जलकुंभावरील १५० mm व २००mm व्हाल नवीन बसवणे तसेच वरखेडी रोड जलकुंभावरील गाळ काढणे व ३५० mm व्हाल नवीन बसविण्यात आले. सदरचे काम हे विना निविदा करण्यात आलेला खर्च रु.३,६५,८४५/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३)(क) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

मागील आर्थिक वर्षापासून ते आजतागायत जे व्हॉल्व दुरुस्त केले, पंप दुरुस्त केले आणि त्या अनुषांगिक कामाची जी देयके अदा केली व कोणती दुरुस्ती केली याचा अहवाल १५ दिवसांच्या आत स्थायी समितीपुढे सादर करावा. त्याचप्रमाणे मुदत बाह्य जे जलकुंभ आहे त्यांचा सर्व्हे करुन नविन जलकुंभ अमृत २ योजनेत किंवा १५ व्या वित्त आयोगात प्रस्तावित करावे.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागूल
अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३० — मुलभूत साई सुविधांचा विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत अंजान शाह कब्रस्तान ईदगाह मैदानाच्या मोकळ्या जागेवर वॉल कंपाऊंड करणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म विजय जाधव — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.रंगनाथ ठाकरे — विषय मंजूर करावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२८ दिनांक ०३/०८/२०२३

मुलभूत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत अंजान शाह कब्रस्तान ईदगाह मैदानाच्या मोकळया जागेवर वॉल कंपाऊंड तयार करणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१९/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **४९,९९,८५५/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४१५/२०२१-२२ दि.२९/११/२०२२ अन्वये रक्कम रु. **४९,९९,८५५/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./२९/२०२३-२४ दि. ३०/०५/२०२३ रोजी दैनिक सकाळ/पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. २१/०६/२०२३पर्यंतनिविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	इसाक शब्बीर शेख	शे.५.००% जास्त	
२	यासीन अब्दुल जब्बार शेख	शे.४.००% जास्त	
३	सिद्धांत बागुल	**अंदाजपत्रक दर**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **सिद्धांत बागुल** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **४९,९९,८५५/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक**दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक**दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **सिद्धांत बागुल** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **सिद्धांत बागुल** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **सिद्धांत बागुल** यांचे **अंदाजपत्रक** दराने आलेल्या दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. विजय बापू जाधव
अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३१ — मनपा निधी सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.०९ मध्ये सुभाष पुतळा मागे ग.नं.७ येथे नव महाराष्ट्र विजय व्यायाम शाळेची इमारत बांधकाम करणे बाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. विजय जाधव — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.रंगनाथ ठाकरे
म. सभापती

विषय मंजूर करावा.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२९ दिनांक ०३/०८/२०२३

मनपा निधी सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.०९ मध्ये सुभाष पुतळा मागे ग.नं.७ येथे नवमहाराष्ट्र विजय व्यायाम शाळेची इमारत बांधकाम करणे बाबतच्या कामास कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.५४ दि.१३/०४/२०२३ म.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.१८/०४/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३३,८६,८४५/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./०१/२० दि.१८/०४/२०२३ अन्वये रक्कम रु. **३३,८६,८४५/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./१४/२०२३-२४ दि.२१/०४/२०२३ रोजी पुण्यनगरी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. / /२० पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.वृषभ सतिष खिवसरा	शे.२.००% जास्त	
२	मे.गायत्री कन्सट्रक्शन	शे.३.००% जास्त	
३	मे.एकविरा कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकदर**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **३३,८६,८४५/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक**दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक**दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रकीय** दराने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. विजय बापू जाधव
अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३२

नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.१८ मध्ये महादेव नगर धागात रस्ता काँक्रीट व गटार करणे व नेरकर यांचे घर ते सोनवणे यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणेबाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव

नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — सभापती महोदया हा जो विषय आला आहे त्याबाबत माझा काही आक्षेप नाही. मात्र मला समजून घ्यायचे आहे की निविदा जे ठेकेदार भरतात त्यात ऐ.के सैफी हा निविदा धारक आहे त्याचा दर शे. १.००%ने जास्त आहे हे नाव मी पुष्कळ वेळा हे नाव वाचतो आहे. या ठेकेदाराने कधीही आजपर्यंत मनपाचे काम घेतलेले नाही. अनायसे मागच्या २ ते ३ बैठकीपूर्वी विषय आला होता. त्यात हा ठेकेदार एल वन होता त्यात प्रशासकीय टिपनी अशी होती एल टू हा एल वनच्या रेटमध्ये काम करायला तयार आहे म्हणून ते काम एल वन ला न देता एल टू ला हे टेंडर देत आहोत त्याने नकार दिलेला नव्हता पण तरी त्याने काम घेतले नाही. यात गौडबंगाल काय आहे. काही ठेकेदार फक्त सपोर्ट म्हणून टेंडर भरण्याचे काम करतात. असे पुष्कळ ठेकेदार आहे ज्यांनी कधीही टेंडर घेतलेले नाही. हा काय प्रकार आहे. एके सैफी ने फक्त बांधकामाचे टेंडर भरले नाहीतर एलबीटी चे ही टेंडर त्याने भरले होते. मला असे वाटते की कुठेतरी आपल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना ही गोष्ट माहित असली पाहिजे. आम्ही प्रभागात फिरतो प्रत्येक जण ओरडतो रस्ते आपल्याकडे निकृष्ट दर्जाचे होत आहे. प्रत्येक निविदेमध्ये हा ठेकेदार असतोच यात शंकेला वाव आहे.

म.अभियंता — सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत आपल्याकडे ३ लाखावरील निविदा हया सर्व ई निविदा होतात. त्यात कोणताही व्यक्ती भाग घेऊ शकतो. व संबंधीत ठेकेदार हे सर्व पात्र ठेकेदार आहे. व पात्र ठेकेदाराला भाग घेण्यास आपण मनाई करु शकत नाही. एखादा ठेकेदार फक्त मॅनेज करण्यासाठी निविदा भरतो असा संशय असल्यास आपण त्याबाबतचा अहवाल स्थायी समिती पुढे ठेवून त्यांना निविदा भरण्यास अपात्र करु शकतो. तशी तरतूद आपल्याकडे आहे. जर सन्मा. सदस्यांची तशी मागणी असेल तर आपण तसे आदेशित करु शकतो. परंतु मी सांगतो या एके सैफी नावाने बरीच कामे झाली आहे. आणि बरीच बिले पण या नावाने निघाली आहे. तसेच त्यांचे कामेपण सुरु आहे. तसेच १ एप्रिल पासून ते आजपर्यंत एकूण किती कामाच्या वर्क ऑर्डर झाल्या तो अहवाल बैठकीत सादर करु शकतो.

म. किरण अहिरराव — माझ्या प्रभागात अनुसूचित जातीची लोकसंख्या इतर राखीव प्रभागापेक्षा जास्त आहे. तरी देखील आमच्या प्रभागाचा समावेश राखीव प्रभागात करण्यांत आलेला नाही. याचा विचार करावा.

म. सभापती — सदरचा विषय मे.महासभेच्या कार्यकक्षेतील आहे.आपण आपले म्हणणे महासभेमध्ये सादर करावे.

म. दगडू बागुल — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३० दिनांक ०३/०८/२०२३

नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.१८ मध्ये महादेव नगर भागात रस्ता काँक्रीट व गटार करणे व नेरकर यांचे घर ते सोनवणे यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२८/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**२९,९३,८८४/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./८९१/२० दि.१०/०३/२०२३ अन्वये रक्कम रु. **२९,९३,८८४/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./०८/२०२३-२४ दि. १७/०४/२०२३ रोजी दैनिक सकाळ/वार्ता या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१८/०५/२०२३ पर्यंतनिविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	सौरभ संजय कदमबांडे	शे.२.००% जास्त	
२	अे.के.सैफी	शे.१.००% जास्त	
३	भूषण एल.चौधरी	**अंदाजपत्रक दर**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **भूषण एल.चौधरी** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **२९,९३,८८४/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **भूषण एल.चौधरी** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **भूषण एल.चौधरी** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **भूषण एल.चौधरी** यांचे **अंदाजपत्रक** दराने आलेल्या दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. दगडू भिमा बागुल
अनुमोदक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-१३३	धुळे मनपा साक्री रोड मोती नाला वरील पुलाच्या कामासाठी पुला खालील जलवाहिनी (पाईप लाईन) स्थलांतर करणे बाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.
म. नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. हर्षकुमार रेलन	या विषयाबाबत मी काही दिवसांपूर्वी बांधकाम विभागाकडे पत्र दिले होते की हे जे काम आहे ते महत्वपूर्ण काम आहे. नाल्याच्या रस्ता चारपदरी झाला आहे. तो चारपदरी करण्याकरता आपण उशीर करता म्हणून पण त्या पत्राचे उत्तर आलेले नाही. मला असे कळाले की मनपाने त्याची निविदा काढली आहे.२६/४/२३ चा टिपनीने याला मंजूरी दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने आपल्याला कधी पत्र दिले?
म.सहा. अभियंता	सार्वजनिक बांधकाम विभागाने ८/३/२०२३ रोजी पत्र दिले होते.
म.हर्षकुमार रेलन	ही निविदा आता प्रसिध्द झाली आहे. विनंती आहे साक्री रोड पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. फक्त तेवढे काम लवकर करुन द्यावे. आणि टिपनीत म्हटले आहे की, फुल डिपॉझिट वर्क म्हणून या कार्यालयाकडे वर्ग करण्यात येणार आहे. याचा अर्थ काय आहे?
म.सहा. अभियंता	सदर कामासाठी लागणारी संपूर्ण रककम सार्वजनिक बांधकाम विभाग देणार आहे. यात मनपाचा एक रुपया देखील खर्च होणार नाही.
म.हर्षकुमार रेलन	सभापती महोदया, हे काम झाले तर चांगले होईल. आपल्या कार्यकाळात होऊन जायाला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच सार्वजनिक विभागाकडून ७५ लाख मी साक्री रोडच्या लाईट करता मंजूर करुन घेतले होते. विद्यवर्धीनी कॉलेजचा पोल स्थलांतरीत करायचा आहे. तो एक पोल राहिला आहे. ठेकेदाराला फोन करुन झाले. बागुल साहेबांना फोन करुन झाले पण काहीच कारवाई होत नाही.
म.सभापती	बागुल साहेब हे काम त्वरीत करुन द्यावे.
म.किरण अहिरराव	या ठिकाणी दोन्ही ठिकाणी पुल होतोय चांगली गोष्ट आहे तेथून दोन पाईपलाईन गेल्या आहे. यांचे काय करणार आहे?
म.सहा. अभियंता	या ठिकाणी नविन लाईन टाकण्यात येणार आहे.
म. हर्षकुमार रेलन	सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.
म.सुनिल बैसाणे	विषय मंजूर करावा.
म. सभापती	सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३१ दिनांक ०३/०८/२०२३

धुळे मनपाची साक्री रोड मोती नाला वरील पुलाच्या कामासाठी पुला खालील जलवाहिनी (पाईप लाईन) स्थलांतर करणे बाबतच्या कामास म. आयुक्त सो., धुळे महानगरपालिका यांच्या कडील दि. २६/०४/२०२३ रोजीच्या टिपणी मंजुरीने उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.५२,२८,४९९/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१३/२०२३-२४ दिनांक ०३/०५/२०२३ अन्वये रक्कम रु. ५२,२८,४९९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ १०१ /२०२३-२४ दि.०४/०५/२०२३ अन्वये दि.०५/०५/२०२३ रोजी दैनिक आपला नवभारत / वार्ता या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१९/०५/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.५% जास्तीने	सर्वात कमी
२	आशिष एम. पटवारी	शे.८% जास्तीने	
३	सुनील विनायक जोशी	शे.६.५०% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.५.००% जास्तीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** सदर काम **शे.५.००% जास्तीने** आलेले असल्याने त्यांना या कार्यालया कडील जा.क्र./ धुमपा / पापुवि / २४२ दि. २१/०६/२०२३ अन्वये दर वाटाघाटीस बोलविले असता उक्त अंदाजपत्रकातील दर व मार्केट दरात १०% ते १२% फरक आहे व सदर काम हे शे.५% जास्त दराने भरलेले आहे. तरी शे.५% जास्त दराने मंजुरी मिळणे बाबत कळविले आहे.

उक्त बाबत दि.२४/०७/२०२३रोजी म.अभियंता यांच्या समवेत झालेल्या चर्चे नुसार मे श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन ठेकेदार यांना वाटाघाटी साठी बोलविले असता त्यांनी ५% जास्तीने दरात कमी करणेस नकार दिलेला आहे. सदरचे काम डीपॉसिट वर्क म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत जास्तीची रक्कम मागविणेत येईल . त्यामुळे सदर कामाचे दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा शे.५% जास्तीने दर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करणे बाबत प्रस्तावित केलेले आहे.

उक्त बाबत दि.२६/०७/२०२३ रोजी म.अति.आयुक्त , धुळे मनपा यांच्या समवेत झालेल्या चर्चे नुसार सदरचे काम मोती नाला पुलाचे दोन्ही साईड ला Widening होणार असल्याने धुळे मनपाच्या ४५० एम.एम. व ६०० एम.एम. स्थलांतर करणे आवश्यक आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत येणाऱ्या अंदाजपत्रकासाठी Full Side Deposite Work म्हणून या कार्यालया कडे वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे सदरचे काम आवश्यक असल्याने मे.स्थायी समिती पुढे दर मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **मे श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांचे **शे.५.००% जास्तीने** दराने आलेल्या दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन
अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३४ धुळे मनपा हद्दीतील खड्डे बुजविणे तसेच रस्ते व क्रॉस ड्रेनेज ची दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे बाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे मागील सभेत विषय आल्यानंतर याबाबत सन्मा. सदस्यांनी शंका मी उपस्थित केल्या होत्या आणि पुन्हा स्थायी समितीपुढे हा तहकूब केलेला विषय आलेला आहे. सदरच्या विषयाबाबत मी मागे देखील शंका उपस्थित केली होती. ज्यावेळेस कार्यालयीन टिपनी पाहिली तेवहा लक्षात आले सदरचा विषय घाई घाईने स्थायी पुढे आणण्यात आला आहे. असे माझे मत आहे. धुळे शहरातील खड्डे हे नागरिकांच्या तक्रारी नुसार खड्डे हे बुजवले जातात. विभागाकडून आलेला विषय हा डायरेक्ट आयुक्त सो. यांच्या मान्यतेने घेण्यात आला आहे. आयुक्त साहेब या ठिकाणी उपस्थित नाही. संबंधीत विभागाचे अधिकारी यांनी उत्तर द्यावे की लेखा विभागाचा याबाबत काय आक्षेप आहे? हा विषय लेखा विभागाकडून स्थायी समितीपुढे आणने गरजेचे वाटले नाही का? दुसरी गोष्ट ज्या वेळेस निविदा काढण्यात आली होती सदरचे कामाबाबत निधी बद्दल त्यामध्ये नमुद केलेले असते. सदरचा विषय कशामधून घेण्यात यावा, देयके कशामधून देण्यात यावी. निविदा काढण्याच्या वेळी देयके कोणत्या निधी मधून देण्याचे त्यामध्ये नमूद होते? त्याबाबत उत्तर देणे अपेक्षीत आहे. आपण याठिकाणी १ कोटीची वार्षिक मान्यते नुसार दिलेले आहे. मा.सभापती महोदया आपण देखील कार्यालयीन टिपणी वाचली असेल. या समिती समोर किती रुपयाची मान्यता द्यायची आहे ? किती लाखांची कामे झाली याबद्दल कुठेही उल्लेख टिपणीत नाही. कामे कुठे कुठे करणार आहे कुठे केली आहे याबद्दलचा उल्लेख नाही आपण कोट्यावधीची विकासकामे देवपूर मध्ये केलेली आहे. धुळे शहरातही कोट्यावधीची विकासकामे केली आहे येणाऱ्या काळामध्ये गणपती, नवरात्र उत्सव आहे अनेक सण येत आहे. त्याबाबत संबंधीत विभागकडे आवाहन आले आहे का की हे खड्डे बुजवणे क्रमप्राप्त आहे? आपण खड्डे बुजवतो पण दुसऱ्याच खड्ड्यांबाबत तक्रारी येतात हे खड्डे बुजवले नाही म्हणून. खड्डे बुजवल्या नंतर आपण अहवाल सादर करतो का? तसेच या ठिकाणी दिलेले आहे सदरची देयके ही जी नव्याने जिओ केबल टाकण्यात आली त्या केबल लाईनचा धनादेश आपल्याकडे प्राप्त झाला आहे. त्या धनादेशातून देण्यात यावी. आधीच्या कार्यालयीन टिपनीत याचा कुठेही उल्लेख नाही. आपण निविदा सादर करतो त्यामध्ये स्पष्ट उल्लेख असतो. की सदरची देयके कुठल्या निधीतून देण्यात यावी. अनेक ठेकेदार आहे. ते आपल्या विनंतीवरुन विकासकामे करीत असतात. त्यांना देयके देणे बंधनकारक नाही का? अत्यावश्यक मध्ये खड्ड्यांचा विषय नाही. पाण्याचा विषय गंभीर असतांना त्या विषयाची का निविदा प्रक्रीया तात्काळ का करत नाही? या कार्यालयीन टिपनीला काहीच अर्थ नाही. लेखाधिकारी साहेबांना माझा प्रश्न आहे हा विषय आपल्या समोर आला आहे का? आला असेल तर त्यावर काय निर्णय घेतला याचे उत्तर द्यावे. नसेल तर काय निर्णय घेणार याचे उत्तर द्यावे.

म.लेखाधिकारी लेखा विभागाच्या वतीने माझे मत असे की, जर एखाद्या कंपनीने केबल लाईन टाकली असेल. किंवा कोणतेही डॅमेज झाले असेल शासन निर्णयानुसार ते नुकसान भरपाई ती त्या त्या प्रभागात वापरली गेली पाहिजे. या अनुषंगाने फाईल बघीतल्यावरच कळेल. मी तपासून बघतो.

म.सुनिल बैसाणे मा. सभापती महोदया हा अत्यंत गंभिर विषय आहे. धुळे मनपा सुरळीत चालवण्यासाठी जी देयके येतात ती सन्मा. पाटील साहेबांच्या माध्यमातून दिली जातात. त्यांच्या समोर हा सदरचा विषय आलेला नाही. हे माझे ठाम मत आहे. त्यांनी जरी सांगीतले तपासून बघतो पण सदरचा विषय डायरेक्ट आयुक्त साहेबांकडून मंजूर होऊन आला आहे. त्यामुळे त्याखालील जे अधिकारी असतील त्यांच्या समोर हा विषय आला नाही. कंपनीने जी नुकसान भरपाई दिली ती जे जे नादुरुस्त झाले असतील त्या कामांसाठी आहे. ती खड्डे बुजवण्यासाठी नाही. सदरचा तहकूब विषय दिशाभूल करुन ज्या अधिकाऱ्याने आणला त्यांना विचारणा केली पाहिजे. निविदा झाल्या असतांना निविदे मध्ये काय होता? आणि यामध्ये तुम्हाला किती बिले अपेक्षित आहे? गायत्री कन्सट्रक्शन या ठेकेदाराचे धुळे मनपाकडे बिले अदा करण्यासाठी किती मागणी आहे? याबाबत सुध्दा माहिती द्यावी.

म.सहा. अभियंता — सदरचा विषय हा लेखा विभागाकडे गेलेला नाही. अति. आयुक्त साहेबांकडून डायरेक्ट आयुक्त साहेबांकडे गेला होता. यामध्ये फक्त खड्डे बुजवण्याचा विषय नाही. तर चेंबर करणे, वेगवेगळया दुरुस्त्या आहे. सदरचा निधी हा खड्डे बुजवण्याच्या कामासाठी मनपा निधीतून १ कोटी तरतूद केली आहे त्यातून हा विषय घेतला आहे. यासाठी १ कोटीची प्र.मा. आयुक्तांनी दिली आहे. तसेच सणा सुदीच्या दिवसांत खड्डे बुजवण्याची तक्रार आमच्या विभागाकडे आलेली नाही. धुळे शहरात शंभर फुटी व ऐंशी फुटी रोड, फुलवाला चौक ते गल्ली नं. ४ व पाच अशा गल्या आहेत तेथे त्या ठिकाणी कुठलाही रस्ता आज प्रस्तावित केलेला नाही. हे खड्डे शहरातील आहे ते बुजवणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच कामाची वर्क ऑर्डर जरी झाली कामाच्या आगोदरचे जी आय टॅग फोटो व काम झाल्यानंतरचे जी आय टॅग फोटो काढल्या नंतरच ठेकेदाराला देयक अदा केले जाईल.

म.सुनिल बैसाणे — सभापती महोदया, त्यांनी स्वत: मान्य केले लेखा विभागाकडे हा विषय गेला नाही. सदरचा विषय हा लेखा विभागचे आक्षेप असतील नसतील ते जाणून घेण्यात यावे. दुसरी गोष्ट मनपा निधी अंतर्गत सदरचा विषय आला आहे. सदर विभागाने मनपाच्या निधिमूधन हे देयके अदा करण्यात यावी असे नमूद करणे बंधनकारक होते. विभागाला कुठुन पैसे मिळाले, कुठुन निधी द्यावा हा त्यांचा अधिकार नाही. हा अधिकार संबंधीत आयुक्तांचा आहे. समितीचा आहे. किंवा अत्यावश्यक सेवेचा आहे. त्यावेळेस आयुक्त महोदय त्याबाबत निर्णय घेऊ शकतात. परंतु जर तुमचा उद्देशच मनपा निधीचा आहे तुम्ही आता आलेल्या पैशावर डोळे ठेवून हा विषय आणलेला आहे. स्टेशन रोड पहा, साक्री रोड पहा शिवाजी महाराज पुतळा ते गांधी पुतळा पहा येथील खड्डे बुजवले पाहिजे. देवपूर येथील खड्डे बुजवण्यासाठी लाख रुपये खर्च करु आणि पुन्हा तोच रस्ता होणार आहे तर काय उपयोग. चारही भागातील इंजिनियर कडून सर्वे करा त्याचा अहवाल सादर करा. त्यानुसार खड्डे बुजवण्याचे काम करावे. मंजूर झालेल्या रस्तयांवर खड्डे बुजवण्याचे काम करु नये. वस्तुनिष्ठ अहवाल स्थायी समिती समोर आल्यानंतरच सदरचा विषयावर निर्णय घेण्यात यावा. हे देयके देण्याचे नमुद केले ते मनपा निधीतूनच देण्यात यावे. जर इतर निधीमधून सदरच्या ठेकेदाराला बिले अदा केले तर मी यावर कायदेशिर तक्रार करणार आहे. याची नोंद घेण्यात यावी. तो पर्यंत हा विषय तहकूब करावा.

म.हर्षकुमार रेलन — सभापती महोदया, हा विषय यापूर्वी पण स्थायीमध्ये आलेला आहे. हा २०२२ चा विषय आहे. २०२२मध्ये खड्डे असतील पण आपण चालू वर्षात सत्ताधारी पक्षाच्या माध्यमातून रस्त्यांची कामे केली आहे. आज तेथे खड्डे असतीलच असा अहवाल नाही. ज्या ज्या रस्त्यावर खड्डे असतील ते रस्ते नविन बनवून टाकले आहे. मग त्यावर खड्डे आहेत हे कसे गृहीत धरायचे? अभियंता साहेबांनी सांगीतले की गल्ली नं ४ व ५ येथे खड्डे आहेत पण मा. उपमुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी १०० कोटी रुपये दिले आहे त्यामध्ये ते रस्ते मंजूर आहेत. त्यांच्या गटारींचे काम झाले आहे. फक्त रस्त्यांचे कामे बाकी आहे. त्यानंतर आग्रा रोडवर खड्डयांचे सांगीतले पण तोही रस्ता आताच झाला आहे. खड्डे बुजवलेच पाहिजे पण हा २०२२ चा अहवाल आहे. त्यात रक्कम पण दिलेली नाही. आपण कशाला मंजूरी देत आहोत ते पण माहित नाही. आपण वस्तुनिष्ठ अहवाल बनवावा २०२३-२४ चा आणि त्याप्रमाणे आपल्याला कुठे कुठे खड्डे आहेत हे अवगत करावे. आणि सभेपुढे अर्धवट टिपणी आणू नये. तो पर्यंत हा विषय रद्द करुन नविन अहवाल स्थायीपुढे आणावा.

म.किरण अहिरराव — सभापती महोदया या विषयामध्ये रक्कमेचा उललेख केलेलानाही. या विषयात काही गौड बंगाल आहे का? ही शंका आहे. १ कोटी रुपये खर्च करुन मनपाची बदनामी बंद होणार आहे का? सत्ताधारी पक्षाची बदनामी बंद होईल का? हा मोठा प्रश्न आहे. व्हॉटसॲप वरील बदनामीकारक मॅसेज बंद होतील का? महाविकास आघाडी सरकारमुळे आमचे सुरवातीचे साडे तीन वर्षे वाया गेले. जुलै २०२२ मध्ये शिंदे-फडणवीस सरकार आहे निधी येण्यास सुरवात झाली. आपल्या वरिष्ठ नेत्यांच्या आशिर्वादाने जुलै २०२२ नंतर मोठया प्रमाणात निधी येतो. आणि हि टिपणी झालेली आहे ऑक्टोंबर २०२२ ला तर मागील साडेतीन वर्षात जे खड्डे होते त्या अनुषंगाने ही टिपणी तयार केली आहे. ज्या ठिकाणी खड्डे असतील तेथे रस्तयांची कामे मंजूर झालेली आहे. तर मग कशासाठी मनपाचा पैसा वापरायचा? माझी विनंती आहे हे १ कोटी रुपये हद्दवाढमधील १० गावांतील रस्तयांवरील खड्डे आहे तेथे मुरुम, खडी टाकण्यासाठी वापरण्यात यावे. आमच्या प्रभागात ४०-४० वर्षापासून साधा मुरुमपण पडलेला नाही. हा पैसा तेथे वापरण्यात यावा. सनेर साहेब आमच्या प्रभागात भेट द्यावी. ग्रामपंचायतीच्या काळात घरपट्टी १००० रुपये येत होती. आता मात्र ५००००/- रुपयांवर घरपट्टी येत आहे. काही सुविधा नसतांना ही

घरपट्टी कशी भरावी? माझी विनंती आहे तेथील खड्डे भरले जावे. ठेकेदार लोकांची बिले अदा केलेली नाही. त्यांचे बिले अदा करण्यात यावी. असा वायफळ खर्च करु नये. हा विषय नामंजूर करण्यात यावा.

म.सभापती — सन्मा. सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहे त्या अनुषंगाने येणार काळ हा सण व उत्सवांचा आहे जे खड्डे बुजवणार आहे त्यांचा संपूर्ण वस्तुनिष्ठ अहवाल स्थायी समिती समोर सादर करण्यात यावा. अदा करण्यात येणारी रक्कम या प्रस्तावात दिलेले नाही. नविन अहवाल तयार करुन लेखा विभागाकडून तपासून सव्वीस्तर सादर करावा. सदरचा विषय पुढील सभेत घेण्यात यावा तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३२ दिनांक ०३/०८/२०२३

धुळे मनपा हद्दीतील खड्डे बुजविणे तसेच रस्ते व क्रॉस ड्रेनेज ची दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे बाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणेबाबत प्रस्ताव मे.स्थायी समितीसमोर सादर झाला असता , सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार सदरचा प्रस्ताव सन २०२२ मधील असून त्यानंतर अनेक भागामध्ये नवीन रस्ते प्रसतावित करण्यांत आलेले आहेत. तसेच कोण कोणत्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यांत येणार आहे याबाबत सविस्तर माहिती प्रस्तावात नमूद करावी व सदरच्या प्रस्तावाबाबत वस्तुनिष्ठ अहवाल लेखा विभागाकडून तपासून सादर करावा तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३५ — पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील व्हॉलमन १ ते १३ कर्मचा-यांना ६ महिन्याकरीता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — मला या विषयाच्या अनुषंगानेच काही प्रश्न आहे. धुळे मनपातील इतर विभाग जे आहे त्या विभागात आपण एजन्सीच्या माध्यमातून कर्मचारी नियुक्त करुन कामे करुन घेतो. परंतु सदच्या एजन्सीच्या बाबतीमध्ये पत्रकार, लोकप्रतिनिधी, नागरिकांनी त्यावर आक्षेप नोंदवल्यामुळे एजन्सीचे काम आता बंद करण्यात आले आहे. आणि पावसाळयाचे दिवस सुरु आहे. अनेक ठिकाणी डबके साचून डेंग्युच्या डासाची उत्पत्ती होते. मलेरिया विभागात फक्त ६ कर्मचारी कार्यरत आहे. आणि त्या विभागामध्ये काम करणे बंधनकारक आहे. म्हणून विनंती आहे ज्या ज्या विभागामध्ये कर्मचारी नियुक्त करुन कामाची रुपरेषा आखून मनपाचे कामे व्यवस्थीत पार पाडावी म्हणून नविन निविदा प्रक्रीया करुन बाहय स्त्रोताच्या माध्यमातून कर्मचारी प्रत्येक विभागासाठी देण्यात यावे. सन्मा. सभापती महोदयांनी मा. आयुक्त साहेबांना पत्र देखील दिले आहे. त्या पत्राच्या अनुषंगाने त्या विषयाची तात्काळ निविदा प्रक्रीया करावी. आपण अनेक एजन्सीच्या माध्यमातून कामे करुन घेतो. पंरतु त्यांना बिले अदा केली जात नाही. आणि बिले अदा झाली नाही म्हणून संबंधीत एजन्सी काम बंद करत असते. सभापती महोदया मनपाकडे जे व्हॉल मन आहेत त्यांचे ३ ते ४ महिन्यांचे मानधन दिले गेले नाही. आणि जर तया व्हॉल्वमन यांनी कामे बंद केली तर पाणी वितरणाचा प्रश्न निर्माण होईल. त्यांना मानधन दिले गेले पाहिजे. ज्या एजन्सीवर आक्षेप असेल त्या पध्दतीने त्या एजन्सीवर कारवाई करा. मनपा नगरसेवक व लोकप्रतिनिधींना तुम्ही वेठीस धरत आहात ही फार मोठी गंभीर बाब आहे. एजन्सीकडे न पाहता केलेल्या कामाचा मोबदला त्या कर्मचाऱ्यांना देण्यात यावा. आणि नविन निविदा प्रक्रीया करण्यात यावी. आणि संबंधीत व्हॉल्वमन यांच्या कामाच्या पध्दती पाहून त्यांना मुदतवाढ देण्यात यावी. अशी विनंती करतो.

म.सभापती — मा. उपायुक्त महोदय, सन्मा. सदस्यांनी ज्या सूचना मांडल्या त्या योग्य आहे. शहराचा विस्तार वाढला आहे लोकसंख्या ही वाढली आहे. तेव्हा ६२० कर्मचारी होते आणि ६२३ कर्मचारी आहे यावर आपण विचार करायला हवा तेव्हा हद्दवाढ नसतांना तेवढेच कर्मचारी व हद्दवाढ झाल्यावरही तेवढेच कर्मचारी

काम करतायेत, शहराची स्वच्छता कशी होणार आहे? आणि आस्था या संस्थेचा ठेका बंद झाला याला काय पर्याय आहे ? याबाबत सव्वीस्तर खुलासा करावा.

म.किरण अहिरराव — धुळे शहरात एकूण व्हॉलमन यांची संख्या किती आहे?

म. आस्थापना लिपिक — शहरात एकूण ४८ व्हॉल्वमन कर्मचारी कार्यरत आहे.

म.किरण अहिरराव — धुळे शहरात एकूण व्हॉल्व किती आहे? फक्त ४८ व्हॉल्वमन धुळे शहर व हद्दवढीची १० गावे सांभाळत आहे पाणी मुबलक आहे शहरात अक्कलपाडा येथून पाणी येते, तापी योजनेतून पाणी येते, डेडरगाव तलावातून पाणी येते नुकतेच आपण १० ते १२ अभियंता भरले आहे त्यांना या कामाला लावावे.

म.उपायुक्त — त्यांना या बाबतीत यापूर्वीच काम दिलेले आहे. पाईपलाईन व्हॉल्व यांची जबाबदारी दिली आहे. त्या संदर्भात परवाच या सभागृहात बैठक झाली. त्याची डिटेल माहिती मी माझ्या कार्यलयात तुम्हाला देतो. आपल्याला ११० एमएलडी पाणी दररोज मिळणार आहे. तुमच्या विषयाची मी नोंद घेतली आहे.

म.किरण अहिरराव — माझे म्हणने आहे व्हॉल्वमन यांची संख्या वाढवावी पाणी भरपूर आहे शहरात पण त्याचे नियोजन नाही. तुम्ही तुमची यंत्रणा व्यवस्थीत राबवावी.

म.उपायुक्त — उगले साहेब आस्था कडील ५० कर्मचाऱ्यांचे गेल्या ३ महिन्यापासून पगार झालेला नाही. व आपली सभागृहात जी चर्चा झाली त्याबाबत सभागृहाला अवगत करावे.

म.सभापती — साहेब आपण आस्थाचा ठेका रद्द केला त्याला पर्याय काय काढला आहे? त्यांच्या जागेवर कोणते कर्मचारी काम करणार आहे?

म.उपायुक्त — टेंडर काढले आहे. त्यांच्या जागी आपण बाहय स्त्रोताद्वारे कर्मचारी भरणार आहोत. तसेच आस्थातील कर्मचाऱ्यांचे पगार लवकरात लवकर दिले जातील.

म.सहा. अभियंता — मनपात पाणी पुरवठा विभागात नविन ५० कर्मचाऱ्यांची निविदा काढली आहे. नविन निविदा उद्या भरण्याची शेवटची तारीख आहे. दोन दिवसांत ओपन करुन स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी पाठवू. आस्था कर्मचाऱ्यांचा मे, जुन , जुलै या महिन्यांचा पगार बाकी आहे.

म.सुनिल बैसाणे — हा फक्त पाणी पुरवठयाचा प्रश्न झाला मनपात अनेक विभाग आहे. त्या विभागाकडे मागणी करावी. त्यांना किती कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे ते पाहून कार्यवाही करावी.

म.उपायुक्त — सन्मा. सदस्यांनी ज्या काही गोष्टी सांगीतल्या तो आस्थापनाशी निगडीत विषय आहे. आकृती बंध २०१६ ला मंजूर झालेला आहे. त्यानंतर २०१८ साली ११ गावांचा समावेश झाला आहे. याचा आढावा घेण्याच्या बाबतीत जी कार्यप्रणाली बाकी आहे त्याचा संपूर्ण अहवाल घेऊन लवकरच सभागृहात सादर करु. तसेच पदांची जी गोष्ट असते पद निर्मिती जर आपल्याकडे असेल तर यावर आपल्याकडे मानधन किंवा आऊटसोर्स ची निविदा काढावी लागेल. लोकसंख्येच्या हिशोबाने किती पदांची गरज आहे त्या संदर्भात शासनाच्या काही गाईडलाईन आहे त्याप्रमाणे ती प्रोसिजर करावी लागेल.

म.सुनिल बैसाणे — आस्थापनाला २२०० पदे अपेक्षित आहे. आस्थापना विभागाची बैठक घ्यावी. शिक्षण मंडळाच्या इंग्रजी माध्यमांच्या शिक्षीका ६-६ वर्षापासून काम करत आहे. तुम्ही त्यांना कायदेशिर आदेशही देत नाही. ते बेकायदेशिररित्या काम करत आहे. जर एकाही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले तर ते मनपाचे पाप राहिल. त्यांना कायदेशिर ही करत नाही. आणि त्या शाळा बंद ही करत नाही. ११ खेडे गावांमध्ये आपण सेवा देतो आहे का? उत्पन्नाचे सोर्स वाढवण्यासाठी उत्पन्नाच्या बाबी निर्माण करा. खड्डयांमध्ये पैसे भरण्यापेक्षा कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करा. सभापती महोदया आपण पत्र दिले आहे त्या अनुषंगाने बैठक घ्यावी. आऊटसोर्सींगचे टेंडर तात्काळ प्रसिध्द करावे. या चर्चेला अतिम स्वरुप मिळावे अशी विनंती करतो.

म.सभापती — सनेर साहेब ही बैठक झाल्यानंतर सर्व विभागांची एक बैठक घेऊ.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३३ दिनांक ०३/०८/२०२३

पाणीपुरवठा विभागाकडील खालील नमुद १ ते १३ एकत्रित मानधनावरील व्हॉलमन यांना पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत सदर ठरावानुसार मंजुरी देण्यात आलेली आहे.

१ ते १३ व्हॉलमन यांना एकत्रित मानधनावर पुढील ६ महिनेकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांची दि ४/७/२०२३ रोजी मुदत संपुष्ठात येत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	एकत्रित मानधन दरमहा	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक
१	दिपक छगन बागुल	रु. १४०००/-	४/७/२०२३
२	सैय्यदइमरान अली जाफर अली	रु. १४०००/-	४/७/२०२३
३	तुषार गिरीश चौधरी	रु. १४०००/-	४/७/२०२३
४	शिंदे दिनेश रामसिंग	रु. १४०००/-	४/७/२०२३
५	चंद्रकांत मोतीलाल फुलपगारे	रु. १४०००/-	४/७/२०२३
६	हेमराज भाईदास कोळी	रु. १४०००/-	४/७/२०२३
७	प्रमोद विठठल सोनवणे	रु. १४०००/-	४/७/२०२३
८	गणेश शंकर बिरारी	रु. १४०००/-	४/७/२०२३
९	किरण राजेंद्र फुलपगारे	रु. १४०००/-	४/७/२०२३
१०	योगेश भानुदास वाखारकर	रु. १४०००/-	४/७/२०२३
११	ज्ञानेश्वर तुकाराम सैंदाणे	रु. १४०००/-	४/७/२०२३
१२	प्रणय राजेंद्र लहामगे	रु. १४०००/-	४/७/२०२३
१३	रणदिवे राहुल अरुणराव	रु. १४०००/-	४/७/२०२३

पाणीपुरवठा विभाग यांनी उक्त १ ते १३ मानधनावरील व्हॉलमन यांचे कामाचे कोणतीही तक्रार नसून त्यांचे काम समाधानकारक असल्याने व कामाची निकड पाहता त्यांना पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

तरी महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत खालीलप्रमाणे अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उपरोक्त व्हॉलमन (मानधनावरील) कर्मचा-यांना ५दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ५३ (३) नुसार सदरचा विषय मे. स्थायी समिती पुढे ठेवणेबाबत कार्यालयीन टिपणी सादर केली असता त्यास मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे त्यानुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावा ही विनंती.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील व्हॉलमन १ ते १३ कर्मचा-यांना ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ६महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ५३ (३) नुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

तसेच मनपा कडील अपूर्ण मनुष्यबळ लक्षांत घेता विभाग निहाय आवश्यक ते कर्मचारी मानधन तत्वावर बाहय यंत्रणेव्दारे पुरविणेसाठी विभाग निहाय आढावा घेवून प्रस्ताव सादर करावा.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २१ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक १७/०८/२०२३
वेळ :- दुपारी ४-३० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२१ आज **गुरूवार दिनांक १७/०८/२०२३ रोजी दुपारी ४-३० वाजता सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
४	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. विजय रघुनाथ सनेर	उपायुक्त
२	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
५	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव

६	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
७	श्री.कैलास शिंदे	अभियंता
८	श्री.डॉ.एम.आर.शेख	आरोग्याधिकारी
९	श्री. पी.डी. चव्हाण	सहा.अभियंता
१०	श्री.चंद्रकांत उगले	सहाय्यक अभियंता पाणी पुरवठा
११	श्री.चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१३	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१४	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
१५	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
१६	श्री. शिरिष जाधव	वसुली अधिक्षक
१७	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१८	श्री. मोहनीश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१९	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
२०	श्री.संजय मोरे	लिपीक,आस्थापना विभाग
२१	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२२	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२३	श्री. महेंद्र सुर्यवंशी	प्रशासन अधिकारी , मनपा शिक्षण मंडळ
२४	श्री.पराग ठाकरे	विद्युत विभाग
२५	श्री.सुक्राम राऊत	वाहन विभाग
२६	श्री.दुष्यंत महाजन	अग्निशमन विभाग प्रमुख

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- १३६ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे (सभा क्रं.१७ दि. ०६/०७/२०२३)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागणी स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.कल्याणी अंपळकर मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३४ दिनांक १७/०८/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.१७ दिनांक ०६/०७/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर ९९ ते १०९ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३७ मुलभूत सोई सुविधा निधी सन २०२१-२२ अंतर्गत पाच कंदील चौक ते ख्रिश्चन कब्रस्तान पर्यंत व गोल बिल्डींग अकबर चौकापर्यंत रस्ता काँक्रीट करणे व पाच कंदील चौक सुशोभिकरण करणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.खान मो. साबीर सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.अन्सारी वसीम विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३५ दिनांक १७/०८/२०२३

मुलभूत सोई सुविधांचा सन २०२१-२२ अंतर्गत पाच कंदील चौक ते ख्रिश्चन कब्रस्तान पर्यंत व गोल बिल्डींग अकबर चौकापर्यंत रस्ता काँक्रीट करणे व पाच कंदील चौक सुशोभिकरण करणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१९/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**८९,९७,०५५/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४२८/२० दि.२९/११/२०२३ अन्वये रक्कम रु. **८९,९७,०५५/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./२८/२० दि. ३०/०५/२०२३ रोजी दैनिक मिड डे /लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. ०४/०७/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	फहाद मिर्झा	शे.४.००% जास्त	
२	मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रक दर**	**सर्वात कमी दर**
३	साजीद अली शाह	शे.२.००% जास्त	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **८९,९७,०५५/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रक दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम धरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा

दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.खान मो.साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक :- श्री.अन्सारी वसीम खलील

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३८ मुलभूत सोई सुविधा निधी सन २०२१-२२ अंतर्गत प्र.क्र.१९ मध्ये गट नं.३१ च्या मोकळ्या जागेत कुंपण भिंत व प्ले ग्राउंड तयार करणेबाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल वैसाणे सदरचा विषयाबाबत त्या जागेवर मनपाचे आरक्षण व जागा मालकी हक्कबाबत नगररचनाकार विभागाकडून तपासणी करून घेण्यात यावी.

म.अन्सारी फातमा सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. अब्दुल लतीफ विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर जागेबाबत मनपाचे आरक्षण व मालकी हक्क नगररचना विभागाकडून तपासणी करण्यात यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३६ दिनांक १७/०८/२०२३

मुलभूत सोई सुविधांचा सन २०२१-२२ अंतर्गत प्र.क्र.१९ मध्ये गट नं.३१ च्या मोकळ्या जागेत कुंपण भिंत व प्ले ग्राउंड तयार करणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१९/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**९९,९८,९२२/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४१४/२० दि.२९/११/२०२३ अन्वये रक्कम रु. **९९,९८,९२२/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./२८/२० दि.३०/०५/२०२३ रोजी दैनिक मिड डे /लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत

येऊन दि.०४/०७/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	साजीद अली शाह	शे.५.००% जास्त	
२	फहाद मिर्झा	शे.३.००% जास्त	
३	मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रक दर**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **९९,९८,९२२/-**इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रक दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. तसेच सदर जागेबाबत मनपाचे आरक्षण व मालकी हक्क नगररचना विभागाकडून तपासणी करण्यात यावी.

सुचक :- श्रीमती अन्सारी फातमा नुरूल अमीन

अनुमोदक :- श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३९ मुलभूत सोई सुविधा निधी सन २०२१-२२ अंतर्गत अंजुमन मुस्लीम शाह बिरादरी सर्व्हे नं.४६८३/१ जागेवर सामाजिक सभागृह बांधणेबाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे सदरचा विषयाबाबत त्या जागेवर मनपाचे आरक्षण व जागा मालकी हक्कबाबत नगररचनाकार विभागाकडून तपासणी करून घेण्यात यावी.

म. किरण अहिरराव — सदर मुलभूत सेवा सुविधा अंतर्गत असलेली कामे ठराविक भागापुरता मर्यादित आहेत. सर्व भागात विकास कामे होणे आवश्यक आहे. याचा विचार करावा.

म.खान मो.साबीर — सदरचा विषय मंजूर करावा.

म.नाजीयाबानो पठाण — विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर जागेबाबत मनपाचे आरक्षण व मालकी हक्क नगररचना विभागाकडुन तपासणी करण्यात यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३७ दिनांक १७/०८/२०२३

मुलभूत सोई सुविधांचा सन २०२१-२२ अंतर्गत अंजुमन मुस्लीम शाह बिरादरी सर्व्हे नं.४६८३/१ जागेवर सामाजिक सभागृह बांधणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१९/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**९९,९९,२६४/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४१३/२० दि.२९/११/२०२३ अन्वये रक्कम रु. **९९,९९,२६४/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./२९/२०दि. ३०/०५/२०२३ रोजी दैनिक सकाळ/पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२१/०६/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	अे.के.सैफी	शे.१.००% जास्त	
२	सौरभ संजय कदमबांडे	शे.२.००% जास्त	
३	रिजवान अहमद युसुफ पटेल	**अंदाजपत्रकदर**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **रिजवान अहमद युसुफ पटेल** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **९९,९९,२६४/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक**दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **रिजवान अहमद युसुफ पटेल** यांचे दर **अंदाजपत्रक दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **रिजवान अहमद युसुफ पटेल** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **रिजवान अहमद युसुफ पटेल** यांचे **अंदाजपत्रक दराने**

आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. तसेच सदर जागेबावत मनपाचे आरक्षण व मालकी हक्क नगररचना विभागाकडुन तपासणी करण्यात यावी.

सुचक :- श्री.खान मो.साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक :- श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा

सर्वानुमते मंजुर,

सही xxx/-

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१४० धुळे मनपा अंतर्गत विविध प्रभागांमध्ये पाईपलाईनचे दुरूस्ती करणे व व्हॉल बसविण्यात आले. सदरचे कामास कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सुनिल बैसाणे सदरचा विषयास कार्यात्तर मंजूरीचा आहे. यांत काम निहाय झालेल्या खर्चांचा उल्लेख आहे. एकुण खर्च नमूद केलेला आहे. शहरातील विविध ठिकाणी व्हॉल लिकेंजेस होत असतात ते दुरूस्त करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतू व्हॉल दुरूस्तीचे कोणते काम करण्यांत आले यापूर्वी कधी केले कामाची आवश्यकता काय? याचा उल्लेख कार्यालयीन अहवालात होणे आवश्यक आहे. यापूढे विभागाने दक्षता घ्यावी.

म.रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३८ दिनांक १७/०८/२०२३

१) प्र. क्र. १९ अलहेरा हायस्कुल वाल्व, २) प्र. क्र. १ मध्ये नकाने वाडीभोकर रोड वरील पॅपिंग लाईन वरील लिकेज काढणे, ३) प्र. क्र. ४ भिडे बाग मधील पाईप लाईन चोकअप काढून वाल्व टाकणे, ४) सिमेंट जलकुंभावरील पॅपिंग लाईन संतोषी माता चौक येथे दुरुस्ती करणे, ५) आझाद नगर येथे ८ इंची वाल्व टाकणे असे विविध ठिकाणी पाईप लाईन लिकेज, तसेच विविध ठिकाणी वाल्व नादुरुस्त असल्याने हजारो लिटर शुद्ध पाणी वाया जात आहे. सदरच्या पाणी गळतीमुळे त्या भागातील नागरिकांना पाणीपुरवठा करणेस अडचण निर्माण झालेलो आहे.त्यामुळे सदर चे पाईप लाईन दुरुस्ती व नवीन वाल्व टाकणे आवश्यक असल्याने उक्त काम हे तातडीने व त्वरित करणे आवश्यक आहे. तरी उक्त कामास अंदाजित रु. ३,६५,२४१/- अपेक्षित आहे.

तरी,सदर चे काम हे भागातील नागरिकांच्या पाणी पुरवठ्याशी संबंधित असल्याने सदरची पाईप लाईन दुरुस्ती काम व नवीन वाल्व टाकणेचे काम हे विना निविदा श्री. संजय

दगडू गायकवाड ठेकेदार, धुळे यांच्या कडुन करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी वअंदाजपत्रकीय खर्च रु.३,६५,२४१/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा अंतर्गत विविध प्रभागांमध्ये पाईपलाईनचे दुरूस्ती करणे व व्हॉल बसविण्याचे काम हे विना निविदा श्री.संजय दगडू गायकवाड,धुळे यांच्याकडुन करून घेण्यात आले. सदर कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (क)अन्वये रू.३,६५,२४१/- खर्चास कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच यापुढे टिपणी सादर करतांना सदर कामासाठी कोणती वस्तूसाठी किती रूपये खर्च झाला व ते काम यापुर्वी कधी करण्यात आले होते याचे सविस्तर अहवाल टिपणीमध्ये देण्यात यावा.तसेच सदर कामाबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची संबंधित विभागाने दक्षता घ्यावी. कायोत्तर मान्यतेचे विषय सादर करतांना काम निहाय खर्च तसेच सदर काम हे यापूर्वी कधी करण्यांत आले. काय काम झाले याचा तपशील कार्यालयीन अहवालात नमूद करण्यांत यावा.

सुचक:-श्री.रंगनाथ रतन ठाकरे

अनुमोदक:- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २२ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक २४/०८/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२२ आज **गुरूवार दिनांक २४/०८/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१२	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती अमिता दगडे-पाटील	आयुक्त
२	श्रीमती करूण डहाळे	अति.आयुक्त
३	श्री. विजय रघुनाथ सनेर	उपायुक्त
४	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
५	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
६	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
७	श्री.नवनीत सोनवणे	कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा विभाग

८	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
९	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
१०	श्री.कैलास शिंदे	अभियंता
११	श्री.डॉ.एम.आर.शेख	आरोग्याधिकारी
१२	श्री. पी.डी. चव्हाण	सहा.अभियंता
१३	श्री.चंद्रकांत उगले	सहाय्यक अभियंता पाणी पुरवठा
१४	श्री.चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१५	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१६	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१७	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
१८	श्री.मधुकर निकुंभे	वसुली अधिक्षक
१९	श्री. शिरिष जाधव	वसुली अधिक्षक
२०	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
२१	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
२२	श्री. कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
२३	श्री. एच.पी. पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
२४	श्री.संजय मोरे	आस्थापना विभाग प्रमुख
२५	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२६	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२७	श्री. महेंद्र सुर्यवंशी	प्रशासन अधिकारी , मनपा शिक्षण मंडळ
२८	श्री.राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२९	श्री.सुक्राम राऊत	वाहन विभाग
३०	श्री.अमोल सोनवणे	अग्निशमन विभाग
३१	श्री.विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे. तसेच मनपाच्या सेवेत नव्याने नियुक्त झालेलया मा.आयुक्त श्रीमती अमिता दगडे-पाटील, अति.आयुक्त श्रीमती करूण डहाळे, कार्यकारी अभियंता श्री.नवनीत सोनवणे या सर्वांचे आजच्या स्थायी समितीमध्ये स्वागत करतो.

सन्मा.सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी

म.सभापती काल दिनांक २३.८.२०२३ रोजी ६ वाजून ४ मिनटांनी आनंदाचा क्षण अनुभवला आदरणीय महापौर महोदया, तसेच अधिकारी कर्मचारी यांनी या सभागृहात थेट प्रक्षेपणाची व्यवस्था केली होती. आपल्या भारतातर्फे यानाचे चंद्राच्या दक्षीण ध्रुवावर लँण्डींग झाले. त्याबद्दल मी आदरणीय पंतप्रधान मोदी साहेबांचे अभिनंदन करते. आणि इसरोचे जेवढे शास्त्रज्ञ आहे त्यांचे ही अभिनंदन करते. १४ जुलैला रॉकेटद्वारे लॉंचिंग करण्यात आलेले होते. आणि याला ४१ दिवसांचा अवधी

लागला तब्बल ३.८४ लक्ष किमी. चे अंतर कापून ते यान चंद्रावर पोहचले. यातून भारताने इतिहास रचला आहे. भारत चंद्राच्या दक्षीण ध्रुवावर लँण्डींग करणारा पहिला देश ठरला आहे.

म.नाजिया पठान — सर्वात आगोदर नव्याने नियुक्त झालेल्या आयुक्त मॅडमांचे अभिनंदन करते. ही आपणा सर्वांसाठी आनंदाची गोष्ट आहे. २०२३ हे आनंदाचे वर्ष आहे. धुळे शहरात मनपामध्ये महिलाराज झाले आहे. आयुक्तांपासून ते महापौरांपर्यंत सर्वच महिला आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. मी आशा करते आमचे कालावधीचे जे २-३ महिने उरलेले आहे आमच्या समस्या सोडवण्यासाठी आपण मदत करावी. आणि धुळे शहराचे नाव उंचावणार आहे. दुसरा विषय काल २३ ऑगस्ट २०२३ ला इसरो चे वैज्ञानिकांना आणि सर्व भारतवासीयांना हार्दीक शुभेच्छा देते. ही आपल्यासाठी गर्वाची गोष्ट आहे. भारताने संपूर्ण जगात एक इतिहास रचला आहे. चंद्राच्या दक्षीण ध्रुवावर भारत देशाने पहिले पाउल टाकले आहे. चार वर्षांची त्यांची मेहनत फळास आली. संपूर्ण विश्वात भारत देशाचा नवा किर्तीमान स्थापित झाला. या मिशनच्या यशस्वीतेसाठी सर्वच वैज्ञानिकांनी मेहनत घेतली आहे. मी धन्यवाद देते सर्वच वैज्ञानिकांना आणि भारतवासीयांना धन्यवाद.

म.सुनिल बैसाणे — सभापती महोदया सभा सुरु होण्यापूर्वीच आपण नवनियुक्त आयुक्त महोदया व अति. आयुक्त तसेच पाणीपुरवठाचे कार्यकारी अभियंता साहेब यांचे स्वागत आणि सत्कार केला. आणि त्यानंतर त्यांनी आपल्या मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्या की धुळे शहराच्या अपेक्षा पूर्ण करु. त्यानंतर सभापती महोदयांनी सर्व सदस्यांतर्फे अपेक्षा व्यक्त केल्या. सर्वांच्या भावना व सदिच्छा आयुक्त महोदया तुमच्या सोबत आहे. करण सर्व दोरी महिला भगिर्णीच्या हाती आहे. आणि खऱ्या अर्थाने शहरात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात धुळे मनपा आदर्श ठरली आहे. अशा पध्दतीने भाजपा मार्फत नियुक्त झालेल्या आहे आणि शासनाच्या माध्यमातून सर्व महिला अधिकारी या ठिकाणी नियुक्त झाल्या आहे. खऱ्या अर्थाने महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न् या महाराष्ट्रात पूर्ण होण्याची ही नांदी लागली आहे. म्हणून आमच्या सदस्यांतर्फे तुम्हाला शुभेच्छा आहेत. आणि काल संपूर्ण विश्वाला आणि भारताचे स्वाभिमान असलेले चंद्रयान ज्या वेळेस चंद्राच्या दक्षीण ध्रुवावर लँण्डींग झाले. आणि याच सभागृहात त्या क्षणाचे साक्षीदार होण्याचा लाभ आम्हाला मिळाला. मा. महापौर महोदयांनी सर्व कार्यक्रम आयोजित केला होता. सर्व पदाधिकारी या ठिकाणी हजर होतो. आणि तो क्षण पाहिला आणि रोमांचक अनुभव मिळाला. या भारताच्या इसरोचे जेवढे शास्त्रज्ञ आहे त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. या आधि चंद्राच्या दक्षीण ध्रुवावर कोणताच देशाने लँण्डींग करु शकले नव्हते. आणि जगात भारत पहिला देश ठरला. आणि खऱ्या अर्थाने देशाचे पंतप्रधान मोदी साहेबांचे अभिनंदन केले गेले पाहिजे. तुम्ही जे करत आहात ते देशाचा स्वाभिमान उंचवण्यासाठी करत आहात. आणि त्या अर्थाने आपले पंतप्रधान कसे असावे? शास्त्रज्ञांच्या पाठीशी उभे राहून काम कसे करुन घ्यावे हा कालचा क्षण पाहिल्या नंतर कळाले आणि आनंद झाला. आयुक्त महोदया, धुळेकर नागरिक प्रेमळ आहे परंतु काही अपेक्षा पूर्ण नाही झाल्या त्यावर लगेच प्रतिक्रीयाही देतो. म्हणून त्या भावना त्या विषयाशी निगडीत धरायच्या, मनामध्ये कटूता व आकसपण ठेवू नका तुम्ही आम्हाला सांभाळून घेणार अशी अपेक्षा या ठिकाणी सर्वांच्या वतीने

व्यक्त करतो. या अधि सुध्दा टेकाळे साहेबांशी तात्वीक वाद झाले. परंतु वाद सभागृहापुरता मर्यादीत असायचा. आपण म्हणतो जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच जगाचा उध्दार करी. खऱ्या अर्थाने या सर्व धुळे शहराचा उध्दार करतील आणि धुळे शहराचे नाव महाराष्ट्रात उज्वल करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. माननीय सभापती आपण चंद्रयान ३ व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे अभिनंदन व्यक्त करण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल तुमचे व स्न्मा. सदस्यांचे आभार व्यक्त करतो.

म. हषर्कुमार रेलन — काल भारतासाठी अभिमानास्पद घटना घडली आपण सर्व जगात सर्वांच्या पुढे येऊन बसलो. आपल्याला वेगळी ओळख या जगामध्ये मिळाली आहे. या चंद्रयान प्रोजेक्ट मध्ये मा. मोदी साहेबांनी विशेष काम केले. आपण जे काही सॅटेलाईट वरती अवकाशात पाठवतो अमेरिका , रशिया, जर्मनी याच देशांची मोनोपॉली होती. पण चंद्रयान ३ ला मा. मोदी साहेबांनी व्हीजन ठेवले होते. आणि पूर्ण चंद्रयानाच्या सर्व गोष्टी भारतीय मालकीच्या कंपन्याकडून करुन घेतल्या आहे. यात एकही परदेशी कंपनी नाही. यामध्ये जे स्पेअरपार्ट लागले आहे ते सर्व वालचंद इंडस्ट्रीज ने केले आहे. यात जे इलेक्ट्रॉनिक पार्ट लागले ते केरला स्टेट कॉर्पोरेशन ने दिले आहे. यामध्ये एचएएल ने उड्डानाचे काम काम त्यांनी केले आहे. जो रोव्हर खाली उतरणार आहे त्याचे पूर्ण काम बँगलोरच्या एका कंपनीने केले आहे. लाँचिंगचे काम एल अँण्ड टी कंपनीने केले आहे. इंधनाचे काम गोदरेज कंपनीने केले आहे. मा. मोदी साहेबांनी या देशाच्या कंपन्यांना काम मिळावे हे प्रयत्न केले. म्हणून विशेष अभिनंदन मा. मोदी साहेबांचे करीन त्यांनी भारतीय कंपन्यांकडून हे काम करुन घेतले. भारताला एका वेगळया उंचीवर त्यांनी नेऊन ठेवले आहे. काही दिवसांनी असे दिसेल की अमेरिकेला यात सोडायचे असेल ते आपल्याला कोटेशन देतील. या प्रसंगी मी सर्व देशवासीयांचे ,मा. मोदी साहेबांचे सर्व वैज्ञानिकांचे अभिनंदन करतो.

म. किरण अहिरराव — या विषयावर सर्वांनी अभिनंदन केलेले आहे. मी एवढेच सांगतो मा. मोदी साहेबांनी राम दिला आणि चंद्र ही दिला.

म.वसीम बारी — सभापती महोदया, बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद नव्याने नियुकत झालेल्या आयुक्त महोदया, अति. आयुक्त महोदया, आणि पाणी पुरवठयाचे कार्यकारी अभियंता यांचे अभिनंदन करतो. दुसरा विषय चंद्रयानाचे यशस्वीपणे लँण्डींग झाले संपूर्ण विश्वात भारताचे कौतुक होत आहे. आपण सर्वात पहिले इसरोचे वैज्ञानिकांचे अभिनंदन केले पाहिजे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर त्यांनी लँण्डींग केले आहे. सभागृहातील सदसयंनी विनंती वैज्ञानिकांसाठी टाळया वाजवल्या जाव्या धन्यवाद.

म.सुनिल बैसाणे — संपूर्ण भारतासह जगाचे लक्ष लागून असलेल्या चंद्रयान-३ मोहिमेचया यशस्वीतेबाबत सर्वांचेचे लक्ष होते. दिनांक १४ जुलै २०२३ रोजी दुपारी २.३५ वाजता आंधप्रदेशच्या श्री.हरीकोटा सतिश धवन स्पेस सेंटर येथून चंद्रयान-३ लाँच झाले होते. दिनांक २३ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताचे चंद्रयान-३ चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणार होते चंद्रयान-३ मोहिमेव्दारे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर आपले यान उतरवून भारतो इतिहास रचला. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँण्डींग करणारा भारत जगातील पहिला देश ठरला आहे. यासाठी तमाम भारतीयांच्या प्रार्थना व इस्त्रोच्या शास्त्रज्ञांच्या मेहनतीला यश आले.

चंद्रयान-३ मोहिम यशस्वीतेबद्दल सर्व शास्त्रज्ञांच्या अभिनंदनाचा ठराव आज रोजीच्या स्थायी समितीसभेमध्ये ठराव पारीत करण्यात यावा हि विनंती.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३९ दिनांक २४/०८/२०२३

संपूर्ण भारतासह जगाचे लक्ष लागून असलेल्या चंद्रयान-३ मोहिमेचया यशस्वीतेबाबत सर्वांचेचे लक्ष होते. दिनांक १४ जुलै २०२३ रोजी दुपारी २.३५ वाजता आंधप्रदेशच्या श्री.हरीकोटा सतिश धवन स्पेस सेंटर येथून चंद्रयान-३ लाँच झाले होते. दिनांक २३ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताचे चंद्रयान-३ चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणार होते चंद्रयान-३ मोहिमेव्दारे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर आपले यान उतरवून भारतो इतिहास रचला. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लॅण्डींग करणारा भारत जगातील पहिला देश ठरला आहे. यासाठी तमाम भारतीयांच्या प्रार्थना व इस्त्रोच्या शास्त्रज्ञांच्या मेहनतीला यश आले.

चंद्रयान-३ मोहिम यशस्वीतेबद्दल सर्व इस्त्रोच्या शास्त्रज्ञांच्या अभिनंदनाचा ठराव आजच्या सभेत पारीत करण्यात येत आहे.

सुचक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक:- श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४१	मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे (सभा क्रं १८ दि.१३/०७/२०२३ व सभा क्रं. १९ दि. २०/०७/२०२३)
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.सुनिल बैसाणे	मागणी स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.
म.कल्याणी अंपळकर	मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.
म.सभापती	सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४० दिनांक २४/०८/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.१८ दिनांक १३/०७/२०२३ रोजीची सभा गणपुर्ती अभावी रद्द करण्यात आलेली होती व सभा क्र.१९ दिनांक२०/०७/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर ११० ते १२४ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४२ जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.०२ मध्ये ग.द.माळी सोसायटी सं.नं.६०/१ मधील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणेचे कामांबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.दगडू बागुल प्र.क्र.०२ मधील ग.द.माळी सोसायटी स.नं.६०/१ ही जागा सोसायटीची आहे का धुळे मनपा मालकीची आहे ? मनपाने सोसायटीचे हस्तांतरण केले आहे का? याबाबत टिपणीमध्ये कोणत्याही उल्लेख नाही. पुढील सभेत याबाबत सविस्तर उल्लेख करण्यात यावा तो पर्यंत सदरचा विषय तहकूब करण्यात यावा हि विनंती.

म.किरण अहिरराव सदरचा विषय तहकुब करण्यात यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार या विषयाबाबत सविस्तर अहवाल टिपणीत नमूद करण्यात यावा तो पर्यंत सदरचा प्रस्तावास तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४१ दिनांक २४/०८/२०२३

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.०२ मध्ये ग.द.माळी सोसायटी सं.नं.६०/१ मधील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणेचे कामांबाबत निविदा दर मान्यतेबाबत प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर झाला असता सदर जागेस मनपाचे नाव लावण्यात आले किंवा नाही याबाबत कार्यालयीन अहवालात उल्लेख नाही. याबाबत सविस्तर माहितीसह पुन्श:च अहवाल सादर करावा तो पावेतो सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागूल

अनुमोदक :- श्री.किरण हरीशचंद्र अहिरराव

सर्वानुमते मंजुर,

सही xxx/-

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१४३ मानधनावरील पंप ऑपरेटर,गाळणी चालक व वैदयकीय अधिकारी इतर एकुण १ ते २४ कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल वैसाणे सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.विजय जाधव विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४२ दिनांक २४/०८/२०२३

खालील मानधनावरील वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता ५ दिवसाचा सेवा खंड करुन नवीन नियुक्ती देण्याबाबतच्या विषयास मे स्थायी समितीने मान्यता दिली होती.

त्याअनुषंगाने खालील कर्मचारी यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता ५ दिवसाचा सेवा खंड करुन नवीन नियुक्ती देण्यात आलेली आहे.

संबंधीत विभाग प्रमुख यांनी खालील कर्मचारी यांचा ६ महिने कालावधी संपुष्ठात आल्याने त्यांना पुढील ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणेबाबत शिफारस केलेली आहे.

.	कर्मचा-याचे नाव	हुददा	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रुपये
१	कल्पतरु स. वाघ	पंप ऑपरेटर	०१/०८/२०२३	१४०००/-
२	अमित अनिल पोतदार	पंप ऑपरेटर	०१/०८/२०२३	१४०००/-
३	योगेश साहेबराव देवरे	पंप ऑपरेटर	०१/०८/२०२३	१४०००/-
४	चेतन भानुदास सुडके	पंप ऑपरेटर	०१/०८/२०२३	१४०००/-
५	दिपक वसंत माळी	पंप ऑपरेटर	०१/०८/२०२३	१४०००/-
६	अमोल नरेंद्र अंपळकर	पंप ऑपरेटर	०१/०८/२०२३	१४०००/-
७	इश्वर विठ्ठल बडगुजर	पंप ऑपरेटर	०१/०८/२०२३	१४०००/-
८	रुपेश महेंद्र खैरनार	पंप ऑपरेटर	०१/०८/२०२३	१४०००/-
९	देवेंद्र नामदेव सोनवणे	विजतंत्री	०१/०८/२०२३	१४०००/-
१०	रमन भिकु पाटील	विजतंत्री	०१/०८/२०२३	१४०००/-
११	केशव मधुकर महाजन	विजतंत्री	०१/०८/२०२३	१४०००/-
१२	विश्वजीत विजय गुर्जर	विजतंत्री	०१/०८/२०२३	१४०००/-
१३	वराडे अक्षय राजेंद्र	विजतंत्री	०१/०८/२०२३	१४०००/-
१४	अमोल मधुकर पाटील	गाळणी निरीक्षक	०१/०८/२०२३	१४०००/-
१५	गणेश दिगंबर शेलार	गाळणी निरीक्षक	०१/०८/२०२३	१४०००/-
१६	खैरनार अरुण राजाराम	गाळणी निरीक्षक	०१/०८/२०२३	१४०००/-
१७	रमेश वेडु बोरसे	गाळणी चालक	०१/०८/२०२३	१४०००/-
१८	साळुंखे विनायक जगन	गाळणी चालक	०१/०८/२०२३	१४०००/-
१९	बडगुजर राहुल अंबादास	गाळणी चालक	०१/०८/२०२३	१४०००/-
२०	महाजन उमेश रविंद्र	गाळणी चालक	०१/०८/२०२३	१४०००/-
२१	निलेश पंढरीनाथ करनाळे	गाळणी चालक	०१/०८/२०२३	१४०००/-
२२	किरण गोविंदा चव्हाण	गाळणी चालक	०१/०८/२०२३	१४०००/-
२३	डॉ. श्री. योगेश पाटील	वैदय.अधिकारी (आयुर्वेदीक)	२०/०७/२०२३	३०,०००/
२४	श्रीमती विजया लाखा राऊत	एएनएम	१६/०६/२०२३	१५,५००/

तरी उक्त मानधनावरील वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

तरी उक्त मानधनावरील वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समिती पुढे ठेवणेबाबत निर्णयास्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील पंप ऑपरेटर,गाळणी चालक व वैदयकीय अधिकारी इतर एकुण १ ते २४ कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१४४ सन२०२३-२४ या वर्षाकरिता धुळे महानगरपालिका आरोग्यविभागाकडील ११ ॲलोपॅथी दवाखाने,३ सुतिकागृह, १ नागरी आरोग्य केंद्र, १ कुटुंब कल्याण केंद्रासाठी लागणारी ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी कमी असलेल्या ई-निविदा प्रणालीव्दारे आलेल्या दरांप्रमाणे ९९ प्रकारचे औषध खरेदीसाठी आलेल्या निविदा दरास व खर्चास मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मनपाच वेगवेगळया ठिकाणी असलेल्या दवाखान्यामध्ये औषधसाठा खरेदी साठी हा विषय आलेला आहे. सभापती महोदया आपल्याला विनंती आहे. सद्यास्थितीत मनपाचे वेगवेगळे दवाखाने आहे. त्यामधील औषधसाठा जो शिल्लक आहे. किंवा कोणत्या प्रकारची आवश्यक औषणे आहे त्याबाबतचा प्रशासनाच्या वतीने खुलासा व आजच्या स्थितीत दवाखान्याची का परिस्थिती आहे तसेच धुळे शहरात अनेक साथीच्या रोगांचा प्रार्दुभाव होत आहे. त्यावर प्रशासनाच्या आरोग्या विभागाच्या माध्यमातून त्यांनी काय उपाययोजना केल्या आहे. फक्त

औषधसाठा करून हा प्रश्न सुटणार नाही. ज्यावेळेस तुम्ही औषधाची मागणी करत आहे. परंतू धुळेकर नागरीकांना तुम्ही कशा पध्दतीने सेवा देत आहे धुळेकर नागरीक उपचार पध्दतीवर समाधानी आहे का ? याबाबत आढावा घेऊन चालणार नाही. प्रशासनाचे जो प्रमुख असतील प्रमुखांनी फक्त मागणी करून चालणार नाही ही मागणी करत असतांना सद्यास्थितीत औषधसाठा किती आहे? याबाबत सभागृहासमोर माहिती दिली पाहिजे तसेच लेखा विभाग हा फक्त पैशाची तजवीज करण्यासाठी नसतो. लेखा विभागने सुध्दा त्याची पाहणी केली पाहिजे. लेखा विभागाकडे आलेल्या डिमांड नोट पुर्ण करून त्यांना फक्त चेक देण्याचे काम न करता नियंत्रण ठेवण्याचेही काम केले पाहिजे. या विषयाच्या अनुषंगाने धुळे मनपाच्या वाहनासाठी आदरणीय महापौर यांनी वाहनासाठी कार्योत्तर मंजूरीला विषय दिला होता. परंतू सदरच्या वाहन्याच्या बाबतीमध्ये काही तांत्रिक मुद्दा उपस्थित झाला आहे. 20 ते 22 हजाराचा आहे तो कार्योत्तर मंजूरीत घेण्यात यावी आणि महापौर किंवा सभापती यांना वाहन मिळले नाही अनेक अधिकारी यांना सुध्दा वाहन नाहीत. म्हणून आपल्याला विनंती आहे महापौर महोदयांच्या वाहनाचा विषय लवकरात लवकर मार्गी लावण्यात यावा आणि औषध साठयाच्या विषयाबाबत धुळेकर नागरीकांना येणाऱ्या काळात काय सेवा पुरवणार आहे याबाबत खुलासा करण्यात यावा.

म.सभापती — आरोग्याधिकारी यांना माझा प्रश्न आहे. कोण कोणत्या दवाखान्यात औषधांची कमतरता आहे आणि नव्याने कोणकोणत्या औषधांचा पुरवठा करणार आहे आणि दवाखान्यात जे प्रमुख नेमले आहे ते जबाबदारी पार पाडतात का ? आपण औषधसाठा उपलब्ध करतो पण तो नागरीकापर्यंत पोहचतो का? याबाबत सभागृहाला माहिती द्यावी.

म.आरोग्याधिकारी — जवळपास 3 महिन्यापासून खोकल्याचे औषधसाठा दवाखान्यामध्ये संपलेला आहे. जखमेवरचे मलमही पुर्ण संपले आहे. ॲण्टी बायोटिक्स जवळपास संपायला आले आहेत मनपा मालकीच्या सर्वच दवाखान्याची औषधसाठासाठी मागणी केलेली आहे. आपण यात 99 प्रकारच्या औषधांची मागणी तयार करून अहवाल सादर केला आहे सुविधाचा बाबत आपण रू.१० केसपेपर रूग्ण काढत असतील तर त्यांना आपण 7 दिवसाचे औषध देत असतो. तापाचे रूग्ण असतील तर मलेरियासाठी सॅम्पल घेतो. खोकल्याचे रूग्ण असतील तर टिबीसाही सॅम्पल घेता आणि कोविडसाठी आर.टी.पी.सी.आर.साठी सॅम्पल घेत असतो.

म.हर्षकुमार रेलन — विषय मंजूर करावा.

म.नाजीया बानो — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४३ दिनांक २४/०८/२०२३

धुळे महानगरपालिकेचे ११ ॲलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्य केंद्र (एकुण १६ दवाखाने) यासाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी लागणारी औषध खरेदीसाठी व स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळणेसाठी जा.क्रं/ धुमपा/ औ.भांडार /४४/ दिनांक १३/०६/२०२३ नुसार दिनांक१४/०६/२०२३ चे दै.सकाळ व दै. खान्देश मैदान या

वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या ई-निविदा सुचना क्रं ५३ No. Tender I.D. २०२३_DMCD_९१६५४८_१ ई-प्रणालीव्दारे ई-निविदाची अंतीम मुदत दिनांक ०३/०७/२०२३ पर्यंत १) मे.गगन फार्मा बोरीवली, मुंबई २) मे. ऑस्टिन हेल्थ केअर, पुणे ३) मे. अग्रवाल एजन्सी, दोंडाईचा. ४) मे. रेणुका सेल्स, चंद्रपुर. या ०४ निविदाकारांनी भाग घेतलेला असल्याने मंजुर कार्यालयीण टिपणीनुसार प्राप्त ई-निविदाधारकांचे तांत्रीक पाकीट दिनांक०६/०७/२०२३ रोजी सायंकाळी १२.३० वाजता उघडण्यात आले.

धुळे महानगरपालिकेस प्राप्त ०४ निविदाधारकांचे तांत्रीक पाकीट मध्ये 1) निविदा फी रक्कम रू.१६,०००/- बयाना रक्कम रू.१,६०,०००/- मात्र Online जमा केल्याची पावती. २) निविदाचे अटी व शर्ती मंजुर असल्याचे फॉरवर्डींग लेटर 3) विधीग्राहय औषध विक्री परवाणा 4) जी.एस.टी. नोदणीप्रमाणपत्र. 5) सन २०२२-२३ या वर्षाचा G.S.T. टॅक्स भरल्याची पावती. ६) २०२२-२३ चे व्यवसायकर भरल्याची पावती. ७) पॅन कार्ड ची प्रत ८) निविदाधारक धुळे शहराचा रहिवाशी असल्यास सन २०२२-२३ या वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती. 9) शासकिय संस्थेस पुरवठा केल्याचे दाखले. 10) रु. 100/- चे स्टँम्प वर Annexur ४ व Annexur ५ प्रतीज्ञापत्र ११) रु.५०० चे स्टँम्प पेपर वर परीशीष्ट क्रमांक १ इ.कागदपत्रांची पाहणी निविदा समीतीने केली असता सर्व निविदाधारकाचे तांत्रीक पाकीटामधील कागदपत्रे महानगरपालिकेचे मागणीप्रमाणे योग्य असल्याने निविदाधारकाचे Commercial Bid दिनांक १८/०७/२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उघडण्यात आले.

निविदाधारकाची तक्रार नको यासाठी निविदा मान्य अथवा अमान्य याबाबत दिनांक १८/०७/२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता दर पाकीट उघडण्यात येणार आहे असा ऑनलाईन मेसेज दिनांक १७/०७/२०२३ रोजी दुपारी १२.४० वाजता देण्यात आला, निविदा समिती व मा. अति.आयुक्त सो. यांचे दिनांक १०/०७/२०२३ चे मान्यतेनुसार स्पर्धात्मक दरांचा जास्तीत जास्त फायदा होण्यासाठी प्राप्त ०४ निविदाकार यांना पात्र ठरवून ०४ निविदाकारांचे व्यापारी लिफाफा उघडण्यास मंजुरी देण्यात आली उक्त मंजुरीप्रमाने प्राप्त ०४ निविदाकारांचे व्यापारी लिफाफे दिनांक १८/०७/२०२३ रोजी दु. ०४.५० वाजता उघडण्यात आले.

तांत्रीक कागदपत्रे तपासणी तक्ता व तांत्रीक पाकिटामधील कागदपत्रे नस्ती सोबत सादर केलेला आहे. १ ते ०४ प्राप्त ई-निविदा दर सादर केलेले आहेत. निविदा समीतीचे स्वाक्षरीचा तुलनात्मक दरांचा तक्ता नस्ती सोबत सादर केलेला आहे.

१) मे.गगन फार्मा बोरीवली, मुंबई :- यांचे मुळ यादीतील अनु.क्रं. २२, २३, ३९, ४२, ६१ या ६ प्रकारचे औषधांचे तुलनात्मक दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी रू.३०,४६५/-मात्र खर्च येणार आहे.

२) मे.ऑस्टिन हेल्थ केअर, पुणे - यांचे मुळ यादीतील अनु.क्रं. ५, १२, २०, २६, ३०, ४४ ४७, ५९या ८ प्रकारचे औषधांचे तुलनात्मक दरसर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी रू.४,९९,१२०/-मात्र खर्च येणार आहे.

३) मे. अग्रवाल एजन्सी, दोंडाईचा :- यांचे मुळ यादीतील अनु.क्रं. ३, ४, ८, १०, १६, ३८, ४०, ४१, ५०, ५१, ५३, ५५, ५८, ६३, ६८, ७३, ७८, ८३, ८६, ८८, ८९, ९३ या २२ प्रकारचे

औषधांचे तुलनात्मक दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी रू.१०,२५,४२२/- मात्र खर्च येणार आहे.

४) मे. रेणुका सेल्स, चंद्रपुर :- यांचे मुळ यादीतील अनु.क्रं. १, २, ६, ७, ९, ११, १३ ते १५, १७ ते १९, २१, २४, २५, २७ ते २९, ३१ ते ३७, ४३, ४५, ४६, ४८, ४९, ५२, ५४, ५६, ५७, ६०, ६२, ६४, ६५ ते ६७, ६९ ते ७२, ७४ ते ७७, ७९ ते ८२, ८४,८५, ८७, ९० ते ९२, ९४ ते ९९ या ६४ प्रकारचे औषधांचे तुलनात्मक दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी रू.२५,४२,८८४/-मात्र खर्च येणार आहे.

सबब, ई-निविदा प्रणालीव्दारे धुळे महानगपालिकेस प्राप्त झालेल्या तुलनात्मक कमी असलेल्या ई-निविदा दरांना मान्यताआदेशास्तव व सन २०२३-२४ या वर्षासाठी धुळे महानगरपालिके चे ११ ॲलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्य केंद्र (एकुण १६ दवाखाने) मागणी प्रमाणे वरील ९९ प्रकारचे औषधांचे खरेदीसाठी एकुण खर्च रू.४०,९७,८९१/- मात्रला मंजुरीआदेशास्तव सादर. उक्त खर्च अंदाजित खर्चापेक्षा रू.२२,८८,६७८/-मात्रने ने कमी येणार आहे. (३५.८३% ने कमी.) (उक्त ९९प्रकारचेऔषधांचे खरेदीसाठी अंदाजित खर्च रु.६३,८६,५६९/-मात्र येणार होता.)

सन २०२३-२४ या वर्षात अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात औषध खरेदीसाठी रू. ६५,००,०००/- मात्र तरतुद आहे. त्यामधुन सन २०२३-२४ या वर्षासाठी लागणारी आयुर्वेद औषधी खरेदीसाठी रु.१,१३,४३१/- मात्र खर्चास मा. आयुक्त सो. यांची प्रशासकीय मान्यता घेऊन कार्यादेश देण्यात आला आहे. ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी सन 2023-२४ चे बजेट तरतुदीनुसार रु.६३,८६,५६९/- मात्र तरतुद शिल्लक आहे. ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी येणारा अंदाजीत खर्च रु. २५ लाख चे वर येणार होता त्यामुळे मा. आयुक्त सो.यांनी दिलेल्या मान्यतेनुसार ई-निविदा मागणी करणेस मे.स्थायी समितीची मान्येतसाठी ठेवण्यास विनंती आहे. धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नंबर ८३ दिनांक ०१/०६/२०२३ मान्येता देण्यात आली आहे.

उद्योग उर्जा कामगार विभागाचा दि. ०१/१२/२०१६ चे शासन निर्णयानुसार (खरेदी नियमावली) अधिन राहुन न्युनतम दरांची औषधे खरेदी करण्याची दक्षता घेण्यात येईल. धुळे महानगरपालिके स प्राप्त ई-निविदा दर योग्य व वाजवी आहेत. कार्यादेशाप्रमाणे प्राप्त औषधांचे दर Mrp दरांपेक्षा कमी असल्याची खात्री करण्यात येईल. औषधांचे गुणवत्तेबाबत शंखा राहु नये यासाठी Analysies Test Report घेण्यात येतील.

सबब, सन २०२३-२४ या वर्षासाठी लागणारी औषध खरेदीसाठी तुलनात्मक कमी असलेल्या ई-निविदा प्रणालीव्दारे आलेल्या दरांप्रमाणे ९९ प्रकारचे औषध खरेदीसाठी खर्च रु. ४०,९७,८९१/-मात्र येणार आहे. उक्त खर्चास प्रशासकीय मान्यतेसाठी व तुलनात्मक कमी असलेल्या दरांप्रमाने खरेदीसाठी विषय मे.स्थायी समीती पुढे ठेवण्यात आलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०२३-२४ या वर्षाकरिता धुळे महानगरपालिका आरोग्यविभागाकडील ११ ॲलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ नागरी आरोग्य़ केंद्र, १ कुटुंब कल्याण केंद्रासाठी लागणारी

अॅलोपॅथी औषध खरेदीसाठी ९९ प्रकारचे औषध साठा खरेदी करणेसाठी आलेल्या न्युनतम निविदा दरास व खर्चास मंजुरी मान्यता देण्यात येत आहे. तसेच औषधाच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाने खात्री करावी व तातडीने औषधी खरेदी करावीत. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री. पठाण नाजीया बानो नासीरखा

सर्वानुमते मंजुर,

सही xxx/

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २३ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक ३१/०८/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२३ आज **गुरूवार दिनांक ३१/०८/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री. चौधरी नरेंद्र रुपला	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१२	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती करूण डहाळे	अति.आयुक्त
२	श्री. विजय रघुनाथ सनेर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री. गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
५	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव

७	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
८	श्री.कैलास शिंदे	अभियंता
९	श्री.डॉ.एम.आर.शेख	आरोग्याधिकारी
१०	श्री.चंद्रकांत उगले	सहाय्यक अभियंता पाणी पुरवठा
११	श्री. के.डी. सावळे	लिपीक आस्थापना विभाग
१२	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१३	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१४	श्री. कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१५	श्री. मोहनीश पाटील	ओव्हरसिअर नगररचना विभाग
१६	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१७	श्री. राजेश गायकवाड	वरिष्ठ लिपीक मनपा शिक्षण मंडळ
१८	श्री.विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१९	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२०	श्री.संजय मोरे	आस्थापना विभाग प्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य,मा.अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म.सुनिल बैसाणे — विषयाशी सबंधीत जे अधिकारी आहे जेष्ठ अधिकारी त्यांना सभागृहात बोलवण्यात यावे. बैठकीची तारीख व वेळ ही ३ दिवस आधिच कळविण्यात आली होती. ज्या पध्दतीने तुम्ही गेटवर कर्मचाऱ्यांची हजेरी घेऊन दंडात्मक कारवाई करतात. त्यापध्दतीने सभागृहात जनतेच्या समस्यांबाबत, आर्थिक विषय मंजूरीसाठी निगडीत असतात. त्यामुळे अधिकाऱ्यांची उपस्थिती प्रार्थनिय आहे. सभापती महोदया, आपण विषयाशी संबंधीत अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्यासाठी नगरसचिव महोदयांना सूचना करावी.

म.नगरसचिव — संबंधीत अधिकाऱ्यांना संपर्क केला आहे. ते पुढील ५ ते ७ मिनिटांत उपस्थित होतील.

म.सभापती — आजच्या बैठकीत उशिरा आलेल्या अधिकाऱ्यांची नोंद घेण्यात आली आहे. सदस्यांनी केलेल्या सर्व सूचनांची नोंद घेण्यात आली आहे.याबाबत प्रशासनाने अहवाल स्थायी समिती समोर सादर करावा.

म.सुनिल बैसाणे — सभापती महोदयांनी अधिकाऱ्यांच्या हजेरीबाबत आक्षेप घेतला आहे. कोण कोण अधिकारी गैरहजर आहे हे आम्हाला कसे कळेल.

म.सभापती — जे अधिकारी गैरहजर आहेत त्याबाबत पुढच्या स्थायी समितीमध्ये माहिती सादर करावी व पुढील बैठकीस अधिकाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी.

सन्मा. सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी.

नुकत्याच झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पीयनशिप स्पर्धेत पुरुष भालाफेक स्पर्धेत भारताचा स्टार ॲथलेटिक्स पटू निरज चोप्रा याने सुवर्णपदक मिळविले. तरी

सुवर्णपदक विजेत्या निरज चोप्रा यांच्या अभिनंदनाचा ठराव आजच्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव पारीत करण्यांत यावा हि विनंती.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४४ दिनांक ३१/०८/२०२३

नुकत्याच झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पीयनशिप स्पर्धेत पुरुष भालाफेक स्पर्धेत भारताचा स्टार ॲथलेटिक्स पटू निरज चोप्रा याने सुवर्णपदक मिळविले.

जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पीयनशिप स्पर्धेत भालाफेक या क्रीडा प्रकरात सुवर्णपदक विजेत्या निरज चोप्रा यांच्या अभिनंदनाचा ठराव आजच्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव पारीत करण्यात येत आहे. सुचक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक:- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजर
सही xxx/-
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४५	मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे (सभा क्रं २० दि. ०३/०८/२०२३)
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.सुनिल बैसाणे	मागणी स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.
म.कल्याणी अंपळकर	मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.
म.सभापती	सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४५ दिनांक ३१/०८/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.२० दिनांक ०३/०८/२०२३ रोजीच्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १२५ ते १३३ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४६	सुखवद पाणी पुरवठा केंद्र येथील ४७५ एच.पी.पंपसेट क्र.२ व ४ च्या बेअरींग बॉक्समध्ये दुरूस्ती कामासाठी रू. १,३१,३९३/- खर्चास कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.रंगनाथ ठाकरे	सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.
म.विजय जाधव	विषय मंजूर करण्यात यावा.
म. सभापती	सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४६ दिनांक ३१/०८/२०२३

तापी पाणी पुरवठा योजनेच्या सुखवद पाणी पुरवठ केंद्र येथे ४७५ एच.पी.एकुण ५ पंपसेट कार्यरतआहे.सदरचे सुखवद पंपिग स्टेशन येथील ४ पंप २४ तास कार्यरत आसतात. दि.०६/०५/२०२३ रोजी उष्णतेमुळे पंपसेट क्र.२ च्या बेअरींग बॉक्स मधील ऑईल कुलिग कॉपर टयुब क्रॅक झाल्याने सदर पंप बंद करण्यात आला. त्याच प्रमाणे दि.०६/०५/२०२३ रोजी रात्री पंपसेट क्र.४ ची पंप बेअरीग घर्षणामुळे खराब झाली.

परिणामी तापी पाणी पुरवठा येथील सुखवद पाणी पुरवठा केंद्रावर ३ पंपसेट कार्यन्वीत होते परंतु पुर्ण क्षमतेने पाणी पुरवठा होण्यासाठी ४ पंप सेट कार्यन्वीत ठेवणे अनिवार्य असल्याने सदरच्या नादुरूस्ती असलेल्या पंपाची दुरूस्ती तातडीने करणे शक्य असल्याने सदरचे पंपसेट डिस्टमेन्टल करून तातडीने दुरूस्तीची कामे करण्यात आली.

सदरच्या कामी पंपसेट क्र.२ व ४ चे बेअरींग बॉक्स काढुन बेअरींग बॉक्सचे कॉपर कुलिग टयुब नविन बसविणे पंपसेट क्र.४ बेअरींग बदलणे ग्रिसिंग करणे इत्यादी कामे मे.आकाश इंन्टरप्राझेस,धुळे यांच्याकडुन अंदाजपत्रकिय खर्च रक्कम रू. १,३१,३९३/- च्या दरात करून घेण्यात आले आहे.

उक्त प्रमाणे काम धुळे शहर पाणी पुरवठयासाठी तापी उध्दभव येथील पंपाची विनाविलंब दुरूस्ती करून घेण्याची अनिवार्यता असल्याने सदरचे काम विना निविदा करण्यात आले आहे.करीता सदरच्या कामी खर्च रक्कम रू. १,३१,३९३/- मात्र करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम ६७(३) क प्रमाणे कार्यात्तर मंजुरी होण्यास म.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस स.सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सुखवद पाणी पुरवठा केंद्र येथील ४७५ एच.पी.पंपसेट क्र.२ व ४ च्या बेअरींग बॉक्समध्ये दुरूस्ती कामासाठी रू. १,३१,३९३/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम ६७(३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यावाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल. सुचक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

अनुमोदक :- श्री. विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१४७ शासन आपल्या दारी उपक्रमानिमित्ताने धुळे मनपा हद्दीमध्ये स्वागत कमान व स्वागत बॅनर व अनुषंगिक कामे करण्यांत आलेली असून याकामी झालेला खर्च रुपये ४,८३,६९९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.दगडू बागूल विषय मंजूर करण्यात यावा.

म.हर्षकुमार रेलन सदरचा विषय मंजूर करण्यात यावा

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४७ दिनांक ३१/०८/२०२३

महाराष्ट्र शासन,नियोजन विभाग शा.स.नी.क्र.संकीर्ण२०२३/प्र/क्र ०५का १४१४ दि. १३/०४/२०२३व जिल्हाधिकारी महोदय यांचेकडील आदेश क्र जि.बी /कक्ष-५ /कावी / ६१/२०२३ दि.२६/०६/२०२३अन्वये शासन निर्णयान्वये शासन आपल्या दारी उपक्रम राबविण्यात येऊन विविध शासकीय योजनांचा पात्र लाभार्थ्यांना देणेकामी कार्यक्रम आयोजित करणेबाबत आदेशित करण्यात आलेले होते.

शासन आपल्या दारी या विशेष अभियानाच्या अंमलबजावणी चे अनुषंगाने जिल्हास्तरावर दि.१० जुलै २०२३ रोजी महाशिबीर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.या विशेष महाशिबीर कार्यक्रमास मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांची उपस्थिती लाभली. त्यानुषंगाने शासन आपल्या दारी अभियानाच्या जागरूकतेचे धुळे महानगरपालिका मार्फत धुळे शहरामध्ये मा.मुख्यमंत्री यांच्या मार्गामध्ये कमानी उभारून शासन आपल्या दारीच्या अनुषंगाने बनर लावण्यात यावेत बाबत संदर्भीय आदेश क्र २ व ३ नुसार जिल्हाधिकारी महोदय यांच्या कडून देण्यात आले.

त्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांच्या मार्गामध्ये

1	१०*१५ Regular banner with onsite installation – 15 qty
2	20*40 Hoarding banner -1 qty
3	20*2 Gate Onsite Installation - 15 qty
4	15*2 Gate Onsite Installation (Total 15 Gate Fitting charges) qty 30
5	Trust GAte road कमान २ दिवस
6	6*40 banner -1 qty
7	15*4 banner -1 qty

ट्रस्ट कमानी उभारणे,कमानी वरील १५ डीजीटल बनर ,शासन आपल्या दारी महानगरपालिका १०*१५ बनर फ्रेम सह इ कामे अनुषंगिक कामे मा.आयुक्त सो मा.अति.आयुक्त सो यांच्या मार्फत समक्ष मा.मुख्यमंत्री यांच्या मार्गावर निश्चित करून मे.चौधरी डिजिटल & प्रिंटर्स,धुळे. यांच्या कडून दि.०८/०७/२०२३ रोजी करून घेतले आहे.

सदरच्या कामासाठीखर्च **रु ४,८३,६९९/-**(१८ % GST सह) मात्र आहे.सदरचे काम बाजार भाव दराप्रमाणे आहेत.सन २०२३-२४च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार दिवे व साहित्य दुरुस्ती करिता १कोटी रु.मात्र तरतूद आहे.तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास बाजारभाव दर **रु ४,८३,६९९/-** चे काम करण्यात आले असून सदरचे काम कोटेशन मागवून कमी दराच्या विना निविदा मे.श्री.इंदासी टेंट हाउस यांच्या कडून करून घेतले असून कार्योत्तर मंजुरी करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) (क) अन्वयेकार्योत्तर मंजुरी होण्यास म. स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस स.सादर. झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालस अधिन राहून शासन आपल्या दारी उपक्रमानिमित्ताने धुळे मनपा हद्दीमध्ये स्वागत कमान व स्वागत बॅनर व अनुषंगिक कामे करण्यांत आलेली असून याकामी झालेला खर्च रुपये ४,८३,६९९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखाआक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागूल

अनुमोदक :- श्री. रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १४८ मा.सभापती सो.स्थायी समिती यांच्या पत्रानुसार मनपा क्षेत्रातील घनकचरा संकलन व वाहतुक प्रक्रियेबाबत निर्णय घेणेस्तव विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती शहराच्या स्वच्छतेच्या बाबतीत गंभिर समस्या निर्माण झाली आहे. याबाबत नागरिक तसेच सन्मा. सदस्य देखील तक्रार करत आहेत. सदरच्या संस्थेचे कामकाज हे अटी शर्तीनुसार होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर कंपनीने अटी शर्तीचे उल्लंघन झालेले असल्याने त्याबाबतचा अहवाल सादर करावे असे निर्देश दिले होते. याची माहिती द्यावी.

म.सुनिल बैसाणे सभापती महोदया, धुळे शहराच्या समस्येबाबत तुमची जागरुकता दिसून येते. सभापती झाल्यानंतर प्रशाकीय स्तरावर तुम्ही बैठक घेतात. परंतु वारंवार आरोग्याच्या दृष्टीकोनातून प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आपल्या पत्रानुसार हा विषय निर्णय घेण्यासाठी उपस्थित केला आहे. त्यामुळे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. मागील आयुक्त यांची बदली झाली. नविन आयुक्त यांच्या बद्दल अनेकांनी अपेक्षा व्यक्त केल्या. प्रशासनाच्या बाजूंवर देखील चर्चा झाल्या. टेकाळे साहेबांनी देखील त्यांच्या परीने चांगले काम करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे देखील या ठिकाणी अभिनंदन केले. सभापती महोदया माझा प्रश्न आहे, या विषयाबाबत विभागप्रमुख यांनी स्वयंभु संस्थेच्या बाबतीमध्ये त्यांच्या कार्यालयीन प्रक्रीयेमध्ये काय काय निदर्शनास आले आहे. त्यांनी येथे खुलासा करावा. त्यांच्या खुलाश्यानंतर त्यावर बोलणे योग्य होईल.

म.उपायुक्त सन्मा. सदस्य सुनिल बैसाणे यांनी दिलेले पत्र माझ्याकडे प्राप्त झाले नाही.

म.सुनिल बैसाणे सभापती महोदयांच्या पत्रानुसार चर्चेसाठी आलेला विषय आहे. त्यामध्ये आपल्याला जे स्वयंभु संस्थेबाबत निदर्शनास आले आहे यावर प्रशासनाचा खुलासा करावा.

म.उपायुक्त अजेंडयाच्या बाबतीत आपण आता जे आदेशित केले होते. ते पुढच्या स्थायीत निश्चीत सादर करणार आहे. ते मला बंधनकारक आहे ते माझे कर्तव्य आहे. सन्मा. सदस्य सुनिल भाऊ

बैसाणे यांनी देखील पत्र दिले आहे. ऑफलाईनमध्ये वाचण्यासाठी दिले होते पत्र ते माझ्याकडे आले असते तर मला उत्तर तयार करणे सोईचे झाले असते.

म.सुनिल बैसाणे — हा विषय खुलासा करण्यासाठीच आला आहे. त्यांचा हा उद्देश आहे की आजच्या सभेत हा विषय जो घेतला आहे या विषयाबाबत आपण याआधी काय काय निर्णय घेतले? याबाबत थोडक्यात खुलासा करावा.

म.उपायुक्त — सन्मा. सदस्यांनी जो प्रस्ताव दिला आहे. त्यावर मला खुलासा करणे बंधनकारक आहे मी ते नाकारत नाही. परंतु स्वयंभु संस्थेच्या बाबत सांगायचे तर माझ्याकडे १० ते १२ विषय आहे मुख्य स्वच्छता निरिक्षक आहे, सहाय्यक स्वच्छता निरिक्षक आहे. त्यांना याबाबत सुचना केल्या आहे. परंतु माझी सभागृहाला व सदस्यांना विनंती आहे. हे सव्वीस्तर देण्यासाठी २ दिवसाचा अवधी द्यावा. २ दिवसानंतर सभापती महोदयांच्या कार्यालयात स्वतंत्र बैठक घेऊन अहवाल सादर करतो. व पुढच्या स्थायी समितीपुढे सगळा सव्वीस्तर प्रस्ताव पण सादर करु. आम्ही स्वयंभु संस्थेच्या लोकांना पत्रही दिले आहे परवा परंतु संबंधीत संस्थेच्या प्रमुखांवर शस्त्रक्रिया झाली आहे. त्यांनी विनंती केली होती. की, पुढील आठवड्यात बैठक घ्यावी. जेणे करुन सर्व सादरीकरण करता येईल.

म.सुनिल बैसाणे — सभापती महोदया, सनेर साहेबांकडे ७ ते ८ विषय असल्यामुळे त्यांना स्पष्टीकरण करता येणार नाही.

म.उपायुक्त — मी तसे म्हणत नाही परंतु त्याची जी माहिती घेतली अटी शर्तीच्या बाबतीत विचारणा करण्यासाठी बैठक आयोजित केली होती. परंतु संबंधीतएजन्सीचे जे मालक आहे त्यांच्यावर सर्जरी झाली तेप्रवास करु शकत नव्हतेत्यांनी सांगीतले पुढच्या आठवड्यात बैठक घ्यावी. म्हणून ती बैठक सोमवारी ठरवली आहे त्याअनुषंगाने पुढच्या बैठकीत सर्वअहवालसादर करु.

म.सुनिल बैसाणे — या संस्थेचे जे प्रमुख आहे त्यांची जी सर्जरी झाली परंतु या विषयावर सव्वीस्तर चर्चा करण्यासाठी हा विषय घेतला गेला होता. तुम्ही आधीच आम्हाला सांगीतले असते. तुमच्या कडे अनेक विषय आहे. आता पर्यंत स्वयंभु संस्थेचे मालक किती वेळा प्रशासनातील अधिकाऱ्यांना भेटले आहे? किंवा काम स्वत: बघता का? त्याचा सर्जरीचा विषय येतो कुठे? हा विषय गंभिर आहे. घनकचरा व्यवस्थापना बाबतीमध्ये आपण हा विषय आणला आहे. मा.अति. आयुक्त महोदया, आपण नव्याने आले आहात मोठया शहराचे कामे आपण बघून आले आहात. आणि तशा कामाची तुमच्याकडून अपेक्षा आहे. या आधी वॉटरग्रेस नावाची संस्था होती. ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सत्ता स्थापनेपासून काम करत होती. आणि त्या संस्थेचे काम आणि कामाची पध्दत याबाबत प्रशासन असेल नगरसेवक असेल, नागरिक असतील सर्वांच्या तक्रारी होत्या. त्यावेळेस मी स्वत: सभापती होतो. त्यावेळेस कचऱ्याचे ढिगारे पडून होते. त्या ठेकेदाराला भाव कमी असल्यामुळे तो कचऱ्या व्यतीरिक्त मातीचे ढिगारे उचलत होता. आणि त्याचे बिल काढत होता. त्या संस्थेमुळे धुळे शहरातील नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सत्ता घालवली. त्याच अनुषंगाने सभापती महोदयांनी हा विषय घेतला आहे. कारण सत्ताधारी पक्षाने एक विश्वास दिला होता. चांगला ठेकेदार नेमू, चांगले काम करु हा त्यामागचा उद्देश होता. प्रशासनाच्या ढोबळ कारभारामुळे विरोधी पक्षाची सत्ता गेली. ५०

नगरसेवक सत्ताधारी पक्षाचे निवडून आले आहे. येणाऱ्या काळात नागरिकांचे हित जपायचे आहे. आणि जी कोणी संस्था असेल त्यांच्या कडून चांगले काम करुन घेण्याची आमची जबाबदरी देखील आहे. त्या संस्थेला कामाबद्दल प्रश्न उपस्थित करतो आहे. त्यामध्ये चांगले काय काय करु शकतो या सूचना देण्याचे अधिकार आहे. आणि अशा पध्दतीचे काम होत असेल तर या संस्थेच्या बाबतीत सव्वीस्तर बोलले गेले पाहिजे. अति. आयुक्त महोदया सदरची संस्था ही ब्लॅकलिस्टेड आहे. त्या संस्थेच्या कार्य पध्दतीमुळे अहमदनगरच्या महानगरपालिकेमध्ये न्यायालयामार्फत ४२० चा गुन्हा त्या स्वयंभु संस्थे विरुध्द आणि त्या ठिकाणच्या आयुक्त व त्या ठिकाणच्या विभाग प्रमुखावर दाखल झाला आहे. त्यांनी संगनमत करुन नागरिकांना फसवले आहे. कारण काय तर बिले जास्तीचे अदा केली. मी खोटा आरोप करत नाही. तुम्ही तपासणी करु शकतात. मी त्या केसचा नंबर देतो. यात जर खोटे आढळले तर मी नगरसेवक पदाचा राजीनामा देईन. या संस्थेने पुण्यामध्ये ४३ कोटी रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे. अधिकाऱ्यांच्या संगनमताने हे मी जबाबदारीने बोलतोय. हा आरोप तेथील उपमहापौरांनी केला. त्याची न्युज राष्ट्रीयकृत चॅनेलवर आर्धातास दाखवण्यात आले. या संस्थेला महाराष्ट्रात एवढया ठिकाणी बॅन केले आहे. आम्हाला प्रशासकीय मंजूरीचा अधिकार नाही. परंतु आम्ही काय बोलतो, करतो याला महत्व आहेच. परंतु सन्मा. आयुक्त ते शासनाचे प्रतिनिधी असतात. जर चुकीचा ठराव होत असेल व त्या ठरावाला सहमती दिली गेली असेल आमच्या दृष्टीकोनातून तो बरोबर आहे. पण प्रशासनाला तो चुकीचा वाटत असेल तो ठराव विखंडीत करण्याचा अधिकार आयुक्त महोदयांना असतो. मग तात्कालीन आयुक्तांना ते लक्षात आले नाही का? सदरच्या संस्थेला ७ वर्षाचा ठेका कुठल्या आधारावर जाते नंतर त्याला काय दर द्यायचे? या गोष्टी होतात. मनपामध्ये याबाबत कुठलेही धोरण ठरवले गेले नाही. अहमदनगर मनपाच्या अधिकाऱ्यांवर ४२० चा गुन्हा नोंदवला गेला व माझ्या सारखा सदस्य न्यायालयात गेला तर सेनर साहेब ही जबाबदारी तुमच्यावर निश्चीत होते. तुम्ही न्यायालयात जाऊन सांगु शकत नाही. माझ्याकडे ८ विभाग होते. म्हणून दूर्लक्ष झाले आणि स्वच्छ सर्व्हेक्षण २०१६ चा शासन जी आर मध्ये असे दिले आहे की, जर स्वच्छ सर्व्हेक्षणाच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापनाचे काम होत असेल त्या कामा बाबत नगरसेवक नागरिक यांनी तक्रार केली असेल त्या कामाचे जे देयके दिले जातात ते देयके तपासून घेतले गेले पाहिजे. आणि मग पुढील काम झाले पाहिजे. आणि जर असे झाले नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी ही आयुक्त महोदयांची असते. हे मी वारंवार सांगीतले आहे. याबाबत मी दिनांक २३/८/२०२२ रोजी पत्र दिले आहे. ३०/११/२०२२ ला पत्र दिले आहे २५/१/२०२३ ला पत्र दिले आहे. दि. ६/०७/२०२३ ला पत्र दिले आहे. आणि प्रशासनाने १/३/२३ ला उत्तर दिले आहे. त्या उत्तरावर मी जर कोर्टात गेलो तर याला जबाबदार तुम्ही असाल. याचे कारण असे आपण स्वच्छ भारत अभियान मध्ये मार्गदर्शक तत्वानुसार कचरा हा शुन्य झाला पाहिजे धुळे शहर कचरामुक्त झाले पाहिजे. परंतु येथे सुका कचराला जास्त भाव असल्यामुळे सुका कचऱ्याचे वजन वाढतच आहे. मा. गजानन पाटील साहेब तुम्ही बऱ्यापैकी वचक लावण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु जिथे लावण्याची खरी गजर आहे तिथे तुम्ही लावत नाही. तुमच्या या गोष्टी लक्षात आले नाही का? स्थायी

समितीने मंजूरी दिली. त्यात स्पष्ट सांगीतले आहे की सहा महिन्याचा अहवालाचा विचार करु पुढील प्रशाकीय मंजूरी देण्यात यावी. सनेर साहेब आपल्याला या गोष्टी लक्षात आल्या नाही का? याचे कारण, प्रशासन व ठेकेदार मिळून धुळे मनपाला लुटण्याचे काम करत आहे. यामुळे सत्ताधारी पक्षाची बदनामी होईल. म्हणून हा विषय घेणे गरजेचे आहे. कोटयावधीचे बिले यात काढली जात आहे. १५ व्या वित्त आयोगात अनुदान टप्प्या टप्प्याने मिळणार आहे आणि आपण ठेकेदाराला कोटयावधी रुपये देत आहात. २२-२३ ला ८ कोटी ४ लाख रुपये दिले. जे फक्त ६ कोटी रुपये देणे अपेक्षित होते. प्रशाकीय मंजूरी व अटी शर्ती मध्ये नमूद केल्यानुसार १५ वा वित्त आयोगाचा निधी रिझर्व्ह असतो. छोटे छोटे ठेकेदारांना तुम्ही फिरवा फिरव करतात. २३-२४ चे ऑगस्ट पर्यंत अडीच कोटी बिल देणे आहे ठेकेदाराचे हा वाढीव पैसा कशातून देणार आहे? फंडातून देणार आहे का? मनपाची परिस्थिती आहे का? मनपाचे कर्मचारी, मनपाच्या गाडया , मनपाचे ४ ते ५ अधिकारी ठेकेदारामागे आणि त्याला पैसे सुपरव्हिजनचे देणार आहोत का? हे आपल्या स्तरावर केले असते तर कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार थांबला असता. आपल्याला आर्थिक गुन्हे शाखेमध्ये याची नोंद केली पाहिजे. या सर्व गोष्टींचा उहापोह झाला पाहिजे.

म.सभापती याबाबत प्रशासनाने सविस्तर स्वयंस्पष्ट अहवाल आपल्या अभिप्रायासह पुढील स्थायी समितीच्या बैठकीत सादर करावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४८ दिनांक ३१/०८/२०२३

मा. सभापती स्थायी समिती यांच्या पत्रानुसार धुळे मनपा क्षेत्रातील घनकचरा संकलन, वाहतूक व प्रक्रियासाठी पुणे येथील स्वंयभू ट्रान्सपोर्ट यांना दिनांक ०५/०१/२०२२ पासून ७ वर्षासाठी कार्यादेश देण्यात आले आहे. तथापी करारनाम्यातील अटी शर्तीनुसार स्वयंभू कंपनीमार्फत काम होतांना दिसून येत नाही.

मनपाने दिलेल्या अटी व शर्ती मध्ये सदरचे कंत्राट स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांना सदरचे कंत्राट देतांना प्रशासनाने सदर कंपनीच्या ६ महिन्यांचा अहवाल स्थायी समिती सभेसमोर सादर करणे बंधनकारक होते सदरचा अहवाल योग्य व समाधानकारक असल्यानंतरच पुढील कामाबाबत निर्णय होणे अपेक्षित होते. याबाबत प्रशासनामार्फत अहवाल सादर केलेला नाही.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार धुळे मनपा हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतूक करणेकामी नियुक्त करण्यात आलेल्या स्वंयभू कंपनी, पुणे यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार शहरात वर्षभरात केलेल्या कामाचा मुल्यमापन अहवाल सविस्तर स्वंयस्पष्ट अभिप्रायासह पुढील स्थायी समितीसमोर सादर करावा.

सुचक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. नरेंद्र रूपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २४ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक ०७/०९/२०२३
वेळ :- सकाळी ११.०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२४ आज **गुरूवार दिनांक ०७/०९/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
४	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य
१०	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती करूणा डहाळे	अति.आयुक्त
२	श्री. विजय रघुनाथ सनेर	उपायुक्त
३	डॉ. सौ. संगिता नांदुरकर	उपायुक्त
४	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक

५	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
६	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
७	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
८	श्री.नवनीत सोनवणे	कार्यकारी अभियंता (पा.पु.)
९	श्री.कैलास शिंदे	अभियंता
१०	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
११	श्री.डॉ.एम.आर.शेख	आरोग्याधिकारी
१२	श्री. पी.डी. चव्हाण	सहा.अभियंता
१३	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१४	श्री.चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१५	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१६	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
१७	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
१८	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१९	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
२०	श्री. मोहनीश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
२१	श्री.के.डी.साबळे	लिपीक,आस्थापना विभाग
२२	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२३	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२४	श्री. राजेश गायकवाड	वरीष्ठ लेखापाल , मनपा शिक्षण मंडळ

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- १४९ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे (सभा क्रं २१ दि. १७/०८/२०२३)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागणी स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

हर्षकुमार रेलन मागे मी बोलल्याप्रमाणे इतिवृत्तामध्ये सदरचे विषय आले आहे. जे आपण सांगीतले ते कामे झालेले नाहीत. त्यात पाईप मोरीचा विषय होता. त्याबाबत सनेर साहेबांनी मागे सांगीतले होते की, नॅशनल हायवेचे अधिकारी तसेच मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या समवेत बैठक घेऊ. अद्यापपावेतो ती बैठक झालेली नाही. त्यानंतर पारोळा रोड येथील वाहतूक कोंडी बद्दल आदेशित केले होते. वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार होते. ती बैठक झालेली नाही. इतिवृत्तात हे नमूद आहे. त्यानंतर मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वकांक्षी योजना आहे सर्वांसाठी घरे यासंदर्भात आमच्या प्रभाग क्र. ७ मिलिंद सोसायटी, समतानगर, महाले नगर यामध्ये अतिक्रमण नियमानुकुल करायचे आहे. या निमित्ताने चेतन सोनार यांच्या बरोबर बैठक घेणार होते. आपण त्यांना फोनही केला होता. त्याबाबत अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही. लाईट विभागाकडून २ वर्षापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे ७५ लाख

रुपयाचे लाईट तेथे लावणार होते ते काम पूर्ण झाले फक्त ४० हजार रुपयाच्या कामाकरता २ वर्षापासून मी पाठपुरावा करतोय. तो विद्यावर्धीनी कॉलेज समोरच्या हायमास्ट पोल आहे तो शिफट होत नाही आहे. ४० हजाराच्या कामाकरीता मी विद्युत अभियंता बागुल साहेब यांना ४० वेळा सांगून झाले पण ते काम अजून पर्यंत झालेले नाही.

म.विद्युत अभियंता — त्या ठिकाणी जो पोल आहे तेथे भाजी विक्रेते यांनी दुकाने लावलेले आहे. ज्या भाजी विक्रेत्याने तेथे दुकान लावले आहे त्याने तेथे जागा मोकळी करुन दिलेली नाही. २ वेळेस माणसे तेथे पाठवले आणि अतिक्रमण विभागाला सुध्दा सांगीतले आहे. कारण तो १६ मी. उंचीचा पोल आहे. तो तेथील जागा मोकळी करुन काढणार आहे.

म.हर्षकुमार रेलन — याबाबत दीड वर्षापूर्वी तुम्ही असेच उत्तर दिले होते.

म.विद्युत अभियंता — जून महिन्यांत याची वर्क ऑर्डर झाली आहे. आणि या कामाची मुदत ४ ते ५ दिवस शिल्लक आहे. या काही तांत्रीक अडचणी त्या ठिकाणी आहे. याबाबत अतिक्रमण विभागालासुध्दा पत्र देऊन झाले आहे.

म. हर्षकुमार रेलन — दुकानवाले सांगत आहे की आम्ही तुम्हाला जागा मोकळी करुन देण्यास तयार आहोत.

म.विद्युत अभियंता — दोन वेळा ठेकेदाराचे माणसे त्या ठिकाणी जाऊन आले आहे. त्या ठिकाणी जागा मोकळी होणे गरजेचे आहे.

म.हर्षकुमार रेलन — मागील बैठकीत उपायुक्त नांदुरकर मॅडमांनी सांगीतले होते. शाळेच्या दुरुस्तीबाबत प्रस्ताव त्यांनी तयार केले आहे. १४ नंबर शाळा आहे ती शाळा पूर्ण नविन करायची आहे. माझी विनंती राहिल त्या शाळेची नविन बांधण्याबाबत प्रोसिजर करा. मा. महापौरांना सांगीतले आहे मा. पालकमंत्री गिरिशभाऊंना ही सांगीतले आहे. निधी ची व्यवस्था करु पण पूर्ण इस्टीमेट तयार करा. त्यानंतर बाजार विभागाला सूचना केली होती. मनपासमोर तिबेटियन लोक येतात. स्टॉल लावून मालविकून निघून जातात. मनपाला त्यातून काहीच उत्पन्न नाही. ते लोकं जीएसटी सुध्दा बुडवतात म्हणून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. हे सर्व सांगण्याचा उद्देश की आपण कुठलाही आदेश दिला तरी ते कामे होत नाही. त्यांच्यावर कोणाचाही वचक नाही इतिवृत्तात लेखी मध्ये हे सर्व आले आहे. तरी कोणी काम करायला तयार नाही. मग यावर नगरसेवकांनी काय करायचे?

म.सभापती — अति. आयुक्त महोदया, या सर्व तक्रारींची नोंद घेऊन संबंधीतांवर योग्य ती कारवाई करावी. तसेच सर्व अधिकाऱ्यांनी ही नोंद घ्यावी.

म.किरण अहिरराव — सभापती महोदया, २ ते ३ महिन्यापासून शौचालय बंद आहेत. पावसाळा सुरु आहे. जवळपास ४० लाख रुपये खर्च करुन बांधण्यात आले आहे.

म.अभियंता — शौचालये बांधून आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत केलेले आहे.

म.किरण अहिरराव — जे सार्वजनिक शौचालये आहे ते चालू करावे. नागरिकांना उघडयावर शौचालयास जावे लागते. भविष्यात काही घटना घडू शकते. याला जबाबदार कोण राहिल?

म. उपायुक्त — नविन निविदा काढली आहे. आज निविदा समिती पुढे पाठवली आहे. निविदा समितीची मान्यतेनंतर पुढच्या स्थायीच्या बैठकीत निविदा मान्यतेसाठी येणार आहे. सार्वजनिक शौचालया बाबत वैयक्तीक करीता आपल्याकडे २७०० अर्ज प्राप्त झाले आहे. त्यासाठी

स्पेशल टिम तयार केली आहे. त्याचे काम सुरु झाले आहे. लवकरात लवकर त्यांच्या अकौंटला पैसे जातील. त्यांना संडास बांधणे बंधनकारक आहे.

म.नगरसचिव — प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त संबंधीतांना पाठवण्यात येते त्यातील चर्चा पाहून त्यावर काय कार्यवाही झाली ते सन्मा. सदस्यांना अवगत केले तर सभागृहाचा वेळ वाया जाणार नाही.

म.सभापती — संबंधित अधिकाऱ्यांनी याची नोंद घेवून कार्यवाही करावी. तसेच सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४९ दिनांक ०७/०९/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.२१ दिनांक १७/०८/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १३४ ते १३८ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५० — देवपूर भागांतील आग्रा रोड वरील राजू टायर दुकानाजवळ ६ इंची पाईपलाईन टाकणे, विटाभट्टी येथे व्हॉल बसविणे, अनमोल नगर येथे १० इंची पाईपलाईन टाकणे, डॉ.राजेश पाटील यांच्या दवाखान्याजवळ २०० एमएम Air व्हॉल बसविणे व राम नगर व नवीन नवरंग जलकुंभ येथे लिकेजेस काढणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — मागील इतिवृत्तात सन्मा. सदस्य श्री सुनिलभाऊ बैसाणे यांनी सांगीतले होते की, पाईपलाईन, व्हॉल्व रिपेअर हे जे कामे असतात ती मोघम स्वरुपात समोर येतात. आणि दरवेळी विना निविदा हे कामे होतात. हे काम कधी झालेआहे हे दरवेळी कळविण्यात यावे असा आदेश सभापती महोदयांनी दिला होता. या विषया संदर्भात पूर्ण माहिती दिलेली नाही की, हे काम पूर्वी कधी झाले आहे? यावर सव्वीस्तर चर्चा झालेली आहे. यात मुंबई प्रांतिक अधिनियम ६७(क)(३) हे काय आहे? पाईपलाईन नविन टाकणे चे काम अचानक निघत नाही. हे कामे करुन कार्योत्तर मंजूरीसाठी आले आहे.

म.प्रदिप चव्हाण — आपण नवरंग जलकुंभ नविन बांधली होती तो चालू केला होता. लाला सरदार नगर येथे ६ इंच् पाईपलाईन आहे आग्रा रोड येथे क्रॉस सेक्शन होते. त्यात बरीच घाण अडकली होती त्यामुळे पाणीपुरवठा संथ झाला होता. त्यानुसार आपण सरळ पाईपलाईन टाकली. तसेच विटाभट्टी येथे व्हॉल्व असविणे आवश्यक होते. तेथे लोकांना पाणी मिळत नव्हते. तसेच अनमोल नगर येथे १० इंची पाईपलाईन आवश्यकता होती. ती टाकण्यात आली. तसेच डॉ. राजेश पाटील यांच्या दवाखान्याजवळ २०० एम एम एअर व्हॉल्व होता तो जुना होता. तो ही नविन टाकला हे कामे अत्यंत तातडीचे असल्याने ते करुन घेतले आहे.

म.हर्षकुमार रेलन — तुम्ही सांगतले की, एअर व्हॉल्व जुना होता तर त्याची निविदा काढली पाहिजे होती.

म.प्रदिप चव्हाण — तापी योजनेचे शटडाऊन होते त्यामुळे ते तातडीने करुन घेतले.

म. नगरसचिव — ३ लाखाच्या आत जे तातडीचे असतात. ते विना निविदा करुन घेण्यात येतात.

म.विजय जाधव — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.नाजियाबानो पठाण — विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५० दिनांक ०७/०९/२०२३

धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेवरील तातडीने खालील कामे करणे आवश्यक होते. तसेच काही ठिकाणी नागरिकांना अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याने तसेच काही भागांत नागरिकांना पाणीपुरवठा होत नसल्याने काही ठिकाणी तातडीने पाईपलाईन जोडण्याचे काम करणे आवश्यक होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कामाचे नाव
१)	देवपूर भागांतील आग्रा रोड वरील राजू टायर दुकानाजवळ ६ इंची पाईपलाईन टाकणे, विटाभट्टी येथे व्हॉल बसविणे, अनमोल नगर येथे १० इंची पाईपलाईन टाकणे, डॉ.राजेश पाटील यांच्या दवाखान्याजवळ २०० एमएम Air व्हॉल बसविणे व राम नगर व नवीन नवरंग जलकुंभ येथे लिकेंजेस काढणे.

वरील कामे हे पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेशी निगडीत असल्याने व तातडीने करणे गरजेचे असल्याने वरिष्ठांच्या आदेशानुसार सदरचे काम ठेकेदार श्री. संजय दगडू गायकवाड यांच्या मार्फत पुर्ण करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसुची सन २०२२-२३ नुसार रु.२,६२,४१०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचा खर्च सन २०२३-२४ च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.संजय गायकवाड ठेकेदार मनपा,धुळे यांच्या कडून करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून देवपूर भागातील आग्रा रोड वरील राजू टायर दुकानाजवळ ६ इंची पाईपलाईन टाकणे, विटाभट्टी येथे व्हॉल बसविणे, अनमोल नगर येथे १० इंची पाईपलाईन टाकणे, डॉ.राजेश पाटील यांच्या दवाखान्याजवळ २०० एमएम Air व्हॉल बसविणे व राम नगर व नवीन नवरंग जलकुंभ येथे लिकेजेस काढणे इत्यादी कामे विना निविदा करण्यात आलेले आहे. सदरच्या कामास

झालेला रू. २,६२,४१०/- खर्चास मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये झालेल्या खर्चास व कामास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्तावाच्या कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याबाबत संबंधित विभागाने दक्षता घ्यावी.

सुचक:- श्री.विजय बापू जाधव

अनुमोदक:- श्रीमती नाजियाबानो नासीर खा पठाण

सर्वानुमते मंजूर
सही xxx/-
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५१ मुलभूत सोई सुविधांचा विकास सन २०२१-२२ अंतर्गत नॅशनल हायवे ३ पासून म्सिबा मस्जिद पासून ते जुना वडजाई रोड पावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणेचे कामांबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.खान मो. साबीर सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. अन्सारी वसीम विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५१ दिनांक ०७/०९/२०२३

मुलभूत सोई सुविधांचा विकास सन २०२१-२२ अंतर्गत नॅशनल हायवे ३ पासून म्सिबा मस्जिद पासून ते जुना वडजाई रोड पावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.०७/०६/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**९९,९९,३६९/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३९२/२०२२-२३ दि. १७/११/२०२२ अन्वये रक्कम रु.**९९,९९,३६९/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./३३/२० दि. १३/०६/२०२३ रोजी दैनिक मिड डे /लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१४/०७/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.एस.बी.देशमुख	शे.१.००% जास्त	
२	श्री.श्रेयस राजेश खंडेलवाल	**अंदाजपत्रक दर**	**सर्वात कमी दर**
३	मे.महादेव कन्सट्रक्शन	शे.२.००% जास्त	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्रेयस राजेश खंडेलवाल** यांची निविदा सर्वातन्यूनतम दराचे **८३,०६,७२९/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्रेयश राजेश खंडेलवाल** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्रेयस राजेश खंडेलवाल** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **श्रेयस राजेश खंडेलवाल** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. **सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.**

सुचक :- श्री.खान मो.साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक :- श्री.अन्सारी वसीम खलील

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५२ मुलभूत सोई सुविधांचा विकास सन २०२१-२२ अंतर्गत सर्व्हे नं. ४३६ (नगरभूमापन क्रं.१८१\७९) येथे मिनी ॲम्युजमेंट पार्क व प्ले ग्राऊड तयार करणेचे कामांबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नाजीयाबानो पठाण सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.अन्सारी फातमा विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५२ दिनांक ०७/०९/२०२३

मुलभूत सोईसुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२ स.नं.४३६ (न.भू.क्र.१८१\७९) येथे मिनी अम्युझमेंट पार्क व प्ले ग्राउंड तयार करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.०७/०६/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३,९९,९९,४२३/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३८०/२० दि.१५/११/२०२२ अन्वये रक्कम रु. **३,९९,९९,४२३/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./३३/२० दि.१३/०९/२०२३ रोजी दैनिक मिडडे/लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. / /२० पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.अभिनय गिते	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**
२	श्री.मिलिंद मुडावदकर	शे.४.०० % जास्त	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.अभिनय गिते** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **३,३५,१८,६९५/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.अभिनय गिते** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.अभिनय गिते** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत सादर. तसेच प्रकरण दर करीता मे.स्थायी समिती समोर सादर करणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.अभिनय गिते** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा

अनुमोदक :- श्रीमती अन्सारी फातमा नुरूल अमीन

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५३ जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.०२ मध्ये ग.द.माळी सोसायटी सं.नं.६०/१ मधील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणेचे कामांबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.दगडू बागुल — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.विजय जाधव — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५३ दिनांक ०७/०९/२०२३

जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.०२ मध्ये ग.द.माळी सोसायटी सं.नं.६०/१ मधील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे बाबतच्या कामास कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.३१/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३९,७२,०००/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९६२/२०२२-२३ दि. २९/०३/२०२३ अन्वये रक्कम रु. **४०,३०,८२५/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./८५/२०दि. ०२/०५/२०२३ रोजी दैनिक सकाळ /मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१९/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	सौरभ संजय कदमबांडे	**अंदाजपत्रकदर**	**सर्वात कमी दर**
२	गिरीष प्रमोद बाविस्कर	शे.२.००%	
३	उमेश राजेंद्र चौधरी	शे.१.००%	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री.**सौरभ संजय कदमबांडे** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **४०,३०,८२५/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री. **सौरभ संजय कदमबांडे** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री.**सौरभ संजय कदमबांडे** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर केले असता जागा मालकी हक्का बाबत सन्मा.सदस्यांनी माहिती मागविली होती व सदर प्रस्ताव तहकुब ठेवणेत आलेला होता. सदर ओपनस्पेसला मनपाचे नाव लावणेत आलेले असून या कामी जिल्हावार्षिक योजने अंतर्गत १०० % निधी उपलब्ध होणार आहे. सदर प्रस्ताव फेर निर्णयार्थ स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.सौरभ संजय कदमबांडे** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागुल

अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५४ महाराष्ट्र सुवर्ण जायंती नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.०८ मध्ये ग.नं.५ ची बोळ पावन मारुती ते नायब आलियान हॉटेल पर्यंत काँक्रीट गटार करणे कामांबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अन्सारी वसीम सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५४ दिनांक ०७/०९/२०२३

महाराष्ट्र सुवर्ण जायंती नगरोत्थान योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.०८ मध्ये ग.नं.५ ची बोळ पावन मारुती ते नायब आलियान हॉटेल पर्यंत काँक्रीट गटार करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२५/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३९,८७,१००/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.५०७/२० दि.२६/१२/२०२२ अन्वये रक्कम रु. **३९,८७,१००/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/२७/२० अन्वये दि.२९/०५/२०२३ रोजी दैनिक **लोकमत/सा.खा.जनसंग्राम** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०९/०६/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	अे.के.सैफी	शे.१.००% जास्त	
२	श्री.सौरभ संजय कदमबांडे	शे.२.०० % जास्त	
३	श्री.सुर्यकांत दीपक महाले	**अंदाजपत्रक दर**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.सुर्यकांत दीपक महाले** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **३९,८७,१००/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.सुर्यकांत दीपक महाले** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.सुर्यकांत दीपक महाले** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती समोर सादर करणेस मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.सुर्यकांत दीपक महाले** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.अन्सारी वसीम खलील

अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५५ धुळे मनपा हद्दीतील मोकाट व भटके श्वान निर्बिजीकरण, शस्त्रक्रीया व लसीकरण कामाचा कार्यादेश व करारनामा रद्द करण्याकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती या विषयाबाबत सविस्तर खुलासा उपायुक्त यांनी करावा.

म. विजय सनेर मोकाट कुत्रे आणि निर्बिजीकरण शस्त्रक्रिया बाबती मधे जयपूरच्या एजन्सीला ठेका दिला होता. नियमाप्रमाणे त्याचा करारनामा रद्द करणे गरजेचे होते. ते रद्द करुन शासन निर्णय आणि केंद्राचा गाईडलाईनचे अभ्यास करुन राज्याच्या ज्या चार एजन्सी आहे त्यांना बोलवून या पैंकी

जो चांगल्या पध्दतीने निर्बिजीकरणाचे सेंटर उभारुन लवकरात लवकर जो काम करुन द्यायला तयार असेल त्या चारही एजन्सीशी चर्चा व निगोसिएशन करुन तो अहवाल पुढच्या येणाऱ्या सभेपुढे ठेवण्यात येईल. त्यातील एका एजन्सीला निविदा समितीकडून मंजूरी घेऊन पुढच्या बैठकीत ठेवता येईल. हा विषय मंजूर झाला तर ते पुढे सादर करता येईल. हा विषय वर्क ऑर्डर रद्द करणेबाबत आहे.

म.सुनिल बैसाणे — मोकाट कुत्र्यांच्या बाबत सर्व सन्मा. सदस्य व नागरिकांच्या तक्रारी उपलब्ध झाल्या आहे. परंतु मोकाट कुत्र्यांच्या बाबत अनेक तांत्रिक अडचणी असल्यामुळे आणि प्रशासनाला देखील वारंवार सूचना केल्या होत्या. परंतु प्रशासनाला कायद्याच्या चौकटीत काम करावे लागते. कुत्र्यांचा विषय कायस्वरुपी मार्गी लावण्यासाठी मनपाला अडचणी आल्या त्याचे कारण असे की, जी प्राणी मित्र संघटना आहे ते त्यावर काम करत असतात. प्राण्यांवर काही अत्याचार होणार नाही याबाबत ते अभ्यास करत असतात. दोन तीन दिवसापूर्वी वर्तमान पत्रात वाचले चारचाकी वाहनाने रस्त्यांवरील दोन कुत्र्यांना उडवून ते निघून गेले याबाबत प्राणीमित्र संघटना यांना कळाले त्यांनी तात्काळ दखल घेऊन संबंधीत व्यक्तीवर गुन्हा दाखल केला. आपण ज्या जयपुरच्या संस्थेला काम दिले होते ते भारतीय प्राणि कल्याण मंडळ यांच्या अटी शर्तीनुसार काम करत नव्हते. त्या संस्थेकडे कुठेही शासनमान्यता यादी मध्ये त्यांचा समावेश नव्हता. त्यामुळे आपल्याला काम करतांना अडचणी आल्या. त्याच्याकडे कुठलेही कागदपत्रे नसतांना त्यांच्याकडून काम केले असते तर आपल्याकडून सुप्रिम कोर्टाचा अवमान झाला असता. सुप्रिम कोर्टाच्या त्याबाबत गाईडलाईन आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता होती. म्हणून आपण त्या संस्थेचे काम बंद करण्यास सांगीतले. माझी प्रशासनाला विनंती आहे आपण नव्याने निविदा प्रक्रीया केली त्याला वेळ जाणार आहे. शासन मान्य ज्या संस्था आहे त्यांना पत्र द्यावे. त्यांच्याशी निगोशिएशन करा. मनपाच्या हिताचे काम करेल त्या संस्थेला काम दिले पाहिजे. तत्पुर्वी या जयपुरच्या संस्थेचा ठेका रद्द करावा. त्याचा करारनामा रद्द करावा. नाहीतर तो मनपाविरोधात न्यायालयात जाईल. आणि मनपाला भरपाई द्यावी लागेल. करारनामा रद्द करुन त्वरीत शासनमान्य संस्थांना बोलवून कायमस्वरुपी मोकाट कुत्र्यांचा विषय निकाली काढावा. तो ठेकेदार पुन्हा निविदा प्रक्रीयेत भाग घेणार नाही याची काळजी घ्यावी. सभापती महोदया, पुढील कार्यवाहीसाठी प्रशासनाला आदेशित करावे.

म.नाजीयाबानो पठाण — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा व लवकर नविन संस्थेची नियुक्ती करण्यात यावी.

म.सभापती — सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे. तसेच याबाबत पुढील प्रस्ताव त्वरीत स्थायी समितीपुढे आणावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५५ दिनांक ०७/०९/२०२३

धुळे महानगरपालिका हद्दीतील मोकाट व भटके श्वान निर्बिजीकरण व शस्त्रक्रीया करुन रेबीज लसीकरण करण्याकामी प्रती श्वान रु.८७५/- या दराने संतुलन जिवकल्याण, जयपुर या संस्थेस कार्यादेश देण्यात येवुन संदर्भ क्र.२ नुसार करारनामा करुन घेण्यात आला आहे.

दिनांक १२/४/२०२३ रोजी देखरेख समितीच्या बैठकीत आपल्या संस्थेमार्फत उभारण्यात आलेल्या प्रकल्पास प्राणी रक्षक संस्थेच्या सदस्यांनी आक्षेप नोंदविला असुन त्याबाबत भारतीय प्राणी कल्याण मंडळ यांचेकडे तक्रार दाखल केलेली आहे. त्यात असे नमुद आहे की आपल्या संस्थेने उभारलेल्या प्रकल्पास प्राणी प्रजनन प्रतिबंध कार्यक्रम राबविण्याकरीता प्राणी जन्म नियंत्रण नियम २०२३ नुसार भारतीय प्राणी कल्याण मंडळ यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

संतुलन जिवकल्याण, जयपुर यांना याबाबत जा.क्र./धुमपा/आरोग्य/७२३/२२-२३ दिनांक २/३/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच प्राणी जन्म नियंत्रण २०२३ च्या नियमान्वये प्रकल्प उभारणीत देखरेख समितीच्या मार्गदर्शनानुसार बदल करुन भारतीय प्राणी कल्याण मंडळ यांच्याकडे प्रकल्प मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते. परंतु संस्थेने तसे काहीही न करता प्रकल्पाची मान्यतासाठी सहा महिन्याच्या कालावधीत पुर्तता करण्यात येईल असे कळविले आहे. संस्थेस यासंदर्भात भ्रमणध्वनीद्वारे विचारणा केली असता समाधानकारक उत्तर न देता टाळाटाळ करीत असल्याचे दिसुन येत आहे. याचा अर्थ संतुलन जिवकल्याण जयपुर या संस्थेस ह्या कामाबद्दल कोणतेही स्वारस्य नसुन काम करण्याची इच्छा दिसुन येत नाही याबाबत आपले म्हणणे ७ दिवसात मांडण्याकरीता समक्ष हजर राहणे बाबत संदर्भ क्र.५ अन्वये नोटीस देण्यात आली होती.

परंतु संतुलन जिवकल्याण जयपुर यांनी सदर नोटीस कुठल्याही प्रकारे खुलासा सादर केलेला नाही व संपर्क देखील केलेला नाही. तसेच वेळोवेळी करारनाम्याचा भंग करीत आहे. तरी शहरात मोकाट कुत्र्यांचा वाढता प्रादुर्भाव पहाता व सन्मा.नगरसेवक व नागरीकांच्या तक्रारी वाढत आहे. तरी उक्त बाबत कार्यवाही करणे गरजेचे आहे. तसेच करारनाम्यातील अट क्र.२५ मध्ये नमुद नुसार मंजुर मक्तेदाराने करारातील कोणत्याही अटी व शर्तींचा भंग केल्यास त्यांना कायदेशीर नोटिस देऊन खुलासा प्राप्त करुन त्यांचे विरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचा हक्क मा.आयुक्त सो. यांना राहील याबाबत नमुद आहे.

त्याअनुषंगाने संतुलन जिवकल्याण, जयपुर या संस्थेसोबत झालेला करारनामा रद्द करुन संतुलन जिवकल्याण, जयपुर यांना काळ्या यादीत टाकण्याबाबत पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात आला त्यावर मा.उपायुक्त सो. यांनी खालील प्रमाणे निर्देश दिले आहे

उपरोक्त संस्थेचे बाबत मा.उपायुक्त (नियोजन व अंदाज) पशुसंवर्धन आयुक्तालय पुणे यांचे दि.७/६/२०२३ यांनी सदर संस्थेची निविदा रद्द करावी कारण त्या संस्थेकडे ABC Rules २०२३ नुसार नोंदणी नाही ABC प्रोग्राम करणे योग्य नाही.

सन २०२२-२३ या वर्षात भटक्या कुत्र्यांकडुन नागरीना चावा घेणे म्हणजे (Biteing) च्या केसेस खुपच झालेले आहे. त्यांचा ठळक दर्शवीणारा तक्ता सोबत जोडलेला आहे तसेच सदर संस्थेने वेळोवेळी दिलेल्या नोटीसा लक्षात घेता सदर संस्था काळ्या यादीत टाकणे बाबत AWBI ने देखील त्यांच्या वेब पोर्टलवर धुळ्याचा नावाचा उल्लेख केलेला म्हणुन सदर संस्थेचा करारनामा व कार्यारंभ आदेश रद्द करण्यासाठी लेखा / लेखापरीक्षण यांचा अभिप्राय घेवुन मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य होईल असे वाटते आदेशार्थ.

तसेच मा.आयुक्त सो. यांनी सदर विषय मान्य करुन Put Before Standing Committee असे निर्देश दिले आहेत. तरी सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यास पुढील कार्यवाहीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार धुळे मनपा हद्दीतील मोकाट व भटके श्वान निर्बिजीकरण, शस्त्रक्रीया व लसीकरणाचे काम संतुलन जिवकल्याण, जयपुर या संस्थेस कार्यादेश व करारनामा करण्यात आलेला होता परंतू सदर संस्थेच्या कार्यप्रणालीबाबत आक्षेप निर्माण झाल्याने केंद्र सरकारने काळया यादीत टाकल्याने सदर संस्थेला देण्यात आलेला कार्यादेश व करारनामा रद्द करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच शहरातील मोकाट व भटके श्वान निर्बिजीकरण,शस्त्रक्रीया व लसीकरण करणे या कामी शासन निर्देशाप्रमाणे प्रस्तावित नविन संस्था नियुक्तीबाबत तातडीने कार्यवाही करून प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करावा.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्रीमती नाजीयाबानो नासीरखा पठाण

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २५ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक १४/०९/२०२३
वेळ :- सकाळी ११.०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२५ आज **गुरूवार दिनांक १४/०९/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह धरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.अहिरराव किरण हरिश्चंद्र	सदस्य
४	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
५	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
६	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
७	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
८	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
९	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
१०	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
११	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१२	श्रीमती अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१३	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१४	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती करूणा डहाळे	अति.आयुक्त
२	श्री. विजय रघुनाथ सनेर	उपायुक्त
३	श्री. अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरीक्षक
४	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी

५	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
६	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
७	श्री.नवनीत सोनवणे	कार्यकारी अभियंता (पा.पु.)
८	श्री.कैलास शिंदे	अभियंता
९	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
१०	श्री.डॉ.एम.आर.शेख	आरोग्याधिकारी
११	श्री. पी.डी. चव्हाण	सहा.अभियंता
१२	श्री.एन.के.बागुल	विद्युत अभियंता
१३	श्री.चंद्रकांत उगले	सहा.अभियंता पाणी पुरवठा
१४	श्री.चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१५	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
१६	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१७	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
१८	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
१९	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
२०	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
२१	श्री. मोहनीश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
२२	श्री.के.डी.साबळे	लिपीक, आस्थापना विभाग
२३	श्री.शिरिष जाधव	मालमत्ता अधिक्षक
२४	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२५	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२६	श्री. राजेश गायकवाड	वरीष्ठ लेखापाल , मनपा शिक्षण मंडळ

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- १५६ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे (सभा क्रं २२ दि. २४/०८/२०२३)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागणी स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.किरण अहिरराव मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५६ दिनांक १४/०९/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.२२ दिनांक २४/०८/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १३९ ते १४३ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही XXX/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५७ धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत ०१ ते ४ भागात स्लॅब ड्रेन , रस्ता कॉंक्रीट करणे , जॉगिंग ट्रॅक करणे रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५७ दिनांक १४/०९/२०२३

धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत ०१ ते ४ भागात स्लॅब ड्रेन , रस्ता कॉंक्रीट करणे,जॉगिंग ट्रॅक करणे रस्ता डांबरीकरण करणे कामास म.जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२/ क/ कक्ष५ नपाप्र / बांध / ८३५ दि.०६/०७/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४,१८,८३,९४८/-(GST वगळून) मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ३४६ , ३०२ , ३४७ , ३४८ / २०२२-२३ दि.२८/१०/२०२२अन्वये रक्कम रु.४,१८,८३,९४८/- (GST वगळून) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ २९३ /२०२३-२४ दि. ०७/०७/२०२३ अन्वये दि.०९/०७/२०२३ रोजी दैनिक मिड-डे / नवभारत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०८/०८/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.५.५२% जास्तीने	
२	मे.अे.बी. वाघ	शे.५.५६% जास्तीने	
३	गायत्री कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम धरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.किरण हरिश्चंद्र अहिरराव

अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही XXX/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५८ धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत ०१ ते ०५ ठिकाणील भागात रस्ता कॉक्रीटकरण व रस्ता डांबरीकरण, संरक्षण भिंत, जॉगिंग ट्रॅक इ.कामांचे निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. कल्याणी अंपळकर विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५८ दिनांक १४/०९/२०२३

धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत ०१ ते ०५ ठिकाणील भागात रस्ता कॉक्रीटकरण व रस्ता डांबरीकरण , संरक्षण भिंत , जॉगिंग ट्रॅक बाबतच्या करणे कामास म.जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२/ क / कक्ष - ५ / नपाप्र / बांध / ८१९ दि.३०/०६/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ४,१८,७१,८६४/- (GST वगळून) मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ३१० , ३३३ , ३४९ , ३५० , ३०९ /२०२२-२३ दि.२८/१०/२०२२ अन्वये रक्कम रु. ४,१८,७१,८६४/- (GST वगळून) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ २८१ /२०२३-२४ दि.०३/०७/२०२३ अन्वये दि.०४/०७/२०२३ रोजी दैनिक मिड- डे / पुण्य नगरी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०३/०८/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.अे.बी. वाघ	शे.०.५६% कमीने	सर्वात कमी दर
२	श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.५.०० % जास्तीने	
३	गायत्री कन्सट्रक्शन	शे.९.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.अे.बी. वाघ** यांचे दर **शे.०.५६% कमी दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.अे.बी. वाघ** यांची **शे.०.५६% कमी दराने** आलेले निविदा दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार**मे.अे.बी.वाघ** यांचे **शे.०.५६कमी दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री.कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १५९ धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत ०१ ते ०७ ठिकाणील भागात रस्ता कॉक्रीटकरण व रस्ता डांबरीकरण, संरक्षण भिंत, स्ट्रीट लाईट, पूल बांधणे इत्यादी कामांचे निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. विजय माळी विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५९ दिनांक १४/०९/२०२३

धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत ०१ ते ०७ ठिकाणील भागात रस्ता कॉक्रीटकरण व रस्ता डांबरीकरण , संरक्षण भिंत , स्ट्रीट लाईट , पूल बांधणे कामास म.जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२/ क / कक्ष - ५ / नपाप्र / बांध / ८६३ दि.११/०७/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३,६०,८१,९४८/- (GST वगळून) मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ३३१, २९९, ३३२ , २९८ , ३००, ३७० /२०२२-२३ दि.११/१०/२०२२ अन्वये रक्कम रु.३,६०,८१,९४८/- (GST वगळून) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ २९७ /२०२३-२४ दि.१२/०७/२०२३ अन्वये दि.१३/०७/२०२३ रोजी दैनिक मिड- डे / लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.११/०८/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
1	श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर
2	मे.अे.बी. वाघ	शे.5.51% जास्तीने	
3	गायत्री कन्सट्रक्शन	शे.5.56 % जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- श्री.विजय बापू माळी

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १६० धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत ०१ ते ४ भागात स्लॅब ड्रेन , रस्ता काँक्रीट करणे, जॉगिंग ट्रॅक करणे रस्ता डांबरीकरण करणेबाबत निविदा दर मागविण्यात आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.खान मो. साबीर सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. वसीम अन्सारी विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६० दिनांक १४/०९/२०२३

धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत ०१ ते ४ भागात रस्ता कॉक्रीटकरण व रस्ता डांबरीकरण करणे कामास म.जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२/ क/ कक्ष –५/ नपाप्र / बांध/८१८ दि.३०/०६/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्च रक्कम रु.३,४२,३३,५८६/- (GST वगळून) मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ३०६,३०५,३११, ३०३ / २०२२-२३ दि.११/१०/२०२२ अन्वये रक्कम रु.३,४२,३३,५८६/- (GST वगळून) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ २८० /२०२३-२४ दि.०३/०७/२०२३ अन्वये दि.०४/०७/२०२३ रोजी दैनिक दिव्य मराठी / आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०३/०८/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.अे.बी. वाघ	शे.०.५६% कमीने	सर्वात कमी दर
२	श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.५.०० % जास्तीने	
३	गायत्री कन्सट्रक्शन	शे.९.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.अे.बी. वाघ** यांचे दर **शे.०.५६% कमी दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.अे.बी. वाघ** यांची **शे.०.५६% कमी दराने** आलेले निविदा दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार**मे.अे.बी.वाघ**यांचे **शे.०.५६ कमी दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. **सदर प्रस्ताव व**

कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.खान मो.महिबुल्लाह साबीर

अनुमोदक :- श्री.अन्सारी वसीम खलील

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १६१ धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत महिंदळे शिवारात स्मशान भूमी, महिंदळे१०सिट शौचालय, कुमार नगर अमरधाम दशक्रिया विधी शेड व बैठकव्यवस्था करणेचे निविदा दर मागविण्यात आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नाजीयाबानो पठाण सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. फातमाबी अन्सारी विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६१ दिनांक १४/०९/२०२३

धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधाचा विकास अंतर्गत महिंदळे शिवारात स्मशान भूमी महिंदळे १० सिट शौचालय , कुमार नगर अमरधाम दशक्रिया विधी शेड व बैठक व्यवस्था करणे कामास म.जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२/ क / कक्ष – ५ / नपाप्र / बांध / ८९७ दि.१७/०७/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. २,४१,९०,०८५/- (GST वगळून) मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ २८३, २९३, ३०१/२०२२-२३ दि. ०६/१०/२०२२ अन्वये रक्कम रु. २,४१,९०,०८५/- (GST वगळून)मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ ३९८ /२०२३-२४ दि.१८/०७/२०२३ अन्वये दि.१९/०७/२०२३ रोजी दैनिक दिव्य मराठी / आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१८/०८/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	सौरभ संजय कदमबांडे	शे.१.००% जास्तीने	
२	गायत्री कन्सट्रक्शन	शे.५.५२% जास्तीने	
३	आदर्श कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.आदर्श कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.आदर्श कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.आदर्श कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. **सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.**

सुचक :- श्रीमती .नाजीयाबानो नासीरखा पठाण

अनुमोदक :- श्रीमती.फातमाबी नुरूल अमीन अन्सारी

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १६२ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा निधी सन २०२२-२३ अंतर्गत ०१ ते १६ कामांबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अब्दुल लतीफ अन्सारी सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. सुनिल बैसाणे विषय क्रमांक १५७ ते १६२ ही कामे कोणत्या निधीच्या लेखाशिर्षकातून करण्यांत येणार आहे तसेच सदर कामासाठी मनपाचा हिस्सा अदा करावा लागणार आहे किंवा नाही याबाबत प्रशासनाकडून माहिती देण्यांत यावी.

म. अभियंता १५७ ते १६२ या विषयातील कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडून मुलभूत सेवा सुविधा या लेखाशिर्षकातून १०० टक्के अनुदान पाप्त होणार आहे. यासाठी मनपाचा कोणताही हिस्सा अदा करावा लागणार नाही. सदरचे काम हे सन २०२२-२३ या मुलभूत सोई सुविध अंतर्गत मंजूर झालेले आहे.

म. सुनिल बैसाणे भाजपा शिवसेना या मित्रपक्षाच्या काळात धुळे महानगरपालिकेला अशा स्वरुपाचा भरघोस निधी प्राप्त झालेला आहे. ही आनंदाची बाब आहे. आपल्या नेत्यांच्या माध्यमातून शहर विकास कामासाठी १००टक्के अनुदानातून होणारी विकास कामे ही नागरीकांसाठी महत्वपुर्ण आहे.

म. दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६२ दिनांक १४/०९/२०२३

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०२३- २४ अंतर्गत ०१ ते १६ कामांबाबतच्या कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष ५ / नपाप्र /बांध/ ६६२ दि.१७/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास **रक्कम रु. १६,३८,३७,५२४/- मात्र** रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ २९०, २७६, २७७ , २७८ २७९, २८०, २८१ ,२८२, २८४, २८५ ,२८६, २९१, २८७ ,२८८ , २८९ , २९२ दि.०६/१०/२०२२ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र. / धुमपा/ पापुवि/ १९२/२०२३-२४दि.०२/०६/२०२३ अन्वये दि. ०३/०६/२०२३ रोजी दैनिक मिड –डे / नवराष्ट्र या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०५/०६/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	**मे.पी.पी. डेव्हलपर्स**	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**
२	मे.अे. बी. बाघ	शे.२.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.पी.पी. डेव्हलपर्स यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.पी.पी. डेव्हलपर्स , धुळे यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती पुढे सदर करणेस मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.पी.पी.डेव्हलपर्स** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या अन्सारी दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.अब्दुल लतीफ अब्दुल हमीन अन्सारी

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागुल

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १६३ देवपूर भागांतील राजे संभाजी उद्यान बिओटी तत्वावर चालवणे कामी फेरनिविदा मागविणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे राजे संभाजी उद्यान बिओटी तत्वावर चालवणेकामी फेरनिविदा मागविणेबाबत आलेला आहे. सदर कार्यालयीन अहवालाचे अवलोकन केले असता मे.गौरव मजूर सह सोसायटी,धुळे यांची निविदा प्राप्त झालेली होती. परंतू ते शासकीय सेवेत रूजू झालेले असल्याने त्याच्याकडुन काम काढून घेणेबाबत पत्र सादर केलेले आहे. तरी सदरची निविदा रद्द करून राजे संभाजी उद्यान बिओटी तत्वावर चालवणेकामी फेरनिविदा करणेस मान्यता देण्यात यावी. लवकरच आपण धुळेकर नागरीकांसाठी उद्यान खुले करणार आहेत याकामाबाबत तात्काळ फेरनिविदा मागविण्यात यावे.

म. रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.सदरबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६३ दिनांक १४/०९/२०२३

भागातील राजे संभाजी उद्यान बिओटी तत्वावर चालवणे कामी निविदा मागविण्यात आली होती. त्यात सर्वात जास्त दराची निविदा मे.गौरव मजुर सह सोसायटी,धुळे यांचे दर प्रती वर्ष रुपये २,६९,९९९/- मात्र असून एकुण ३ वर्षासाठीची रक्कम ही रुपये ८,०९,९९७/- एवढी असल्याने मे.गौरव मजुर सह सोसायटी,धुळे यांचे दर मंजुरी कामी सदरचा प्रस्ताव मे.स्थायी समिती समोर ठेवला असता मे.गौरव मजुर सह सोसायटी,धुळे यांचे दर मंजूर करण्यात आले होते.

तथापि मे.गौरव मजुर सह सोसायटी,धुळे यांनी पत्र देवून ते शासकीय सेवेत रुजू झाले असल्याने सदरची निविदा रद्द करणे बाबत विनंती केली आहे.त्यानुसार मे.गौरव मजुर सह सोसायटी, धुळे यांची बयाना रक्कम जप्त करून सदर कामाची नव्याने फेर ई-निविदा मागविणे कामी सदरचा प्रस्ताव मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून देवपूर भागांतील राजे संभाजी उद्यान बिओटी तत्वावर चालवणे कामी फेरनिविदा मागविणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रशासनामार्फत तात्काळ याबाबत कार्यवाही करावी.

सुचक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक:- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १६४ धुळे मनपा हद्दीतील खड्डे बुजविणे तसेच रस्ते व क्रॉस ड्रेनेज ची दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे बाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे सदरचा विषय हा मागील २ सभापासून तहकुब ठेवण्यात आलेला होता. मी मागे तहकुब करणेबाबत मत मांडलेले होते. मा.आयुक्त यांनी महासभेत निर्देश दिलेले होते की तहकुब झालेले विषय माझ्या निर्दशानास महासभा किंवा स्थायी समितीसमोर सादर करतांना विषय फेरसादर करू नये असे आदेशित केलेले होते. तरी देखील हा विषय पुन्श:च स्थायी समितीसमोर आलेला आहे. परंतू याबाबत लेखाविभागाचा अभिप्राय घेण्यात आलेले नाही. निविदा समितीमध्ये सदर प्रस्ताव न जाता आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. आयुक्तांचा अभिप्राय अंतिम असतो का लेखा विभागाचा आक्षेप असल्यास त्याबाबत विभागाची जबाबदारी असणार आहे. शहरातील खड्डे बुजविणे व रस्ते व क्रॉस ड्रेनेजची दुरूस्ती व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत टिपणी छोटी होती आता मोठी टिपणी सादर केलेली आहे. सदर टिपणीत सदरच्या खर्चास कोणत्या निधीतून देणार आहे याबाबत उल्लेख नाही. माझी विनंती आहे की धुळे शहरातील खड्डे बुजविणे अत्याआवश्यक बाब म्हणून खड्डे बुजविणे आवश्यक आहे. या कामासाठी जो कोणी ठेकेदार असेल त्याला पैसे हे मनपा निधीतून दिले गेले पाहिजे त्याव्यक्तीरिक्त कोणत्याही निधितून बिल देण्यात येवू नये. तसे जर नाही केलेस तर निविदातील अटी शर्तीचे स्थायी समिती उल्लघंन करत आहे असे लेखाआक्षेप येण्याची शक्यता नाकारता येत नाही. जे अत्यावश्यक आहे परंतू ते मोठया प्रमाणावर रस्ता दुरूस्तीचा विषय असेल व तो रस्ता जिल्हा नगरोत्थान योजना व अन्य निधीतून प्रस्तावित असेल तर सदर रस्ता त्या योजनेजून प्राधान्याने पुर्ण करावा.म्हणजे त्या रस्त्यावर होणाऱ्या खर्चाचा अपव्यय होणार नाही. सध्या सणसुदीचे दिवस आहेत. म्हणून तात्पुरता शहरातील रस्तावरील खड्डे तात्काळ बुजविण्यात यावे. जो रस्ता अत्यावश्यक आहे जनतेच्या हिताच्या दृष्टीने तो रस्ता आवश्यक असेल तर मनपाच्या निधीवर भार न पडता तो रस्त्याच्या निधीतून करण्यात यावे अशी मी तुम्हाला विनंती करतो. यापुर्वीच्या कार्यालयीन अहवालात बदल करून नविन अहवाल सादर केलेला आहे. परंतू सदरचा खर्च कोणत्या निधीतून करणार आहे हे टिपणीत नमूद नाही. बांधकाम विभागाकडुन अवाधानाने राहून गेले असेल. सदरचा खर्च कोणत्या निधीतून करणार आहे याबाबत बांधकाम विभागाकडून खुलासा घेण्यात यावा व त्यानुसार विषय मंजूर करावा.

म. रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म.विजय जाधव विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर काम अत्यावश्यक व गरजेचे असून खड्डे बुजविणेकामी मागविण्यात आलेल्या वार्षिक निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच याकामी होणारा खर्च हा मनपा निधीतूनच करण्यात यावा

अन्य कोणत्याही निधीतून करण्यात येवू नये व सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दानुसार नेटवर्क कंपनीने अदा केलेल्या रक्कमेतून सदरचे देयके अदा न करता मनपा निधीतून देयके अदा करण्यात यावी. तथापी अन्य निधीतून देयके अदा करावयाचे असल्यास स्थायी समितीची मंजूरी घेण्यात यावी. तसेच प्रस्तावातील आक्षेपांची पुर्तता करून आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने कारवाई करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६४ दिनांक १४/०९/२०२३

धुळे मनपा हद्दीतील खड्डे बुजविणे तसेच रस्ते व क्रॉस ड्रेनेज ची दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. २२२ दि.१०/११/२०२२ म. आयुक्त सो., धुळे महानगरपालिका यांच्या कडील दि. २८/१०/२०२२ रोजीच्या टिपणी मंजुरीने उक्त कामाच्या खर्चास ०१ वर्षा साठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४०१/२०-२०२१ दिनांक २५/११/२०२३ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/ १३४/२०२२-२३ दि. ०३/०२/२०२३ अन्वये दि.०४/०२/२०२३ रोजी दैनिक आपला महाराष्ट्र / नवराष्ट्र या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२१/०१/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	गायत्री कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी
२	एकविरा कन्सट्रक्शन	शे.२% जास्तीने	
३	ऋषभ सतिष खिवसरा	शे.३% जास्तीने	

व

रील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे गायत्री कन्सट्रक्शन** यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे गायत्री कन्सट्रक्शन** सदर काम **अंदाजपत्रकीय दराने** आलेले असल्याने यांच्या दरास मान्यतेसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर.

मे.स्थायी समिती ठराव नं. ८७ दि. ०१/०६/२०२३ नुसार सदरचा विषय बाबत माहिती घेवून कामाच्या आवश्यकते बाबत चर्चा करण्यात येईल तोपावेतो प्रस्ताव तहकूब ठेवण्य बाबत मंजुरी दिलेली होती.

त्यानुसार सदर विषया बाबत मे.महासभेत चर्चा करण्यात आली. सदरचा विषय हा आवश्यक असल्याने पुन्हा मे. स्थायी समिती समोर ठेवण्यात आलेला होता. परंतु मे.स्थायी समिती ठराव नं. १३२ दि.०३/०८/२०२३ रोजी पुन्हा शहरातील प्रस्तावित रस्ते वगळून

असलेल्या खड्ड्या बाबतची माहिती सादर करणे बाबत आदेशित करण्यात आलेले होते. त्यानुसार शहरात प्रस्तावित रस्त्या व्यतिरिक्त खालील मुख्य मार्गावर खड्डे आहेत.

१) १०० फुटी रस्ता मालेगाव रोड ते ४० गाव रोड ते वडजाई रोड ते बायपास हायवे पावेतो
२) ८० फुटी रोड रेल्वे स्टेशन रस्ता ते अग्रसेन पुतळा ते डॉ. खोपडे हॉस्पिटल ते वडजाई रोड ते ८० फुटी रोड
३) डॉ. जे.के. ठाकरे ते खोपडे यांच्या मंगल कार्यालया पावेतो
४) गल्ली नं. ०१ ते ०७ मुख्य बाजार पेठ मधील जोड रस्ते वरील खड्डे
५) देवपूर भागातील मुख्य रस्त्यावरील खड्डे

म.प्रधान सचिव , नगरविकास विभाग , मंत्रालय , मुंबई ४०० ०३२ यांच्या कडील पत्र क्र. अर्ध शा. पत्र क्र. न्यायाप्र- २०१९ / प्र.क्र. २३३ / नवि- २० दिनांक ११ ऑगस्ट , २०२३ रोजीच्या पत्रानुसार खालील दोन मुद्यांची माहितीची विचारणा केली आहे.

१) रस्त्यावरील खड्डया बाबत व ना दुरुस्ती बाबत नगरविकास विभागा कडून मा. न्यायालयास सादर होणारे सर्व महापालिकांचे त्रैमासिक अहवाल काही महानगरपालिका कडून नियमितपणे न्यायालयास प्राप्त होत नाहीत. त्यामुळे मा. न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. यास अनुसरून आपल्या महानगरपालिके संदर्भातील अचूक व नियमितपणे त्रैमासिक अहवाल शासनास पाठविण्या बाबत दक्षता घेण्यात यावी. आपल्या महानगरपालिके सबंधित माहिती विहित कालावधीत नियमितपणे शासनास सादर न करणाऱ्या संबंधितां विरुद्ध कारवाई करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत.
२) मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने रस्त्यावरील खड्डे व ना- दुरुस्ती संदर्भात कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने दि.१८/०८/२०१८ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने महानगरपालिके कडून अद्यापपर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाही बाबतचा कार्यपालन अहवाल प्रतिज्ञापत्राद्वारे मा. न्यायालयास सादर करावयाच्या असल्याने प्रस्तुत परिपत्रकाच्या अनुषंगाने आपल्या महानगरपालिके संदर्भातील मुद्दे निहाय कार्यपालन अहवाल दि. ०५/०९/२०२३ पर्यंत शासनास सादर करावा असे कळविण्यात आलेले आहे.

उक्त बाबत धुळे शहरात वेळोवेळी महाराष्ट्र राज्य येथील मंत्री महोदय यांचे दौरे होत असतात त्यावेळी त्यांच्या दौरा निश्चित झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती तात्काळ करणे बाबत वरिष्ठांचा आदेश प्राप्त होत असतात. त्यानुसार खड्डे बुजविणेचे काम तातडीने करावे लागते.

तसेच सध्यस्थितीत श्री.गणेश उत्सव काळात शहरातील मुख्य मंडळांचा आजूबाजूचे व श्री.गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान असलेले रस्त्यावरील खड्डे , दसरा सण , रथयात्रा , दिवाळी सण व दुर्गा उत्सव तसेच रमजान ईद इत्यादी सणांच्या वेळेस सुद्धा खड्डे बुजविणे बाबत सन्मा. सदस्य यांची मागणी होत असते.

कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलिस प्रशासना कडूनही या संदर्भात वेळोवेळी मुख्य मार्गावरील खड्डे बुजविणे बाबत कळविणेत येते. खड्डे दुरुस्तीची प्रक्रिया ही सातत्याने सुरु

राहणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे दर मागविणेत आलेले आहेत. खड्डे दुरुस्ती बाबत आपत्कालीन कार्यवाही दर वेळी वरिष्ठांच्या आदेशानुसार प्रस्तावित करणेत येते. वार्षिक दर मान्यता झाल्यास एकाच ठेकेदारा कडुन आपत्कालीन परिस्थितीत खड्डे दुरुस्तीचे काम करणे शक्य होणार आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे. गायत्री कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या वार्षिक निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच याकामी होणारा खर्च हा मनपा निधीतूनच करण्यात यावा अन्य कोणत्याही निधीतून करण्यात येवू नये. तथापी अन्य निधीतून देयके अदा करावयाचे असल्यास स्थायी समितीची मंजूरी घेण्यात यावी. सदर प्रस्वात असलेल्या आक्षेपांची पुर्तता करून म.आयुक्त यांच्या मान्यतेने कारवाई करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री.ठाकरे रंगनाथ रतन

अनुमोदक:- श्री.जाधव विजय बापू

सर्वानुमते मंजूर
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १६५ महानगरपालिका नंदी रोड दवाखाना येथे मॅटर्निटी होम करीता एकत्रित करार पध्दतीने मानधन तत्वावर वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे मानधावरील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना मुदत वाढ देण्याचा विषय आलेला आहे. या कर्मचा-यांचा पगारावर वार्षिक किती खर्च येणार आहे. त्याच्या पगाराची अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे का मनपाच्या अधिनियमात कलम ५३ (३)नुसार खर्चाची मर्यादा ठरवून दिलेली आहे. त्यानुसार याबाबत खुलासा करण्यात यावा.

म. उपायुक्त सार्वजनिक शौचालयाचा देखभाल दुरूस्तीचा प्रस्ताव तयार झालेला आहे त्यावर आयुक्त महोदयांची सही झालेली आहे. पुढील स्थायी समितीच्या समोर मान्यतेसाठी सादर करणार आहोत. मानधनावरील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचा-यांना मागेच्या आदेशानुसार त्यांची मुदत संपत असल्याने मुदतवाढीचा प्रस्ताव आस्थापना विभागाने सादर केलेला आहे. त्यानुसार त्यांना मुदत वाढ देण्याचा विषय आलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांच्या पगारावर साधारता ९० हजार रूपये महिन्याला येणार आहे. लेखाविभागाचे अभिप्रायानुसार त्यांचा पगार हा मनपा निधीतूनच करण्यात येत असतो. माझ्या माहितीप्रमाणे त्याच्या पगारावर आजपर्यंत कोणतेही अनुदान आलेले नाही. याबाबत अधिक माहिती घेवून तुम्हाला कळवितो.

म. अन्सारी वसीम सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. कल्याणी अंपळकर विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६५ दिनांक १४/०९/२०२३

आरोग्य विभागाकडील एकत्रित मानधनावरील वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना पुढील ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणेबाबत ठराव पारीत झालेला होता. वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना पुढील ६ महिनेकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देण्यात आली होती. त्यानुसार त्यांची खालील प्रमाणे नवीन नियुक्तीची मुदत संपुष्ठात आलेली आहे.

हुद्दा	कर्मचा-याचे नाव	पदनाम	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रुपये
१	डॉ. पिंगला देसाई	वैदय. अधिकारी	२४/८/२०२३	६०,०००/-
२	श्री. संकेत जैतपुरे	औषध निर्माता	२४/८/२०२३	१५,७००/-
३	श्री.इमरान शेख इब्राहिम अत्तार	फीटर	२४/८/२०२३	१४,०००/-

वरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उक्त मानधनावरील वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे.स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे निर्णयासाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार नवीन नियुक्ती देणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.अन्सारी वसीम खलील

अनुमोदक :- श्री.अंपळकर कल्याणी सतिष

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २६ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह

शुक्रवार दिनांक २२/०९/२०२३

वेळ :- दुपारी ४.०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२६ आज शुक्रवार दिनांक **२२/०९/२०२३** रोजी **दुपारी ४-०० वाजता** सौ. किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१२	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
१३	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या
१४	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. विजय रघुनाथ सनेर	उपायुक्त
२	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
३	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
४	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
५	श्री.कैलास शिंदे	अभियंता
६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव

७	श्री.डॉ.एम.आर.शेख	आरोग्याधिकारी
८	श्री.गितेश सानोर	कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग
९	श्री.चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
१३	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१४	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१५	श्री.के.डी.सावळे	लिपीक,आस्थापना विभाग
१६	श्री.शिरिष जाधव	मालमत्ता अधिक्षक
१७	श्री.हेमंत पावटे	कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग
१८	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१९	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२०	श्री. राजेश गायकवाड	वरीष्ठ लेखापाल , मनपा शिक्षण मंडळ

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.अति.आयुक्त व उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरूवातील सन्मा.सदस्यांकडून श्रध्दांजलीची यादी सादर झालेली आहे.

धुळे महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६ चे नगरसेवक व स्थायी समिती सदस्य स्व.किरण हरिशचंद्र अहिरराव हे दिनांक १८/०९/२०२३ नाशिक कडून धुळेकडे येत असतांना वडाळी भोई येथे कंटेनरच्या भीषण अपघातात डोक्याला मार लागल्याने त्यांचे दुदैवी दु:खद निधन झालेले आहे. त्यांच्या समवेत तीन्ही सहकारी देखील या अपघातात मृत्य पावलेले आहे.

त्याच्या दु:खद निधनाने धुळे महानगरपालिकेचे एक हसमुख व हुन्नेरी व्यक्तीमत्व आज काळाच्या आड गेलेले आहे. प्रभागातील नागरीकांचे मुलभूत सेवा-सुविधांची प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहून प्रशासनाच्या माध्यमातून न्याय मिळवून देणारे आज आपल्यात नाही. त्यांच्या दु:खात आम्ही सर्व स्थायी समिती सदस्य अहिरराव परिवारासोबत आहोत. अहिरराव परिवारावर फार मोठा दुखाचा डोंगर कोसळला आहे हे दुख सहन करण्याची शक्ती सर्व शक्तीमान परमेश्वर त्यांच्या कुटूंबाला देवो.

सन्मा.सभापती सौ.किरणताई राकेश कुलेवार यांनी ही या दुदैर्वी व दु:खद घटनेबाबत शोक व्यक्त करून सहवेदना सभागृहात प्रकट केल्या.

आज रोजीच्या स्थायी समिती सभेत त्यांना श्रध्दांजली वाहण्यात येवून तसा श्रध्दांजलीचा ठराव पारीत करण्यात यावा हि विनंती.

सुचक:- सौ.किरण राकेश कुलेवार, सभापती, स्थायी समिती

अनुमोदक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे, श्री.नरेंद्र रूपला चौधरी

श्री.खान मो. साबीर महिबुल्लाह श्री.दगडू भिमा बागुल

श्री.विजय बापू जाधव श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन
सौ.सुरेखा चंद्रकांत उगले, सौ. वंदना विक्रम थोरात
श्री.वसीम खलील अन्सारी श्री.अन्सारी अब्दुल लतीफ
श्री.पठाण नाजीयाबानो नासीरखा श्रीमती अन्सारी फातमाबी नुरूल अमीन

म. सभापती सन्मा. सदस्यांनी श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६६ दिनांक २२/०९/२०२३

धुळे महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६ चे नगरसेवक व स्थायी समिती सदस्य स्व.किरण हरिशचंद्र अहिरराव हे दिनांक १८/०९/२०२३ नाशिक कडून धुळेकडे येत असतांना वडाळी भोई येथे कंटेनरच्या भीषण अपघातात डोक्याला मार लागल्याने त्यांचे दुदैवी दु:खद निधन झालेले आहे. त्यांच्या समवेत तीन्ही सहकारी देखील या अपघातात मृत्य पावलेले आहे.

त्याच्या दु:खद निधनाने धुळे महानगरपालिकेचे एक हसमुख व हुन्नेरी व्यक्तीमत्व आज काळाच्या आड गेलेले आहे. प्रभागातील नागरीकांचे मुलभूत सेवा-सुविधांची प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहून प्रशासनाच्या माध्यमातून न्याय मिळवून देणारे आज आपल्यात नाही. त्यांच्या दु:खात आम्ही सर्व स्थायी समिती सदस्य अहिरराव परिवारासोबत आहोत. अहिरराव परिवारावर फार मोठा दुखाचा डोंगर कोसळला आहे हे दुख सहन करण्याची शक्ती सर्व शक्तीमान परमेश्वर त्यांच्या कुटूंबाला देवो.

धुळे मनपाचे व स्थायी समिती सदस्य स्व.किरण अहिरराव यांच्या दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून या दु:खद निधन निमित्त त्यांचे आत्मास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सभेच्या सुरूवातील सन्मा.सदस्यांकडून अभिनंदनाची यादी सादर झालेली आहे.

सन्मा.सदस्य श्री.सुनिल बैसाणे यांनी पत्र सादर करून अभिनंदनाचा ठराव करणेबाबत विनंती केलेली आहे यात नमूद केलेले आहे की, सद्या दिल्लीमध्ये लोकसभेचे अधिवेशन सुरू आहे. या लोकसभेच्या अधिवेशनमध्ये देशातील महिलांन सबळीकरण व शक्तीकरण तसेच लोकशाही मजबूत करण्यासाठी देशाचे लाडके पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी साहेब यांच्या नेतुत्वाखाली कायदामंत्री मा.श्री. अर्जुनकुमार मेघवाल साहेब यांनी यांनी महिलांना राजकीय क्षेत्रात आरक्षण मिळण्याकामी नवीन संसद भवनमध्ये ऐतिहासिक "नारीशक्ती वंदन विधेयक २०२३ बील सादर करण्यात आले व बहुमताने सदर विधेयक मंजूर करण्यात आले. महिला आरक्षणासाठी सदर विधेयक हे राज्यघटनेत १२८ वी घटनादुरुस्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे लोकसभा व राज्यांच्या विधानसभ ३३ टक्के आरक्षण विधेयक लागू झाल्यावर देशातील सर्व महिलांचा सन्मान होणार आहे. तसेच हे विधेयकाचा लाभ हा

देशातील तमाम दलित-आदिवासी, अल्पसंख्याक त्याचप्रमाणे मागासवर्गीय सर्व जाती धर्मातील पंथातील महिलांना होणार आहे. जे अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित आहे. यासर्व महिला देशाच्या मुख्य प्रवाहात येणार आहे. भारतीय जनता पक्ष नेहमी गोरगरीब जनतेच्या न्याय हक्कासाठी काम करीत आहे. त्याप्रमाणे भारतीय जनता पक्षाचे ब्रीदवाक्य हे "सबका साथ सबका विकास" हे आहे. ब्रीदवाक्यनुसार देशातील शेवटच्या तळागळातील व्यक्तीपर्यंत न्याय देणार आहे.

यामध्ये महिलांना राजकीय क्षेत्रामध्ये आरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. महाराष्ट्र राज्य नेहमी देशांसाठी इंजिन ठरले आहे. यामध्ये प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ग्रामपंचायत पासून ते महानगरपालिकांमध्ये राजकीय क्षेत्रात महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्रमध्ये अनेक जिल्हा परिषद अध्यक्ष, नगरपालिका अध्यक्ष व महानगरपालिकेतील महापौर तसेच अनेक इतर पदावर महिलांनी काम केले आहे.

त्याचप्रमाणे प्रामुखाने आपल्या धुळे महानगरपालिकेतील सर्व सन्मा.पदाधिकारी व सन्मा. अधिकारी महिला भगिनी आहे. यासर्व महिला भगिनी आपल्या शहरात उत्तम प्रकारे काम करीत आहे. हे भविष्यात देशाला दिशादर्शक ठरणार आहे हे आमच्या भारतीय जनता पार्टीने आपल्या ब्रीदवाक्यातून दाखवून दिले आहे.

तसेच या धुळे जिल्हाने मा.महापौर मा. जिल्हा परिषद अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी मा. आयुक्त मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तसेच प्रमुख जिल्हा न्यायाधीश या महिलांनी आपल्या शहरामध्ये आपल्या क्षेत्रात कामाचा ठसा दाखवला आहे. या देशाने जगाला महिलांच्या रूपाने पंतप्रधान, राष्ट्रपती व मुख्यमंत्री दिले आहे. यांचे सर्व श्रेय भारतीय लोकशाही अर्थात हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते.

सन १९४९ मध्ये भारताचे पहिले कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील स्त्रियांना समान अधिकार मिळण्याकामी हिंदू कोड बिल संसदेत मांडले होते. "हिंदू कोड बिल" (हिंदू संहिता विधेयक) हे भारतातील कायद्याचा मसुदा होता. हा मसुदा २४ फेब्रुवारी १९४९ संसदेत मांडला गेला. स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या भारतातील सर्व जाती-धर्मातील स्त्रियांना जाचक रुढी आणि परंपरांपासून सुटका मिळावी यासाठी हा मसुदा लिहिला. डॉ. आंबेडकरांनी ४ वर्षे १ महिना आणि २६ दिवस यावर काम करून हे "हिंदू कोड बिल" तयार केले. हे बिल इ.स. १९४७ पासून ते फेब्रुवारी १९४९ रोजी संसदेत मांडले. हा मसुदा सात वेगवेगळ्या घटकांशी निगडित कायद्याचे कलमात रूपांतर करू पाहत होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रख्यात वकील होते. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून त्यांनी हिंदू कोड बिलावर सुमारे ३ वर्ष काम केले. त्यांना वाटत होते की जाति व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कमी लेखले जात आहे. त्यासाठी हिंदू कोड बिल असे बनवले पाहिजे ज्यामुळे देशातील सर्व स्त्रियांना समान अधिकार प्राप्त होतील.

तथापी त्यावेळेस संसदेमध्ये "हिंदू कोड बिल पास होऊ शकले नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला होता. त्यावेळेस जर महिलांना राजकीय आरक्षण मिळाले असते तर महिलांचे सबळीकरन व शक्तीकरण तसेच आपली राज्य घटनेत अभिप्रेत मजबूत लोकशाही आज मोठया प्रमाणावर झाले असते. सबब आज भविष्यातील दूरदृष्टी ठेवून देशाचे

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजीसाहेब यांनी लोकसभेत "नारीशक्ती वंदन विधेयक २०२३" बिल बहुमताने पारित करण्यात आले. त्याअर्थी मे.स्थायी समितीमध्ये देशाचे लाडके पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीसाहेब यांचा अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात यावा हि विनंती.

तसेच सन्मा.सदस्या सौ.सुरेखा चंद्रकांत उगले यांनी पत्र सादर केलेले आहे की, भारताचे यशस्वी पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात नविन संसद भवनात विशेष अधिवेशनात **नारी शक्ती वंदन विधेयक-२०२३ (महिला आरक्षण विधायक)** लोकसभा व राज्यसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आलेले आहे. हा महिलांसाठी गौरवाचा क्षण असून तो देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिला जाणार आहे. या विधायकात महिलांना लोकसभा आणि विधानसभामध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणजे लोकसभेत ५४५ सीटपैकी १८० सीट हे महिलांसाठी आरक्षित राहणार आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला आपला कार्य कर्तत्वाचा ठोसा उमटवीत आहे या विधेयकांने महिलाचे सक्षमीकरण अधिक मजबूत होणार आहे.

नारी शक्ती वंदन विधेयक -२०२३ (महिला आरक्षण विधायक) लोकसभेत व राज्यसभेत सर्वानुमते मंजूर केल्याबद्दल भारताचे कार्यकुशल व दुरदृष्टी नेतृत्व असलेले पंतप्रधान आदरणीय श्री.नरेंद्रजी मोदी साहेबांचे अभिनंदनाचा ठराव आज रोजीच्या स्थायी समिती पारीत करण्यात यावा हि विनंती.

सुचक:- सौ.किरण राकेश कुलेवार,सभापती, स्थायी समिती

अनुमोदक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे सौ. सुरेखा चंद्रकांत उगले

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६७ दिनांक २२/०९/२०२३

भारताचे यशस्वी पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात नविन संसद भवनात विशेष अधिवेशनात **नारी शक्ती वंदन विधेयक-२०२३ (महिला आरक्षण विधायक)** लोकसभा व राज्यसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आलेले आहे. हा महिलांसाठी गौरवाचा क्षण असून तो देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिला जाणार आहे. या विधायकात महिलांना लोकसभा आणि विधानसभामध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणजे लोकसभेत ५४५ सीटपैकी १८० सीट हे महिलांसाठी आरक्षित राहणार आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला आपला कार्य कर्तत्वाचा ठोसा उमटवीत आहे या विधेयकांने महिलाचे सक्षमीकरण अधिक मजबूत होणार आहे.

नारी शक्ती वंदन विधेयक -२०२३ (महिला आरक्षण विधायक) लोकसभेत व राज्यसभेत सर्वानुमते मंजूर केल्याबद्दल भारताचे कार्यकुशल व दुरदृष्टी नेतृत्व असलेले पंतप्रधान आदरणीय श्री.नरेंद्रजी मोदी साहेबांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१६६ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं २३ दि. ३१/०८/२०२३)

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — मागणी स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.कल्याणी अंपळकर — मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६८ दिनांक २२/०९/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.२३ दिनांक ३१/०८/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १४४ ते १४८ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१६७ — मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.१३ मध्ये म्युनिसिपल कॉलनी व प्रवीण किराणा संपूर्ण भागात काँक्रीट रस्ता व गटार करणे बाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. खान मो.साबीर — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. वसीम अन्सारी — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६९ दिनांक २२/०९/२०२३

मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.१३ मध्ये म्युनिसिपल कॉलनी व प्रवीण किराणा संपूर्ण भागात काँक्रीट रस्ता व गटार करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१९/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**२९,९५,१३०/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४१२/२० दि.२९/११/२०२२ अन्वये रक्कम रु. **२९,९५,१३०/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत दैनिक पथदर्शी /सकाळ या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२१/०६/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.अे.के.सैफी	शे.१.०० % जास्त	
२	श्री.सौरभ संजय कदमबांडे	शे.२.०० % जास्त	

३	श्री.अमोल अरविंद बोरसे	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.अमोल अरविंद बोरसे** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **रू. २९,९५,१३०/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.अमोल अरविंद बोरसे** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम धरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.अमोल अरविंद बोरसे** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत सादर. तसेच प्रकरण दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर सादर करणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.अमोल अरविंद बोरसे** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.खान मो.माहिबुल्लाह साबीर

अनुमोदक :- श्री.अन्सारी वसीम खलील

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१६८ मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२ अन्सार नगर फायनल स.नं.३६४ पैकी प्लॉट नं.८४ येथे जलकुंभ बांधणेबाबत निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नाजीया बानो सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. अब्दुल लतीफ विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७० दिनांक २२/०९/२०२३

मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२ अन्सार नगर फायनल स.नं.३६४ पैकी प्लॉट नं.८४ येथे जलकुंभ बांधणेबाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.१९/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**१,२७,५५,५३७/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२१८१/२० दि.२२/०९/२०२२ अन्वये रक्कम रु. **१,२७,५५,५३७/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका दैनिक पथदर्शी /सकाळ या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०६/०६/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन	शे.२.०० % जास्त	
२	फहाद मिर्झा	शे.५.०० % जास्त	
३	शाहीद अली शाह	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **शाहिद अली शाह** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे रू.**१,२७,५५,५३७/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **शाहीद अली शाह** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **शाहीद अली शाह** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत सादर. तसेच प्रकरण दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर सादर करणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **शाहीद अली शाह** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती नाजीया बानो नासीरखा पठाण

अनुमोदक :- श्री.अब्दुल लतीफ अब्दुल करीम शेख

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १६९ धुळे महानगरपालिका हद्दीतील १३५ युनिट सामुदायीक शौचालय देखभाल दुरुस्ती करीता निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे आज सभागृहात आल्यानंतर मनापासून दु:ख व यातना होत आहे. आपल्या परिवारातला माणूस आपल्यात नाही या सभागृहात येतांनाच भावना विवश झालो होतो. आमचे लहान बंधू किरण अहिरराव हा नेहमी ११ हद्दवाढ गावांबाबत भूमिका मांडाणे मी त्याची समजूत काढायचो. ही उणीव न भरणारी आहे. सार्वजनिक शौचाला देखभाल दुरूस्तीबाबत आलेल्या प्रस्तावावर प्रशासनाने खुलासा करावा.

म.उपायुक्त आपण धुळे मनपा हद्दीतील १३५ युनिट सामुदायिक शौचालय १३ संस्थांच्या माध्यमांतून देखभाल दुरुस्तीचे कामकाज करतो. परंतु त्यांनी जून महिन्यापासून काम बंद केले त्या अनुषंगाने शहरातील सार्वजनिक शौचालयावर देखभाल दुरुस्तीचा दुष्यपरिणाम दिसायला लागल्यामुळे शहरात रोगराई चे प्रमाण वाढू नये म्हणून त्या दृष्टीकोनातून तातडीची निविदा प्रसिध्द केली. त्यामध्ये ४ निविदाधारकांनी भाग घेतला. जे पूर्वीचे निविदाधारक होते त्यांनी ही त्यात भाग घेतला ज्या कागदपत्रांची आपण मागणी केली होती त्या सगळयांची पूर्तता करुन आयुक्त स्तरावर निर्णय करुन, कार्यालयीन प्रोसिजर पूर्ण करुन कमी दराचा निविदाधारक श्री चंद्रगणेश एंटरप्राईजेस, धुळे या संस्थेने प्रति युनिट प्रति महिना जे १३५ युनिट आहे. त्या ६१२० हा कमीत कमी तुलनात्मक दर आल्यामुळे आपण ही निविदा स्थायी समितीपुढे सादर केली आहे. या विषयाला मान्यता व्हावी. अशी विनंती करतो.

म.सुनिल बैसाणे या विषयामध्ये आपण सदरचा ठेका १ वर्षासाठी देत आहोत. या एक वर्षाच्या ठेक्या मध्ये यांच्या कामाची तुलना करुन पुढे मुदतवाढ द्यावी. किंवा काम करण्यासाठी संधी द्यावी. किंवा कसे? माझ्या विचाराधीन असलेल्या ज्या काही गोष्टी आहे त्यात सदरच्या ठेक्यामध्ये ज्या काही अटी शती शर्ती आहे त्यांचे पालन केले पाहिजे. हा ठेकेदार दिवसातून किती वेळा स्वच्छता करणार आहे? स्वच्छता मनुष्यबळाने करणा किंवा मशिनद्वारे करणार आहे. याबाबत देखील अटी शर्ती मध्ये उल्लेख करणे गरजेचे आहे. ठेकेदारावर नियंत्रण करण्यासाठी जे स्वच्छता निरिक्षक असतात. त्या पध्दतीचा विचार केला पाहिजे. ठेक्याच्या अटी शर्ती मध्ये किरकोळ दुरुस्ती आहे. त्या मनपा स्तरावरुन करणार किंवा ठेकेदाराच्या माध्यमातून करणार आहे? याबाबत खुलासा करणे क्रमप्राप्त आहे. सभापती महोदया सर्वात महत्वाची गोष्ट यापूर्वीच्या ठेकेदाराचे विद्युतचे बिले बाकी होते. ते बिले अदा केले आहे किंवा कसे? याबाबत खुलासा टिपनीत दिसून येत नाही. कामासाठी ठेका दिला तसेच मागील पूर्तता करणे क्रमप्राप्त आहे. त्यावर उपाययोजना कशापध्दतीने करणार? याचा या ठिकाणी कुठेही उल्लेख नाही. या ठेकेदाराने शासनाच्या दरापेक्षा कमी दराने निविदा भरली आहे. शासनाच्या दरापेक्षा कमी दराने भरले असेल तर सदरच्या ठेकेदाराला येणाऱ्या काळात अडचणी येणाची शक्यता नाकारता येत नाही. व अडचणी येत असतील तर आपण आपल्या स्तरावरुन त्याला सुचित करु शकतो. किंवा ठेकेदार नविन आहे असे दिसून येते. याबाबत कायदेशीर बाबीबाबत निविदा समितीची जबाबदारी प्रशासनाची असले. २-३ महिन्यात सदस्यांचा कार्यकाळ संपणार आहे.

कार्यकाळ संपल्यावर पुढे निवडणूका होता किंवा नाही हे सांगणे अवघड आहे. मनपावर प्रशासक असतांना त्यांनी याबाबत असे सांगता कामा नये की, स्थायीच्या बैठकीत असा विषय आला होता. व मंजूर झाला आणि ठेकेदार काम करु शकतो किंवा नाही याबाबत प्रश्न उपस्थित होऊ शकतो. तसेच या विषयात ११ गावांचा समावेश केला आहे किंवा नाही? जर समावेश नसेल तर त्या ११ गावांवर अन्याय होणार आहे. ११ गावांचा समावेश यात झाला पाहिजे. अमृत योजना व माझी वसुंधरा याचे मानांकन येत असते. या सर्व गोष्टी बघणे गरजेचे आहे. याची देयके कशामधून दिली जाणार आहे. याआधी देयके १४ व्या वित्त आयोगातून देण्यात येत होतो. मनपाची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे. येणाऱ्या काळात आपण मागील ठेकेदारांना बिले अदा करु शकलो नाहीत. म्हणून मागील ठेकेदाराने काम बंद केले. मागील ठेकेदाराचा करारनामा तो रद्द केला आहे किंवा नाही याचा विचार व्हावा. उद्या जर तो ठेकेदार न्यायालयात गेला न्यायालयीन प्रक्रीयेत वाद निर्माण झाला त्याची झळ तुम्ही नागरिकांना देणार का? प्रशासनाला या गोष्टीची सर्व कल्पना आहे. मागील ठेकेदाराने काय काम केले याचा खुलासा देखील झाला पाहिजे. करारनामा रद्द नसेल आणि ही निविदा प्रक्रीया केली ही कायदेशिर नसेल याची सर्वस्वी जबाबदारी निविदा समितीची असेल. स्थायी समितीची नसेल. बिल अदा केले नाही. म्हणून काम बंद होणार नाही यासाठी सुध्दा तजविज करणे गरजेचे आहे. सभापती महोदया हे काम कमी दराचे आहे. याचा करारनामा यासारख्या गोष्टी करणे सर्व जबाबदारी तुमची आहे. मागील ठेकेदाराचा न्यायालयीन वाद निर्माण होणा नाही याची जबाबदारी प्रशासनाची आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुन मंजूरी देणे गरजेचे आहे. धुळेकर नागरिकांना या शौचालयाच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करुन द्याव्या. अशी विनंती करतो. कायदेशिर बाबी तपासून घेणं गरजेचे आहे. धुळे मनपाच्या इतिहासात हे पहिल्यांदा होत आहे. ७०१५ रु शासकीय दर असतांना आणि ६१२० रु हे ठेकेदाराचे दर आहे. यात मनपाची देखील आर्थिक बचत होणार आहे. म्हणून ठेकेदाराला प्रशासनाच्या माध्यमातून जास्त त्रास न देता काम द्यावे. मला अशी माहिती मिळाली आहे. हा ठेकेदार काम करणार नाही असे प्रशासकीय लेव्हलला सांगण्यात येत आहे. जर तो काम चांगल्या पध्दतीने करत असेल तर त्याला सहकार्य करा. उगाच काहीतरी कागदोपत्री प्रश्न उपस्थित करुन त्रास देऊ नये. ठेकेदार कोणाच्या नातेवाईक नाही हा फक्त कमी निविदा दर आल्यामुळे ही मंजूरी देत आहोत. सभापती महोदया वॉटरग्रेसच्या वेळी असाच दर कमी होता. वेगवेगळया कारणाने बिल वाढीव द्यायचे असे होता कामा नये. हा ठेका फक्त १ वर्षासाठी आहे. ठेकेदार चांगले काम करत असेल तर त्याच्या कामाच्या दर्जा बघून ६ महिन्यांनी त्याच्या कामाची सुधारणा पाहून टप्प्या टप्प्याने मुदतवाढ देता येत असेल व कुठल्याही अटी शर्तीचे उल्लंघन न होता त्या पध्दतीने ठराव पारित करावा ही विनंती करतो.

म.सभापती — सनेर साहेब सन्मा. सदस्या ज्या सूचना मांडत आहे त्यांचा खुलासा करावाच परंतु सर्व शाहनिशा करुनच या विषयामध्ये लक्ष द्यावे. काम बंद पडता कामा नये नागरिकांच्या बऱ्याच समस्या आल्या आहे.

म.साबिर खान — या विषयावर सन्मा. सदस्य सुनिल भाऊंनी चांगले मुद्दे मांडले. परंतु या निविदा प्रक्रीयेतील L२ सेवा फाउंडेशन पुणे व L३ आस्था स्वयंरोजगार सेवा सह. संस्था या दोन एजन्सी मनमानी करतात. आपण यांच मागील अनुभव पाहिलाच आहे. आस्था संस्थेचा विषय मंत्रालय स्तरापर्यंत गेला होता. या दोन्ही संस्था ब्लॅकलिस्ट करण्यासारख्या आहे. यांना हा ठेका देता कामा नये.

म.हर्षकुमार रेलन — हा विषय सभागृहात येऊन मंजूरी देणं गरजेचे होते. मागील ठेका आपण रद्द केला करण आपण त्याला वेळेवर पैसे देऊ शकलो नाही. आणि ठेकेदाराने काम बंद केले. मागील बैठकीत पथदिव्यांच्या बाबतीत असाच प्रश्न निर्माण झाला होता. पथदिव्यांचा देखभाल दुरुस्तीचा ठेकेदाराने कमी दर भरला होता. त्याला परवडत नाही म्हणून शहर अंधारात आहे. आता शौचालयाच्या ठेक्याचे दर ठेकेदाराने कमी भरले आहे. आपली परिस्थिती हालाखीची आहे. पुन्हा तीच परिस्थिती व्हायला नको लोकांचा आरोग्याचा प्रश्न आहे. यावर जबाबदरी निश्चीत करा. आपण त्याला टेंडर देतच आहोत पण ठेकेदाराकडे सक्षम यंत्रणा आहे का?

म.उपायुक्त — किरकोळ दुरुस्ती असेल तर आपण ठेकेदाराकडून करुन घेऊ. जेथे मेजर समस्या असेल मनपा आपल्या स्तरावर मदत करेल. प्रशासनाची जबाबदारीच्या बाबत निविदा समितीने शिफारस केली आहे. मागील ठेका रद्द करण्याबाबत लीगल प्रोसिजर सुरु आहे. एल२ व एल३ या एजन्सींना ब्लॅकलिस्टेड केलेले नाही. आस्था संस्थेच्या बाबतीत त्यांच्याकडे जो मेजर खर्च घेणं बाकी आहे. ते आपण वजा करणार आहोत. आपण १३५ युनिट प्रमाणे निविदा काढली आहे. सेवा फाउंडेशन व आस्था हया ब्लॅकलिस्टेड होणारच आहे. त्यासाठी लिगल प्रोसिजर अनुसरुन ती होणार आहे. लाईटच्या बाबत ठेकेदाराकडून मटेरियल प्राप्त झाले आहे. त्यात आपल्याला थोडया संयमाने जावे लागणार आहे. पुढच्या आठ दिवसात बऱ्याचशा दुरुस्तया होतील ठेकेदाराला टप्प्या टप्प्याने बिल देण्याचे अश्वासन झाले आहे.

म.नरेंद्र चौधरी — सदर विषयाला मंजूरी देण्यात यावी.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार आलेल्या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, याबाबत कायदेशिर बाबी तपासून घेण्यात याव्यात याबाबत आवश्यक तो करारनामा करणे व अनुषांगीक बाबींची जबाबदारी प्रशासनाची राहिल. नागरिकांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही याची जबाबदारी प्रशासनाची राहिल. संबंधीत ठेकेदाराचे काम समाधान कारक असल्यास त्यांना नैसर्गिक दरवाढ देवून मुदतवाढ देण्यात यावी. सन्मा. सदस्य साबिर खान तसेच वसीम बारी यांचा विरोध नोंदवून विषयाला मंजूरी देणेत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७१ दिनांक २२/०९/२०२३

धुळे महानगरपालिका हद्दीतील १३५ युनिट सामुदायीक शौचालय देखभाल दुरुस्ती करीता ठोक रक्कमेवर ई-निविदा सुचना क्र.६२ सन २०२३-२४ प्रसिध्द करण्यात आली होती. त्यात खालील प्रमाणे चार निविदाधारक प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	निविदाधारकाचे नांव	प्रती युनिट प्रती महिना ठोक रक्कमेचे दर
L-१	श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस,धुळे	६१२०
L-२	सेवा फाऊंडेशन,पुणे	९७२१
L-३	आस्था स्वयंरोजगार सेवा सह.संस्था, धुळे	९९१२
L-४	जनकल्याण फाऊंडेशन,पुणे	९९३५

तरी उक्त ४ निविदाधारक पैकी श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांचे सर्वात न्युनतम (कमी) दर प्रती युनिट प्रती महिना रु.६१२०/- प्राप्त झाले आहे. तरी सदर दरास मान्यता मिळुन होणारा खर्चकामी सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात शौचालय निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षकात रु.२.५० कोटी ची तरतुद करण्यात आली आहे. तरी सदर तरतुदी मधुन खर्च करण्यास मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यास निर्णयास्तव सादर करण्यात आला असता त्यावर मा.उपायुक्त सो. यांनी लेखा / लेखापरीक्षक कृ.तपासुन सादर करा असा अभिप्राय दिला होता. त्यानुसार मा.मुलेअ यांच्या मार्फत पुढील प्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेला आहे.

विभागाने धुळे महानगरपालिका हद्दीतील १३५ युनिट सामुदायिक शौचालय देखभाल दुरुस्ती करीता ठोक रक्कमेवर ई-निविदा सुचना क्र.६२ सन २०२३-२४ प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ई-निविदेत अ.क्र.१ ते ४ निविदा धारकांनी भाग घेतला होता. त्यात श्री.चंद्रगणेश एन्टरप्राईजेस,धुळे यांचे प्रति युनिट प्रति महिना ठोक रक्कम रुपये ६१२०/- न्युनतम दर प्राप्त झाल आहे.

तरी न्युनतम दर रुपये ६१२०/- नुसार दर मंजुरी बाबत मे.स्थायी समितीपुढे सादर करणे बाबत निर्णयार्थ सादर.

त्याअनुषंगाने मा.मुलेप सो. यांनी प्रस्तुत प्रकरणी धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील मनपा हद्दीतील १३५ यूनीट सामुदायिक शोचालय देखभाल दुरुस्तीकरीता ठोक ई-निविदा सूचना क्र.६२ सन २०२३-२४ प्रसिध्द करण्यात येऊन त्यात वेगवेगळया १ ते ४ निविदाधारकांनी भाग घेतला आहे. त्यातील श्री चंद्रगणेश एन्टरप्राईजेस धुळे यांचे सर्वात कमी (L-१) दरास मंजूरी मिळणेबाबत विभागाने सादर केले आहे.

त्यानुसार सदर एकूण ४ निविदा प्राप्त आहे. त्यांचे व्यापारी दराचे लिफाफे उघडण्यात येऊन दरांचे तुलनात्मक पत्रकानुसार श्री चंद्रगणेश एन्टरप्राईजेस धुळे यांचे सर्वात कमी दर प्रती महीना प्रती यूनीट १६२०/- मात्र नुसार दर प्राप्त झाले आहे.

१) प्रस्तुत कामाचे आदेश सक्षम आधिकारी यांचे असणे आवश्यक असेल.

२) दर स्विकृतीचे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत.

३) सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात शौचालय निगा व दुरूस्ती या लेखाशिर्षावर तरतूद नमूद केली आहे.

४) मुद्रांक करारनामा करतांना विभागाने मनपा हितांच्या सर्वकष अटी व शर्ती नमूद करणे आवश्यक आहे. करारनाम्यातील अटी शर्तीनुसार काम करून घेण्याची जबाबदारी विभागाची राहील. सदर करारनामा मनपा आर्थिक हिताच्या अटी व शर्तींची पूर्तता करण्याची दक्षता विभागाने घेणे आवश्यक आहे.

५) नगर विकास विभागाकडील शासन आदेशांनुसार विभागाने केंद्रीकृत सनियंत्रण करिता माहिती तंत्रज्ञान आधारित प्रणालीबाबत कार्यवाही करणे आवश्यक.

६) आदेशानंतर शौचालय साफसफाई देखभाल दुरूस्ती वेळोवेळी सुरळीतपणे व व्यवस्थीत रित्या होत आहे किंवा नाही याबाबत खात्री करण्याची जबाबदारी विभागाची राहील.

७) कामाचे अदाजपत्रकीय रक्कमेनुसार विहीत दराचे शासकीय मुद्रकांवर करारनामा करून घेणे बंधनकारक राहील.

८) दर वाजवी आणि प्रचलित बाजारभावानुसार योग्य असल्याबाबत विभागाने प्रमाणित करणे आवश्यक

उपरोक्त बाबींच्या अधीन राहून तसेच विभागाच्या व लेखाविभागाच्या अभिप्रायानुसार सर्वात कमी (L-१) दरास मंजूरी मिळणेबाबत मे.स्थायी समिती पुढे सादर करणेबाबत पुढील निर्णयार्थ सादर करणे बाबत निर्देश दिले आहेत.

मा.आयुक्त सो. यांच्या मान्यता दिलेली आहे. तरी सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका हद्दीतील १३५ युनिट सामुदायीक शौचालय देखभाल दुरुस्ती करीता सदर कामी श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांचे सर्वात न्युनतम (कमी) दर प्रती युनिट प्रती महिना रु.६१२०/- आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. या कामी उक्त अहवालात नमूद १ ते ८ मुद्देबाबत असलेली पुर्तता व कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात यावी. , याबाबत कायदेशिर बाबी तपासून घेण्यात याव्यात संबंधित संस्थेशी आवश्यक तो करारनामा करणे व अनुषांगीक बाबींची जबाबदारी प्रशासनाची राहिल. हद्दवाढ भागातील सार्वजनिक शौचालयांच्या देखभाल दुरूस्तीच्या कामांचाही समावेश करण्यात यावा. तसेच मागील ठेकेदाराचा करारनामा रद्द करणे व अनुषंगिक कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासनाची राहिल. तसेच संबंधीत ठेकेदाराचे काम समाधान कारक असल्यास त्यांना नियमाप्रमाणे दरवर्षी नैसर्गिक दरवाढ देवून मुदतवाढ देण्यात यावी. सदर प्रस्तावास सन्मा. सदस्य खान मो.साबीर मुहिबुल्लाह व अन्सारी वसीम खलील यांनी विरोध नोंदविलेला असून याबाबत नोंद घेवून प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक:- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

सर्वानुमते मंजूर

सही xxx/-

सभापती

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २७ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक ०५/१०/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२७ आज **गुरूवार दिनांक ०५/१०/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
३	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
४	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
५	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
६	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
७	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
८	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
९	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१०	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
११	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
१२	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या
१३	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती करूणा डहाळे	अति.आयुक्त
२	श्रीमती डॉ.संगिता नांदूरकर	उपायुक्त
३	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
४	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
५	श्री.नवनीत सोनवणे	कार्यकारी अभियंता पा.पु.विभाग
६	श्री.कैलास शिंदे	अभियंता

७	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
८	श्री.डॉ.एम.आर.शेख	आरोग्याधिकारी
९	श्री.एन.के.बागुल	कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग
१०	श्री.चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
१३	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१४	श्री.मोहनिश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१५	श्री.के.डी.साबळे	लिपीक,आस्थापना विभाग
१६	श्री.शिरिष जाधव	मालमत्ता अधिक्षक
१७	श्री.मधुकर निकुंभे	मालमत्ता अधिक्षक
१८	श्री. राजेश गायकवाड	वरीष्ठ लेखापाल, मनपा शिक्षण मंडळ
१९	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
२०	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.अति.आयुक्त व उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरूवातील सन्मा.सदस्यांकडून श्रध्दांजलीची यादी सादर झालेली आहे.

प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य श्री.नरेंद्र रूपला चौधरी यांच्या मातोश्री गं.भा.रूखमाबाई रूपला चौधरी यांचे दिनांक ०३/१०/२०२३ रोजी वृध्दकाळाने दु:खद निधन झालेले आहे. त्यांच्या कुंटूंबावर कोसळलेल्या दु:खात आम्ही सर्व स्थायी समिती सदस्य सहभागी आहोत. परमेश्वर हे दु:ख पेलण्याची शक्ती श्री.चौधरी परिवराला देवो हीच प्रार्थना.

आज रोजीच्या स्थायी समिती सभेत श्रध्दांजली व्हाण्यात येवून तसा श्रंध्दाजलीचा ठराव पारीत करण्यात यावा हि विनंती.

सुचक:- सौ.किरण राकेश कुलेवार,सभापती

अनुमोदक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे, श्री.दगडू भिमा बागुल,
श्री.खान मो.साबीर मुहिबुल्लाह श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

म. सभापती सन्मा. सदस्यांनी श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७२ दिनांक ०५/१०/२०२३

प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य श्री.नरेंद्र रूपला चौधरी यांच्या मातोश्री गं.भा.रूखमाबाई रूपला चौधरी यांचे दिनांक ०३/१०/२०२३ रोजी वृध्दकाळाने दु:खद निधन झालेले आहे. स्व.गं.भा.रूखमाबाई रूपला चौधरी यांच्या दु:खद निधनाने या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून या दु:खद

निधन निमित्त त्यांचे आत्मास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७० मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं २४ दि. ०७/०९/२०२३)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागणी स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.विजय जाधव मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७३ दिनांक ०५/१०/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.२४ दिनांक ०७/०९/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १४९ ते १५५ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७१ प्रभाग क्र. २ मधील सुदर्शन कॉलनी भागातील ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र दुरूस्तीचे कामास व झालेला खर्च रू. २,९२,५७५/- मात्रला मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे शासन आदेशाबाबत खुलासा करावा. विषय चांगला आहे.

म.प्रदिप चव्हाण मा. आयुक्त महोदयांच्या एक व्हॉटस्अप ग्रुप आहे. त्यात नगर विकास विभागाचे सेक्रेटरी असतात. त्या विरंगुळा केंद्र चालू करणे बाबत आदेशित केले होते. त्या नुसार मा. आयुक्त यांनी पाहणी करुन प्रभाग क्र. २ मधील सुदर्शन कॉलनी भागातील जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र तातडीने दुरुस्त करुन घेतले होते.

म.सुनिल बैसाणे आपण टिपनीमध्ये सव्वीस्तर उल्लेख का केला नाही? शासनाच्या कुठल्या अधिकाऱ्याने आदेशित केले ? विषय चांगला आहे येणाऱ्या काळात याबाबत उल्लेख करावा.

म.हर्षकुमार रेलन २०२० मध्ये मी नागरिक विरंगुळा केंद्राचे प्रपोजल दिले आहे. ३ वर्षे झाली माझे प्रकरण गहाळ झाले आहे. सभापती महोदया आपण आदेशित सुध्दा केले नाही. शिंदे साहेबांना ते प्रकरण

शोधा म्हणून. याबाबत शासनाने सुध्दा आदेशित केले आहे. माझ्या प्रकरणाबाबत खुलासा होईल का?

म.विजय जाधव — विषय मंजूर करण्यात यावा.

म.रंगनाथ ठाकरे — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७४ दिनांक ०५/१०/२०२३

धुळे मनपा हद्दीत ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र सुरु करणे बाबत शासनाने दिलेल्या आदेशानुसार मा.आयुक्त यांनी पाहणी करून प्रभाग क्र.२ मधील सुदर्शन कॉलनी भागांतील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राची तातडीने दुरुस्ती करणे बाबत आदेशित केले होते.उक्त बाबत समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी पत्र्याचे शेड तुटले असल्याने पत्रे बदलणे आवश्यक होते.तसेच सदर ठिकाणी दरवाजे तुटले असून कलर काम देखील करणे आवश्यक होत .

शासनाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे काम तातडीने करणे गरजेचे असल्याने वरिष्ठांच्या आदेशानुसार सदरचे काम ठेकेदार श्री.हेमंत राजाराम बागुल,धुळे यांच्या मार्फत पुर्ण करण्यात आले आहे. त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसुची सन २०२२-२३ नुसार रु.२,९२,५७५/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचा खर्च सन २०२३-२४ च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे. उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.हेमंत राजाराम बागुल,धुळे यांच्या कडुन करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रभाग क्र. २ मधील सुदर्शन कॉलनी भागातील ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र दुरूस्तीचे काम श्री.हेमंत राजाराम बागूल यांच्याकडून करून घेण्यात आले. सदर कामास झालेला खर्च रू. २,९२,५७५/- मात्रला मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.विजय बापू जाधव

अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १७२	अक्कलपाडा मध्यम प्रकल्पातून नदीत सोडण्यात आलेले पाणी हरणमाळ लघु प्रकल्पात भरणेचे कामास व झालेला खर्च रू. रु.९,९९,५९३/- मात्रला मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.सभापती	याबाबत काय काय काम केले याबाबत सभागृहाला माहिती द्यावी.
म.कार्यकारी अभियंता	मागे कलेक्टर साहेबांच्या ऑफिसमध्ये पाणी टंचाईची मिटींग झाली होती. त्यात तातडीने कॅनॉल दुरुस्त करुन घेण्यास सांगीतला होता. त्यासंदर्भात इरिगेशन डिपार्टमेंटला विनंती केली होती. त्यांनी त्याचे साधारणत: ९ लाखाचे अंदाजपत्रक आपल्याला पाठवले होते. परंतु त्या प्रोसिजरला वेळ लागणार होता. कलेक्टर साहेबांनी आदेशित केल्याप्रमाणे तो अर्जंटली दुरुस्त केले होते. त्या मशिनरीने तेथील सर्व झाडेझुडपे काढून घेतली पाण्याचा अडसर दूर केला आहे. आणि ते पाणी हरण्यामाळ पर्यंत आले आहे.
म.सुनिल बैसाणे	दुरुस्ती करणे जरुरी होते. आणि ते योग्य आहे. परंतु तो कॅनॉलची मालकी कोणाकडे आहे.
म.कार्यकारी अभियंता	कॅनॉल मनपा मालकी हक्कामध्ये आहे.
म.सुनिल बैसाणे	काम चांगले केले परंतु टिपनीमध्ये सव्वीस्तर उल्लेख नाही. जेसीबी कोणता होता त्याचा नंबर काय होता? जेसीबी ठेकेदाराच्या मालकीचा होता का ? का त्याने भाडयाने आणले होते? काय काय काम केले आहे?
म.कार्यकारी अभियंता	आपण ज्या वेळेस हा विषय मंजूरीस्तव ठेवला होता त्याबाबत सव्वीस्तर माहिती दिली होती. याबाबत अजून माहिती मी आपल्याला देऊ शकतो.
म.सुनिल बैसाणे	निविदा करत असतांना माहिती देणे तो तुमच्या कार्यालयीन भाग आहे. परंतु आम्ही कार्यालयीन मंजूरी देतोय आम्हाला ते अवगत होणे गरजेचे आहे. आलेल्या विषयाला तात्काळ मंजूरी देणं हे सुध्दा योग्य नाही. मनपा कडे सुध्दा जेसीबी आहे. यात मनपाची बचत होणार का जास्त खर्च होणार हे पाहणे सुध्दा महत्वाचे आहे. यात मनपाचे हित जपले गेले पाहिजे. मंजूरी देत असतांना जेसीबी कोणाच्या मालकीचे होते. त्याचा क्रमांक याचा खुलासा ठेकेदाराच्या नावाने प्रतिज्ञापत्र करुन घ्यावे त्याशिवाय कार्यादेश देऊ नये.
म.कार्यकारी अभियंता	आपण या कामासाठी पोकलेन वापरले होते. त्याचे सर्व डिटेल तुम्हाला देतो.
म.सुनिल बैसाणे	याबाबत सव्वीस्तर माहिती घेऊन कार्यादेश द्यावे.
म.हर्षकुमार रेलन	या विषयात ठेकेदार सैफी याच्या संदर्भात मागील बैठकीत बोललो होतो. जर त्याचे रेट कमी आहे पण त्याने काम करण्यास असमर्थता का दर्शविली आहे?
म.कार्यकारी अभियंता	त्यांच्याकडे मशिन उपलब्ध नसल्याचे पत्र आपल्याला प्राप्त झाले होते.
म.हर्षकुमार रेलन	सैफी नावाचा ठेकेदार टेंडर भरुन घेतो परंतु काम करत नाही.
म.सुरेखाताई उगले	सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.
म.वंदनाताई थोरात	विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच संबंधीत ठेकेदाराकडून प्रतिज्ञापत्र करुन घ्यावे मगच पुढील कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७५ दिनांक ०५/१०/२०२३

धुळे शहरात भविष्यात पाणी टंचाई भासू नये यासाठी अक्कलपाडा धरणातील पाणी सैय्यद नगर कालव्याद्वारे द्दतगती कालव्यातून धुळे शहराचे पिण्याचे पाण्यासाठी पाणी सोडुन हरणमाळ तलाव भरणे गरजेचे आहे.त्यासाठी द्दतगती कालवा दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

म.जिल्हाधिकारी सो., यांनी हरणमाळ तलाव भरण्यासाठीचा द्दतगती कालवा तातडीने दुरुस्त करण्याचे पाणी टंचाई बैठकी दरम्यान आदेशित केलेले आहे. सदर कालव्याच्या दुरुस्तीसाठीचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी म.कार्यकारी अभियंता , पाटबंधारे विभाग , धुळे यांना पत्र क्र. धुमपा / पापुवि / ४८७ दि.०१/०९/२०२३ अन्वये विनंती करण्यात आलेली होती. तद्दअनुषंगाने पाट बंधारे विभागाने पत्र क्र. प्रशा- ३ / ५८३० दि. ३१/०८/२०२३ अन्वये रु.९,९९,७१३/- मात्रचे अंदाजपत्रक येत असल्याचे कळविले आहे.

महानगरपालिकेने पूर्वी प्रदान केलेल्या निविदा मध्ये या कार्यालया कडील जा.क्र. ४७७ दि.२८/१२/२०२२ रोजीच्या कार्यारंभ आदेशानुसार मे.अे. के. सैफी यांचे निविदेत पोकलेन चा दर रु.२६६४.२४/- तसेच जे.सी.बी. चा दर रु.१२९९.०९/- मंजूर आहे. तसेच जा.क्र. ५८८ दि.२८/०३/२०२३ रोजीच्या कार्यारंभ आदेशानुसार श्री.चेतनकुमार सूर्यवंशी यांचे निविदेत पोकलेन चा दर रु.२६६४.६४/- तसेच जे.सी.बी. चा दर रु.१२९९.०९/- आहे.

उपरोक्त काम करण्या करता मे.अे. के. सैफी व श्री.चेतन सूर्यवंशी यांना विचारणा केले असता मशिन उपलब्ध नसल्याने त्यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविली तद्दनंतर श्री.अंकित किशोर भंडारी यांनी पोकलेन चा रु.२६००/- व जे.सी.बी. चा रु.१२५०/- दरात तात्काळ काम सुरु करण्याचे मान्य केले. वरील दर पाहता श्री.अंकित किशोर भंडारी यांनी दिलेला दर सर्वात कमी असून महानगरपालिकेची बचत करणारे दिसून येतात.

तरी शहरात भविष्यात पाणी टंचाई भासू नये म्हणून अक्कलपाडा धरणातील पाणी सैय्यद कलव्या द्वारे हरणमाळ तलाव भरणे साठीचा द्दतगती कालव्यातून आणणे कामी सदरचा कालव्याची साफ सफाई करणे आवश्यक असल्याने कालव्याची साफ सफाई करणे कामी रक्कम रु.९,९९,५९३/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा मे.अंकित किशोर भंडारी , ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेणेस सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.९,९९,५९३/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून अक्कलपाडा मध्यम प्रकल्पातून नदीत सोडण्यात आलेले पाणी हरणमाळ लघु प्रकल्पात भरणेचे काम मे.अंकित किशोर भंडारी,धुळे यांच्याकडुन करून घेण्यात आले. सदर कामास झालेला खर्च

रू. रु.९,९९,५९३/- मात्रला मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.सुरेखा चंद्रकांत उगले

अनुमोदक :- सौ.वंदना विक्रम थोरात

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७३ धुळे महानगरपालिका हद्दीतील शास्ती माफी योजना व १ ते ११ गावांना मालमत्ता कर व पाणीपट्टी कर भरणे साठी रिक्षाद्वारे आवाहन करण्यात आले. त्या कामासाठी झालेल्या खर्चास रू.२,२१,२५०/- मात्रला कार्यात्तर मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. दगडू बागूल सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. सुनिल बैसाणे विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७६ दिनांक ०५/१०/२०२३

धुळे महानगरपालिका मालमत्ता विभागकडील थकबाकी कर संदर्भात जिल्हा न्यायालय आवारात दिनांक ११/०२/२०२३ रोजी राष्ट्रीय लोक अदालत भरविणे करीता मा. आयुक्त सो यांच्या मंजुर टिपणी अन्वये सुचित केले आहे.

तरी धुळे महानगरपालिका हद्दीतील शास्ती माफी योजना व १ ते ११ गावांना मालमत्ता कर व पाणीपट्टी कर भरणे साठी रिक्षाद्वारे आवाहन करण्यासाठी दिनांक २०/०२/२०२३ ते दिनांक २८/०२/२०२३ (०५) रिक्षा ते दिनांक १०/०३/२०२३ ते २९/०३/२०२३ (०४ रिक्षा) असे एकुण ०९ रिक्षा जनजागृती मोहिम राबविणे बाबत मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी यांनी लेखी मागणी पत्र मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने भांडार विभाग कडेस मागणी पत्र सादर केलेले आहे.

सदरचे नियोजन संदर्भात मा. सो यांचे सुचने नुसार तातडीने असल्याने त्वरीत सेवा उपलब्ध करुन दयावे लागणार असुन सदर साहित्य स्थानिक सेवा धारक मे. माऊली सप्लायर्स, धुळे यांचे कडुन करुन घेऊन मा.स्थायी समिती पुढे कार्यात्तर मंजुरी घेऊन बिल अदा करणेत येईल या चर्चे अंती काम करुन घेण्यात आले आहे.

तरी सदरचे सेवा धारक कडुन खालील प्रमाणे काम करुन घेण्यात आलेले असुन त्यांचे कडील बिला प्रमाणे त्यांनी खर्च दर्शविलेला आहे.

अ.क्र.	साहित्याचे तपशिल	एकुण वापर रिक्षा दिवस	प्रति दिवस दर	एकुण खर्च
१.	शास्ती माफी संदर्भात जनजागृती करण्यासाठी रिक्षा वाहन,इंधन,रिक्षा चालक सह भाडे (एकुण रिक्षा-९)	१२५	१५००	१,८७,५००/-
			एकुण खर्च	**,८७,५००/-**
			GST १८%	**३३,७५०/-**
			एकुण खर्च सर्व करासहित	**२,२१,२५०/-**

तरी वरील प्रमाणे काम करुन घेण्यात आले नुसार GST व इतर करासहित एकुण खर्च रु.२,२१,२५०/- मात्र अदा करणेस महानगरपालिका अधिनियम ५ (२) २ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी घेण्याकरीता मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका हद्दीतील शास्ती माफी योजना व १ ते ११ गावांना मालमत्ता कर व पाणीपट्टी कर भरणे साठी रिक्षाद्वारे आवाहन करण्यासाठी मे. माऊली सप्लायर्स, धुळे यांचेकडून करून घेण्यात आले. सदर कामास झालेला खर्चास रू.२,२१,२५०/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२) २ अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागूल

अनुमोदक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७४ मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२३-२४ प्र.क्र.१९ मध्ये सुमैय्या हॉल पासून ते ग्रीन कॉलनी पर्यंत रस्ता काँक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यात आलेले आहे त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नाजीया बानो सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. फातमाबी विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७७ दिनांक ०५/१०/२०२३

मुलभूत सोई-सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२३-२४ प्र.क्र.१९ मध्ये सुमैय्या हॉल पासून ते ग्रीन कॉलनी पर्यंत रस्ता काँक्रीट करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२१/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**१,००,३६,७२०/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./८९९/२०२३ दि. १५/०३/२०२३ अन्वये रक्कमरु.**१,००,३६,७२०/-**मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./४२/२०(फेर निविदा) दि. २५/०७/२०२३ रोजी दैनिक मिड डे/पुण्यनगरी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. ११/०८/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	समता किचन इंटेरियर प्रोडक्ट	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**
२	सिद्धीविनायक इंजि.अॅण्ड कॉन्ट्रक्टर	शे.५.०० % जास्त	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **समता किचन इंटेरियर प्रोडक्ट** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **१,००,३६,७२०/-**इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **समता किचन इंटेरियर प्रोडक्ट**यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **समता किचन इंटेरियर प्रोडक्ट** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत तसेच प्रकरण दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **समता किचन इंटेरियर प्रोडक्ट** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती नाजीया बानो नासीरखा पठाण
अनुमोदक :- श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७५ मुलभूत सोईसुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२ धुळे मनपा हद्दीतील जुने जिल्हाधिकारी कार्यालय ते वराडे अंडी केंद्रापर्यंत रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यात आलेले आहे त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. वसीम बारी विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७८ दिनांक ०५/१०/२०२३

मुलभूत सोईसुविधांचा विकास अंतर्गत सन२०२१-२२धुळे मनपा हद्दीतील जुने जिल्हाधिकारी कार्यालय ते वराडे अंडी केंद्रापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास मा. जिल्हाधिकारी सो.धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२१/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**१,८४,२२,५२३/-**मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२२५/२०२३ दि. ०७/०९/२०२३ अन्वये रक्कम रु. **१,९९,४०,६९९/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बां.वि./१८४/२०दि.२४/०३/२०२३ रोजी दैनिक पुण्यनगरी/ मिड डे या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. १०/०४/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.समर्थ कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**
२	ई.कौस्तुभ सचिन दिक्षित	शे.१.०० % जास्त	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.समर्थ कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **१,८४,२२,५२३/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.समर्थ कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.समर्थ कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत . तसेच प्रकरण दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.समर्थ कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रक दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री.अन्सारी वसीम खलील

सर्वानुमते मंजुर,
सही xxx/-
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २८ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक १९/१०/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२८ आज **गुरूवार दिनांक १९/१०/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
६	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
७	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
८	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
९	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
१०	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
११	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१२	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
१३	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या
१४	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	डॉ.संगीता नांदूरकर	उपायुक्त
२	श्री.अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरिक्षक
३	श्री. सुनिल सुर्यवंशी	उपमुख्य लेखापरीक्षक
४	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
५	श्री.नवनीत सोनवणे	कार्यकारी अभियंता, पा.पु.विभाग

६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
७	श्री.डॉ.एम.आर.शेख	आरोग्याधिकारी
८	श्री.चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
९	श्री.एन.के.बागुल	कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग
१०	श्री.चंद्रकांत उगले	सहा.अभियंता, पा.पु.विभाग
११	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१२	श्री.मोहनीश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१३	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१४	श्री.के.डी.साबळे	लिपीक,आस्थापना विभाग
१५	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
१६	श्री. विकास साळवे	मलेरिया पर्यवेक्षक
१७	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१८	श्री. राजेश गायकवाड	वरीष्ठ लेखापाल , मनपा शिक्षण मंडळ
१९	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभागप्रमुख

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरूवातील सन्मा.सदस्यांकडून श्रध्दांजलीची यादी सादर झालेली आहे.

शहरातील देवपूर भागातील प्रसिध्द उद्योजक तथा धर्मवीर गौरव किशोर जगताप यांचे दिनांक १२/१०/२०२३ रोजी रात्री ११.४० वाजता नाशिक येथील अपोलो हॉस्पिटल येथे उपचार सुरू असतांना दु:खद निधन झाले धर्मवीर गौरव जगताप यांनी आपल्या मेहनतीच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर स्वत:चे एक विश्व निर्माण केले होते. उद्योगासोबत सामाजिक बांधिलकीच्या यज्ञही त्यांनी नेहमीच तेवत ठेवला. त्यांनी शहरासह संपूर्ण जिल्हयात विविध मंदिरासाठी सुमारे ४०० हुन अधिक देवीदेवतांच्या मृर्त्या दान केल्या होत्या. तसेच शहरातील मुकबधीर शाळा,वृध्दाश्रम आदि ठिकाणी दरमहा नियमीतपणे किराणा पोहचवत होते. हसतमुख, मनमिळावू, तसेच सर्व गरजवतांना मदत करण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळेच नागरीकांनी त्यांना धर्मवीर पदवी बहाल केली होती.

तरी प्रसिध्द उद्योजक तथा धर्मवीर गौरव किशोर जगताप यांना आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यात यावे हि विनंती.

सुचक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक:- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

म. सभापती सन्मा. सदस्यांनी श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७९ दिनांक १९/१०/२०२३

शहरातील देवपूर भागातील प्रसिध्द उद्योजक तथा धर्मवीर गौरव किशोर जगताप यांचे दिनांक १२/१०/२०२३ रोजी रात्री ११.४० वाजता नाशिक येथील अपोलो हॉस्पिटल येथे उपचार सुरू असतांना दु:खद निधन झाले धर्मवीर गौरव जगताप यांनी आपल्या मेहनतीच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर

स्वत:चे एक विश्व निर्माण केले होते. उद्योगासोबत सामाजिक बांधिलकीच्या यज्ञही त्यांनी नेहमीच तेवत ठेवला. त्यांनी शहरासह संपूर्ण जिल्हयात विविध मंदिरासाठी सुमारे ४०० हुन अधिक देवीदेवतांच्या मृर्त्या दान केल्या होत्या. तसेच शहरातील मुकबधीर शाळा,वृध्दाश्रम आदि ठिकाणी दरमहा नियमीतपणे किराणा पोहचवत होते. हसतमुख, मनमिळावू, तसेच सर्व गरजवतांना मदत करण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळेच नागरीकांनी त्यांना धर्मवीर पदवी बहाल केली होती.

शहरातील प्रसिध्द उद्योजक स्व.गौरव जगताप यांच्या दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून या दु:खद निधन निमित्त त्यांचे आत्मास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज.

सन्मा.सदस्य खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह या सदस्यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आजच्या स्थायी समितीच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज केले आहे.

म. महापौर — सन्मा.सदस्य यांनी विनंती अर्जानुसार आजच्या स्थायी समिती सभेस रजा मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८० दिनांक १९/१०/२०२३

सन्मा.सदस्य खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे आजच्या स्थायी समितीच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज केले आहे.

सन्मा.सदस्य यांनी विनंती अर्जानुसार आजच्या स्थायी समिती सभेस रजा मंजुर करण्यांत येत आहे.

सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७६ — मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं २५ दि. १४/०९/२०२३)

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — मागणी स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.कल्याणी अंपळकर — मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८१ दिनांक १९/१०/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.२५ दिनांक १४/०९/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १५६ ते १६५ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७७ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोस्थान योजनेंतर्गत महाभियान जिल्हा स्तर २०२२ - २३ अंतर्गत प्रभाग क्र. ११ मध्ये भगा मोहन नगर ते सिमेंट गोडाऊन ते स्वामी नारायण सोसायटी पावेतो रस्ता काँक्रीट व गटार करणेचे निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वंदना थोरात सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सुरेखा उगले विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८२ दिनांक १९/१०/२०२३

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोस्थान योजनेंतर्गत महाभियान जिल्हा स्तर २०२२ - २३ अंतर्गत प्रभाग क्र. ११ मध्ये भगा मोहन नगर ते सिमेंट गोडाऊन ते स्वामी नारायण सोसायटी पावेतो रस्ता काँक्रीट व गटार करणे. तसेच मा. जिल्हाधिकारी सो. यांचे पत्र क्र. १२/ कक्ष /५/ नपाप्र/बांधकाम/३९५ दि.२९/०३/२०२३ मंजुरीने उक्त कामाबाबत रक्कम रु. ९९,०८,१५९/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ९५९ दि.२८/०३/२०२३ अन्वये रक्कम रु. ९९,०८,१५९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा. क्र. / घुमपा/बांवि./१८ दि.१०/०५/२०२३ रोजी नवभारत / समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. २९/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री. गणेश बोरसे	शे. ५.०० % जास्त	
२	हिंद कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **हिंद कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ९९,०८,१५९/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा. आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.**हिंद कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रकीय** दराने आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.वंदना विक्रम थोरात

अनुमोदक :- सौ.सुरेखा चंद्रकांत उगले

सर्वानुमते मंजुर,
सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७८ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोस्थान योजनेंतर्गत महाभियान जिल्हा स्तर २०२२ - २३ अंतर्गत १ ते ३३ कामे करणेचे निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल वैसाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोस्थान योजनेंतर्गत महाभियान जिल्हा स्तर २०२२ - २३ अंतर्गत १ ते ३३ कामाचे विवरण देण्यात आलेले आहे. परंतू सदर कामे हे वेगवेगळया निधीत आले असेल तर ते कामामध्ये दुरूस्ती करण्यात येवून अन्य ठिकाणी काम करण्यात यावे. तसेच कामांबाबत पडताळणी करण्यात यावी व कामे दुबार होणार नाही याची प्रशासनाने खात्रजमा करावी.

म. कल्याणी अंपळकर सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच प्रस्तावित कामांबाबत प्रशासनाने खातरजमा करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८३ दिनांक १९/१०/२०२३

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अंतर्गत सन २०२२-२३ महाधियान रस्ते विकास प्रकल्प अंतर्गत १ ते ३३ कामे करणे बाबतच्या कामास शासन निर्णय क्रमांक/नगरो-२३/ प्र.क्र.२२७ (भाग-१)नवि-३३ मंजुरीने दि.०८/०५/२०२३ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.**८,१९,४२,४८२/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत मुख्य अभियंता सा.बां.विभाग, नाशिक यांचे पत्र क्र./१०३५/ दि.२४/०२/२०२३ अन्वये रक्कम रु.**८,१९,४२,४९४/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./१९/२० दि.११/०५/२०२३ रोजी दैनिक आपला मिड डे /लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१९/०६/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	ए.के.सैफी	शे.१.०० % जास्त	
२	श्री.अक्षय धनराज माखिजा	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **८,१९,४२,४८२/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांचे **अंदाजपत्रकीय** दराने आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच प्रस्तावित कामांबाबत प्रशासनाने खातरजमा करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.कल्याणी सतिष अंपळकर
अनुमोदक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजुर,
सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१७९ मनपा निधीअंतर्गत चाळीसगांव रोड येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळाकरीता चबुतरा बांधणे व सुशोभिकरण करणेचे निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल वैसाणे सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८४ दिनांक १९/१०/२०२३

सन २०२३-२४ अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा सुशोभिकरण करणे अंतर्गत चाळीसगांव रोड येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा करिता चबुतरा बांधणे व सुशोभिकरण करणे या कामास मा.आयुक्तधुळे महानगरपालिका,धुळे यांची टिपणी मंजुरीने दि.२५/०५/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रुपये १,२४,९९,६९५/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशाकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२२ /२०२३ दि.२६/०५/२०२३ अन्वये रक्कम रु. १,२४,९९,६९५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि./१८६/२०२३ दि.३१/०५/२०२३ रोजी दैनिक पुण्य नगरी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२१/०६/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.१ % जास्त	
२	मिलिंद मुडावदकर	अंदाजपत्रक दराने	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मिलिंद मुडावदकर** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे १,२४,९९,६९५/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मिलिंद मुडावदकर** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मिलिंद मुडावदकर** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मिलिंद मुडावदकर** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजुर,
सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८० धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे ॲलम(तूरटी),ब्लिचिंग पावडर व क्लोरीन टनर या रसायनांचा पुर्वीच्या मंजूर दराप्रमाणे पुरवठा करणेकामी मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.या विषयाची टिपनी सुरूवातीला स्थायी समिती समोर सादर झाली होती परंतु ॲलम ब्लीचिंग पावडर व क्लोरिन टनर यांना वेगवेगळी मान्यता आवश्यक असल्याने स्वतंत्र टिपनी आपल्यासमोर सादर केली आहे. त्यामुळे या एकच विषयावर ३ वेगवेगळे प्रस्ताव मान्यतेसाठी आले आहे.

म.सुनिल बैसाणे या तिनही बाबतीत प्रशासनाने मुदत का देण्यात यावी? हे आत्यावश्यक आहे किंवा कसे? याबाबत खुलासा करावा.

म.एन.के.बागूल आपण जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारे आवश्यक रसायने त्यासाठी निविदा प्रक्रीया सुरु केली आहे. त्यासाठी मा. आयुक्तांची मान्यता सुध्दा झाली आहे. नुकतीच अक्कलपाडा योजना सुरु झाली आहे. त्यासाठी मोठया प्रमाणावर रसायनांची आवश्यकता आहे. ३ पंपाचे पाणी सुरु होणार आहे. त्यासाठी रसायनांची मागणी वाढती आहे. त्या दृष्टीने आपण मुदवाढीचा विषय आणला आहे. नविन निविदा प्रक्रीया पण सुरु केली आहे. त्यासाठी मंजूरी देखील झाली आहे. वार्षिक निविदा मागे पुढे होतात त्यामुळे बजेट तरतुर्दीना अडचण येते. बरेचसे बिले स्पील ओव्हरमध्ये जातात. मंजूर दर व वाढलेले दर त्यामध्ये मोठया प्रमाणावर तफावत आहे. मागील मंजूर दराप्रमाणे मनपाचा आर्थिक फायदा पण होणार आहे. त्याउ दृष्टीने ३१ मार्च पर्यंत या दरांना मंजूरी द्यावी. अशी विनंती स्थायीपुढे केली आहे.

म.सुनिल बैसाणे याची जी निविदा प्रक्रीया आहे. ॲलम असेल ब्लीचिंग पावडर असेल किंवा क्लोरिन टनर असेल. ही निविदा प्रक्रीया कोणत्या टप्प्यावर आहे ? याला किती कालावधी लागणार आहे? आणि या रसायनांचे महत्व काय?

म.रसायन तज्ञ पावसाळयामध्ये जे गढूळ पाणी येते अजूनही गढूळ पाणी नळांना काही प्रमाणात येते आहे. यासाठी ॲलम, ब्लीचिंग व क्लोरिन यांचे प्रमाण वाढवावे लागते. ॲलम गढूळपण कमी करण्याचे काम करते. क्लोरिन शुध्द पाण्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी होतो.

म.सभापती — मागील वर्षी किती टन रसायने खरेदी केले होते व शिल्लक किती आहे?

म.एन.के.बागूल — ६/४/२०२२ पासून ते १९/६/२०२३ पर्यंत वेळोवेळी पुरवठा झाला आहे. त्याचे सव्वीस्तर अहवाल सादर केला आहे.

म.सुनिल बैसाणे — मागील वर्षी घेतलेला जो पुरवठा व आता जी मागणी केली यामध्ये काही तफावत आहे का? व आज रोजी आपल्याकडे किती रसायने शिल्लक आहे? आपल्याला लागत असेल २० टन आपण खरेदी करतोय २५ टन त्र ५ टनाचा जो विषय असतो ती वाढ केली ती योग्य आहे का? आपण पुरवठा जास्तीचा घेतो का?

म.एन.के.बागूल — मागची जी मागणी आहे ती अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना सुरु होण्यापुर्वीची आहे. आता अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना सुरु झाली आहे. त्याची क्षमता ६९ एमएलडी आहे. जर आपणी डे टु डे किंवा १ दिवसाआड पाणी देण्याचे नियोजन असेल वाढीव क्वांटिटी यामध्ये धरली आहे. तापी पाणी पुरवठा योजनाही सुरु राहणार आहे. हनुमान टेकडी सुरु राहील ती सध्या २४ तास चालू आहे ती १२ तास किंवा ८ तास चालेल त्याप्रमाणे आपण गृहीत धरले आहे. आपली निविदा मंजूर झाली तर त्याप्रमाणे इंम्प्लीमेंट करु कमी मंजूर दराने निविदा आल्यास त्यानुसार रसायने खरेदी बंधनकारक असणार आहे.

म.सुनिल बैसाणे — मागील ठेकेदाराच्या अटी शर्तीप्रमाणे त्याला पुरवठा करायचा आहे. त्याला आपण मुदतवाढ देतोय त्याला मुदतवाढ देऊ शकतो का याचा टिपनीमध्ये उल्लेख झाला पाहिजे लेखा विभागाचा आक्षेप येऊ नये म्हणून त्या विभागाने त्या पध्दतीची खातरजमा करणे व त्याला अधिन राहून या विषयाला मंजूरी देऊ परंतु आपण ६ महिन्यासाठी मुदतवाढ देतोय की नविन निविदा प्रक्रीया होईपर्यंत मुदतवाढ देतोय याबाबत खुलासा करावा. अंतिम निविदा तिनही रसायनांकरीता झाली आहे. ती किती दिवसांत होणार किंवा कसे? याबाबत खुलासा करावा.

म.एन.के.बागूल — साधारणत: नोव्हेंबर मध्ये निविदा कारवाई करणार आहोत. मागील निविदेला ६ महिने झाले होते. म्हणून जास्तीचा काळ गृहीत धरला आहे. पहिल्या निविदेमध्येच निविदा अंतिम झाली तर डिसेंबर किंवा जानेवारीमध्ये विषय स्थायीपुढे येऊ शकतो. कमी दर आले तर त्याप्रमाणे वर्कऑर्डर काढणार आणि समजा दर जास्त आले तर पुन्हा फेरनिविदा करावी लागेल त्यासाठी जास्तीची मागणी गृहीत धरली आहे.

म.सुनिल बैसाणे — येणाऱ्या काळामध्ये आपल्याला पाणी हा आत्यावश्यक विषय असल्यामुळे चर्चा झाल्या पाहिजे. यात काही लेखा आक्षेप असल्यास सर्वस्वी संबंधीत विभागाची जबाबदारी राहिल यानुसार विषय मंजूर करण्यात यावा.

म. नरेंद्र चौधरी — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८५ दिनांक १९/१०/२०२३

धुळे महानगरपालिका अंतर्गत सन २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षाकरीता धुळे महानगरपालिकेच्या मालकीचे पाच शुध्दीकरण केंद्रावर लागणारे रसायने,अॅलम, ब्लिचिंग पावडर व क्लोरीन टनर पुरवठा करणे करीता सन २०२३-२४ व २०२४-२५ या दोन आर्थिक

वर्षा करीता पुरवठाधारक नेमणुक करणे आवश्यक आहेत.त्यानुसार पाच ही शुध्दीकरण केंद्रावर सन २०२३-२४ व २०२४-२५ या दोन वर्षा करीता लागणारे रसायने खालील प्रमाणे आहेत.

१) ॲलम - ८००० मे.टन

२) ब्लिचिंग पावडर - ११०० मे.टन

३) क्लोरीन टनर - ६०० नग

उक्त प्रमाणे मागणी नुसार रसायने पुरवठा निश्चिती करीता वार्षीक निविदा करणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.तथापी सदरचे निविदा कार्यवाही अदयाप झालेली नाही. सदरील प्रस्ताव मान्यतेसाठी लेखा शाखे कडे दि.०४/०७/२०२३ पासून सादर आहे. सदयास्थितीमध्ये धुळे महानगरपालिकेच्या पुरवठादार व त्यांचे मंजुर दर खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	रसायने	पुरवठाधारकाचे नाव	मंजुर दर	कार्यादेश
१	ॲलमग्रेड-१	मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी	७८००/-	धुमपा/पा.पु/०६ दि.१९/०९/२०२२
२	ॲलमग्रेड-४	मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी	९४००/-	धुमपा/पा.पु/०६ दि.१९/०९/२०२२
३	ब्लिचिंग पावडर-ग्रेड-१	मे.यश केमिकल्स	२१६००/-	धुमपा/पा.पु/०७ दि.१९/०९/२०२२
४	क्लोरीन टनर (९०० kg)	मे.तिरूपती केमिकल्स	१४२००/-	धुमपा/बा.वि/१७७ दि.०८/०७/२०२२

उक्त प्रमाणे मंजुर दरानुसार पुरवठा प्राप्त असुन सदयास्थितीत पुरवठाधारकाकडुन पुरवठा होत आहे.

मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी,जळगांव यांनी त्यांच्या कडील पत्र आवक पत्र क्र.११२१ दि.२५/०५/२०२३ नुसार दिलेल्या पत्रानुसार सन २०२२-२३ करीता धुळे शहर पाणी पुरवठा योजने वरील जलशुध्दीकरणा करीता ISI Mark IS २९९:२०१२ Grade I or Alum Aluminium Ferric ISI Mark IS 299 2012 Grade IV नुसार ॲलम (तुरटी) पुरविणे हया कामाची निविदा कमी दराची असल्यामुळे आम्हास मंजूर करण्यात आलेली आहे.सदर निविदेतील दर हे DSRनुसार आहेत.आम्ही आपणास हया पत्रदवारे विनंती करतो, की सदर निविदेस २०२३-२४ करीता मुदत वाढ देण्यात यावी.आम्ही निविदेत मंजूर करण्यात आलेल्या दरात पुढे देखील ॲलम (तुरटी) पुरवण्यास तयार आहेत.या प्रमाणे विनंती पत्र दिले आहे.

सदयास्थितीत पुरवठा दराचे मंजुर दर व प्रस्तावीत वार्षीक निविदे करीता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांच्याकडील सन २०२३-२४ च्या दर सुची प्रमाणे असलेल्या अंदाजपत्रक दर याबाबत तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	रसायने	पुरवठाधारकाचे नाव	मंजुर दर	महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांच्या दर सुची प्रमाणे दर	तफावत
१	ॲलमग्रेड-१	मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी	७८००/-	८६००+१८%GST(१०१८३/-)	१५.७१% वाढ
२	ॲलमग्रेड-४	मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी	९४००/-	९०५७+१८%GST(१०६८७/-)	१३.६९% वाढ
३	ब्लिचिंग पावडर-ग्रेड-१	मे.यश केमिकल्स	२१६००/-	२७०००+१८%GST(३१८६०/-)	४७.०५% वाढ
४	क्लोरीन टनर	मे. तिरूपती केमिकल्स	१४२००/-	१७००५+१८%GST(२००६६/-)	४१.३१% वाढ

वरील प्रमाणे मजिप्रा दरसुची नुसार रसायनाच्या दरामध्ये वाढ झाली असुन या दरानुसार व बाजार भाव दरानुसार निविदा प्रक्रियेमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच सन २०२३-२४ साठी व त्या पुढील वर्षासाठी वार्षीक निविदा मागविणे व याकामी प्रस्तावित खर्चास मा.आयुक्त सो.यांनी दि.१२/०९/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे.या मंजुर दरा प्रमाणे निविदाप्राप्त होणे निविदा दराना मंजुरी होणे व कार्यादेश होणे या कामी विलंब होऊ शकतो.

सदयास्थितीतील पुरठाधारक यांनी मंजुर दराप्रमाणे यापुढे पुरवठा करणे व त्यासाठी मनपाने आदेश करावे या बाबतचे विनंती पत्र दिलेले आहे.

करीता उक्त १ ते ३ सदयास्थितीतील मक्तेदाराने पुर्वीच्या मंजुर दराप्रमाणे पुरवठा केल्यास मनपाच्या आर्थिक फायदा होणार असल्याने पुरवठाधार मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी यांना त्यांच्या मजुर दराप्रमाणे पुढील ६ महिने कालावधी करीता किंवा सन २०२३-२०२४ च्या नविन निविदा कार्यवाहीमधुन नविन पुरवठाधारक निश्चिती होई पावेतो मुदत वाढ देणे करीता मान्यतेस सादर असुन सदरची मुदतवाढी नुसार संभाव्य रसायनाचा पुरवठा पुर्वीच्या मंजुर दरा प्रमाणे होणे अपेक्षित आहे.

अ.क्र.	**रसायने**	**पुरवठाधारकाचे नाव**	**मंजुर दर**	**संभाव्य पुरवठा**	**अपेक्षित खर्च**
१	ॲलमग्रेड-१	मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी	७८००/-	३०० मे.टन	२,३४,,०००/-
२	ॲलमग्रेड-४	मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी	९४००/-	२२०० मे.टन	२,०६,८०,०००/-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच शासन लेखा संहिता नुसारमाहे फेब्रुवारी महिन्या मध्ये वार्षिक निविदा करण्याचे नियमोचित असुन नविन वार्षीक निविदा १ एप्रिल पासुन सुरू व्हावी असे निर्देश आहे. तसचे सदरच्या पुर्वीच्या मजुर दरा प्रमाणे मनपा आर्थिक हिताचे असल्याने सदरच्या पुरवठाधारकाच्या मंजुर दराप्रमाणे ६ महिन्या करीता किंवा नविन

पुरवठादार निश्चिती होई पावेतो मुदत वाढ देणे करीता म.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मनपाचे आर्थिक हित लक्षात घेता मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी यांना मागील मंजुर दराप्रमाणे ६ महिन्या करीता किंवा नविन पुरवठादार निश्चिती होई पावेतो मुदत वाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे. नविन निविदा प्रक्रिया तातडीने करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८० धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे ॲलम(तूरटी),ब्लिचिंग पावडर व क्लोरीन टनर या रसायनांचा पुर्वीच्या मंजूर दराप्रमाणे पुरवठा करणेकामी मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुरेखा उगले सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८५ (अ) दिनांक १९/१०/२०२३

मे.यश केमिकल्स,जळगांव यांनी त्यांच्या कडील आवक पत्र क्र.१५५१ दि.२० जुन २०२३ च्या पत्रानुसार धुळे मनपाच्या पुरवठा आदेश क्र.०७दि.१९/०९/२०२२ च्या आदेशानुसार च्या मंजुर दरानुसार यापुढे मुदत वाढ देण्याबाबत विनंती केली असुन मंजुर दर २१६०० प्रती मे.टन च्या दराप्रमाणे यापुढे सदर पुरवठाधारक ब्लिंचींग पावडरचा पुरवठा करण्यास तयार आहे.

तसेच सन २०२३-२४ साठी व त्या पुढील वर्षासाठी वार्षीक निविदा मागविणे व याकामी प्रस्तावित खर्चास मा.आयुक्त सो.यांनी दि.१२/०९/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे.या मंजुर दरा प्रमाणे निविदाप्राप्त होणे निविदा दराना मंजुरी होणे व कार्यादेश होणे या कामी विलंब होऊ शकतो.

सदयास्थितीतील पुरठाधारक यांनी मंजुर दराप्रमाणे यापुढे पुरवठा करणे व त्यासाठी मनपाने आदेश करावे या बाबतचे विनंती पत्र दिलेले आहे.

मे.यश केमिकल्सयांना त्यांच्या मजुर दराप्रमाणे पुढील ६ महिने कालावधी करीता किंवा सन २०२३-२०२४ च्या नविन निविदा कार्यवाहीमधुन नविन पुरवठाधारक निश्चिती होई पावेतो मुदत वाढ देणे करीता मान्यतेस सादर असुन सदरची मुदतवाढी नुसार संभाव्य रसायनाचा पुरवठा पुर्वीच्या मंजुर दरा प्रमाणे होणे अपेक्षित आहे.

अ.क्र.	रसायने	पुरवठाधारकाचे नाव	मंजुर दर	संभाव्य पुरवठा	अपेक्षित खर्च
१	ब्लिचिंग पावडर-ग्रेड-१	मे.यश केमिकल्स	२१६००/-	३०० मे.टन	६४,८०,०००/-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच शासन लेखा संहिता नुसार माहे फेब्रुवारी महिन्या मध्ये वार्षिक निविदा करण्याचे नियमोचित असुन नविन वार्षीक निविदा १ एप्रिल पासुन सुरू व्हावी असे निर्देश आहे. तसचे सदरच्या पुर्वीच्या मजुर दरा प्रमाणे मनपा आर्थिक हिताचे असल्याने सदरच्या पुरवठाधारका च्या मंजुर दराप्रमाणे ६ महिन्या करीता किंवा नविन पुरवठादार निश्चिती होई पावेतो मुदत वाढ देणे करीता म.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मनपाचे आर्थिक हित लक्षात घेता मे.यश केमिकल्स यांना मागील मंजुर दराप्रमाणे ६ महिन्या करीता किंवा नविन पुरवठादार निश्चिती होई पावेतो मुदत वाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे. नविन निविदा प्रक्रिया तातडीने करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.सुरेखा चंद्रकांत उगले
अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८० धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे ॲलम(तूरटी),ब्लिचिंग पावडर व क्लोरीन टनर या रसायनांचा पुर्वीच्या मंजूर दराप्रमाणे पुरवठा करणेकामी मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. विजय जाधव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. वंदना थोरात विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८५ (ब) दिनांक १९/१०/२०२३

तिरूपती केमिकल्स,जळगांव यांनी दि.१२/०९/२०२३ च्या पत्रानुसार धुळे मनपाच्या पुरवठा आदेश क्र. १७७ दि.०८/०७/२०२३ नुसार मंजुर दरानुसार मुदत वाढ देण्याबाबत अर्ज सादर केला असुन मंजुर दर १४२०० प्रती टन च्या दरानुसार पुरवठाधारक क्लोरीन टनर पुरवठा करण्यास तयार आहे.

तसेच सन २०२३-२४ साठी व त्या पुढील वर्षासाठी वार्षीक निविदा मागविणे व याकामी प्रस्तावित खर्चास मा.आयुक्त सो.यांनी दि.१२/०९/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे.या मंजुर दरा प्रमाणे निविदाप्राप्त होणे निविदा दराना मंजुरी होणे व कार्यादेश होणे या कामी विलंब होऊ शकतो.

सदयास्थितीतील पुरठाधारक यांनी मंजुर दराप्रमाणे यापुढे पुरवठा करणे व त्यासाठी मनपाने आदेश करावे या बाबतचे विनंती पत्र दिलेले आहे.

करीता मे. तिरूपती केमिकल्सयांना त्यांच्या मंजुर दराप्रमाणे पुढील ६ महिने कालावधी करीता किंवा सन २०२३-२०२४ च्या नविन निविदा कार्यवाहीमधुन नविन पुरवठाधारक निश्चिती होई पावेतो मुदत वाढ देणे करीता मान्यतेस सादर असुन सदरची मुदतवाढी नुसार संभाव्य रसायनाचा पुरवठा पुर्वीच्या मंजुर दरा प्रमाणे होणे अपेक्षित आहे.

अ.क्र.	रसायने	पुरवठाधारकाचे नाव	मंजुर दर	संभाव्य पुरवठा	अपेक्षित खर्च
१	क्लोरीन टनर (९०० kg)	मे.तिरूपती केमिकल्स	१४२००/-	३०० नग	४२,६०,०००/-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच शासन लेखा संहिता नुसार माहे फेब्रुवारी महिन्या मध्ये वार्षिक निविदा करण्याचे नियमोचित असुन नविन वार्षीक निविदा १ एप्रिल पासुन सुरू व्हावी असे निर्देश आहे. तसचे सदरच्या पुर्वीच्या मजुर दरा प्रमाणे मनपा आर्थिक हिताचे असल्याने सदरच्या पुरवठाधारका च्या मंजुर दराप्रमाणे ६ महिन्या करीता किंवा नविन पुरवठादार निश्चिती होई पावेतो मुदत वाढ देणे करीता म.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालर्यीन अहवालास अधिन राहून तसेच मनपाचे आर्थिक हित लक्षात घेता मे.तिरूपती केमिकल्स यांना मागील मंजुर दराप्रमाणे ६ महिन्या करीता किंवा नविन पुरवठादार निश्चिती होई पावेतो मुदत वाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे. नविन निविदा प्रक्रिया तातडीने करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.विजय बापू जाधव
अनुमोदक :- सौ.वंदना विक्रम थोरात

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८१ धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.आयुक्त सो. यांचे सेवेतील सियाझ वाहन क्र. एम.एच. १८ बी.सी. ७५०७ वाहनांसाठी दुरुस्ती खर्च ₹२२,४८२/- मात्रच्या खर्चास कार्यात्तर मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. विजय जाधव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८६ दिनांक १९/१०/२०२३

महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.आयुक्त सो. सेवेतील वाहन क्र. एम.एच.१८ बी.सी. ७५०७ वाहनाची सर्व्हिसींग करणेकामी अहवाल सादर केला आहे. सदरील वाहन हे म. आयुक्त सो. यांच्या सेवेतील असल्याने वाहन सुसज्ज असणे आवश्यक आहे. त्यानुसार अधिकृत वितरक-सेवा ॲटोमोटिव्ह यांचेकडुन वाहन तपासले असता वाहनात खालील प्रमाणे दुरूस्ती करावे लागेल. त्यानुसार खालील प्रमाणे दुरूस्ती कामे करुन घेणे आवश्यक आहे.

वाहनाची दुरूस्ती मजुरीसह अधिकृत वितरक-सेवा ऑटोमोटीव्ह, धुळे मारूती मोटर्स यांचेकडून करुन घेणे आवश्यक आहे. दुरूस्ती कामांची नोंद हिस्ट्री शिट मध्ये मान्यता झाले नंतर घेण्यात येऊनच देयक/नस्ती देयक अदा करण्यात येईल. देखभाल दुरूस्ती शासन निर्णय ३० सप्टेंबर २०११ महसूल व वन विभाग वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-एक उपविभाग दोन नियम ६९, पृष्ठ क्र. ३० नुसार डिझेल वाहनास ₹७५०००/- पर्यंत दुरूस्ती खर्चास वार्षीक मर्यादा आहे.

सन २०२३-२४ या चालु आर्थीक वर्षात आजपावेतो खर्च ₹६०८३८/- व या बिजकातील खर्च ₹२२४८२/- होणार आहे. असा एकुण चालु आर्थिक वर्षात ₹८३३२०/- मात्र खर्च होणार आहे. वित्तीय नियमावली नुसार आर्थिक वर्षात दुरूस्ती खर्च मर्यादा ओलांडत असल्याने मे.स्थायी समिती पुढे मंजुरी घेणे आवश्यक आहे. सदर दुरूस्ती कामे ही पुर्वमान्यतेसाठीच ठेवण्यात आले आहे.

शासकीय खरेदी कार्यपध्दती शासन निर्णय १ डिसेबर २०१६ नियम ३.२.२ मधील परिच्छेद २ व नियम ४.३ मधील तरतुदीनुसार ₹५०,०००/- पर्यंतची थेट खरेदी अधिकृत वितरक यांच्याकडुन करता येईल. असे नमुद आहे. वाहन दुरूस्ती करण्यात येणारी संस्था ही जी.एस.टी. नोंदणीकृत आहे. दुरूस्ती कामाच्या नोंदी हिस्ट्रीशीट मध्ये मान्यतेनंतर घेण्यात येऊनच देयक अदा करणेची प्रक्रिया करणेत येईल. दुरूस्ती कामाचे दर बाजारभावा प्रमाणे योग्यआहेत असे विभाग प्रमुख यांनी तांत्रिक मांन्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार खर्च रक्कम ₹२२,४८२/- मात्र मा. आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत. त्यानुसार म.आयुक्त सो. यांचे सेवेतील वाहन क्र. एम.एच.१८ बी. सी. ७५०७ या वाहनांचे नियमीत सर्व्हीसींगची कामे एस्टीमेट नुसार

स्पेअरपार्ट, मजुरीसह दुरूस्ती खर्च रक्कम **₹२२,४८२/- (अक्षरी-बावीस हजार चारशे ब्याऐंशी रुपये)** मात्रस खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणे व वित्तीय नियमावलीनुसार आर्थिक वर्षात प्रति वाहन दुरूस्ती खर्च मर्यादा ओलांडत असल्याने मे.स्थायी समितीच्या पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.आयुक्त सो. यांचे सेवेतील सियाझ वाहन क्र. एम.एच. १८ बी.सी. ७५०७ वाहनांसाठी दुरुस्ती खर्च ₹२२,४८२/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम ६७(३) क अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यावाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.विजय बापू जाधव

अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८२	मानधनावरील १ ते ३ लिपीक/टंकलेखक यांना ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.सुनिल बैसाणे	संबंधीत कर्मचारी काय काय काम करता याबाबत खुलासा करा. व कुठे कार्यरत आहे?
म.के.डी.साबळे	हे तीन कर्मचारी कोव्हीड काळात भरती करण्यात आले आहे. त्यांना विभागाने वेळोवेळी कामाची निकड लक्षात घेता मुदवाढीचा अहवाल स्थायीपुढे पाठवला आहे.
म.उपायुक्त	त्यांच्या विभागाकडून शिफारस आली आहे का? ती यामध्ये उल्लेख करायला पाहिजे.
म.सुनिल बैसाणे	कोणत्या विभागामध्ये कार्यरत आहे? मुदतवाढ कुठल्या आधारावर द्यायची? काय काम करत आहे याची माहिती द्यावी.
म.के.डी.साबळे	अभिलेख विभागाकडून मिलिंद नगराळे यांचे काम उत्कृष्ठ आहे अशी शिफारस आली आहे.
म.सुनिल बैसाणे	उर्वरित दोन कर्मचाऱ्यांचे ही सांगा. उद्या उठून आम्हाला विचारणा झाली कर्मचारी कुठे कार्यरत होते याची माहिती सादर करावी. आम्ही काय उत्तर द्यायचे? त्यांना मुदतवाढ स्थायी समितीने कोणत्या आधारावर द्यायची? आम्ही गोत्यात येऊ शकतो.
म.के.डी.साबळे	फक्त अभिलेख विभागाची शिफारस आली आहे. बाकी दोघांची शिफारस आलेली नाही.
म.सुनिल बैसाणे	या विषयाला मंजूरी देण्याआधी याबाबत खातरजमा आस्थापनाच्या वतीने तसेच मा.उपायुक्त महोदयांच्या वतीने खुलासा करुन खातरजमा करणे तरच या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यात यावी. अन्यथा चुकीचा विषय स्थायीपुढे आणला म्हणून यावर कार्यवाही करण्यात यावी. संबंधीत कर्मचारी काम चांगले करत असतील तर निश्चीतच मुदतवाढ दिली पाहिजे. परंतु

आम्हाला त्याची माहिती मिळायला पाहिजे. हा विषय प्रशासनाचा व आस्थापनाचा विषय आहे. यास अधिन राहून मान्यता द्यावी. किंवा कसे हा माझा यामध्ये आक्षेप आहे.

म.सभापती — या विषयात सन्मा. सदस्यांच्या सूचना लक्षात घेऊन आणि प्रशासनाने खातरजमा करुनच या विषयाला मान्यता देण्यात यावी.

म. विजय जाधव — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. दगडु बागूल — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८७ दिनांक १९/१०/२०२३

खालील मानधनावरील **डाटा ऐंट्री ऑपरेटर** मानधनावरील यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देणेबाबत मे. स्थायी समितीने मान्यता दिली होती.

त्यानुसार खालील मानधनावरील **डाटा ऐंट्री ऑपरेटर** यांना एकत्रित मानधनावर ६ महिनेकरीता नियुक्ती देण्यात आली होती. त्यांची ६ महिने कालावधीची नियुक्ती दि २३/८/२०२३ रोजी संपुष्ठात आलेली आहे. संदर्भीय क्र ३ अन्वये खालील मानधनावरील कर्मचारी यांनी पुढील ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

अ क्र	उमेदवाराचे नाव	पदनाम	मानधन	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक
१	श्री. पवन किशोर कानडे	डाटा ऐंन्ट्री ऑपरेटर (संगणक ऑपरेटर)	रु. १५,०००/-	२३/८/२०२३
२	श्री. मिलींद रविन्द्र नगराळे			
३	श्रीम. भाग्यश्री प्रकाश मोरे			

उक्त मानधनावरील **डाटा ऐंट्री ऑपरेटर** कर्मचा-यांची कामाची निकड पाहता त्यांचे काम समाधानकारक असून त्यांना मुदतवाढ देणेबाबत संबंधीत विभाग प्रमुखांनी शिफारस केलेली आहे.

वरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

तरी उक्त मानधनावरील **डाटा ऐंट्री ऑपरेटर** यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार में. स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे मंजूरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील १ ते ३ लिपीक/टंकलेखक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची

सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार नवीन नियुक्ती देणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर कर्मचाऱ्यांची आवश्यकता व कामाचे स्वरूप याबाबत प्रशासनाने खातरजमा करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.विजय बापू जाधव
अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८३ मानधनावरील १ ते १२ कनिष्ठ अभियंता यांना ६ महिने कालावधीकरीता नवीन नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे १ ते १२ कनिष्ठ अभियंता हे अत्यंत चांगले काम करीत आहे. त्यांनी त्यांच्या कामात अजून सुधारणा करावी व त्यांना मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात यावी.

म.के.डी.साबळे अ.क्र.५ वरील चेतन नवसारे यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेले असल्यामुळे त्यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय घ्यावा.

म. नरेंद्र चौधरी सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. कल्याणी अंपळकर विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८८ दिनांक १९/१०/२०२३

मानधन तत्वावरील कनिष्ठ अभियंता यांना रु. २०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता आदेशात नमुद अटी व शर्तीस अधिन राहून नियुक्ती देण्यात आली होती. तरी खालील नमुद केलेले कनिष्ठ अभियंता यांची ६ महिने मानधनाचा कालावधी दि. ९/१०/२०२३ रोजी संपुष्ठात येत आहे.

अ क्र	कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांचे नाव	पदाचे नाव	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक	मानधन रु
१	राकेश आट्या पावरा	कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
२	ज्योती रुपसिंग पावरा	कनिष्ठ अभियंता (विदयुत विभाग)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-

३	सत्यम रामचंद्र मोरे	कनिष्ठ अभियंता (पाणीपुरवठा)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
४	सुनिल गणपत थोरात	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
५	चेतन प्रदिप नवसारे	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
६	राहुल संजय सोनवणे	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
७	गौरव विजयसिंग पाटील	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
८	राहुल आत्माराम फुलपगारे	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
९	सायली लक्ष्मण गोराड	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
१०	श्रृती ज्ञानेश्वर पवार	कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
११	मयुर जितेंद्र भट	कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-
१२	सागर संतोष कोळी	कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक)	९/१०/२०२३	रु. २०,०००/-

विभाग प्रमुखांच्या अहवालानुसार वरील विविध विभागातील कनिष्ठ अभियंता यांचे कार्यालयीन कामाच्या सोयीसाठी ६ महिनेकरीता मुदतवाढ देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

वरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

तरी उक्त मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे निर्णयासाठी ठेवण्यात यावा ही विनंती.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील १ ते १२ कनिष्ठ अभियंता यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची

सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार नवीन नियुक्ती देणेस मान्यता देण्यात येत आहे. तथापी अ.क्र.५ वरील श्री.चेतन नवसारे,कनिष्ठ अभियंता यांचे जातवैधता प्रमाणपत्र वैधतेबाबत मुद्दा उपस्थित झालेला आहे याबाबत प्रशासनाने पडताळणी करून पुढील उचित कार्यवाही करावी. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- सौ.अंपळकर कल्याणी सतिष

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८४	सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाचे सुधारीत वार्षिक लेख्यास मंजुरी देणेबाबत विचार करणे.
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.सुनिल बैसाणे	स्थायी समितीने या विषयाला का मंजूरी द्यावी याबाबत खुलासा करावा.
म. लेखापाल	मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार नमुना २८ मध्ये स्थायी समितीपुढे ठेवण्यात येतात त्यानुसार त्याला स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.
म.सुनिल बैसाणे	कायद्यातील तरतुदी नुसार मंजूरी करीता विषय ठेवतो. या आधी स्थायी समितीच्या मंजूरीसाठी विषय आले आहे का?
म.लेखापाल	हो दरवर्षी येतात.
म.सुनिल बैसाणे	यामध्ये काही बाबी राहून गेल्या आहेत का?
म.लेखापाल	नाही.
म.सुनिल बैसाणे	या विषयाला मंजूरी देतांना लेखाच्या बाबतीत कुठल्याही अडचण येणार नाही असे तुमचे म्हणने आहे. यात उत्पन्नाच्या सर्व बाबींचा समावेश केला आहे का?
म. लेखापाल	हो यात सर्व बाबींचा समावेश आहे.
म.सुनिल बैसाणे	आपल्या धुळे शहरामध्ये टेलीक्युमिनिकेशन कंपन्यांचे रस्ता डॅमेजचे नुकसान भरपाई अदा करतात हे मिळणारे उत्पन्न आहे. या बाबींचा समावेश केला आहे का?
म.लेखापाल	५७.३७ संकीर्ण मध्ये घेतले आहे.
म.सुनिल बैसाणे	अंदाजपत्रक आपण ज्यावेळी घेतो. प्रशासनाच्या वतीने स्थायी समितीपुढे येते व स्थायी समिती मंजूरीसाठी महासभेपुढे सादर करते. ते अंदाजीत असते. वार्षीक लेख्यांचा मंजूरी देण्याबाबत जो विषय आला आहे हा अंदाजित नसतो. याठिकाणी एअरटेल नावाची कंपनी आहे यांना २०१३ ला ५३ लाख ४५ हजार तसेच जिओ कंपनीने ४२ लाख अमाउंट मनपाकडे जमा केली आहे. एअरटेल कंपनीने चालू वर्षात १ कोटी १३ लाख ५६ हजार रुपयांची अमाउंट मनपाच्या तिजोरीत जमा केली आहे. याचा समावेश लेख्यांमध्ये आहे का?
म.लेखापाल	पुढच्या लेख्यांमध्ये त्याचा समावेश होईल.

म.सुनिल बैसाणे — हे सांगायचा उद्देश असा की, या कंपन्यांच्या माध्यमातून मनपाला जे उत्पन्न अपेक्षित आहे एअरटेल कंपनीची माहिती घेतल्यानंतर साधारणत: ३ ते ४ कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित आहे. परंतु उत्पन्न १ कोटी १३ लाख जमा झाले आहे. त्यानंतर जिओ कंपनीच्या बाबतीत अनेक तक्रारी आहे. धुळे मनपाला अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. हा फार गंभिर विषय आहे. एअरटेल कंपनीने आपल्याकडे चेक जमा केला तो लेखा विभागाकडे जमा झाला पाहिजे होता. परंतु तो चेक बांधकाम विभागाकडे जमा झाला. तो साधारणत: एक ते दोन दिवसात लेखा विभागाकडे जमा झाला पाहिजे. परंतु हा चेक दहा ते बारा दिवसांनी जमा झाला. चेक उशिरा जमा होण्याचे कारण काय? हा विषय मनपाच्या आर्थिक हिताचा विषय आहे. मला अशी माहिती मिळाली की, जिओ कंपनीने अनेक वेळा मनपाकडे डी.डी. जमा केले ते बाऊंस झाले आहे. या गोष्टी आयुक्त महोदयांच्या निर्देशनास आणून द्या. या वेगवेगळया एजन्सीच्या माध्यमातून जे उत्पन्न अपेक्षित करतो ते मिळत नाही. या कंपन्यांच्या माध्यमातून वर्षाला १० ते २० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. शहरातील रस्ते ही खराब करत असतात. सव्वीस्तर किती उत्पन्न मिळाले हे दिसून येत नाही. याची सखोल चौकशी झाली पाहिजे. आणि चेक उशिरा मिळण्याचे कारण काय ? जर तो चेक गहाळ झाला तर याची जबाबदारी कोणाची राहिल? या आधीही धुळे मनपा पेटवून देण्याचा प्रकार झाला आहे. फाईल चोरली जाते असे प्रकार घडत असतील तर यात जबाबदारी निश्चीती केली पाहिजे. ठेकेदार ही त्यांच्या सोयीनुसार फाईली घेऊन जातात. जो कोणी फाईल नेईल त्याची संबंधीत विभागाने नोंद घेतली पाहिजे. या गोष्टींचा विचार केला पाहिजे. मा. लेखा विभागाच्या वरीष्ठांच्या तपासणीच्या अधिन राहून मान्यता देण्यात यावी. तसेच तपासणी बाबतचा अहवाल स्थायी समिती समोर सादर केला पाहिजे. यास अधिन राहून लेख्यांच्या विषयाला मंजूरी द्यावी. अशी विनंती करतो. या विषयात सर्वस्वी जबाबदारी लेखा विभागाची असेल. स्थायी समिती याला जबाबदार असणार नाही. असे प्रशासनाला सूचित करतो.

म.सभापती — सन्मा. सदस्यांनी दिलेल्या सूचना गंभिरतेने घ्याव्या. या विषयाला सर्व सदस्यांच्या वतीने मान्यता देणे अगोदर वित्तीय वार्षीक लेखे मुख्य लेखापरिक्षक यांच्यामार्फत तपासणी करण्यात यावी. व मुख्य लेखा परिक्षक यांच्या तपासणीच्या अधिन राहून या विषयाला मान्यता देण्यात येत आहे. तपासणीसाठी किती वेळ लागेल ?

म.मुख्यलेखा परिक्षक — सध्या मालमत्ता करचे ऑडीट चालू आहे. ते ऑडीट संपले की हे वार्षीक लेखे तपासणी करु साधारणत: १ महिना कालावधी लागेल. तपासणीसाठी एकच कर्मचारी कार्यरत आहे. यासाठी डिसेंबर च्या आत तपासणी करुन देईन.

म. सुरेखाताई उगले — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. रंगनाथ ठाकरे — विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार म.मुख्यालेखापरीक्ष यांच्या तपासणीच्या अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८९ दिनांक १९/१०/२०२३

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखासंहिता १९७१ नियम ६० व नमुना क्रमांक २८ नुसार तयार केलेले असून सदर लेख्यांचे सारांश मे.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर झालेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार म.मुख्यालेखापरीक्ष यांच्या तपासणीच्या अधिन सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाचे लेख्यास अधिनियमातील तरतुदीनुसार मान्यता देण्यांत येत आहे. म.लेखापरीक्षक यांनी सदर तपासणी १५ डिसेंबरच्या आत पुर्ण करावी.

सुचक:-श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक:- सौ.सुरेखा चंद्रकांत उगले

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८५ सन २०२२-२३ अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रक्कम प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखाशिर्षात वर्ग करणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे या विषयाबाबत खुलासा करावा.

म.लेखा लिपिक अत्यावश्यक बाबीमये काही हेड कर्मचारी अनुषंगीक देयकांबाबत असतात ७ व्या वेतन आयोगामुळे खर्च वाढले आहे. २८ कोटीची तरतूद झाली आहे. सामान्य प्रशासनावर १३ कोटीची तरतूद होती पण ६ कोटी ६९ लाख खर्च झाला आहे. राहीलेली शिल्लक दाखविली आहे.

म.सुनिल बैसाणे या ठिकाणी माझी शंका आहे. सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकातील एका शिर्षातून दुसऱ्या शिर्षाखाली कमाल मर्यादेच्या अधिन पूर्ण नियोजन बदल करायचा विषय आला आहे. हे करत असतांना कोणत्या गोष्टी डोळयासमोर ठेवून विचार करतात? येणारे उत्पन्न व खर्च झालेले उत्पन्न शिल्लक असते कशा पध्दतीने करतात?

म. लेखा लिपिक ज्या मंजूर तरतूदी आहे. अंदाजपत्रकातील त्यातून राहिलेल्या शिल्लक रक्कमा त्यांचा विचार करण्यात येतो.

म.सुनिल बैसाणे मा. आयुक्तांना दरवर्षी आर्थिक वार्षिक विवरण पत्र तयार करणे हे बंधनकारक असते का?

म.लेखा लिपिक बंधनकारक असते वर्ष संपल्यावर लवकरात लवकर लेखे सादर करणे आवश्यक असते.

म.सुनिल बैसाणे या वर्षी सादर केले का?

म.लेखा लिपिक — सुधारित अंदाजपत्रकाचा आताच महासभेचा ठराव पारित झाला त्यानंतर हा विषय आला आहे. रिकन्सीलेशन ॲक्ट नुसार स्थायीला मंजूरीचे अधिकार आहे.

म.सुनिल बैसाणे — येणाऱ्या काळामध्ये शासनाच्या वतीने दायीत्व आहे त्या दायीत्वाच्या बाबतीत कुठल्याही खुलासा नाही. शासनाच्या अनुदानाचा उल्लेख नाही. शासन किती पैसे देते आहे ? शासनाला ३०% हिस्सा द्यायचा आहे त्याबाबत अंदाजपत्रकीय विवरण पत्रामध्ये कुठेही उल्लेख नाही. जर उत्पन्न आपले १०० रुपये आणि आपल्याला द्यायचे असतील ११० रुपये तर १० रुपये कोणत्या पध्दतीने देणार आहे? आयुक्त महोदयांना देणे बंधनकारक आहे परंतु उपाययोजना कशा पध्दतीने करणार आहे? मनपाच्या मालमत्ता विकणार का? की त्या मालमत्तांवर कर्ज काढणार आहे?

म.लेखा लिपिक — हे झालेल्या खर्चाच्या बाबतीत आहे. या तरतुदी केलेल्या असतात या अंदाजीत असतात. सर्व तरतुदी विचार करुन केल्या जातात त्या कमी सुध्दा होतात किंवा जास्तही असू शकतात.

म.सुनिल बैसाणे — आपल्याला अमृत २ मध्ये केंद्र व राज्य सरकार अनुदान देते यात आपला काही हिस्सा आहे अमृत २ मध्ये आपला काही हिस्सा आहे. आपण ते कुठुन कसे देणार त्याबाबत खुलासा करावा. स्थायीपुढे मंजूरीसाठी पाठवून प्रश्न सुटणार आहे का?

म.उपायुक्त — यामध्ये बेसिक गोष्टी अशा आहेत की, हेडवाईज् शासनाने रिकन्सीलेशनचे अधिकार डिस्ट्रीब्युट केलेले असतात. हेडला जास्त खर्च होतो आणि हेडमध्ये पैसे शिल्लक राहत नाही जर महत्वाची कामे असतील तर मा. आयुक्तांना कायद्याप्रमाणे अधिकार असतात. ते एका हेडचे पैसे दुसऱ्या हेडला स्वत: च्या अधिकाराने पाठवू शकतात. परंतु त्याला बंधन आहे की, ते स्थायी पुढे सादर करणे आवश्यक आहे. स्थायीने मंजूरी दिलेली पाहिजे. शासकीय योजनेच्या हेडमधील अमाउंट काढणे दुसऱ्या हेडमध्ये टाकणे हे आयुक्त स्तरावर मान्यतेची गोष्ट नाही. त्यासाठी शासन स्तरावरच प्रपोजल पाठवून रिकन्सीलेशन करावे लागतात. त्यामध्ये आपण स्थायीच्या किंवा महासभेच्या परवानगीने परस्पर काही करु शकत नाही. ठरावाचा आधार घेऊन पुन्हा राज्य शासनाला पाठवावे लागतात. जनरली त्या हेडला लागणरा पैसा स्कीमचा पूर्ण अभ्यास करुनच दिलेला असतो. त्यामुळे त्यामध्ये रिकन्सीलेशनची गरज पडत नाही. पण लोकल लेव्हल असतील आणि काही हेडमध्ये पैसे शिल्लक असतील आणि प्रशासनाची सोय म्हणून ते इकडून तिकडे करायचे असतील सभेच्या मंजूरी नंतर आयुक्त त्यामध्ये दखल करु शकतात. फक्त त्यामध्ये लेखा विभागाने यादी आपल्यासमोर सादर केली एवढे उरले, यात एवढे कमी पडले, इकडचे काढून तिकडे टाकले व लोकल कामे आपण करुन घेतले तर ते काम सोपं होऊन जाते. फक्त लेखा विभागाने या संदर्भात डिटेल्स सन्मा. सदस्यांना उपलब्ध करुन द्यावे.

म.सुनिल बैसाणे — हा विषय राज्य शासनाला माहितीस्तव अवगत करायचा आहे. म्हणून मी यासाठी हा उहापोह केला की दरवर्षी जे विवरण पत्र आयुक्तांना द्यायचे असते त्या विवरण पत्रात आयुक्तांनी या गोष्टीचा उहापोह केला असावा असे माझे मत आहे. खुलासा करणे आयुक्तांना बंधनकारक आहे. या प्रत्येक गोष्टीसाठी महासभा किंवा स्थायी समितीला बंधनकारक नाही. काही गोष्टी राज्य शासनाच्या लेव्हलवर असतात. ते त्यांना विवरण मध्ये सर्व द्यावे लागते ते विवरण पत्र

स्थायी समितीपुढे आलेले नाही. या गोष्टी निर्दशनास आणून द्याव्या या अनुषंगाने विचार करुन विचार विनिमय करावा.

म.सभापती — याबाबत पुढील स्थायी बैठकीत सर्व माहिती द्यावी.

म.हर्षकुमार रेलन — हे काम झालेले आहे. त्यानंतर स्थायीकडे मंजूरीला आले आहे. एका गौण शिर्षामधून दुसऱ्या गौण शिर्षामध्ये ज्या रकमा टाकल्या त्याची यादी माझ्याकडे नाही.

म.नगरसचिव — आपण फक्त टिपनी वाचली टिपनी बरोबर वार्षीक लेखे व त्याचा सारांश देण्यात आला आहे. त्यामध्ये सर्व जोडलेले आहे.

म.हर्षकुमार रेलन — फक्त एक प्रश्न आहे मागच्या वर्षामध्ये शाळा दुरुस्तीसाठी ३० लाख रुपये आपल्याकडे होते आपण ते खर्च केले नाही. रक्कम उरलेली आहे. ते कुठल्या हेडमध्ये टाकले ते मला सांगा.

म.नगरसचिव — वार्षीक अंदाजपत्रकात तरतुद केली म्हणजे पैसे आपल्याकडे शिल्लक आहे असे नाही.

म. सभापती — या संदर्भात कॅबिनमध्ये या लेखाअधिकारी यांच्याकडून समजून घेऊ विषय मंजूर करण्यात यावा.

म. नरेंद्र चौधरी — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म. वंदना थोरात — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९० दिनांक १९/१०/२०२३

सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे तयार करून मे स्थायी समितीपुढे मंजूर कार्यालयीन अहवालानुसार मंजूरीसाठी सादर करणेत आलेले आहे. सदर वार्षिक लेखे सोबत जोडलेला तक्ता नमुना क्र १० मध्ये दर्शविल्यानुसार विविध लेखाशिर्षात एकूण रक्कम रूपये १५६१.१६ लक्ष चे तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च झालेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये मंजूर झालेल्या अर्थसंकल्पात प्रधान लेखाशिर्षाखाली व एका उपशिर्षातून व दुस-या गौण शिर्षाखाली अथवा एका गौण शिर्षातून दुस-या गौणशिर्षाखाली पुढील कमाल मर्यादेच्या अधिन पुर्ण नियोजन बदल करावयाच्या रकमा बदल करता येतील. त्यानुसार प्रधान लेखाशिर्षात राहिलेल्या तक्त्यानुसार शिल्लक रक्कम रूपये १६६७.६३ लक्ष मधून भागविण्याकरीता उक्त कार्यवाहीत महानगरपालिका अस्तित्वात असल्याने मे स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ नियम ३० अन्वये नमुना क्र १० मध्ये नमुद पुर्निविनियोजनास अधिनियमातील तरतुदीनुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक:-श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक:- सौ.वंदना विक्रम थोरात

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २९ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक ०९/११/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२९ आज गुरूवार दिनांक **०९/११/२०२३** रोजी **सकाळी ११-०० वाजता** सौ. किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
६	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
७	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
८	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
९	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१०	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
११	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या
१२	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती करूणा डहाळे	अति.आयुक्त
२	डॉ.संगीता नांदूरकर	उपायुक्त
३	श्री.अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरिक्षक
४	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी
५	श्री.कैलास शिंदे	अभियंता
६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
७	श्री.डॉ.एम.आर.शेख	आरोग्याधिकारी
८	श्री.एन.के.बागुल	कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग

९	श्री.चंद्रकांत उगले	सहा.अभियंता, पा.पु.विभाग
१०	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
११	श्री.प्रकाश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१२	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१३	श्री.संजय मोरे	कार्यालयीन अधिक्षक,आस्थापना विभाग
१४	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
१५	श्री.शिरीष जाधव	मालमत्ता अधिक्षक
१६	श्री.चंद्रकांत जाधव	मलेरिया पर्यवेक्षक
१७	श्री. विकास साळवे	स्वच्छता निरिक्षक घनकचरा व्यवस्थापन
१८	श्री. निखिल जगताप	लिपीक,भांडार विभाग
१९	श्री. राजेश गायकवाड	वरीष्ठ लेखापाल , मनपा शिक्षण मंडळ
२०	श्री.एच.पी.पावटे	कनिष्ठ अभियंता

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.अति.आयुक्त, उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरूवातील सन्मा.सदस्यांकडून श्रध्दांजलीची यादी सादर झालेली आहे.

भाजप परिवारातील सदस्य, खजिनदार, सरचिटणीस पदी असतांना सुध्दा चहाची किटली हातात घेवून चहा वाटप करीत असणारा,घोषणा देत बुलंद आवाजा शेवटपर्यंत देत असणारे भाजपाचे ज्येष्ठ सदस्य स्व.चंद्रकांत नारायणदास गुजराथी यांचे दिनांक ०५/११/२०२३ रोजी हदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले. चंदूकाका गुजराथी हयांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमध्ये देखील काम केले होते तसेच ते विश्व हिंदू परिषदेचे शहरमंत्री होते. तसेच गेली २८ वर्षे भारतीय जनता पार्टीचे निष्ठावान सदस्य व विविध पदावर काम केले होते. त्यानंतर ते भाजपाचे जिल्हा सरचिटणीस होते.

तरी भाजपाचे ज्येष्ठ व निष्ठावान सदस्य स्व.चंद्रकांत नारायणदास गुजराथी यांना आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली वाहण्यात येवून तसा ठराव पारीत करण्यात यावा हि विनंती.

म. सभापती सन्मा. सदस्यांनी श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

म.सुनिल बैसाणे कार्यकर्ता म्हणून पक्षांतर्गत काम करत असतांना आपल्या परिवाराकडे दूर्लक्ष होत असते. पक्ष निष्ठा दाखवतांना कौटुंबिक जबाबदारीचे भान विसरतो त्याचेच एक ज्वलंत उदाहरण म्हणजे भाजपाचे विद्यार्थी दशकेपासून श्री चंद्रकांत गुजराथी ते सर्वांना चंदुकाका नावाने परिचित होते. त्यांचे दु:खद निधन झाल्यानंतर आमच्या सारखा नविन कार्यकर्ता काम करत असतांना हळहळ सर्व कार्यकर्त्यां कडून व्यक्त झाली. धुळे शहरामध्ये पक्षाशी निष्ठापूर्वक काम करणाऱ्या व्यक्ती बद्दल भावना नागरिक व्यक्त करत असतात. चांगले काम करणाऱ्या व्यक्तीच्या मागे सर्व नागरिक आणि पदाधिकारी असतात. सभापती महोदया, काम करत असतांना परिवाराकडे सुध्दा लक्ष देऊन कामे केली पाहिजे. पक्षाची जबाबदारी आपल्यावर असली परंतु परिवाराची फार मोठी जबाबदारी असते. परिवार आपल्यावर निर्भर असतो. त्याच्या उदरनिर्वाहाची देखील काळजी घेतली पाहिजे. चंदुकाका छोटी चहाची टपरी लावून परिवाराचा उदरनिर्वाह करत होते. मला भावना व्यक्त करत असतांना वेदना होत आहे. चहा टपरीवर उदर निर्वाह होता परंतु चहासाठी लागणारा पैसा सुध्दा उपलब्ध होत नव्हता. येणाऱ्या कार्याकत्यांना ते प्रेमापोटी चहा मोफत देत असत. हे काम करत असतांना त्यांना चांगले दिवस

आले आणि त्यांना परमेश्वराने आमच्या पासून हिरावून घेतले. सभागृहाला सांगु इच्छितो आपण ज्याही पक्षात काम करत असाल कुठल्याही पक्षाशी निगडीत असाल तर प्रथमत: पक्षाशी निष्ठा ठेवावीच परंतु परिवारावर ही लक्ष ठेवावे हे जिवंत उदाहरण आहे हा एक आदर्श चंदुकाका आपल्या समोर ठेऊन गेले आहे. भारतीय जनता पार्टी मध्ये त्यांचे मोठे योगदान होते. त्यांना उमेदवारी दिलेली नसतांना त्यांनी प्रचार कार्यात झोकून घेतले. अशा भावना फार कमी लोकांमध्ये असतात. पक्षाच्या वतीने आदेश काढण्यात आला आहे. त्या आदेशाचे सर्व सन्मा. नगरसेवकांनी पालन करावे. आणि एक महिन्याचे मानधन आहे ते कुठलेही आढेवेढे न करता ते पक्षाच्या अध्यक्ष व महापौर यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या परिवाराला मदत होईल अशा पध्दतीने काम करावे. मला भावना व्यक्त करण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आभारी आहे.

म.सभापती भारतीय जनता पार्टी मोत्याची माळ आहे त्यातून एक एक मोती हरवत चालले आहे. युवराज पाटील , किरण अहिरराव, आणि आता चंदुकाका. याबाबत हळहळ कायम मनात राहणार आहे. दिवंगताना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९१ दिनांक ०९/११/२०२३

स्व.चंद्रकांत गुजराथी उर्फ चंदू काका यांच्या दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून दोन्ही मान्यवरांचे दु:खद निधन निमित्त त्यांचे आत्मास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सुचक:-श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे
अनुमोदक:- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,
सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सभेच्या सुरूवातीला सन्मा.सदस्यांकडून अभिनंदनाची यादी सादर झालेली आहे.

माजी स्थायी समिती सभापती तथा स्थायी समितीचे सदस्य व प्रभाग क्रमांक ७ चे कर्तत्वदक्ष नगरसेवक श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे यांची भारतीय जनता पार्टीच्या अनुसूचित जाती प्रदेश चिटणीस पदी सुयोग्य निवड झाल्याबद्दल त्यांचा अभिनंदनाचा ठराव आज रोजीच्या स्थायी समितीच्या सभेत पारीत करण्यात यावा हि विनंती.

सुचक:- सौ.किरण राकेश कुलेवार
अनुमोदक:- श्री.नरेश रूपला चौधरी

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९२ दिनांक ०९/११/२०२३

श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे यांची भाजपा अनुसूचित जाती प्रदेश चिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८६ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं २६ दि. २२/०९/२०२३)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागणी स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.विजय जाधव मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९३ दिनांक ०९/११/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.२६ दिनांक २२/०९/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १६६ ते १७१ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८७ मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील प्रकरण ७ (ड) अन्वये दि.२१/०७/२०२३ ते दि.१३/१०/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वंदना थोरात सदर कार्यादेशाची यादीचे अवलोकन करण्यात आले.

म.सुरेखा उगले सदर कार्यादेशाची यादीचे अवलोकन करण्यात आले.

म.सभापती मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील प्रकरण ७ (ड) अन्वये दि.२१/०७/२०२३ ते दि.१३/१०/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकन करण्यात आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९४ दिनांक ०९/११/२०२३

दि.२१/०७/२०२३ ते दि.१३/१०/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

अ. क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	१५४	२१/०७/२०२३	प्र.क्र.०७ मध्ये मोहिते यांचे घरापासुन ते मोरे यांचे घरापर्यंत बंदिस्त गटार करणे.	६,९४,५२६/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
२	१५५	२१/०७/२०२३	भंगार साहित्य, बेस स्ट्रक्चर आणि शिल्प कलेसाठी लँड स्किर्पींग डेव्हलपमेंट मधुन आर्टिफॅक्टस तयार करणे बाबत.	२३,४३,६००/-	स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सन २०२३-२४
३	१५६	२४/०७/२०२३	प्र.क्र.०५ मध्ये सैलानी कॉलनी बोर्डापासून ते समीर पंडित यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१९,९०,६८२/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
४	१५७	२७/०७/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये चंपा बाग भागात भिकन प्लंबर यांच्या घरापासून ते महाराज यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९७,१४७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३

५	१५८	२७/०७/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये पवन नगर येथे महादेव मंदिराजवळ ड्रेनेज लाईन व रस्ता काँक्रीट करणे.	१९,९८,६०७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
६	१६०	२८/०७/२०२३	प्र.क्र.१ मध्ये लक्ष्मी नगर ते दिपक कापुरे वलवाडी रस्त्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२२,९६,२०४/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
७	१६१	२८/०७/२०२३	प्र.क्र.१ मध्ये इंदिरा नगर भागात विविध ठिकाणी गटार करणे.	९,९३,३२७/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
८	१६३	२८/०७/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये हिदायत मस्जिद लागून ते शेख साहेब यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,९१,७६४/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
९	१६४	२८/०७/२०२३	प्र.क्र.१९ मध्ये जामचा मळा नाजीम ठेकेदार यांचे घरापासून अशपाक पिंजारी यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,९४,३६४/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१०	१६६	२८/०७/२०२३	महिंदळे शिवार स.क्र.४३/३ A गोदाई कॉलनीतील मोकळ्या जागेस काँक्रीटसह पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	९,९९,१४९/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
११	१६७	०४/०८/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये पवन नगर येथे महादेव मंदिराजवळ ड्रेनेज लाईन व रस्ता काँक्रीट करणे.	१९,९८,६०७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१२	१६८	०४/०८/२०२३	प्र.क्र.१३ मध्ये गफ्फुर नगर मस्जिद ते हाजी प्लास्टिक निसार यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९९,७४७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१३	१६९	०४/०८/२०२३	प्र.क्र.०८ मध्ये आझाद नगर पोलीस चौकी ते कसाब वाडा मस्जिद ते जलील अन्सारी ते अफजल खान यांचे घर ते गुलाब धोबी ते नवाब मास्तर यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९४,१४०/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१४	१७०	०४/०८/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये रंगरेज भाई यांचे घरापासून ते साबुद्दीन भाई यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१९,९९,७४७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१५	१७१	०४/०८/२०२३	प्र.क्र.११ मध्ये परमपूज्य संत जलाराम बाप्पा मंदिर मार्ग या नावाची कमान करणे.	२३,८०,८०१/-	मनपा निधी अंतर्गत सन २०२२-२३
१६	१७२	०८/०८/२०२३	धुळे मनपा धुळे पाणी पुरवठा या अत्यावश्यक सेवेचे कामी कर्मचारी उपलब्ध करून देणे बाबत.	२३,५८,१०८/-	मनपा निधी अंतर्गत
१७	१७६	१८/०८/२०२३	प्र.क्र.११ मध्ये स्वामी नारायण कॉलनी मध्ये अशोक कोठावळे ते सोमनाथ पवार व लक्ष्मी नगर मध्ये विजू चौधरी ते राजपूत ते जय मल्हार इलेक्ट्रिक ते जोशी ते विजू भिका चौधरी व सुरुदेय गोयीन यांच्या घरापासून ते कीर्ती बराळे पर्यंत ते सागर परदेशी यांच्या घरापर्यंत बंदिस्त गटार करणे.	२०,०३,४०३/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
१८	१७७	१८/०८/२०२३	अजबे नगर पंचशील स्तंभ येथे अभ्यासिका तयार करणे.	२४,९९,९७३/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
१९	१७८	१८/०८/२०२३	प्र.क्र. १२ कबीर गंज सर्व्हे नं.४०३ येथे अभ्यासिका बांधणे.	२४,९६,३५३/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
२०	१८१	२१/०८/२०२३	प्र.क्र.१० मध्ये दादा माळी यांच्या घरापासून ते नितीन कोळी यांचे घरापावेतो काँक्रीट रस्ता व गटार करणे.	२४,४८,७४०/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
२१	१८३	२१/०८/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये नूतन कृषिनगर बोर्डापासून ते चव्हाण यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,७९,३४०/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत

२२	१८४	२१/०८/२०२३	प्र.क्र.१८ लोकरे नगर भागात नैनेश साळुंखे ते भूषण पाटील घरापावेतो बंदिस्त गटार व रस्ता डांबरीकरण करणे.	२४,५४,११६/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२२-२३
२३	१८७	२४/०८/२०२३	प्र.क्र.०४ मध्ये विजय शॉप पासून ते श्री.सुरेश दादा पाटील यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,७२,२८७/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
२४	१८८	२४/०८/२०२३	प्र.क्र.०४ मध्ये जागृती मित्र मंडळ पासून ते महाराणा प्रताप शाळे पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१४,९५,७५७/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
२५	१८९	२४/०८/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये राजेंद्र भावसार यांचे घरापासून ते चित्रकला महाविद्यालय पर्यंत नूतन पदवी (पाडवी) हायस्कूल समोरील रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१९,९२,५११/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२२-२३
२६	१९०	२४/०८/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये मलेरिया ऑफिस पासून ते हिलाल वाघ यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१९,९५,३९२/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
२७	१९१	२४/०८/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये कालिका देवी नगर कुलकर्ने यांचे घरापासून वाघ बापू यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी व गटार करणे.	१९,९८,३५६/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
२८	१९२	२४/०८/२०२३	प्र.क्र.०४ मध्ये चैत्रलाल केसावलेकर यांच्या घरापासून ते पारस काळकर यांचे घरापावेतो पेव्हर ब्लॉक बसविणे.	१४,९२,१८३/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
२९	१९३	२४/०८/२०२३	प्र.क्र.०४ मध्ये श्री.योगेश चव्रे यांचे घरापासून ते लॉ कॉलेज पावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,४२,१९६/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
३०	१९४	२४/०८/२०२३	प्र.क्र. १८ जिरेकर नगर सर्व्हे क्र.५२६ व ५२७ येथे अभ्यासिका करणे.	२४,९८,१६८/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
३१	१९५	२४/०८/२०२३	प्र.क्र. ०३ सं नं.३३/३ देवपूर विटाभट्टी येथे अभ्यासिका तयार करणे.	२४,९९,६१९/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२१-२२
३२	१९८	०४/०९/२०२३	३३६/२ पवन नगर भागात खुल्या जागेत सुशोभिकरण व उद्यान करणे.	२४,९०,३८८/-	नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
३३	२०१	०४/०९/२०२३	प्र.क्र.१८ मध्ये अवधान येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्या समोरील रस्ता काँक्रीट करणे.	२४,९९,११७/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
३४	२०५	०८/०९/२०२३	प्र.क्र.१० मध्ये बंधुभाव मित्र मंडळ ते रत्नाकर माळी यांच्या घरापर्यंत आर.सी.सी.पाईप गटार करणे.	२४,९७,९३७/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२१-२२
३५	२०६	०८/०९/२०२३	प्र.क्र.१० मध्ये तुपे यांचे घरापासून ते विनायक नगर पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१९,९१,५६०/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
३६	२०७	१५/०९/२०२३	प्र.क्र.१३ नजम टॉवर , पुनम टॉवर, कल्याण शेठ यांचे मागील रस्ते काँक्रीट करणे.	१९,८८,८५४/-	मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत
३७	२०९	१८/०९/२०२३	हरणमाळ तलाव भरण्यासाठीचा द्रुतगती कालवा तातडीने दुरुस्ती करणे मुंबई प्रांतिक अधि.६७(३) (उ) अन्वये	९,९९,७१३/-	
३८	२११	१८/०९/२०२३	धुळे मनपा हद्दीतील विविध ठिकाणी सिमेंट बेंचेस बसविणे.	५,००,३२०/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२३-२४
३९	२१२	१८/०९/२०२३	प्र.क्र.१६ संघमा चौक ते दिपक परदेशी यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२४,९९,९५६/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना
४०	२१३	१८/०९/२०२३	प्र.क्र.४ मध्ये आग्रारोड ते एकविरा देवी मंदिर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१९,३९,२७९/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना

					अंतर्गत सन २०२२-२३
४१	२१४	२०/०९/२०२३	प्र.क्र.७ मोगलाई भागात पोलीस चौकी ते संत गाडगे बाबा मठा पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार करणे.	२४,९७,१६०/-	OFC रस्ता दुरुस्ती निधी अंतर्गत
४२	२१५	२०/०९/२०२३	प्र.क्र.१० नवीन भिलाटी येथे रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,६८,२५०/-	OFC रस्ता दुरुस्ती निधी अंतर्गत
४३	२१६	२०/०९/२०२३	प्र.क्र.१० मध्ये आनंदा महाजन यांचे घर ते धनदाई मेडिकल ते साहेबराव बोरसे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,९७,१५३/-	OFC रस्ता दुरुस्ती निधी अंतर्गत
४४	२१७	२०/०९/२०२३	प्र.क्र.७ गवळीवाडा भागात प्रवेशव्दार पासून ते बिसमिल्ला व्यायाम शाळे पर्यंत काँक्रीटीकरण करणे.	२४,९९,९१३/-	OFC रस्ता दुरुस्ती निधी अंतर्गत
४५	२१८	२०/०९/२०२३	प्र.क्र.९ मध्ये कुंभार खुंट ते नाला किनार व मोरे हॉस्पिटल ते साई सैलानी मंदिर पावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,८५,८०६/-	OFC रस्ता दुरुस्ती निधी अंतर्गत
४६	२२०	२०/०९/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये नाना नाणी पार्क व स्वर्गीय विलमादेवी ओमप्रकाश अग्रवाल उद्यान विकसित करणे.	१९,९५,१८६/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत
४७	२२२	२६/०९/२०२३	प्र.क्र.१० मधील देविदास कॉलनी येथे सामाजिक भवन बांधणे.	१४,९९,०६१/-	नगरसेवक निधी
४८	२२३	२६/०९/२०२३	प्र.क्र.२ सर्व्हे नं.१०५/१ सिटी एस.नं.८२०२ मध्ये ओपनस्पेसळा संरक्षण भिंत बांधणे.	१९,९६,०००/-	आमदार निधी
४९	२२६	२६/०९/२०२३	प्र.क्र.१७ पाटोळे घर रेशन दुकान ते शिवशंभू मिल्क केंद्र पावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१९,९८,८२१/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत
५०	२२७	२६/०९/२०२३	प्र.क्र.१५ मध्ये उदयनगर येथे बागले यांचे घरापासुन ते विद्यामंदिर कॉलनी जगताप यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	९,९२,४०२/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२२-२३
५१	२२८	२६/०९/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये कैलास नगर चितोड नाल्यास पुरापासून संरक्षण होण्यासाठी भिंत बांधणे.	१४,७७,७८७/-	खासदार निधी
५२	२३५	१३/१०/२०२३	प्र.क्र.६ मध्ये नकाणे येथील आदिवासी वस्तीत श्री.गणपत मोरे घर ते संतोष मोरे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१४,९८,९३२/-	खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२३-२४

सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८८ शहरातील पाणी पुरवठा नियोजन सुरळीत करण्याकरिता आवश्यक मनुष्यबळ बाह्ययंत्रने मार्फत पुरविणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे सदरच्या विषयाबाबत संबंधित विभागाने खुलासा करावा.

म.सहा.अभियंता — धुळे शहरातील जलकुंभ, जलशुध्दीकरण केंद्र पंपींग स्टेशन या ठिकाणी वर्ग ४ कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने मागील वर्षामध्ये आस्था स्वयं रोजगार संस्था यांच्या मार्फत ५० कर्मचारी पाणीपुरवठा विभागात घेतले होते. मे २०२३ ला तत्कालीन आयुक्त यांनी त्यांच्या बाबतीत तक्रारी आल्याने त्यांची निविदा रद्द केली होती. जून पासून मनुष्य बळ आवश्यक असल्याने ४/७ २०२३ रोजी निविदा काढली होती. त्या निविदेत कोणी भाग घेतला नसल्याने ९/८/२०२३ रोजी फेर निविदा मागविण्यात आली. त्यात एकूण ६ निविदा धारक आले होते. पैकी ३ निविदा धारकांनी त्याची पूर्तता न केल्याने व्यापारी लिफाफा उघडण्यात आलेले नाही. उर्वरित ३ निविदा धारकांचे दर मंजूरीसाठी हा विषय स्थायी समितीपुढे आला आहे.

म.सुनिल बैसाणे — आपण बाहय स्त्रोताद्वारे कर्मचारी भरुन पाणी पुरवठयाचे काम व देखरेख करत होतो. परंतु आता ११ गावांचा समावेश मनपात झाला आहे. त्याचा देखील पाणी पुरवठयाचा प्रश्न अनेक वेळा उपस्थित झाला आहे. तर ५० लोकांचीच निविदा प्रक्रीया केली आहे. आणि येणाऱ्या काळात अधिक कर्मचारी लागले तर त्याची उपाययोजना कशा पध्दतीने करणार आहे.

म.सहा. अभियंता — आपण त्यात कर्मचारी वाढवू शकतो कमी ही करु शकतो.

म.सुनिल बैसाणे — त्यासाठी नविन निविदा करणार का ? याच निविदेत करणार आहे.

म.सहा. अभियंता — याचत निविदेत करता येईल. याबाबत आपण दरांना मंजूरी होत आहोत.

म.सुनिल बैसाणे — याबाबत टिपनीत उल्लेख नाही. हा विषय पाण्याच्या प्रश्नाशी संबंधीत आहे. धुळे मनपाची कार्यपध्दती चांगली होण्यासाठी विषय आहे. जर लाईनचे कर्मचारी अधिक लागले त्यासाठी अमाउंट लिहली ५० कर्मचाऱ्यांची आणि दरांना मंजूरी निविदा धारकास देतोय २० कर्मचारी वाढले तर त्याची पुन्हा निविदा प्रक्रीया करणार किंवा यात समावेश करणार प्रशासकीय अटी शर्ती ज्या काही असेल मा. आयुक्त महोदयांशी त्या पध्दतीने चर्चा करुन निर्णय घ्यावा. निविदा प्रक्रीयेसाठी आपल्याला प्रचंड उशिर होतोय. पहिल्यांदा निविदेत कोणी भाग घेतला नाही दुसऱ्या निविदा प्रक्रीयेत ६ ते ७ लोकांनी भाग घेतला या सर्व गोष्टींचा विचार करुन निर्णय घ्यावा. मागील आस्था संस्थेचा अनुभव पाहता ते कर्मचाऱ्यांना कमी पगार देत होते. मनपाकडून जास्तीचे मानधन घेत होते. कर्मचाऱ्यांचे पेमेंट बँकेत होत नव्हते. या संस्थेच्या माध्यमातून तसा अनुभव आला तर त्याबाबत उपाययोजना अटी शर्ती मध्ये करणार आहे का? जे काम करत होते त्यांचे मानधन ३ ते ४ महिन्यांपासून दिले नव्हते. तो प्रश्न पुन्हा उपस्थित होऊ नये हे जे काम संस्थेच्या माध्यमातून करणार आहे ते कशातून करणार मनपा फंडातून करणार किंवा कशातून करणार याचा कुठेही उल्लेख नाही. ती एजन्सी सक्षम आहे का मनपाच्या आर्थिक परिस्थिती नसतांना कर्मचाऱ्यांचे मानधन एजन्सीच्या माध्यमातून डिपॉझिट बँकेत जमा करुन घ्यावे. जेणे करुन जे काम करता त्यांना कामाचा मोबदला मिळाला पाहिजे. आणि कुठेही याची तक्रार आली नाही. पाहिजे. मा. आयुकत महोदयांशी चर्चा करुन आहे त्या दरामध्ये मनपावर आर्थिक बोजा न होता करावे. सदरच्या विषयाला मंजूरी द्यावी.

म.विजय जाधव — सदरचा विषय मंजूर करावा.

म.सभापती

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत सदर संस्थेशी प्रशासनाने आवश्यक तो अर्टी व शर्तीचा करारनामा करण्यात यावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९५ दिनांक ०९/११/२०२३

दि. ३१/०५/२०२३ रोजीच्या पाणी पुरवठा नियोजन पदाधिकारी यांच्या झालेल्या बैठकीनुसार, धुळे महानगरपालिका हद्दीतील पाणीपुरवठा मुख्य तीन जलस्त्रोतावरून होत असतो. शहरात एकूण २९ हून अधिक जलकुंभ अस्तित्वात आहे. लोकसंख्या वाढी प्रमाणे भावी काळात जलकुंभ यांच्या संख्येत वाढ नाकारता येत नाही. तसेच वाढते शहरीकरण, हद्दवाढ गावांचा समावेश, शहराची पाण्यासंबंधी वाढणारी निकड/गरज व पाणी पुरवठा करणारे कर्मचारी (व्हॉल्वमन, वॉचमन, पंप ऑपरेटर) यांच्या संख्येतील कमतरता ह्या सर्व बाबी लक्षात घेता शहरात पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे अवघड आहे; परिणामी धुळे शहरातील नागरिक व सन्मा. नगरसेवक यांच्या रोषास प्रशासनाला सामोरे जावे लागते.

शहरात बरेच जलकुंभांवर वॉचमन नाहीत त्यामुळे जलकुंभाबाबतची स्थिती समजण्यास कठीण होते, सदरच्या जलकुंभावर एखादी समस्या निर्माण झाल्यास बराच कालावधी उलटून गेल्यावर लक्षात येते परिणामी समस्या वरील निराकारण करण्यासाठीचा खर्च व कालावधी यात वाढ होते. तसेच काही जलकुंभावरील वॉचमन सेवा निवृत्त झाले असून त्या ठिकाणी दुसरे वॉचमन यांची नियुक्ती केलेली नाही . पुरेसे व्हॉल्वमन नसल्या कारणांमुळे शहरात पाणी सोडण्यास दिरंगाई व नियंत्रण करणे कठीण होते. शिवाय व्हॉल्वमन यांना कराव्या लागणाऱ्या पाणी पुरवठा भागाची सिमा वाढल्यामुळे व्हॉल्वमन भागात पाणी अधिक सोडतात व पाण्यावरचे नियंत्रण जाऊन काही भागात अधिक पाणीपुरवठा होतो व पाण्याचे तास देखील वाढतात. त्यामुळे जलकुंभावर आवश्यक संख्येत वॉचमन व भागात पाणी सोडण्यासाठी व्हॉल्वमन यांची सक्त गरज आहे.

उक्त प्रमाणे वर्ग -४ कर्मचार्यांची आवश्यकता लक्षात घेऊन किमान वेतनकरिता निविदा दर मागविणे उचित राहील. या बाबत नवीन एकूण ५० कर्मचार्यांची ई- निविदा काढून बाह्य यंत्रणेला देणे उचित राहील असे मत आहे. निविदा मागविणे योग्य राहील. धुळे शहरात पाणीपुरवठा योजने करता वर्ग-०४ पाणीपुरवठा विभागासाठी कंत्राटी कर्मचारी नेमणे आवश्यक आहे त्यासाठी सन २०२३-२४ या अर्थसंकल्पात रु. ७५ लक्ष मात्र कंत्राटी कर्मचारी नेमणे या लेखात तरतूद करण्यात आली आहे परंतु सदरची तरतूद कमी असल्याने या आर्थिक वर्षात कमी पडणार आहे त्याकरिता या कार्यालयामार्फत मा. महापौर सौ यांना जा.क्र./पापुवि/२८९/२०२३ दिनांक ६/०७/२०२३ अन्वये कंत्राटी कर्मचारी नेमणुकीसाठी रु.१.६५ कोटी मे महासभेपुढे लेखाशिर्षाकात तरतूद करण्यात आलेली आहे. सदरच्या तरतुदीचा विचार करिता पाणीपुरवठा विभागात एका कर्मचारी यांच्या EPF, ECIC, महागाई भत्ता, घरभाडे, मालकाचा हिस्सा धरून किमान वेतन रुपये १४,२२८/- ४ तासांसाठी प्रति महिना प्रति क्रमचारी घेतला आहे. यानुसार ५० कर्मचारी यांच्यासाठी होणारा खर्च हा ८५,३६,८००/- मात्र होणार आहे. निविदा मागवितांना सेवाशुल्क टक्केवारी दराप्रमाणे

मागविण्यात आली आहे. यानुसार ५% सेवाशुल्क धरून निविदा रक्कम रु.८९,६३,६४०/- ची प्रशासकीय मंजुरी आदेश तयार करण्यात आला असून त्याचप्रमाणे निविदा मागविण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने, प्रस्तुत प्रकरणी शहरातील पाणीपुरवठा नियोजन सुरळीत करण्याकरिता आवश्यक मनुष्यबळ बाह्य यंत्रणेमार्फत उपलब्ध करणे बाबत विभागाने नमूद केले आहे सन २०२३-२४ या अर्थसंकल्पात रु.१.६५ कोटी मात्र पाणीपुरवठा कंत्राटी कर्मचारी नेमणे या लेखाशीर्षकात तरतूद असून सदर आर्थिक वर्षात बारा महिन्यांकरिता ५० कर्मचारी पुरविण्याच्या कामास रु.८९,६३,६४०/- मात्र रकमेस प्रशासकीय मान्यतेसाठी पुढील योग्य त्या निर्णयार्थ सादर. असा अभिप्राय लेखा विभागाकडुन प्राप्त झाला आहे.

धुळे महानगरपालिका मार्फत मनुष्यबळ पुरविण्यासाठी दि.०४/०७/२०२३ ई-निविदा सूचना क्र.६० नुसार ई-निविदा मागविण्यात आली होती. परंतु कोणत्याही ठेकेदाराने भाग न घेतल्याकारणाने पुन्हा दि.०९/०८/२०२३ ई-निविदा सूचना क्र.७२ (फेर ई-निविदा २ री वेळ) नुसार ई-निविदा मागविण्यात आली त्यापैकी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी भाग घेतला होता.

१) सावितामाई एस.बी. सेवा सह. संस्था

२) M/s. बडगुजर अँड कंपनी

३) के.जी.एन. केटर्स अँड ट्रेडर्स

४) महाजन ब्रदर्स

५) फ्रेंड्स इंजी. कार्पोरेशन

६) यशश्री एन्टरप्राईजेस

उक्त निविदाधारकापैकी अ.क्र.२,४,५ या ३ निविदाधारकांनी कागतपत्रांची पूर्तता न केल्याने व्यापारी लिफाफा उघडण्यात आलेला नाही उर्वरित ३ निविदाधारकांचे व्यापारी लिफाफा उघडला असता त्यांचे दर खालीलप्रमाणे:

१) सावितामाई एस.बी. सेवा सह. संस्था - ४०%

२) के.जी.एन. केटर्स अँड ट्रेडर्स -४५%

३) यशश्री एन्टरप्राईजेस- ४८%

उक्त प्रमाणे आलेल्या सर्वात कमी दाराची निविदा ठेकेदार सावित्रीमाई एस.बी.सह.संस्था यांचे शे.४०% सेवाशुल्क आली होती.

त्यानुसार ठेकेदार सावित्रीमाई एस.बी.सह.संस्था जाक्र/.धुमपा/पापुवी/६२५/२०२३ दि.२६/१०/२०२३ नुसार वाटाघाटीचे पत्र दिले होते. वाटाघाटी नंतर ठेकेदार सावित्रीमाई एस.बी.सह.संस्था यांनी दि.२६/१०/२०२३ रोजी संबंधित काम हे सेवाशुल्क व अस्थापना खर्च यांवर ३०% जास्ती दराने मी काम करण्यास तयार आहे, असे पत्र दिले आहे.या नुसार मासिक खर्च हा रु.९,२४,८२०/-मात्रचा असून वार्षिक खर्च रु.१,१०,९७,८४०/- मात्र होणार आहे.

उक्त प्रमाणे ठेकेदार सावित्रीमाई एस.बी.सह.संस्था यांनी वाटाघाटी अंती सेवाशुल्क व अस्थापना खर्च यांवर ३०% जास्ती दरासाठी व १,१०,९७,८४०/- मात्र रक्कमेस मंजुरीस्तव मे. स्थायी समितीकडे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून शहरातील पाणी पुरवठा नियोजन सुरळीत करण्याकरिता आवश्यक मनुष्यबळ पुरविण्यासाठी मे. सावितामाई एस.बी. सेवा सह. या संस्थेचे वाटाघाटी अंती आलेल्या दरास (सेवाशुल्क व अस्थापना खर्च यांवर ३०% जास्तीने) व १,१०,९७,८४०/- मात्र रक्कमेस १ वर्षांसाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.तसेच मनपाच्या विविध विभागासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास सदर संस्थेमार्फत मंजूर निविदा दरानुसार घेणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर संस्थेचे काम समाधानकारक असल्यास त्यांना नियमानुसार मे.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यात यावी. याबाबत मा.लेखापरीक्षक यांच्या अभिप्रायानुसार आवश्यक ती पुर्तता विभागाने करावी. सदर संस्थेशी प्रशासनाने आवश्यक त्या अटी व शर्तींचा करारनामा करण्यात यावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१८९ धुळे महानगरपालिका कडील स्वच्छता हि सेवा अभियानाची अंमलबजावणी करीता आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना साफसफाईचे साहित्य खरेदी करण्यात आल्या त्याकामी कार्योत्तर मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.विजय जाधव विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९६ दिनांक ०९/११/२०२३

धुळे महानगरपालिका कडील स्वच्छता हि सेवा अभियानाची अंमलबजावणी करीता आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना साफसफाईचे साहित्य खरेदी करण्यासाठी कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत मा.आयुक्त सो यांच्या मंजुर टिपणी अन्वये सुचित केले आहे.

तरी धुळे महानगरपालिका कडील शासनाच्या प्राप्त निर्देशानुसार स्वच्छता हि सेवा अभियानाची अंमलबजावणी करणे करीता आरोग्य विभागातील सफाई कर्मचाऱ्यांकरीता साफसफाईचे साहित्य मिळणेबाबत मा उपायुक्त सो यांनी.लेखी मागणी पत्र मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने भांडार विभागा कडेस मागणी पत्र सादर केलेले आहे.

सदरचे नियोजन संदर्भात मा.आयुक्त सो यांचे सुचने नुसार तातडीने असल्याने त्वरीत सेवा उपलब्ध करुन घ्यावी लागणार असुन सदरचे साहित्य स्थानिक सेवा धारक मे.सचिन

एस.कोडगीर यांचे कडुन करुन घेऊन मा.स्थायी समिती पुढे कार्योत्तर मंजुरी घेण्यास सादर करणेस येणार आहे.

तरी सदरचे सेवा धारक कडुन खालील प्रमाणे काम करुन घेण्यात आलेले असुन त्यांचे कडील बिला प्रमाणे त्यांनी खर्च दर्शविलेला आहे.

अ.क्र.	साहित्याचे तपशिल	एकुण नग	प्रति दर	एकुण खर्च
१.	बांबु खराटे	३००	१५०	४५०००/-
२.	खराटे	२००	९०	१८०००/-
३.	फायबर पाटी	१५०	४५०	६७५००/-
४.	फावडे दांडसह	१४०	१५०	२१०००/-
५.	टिकम दांडसह	७०	१९०	१३३००/-
६.	कुऱ्हाड दांडसह	४०	१९०	७६००/-
७.	घन दांडसह	१४	४५०	६३००/-
८.	पार	१४	६५०	९१००/-
९.	लोखंडी पंजर	१००	३५०	३५०००/-
१०.	कुदळ	७०	१९०	१३३००/-
११.	कोयता	७०	२१०	१४७००/-
			एकुण खर्च	**२,५०,८००/-**
			GST १८%	**४५,१४४/-**
			एकुण खर्च सर्व करासहित	**२,९५,९४४/-**

तरी वरील प्रमाणे काम करुन घेण्यात आले नुसार GST व इतर करासहित एकुण खर्च रु.**२,९५,९४४/-** मात्र अदा करणेस महानगरपालिका अधिनियम ५ (२) २ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी घेण्याकरीता मे.स्थायी समिती पुढे सदरचा विषय मंजुरीस्तव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका कडील स्वच्छता हि सेवा अभियानाची अंमलबजावणी करीता साफसफाईचे विविध साहित्य खरेदी करण्यात आले सदर काम हे मे. सचिन एस.कोडगीर यांच्याकडून विनानिविदा करून घेण्यात आले. सदर कामास रू.२,९५,९४४/- मात्रला महानगरपालिका अधिनियम कलम ५ (२) २ अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९०	अक्कलपाडा पाणी पुरवठा योजनेसाठी बाहय यंत्रणे मार्फत ३३ कर्मचारी उपलब्ध करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.सुनिल बैसाणे	सदर विषया बाबत सव्वीस्तर खुलासा करावा.
म.अभियंता(विद्युत)	आपण ही निविदा स्थायी समितीकडे मंजूरीसाठी आणली आहे. ती फक्त कमचारी पुरवठयाची नाही तर अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना पूर्ण क्षमतेने चालू झाली आहे. तर त्या ठिकाणी लागणारा टेक्नीकल स्टाफ यात पंप ऑपरेटर, फिल्टर ऑपरेटर, हेल्पर/वॉचमन फिल्टर इन्सपेक्टर, इलेक्ट्रीशिएन हे कर्मचारी या योजनेवर काम करणार आहे. यामध्ये डे टु डे मेन्टेनंस, पंपाची निगा राखणे, वेळोवळी सर्व्हिसिंग करणे, विद्युत पुरवठा केबलची दुस्ती करणे पंपींगच्या प्रति तास नॉदी ठेवणे रजिस्टर अपडेट करुन मनपास सुपूर्द करणे अक्कलपाडा जॅक्वेल ३३ केव्ही सबटेशन अंतर्गत् व बाहय देखरेख करुन मनपा पाणी पुरवठा केंद्र मालमत्ता संभाळणे. धुळे ते अक्कलपाडा पाईपलाईनचे पेट्रोलिंग करणे त्यासाठी मक्तेदाराकडून फोर व्हीलर गाडी असेल. तेथे इजिनिअर व केमीस्ट यांच्या नियंत्रणात हे सर्व कर्मचारी काम करतील यामध्ये क्रीयेटीव्ह मेन्टेनंस, पंपाचे लॅण्ड बदलणे, रिसीव्ह करणे हे कामेअसे एकत्रीत काम आपण या ठेकेदाराला देतोय.
म.सुनिल बैसाण	आपण या ठिकाणी सर्व मेन्टेनंस या ठेकेदाराकडून करणार आहे का?
म. अभियंता(विद्युत)	मायनर मेन्टेनंस करणार आहोत.
म. सुनिल बैसाणे	हे कर्मचारी ट्रेन आहे की अनट्रेन आहे हे कोण तपासणार?
म. अभियंता(विद्युत)	यात क्वालीफिकेशन दिलेली आहे फिल्टर ऑपरेटर ते आय टी आय झालेला असावा. फिल्टर इन्स्पेक्टर बीएससी झालेला असावा. इलेक्ट्रीशिएन आयटीआय झालेला असावा. ठेकेदाराने ते देणे बंधनकारक आहे.
म.सुनिल बैसाणे	परंतु या कर्मचाऱ्यांची तपासणी आपण स्वत: करणार का त्या ठेकेदारावर सोडणार आहे.
म. अभियंता(विद्युत)	आपण त्यांची पात्रता तपासून घेणार आहोत. त्यानंतर ठेका देणार आहोत.
म.सुनिल बैसाणे	सभापती महोदया ही अत्यंत महत्वपूर्ण योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून धुळेकर नागरिकांना जे अभिवचन दिले आहे की किमान २ दिवसाड पाणी देऊ या योजनेवर काम करणारी ही यंत्रणा आहे परंतु बागुल साहेब ही एजन्सी आहे नासिकची आणि काम करणार धुळयात मग काम करणारे कर्मचारी नासिकचे देणार का धुळयाचे देणार? किंवा कसे जर नासिकचे कर्मचारी दिले तर त्यांची निवासी व्यवस्था त्यांची जबाबदारी आहे परंतु धुळयातील कर्मचाऱ्यांना दिले तर कामामध्ये सुसुत्रता येईल. कारण ऐनवेळी जर प्रश्न उपस्थित झाला तो लवकर सोडवला गेला पाहिजे. बाहेरगावी कर्मचाऱ्यांबाबत ते अपडाऊन करत असतात. परंतु ही अत्यावश्यक सेवा आहे धुळयातीलच जर कर्मचारी त्यांची शैक्षणीक पात्रता चांगली असेल जो त्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाला असेल अशाच कर्मचाऱ्यांना नेमावे व त्यांची गुणवत्ता आपण स्वत: तपासावी. एजन्सीला काम दिले म्हणून हा प्रश्न सुटणार नाही. देखरेख आपल्या व्यवस्थेतून होणार आहे. कर्मचाऱ्यांची गन्हेगारी पार्श्वभूमी ही बघीतली गेली पाहिजे. ज्याला

चारित्र्य पडताळणी दाखला मिळाला असेल अशाच कर्मचारी तेथे नेमला पाहिजे. यात मनपाचे पण दायित्व आहे. यांचे मानधन कोणत्या निधीतून देणार आहे?

म. अभियंता(विद्युत) हे मनपा निधीतून खर्च आहे पाणीपुरवठा लेखाशिर्ष जे आहे देखभाल दुरुस्ती त्यात आपण तरतूद केली आहे त्या तरतूदीतून मनपा निधीतून हा खर्च होणार आहे.

म.सुनिल बैसाणे त्या अटी शती या सर्व गोष्टी आल्या पाहिजे बँक गॅरंटी राष्ट्रीयकृत बँकेची घ्या. आपण पाणी परुवठयाच्या विषयामध्ये गांभिर्याने लक्ष देतात आणि हा विषय धुळे शहराच्या हिताचा असल्यामुळे अति. आयुक्त महोदया, आपण स्वत: या गोष्टी तपासून घ्याव्या. आणि एक दिवस हे कर्मचारी काय काम करणार आहे अककलपाडयाला जाऊन यांची चाचणी घ्यावी. अटी शर्तीचे उल्लंघन होणार नाही , लेखा आक्षेप होणार नाही या सर्व गोष्टी तपासून घ्याव्या. विषयाला मंजूरी द्यावी.

म.दगडू बागुल सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच तांत्रिक कर्मचारी नियुक्त करतांना त्या पदासाठी असणारी शैक्षणिक अर्हता तपासण्यात यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९७ दिनांक ०९/११/२०२३

धुमपा निविदा सुचना क्र. दि.३१/०५/२०२३ च्या निविदे करीता मे.बडगुजरॲण्ड कंपनी, नाशिक L-1निविदाधारक यांचे दर ९ असे प्राप्त आहेत.सदरचे निविदा दराच्या मान्यतेसाठी निविदा समितीकडे प्रस्ताव सादर झाला असता. दि.१९/०६/२०२३ च्या निविदासमितीच्या निर्देशानुसार प्राप्त निविदाधारकांच्या L-1निविदाधारकाचे प्राप्त असलेले दर जास्त असल्याने त्याना वाटाघाटी बाबत कळविण्यास निर्णय घेण्यात आला.

धुमपा जा.क्र/५० दि.२२/०६/२०२३ च्या पत्रानुसार मे.बडगुजर ॲण्ड कंपनी,नाशिक यांना कळविण्यात आले. L-1 निविदाधारक यांच्या कडील दि.१८/१०/२०२३ च्या ई-मेल पत्रा व्दारे मे.बडगुजर ॲण्ड कंपनी, नाशिक यांनी निविदेतील दर ९,५०,०००/- असे दिले आहे.सदरच्या कामामध्ये अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना मनुष्य बळासह चालविणे व दैनंदिन देखभाल करण्याच्या कामा करीता खालील प्रमाणे कर्मचाऱ्यांची गरज असुन सदरच्या दरामध्ये ही बाब अंतभुर्त आहे. किमान वेतन कायदया प्रमाणे कुशल व अकुशल कर्मचाऱ्यांसाठीचे वेतन निश्चिती असुन त्याप्रमाणे ३३ कर्मचाऱ्यासाठी वार्षिक संभाव्य खर्च रू.९७,०९,५९६/- येणार आहे.

तसेच निविदा शर्ती प्रमाणे सदरच्या कामात खालील प्रमाणे बाबी अंतभुत आहे.

१)अक्कलपाडा जॅक्वेल येथे पात्र कर्मचाऱ्यांची २४ तासा करीता वरील तपशीला प्रमाणे कर्मचाऱ्यांची नेमणुक करणे. २५० एच.पी पंपाची दैनंदिन प्राथमिक देखभाल करणे. पंपची निगा राखणे,पंपाची बेरींग,ग्ल्यॉड इत्यादीची वेळोवेळी सर्विसींग करणे.स्टार्टर पॅन्नलची देखभाल करणे विदयुत पुरवठा, केबल यांची तपासणी करणे.दैनंदिन पंपिंग च्या प्रती तास नोंदी ठेवणे व प्रती महिन्याचे रजिस्टर अपडेट करून महानगरपालिकेस सुपुर्त करणे यांच प्रमाणे

अक्कलपाडा जॅकवेल ३३ के.व्ही सबस्टेशन अंतर्गत व बाहयगत देखरेख करून मनपा पाणी पुरवठा केंद्र मालमत्ता सांभाळणे. .

२)अक्कलपाडा जलशुध्दीकरण केंद्र येथे धुळे मनपाच्या रसायन तज्ञांच्या देखरेखी खालील व निर्देशाप्रमाणे जलशुध्दीकरण प्रक्रियेचे काम करणे, सदरच्या कामी उक्त तपशीलात नमुद केल्या प्रमाणे पात्र कर्मचाऱ्यांची नेमणुक करणे. जलशुध्दीकरण केंद्रावरील संपुर्ण यंत्रणा 24 तास देखभाल करणे व दैनंदिन जलशुध्दीकरण प्रक्रीयेची हाताळणी करणे, तसेच मनपा पाणी पुरवठा केंद्र मालमत्ता साभांळणे.

३)अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना जॉकवेल ते जलशुध्दीकरण केंद्र ते देवपुर एम.बी.आर व चक्करबर्डी एम.बी.आर, हनुमान टेकडी पा.पु केंद्रा पर्यतच्या मुख्य जलवाहिनीची दैनंदिन तपासणी करणे सदरच्या कामी दैनंदिन पाहणी करीता चार चाकी वाहन (महिन्द्रा/टाटा जिप/व्हॅन) ची व्यवस्था 24 तासासाठी ड्रायव्हर व इंधनासह उपलब्ध ठेवणे.

वरील प्रमाणे मक्तेदाराचे दायित्व असुन सदरच्या खर्चामध्ये जी.एस.टी, विमा,इ.पी.एफ इत्यादीची संपुर्ण जबाबदारी मक्तेदाराची असुन या बाबत स्वंतत्र खर्च मक्तेदारास मिळणार नाही.

वरील प्रमाणे अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना पुर्ण क्षमतेने चालवण्यासाठी मनुष्यबळ व वाहन व्यवस्था मक्तेदाराने करावयाची असुन दर वाटाघाटी अंन्ती वरील संपुर्ण कामा करीता एकत्रीत दर व खर्च संपुर्ण करासह ९,५०,०००/- प्रती महिन्या करीता दिलेला असुन सदरच्या दरांना व खर्चास 1 वर्षा करीता मान्यतेसाठी म.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना बाहययंत्रणेमार्फत चालविणे व दैनदिन देखभाल करण्यासाठी एकूण ३३ कर्मचारी पुरविणेकामी मे.बडगुजर ॲण्ड कंपनी, नाशिक या संस्थेस संपुर्ण कामा करीता एकत्रीत दर व खर्च संपुरण करासह ९,५०,०००/- प्रती महिना १ वर्षासाठी कर्मचारी पुरविणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर संस्थेचे काम समाधानकारक असल्यास त्यांना नियमानुसार मे.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यात यावी. तांत्रिक कर्मचारी नियुक्त करतांना त्या पदासाठी असणारी शैक्षणिक अर्हता तपासण्यात यावी. सदर संस्थेशी प्रशासनाने आवश्यक त्या अटी व शर्तीचा करारनामा करण्यात यावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजुर,

सही /- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९१ मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन २०२३-२४ धुळे मनपा हद्दीतील साक्रीरोड हॉटेल सनन पासून ते अंजना हॉस्पिटल पुढे रस्ता काँक्रीट करणे व काँक्रीट गटार करणेबाबत निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अब्दुल लतीफ सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.नाजीयाबानो पठाण विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९८ दिनांक ०९/११/२०२३

मुलभूत सोईसुविधांचा विकास अंतर्गत सन २०२३-२४ धुळे मनपा हद्दीतील साक्रीरोड हॉटेल सनन पासून ते अंजना हॉस्पिटल पुढे रस्ता काँक्रीट करणे व काँक्रीट गटार करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळेयांनी टिपणी मंजुरीने दि.०५/०९/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**४९,७३,६५०/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९७-९८/२०२३ दि.१८/०८/२०२३ अन्वये रक्कम रु.**४९,५२,९८०/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/पा.पु.वि./५२९/२०२३ दि.११/०९/२०२३ रोजीलोकमत/पथदर्शीया वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२२/०९/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	ऋषिकेश बी.महाजन	अंदाजपत्रकीय दराने	
२	**वैभव महाजन**	**शे.३.०० % कमीने**	**सर्वात कमी**
३	जितेंद्र गोरख देवरे	शे.२.०० % जास्तीने	
४	आनंद आहिरराव	शे.५.०० % जास्तीने	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.वैभव महाजन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **४०,८२,६०९.७२** इतक्या रक्कमेचे असून **शे.३.०० % कमीने** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.वैभव महाजन** यांचे दर **शे.३.०० % कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.वैभव महाजन** यांची **शे.३.०० % कमीने** दराने आलेले निविदा

दरमंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत तसेच प्रकरण दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर सादर करणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.वैभव महाजन** यांचे **शे. ३.००% कमीने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद

अनुमोदक :- श्रीमती पठाण नाजियाबानो नासीर खा

सर्वानुमते मंजुर,
सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९२ मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना ६ महिन्याकरीता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल वैसाणे सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९९ दिनांक ०९/११/२०२३

मानधन तत्वावरील स्वच्छता निरीक्षक यांना रु. १५,५००/- मात्र एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता आदेशात नमुद अटी व शर्तीस अधिन राहून नियुक्ती देण्यात आली होती.

खालील स्वच्छता निरीक्षक यांना पुनश्च ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेबाबत विभाग प्रमुख यांनी शिफारस केलेली आहे.

तथापी खालील नमुद स्वच्छता निरीक्षक यांच्या नियुक्तीचा कालावधी दि.०१/११/२०२३ रोजी संपुष्ठात आलेला आहे.

अ.क्र.	उमेदवारचे नाव	पदाचे नाव	मानधन रुपये	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक
१	श्री गौरव अशोक माळी	स्वच्छता निरीक्षक	१५,५००/-	०१/११/२०२३
२	श्री मनिष अशोक आघाव	स्वच्छता निरीक्षक	१५,५००/-	

तरी वरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर फेर नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उक्त मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील २ स्वच्छता निरिक्षक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेस विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागुल

सर्वानुमते मंजुर,
सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९३ गणेश विर्सजनासाठी हत्तीडोह येथे तात्पुरता बांधरा बांधणेकामी झालेला खर्च रू.८९,०७८/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.विजय जाधव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०० दिनांक ०९/११/२०२३

गणेश विसर्जनासाठी पांझरा नदीतील हत्तीडोह येथे पाणी साठविण्यासाठी तात्पुरता मातीचा बंधारा बांधणे बाबत वरिष्ठांनी आदेशित केले होते.त्यानुसार सदरचे काम तातडीने करणे गरजेचे असल्याने उक्त काम ठेकेदार यासीन जब्बार शेख,धुळे यांच्यामार्फत तातडीने पूर्ण करून घेण्यात आले आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसूची सन २०२२-२३ नुसार रु.८९,०७८/-मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा ठेकेदार यासीन जब्बार शेख,धुळे यांच्या कडून करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून गणेश विर्सजनासाठी हत्तीडोह येथे तात्पुरता बांधरा बांधणेचे काम विना निविदा ठेकेदार यासीन जब्बार शेख यांच्याकडून करून घेण्यात आले. सदर कामास झालेला खर्च रू.८९,०७८/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री.विजय बापू जाधव

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागुल

सर्वानुमते मंजुर,
सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९४ मा.महापौर सो.यांच्या निर्देशानुसार धुळे महानगरपालिकेमार्फत दिवाळी पाडवा पहाट कार्यक्रम आयोजनाच्या अनुषंगाने संभाव्य खर्चास व सदरचे काम बाजारभावाप्रमाणे विना निविदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती हा खर्च अंदाजित आहे का?

म.विद्युत अभियंता महापौर महोदयांनी त्याचया दालनात सांगीतले की धुळे शहरातील कलावंत आहे त्यांचा सत्कार या कार्यक्रम प्रसंगी करण्यात यावा त्यासाठी शाल,श्रीफळ , ट्रॉफी देणार आहे. त्यामध्ये थोडा खर्च वाढु शकतो. त्यालाही मंजूरी द्यावी. अशी विनंती करतो. हे खर्च अंतिम केले आहे. ठेकेदाराशी निगोशिएट करुन एकूण खर्च ६,६९,०६०/- होता तो निगोशिएट होऊन ५,११,०००/- झाले आहे. एकाच व्यक्तीकडे या कार्यक्रमाचा ठेका देण्यात येणार आहे.

म.सुनिल बैसाणे विषय क्र १९४ महापौरांच्या निर्देशानुसार दिवाळी पाडवा पहाट कार्यक्रम होणार आहे. दिवाळीतील पाडवा पहाट ही मधुन आणि गोड असावी. आपल्या जिवणात संगीताची झलक यावी म्हणून हा दिवाळीचा कार्यक्रम करतोय. या ठिकाणी महापौरांचे अभिनंदन व कौतूक केले पाहिजे. चांगला विषय आणला आहे. हे जे गायक , गायीका यांच्या मानधनाबाबत आम्ही समजू शकतो. त्यांची लोकप्रियतेमुळे त्या पध्दतीने ते मानधन घेत असतात. त्याबद्दल आम्हाला शंका नाही. परंतु कलाकारांची राहण्याची व भोजन व्यवस्था याबाबत धुळे शहरात कोणत्या हॉटेलमध्ये काय जेवणची व्यवस्था असते याचा अंदाज आम्हाला आहे. आणि किंमती ही माहित आहे. आणि पाहटेच्या कार्यक्रमासाठी जास्त कलाकार राहत नाही. माझ्या माहिती नुसार या गोष्टींचा विचार करावा. त्यानंतर साउंड सिस्टीम बाबत समजू शकतो.

त्यानंतर स्टेज, सोफा, खूर्ची यासाठी अडीच लाख रुपये खर्च होणार आहे. हे खरेदी करणार आहे का?

म.विद्युत अभियंता — स्टेज, सोफा , मॅट, खूर्ची हे भाडे तत्वावर आहे.

म. सुनिल बैसाणे — यात काही निगोशिएश्न करता आले तर पहावे जास्त ही खर्च झाले त्याबद्दल वाद नाही परंतु सेवा ही त्या पध्दतीने मिळाली पाहिजे. विरोधकांनी याबाबत आक्षेप घेतला नाही पाहिजे असा कार्यक्रम झाला पाहिजे.

म.अभियंता — मा.महापौर साहेब यांनी आदेशित केल्याप्रमाणे सदर कार्यक्रमात शहरातील ज्येष्ठ कलावंताना स्मृतीचिन्ह शाल देवून सन्मान करावयाचा आहे. त्याच्या प्रमाणे शिवमहापुराण कथेत स्वच्छता करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना मनपामार्फत टि-शर्ट देण्यात येणार आहे. याबाबतचा खर्च ही यामध्ये समावेश करावा अशी विनंती आहे.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०१ दिनांक ०९/११/२०२३

धुळे महानगरपालिके मार्फत धुळे शहरातील नागरिकांच्या मनोरंजनासाठी दि.१४/११/२०२३ रोजी पहाटे पहाट हा कार्यक्रम आयोजित करावयाचा आहे.सदर कार्यक्रम धुळे महानगरपालिकेच्या नुतन प्रांगनात पहाटे ५ वाजता घेण्यात येणार असुन कार्यक्रमाच्य दृष्टीने निश्चित केलेल्या कलावंताचे मानधन, स्टेज व्यवस्था, ध्वनी व्यवस्था,बैठक व्यवस्था, निवास व्यवस्था प्रसिध्दी व इतर अनुषंगिक बाबीसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी या करीता म.महापौर सो,धुळे मनपा यांनी पत्र सादर केले आहे.

विषयान्कीत कामा बाबत अशा स्वरूपाच्या एकत्रित कामासाठी दरपत्रक तपासले असता मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स ॲण्ड डेकोरेटर्स,धुळे यांनी दिलेले दर एकत्रित कामासाठी सोबत सादर आहे. उपरोक्त विषयान्वये सदरच्या दिवाळी पहाट पाडवा कार्यक्रमामध्ये खालील प्रमाणे खर्चाच्या बाबी अंतभुर्त आहेत.व त्यासाठी प्रंचलित बाजार भाव दर नमुद केले आहे.

अ.क्र.	कामाचा तपशील	दर
१	गायक, गायिका, वादयवृंद यांचे मानधन	१,००,०००/-
२	कलाकारांची राहण्याची व भोजन व्यवस्था-२	५०,०००/-
३	साऊड सिस्टीम-२ मोनिटर,२ श्रीवे किट,मिक्सर,४ कॉलेस माईक कलाकारांसाठी माईक-९	३५,०००/-
४	स्टेज १६x २० मॅटिंग टाकुन मागे परदा लावणे.	२,५०,०००/-
५	एक्युटीव्ह सोफा ४० नग	
६	खुर्ची ५०० नग	
७	मॉटींग	
८	एल.ई.डी.फोकस व्हाईट ३० नग	१३०००/-
९	जनरेटर्स डिझेल सह पुर्ण कार्यक्रम	१७०००/-
१०	स्टेज मागील बॅनर ८ बाय १०	३५००/-
११	समई,वात, तेल साहित्यासह	१५००/-

१२	निवेदकाचे मानधन	१०,०००/-
१३	चहा २०० लोकांचा	५०००/-
१४	पाणी बॉटल ६०० नग	१२०००/-
१५	बॅनर नग १० साईज ८ बाय १० फिर्टींगसह लावणे	३५०००/-
१६	ध्वनी फित ऑडिओ जाहिरात	५०००/-
१७	पुष्प गुच्छ,शाल,फुलांची सजावट,इतर खर्च	३०,०००/-
एकुण		**५,६७,०००/-**
१८ % जी.एस.टी करासह रक्कम		**१,०२,०६०/-**
एकुण जी.एस.टी करासह रक्कम		**६,६९,०६०/-**

वरील प्रमाणे विविध कामासाठी मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स अॅण्ड डेकोरेटर्स,धुळे यांचे दर व खर्च एकुण ६,६९,०६०/- आहे.

तथापी सदरचे दराप्रमाणे मक्तेदाराने दिलेला खर्च बाजार भाव प्रमाणे कमी होणे शक्य असल्याने मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स अॅण्ड डेकोरेटर्स,धुळे यांना दर कमी करण्याकरीता समक्ष चर्चेसाठी बोलविणे आले.

उपरोक्त विषयान्वये धुळे मनपा आयोजित दिवाळी पाडवा पहाटकार्यक्रमाच्या एकत्रित पुष्ठ क्र. १ च्या खर्चासाठी मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स अॅण्ड डेकोरेटर्स,धुळे यांचे दर ६,६९,०६०/- मात्र च्या खर्चास दर कमी करण्याबाबत धुमपा पत्र जा.क्र.दि.०३/११/२०२३ नुसार कळविले असता.मक्तेदार यांनी एकत्रित कामाचा खर्च दर कमी करून दिले आहे.

मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स अॅण्ड डेकोरेटर्स,धुळे यांचे दि.०६/११/२०२३ च्या पत्रानुसार एकत्रित खर्च जी.एस.टी सह ५,११,०००/- मात्र असे दिले आहे. सदरच्या खर्चा मध्ये १८ % जी.एस.टी अन्तंभुत आहे. करीता सदरच्या मा.महापौर सौ.प्रतिभाताई चौधरी यांच्या निदर्शानुसार पाडवा पहाट संभाव्य एकत्रित खर्च सुमारे ५,११,०००/- मात्र च्या खर्चास तसेच सदरचे कार्यक्रमासाठी अनुषंगिक बाबी बाजारभावप्रमाणे विना निविदा करणेस्तव मे.स्थायी समितीच्या मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिकेमार्फत दिवाळी पाडवा पहाट कार्यक्रम आयोजनाच्या अनुषंगाने रू.५,११,०००/- मात्र खर्चास व सदरचे काम बाजारभावाप्रमाणे मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स अॅण्ड डेकोरेटर्स,धुळे यांच्याकडून विना निविदा करणेस व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच ज्येष्ठ कलावंत सन्मान व स्वच्छता कर्मचारी टी-शर्ट वाटप इ.साठी येणाऱ्या अनुषंगिक वाढीव खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.दगडू भिमा बागुल

अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही /- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ३० चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक ३०/११/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.३० आज **गुरूवार दिनांक ३०/११/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता सौ. किरण राकेश कुलेवार सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. सदर सभेचे इतिवृत्त.

या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
९	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	सौ.अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
११	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१२	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
१३	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या
१४	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती करूणा डहाळे	अति.आयुक्त
२	डॉ.संगीता नांदूरकर	उपायुक्त
३	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
४	श्री.अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरिक्षक
५	श्री. सुनिल सूर्यवंशी	उपमुख्य लेखापरिक्षक
६	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरर्धारण अधिकारी

७	श्री.कैलास शिंदे	अभियंता
८	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
९	डॉ.संपदा कुलकर्णी	वैद्यकीय अधिकारी
१०	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री.एन.के.बागुल	कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग
१२	श्री.चंद्रकांत उगले	सहा.अभियंता, पा.पु.विभाग
१३	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१४	श्री.राजेश वसावे	मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१६	श्री.प्रकाश पवार	लिपीक,आस्थापना विभाग
१७	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
१८	श्री.चंद्रकांत जाधव	मलेरिया पर्यवेक्षक
१९	श्री. विकास साळवे	स्वच्छता निरिक्षक घनकचरा व्यवस्थापन
२०	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२१	श्री. राजेश गायकवाड	वरीष्ठ लेखापाल , मनपा शिक्षण मंडळ
२२	श्री.एच.पी.पावटे	कनिष्ठ अभियंता
२३	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभागप्रमुख
२४	श्रीमती मीना सातभाई	महिला बालकल्याण विभाग
२५	श्रीमती कल्पना जाधव	अभिलेखापाल
२६	श्री.संभाजी सुडके	लिपीक, वाहन विभाग

म. सभापती — सन्मा.सदस्य,मा.अति.आयुक्त, उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-१९५ — मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं २७ दि. ०५/१०/२०२३)

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कल्याणी अपंळकर — स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.विजय जाधव — स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०२ दिनांक ३०/११/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.२७ दिनांक ०५/१०/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १७२ ते १७८ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९६ मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि.२५/१०/२०२३ ते दि.३१/१०/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी सादर.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वंदना थोरात सदर कार्यादेशाची यादीचे अवलोकन करण्यात आले.

म.सुरेखा उगले सदर कार्यादेशाची यादीचे अवलोकन करण्यात आले.

म.सभापती मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड)अन्वये दि.२५/१०/२०२३ ते दि. ३१/१०/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकन करण्यात आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०३ दिनांक ३०/११/२०२३

दि.२५/१०/२०२३ते दि.३१/१०/२०२३अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

अ. क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	२३९	२५/१०/२०२३	प्र.क्र.१०मध्ये शांताराम पाटील यांच्या घरापासून ते इंदिरा नगर ग.नं.१ पंढरीनाथ महाजनयांचे घरापावेतोरस्ता काँक्रीट करणे.	१९,९३,४५०/-	महाराष्ट्रसुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२२-२३
२	२४३	२५/१०/२०२३	प्र.क्र.१मध्ये भोकर येथील जैतोबा नगर भागातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	१९,९४,३३२/-	नागरी दलितवस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
३	२४४	२५/१०/२०२३	प्र.क्र.१ मध्ये धनदाई नगर विवेकानंद नगर येथे सुशांकर ते महेशराठोड यांचे घरापावेतो वअंतर्गतरस्तेडांबरीकरण करणे.	२१,८८,८३३/-	नागरीदलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
४	२५२	३१/१०/२०२३	कमलाबाई शाळे जवळील मुख्य पुलाला जोडणारा लोखंडी पदचारी पूल व त्यावरील शेड, प्लास्टिक पेंट आणि इतर विविध कामे करणे.	१९,९९,२०९/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२३-२४

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९७ धुळे मनपा पॅनेलवर इंटेरियर डिझायनर म्हणुन श्री. हर्षल योगेश्वर कुंभार यांची नियुक्ती करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती हे जे इंटेरिअर डिझाईनर नियुक्त करीत आहोत ते कोण कोणते कामे करणार आहेत. याबाबत माहिती द्यावी.

म. अभियंता इंटेरिअर डिझाईनर श्री हर्षल योगेश्वर कुंभार यांनी २३/१०/२०२३ रोजी मा. महापौर यांना पत्र दिले होते. त्यात त्यांनी १३ वर्षाचा अनुभव सांगीतला होता. हे इंटेरिअर डिझाईनर हे महानगरपालिकेचे गार्डन, मनपाचे ऑफिसेस आणि इतर शाळा, कॉलेजेस याबाबत इंटेरिअर डिझाईनचे काम करतात. यात त्यांनी १३ वर्षाचा अनुभव दाखला, इत्यादी कागदपत्रे जोडली आहे. आपण त्यांची पॅनेलवर नियुक्ती करणार आहोत.

म.सभापती नेमणुक करतांना अटी शर्ती टाकल्या आहेत का?

म.अभियंता मंजूर करतांना करारनाम्यात अटी शर्ती आपण टाकून घेणार आहोत.

म.वंदना थोरात विषय मंजूर करण्यात यावा.

म.रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०४ दिनांक ३०/११/२०२३

श्री. हर्षल योगेश्वर कुंभार (बोरसे) यांनी दि.२३/१०/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात मला इंटेरियर डिझायनर क्षेत्रात एकुण १३ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे.माझी स्वतः ची कंपनी इंस्टील आर्किटेक्चर व इंटेरिअर्स नावाने आहे.आम्ही धुळे शहरासह नाशिक, पुणे, मुंबई, मालेगाव तसेच दुबई मध्ये अनेक आर्किटेक्चरल प्रोजेक्टस वर काम केले आहे.आम्हाला आमच्या कामासाठी काही अवॉर्ड्स ही मिळले आहेत असे नमूद केले आहे.अशीच काही चांगले कामे आपल्यासोबत करण्याची संधी आम्हाला मिळावी अशी विनंती केली आहे.

तसेच शासन निर्णय ०४ जून, २०१८ चे दर खालीलप्रमाणे

अ.क्र.	प्रकल्पाच्या /कामाच्या प्रगतीचा टप्पा	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापना सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात)	
		महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पांसाठी	इतर सर्व कामांसाठी
१	प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर	०.७५% (डीपीआर ०.५०% + प्र.मा.-०.२५%)	०.५० (डीपीआर ०.३३% + प्र.मा.-०.१७%)
२	प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर	०.२५%	०.१६
३	प्रकल्पाचे २५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.४०%	०.२७
४	प्रकल्पाचे ५० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.४०%	०.२७
५	प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.६०%	०.४०
६	प्रकल्पाचे १०० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.६०%	०.४०
एकूण		**३.००%**	**२.००%**

श्री. हर्षल योगेश्वर कुंभार (बोरसे) यांनी दिलेल्या दि.२३/१०/२०२३ रोजीच्या पत्रानुसार त्यांची धुळे मनपा पॅनेल बॉडी वरइंटेरियर डिझायनर म्हणुन नियुक्ती करणे तसेच शासन निर्णय ०४ जून, २०१८ च्या दरास मान्यते करीता मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा पॅनेलवर इंटेरियर डिझायनर म्हणुन श्री. हर्षल योगेश्वर कुंभार (बोरसे) यांची शासन मान्य दरानुसार नियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- सौ.वंदना विक्रम थोरात

अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/-xxx
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९८ धुळे मनपा पॅनेलवर आर्किटेक्ट म्हणुन श्री.योगेश्वर केशव कुंभार यांची नियुक्ती करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०५ दिनांक ३०/११/२०२३

श्री.योगेश्वर केशव कुंभार यांनीदि.२३/१०/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात मला आर्किटेक्चर क्षेत्रात एकूण १४ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे.माझी स्वत: ची कंपनी इंस्टील आर्किटेक्चर व इंटेरियर नावाने आहे.आम्ही धुळे शहरासह नाशिक, पुणे, मुंबई, मालेगाव तसेच दुबई मध्ये अनेक आर्किटेक्चरल प्रोजेक्टस वर काम केले आहे.

आम्हाला आमच्या कामासाठी काही अवॉड्र्स ही मिळले आहेत असे नमूद केले आहे.अशीच काही चांगले कामे आपल्यासोबत करण्याची संधी आम्हाला मिळावी अशी विनंती केली आहे.

तसेच शासन निर्णय ०४ जून, २०१८ चे दर खालीलप्रमाणे

अ.क्र.	प्रकल्पाच्या /कामाच्या प्रगतीचा टप्पा	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापना सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात)	
		महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पांसाठी	इतर सर्व कामांसाठी
१	प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर	०.७५% (डीपीआर ०.५०% + प्र.मा.-०.२५%)	०.५० (डीपीआर ०.३३% + प्र.मा.-०.१७%)
२	प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर	०.२५%	०.१६
३	प्रकल्पाचे २५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.४०%	०.२७
४	प्रकल्पाचे ५० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.४०%	०.२७
५	प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.६०%	०.४०
६	प्रकल्पाचे १०० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर	०.६०%	०.४०
एकूण		**३.००%**	**२.००%**

तरी श्री.योगेश्वर केशव कुंभार यांनी दिलेल्या दि.२३/१०/२०२३ रोजीच्या पत्रानुसार त्यांची धुळे मनपा पॅनेल बॉडी वरआर्किटेक्ट म्हणुन नियुक्ती करणे तसेच शासन निर्णय ०४ जून, २०१८ च्या दरास मान्यते करीता मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा पॅनेलवर आर्किटेक्ट म्हणुन श्री.योगेश्वर केशव कुंभार यांची शासन मान्य दरानुसार नियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- सौ.वंदना विक्रम थोरात

अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९९ महिला व बालकल्याण निधीअंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्वे नं. ४८७/२ येथे महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा बांधणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती या विषयाच्या संदर्भात माहिती द्यावी.

म.अभियंता महिला बालकल्याण निधी अंतर्गत ५ लाखाच्या वरती असल्याने महिला बालकल्याण सभापती व त्यांच्या वतीने सदरच्या विषयांना यापूर्वीच मान्यता दिलेली आहे. आणि याबाबत बजेटमध्ये सुध्दा तरतुद असल्याने सदरचे विषय मान्यतेसाठी सादर केले आहे. जेवढी बजेटमध्ये तरतूद आहे त्याप्रमाणेच कामे घेतली आहे.

म. वंदना थोरात विषय मंजुर करण्यांत यावा.

म.कल्याणी अपंळकर विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०६ दिनांक ३०/११/२०२३

धुळे मनपा हद्दीत खालील प्रस्तावित जागेवर महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा उभारणेसाठी महिला व बाल.समितीच्या ठरावा नुसार मंजुरी मिळालेली आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	धुळे मनपा हद्दीतील सर्वे नं. ४८७/२ येथे महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा बांधणे	रु.३२,५४,०००/-
	एकूण	रु.३२,५४,०००/-

तरी सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकिय खर्च रु.३२,५४,०००/- मात्र येणार आहे.

उक्त कामीचा अंदाजपत्रकीय खर्च रु.३२,५४,०००/- मात्रच्या खर्चास महिला व बाल कल्याण निधी अंतर्गत आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस्तव मे. स्थायी समितीची आवश्यकता असल्याने मे. स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून महिला व बालकल्याण निधीअंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्वे नं. ४८७/२ येथे महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा बांधणेकामी अंदाजपत्रकीय खर्च रु.३२,५४,०००/- मात्रच्या खर्चास महिला व बाल कल्याण निधी अंतर्गत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल. सुचक :- सौ.वंदना विक्रम थोरात

अनुमोदक :- सौ.कल्याणी सतिष अपंळकर

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२०० महिला व बालकल्याण निधीअंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्वे नं. ४८९/२/१ येथे महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा बांधणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वसीम अन्सारी विषय मंजूर करण्यात यावा.

म.विजय जाधव विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०७ दिनांक ३०/११/२०२३

धुळे मनपा हद्दीत खालील प्रस्तावित जागेवर महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा उभारणेसाठी महिला व बाल.समितीच्या ठरावा नुसार मंजुरी मिळालेली आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	धुळे मनपा हद्दीतील सर्वे नं. ४८९/२/१ येथे महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा बांधणे	रु.४०,४८,०००/-
	एकुण	रु.४०,४८,०००/-

तरी सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकिय खर्च रु.४०,४८,०००/- मात्र येणार आहे.

उक्त कामीचा अंदाजपत्रकीय खर्च रु.४०,४८,०००/- मात्रच्या खर्चास महिला व बाल कल्याण निधी अंतर्गत आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस्तव मे. स्थायी समितीची आवश्यकता असल्याने मे. स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून महिला व बालकल्याण निधीअंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्वे नं. ४८९/२/१ येथे महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा बांधणेकामी अंदाजपत्रकीय खर्च रु.४०,४८,०००/- मात्रच्या खर्चास महिला व बाल कल्याण निधी अंतर्गत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.वसीम खलील अन्सारी

अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२०१ प्रभाग क्र. १८ मध्ये मनुदेवी मंदिर ते अमरधाम अवधान येथे LT पोल व DP बसविणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. सदरचे काम मनपा निधी अंतर्गत आहे.

म.दगडू बागूल विषय मंजूर करण्यात यावा.

म.विजय जाधव विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०८ दिनांक ३०/११/२०२३

सन्मा. नगरसेविका प्रवीण अग्रवाल यांच्या पत्रानुसार प्रभाग क्र. १८ मधील अवधान येथील मनुदेवी मंदिर ते अमरधाम येथे स्ट्रीट लाईटसाठी पोल टाकणे कामी कार्यादेश क्र. विवि / ३१ दि. २७/०२/२०२३ नुसार कार्यादेश देण्यात आलेला होता. परंतु सदर ठिकाणी महावितरण स्ट्रीट लाईट जोडणी नसल्याने सदर कामपूर्ण होण्यास अडथळा निर्माण होत आहे. सदर ठिकाणच्या स्ट्रीट लाईटसाठी अतिरिक्त LT पोल व DP ची आवश्यकता आहे. त्यानुसार १.३% सूप. चार्जेस अंतर्गत अंदाजपत्रक देणे कामी महावितरणला कळविले होते. त्यानुसार सदर ठिकाणी संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करून रु.२६,४४,७२८/- मात्रचे अंदाजपत्रक प्राप्त झाले आहे. सदर अंदाजपत्रकाचे अवलोकन केले असता, सदर अंदाजपत्रक महावितरणच्या कॉस्ट DATA २०१९-२० नुसार तयार केले आहे. त्यानुसार शासन दरसूची सा.बा. विभाग , विद्युत २०२२-२३ नुसार सदर कामी अंदाजित रक्कम एकूण २७,६६,४९३/- (GST , INSURANCE , 1.3% सूप. चार्जेस सह) अपेक्षित आहे.

उक्त कामासाठी अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ अंतर्गत विशेष तरतूद करावी लागणार आहे.करिता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.२७,६६,४९३/- मात्रच्या खर्चास मे. स्थायी समितीची आवश्यकता असल्याने मे. स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रभाग क्र. १८ मध्ये मनुदेवी मंदिर ते अमरधाम अवधान येथे LT पोल व DP बसविणेकामी अंदाजपत्रकीय खर्च रु.२७,६६,४९३/- मात्रच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यावाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.दगडु भिमा बागूल
अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२०२ धुळे महानगरपालिकेच्या जागेमध्ये जुनी हेरिटेज इमारत नूतनीकरण डीजीटलायझेश व फर्निचर करणेकामी आर्किटेक्ट श्री एम एस काझी यांची नियुक्ती करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती या विषयाबाबत माहिती द्यावी.

म.हर्षकुमार रेलन या विषयाबाबत आपल्याला आर्कीटेक्टची नियुक्ती करायची आहे. यामध्ये किती लोकांनी स्वारस्य दाखवले आहे? किती लोकांचे अर्ज आपल्याकडे आले आहे?

म.अभियंता मागील विषयाप्रमाणे यांची पॅनेलवर नियुक्ती करायची आहे आणि सदरचे काम आमदार श्री सत्यजित तांबे यांनी जुनी इमारतीच्या जतन करणे याकामी १ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यापूर्वी असे काम संगमनेर येथे झाले आहे. ते याच आर्कीटेक्ट यांनी केले आहे. याच आर्कीटेक्ट कडून ते काम करा अशी त्यांनी शिफारस केली होती. त्यानुसार हा विषय सभागृहापुढे आला आहे.

म.हर्षकुमार रेलन	आपण या कामाकरता त्यांना नियुक्त करत आहोत पण या करीता किती लोकांचे अर्ज आले होते?
म.अभियंता	आपल्याकडे असा कोणाचा अर्ज आलेला नाही. यांचाच अर्ज आला आहे.
म.हर्षकुमार रेलन	यांच्याकडे हेरिटेज बिल्डींगचा अनुभव आहे का? टिपनीमध्ये याबद्दल काहीच उल्लेख नाही.
म.अभियंता	याकामाबाबत त्यांना अनुभव आहे.
म.हर्षकुमार रेलन	काही दिवसांपुर्वी आपण एका उद्यानाचे उद्घाटन केले देवपूर मधील आणि विरोधी पक्ष यांनी आरोप केला की गटारीचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराला उद्यानाचे काम दिले म्हणून. ते उद्यान योग्य रितीने बनवले नाही. असा त्यांचा आरोप आहे. हे असे व्हायला नको कारण हेरिटेज बिल्डींगचे काम आहे. हेरिटेज बिल्डींग बनवण्यासाठी विशेष प्राविण्य , डिग्री लागते. असे काम आपण सहसा देऊ शकत नाही.
म.अभियंता	यापूर्वी यांनी अशा स्वरुपाचे काम केले आहे म्हणूनच आपण त्यांच्या नावाची शिफारस केली आहे. आणि त्यांनी आमच्या समोर सादरीकरण सुध्दा केले आहे. आपण जर म्हणत असाल तर त्यांना बोलवून सभापतींच्या दालनात याचे सादरीकरण सुध्दा घेऊ.
म.हर्षकुमार रेलन	माझे एवढेच म्हणने आहे, एकच अर्ज आला आणि आपण त्याला मान्यता देणे योग्य नाही.
म.अभियंता	यापूर्वीही स्थायी समितीने आतापर्यंत १० ते १५ लोकांची पॅनेलवर नियुक्ती केली आहे. आणि याचे अनुदान सुध्दा आले आहे. आपल्याकडे शासनाकडे प्रस्ताव दाखल करायचा आहे. त्यापूर्वी नियुक्ती करुन घेणे आवश्यक आहे.
म.सभापती	टेंडर कॉल न करता काम देणे योग्य आहे का?
म.अभियंता	काही विशिष्ठ परिस्थितीमध्ये आपल्याला शासकीय दरानुसार अशी कामे देता येतात. त्याप्रमाणे मागील दोन विषयांना मंजूरी दिली आहे. तरी सुध्दा हा निर्णय सभागृहाचा आहे. याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.
म.हर्षकुमार रेलन	टिपनीमध्ये सव्वीस्तर उल्लेख नाही. धुळयात असे आर्कीटेक्ट आहेत जे संपूर्ण भारतात हेरिटेज बिल्डींगचे काम करतात. धुळयाचा आर्कीटेक्ट आहे शिमल्यामध्ये १० हेरिटेज बिल्डींग आहेत त्याचे ते काम बघतात. आपण अशा लोकांना बोलवले पाहिजे. माझे म्हणने आहे धुळयात पात्र लोकं असतांना त्यांना डावलून इतर कोणाला हे काम देऊ नका. यामध्ये निविदा काढा. हे काम पात्र व्यक्तीला देण्यात यावे असे माझे मत आहे.
म.सभापती	यात आपण त्यांची पात्रता तपासून घेऊ.
म.हर्षकुमार रेलन	आपण टेंडर मागवा आणि धुळयाच्या लोकांनाही संधी द्यावी. धुळयात असे कमीत कमी ५ लोकं आहेत. जे हेरिटेज बिल्डींगचे काम करतात.
म.सभापती	निधी आमदार श्री सत्यजित तांबे यांनी दिला आहे त्यांनीच आर्कीटेक्टची शिफारस केली आहे. तुमचा विरोध असेल तर तर विरोध नोंदवून विषय मंजूर करु.
म.हर्षकुमार रेलन	संबंधीत आर्कीटेक्ट यांच्याबद्दल माहिती अपूर्ण आहे. विषयाच्या टिपनीमध्ये उल्लेख नाही.मागील बैठकीत असेच उत्तर मिळाले होते आमच्याकडे याचे उत्तर नाही तुम्ही महापौरांकडे जा.
म.सभापती	तो विषय महासभेच्या कार्यकक्षेतील होता. आपण आर्कीटेक्ट यांच्या कडून सादरीकरण करुन घेऊ.
म.हर्षकुमार रेलन	तुम्हाला हा विषय पास करायचा आहेत तर आम्हाला चर्चेसाठी का बोलवता हे बरोबर नाही. आपण निवदा काढा. त्यामध्ये स्पर्धा होऊ द्या आपल्याकडे पात्र लोकं आहेत. विषयाला माझा विरोध नाही. भाजपावर आरोप होत आहेत. गटारीचे काम करणाऱ्याला उद्यानाचे काम दिले म्हणून सांगत आहे पात्रता तपासून घेऊन विषय मंजूर करावा. विषय तहकूब ठेवा अशी माझी विनंती आहे.
म. नगरसचिव	तुमच्या म्हणन्याची नोंद घेतली आहे.
म.हर्षकुमार रेलन	मागील उत्तर देखील इतिवृत्तात घ्या. माझ्या प्रश्नावर सभापतींनी उत्तर दिली की, महासभेत उत्तर मागा. हे चुकीचे आहे आगोदर ठरवून घेता आणि मग चर्चेसाठी येतात.
म.सभापती	जो विषय महासभेचा असतो त्याचे उत्तर महासभेत मिळेल
म.हर्षकुमार रेलन	तो आर्थिक विषय आहे. आर्थिक विषय स्थायीमध्येच असतो.
म. साबीर खान	शाळा नंबर २० चा निधी येऊन पडला आहे याबाबत टेंडरची कारवाई झाली नाही.

म.अभियंता — २० नंबर शाळे बाबत आपल्याला जे बांधकाम करायचे होते त्याची निविदा तयार केली होती पण त्याठिकाणी जी मोकळी जागा आहे ती मनपाच्या नावे नाही. ती जागा उर्वरित जी जागा आहे त्या जागेवर बांधकाम करण्यासाठी निविदा तयार झाली आहे. पुढील दोन दिवसात निविदा निघेल.

म.साबिर खान — टेंडर साठी इतका उशिर का लावत आहे.

म.अभियंता — सोमवार पर्यंत याचे टेंडर निघेल.

म.नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यात यावा.

म.सुरेखा उगले — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सन्मा.सदस्यांच्या सुचनांची नोंद घेण्यात येत आहे. याबाबत आर्कीटेकची पात्रता तपासून प्रेझेंटेशन सादर करण्यात यावे पात्रता तपासून त्यांना कार्यादेश देण्यात यावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०९ दिनांक ३०/११/२०२३

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेषतरतूद योजने अंतर्गत धुळे महानगरपालिकेच्या मालकीची जुनी हेरिटेज इमारत नूतनीकरण डीजीटलायझेश व फर्निचर करणे या या कामा बाबत संदर्भ क्र २ नुसार शासन निर्णय प्राप्त असुन अंदाजित रक्कम एक कोटी इतका निधी प्राप्त आहे सदरची जागा हि जुने कार्यालय येथे प्रथम मजल्यावर असून मूळ बांधकाम स्वरुपात कुठल्याही प्रकारचा बदल न करता त्याठिकाणी नूतनीकरण करणे, फर्निचर व डीजीटलायझेशन हे काम प्रस्तावित असून शहरातील युवकांसाठी अभ्यासिका व माहिती केंद्र धुळे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने युवकांना शैक्षणिक दृष्ट्या लाभ देणे सोयीचे होईल व इमारतीचे जतन होईल व कायम स्वरूपी इमारतीचे देखभाल दुरुस्ती होईल.सदरची इमारत हि हेरिटेज इमारत असून अशा इमरतीची दुरुस्ती करताना मूळ बांधकामाला कुठलाही बाधा होऊ नये या साठी मनपा कडे मनपाचे वास्तू विशारद नसून अशा परिस्थितीत त्या क्षेत्रातील अनुभवी तांत्रिक सल्लागार यांच्याकडुन सर्व बाबी तपासून उचित कार्यवाही व्हावी असे या विभागाचे मत आहे.

सदर कामासाठी संकल्पना चित्र, अंदाजपत्रक मागविणे,अटी शर्ती नमूद इ कार्यवाही करणे . उक्त प्रमाणे.आवश्यक आहेश्रीएम एस काझी , आर्किटेक्ट यांची या कामासाठी वास्तू विशारद पॅनलवर नेमणूक करणे कामी मा आमदार महोदय यांनी मागणी केली असून सदर कामासाठी प्राप्त निधीतून त्यांची फी अदा करता येईल .

श्री एम एस काझी आर्किटेक्ट यांच्याकडुन संकल्पना चित्र,अंदाजपत्रक मागविणे,अटी शर्ती नमूद करणे, व इतर अनुषंगिक कामांचा विचार विनिमय होऊन प्रस्ताव.मे स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिकेच्या जागेमध्ये जुनी हेरिटेज इमारत नूतनीकरण डीजीटलायझेश व फर्निचर करणेकामी आर्किटेक्ट श्री एम एस काझी यांची नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत कार्यादेश देण्यापुर्वी आर्कीटेकची पात्रता तपासून प्रेझेंटेशन सादर करण्यात यावे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

अनुमोदक :- सौ. सुरेखा चंद्रकांत उगले

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२०३ — मानधनावरील लिपीक टंकलेखक, औषध निर्माता, स्टॉप नर्स, ए.एन.एम.,दाई, व्हॉलमन / पंप ऑपरेटर, वाहन चालक यांना ६ महिन्याकरीता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यात यावा.

म.कल्याणी अंपळकर विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१० दिनांक ३०/११/२०२३

खालील मानधनावरील विविध विभागातील व विविध संवर्गातील कर्मचारी यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता ५ दिवसाचा सेवा खंड करुन नवीन नियुक्ती देण्याबाबतच्या विषय मे. स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार खालील मानधनावरील विविध विभागातील व विविध संवर्गातील कर्मचारी यांचे प्रस्ताव खालील प्रमाणे सादर केलेले आहे.

अ क्र	पदनाम	एकुण संख्या	मंजुर कार्यालयीन टिपणी दिनांक	शेरा
१	लिपीक टंकलेखक/ कॉम्प्युटर ऑपरेटर	२१	दि. २३/११/२०२३	जा क्र धुमपा आस्था/१०२७ दि २३/११/२०२३ अन्वये पुढील ६ महिने करीता मे. स्थायी समितीच्या मान्यतेस अधिन राहून नियुक्ती आदेश निर्गमित करणेत आलेला आहे.तरी सदरचा विषय कार्यात्तर मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर केलेला आहे
२	औषध निर्माता, स्टॉप नर्स, एएनएम,दाई	१५	दि. २५/११/२०२३	--------
३	व्हॉलमन / पंप ऑपरेटर	०६	दि. २५/११/२०२३	---------
४	वाहन चालक	१३	दि. २५/११/२०२३	----------

तरी उक्त मानधनावरील विविध विभागातील व विविध संवर्गातील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

तरी उक्त मानधनावरील विविध विभागातील व विविध संवर्गातील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समिती पुढे ठेवणेबाबत निर्णयास्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील लिपीक टंकलेखक, औषध निर्माता, स्टॉप नर्स, ए.एन.एम.,दाई, व्हॉलमन / पंप ऑपरेटर, वाहन चालक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- सौ. कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ३१ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक ०७/१२/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.३१ आज गुरूवार दिनांक **०७/१२/२०२३** रोजी **सकाळी ११-०० वाजता** सौ. किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. सदर सभेचे इतिवृत्त. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य
९	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे	सदस्य
११	श्री. अन्सारी वसीम खलील	सदस्य
१२	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
१३	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या
१४	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती करूणा डहाळे	अति.आयुक्त
२	डॉ.संगीता नांदूरकर	उपायुक्त
३	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
४	श्री.अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरिक्षक
५	श्री. सुनिल सूर्यवंशी	उपमुख्य लेखापरिक्षक
६	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरधारण अधिकारी
७	श्री.नवनीत सोनवणे	कार्यकारी अभियंता,पा.पु.वि.

८	श्री.कैलास शिंदे	अभियंता
९	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
१०	डॉ.एम.आर.शेख	वैद्यकीय अधिकारी
११	श्री.राजेश वसावे	मुख्य स्वच्छता निरिक्षक
१२	श्री.एन.के.बागुल	कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग
१३	श्री.चंद्रकांत उगले	सहा.अभियंता, पा.पु.विभाग
१४	श्री.मोहनीश पाटील	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१५	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबीटी विभाग
१६	श्री.मधूकर निकुंभे	मालमत्ता अधिक्षक
१७	श्री.चंद्रकांत जाधव	मलेरिया पर्यवेक्षक
१८	श्री. राजेश गायकवाड	वरीष्ठ लेखापाल , मनपा शिक्षण मंडळ
१९	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभागप्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य,मा.अति.आयुक्त, उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-२०४ — मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं २८ व २९ दि.१९/१०/२३, ०९/११/२३)

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कल्याणी अपंळकर — स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.विजय जाधव — स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २११ दिनांक ०७/१२/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.२८ दिनांक १९/१०/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १७९ ते १९० अखेर तसेच स्थायी समिती सभा क्रं.२९ दिनांक ०९/११/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १९१ ते २०१ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२०५ — महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०२२-२३ प्र.क्र.११ मध्ये बाळापुर भागात अमरधाम विकसित करणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वंदना थोरात — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.विजय जाधव — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१२ दिनांक ०७/१२/२०२३

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०२२-२३प्र.क्र.११ मध्ये बाळापुर भागात अमरधाम विकसित करणेबाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळेयांनी टिपणी मंजुरीने दि.२५/०३/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**५४,९९,८३२/-**मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५२०/२० दि.२६/१२/२०२२ अन्वये रक्कम रु.**५४,९९,८३२/-**मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बां.वि./१३/२०२३ दि.२०/०४/२०२३ रोजी दैनिक नवभारत/समाज सारथीया वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१२/०५/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.गणेश बोरसे	शे.३.०० % जास्त	
२	श्री.कुणालजयकर पवार	शे.१.०० % जास्त	
३	श्री.भूषण एल.चौधरी	**शे.-१५.९९ % कमी**	**सर्वात कमी दर**
४	मे.हिंद कन्सट्रक्शन	शे.-१४.००% कमी	

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.भूषण एल.चौधरी** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **४६,१९,३३४/-**इतक्या रक्कमेचे असून **शे.-१५.९९ % कमी** दराने आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-१५.९९ % कमी** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

श्री.भूषण एल. चौधरी यांनी दि.०६/१०/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात सदरचे काम नजर चुकीने भरल्याबाबत नमूद केलेले आहे. शासन निर्णय २०१८ नुसार दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.४.६ व मुद्दा क्र.५.१.१ नुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposity) निविदेचा लिफाफा क्र.२ मध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना या परिपत्रकाप्रमाणे रद्द करण्यात येत असून लिफाफा क्र. १ मध्ये लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकारसादर करणाऱ्या **L-१** निविदाकाराने (Additional Performance Security Deposity) आठ दिवसाच्या आत कार्यकारी अभियंता यांचेकडे जमा करण्याबाबतच्या अटीचा समावेश निविदामध्ये करण्यात यावा व निविदे बाबत पुढील कार्यवाही करावी. ही आठ दिवसाची मुदत कोणत्याही कारणाने शिथिलक्षम असणार नाही.

प्रथम न्यूनतम देकाराचा **(L १)** निविदाकाराने वरील विहित मुदतीत सुरक्षा अनामत रकमेचा डी.डी. चाभरणा केला नाहीतर व्दितीय न्यूनतम देकाराचा **(L-२)** निविदाकारास लेखी विचारणा करावी.व **L-२** निविदाकार **L-१**पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करावी असे नमूद आहे.

L-१ श्री.भूषण एल.चौधरी यांनी जा.क्र./धुमपा/बां.वि./२९१ दि.२८/०९/२०२३ सुरक्षा अनामत रकमेचा डी.डी. भरणा करणे बाबत कळविण्यात आलेले असतांना त्यांना दि.०६/१०/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. त्यामुळे त्यांना निविदे मधून बाद करून ई.एम.डी.जप्त करणे व **L-२ मे. हिंद कन्सट्रक्शन** यांना दर वाटाघाटी करीता बोलविण्यात आले असता **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी दि.२२/११/२०२३ रोजी दिलेल्या पत्रात **शे.१६.५० %** कमीदराने काम करण्यास सहमती दर्शविलेली आहे.**L-१ श्री.भूषण एल.चौधरी** यांची ई.एम.डी.

अनामत रक्कम जप्त करणे व **L-२ मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे **शे.१६.५०** % कमीचे दरास निर्णयास्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **L-२ मे. हिंद कन्सट्रक्शन** यांचे **शे.१६.५०%** कमीने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.वंदना विक्रम थोरात

अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२०६ छत्रपती संभाजी राजे पूर्णाकृती पुतळा उभारणे कामी चबुतऱ्याचे उर्वरित काम करणेकामी रू.५,५०,०००/-मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१३ दिनांक ०७/१२/२०२३

धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील संभाजी महाराज गार्डन येथे छत्रपती संभाजी राजे महाराज पुतळा उभारणे कामी चबुतरा बांधणे बाबत कार्यादेश इकडील कार्यालया कडील आदेश जाक्र/धुमपा/बां.वि/२९६/दि.१५/०१/२१ नुसार ठेकेदार मे.एकविरा कन्सस्ट्रक्शन, धुळे यांना देण्यात आला आहे.त्यानुसार चबुतऱ्याचे बांधकाम अंदाजपत्रकानुसार ठेकेदार यांनी केले आहे.तथापि सदर ठिकाणी दि.२०/११/२३ रोजी छत्रपती संभाजी राजे पूर्णाकृती पुतळा समितीचे सदस्य यांनी आंदोलन करून चबुतऱ्याच्या उर्वरित भागास सुशोभिकरण करण्याची मागणी केली. त्यानुसार सदर ठिकाणी मा.महापौर सो., मा.आयुक्त सो,मा.शहर अभियंता, आर्किटेक्ट श्री.भावसार व छत्रपती संभाजी राजे पूर्णाकृती पुतळा समितीचे सदस्य यांच्या समवेत पाहणी केल्या नुसार चबुतऱ्याच्या काही भागास आग्रा रेड स्टोन बसविण्यात आला आहे.तथापि सदर ठिकाणी सुशोभिकरणाच्या दृष्टीकोनातून चबुतऱ्याच्या उर्वरित भागास आग्रा रेड स्टोन ऐवजी ग्रेनाईट मध्ये उर्वरित काम आर्किटेक्ट श्री.भावसार यांच्याकडील खाजगी कारागीर यांच्या मार्फत तातडीने दि.१५ डिसेंबर २०२३ च्या आत पूर्ण करण्यात यावे असे मा.महापौर सो.,मा.आयुक्त सो व मा.शहर अभियंता यांनी आदेशित केले.त्यानुसार आर्किटेक्ट श्री.भावसार यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली खाजगी कारागीर यांच्या मार्फत तातडीने सदर कामाचे कोटेशन इकडील कार्यालयास सादर करावे असे आर्किटेक्ट श्री.भावसार यांना आदेशित करण्यात आले.

त्यानुसार आर्किटेक्ट श्री.भावसार यांच्या मार्गदर्शनाखाली श्री श्याम ग्रेनाईट,धुळे यांनी एकुण ११७.९८ चौ. मी. भागास ग्रेनाईट बसविणे कामाचे रु.६,०३,२५०/- मात्रचे कोटेशन सादर केले आहे.तथापि सदरचे दर जास्तीचे असल्याने श्री श्याम ग्रेनाईट,धुळे यांना दर वाटाघाटी साठी बोलविण्यात आले होते.त्यानुसार श्री श्याम ग्रेनाईट,धुळे यांनी पत्र देवून सदरचे काम रु.५,५०,०००/- मात्र रक्कमेत करण्याची तयारी दर्शविली आहे.तरी सदरचा खर्च सन २०२३-२४ च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री श्याम ग्रेनाईट,धुळे यांच्या कडून करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून छत्रपती संभाजी राजे पूर्णाकृती पुतळा उभारणे कामी चबुतऱ्याचे उर्वरित काम श्री श्याम ग्रेनाईट,धुळे यांच्याकडून करून घेण्यात आले. सदर कामास रू.५,५०,०००/-मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :-श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२०७ भारतीय स्वातंत्रदिनानिमित्त मनपा इमारत व पुतळे येथे लायटिंग व फोकस लावणेकामी रू.२,९६,५००/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन भारतीय स्वातंत्र दिन हा दरवर्षी साजरा केला जातो. मी मागेपण एका बैठकीत बोललो होतो की, हे विषय कार्योत्तर मंजूरीसाठी का येतात दरवर्षी कार्यक्रम ठरलेला असतो?

म.विद्युत अभियंता आपण दरवर्षी लाईटींग किंवा अशी व्यवस्था करत नाही. या वर्षी विशेष कार्यक्रम होता आणि मा. पंतप्रधान यांच्या आदेशाने मेरी माटी मेरा देश हा ही कार्यक्रम चालू होता. ज्या मध्ये २ दिवस आधी सूचना दिल्या होत्या की, प्रशासकीय इमारतींना रोषणाई करा त्यामुळे मा. आयुक्तांनी आदेश दिले होते. व म. महापौरांनी ही सूचना केल्या होत्या म्हणून आपण लाईटींग ची व्यवस्था केली होती.

म.रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१४ दिनांक ०७/१२/२०२३

भारतीय स्वातंत्रदिन १५ ऑगस्ट २०२३ निमित्त मनपा इमारत व पुतळे येथे लायटिंग व फोकस लावणेसाठी मा.महापौर सो. यांनी निर्देश दिलेले होते.त्यानुसार खालीलप्रमाणे लायटिंग व फोकस लावणेचे कामे पूर्ण करणेत आलेले आहे.

१. धुळे मनपा इमारतीस संपूर्ण तिरंगा थीमची लायटिंग लावणे.

२. धुळे शहरातील खालीलप्रमाणे सर्व महापुरुषांच्या पुतळ्यावर लायटिंग लावणे.

i) स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा
ii) सरदार वल्लभभाई पटेल पुतळा
iii) अहिल्याबाई होळकर पुतळा
iv) लोकमान्य टिळक पुतळा
v) महात्मा गांधी पुतळा
vi) पंडित जवाहरलाल नेहरू पुतळ
vii) महाराणा प्रताप पुतळा
viii) झाशीची राणी पुतळा
ix) महात्मा ज्योतीबा फुले पुतळा
x) शहीद अब्दुल हमीद व रणगाडा पुतळा

वरीलप्रमाणे उक्त ठिकाणी दिनांक १३ ऑगस्ट २०२३ ते १५ ऑगस्ट २०२३ तीन दिवसकरिता धुळे मनपा इमारतीस संपूर्ण तिरंगा थीमची लायटिंग लावणे व फोकस लावणेचे काम होते.सदरचे कामी भारतीय स्वातंत्रदिन १५ ऑगस्ट २०२३ निमित्त मनपा इमारत व पुतळे येथे लायटिंग व फोकस लावणेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,९६,५००/- मात्र आहे.

वरीलप्रमाणे उक्त ठिकाणी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने काम हे विना निविदा **मे.न्यू सतिष इलेक्ट्रिकल अंड डेकोरेटर्स,धुळे** यांच्या कडुन करून घेण्यात आले.या एकत्रित कामास अंदाजपत्रकीय **रू.२,९६,५००/-**मात्रचा आहे, सदरचे काम हे सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार **दिवे व साहित्य रू.१ कोटी** मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.करिता सदरच्या कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क)** प्रमाणे कार्यात्तर मंजुरी होण्यास मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून भारतीय स्वातंत्रदिनानिमित्त मनपा इमारत व पुतळे येथे लायटिंग व फोकस लावणेकामी **मे.न्यू सतिष इलेक्ट्रिकल अंड डेकोरेटर्स,धुळे** यांच्याकडून करून घेण्यात आले. सदर कामास रू.२,९६,५००/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२०८ वरखेडी रोडवरील कंपोस्ट डेपो येथील बंद पडलेल्या सी.सी.टी.व्ही.कॅमेरेची दुरूस्ती करणेकामी रू.३५,१९१/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे हा गंभिर स्वरुपाचा विषय आहे. मी या संस्थेच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. वजनकाटा या बाबतीत मी या संस्थेवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर यांनीच प्रश्न उपस्थित करुन दिले आहे की, कशा पध्दतीने या घनकचरा व्यवस्थापनाच्या बिलांची विल्हेवाट लावून यामध्ये काय काय होत आहे हे लक्षात येते. मला प्रशासनाला विचारणा करायची आहे की हे सी सी टी व्ही कॅमेरे कधीपासून बंद होते याबाबत खुलासा करावा. आणि ज्या वेळेस कॅमेरे बंद होते त्या बंद झालेल्या कॅमेऱ्यांच्या बाबतीत

प्रशासनाला आपण सूचना किंवा लेखी स्वरुपात कळवले होते का? कळवले होते तर त्या बाबतची माहिती द्यावी. जर कळवले नसेल तर मा. उपायुक्त मॅडम आपण यामध्ये त्यांचे काही संगनमत आहे किंवा या बिलांच्या घोटाळयामध्ये काही विषय आहे. या सर्व गोष्टींचा खुलासा करावा.

म.सभापती — विद्युत विभागाने सांगावे हे सी सी टी व्ही कॅमेरे कधीपासून बंद आहे.

म.नगरसचिव — या ठिकाणी विषय आला आहे तो शाखा अभियंता यांच्याकडून आला आहे. पण रिपोर्ट आरोग्य विभागाने दिले आहे.

म.विद्युत अभियंता — कॅमेरे किती दिवसापासून बंद होते हे माहित नाही. परंतु तेथील कर्मचारी धनंजय सोनार यांनी रिपोर्ट दिला होता त्या प्रमाणे इंजि. यांनी पाहणी केली. देखभाल दुरुस्तीचा कालावधी देखील संपला होता. वायर तुटलेली होती. आपल्याला मागील फुटेज वरुन लक्षात येईल ते आपण पाहून घेऊ. साधारण १ महिना झाला असेल.

म.सुनिल बैसाणे — माझा आरोप आहे ज्या दिवशी कार्यादेश झाला त्याच्या २-३ महिन्यानंतर हे सी सी टी व्ही कॅमेरे बसवले होते. या सर्व बिलाची चौकशी झाली पाहिजे. जो पर्यंत चौकशी होत नाही तो पर्यंत यांना बिल अदा करण्यात येऊ नये. यामध्ये जो कोणी दोषी असेल त्या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे. अनेक मनपामध्ये बेहिशोबी मालमत्ता वाले अधिकारी / पदाधिकारी ,कर्मचारी रिटायर्ड झाल्यानंतरही त्यांच्या चौकशा सुरु झाल्या आहे. आपण असे समजू नये आमचा कार्यकाळ संपल्यानंतर आमच्यावर नियंत्रण नाही. आपण सर्व माहितीच्या अधिकारात येतो. याची चौकशी सव्वीस्तरपणे करावी. हे काम तातडीचे आहे त्यांना भ्रष्टाचारास वाव देऊ नये.

म.सभापती — विषय मंजूर करण्यात येत आहे. पण अति. आयुक्त महोदया यावर चौकशी लावावी.

म.सुनिल बैसाणे — सदरचा विषय महत्वाचा आहे मंजूर करण्यात यावा.

म.सुरेखा उगले — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१५ दिनांक ०७/१२/२०२३

वरखेडी रोडवरील मनपा कंपोस्ट डेपो येथील वजनकाटा येथील बंद पडलेल्या cctv क्यामेरेची दुरुस्ती करणेबाबत पत्र प्राप्त झालेले आहे.सदर ठिकाणी शहरातील कचरा संकलन करून येणाऱ्या वाहनांच्या पावत्या काढल्या जातात,सदर काम हे अत्यावश्यक सेवेतील असल्याने सदर ठिकाणी ये जा करणाऱ्या कचरा गाड्यांचे cctv च्या माध्यमातून थेट चित्रीकरण होत असते.त्यानुसार उक्त ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता,यापूर्वी लावण्यात आलेले cctv ची देखभाल दुरुस्ती कालावधी संपला असून,या ठिकाणी दुरुस्ती करणे आवश्यक होते.त्यासाठी सदर ठिकाणी cat-6 केबल,वायर,स्वीच बॉक्स, DVR, SMPS, हार्डडिस्क ई.नवीन साहित्य बदलवण्याचे कामे पूर्ण करणेत आलेले आहे.सदरचे कामी वरखेडी रोडवरील मनपा कंपोस्ट डेपो येथील वजनकाटा येथील बंद पडलेल्या cctv क्यामेरेची दुरुस्ती करणे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.३५,१९१/- मात्र आहे.

वरीलप्रमाणे उक्त ठिकाणी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने काम हे विना निविदा मे.आकाश इंटरप्राइजेस,धुळे यांच्या कडून करून घेण्यात आले.या एकत्रित कामास अंदाजपत्रकीय रू.३५,१९१/-मात्रचा आहे, सदरचे काम हे सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार दिवे व साहित्य रू.१ कोटी मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.करिता सदरच्या कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) प्रमाणे कार्यात्तर मंजूरीस्तव मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून वरखेडी रोडवरील कंपोस्ट डेपो येथील बंद पडलेल्या सी.सी.टी.व्ही.कॅमेरेची दुरूस्ती करणेचे काम विना निविदा मे.आकाश इंटरप्राइजेस,धुळे यांच्या कडून करून घेण्यात आले. सदर कामास रू.३५,१९१/- मात्र **खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता** देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

तसेच सी.सी.टी.व्ही कॅमेरे किती कालावधीसाठी बंद होते याबाबत प्रशासनाने चौकशी करून अहवाल सादर करावा.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे
अनुमोदक :-सौ.सुरेखा चंद्रकांत उगले

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२०९ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मंडप,फोकस इ.कामे करणेकामी रू.२७,३००/- मात्र **खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता** देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वसीम बारी सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.विजय जाधव विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१६ दिनांक ०७/१२/२०२३

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती १ ऑगस्ट २०२३ निमित्त लेनिन चौक या नोयोजित ठिकाणी येथे मंडप,फोकस ई.कामे तात्काळ करणेबाबत मा.महापौर सो.यांनी निर्देश दिलेले होते.त्यानुसार सदर ठिकाणी महाराजा स्टेज,LED फोकस,कलर फोकस ई.लावणेचे कामे पूर्ण करणेत आलेले आहे.

सदरचे कामी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती १ ऑगस्ट २०२३ निमित्त लेनिन चौक या नोयोजित ठिकाणी येथे मंडप,फोकस ई. कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.२७,३००/- मात्र आहे.

वरीलप्रमाणे उक्त ठिकाणी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने काम हे विना निविदा मे.श्री गणेश मंडप डेकोरेटर्स,धुळे यांच्या कडून करून घेण्यात आले.या एकत्रित कामास मक्तेदाराने रू.२७,३००/-मात्रचा खर्च सादर केला आहे, सदरचे काम हे सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार महापुरुष जयंती उत्सव रु.१५ लक्ष मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.करिता सदरच्या कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) प्रमाणे कार्यात्तर मंजूरीस्तव मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मंडप,फोकस इ.कामे करणेचे काम विना निविदा मे.श्री गणेश मंडप डेकोरेटर्स,धुळे यांच्या कडुन करून घेण्यात आले. सदर कामास रू.२७,३००/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.वसीम खलील अन्सारी
अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ३२ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक २१/१२/२०२३
वेळ :- सकाळी ११-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.**३२** आज गुरूवार दिनांक **२१/१२/२०२३** रोजी **सकाळी ११-०० वाजता** सौ. किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. सदर सभेचे इतिवृत्त

या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह	सदस्य
६	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
७	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
८	श्री. बागुल दगडु भिमा	सदस्य
९	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
१०	श्री. बैसाणे सुनिल तुळशीराम	सदस्य
११	सौ.अपंळकर कल्याणी सतिष	सदस्या
१२	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
१३	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	डॉ.संगीता नांदूरकर	उपायुक्त
२	श्री.अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरिक्षक
३	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
४	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमुल्य निरधारण अधिकारी
५	श्री. नवनीत सोनवणे	कार्यकारी अभियंता
६	श्री.कैलास शिंदे	अभियंता
७	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
८	डॉ.एम.आर. शेख	आरोग्याधिकारी

९	श्री.लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री.एन.के.बागुल	कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग
११	श्री.चंद्रकांत उगले	सहा.अभियंता, पा.पु.विभाग
१२	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१३	श्री.राजेश वसावे	मुख्य स्वच्छता निरिक्षक
१४	श्री. किशोर सुडके	प्र.बाजार विभाग व एलबोटी विभाग
१५	श्री.संजय मोरे	कार्यालयीन अधिक्षक
१६	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
१७	श्री.चंद्रकांत जाधव	मलेरिया पर्यवेक्षक
१८	श्री. विकास साळवे	स्वच्छता निरिक्षक घनकचरा व्यवस्थापन
१९	श्री. महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ
२०	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
२१	श्री.एच.पी.पावटे	कनिष्ठ अभियंता
२२	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभागप्रमुख
२३	श्री.संभाजी सुडके	लिपीक, वाहन विभाग
२४	श्री. दुष्यंत महाजन	अग्नीशमन विभाग

म. सभापती सन्मा.सदस्य,मा.अति.आयुक्त,उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सन्मा. सदस्यांचे आलेला रजेचा अर्ज

सन्मा. सदस्या श्रीमती वंदना विक्रम थोरात यांनी आजच्या सभेस महत्वाच्या कामामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१७ दिनांक २१/१२/२०२३

सन्मा. सदस्या श्रीमती वंदना विक्रम थोरात यांनी आजच्या सभेस महत्वाच्या कामामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार रजा मंजूर करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजूर,**

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२१० मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्रं ३० व ३१ दि.३०/११/२३, ०७/१२/२३)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कल्याणी अपंळकर स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.विजय जाधव स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१८ दिनांक २१/१२/२०२३

मागील स्थायी समिती सभा क्रं.३० दिनांक ३०/११/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर २०२ ते २१० अखेर तसेच स्थायी समिती सभा क्रं.३१ दिनांक ०७/१२/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर २११ ते २१६ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२११ मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि.०८/११/२०२३ ते दि. २४/११/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि.०८/११/२०२३ ते दि. २४/११/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकन करण्यात आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१९ दिनांक २१/१२/२०२३

दि.०८/११/२०२३ ते दि. २४/११/२०२३ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशाची यादी

अ. क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामांचे नाव	रक्कम	निधी
१	२५४	०८/११/२०२३	धुळे महानगरपालिका पाणीपुरवठा प्रकल्पाचे मंजुर झालेल्या कामावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन कामकाज करणेसाठी नेमणूक करणे बाबत.	अंदाजपत्रक दराने	केंद्र शासन पुरुस्कृत अमृत २.० अभियान
२	२५५	०८/११/२०२३	धुळे मनपाचे मलनि:सारण प्रकल्पाचे मंजुर झालेल्या कामावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन कामकाज करणेसाठी नेमणूक करणे बाबत.	अंदाजपत्रक दराने	केंद्र शासन पुरुस्कृत अमृत २.० अभियान
३	२५८	०९/११/२०२३	प्र.क्र.१२ मध्ये मनपा शाळा क्र.५३/५४ जवळ नाल्यावर पूल बांधणे.	१४,९९,५५०/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२३-२४
४	२५९	०९/११/२०२३	प्र.क्र.१३ मध्ये मौलाना आझाद स्कुल समोर कलव्हर्ट पूल बांधणे.	१४,९९,५५०/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२३-२४
५	२६०	०९/११/०२३	प्र.क्र.१२ मध्ये गजानन कॉलनी स.नं.३९४ येथील खुल्या जागेस वॉल कंपाऊंड व जॉगिंग ट्रॅक करणे..	१४,९९,०६१/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२३-२४
६	२६१	०९/११/२०२३	प्र.क्र.१४ मध्ये श्री.दिपक साडे यांच्या घरापासुन ते सुगंध नगरच्या ओपनस्पेस पर्यंत भुमिगत गटार बांधणे.	९,९९,२६४/-	खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३
७	२६२	०९/११/२०२३	एन.यु.एच.एम.अंतर्गत धुळे मनपाच्या शाळा क्र.५,मोहाडी व नकाणे येथील शाकीय इमारतीचे (आरोग्यवर्धनी) दुरुस्ती करणे.	११,५०,९६९/-	एन.यु.एच.एम.अंतर्गत (१५ वित्त आयोगा अंतर्गत सन २०२२-२३)
८	२६३	२०/११/२०२३	प्र.क्र.७ मध्ये प्रमोद केदार ते लक्ष्मण भोई कॉंक्रीट बंदिस्त गटार करणे.	६,९५,५५३/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
९	२६४	२०/११/२०२३	प्र.क्र.७ मध्ये श्री.सोनू कांबळे यांचे घरापासुन ते किराणा दुकान पर्यंत रस्ता कॉंक्रीट बंदिस्त गटार करणे.(मोगलाई जाळीचा पूल)	१९,९२,१५६/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
१०	२६५	२०/११/२०२३	प्र.क्र.७ मध्ये मनोज जगताप ते आनंद जावडेकर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे.	७,९३,१४८/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत

११	२६६	२०/११/२०२३	प्र.क्र.७ मध्ये बबलू मोरे यांचे घरापासुन ते राहुल वाडीले ते राजु गायकवाड यांचे घरापर्यंत काँक्रीटबंदिस्त गटार करणे.	२३,८४,७०८/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
१२	२६७	२०/११/२०२३	प्र.क्र.७ मध्ये जावडेकर यांचे घरापासुन ते डी.पी.पर्यंत ते पोळ्यांच्या घरापावेतो ते साईबाबा मंदिर चौक रस्ता काँक्रीट करणे.	९,९१,५९५/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
१३	२६८	२१/११/२०२३	प्र.क्र.११ मध्ये दाता चिकन सेंटर पासून ते अकबर शाह यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	१४,९५,०२१/-	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२३-२४
१४	२६९	२४/११/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये अजबे नगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे व गटार करणे.	२४,९०,६६६/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
१५	२७०	२४/११/२०२३	प्र.क्र.१६ मध्ये शिवनेरी कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण व बंदिस्त गटार करणे.	२४,९४,८१०/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ अंतर्गत
१६	२७१	२४/११/२०२३	प्र.क्र.०१ मध्ये वलवाडी भागात रमेश पाटील यांचे घरापासून ते पंढरीनाथ पाटील यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१९,९९,३४६/-	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनासन २०२२-२३ अंतर्गत

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२१२ मा.सभापती सो.यांच्या वापरातील वाहन क्र.एम.एच१८ बी.आर.००१९ वाहनाची दुरूस्ती कामी रू.१६५३३/- मात्रचा खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२० दिनांक २१/१२/२०२३

धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.सभापती सो यांच्या सेवेतील वाहन क्र एम.एच.१८ बी.आर.००१९ हे मनपा टाटा सफारी वाहनांचे नियमीत दुरुस्ती इलेक्ट्रीक व एसी नादुरुस्त झाल्याने असा अहवाल वाहन चालक यांनी वाहन विभागाकडेस सादर केल्यानुसार वाहन विभागाकडून टाटा अधिकृत वितरक, उज्वल ॲटोमोटीव्ह प्रा.लि.धुळे यांना यांचे कंपनी अभियंता मार्फत वाहनांची तपासणी केली असता त्यांचे अहवालानुसार वाहनात दुरूस्ती कामे करणे आवश्यक आहे.

तरी वाहनास करण्यात येणारी दुरुस्ती मजुरीसह टाटा मोटर्स अधिकृत वितरक — उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि.धुळे यांचे कडून करुन घेणे आवश्यक आहे.दुरूस्ती कामांची नोंद हिस्ट्री शिट मध्ये मान्यता झालेनंतर घेण्यात येऊनच सदर प्रकरण/नस्तीदेयक अदा करणेस पाठविले जाईल. देखभाल दुरूस्ती शासन निर्णय ३० सप्टेंबर २०११ महसूल व वन विभाग वित्तीय अधिकार नियम पुसतिका १९७८, भाग-एक उपविभाग दोन नियम ६९, पृष्ठ क्र.३० नुसार डिझेल वाहनास ₹.७५,०००/- पर्यंत दुरूस्ती खर्चास वार्षीक मर्यादा आहे.

आर्थीक वर्ष	खर्च रक्कम	आर्थीक वर्ष	खर्च रक्कम
२०१९-२०	₹.१३००/-	२०२२-२३	₹.१,०८,८२९/-

२०२०-२१	₹.१,०२,९६६/	२०२३-२४ या वर्षात दुरूस्ती खर्च आजपावेतो	₹.६२,८१६/-
२०२१-२२	₹.२८१३७/-		

सन २०२३-२४ या चालु आर्थीक वर्षात व या बिजकातील खर्चा सहित ₹.६२,८१६/-व हया बिलातील खर्च रक्कम ₹.१६,५३३/-असे मिळून एकुण ₹.७९,३४९/-मात्र या आर्थीक वर्षात खर्च होत आहे.

सदर दुरूस्ती खर्चातील खर्च रक्कम ₹.१६,५३३/- नविन साहित्याची नोंद प्रमाणित केल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल. सदर दुरूस्ती कामेही पुर्वमान्यतेसाठीच ठेवण्यात आले आहे. विभाग प्रमुख यांनी तांत्रिक अहवाल दिलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार सदर खर्च रक्कम₹.१६,५३३/- मात्रला मा.आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत. सदरील खर्च ₹.१६,५३३-(अक्षरी- सोळा हजार पाचशे तेहतीस रुपये) मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक तसेच आर्थिक वर्ष दुरूस्ती खर्च मर्यादा ओलांडत असल्यामुळे मे. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव निर्णयास्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मा.सभापती सो. यांच्या वापरातील वाहन क्र.एम.एच१८बी.आर.००१९ वाहनाची दुरूस्ती कामी रू.१६५३३/- मात्रचा खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक:- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक:- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजूर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२१३ धुळे शहरातील अतिक्रमण काढणे व साहित्य उचलण्यासाठी क्रेन लावणेकामी रू. १,१०,८६१/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.रंगनाथ ठाकरे विषय मंजूर करण्यात यावा.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२१ दिनांक २१/१२/२०२३

धुळे मनपा हद्दीतील झालेले अतिक्रमण काढणेसाठी संयुक्तिक अतिक्रमण निर्मुलन पथक तयार करणेत आले असून सदर अतिक्रमण पथकांनी म.जिल्हाधिकारी सो., धुळे यांचे कडेस झालेल्या बैठकीनुसार शहरातील दि.३०/१०/२०२३ पासून सुरु करणेत आले.

उक्त कामी ५० तासासाठी अतिक्रमण काढणे नंतरचे साहित्य तात्काळ उचलून इतरत्र ठेवणे आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा पवन नंदलाल अजळकर, ठेकेदार, धुळे यांचे कडील क्रेनद्वारे सदरचे साहित्य उचलणे व सुरक्षित स्थळी हलविणे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७

(३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु. १,१०,८६१/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे शहरातील अतिक्रमण काढणे व साहित्य उचलण्यासाठी क्रेन लावणेकामी रू.१,१०,८६१/- मात्रच्या झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.रंगनाथ रतन ठाकरे

अनुमोदक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२१४ धुळे महानगरपालिकेसाठी QR CODE BASED ADERTISEMENT MODULE संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.खान मो.साबीर विषय मंजूर करण्यात यावा.

म.सौ.सुरेखा उगले विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२२ दिनांक २१/१२/२०२३

राज्यातील अनधिकृत जाहिरात घोषणा फलक,होर्डिंग व पोस्टर्स बाबत मा.उच्च न्यायलय,मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.१५५/२०११ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.३१/०१/२०१७ रोजी निकाल दिलेला आहे.

तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.याचिका ३०१७/ प्र.क्र.१३०नवि-२२ दि.१४/११/२०२२अन्वये होर्डिंग,फ्लेक्स,बॅनर्स,पोस्टर्सई प्रकारच्या तात्पुरत्या जाहिराती लावणेसाठी जागा निश्चित करणे,दररोज दिल्या जाणाऱ्या परवानग्यांची माहिती Integrated web based portal अथवा उपलब्ध असलेल्या संगणकीय प्रणालीद्वारे पोलिसांना उपलब्ध करून देणे,तात्पुरत्या जाहिराती यावरQR कोड लावणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.सद्यस्थिती धुळे मनपाकडे उक्त बाबत संगणक प्रणाली उपलब्ध नसल्याने सदरची कार्यवाही करता येत नाही.

मा.न्यालयीन प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकांचा अनुपालन अहवाल मा.उच्च न्यायालय व शासनास सादर करावयाचा असल्यामुळे नगरपरिषद प्रशासन संचालनालयास तत्काळ सादर करणे बाबतचे आदेश करण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेसाठी QR CODE BASED ADVERTISEMENT MODULE संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणेबाबत मे.असेंटेक इन्फोर्मेशन टेकनेलॉजी प्रा.लि.मुंबई यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.त्या अनुषंगाने One Time Implementation cost of Module – Rs.

8,00,000/- तसेच Annual Maintenance Contract (From Year 2 Onwards) – Rs.2,00,000/- मात्र असे एकूण रु.१०,००,०००/-मात्र खर्च अपेक्षित आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता QR CODE BASED ADVERTISEMENT MODULE ERP द्वारे एकत्रित असल्यास त्याचे Integration व Implementation करणे सोपे आहे.सदरचे प्रकरण न्यायालयीन प्राधम्य असल्याने मुदतीत संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणे अत्यावश्यक आहे. तात्काळ मंजुरीचे आदेश मा.आयुक्त सो.यांना आहेत. स्थायी समितीची मुदत संपत असल्याने काम अत्यावश्यक असल्याने मंजुरी घेऊन कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव तथा आदेशार्थ सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून QR CODE BASED ADERTISEMENT MODULE संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणेस रू.१० लक्ष मात्रस खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक :- सौ.सुरेखा चंद्रकांत उगले

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२१५ धुळे मनपा अग्निशमन विभागाकडील अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणेकरीता नविन अग्निशमन वाहने व पुरक साधन सामग्री खरेदी करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.विजय जाधव विषय मंजूर करण्यात यावा.

म.नाजीयाबानो पठाण विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२३ दिनांक २१/१२/२०२३

धुळे महानगरपालिकेची स्थापना ३० जुन २००३ ला झाली. त्यानुसार धुळे मनपाचे क्षेत्रफळ ४६.४६ चौ.कि.मी इतके होते. परंतु नव्याने धुळे मनपा क्षेत्रात हद्दवाढ झाल्यानंतर १०१.०८चौ.कि.मी. आहे. सदरील क्षेत्र फळ व वाढत्या लोकसंख्ये नुसार धुळे महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता आग आपत्ती जोखीम घटना बघता अद्यावत साधन सामग्री (उपकरणे) मदत कार्यासाठी असणे गरजेचे आहे.धुळे महानगरपालिके कडे सद्य स्थितीत एकच अग्निशमन केंद्र आहे,नव्याने एक अग्निशमन उपकेंद्र प्रस्तावित असल्यामुळे धुळे मनपा अग्निशमन विभागांकडे अग्निशमन वाहनांची संख्या खूप कमी आहे. तसेच उक्त उपकरणांची पुर्तता करणे करीता महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत (जिल्हास्तर २०२२-२३) अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे करीता खालील उपकरणे घेणे अत्यंत जरूरीचे आहे.

अ.क्र	उपकरणे	साईज	प्रति नग
१	**नवीन अग्निशमन वाहन**	६००० हजार लिटर क्षमता (मल्टी परपज फायर टेंडर)	०२ नग

२	होज पाईप	२५ फुट, ५० फुट, १००फुट	२५फुट-१००- ५० नग, ५० फुट-१०० नग, १००फुट-१०० नग
३	नायलॉन दोर	२००मीटर(12mm)	१० नग
४	हेड लांप		१० नग
५	सर्च लाईट		१० नग
६	गम बूट		२० नग
७	सेफ्टी नेट		१० नग
८	हेलमेट		३० नग
९	वूड कटर		३ नग
१०	ब्रश कटर		२ नग
११	रबर हन्ड ग्लोज		१५ नग
१२	टूल बोक्स		२ नग
१३	कोन्क्रेट कटर		२ नग
१४	BA सेट		२ नग
१५	fire सूट		५ नग
१६	बॉडी हारनेस		५ नग
१७	होज ब्रांच		१० नग
	अंदाजपत्रकीय एकुण खर्च	अग्निशमन वाहने व साधन सामग्री.	**४,००,००,०००**/मात्र

सदर अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे (जिल्हास्तर)सन २०२२-२०२३ योजने अंतर्गत उक्त साधन समग्री खरेदी करणे करिता अंदाजे ४,००,००,०००/ मात्र खर्च येणार असून सदर प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा अग्निशमन विभागाकडील अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणेकरीता नविन अग्निशमन वाहने व पुरक साधन सामग्री खरेदी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत (जिल्हास्तर २०२२-२३) अग्निशमन सेवांचे बळकटीकरण निधी अंतर्गत रू.४ कोटी मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.विजय बापू जाधव
अनुमोदक :- श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२१६ प्र.क्र. ७ मधील मोगलाई रमापती चौक येथील चहाकर यांचे घर ते मोती नाला पावेतो आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेकामी रू ७,२१,०९४/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे विषय मंजूर करण्यात यावा.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२४ दिनांक २१/१२/२०२३

प्र.क्र. ७ मधील मोगलाई रमापती चौक येथील चहाकर यांचे घर ते मोती नाला पावेतो गटारीची अत्यंत दुरावस्था झालेली असल्याने सदरील भागातील नागरिकांचे सांडपाणी वाहणेसाठी अडचण निर्माण होवून सदरील सांडपाणी रस्त्यावर येवून भागात दुर्गंधी पसरलेली असल्याने सदरचे भागात तातडीने ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे असे संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा मे.हेमंत राजाराम बागुल, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यास सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.७,२१,०९४/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्र.क्र. ७ मधील मोगलाई रमापती चौक येथील चहाकर यांचे घर ते मोती नाला पावेतो आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेचे काम विना निविदा मे.हेमंत राजाराम बागुल, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आले. सदर कामी रू ७,२१,०९४/- मात्रच्या आलेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२१७ प्र.क्र.१ मधील वलवाडी भागातील विविध ठिकाणी व्हॉल बसविणे कामी रु.५,१२,५१८/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२५ दिनांक २१/१२/२०२३

प्रभाग क्र.१ मधील वलवाडी भागांतील विविध ठिकाणी व्हॉल बसविणे बाबत सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र रुपला चौधरी यांनी मे स्थायी समितीत मागणी केली आहे. तसेच उक्तबाबत मा.महापौर यांच्या दालनात झालेल्या बैठकीत सदरचे काम तातडीने श्री. संजय गायकवाड यांच्या मार्फत करणे

बाबत आदेशित करण्यात आले होते. त्यानुसार सदर विकाणी समक्ष पाहणी केली असता साने गुरुजी कॉलनी, गौतम नगर, बोरसे नगर, वृंदावन कॉलनी, औदुंबर कॉलनी, गोंदूर रोड पेट्रोल पंपासमोर, आधार नगर पाण्याच्या टाकीजवळ, नवनाथ बाबा मंदिराजवळ, बलवाडी गाव पाण्याच्या टाकीजवळ, सिद्धांत कॉलनी, यशोधन कॉलनी, समर्थ नगर, पलवाडी जलशुद्धीकरण केंद्राजय शिक्षक कॉलनी, देवमोगरा कॉलनी, पोलीस कॉलनी, अक्षय कॉलनी व श्रीनाथ नगर इ. भागांत उशिराने पाणीपुरवठा होत असल्याने सदर विकाणी व्हॉल बसविणे गरजेचे आहे.

वरील कामे हे पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेशी निगडीत असल्याने तातडीने करणे गरजेचे असल्याने वरिष्ठांच्या आदेशानुसार सदरचे काम ठेकेदार श्री संजय दगडू गायकवाड यांच्या मार्फत पूर्ण करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. त्यानुसार उक्त कानाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसुची सन २०२३-२४ नुसार रु.५.१२.५१८/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचा खर्च सन २०२३-२४ च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री. संजय गायकवाड ठेकेदार मनपा, धुळे यांच्या कडून करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्यात्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून .क्र.१ मधील वलवाडी भागातील विविध ठिकाणी व्हॉल बसविणे काम विना निविदा श्री. संजय गायकवाड ठेकेदार मनपा, धुळे यांच्या कडून करून घेण्यात आले. सदर कामी रु.५,१२,५१८/- मात्रचा झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२१८ धुळे शहर तापी पाणीपुरवठा योजनेच्या बाभळे जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर प्लांट येथील पाईप गॅलरी काम व वाडीभोकर रोड वरील ८ इंची पाईपलाईनचे लीकेजेस काढणेकामी रू. २,८०,२५३/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२६ दिनांक २१/१२/२०२३

धुळे तापी पाणीपुरवठा योजनेच्या बाभळे जल शुद्धीकरण केंद्र येथील फिल्टर प्लांट येथील पाईप गॅलरी काम करणे बाबत आदेशित करण्यात आले होते.

बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथे ४८ MLD क्षमतेचा प्रकल्प असून त्या ठिकाणी एकूण ६ फिल्टर कार्यरत आहेत. सदरील ठिकाणी पाईप गॅलरी असून त्या ठिकाणावरून सर्व फिल्टरचे पाणी sump well कडे जाण्यासाठी ८ इंच पाण्याची MS ची पाईप लाईन असून ती बऱ्याच ठिकाणी गंजल्याने व काही ठिकाणचे टी, बैंड, व्हाल्वचे टेल पीस मधून फार मोठ्या प्रमाणात पाणी लिकेजद्वारे वाया जात होते. सदरचा प्लांट २४ तास सुरु असल्याने सदरचे पाईप बदलणे अशक्य होते त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात होते. दि. २०/०५/२०२३ रोजी तापी पाणी पाणीपुरवठा योजनेचे पाईप लाईन चे लीकेजेस काढण्यासाठी व clary flaculater चे गाळ काढण्यासाठी संपूर्ण तापी पाणी पाणीपुरवठा योजना २ दिवस बंद ठेवण्यात आली होती. त्या वेळेस सदरचे काम ठेकेदार श्री. दत्तात्रय कैलास दुसाने, धुळे याच्यामार्फत तातडीने पूर्ण करण्यात आले. तसेच वाडीभोकर रोड वरील ८ इंच पाईप लाईन वरील लीकेजेस काढण्यासाठी मा. अभियंता यांनी आदेशित केले होते त्यानुसार त्याठिकाणी कॉक्रिटचा रस्ता करण्या आधी सदरचे लीकेजेस काढणे आवश्यक होते. त्यानुसार सदरचे काम ठेकेदार यांच्यामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

सदरचे कामे पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेशी निगडीत असल्याने व तातडीने करणे गरजेचे असल्याने वरिष्ठांच्या आदेशानुसार सदरचे काम ठेकेदार श्री. दत्तात्रय कैलास दुसाने, धुळे यांच्या मार्फत पुर्ण करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला होता. त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसुची सन २०२३-२४ नुसार रु.२,८०,२५३/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचा खर्च सन २०२३-२४ च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री. दत्तात्रय कैलास दुसाने ठेकेदार मनपा, धुळे यांच्या कडून करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे शहर तापी पाणीपुरवठा योजनेच्या बाभळे जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर प्लांट येथील पाईप गॅलरी काम व वाडीभोकर रोड वरील ८ इंची पाईपलाईनचे लीकेजेस काढणेचे काम विना निविदा श्री.दत्तात्रय कैलास दुसाने, ठेकेदार यांच्याकडून करून घेण्यात आले. सदर कामास रू.२,८०,२५३/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी
अनुमोदक:- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२१९ मनपा हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतूक करणेकामी मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांची थकीत असलेली रक्कम देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.सुनिल बैसाणे	प्रशासनाने याबाबत खुलासा करावा. हा विषय कशासाठी आणला आहे?
सहा आरोग्यधिकारी	घनकचरा संकलन आणि वाहतूक कामाकरीता निविदा प्रक्रीया राबवण्यात आली होती. ३ वर्षाकरीता ऑर्डर देण्यात आली होती. सदर संस्थेने ६.५.२०१९ पासून कामास सुरवात केली होती. ९१८ रुपये प्रति टन प्रमाणे प्रथम वर्षासाठी व दरवर्षी ५% वाढावी दराने या कामाचा कार्यादेश देऊन देण्यात आली. वॉटरग्रेस कंपनीने २०१९-२० मध्ये घंटागाडया बंद ठेवणे यामुळे वॉटरग्रेस कंपनीचे काम बंद करुन नविन एजन्सी नियुक्त केलेली होती. स्थायी समितीच्या निर्देशानुसार व वॉटरग्रेस कंपनीवर आरोपानुसार त्यांचे बिले थकीत होते. तसेच हे बिले अदा करण्यात येऊ नये असे तत्कालीन स्थायी समिती सभापतींनी तसे नमूद केले होते. वॉटरग्रेस कंपनीने पत्र देऊन मनपाकडे बिलाची मागणी केली आहे. त्यानुसार हा विषय स्थायीपुढे आला आहे.
म.सुनिल बैसाणे	आपण अर्धवट खुलासा करत आहे असा माझा आरोप आहे. करारनामा पाना नं.१९ व २० आर्टीकल ८ मुद्दा नुसार टिपनीत नमूद आहे याबाबत माहिती द्यावी.
म.सहा. आरोगयधिकारी	वॉटरग्रेस कंपनीसोबत आपण करारनामा केला होता त्या करारनाम्यामध्ये आर्टीकल ८ मध्ये ८.१ असे सांगितले आहे की, पक्षामधील कोणत्याही वाद, फरक किंवा विवाद कोणत्याही स्वरूपा असो पहिल्या घटनेत प्रक्रियेनुसार सौहार्दपुर्ण निराकरण करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्या अनुषंगाने पक्षकारातर्फे २७/१०/२०२३ रोजीच्या पत्रानुसार विनंती केलेली होती. ॲमिकल रिसोलूशन संदर्भात विनंती केलेली होती.
म.सुनिल बैसाणे	करारनामा पृष्ठ क्र. १९ व २० मध्ये काय आहे?
म.सहा. आरोग्यधिकारी	यात मनपा संधी देऊ शकते. या करारनाम्यात तसे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने संबंधित कंत्राटदार यांना बैठकीस उपस्थित राहणेबाबत नोटीस देण्यात आलेली होती.
म.सुनिल बैसाणे	ठेकदाराला संधी म्हणजे काय? तो काम सोडू शकतो किंवा कसे?
म.सहा. आरोग्यधिकारी	आपण ठेकेदाराला वेळोवेळी नोटसा दिलेल्या होत्या तो करारनाम्यातील अटी शर्तींचा भंग करीत असल्यामुळे आपण त्याला ब्लॅकलिस्ट का करु नये किंवा करारनामा का रद्द करु नये या अनुषंगाने नोटीस दिली होती. त्या नोटीसच्या अनुषंगाने संबंधीत ठेकेदार याची आयुक्त दालनात बैठक ही झाली होती. त्या बैठकीत समितीचे काही सदस्य उपस्थित होते. आणि त्या कालावधीमध्ये त्याने मनपाने सुविधा उपलब्ध करुन दिल्या नाही ,गाडयांची परिस्थिती योग्य नाही असे खुलासे केले होते. तो खुलासा मनपाने फेटाळून लावला होता.
म.सुनिल बैसाणे	त्यावेळी आपण वॉटरग्रेसच्या गोष्टी पाहत होता. आपल्याकडे त्या विभागाचा पदभार होता. या ठेकेदाराला कापडणीस साहेबांनी नोटीस दिली होती का ?
म.सहा आरोग्यधिकारी	त्या बाबतीत संबंधीत कंत्राटदारामार्फत ताब्यात देण्यात आलेल्या घंटागाडया दुरुस्त करीत नसल्याने आपण सुरक्षा अनामत जप्त करण्या संदर्भात कारवाई केली आहे.
म.सुनिल बैसाणे	आपण जी नोटीस दिली त्या संदर्भात त्याचा खुलासा आला होता का?
म.सहा. आरोग्यधिकारी	होदय त्यांचा खुलासा आला होता परंतु तो समाधानकारक नव्हता.
म.सुनिल बैसाणे	काय खुलासा होता ? ७.१०.२०२० चे एक पत्र दिले होते त्यामध्ये खुलासे सादर केले होते. त्यात त्याने वाहनांमध्ये ५०० किलो कचरा बसत नाही. सदरची वाहने चुकीची आहे, वाहने बंद पडतात त्यामुळे भाडयाने ४५ वाहने उपलब्ध करुन कचरा संकलनाचे काम करत आहे त्याचा आर्थिक बोजा आमच्यावर पडत आहे. तसेच ज्या निकषाप्रमाणे १६८ मेट्रीक टन कचऱ्याचे संकलनाबाबत दिलेले होते. हे उद्दीष्ट चुकीचे दिले आहे हे पत्रात नमूद केले होते.

म.सभापती संबंधीत ठेकेदार कोर्टात गेले आहे का?

म.सहा. आरोग्यधिकारी संबंधीत ठेकेदाराने लवाद नेमणे बाबत औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. आपण या नोटीसीची उत्तरे देऊन ते त्यातील मुद्दे खोडून काढले.

म.सुनिल बैसाणे मनपाची त्या लवादाच्या बाबतीमध्ये काय भूमिका घेतली होती? लवादात न जाण्याबाबत मनपाने परस्पर समस्या सोडवण्यासाठी मनपाने याबाबत कारवाई केली होती का?

म.सहा. आरोग्यधिकारी ठेकेदाराला २ मिटींगला बोलवले होते. आपण त्याला ज्या ज्या सूचना दिल्या होत्या सुधारणा करण्यासंदर्भात कळवले होते परंतु त्याने अचानक काम बंद केल्यामुळे आणि ती शहरावर नामुष्की होती. त्यामुळे पर्यायी व्यवस्था करावी लागली.

म.सुनिल बैसाणे वॉटरग्रेसच्या बाबतीत सर्वांनी तक्रारी केल्या होत्या सर्व सदस्य, नागरिक ते अधिकाऱ्यांपर्यंत एवढे सर्व होत असतांना कचरामुक्त महाराष्ट्रा मध्ये धुळे शहराला मानांकन मिळाले ३ स्टार मानांकन कुठल्या आधारावर देण्यात आले होते?

म.सहा. आरोग्यधिकारी घनकचरा नियम २०१६ च्य अनुषंगाने १०० टक्के घरोघर कचरा संकलन करणे तसेच वर्गीकृत कचरा संकलन करणे इत्यादीची अंमलबजावणी करणे जीएफसीसाठी निकष होते त्या कालावधीत कंत्राटदाराला देण्यात आलेल्या घंटागाडया बंद होत्या गाडया सुरु करण्यासंदर्भात नोटीसा दिल्या जे वाहने बंद दंडात्मक कारवाई केली. त्या पर्याय म्हणून त्याने ४५ वाहने खाजगी स्वरुपाचे ते त्याने उपलब्ध केले होते. आपण त्याला व्यवस्था करायला लावली होती. आपण निकषाची पूर्तता करु शकलो म्हणून शहराला जीएफसीचे नामांकन मिळाले. वेळोवेळी दंडात्मक कारवाई सुध्दा केली आहे.

म.सुनिल बैसाणे ठेकेदाराने अटी शर्तीची उल्लंघन केले म्हणून त्याला टर्मीनेट केले. त्याचा करारनामा रद्द करुन नविन निविदाप्रक्रीया केली. मग आता आपल्याकडे कुठल्या आधारावर थकीत बिलाची मागणी करत आहे? करारनामा अटी शर्तीमध्ये नमूद आहे का ते ?

म.सहा. आरोग्यधिकारी उक्त बाब ही करारनाम्याच्या अटी शर्ती मध्ये नमूद आहे. ज्यावेळी संस्था लवाद नेमण्या संदर्भात न्यायालयास विनंती केली होती. आपण कोर्टात सांगीतले की सदरची एजन्सीना वारंवार नोटीस बोलवण्यात आले होते परंतु यात संस्था उपसिथत राहत नव्हती. यात कुठलाही वाद झालेला नाही त्यामुळे लवाद नेमण्याची आवश्यकता नाही. ठेकेदार उपस्थित होत असेल तर त्यातून मार्ग निघू शकतो. त्यावेळेस आपल्या वकीलाने असे मांडले होते.

म.सुनिल बैसाणे प्रशासनाने त्यावेळेस त्यांच्याशी संवाद साधला की, लवादाकडे दाद मागू नका. तुमच्या अटी शर्ती योग्य असतील प्रशासनाने ते तपासून त्यावर निर्णय घेतला त्या अनुषंगाने तुम्ही त्याच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता का?

म.सहा. आरोग्यधिकारी नाही लवाद नियुक्त करण्या संदर्भात दावा दाखल केला होता परंतु त्यावेळी केस स्टँण्ड झाली त्या लवादा संदर्भात आपल्या वकीला मार्फत प्रशासनाचे म्हणने मांडले होते. लवाद नेमण्याची गरज नाही.

म.सुनिल बैसाणे वॉटरग्रेस चे जे घेणे आहे ते किती असू शकते? ते देणं योग्य असेल किंवा काय?

म.सहा. आरोग्यधिकारी यात वॉटरग्रेस कंपनीला दरमहा देयके दिले आहे. त्यामध्ये काही रकमा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. घंटागाडया नादुरुस्त असल्या कारणाने रनिंग बिलात रक्कम राखीव ठेवण्यात आली आहे.

म.सुनिल बैसाणे देयकं देणं योग्य आहे किंवा काय?

म.सहा. आरोग्यधिकारी निविदा करारनामा अटी शर्ती नुसार एक वर्षा नंतर ५% दरवाढ देणे गरजेचे होते परंतु त्याची कार्यपध्दती चुकीची होती. ठेकेदार बैठकीला उपस्थित राहत नव्हते. वेळोवेळी गाडया नादुरुस्त होत्या.

म.सुनिल बैसाणे प्रशासनाच्या टिपनीमध्ये अभिलेख सादर केलेले नाहीत. सदर बाबत मोघम स्वरुपाची टिपनी केलेली आहे असे तुम्हीच टिपनीत नमुद करत आहात.

म.सहा. आरोगयधिकारी	सदर बिले अकौंट विभागाकडे जमा आहे. जी रक्कम कपात केली आहे तसेच मनपा मार्फत् एकतर्फी घंटागाउया ताब्यात घेऊन अधिकृत एजन्सीकडून दुरुस्त करुन घेण्यात आलेल्या आहे. सदरचे दुरुस्तीचे बिल मनपाने अदा केले आहे. त्याबाबत वाहन विभाग,आरोगय विभाग व लेखा विभाग सव्वीस्तर बैठक घेऊन निर्णय घ्यावा लागेल.
म.सुनिल बैसाणे	वॉटरग्रेस कंपनी काम चुकीचे करत होती म्हणून नविन निविदा प्रक्रीया केली. त्यांच्या अटी शर्तीच्या अनुषंगाने प्रशासनाने आणलेला आहे.
म.सभापती	प्रशासनाने हा विषय स्थायी समोर का आणला आहे?
म. सहा. आरोग्यधिकारी	वॉटरग्रेस कंपनीच्या बाबतीत स्थायी निर्देशानुसार त्याचे काम बंद केले होते. त्याने विनंती प्रस्ताव सादर केला होता. कंत्राटदाराने थकीत बिले मिळावी असा विनंती अर्ज सादर केल्याने म्हणून हा विषय आणला आहे.
म.सुनिल बैसाणे	त्याची विनंती योग्य होती असे प्रशासनाला वाटते म्हणून हा विषय स्थायीपुढे आणला का?
म.उपायुक्त	योग्य किंवा आयोग्य हे सभागृह ठरवेल.
म.सुनिल बैसाणे	ते ठरवेलच परंतु योग्य रित्या त्याने जी मागणी केली त्या मागणीला अनुसरुन प्रशासनाने अभ्यास केलेला असेल ना आयोग्य असेल तर प्रशासनाने आणला असता का? त्याच्या अटी शर्ती असेल ५% - १०% वाढ किंवा घंटागाडी दुरुस्ती बाबत त्याकडून काही देयके घेणे असेल तर ते तुम्ही कटींग करुन देणार आहे की सरसकट मान्य करणार आहे?
म.सहा. आरोग्यधिकारी	या संदर्भात ६६ गाडया टाटा मोटर्स कडून दुरुस्त करुन घेतल्या आहे. आणि देयके व फरक इत्यादी देण्या संदर्भात सर्व बाबींची योग्य ती पडताळणी करुन निणर्य घेतला जाईल.
म.सुनिल बैसाणे	आणि आपण त्याला दंडात्मक कारवाई केली ते पण त्यातून वजा करणार का?
म. सहा. आरोग्यधिकारी	प्रत्येक महिन्याच्या बिलात ती दंडात्मक कारवाईची रक्कम कपात करण्यात आली आहे.
म.सुनिल बैसाणे	सभापती महोदया, याबाबत कुठलाही न्यायलयीन वाद निर्माण झाला तर प्रशासन आणि ठेकेदाराची जबाबदारी राहील. अभिलेख तपासण्याची जबाबदारी आपली नाही. ती जबाबदारी प्रशासनाची आणि लेखा विभागाची आहे. त्यात ही स्थायी समिती जाबाबदार राहणार नाही. अभिलेखाची जबाबदारी त्या त्या विभागाची असते ते योग्य की आयोग्य हे तपासण्याची जाबाबदारी आयुक्ताची असते. शासनाच्या अधिनियमानुसार वॉटरग्रेस असू किंवा घनकचरा व्यवस्थापन असेल त्याच्या देयकाबाबत काही तक्रारी असेल त्या बाबतीत ज्या शंका असतील त्याची जाबाबदारी आयुक्तांची असते. त्यांनी त्या त्या वेळी तपासणी करुन बिले अदा करणे जर तक्रार असेल ही सुध्दा विभागाची व आयुक्ताची जबाबदारी असते. आता ही १४ व्या वित्त आयोगातून कारवाई केली आहे. १४ व्या वित्त मध्ये पैसे आहे का शिल्लक घ्यायला ? किंवा कशातून देणार आहे?
म.सहा.आरोग्यधिकारी	आपण ३ वर्षाची प्रशासकीय मान्यता एकदाच घेतली होती. १७ कोटीची प्र. मा. घेतली त्यातून हे देयके दिले आहे. त्याबाबत लेखा अभिप्राय ही घेणार आहे.
म.सुनिल बैसाणे	या गोष्टी लेखा विभाग व संबंधीत विभागाने व प्रशासनाने तपासून व ठेकेदाराने विनंती केली म्हणून प्रशासनाने आणलेला विषय आहे. टिपनीला अनुसरुन यामध्ये विभागाचे काय मत आहे. सर्व लेखा जोखा घेतल्यावरच याबाबत निर्णय घेण्यात याव्या. याबाबत न्यायालयीन वाद उपस्थित झाला नाही. पाहिजे प्रशासनाने हा विषय अभ्यास करुनच आणला असावा असे माझे मत आहे. त्या नुसार निर्णय घेऊन त्याबाबतची कारवाई करावी. लेखा आक्षेप येणार नाही याची काळजी घ्यावी.
म.सभापती	या बाबतचा कार्यभार ३ वर्षे तुमच्याकडे होता का?

म.सहा. आरोग्यधिकारी — ज्यावेळी कारवाई करायची होती वॉटरग्रेसवर त्यावेळी हा विषय माझ्याकडे आला होता. जेव्हा मिटींग घेण्यात येईल तेव्हा तत्कालीन अधिका-यांनाही बोलवण्यात येईल.

म.हर्षकुमार रेलन — आपल्या ५ वर्षाच्या कार्यकाळात सर्वात खराब जे काम झाले ते या वॉटरग्रेसच्या कार्यकाळात झाले आहे. तत्कालीन उपमहापौर यांनी स्टींग ऑपरेशन केले होते अशोक नगर मध्ये त्याच्या सर्व गाडया ६० ते ७० गाडया तेथे उभ्या होत्या त्याच दिवशी त्याने बिलींग २३० टन चे टाकले आहे. त्या दिवशी त्याच्या गाडया चालल्या नाही. सर्व रस्त्यांवर कचरा होता, सर्व नागरिक ओरडत होते. वर्तमान पत्रात छापून येत होते. त्यावेळी आपले तत्कालीन उपायुक्त गोसावी साहेब एक दिवसा करता गुल होऊन गेले होते. आपल्या एका नगरसेवकाने त्यांना नकाणे तलाव येथून पकडून आणले होते. एवढे मोठे टेंशन होते त्यावेळी काम होत नव्हते पण २०० टन, २५० टन बिल दररोजचे निघत होते. इतका मोठा घोटाळा हा झालेला होता. खरतर आपली ड वर्ग मनपा आहे. जाधव साहेब उत्तर देत होते आधीने स्वच्छता निरिक्षक् होते. सुनिल भाऊंच्या प्रश्नांची उत्तरे त्यांना देता येत नव्हती पण हा जो विषय आहे त्यांच्या आवाक्यातील नाही. अशा प्रश्नांची उत्तरे देणे त्यांना जमत नव्हते. या ठेकेदाराने आपल्याकडे पैशाची मागणी केली आहे. जे काम त्याने केलेच नाही चुकीच्या पध्दतीने हा विषय प्रेझेंटेशन झाला आहे येथे. हा क्लीष्ट विषय होता. त्या ठेका देतांना चुका , गाडया देतांना झालेल्या चुका, त्या वेळेला संपूर्ण झालेला त्रास तरी तो आपल्याकडे पैसे मागतोय. माझे असे मत आहे या संदर्भात पॅनेलवरचे वकील आहे. त्यांचा कायदेशिर सल्ला घ्यावा. तो कोर्टात जाऊ शकतो किंवा आपण ही कोर्टात जाऊ शकतो. याच्या टिपन्या दिलेल्या नाही. ठेकेदाराने न सांगता काम सोडले आहे खरंतर पैसे देऊन काम करुन द्यावे लागले. आणि टिपनी आली की, आपल्याला त्याला पैसे द्यायचे आहे. आपल्याला खरेतर त्याच्याकडून पैसे घ्यायचे आहे. त्यात कायदेशिर बाजू समजून घ्यावी. प्रशासनाला सूचना द्याव्या हा विषय पुन्हा एकदा कागदपत्रासह सादर करावा. तर आम्ही त्याला मंजूरी देऊ.

म.विजय जाधव — अटी व शर्तीनुसार सदर विषयास मंजूरी देण्यात यावी.

म.सभापती — हा विषय आपली सत्ता मनपावर आली तेव्हा सुरु झाला होता. आपल्यालाच त्याच्या शेवट करायचा आहे. या विषयाबाबत प्रशासकीय पातळीवर स्वतंत्र बैठक घेण्यात यावी. तसेच जप्त केलेल्या अनामत बाबत एक तर्फी निर्णय न घेता घंटागाडयांचा दुरुस्तीचा झालेला खर्च तो त्या ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावा. तसेच भविष्यात न्यायालयीन वाद निर्माण होणार नाही व लेखा आक्षेप असल्यास त्याची जबाबदारी मनपा प्रशासनाची राहील याबाबत दक्षता प्रशासनाने घ्यावी व उर्वरित रक्कम तपशिलवार तपासून प्रशासनाने सादर केलेल्या टिपनीनुसार अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२७ दिनांक २१/१२/२०२३

धुळे महानगरपालिकेने ई-निविदा सुचना क्र.८० दि.२०/१२/२०१८ अन्वये धुळे मनपा हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतुक करणेकामी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता सदर निविदेत एकुण ३ निविदाधारकांनी भाग घेतला असता त्यात सर्वात कमी दर वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांचे प्रती मे.टन रु.९१८/- प्राप्त झाले होते. उक्त बाबत सदर दरास मे.स्थायी समिती ठराव क्र.२७ दि.२८/२/२०१९ अन्वये मंजुरी दिली आहे.

सदर संस्थेस जा.क्र./धुमपा/आरोग्य/६५९ दि.६/३/२०१९ च्या कार्यादेशान्वये ३ वर्षाकरीता प्रती मे.टन रु.९१८/- या दराप्रमाणे काम देण्यात आले आहे व तसा मनपा हिताचा करारनामा करुन घेण्यात आला असुन सदर संस्थेने दि.६/५/२०१९ पासुन काम सुरु केलेले आहे. सदर संस्थेने दि.६/५/२०१९ पासुन काम सुरु केले असुन संस्थेच्या निविदेतील व करुन दिलेल्या करारनाम्यातील

अटी शर्तीप्रमाणे मनपाचे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत खरेदी केलेल्या नविन ७९ ऑटो टिपर घंटागाड्या, पुर्वीच्या जुन्या मॅटेडोर ४०७ वाहने ९, व १ झुलागाडी ताब्यात देण्यात आल्या होत्या.

तरी सदर संस्थेने मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांनी घनकचरा संकलन, वाहतुक कामाचे सुरक्षा अनामत, दरवाढीतील फरक, दरमहा देयकातुन कपात झालेली अनामत व कामाचे देयक मिळणे बाबत पत्र सादर केले आहे.

वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांच्या कामाबाबत वेळोवेळी तक्रारी प्राप्त होत असल्याने त्यांना नोटीसा देवुनही कामात कोणत्याही प्रकारे सुधारणा केलेली नाही. त्यानुसार सदर संस्थेचे दि.२०/१०/२०२० रोजी सादर केलेल्या खुलास्यातील करारनामा पृष्ठ क्र.१९ व २० आर्टिकल ८ मुद्दा क्र.८.१ AMICABLE RESOLUTION बाबत विचार व्हावा याबाबत विनंती केली होती. त्यानुसार धुळे मनपा मार्फत नविन ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर कालावधी पर्यंत वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांच्याकडुन काम सुरु ठेवण्यात आलेले होते.

वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांनी दि.१८/१२/२०२१ पासुन कार्यालयात पुर्व सुचना न देता पुर्णपणे काम बंद केले होते. वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना ताब्यात देण्यात आलेली सर्व वाहने ताब्यात घेतलेली आहे.

वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांचे खालील प्रमाणे बिल अदा करण्यात आले असुन जर त्यांना मे-२०२० ते मार्च-२०२१ चे ५% व मे-२०२१ ते नोव्हेंबर-२०२१ पावेतो १०% दरवाढ दिली असता तर त्यांना नियमाप्रमाणे एकुण ६७,६८,४२३/- मात्र दरवाढ फरकाची रक्कम होणार आहे.

तसेच वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांनी निविदा ई-निविदा भरतेवेळी निविदा सुरक्षा अनामत व डिपॉझिट पोटी रू.५३,३७,१६९/- रक्कम मनपाकडे जमा केलेली आहे.

तसेच सदर संस्थेला माहे मे-२०१९ ते ऑक्टोंबर-२०२१ पर्यंत देयके अदा केले असुन त्यातुन रू.४८,३२,८३४/- मात्र मासिक ३% सुरक्षा अनामत रक्कम कपात केलेली आहे.

उक्त नुसार सदर संस्थेचे मनपाकडे रू.२,१६,२८,०७९/- रक्कम निधु शकते.

१) **दरवाढीचा फरक** :- करारनाम्याच्या अटी शर्ती क्र. . नुसार वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना पहिल्या वर्षाकरीता मंजुर दराच्या ५% दरवाढ व दुसऱ्या वर्षाच्या एकुण दराच्या १०% दरवाढ लागु करणे बाबत नमुद असल्याने जा.क्र./धुमपा/आरोग्य/ दिनांक / /२०२२ अन्वये पहिल्या वर्षातील मे २०२० पासुन एप्रिल-२०२१ पर्यंत ५% दरवाढ व दुसऱ्या वर्षाकरीता मे-२०२१ पासुन १०% दरवाढ लागु करणे बाबत मा.तत्कालीन आयुक्त यांनी मान्यता दिली असुन प्रत्यक्षात देयकात दरवाढ लागु केलेली नाही.

२) **परफॉर्मंस सिक्युरीटी** :- वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांनी निविदा भरतेवेळी सादर केलेली परफॉर्मंस सेक्युरीटी रक्कम रु.३५,५८,०००/- अचानक काम बंद केल्याने मनपाची प्रतीमा मलीन झाल्याने सदर रक्कम जप्त करण्यात आली आहे.

३) **माहे नोव्हेंबर-२०२१ चे बिल** :- वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांनी दि.१/१०/२०२१ ते ३०/१०/२०२१ पर्यंतचे बिल विभागामार्फत सादर करण्यात आले असता त्यास अंतिम मंजुरी दिलेली नाही. तरी सदरचे बिल विभागाकडे जमा आहे.

४) **३% सुरक्षा अनामत**:- करारनाम्यात नमुद नुसार वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांच्या मासिक बिलातुन ३% सुरक्षा अनामत रक्कम कपात करणेचे नमुद असल्याने माहे मे-२०१९ ते ऑक्टों.-२०२१ च्या बिलातुन एकुण रु.४४,३२,८३४/- अशी ३% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात आली आहे. परंतु संस्थेने त्याच्या मुळ पावत्या सादर केलेल्या नाहीत.

५) **एप्रिल २०२० ची राखीव ठेवलेली रक्कम:-** वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांच्या माहे एप्रिल-२०२० च्या बिलात सरासरी पेक्षा जादा कचरा उचलण्यात आल्याने मा.तत्कालीन आयुक्त यांनी रुपये ६,४६,१६२/- रक्कम राखीव ठेवुन उर्वरीत देयके अदा केली होती. त्यानुसार सदर कालावधीत शहरात पावसाळ्यापुर्वी नाले सफाई करण्यात आल्यामुळे कचऱ्याचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे सरासरीपेक्षा जादा कचरा उचलण्यात आला होता. याबाबत राखीव ठेवलेली रक्कम रु.६,४६,१६२/- अदा करणेस मान्यता दिली असुन अद्याप पावेतो सदरची रक्कम अदा केलेली नाही.

६) **मे-२०२१ च्या बलातुन १०% राखीव ठेवलेली रक्कम:-** वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांनी माहे मे-२०२१ मध्ये बरेचसे वाहने नादुरुस्त ठेवल्यामुळे बंद होती. त्यामुळे पुर्ववत वाहने सुरु होईपावेतो माहे मे-२०२१ च्या बिलात १०% रक्कम रुपये ७,२३,३८६/- राखीव ठेवण्यात आली होती.तरी सदर संस्थेने माहे जुन-२०२१ मध्ये वाहने दुरुस्त करुन पुर्ववत सुरु केले होते त्याबाबत १०% राखीव ठेवलेली रक्कम रु.७,२३,३८६/- अदा करणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिली असुन परंतु सदरची रक्कम अदा केलेली नाही.

७) **सप्टेंबर-२०२१ च्या बिलात राखीव ठेवलेली रक्कम :-** वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांनी बरेचसे वाहने बंद ठेवल्यामुळे सप्टेंबर-२०२१ च्या बिलात रु.५,००,०००/- राखीव ठेवुन उर्वरीत देयके अदा केलेली आहे.

८) **वाहन दुरुस्तीचा खर्च :-** वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांच्या ताब्यात देण्यात आलेली मनपाची वाहने धुळे मनपा मार्फत एकतर्फी ताब्यात घेण्यात येवुन सर्व नादुरुस्त वाहने वाहन विभागामार्फत दुरुस्त करण्यात आलेले आहे. त्यावर झालेला खर्च संबंधीत संस्थेकडुन वसुल करुन घेणे आवश्यक आहे. त्याबाबत वाहन विभागामार्फत सदरचा खर्चाचा अहवाल मागविणे योग्य होईल.

वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांच्या कामकाजा बाबत मे.स्थायी समितीपुढे वेळोवेळी मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत.

तरी वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांचे उक्त १ ते ८ मधील एकुण रक्कम अदा करणेपुर्वी मे.स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर करुन पुढील निर्णय घेणे उचित राहील असे मत आहे. तरी याबाबत प्रस्ताव सादर झालेला आहे.

मा.आयुक्त सो.यांनी सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे पाठविणेस मंजूरी दिलेली आहे. तरी सदरचा विषय मे.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर संस्थेच्या थकीत रक्कमेचा तपशील तसेच करारनाम्यातील अटी व शर्ती, दरवाढ व इतर अनुषंगिक बाबीबाबत प्रशासकीय पातळीवर खातरजमा करावी.तसेच जप्त केलेल्या अनामत बाबत एक तर्फी निर्णय न घेता घंटागाडयांचे नुकसान व दुरुस्तीचा झालेला खर्च तो त्या ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावा. तसेच भविष्यात न्यायालयीन वाद निर्माण होणार नाही व लेखा आक्षेप असल्यास त्याची जबाबदारी मनपा प्रशासनाची राहील याबाबत दक्षता प्रशासनाने घ्यावी व उर्वरित रक्कम तपशिलवार तपासून प्रशासनाने सादर केलेल्या टिपनीनुसार अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे
अनुमोदक :- श्री.विजय बापू जाधव

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२२० मा.सभापती सो.स्थायी समिती यांच्या आदेशाने व सन्मा.सदस्य श्री.सुनिल बैसाणे यांच्या पत्रानुसार शहरातील घनकचरा व्यवस्थापन करणारी स्वंयभू ट्रान्सपोर्ट,पुणे यांच्या कार्यप्रणाली व करारनाम्यातील अटी शर्तींचा भंग झाल्याने त्याबाबत दिलेल्या पत्रावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे सन्मा. सभापती हा जो स्वयंभू ट्रान्सपोर्ट पुणे याबाबतचा माझ्या पत्रानुसार विषय विषय पत्रीकेवर घेतला तसेच २-३ दिवसापूर्वी झालेल्या महासभेमध्ये सुध्दा हा विषय विषयपत्रीकेवर घेऊन त्या महासभेमध्ये नवि निविदा प्रक्रीया करावी अशा पध्दतीचे महासभेत झालेल्या चर्चे अंती महापौरांनी रुलींग दिले. त्याबाबत आयुक्त महोदयांनी त्या विभागाला आदेशित केले आहे. त्याची अंमलबजावणी त्या विभागाने करावी. ज्या पध्दतीने वॉटरग्रेस संस्था चुकीचे काम करत होती व अटी शर्तीचे उल्लंघन केले म्हणून त्याला हद्दपार केले. आपण नविन निविदा प्रक्रीया करुन धुळे शहरात घनकचरा व्यवस्थापनाचा ठेका दिला. ज्यावेळी निविदा प्रक्रीया केली उपायुक्त महोदया हा विषय तुमच्या विभागाशी संबंधीत असल्यामुळे तुम्हाला अवगत करणे गरजेचे आहे. एखाद्या विषयाचे धोरण आपण ठरवतो आणि धोरण ठरवल्यानंतर निविदा होते ज्या काही प्रक्रीया त्या प्रशासनाच्या माध्यमातून होतात पण या घनकचरा व्यवस्थापनाबाबत निविदा आधी झाली नंतर प्रशासकीय मंजूरी सगळया गोष्टी झाल्या. आणि ज्यावेळी हा विषय आला दरमंजूरीच्या वेळेस मी आणि शितलभाऊ नवले यांनी जे बारकावे असतात त्या बाबत मांडणी केली. परंतु प्रशासनाने निर्णय घेऊन टाकला नंतर महासभेत धोरण ठरवले. आणि अशी महासभा की ज्या बाबतीत महापौर पदाच्या बाबत सुप्रिम कोर्टात निर्णय प्रलंबित होता. सुप्रिम कोर्टात वाद होता की ओबीसीचा महापौर असावा किंवा अनुसूचित किंवा ओपन कॅटेगरीचा महापौर असावा असा वाद न्यायालयीन वाद होत असतांना त्यावेळेस महासभा काढण्यात आली. त्यावेळेस न्यायालयाचा आदेशही नव्हता की महासभा घ्या किंवा महापौरांच्या अनुपस्थितीमध्ये महासभा घ्या. ज्यावेळी महासभा काढण्यात आली त्यावेळी सक्षम अधिकारी असणे गरजेचे होते. हया गोष्टी तात्कालीन आयुक्तांच्या लक्षात आल्या. ते धुळे शहरात असतांना सुध्दा त्यावेळी त्यांनी तत्कालीन उपायुक्तांना महासभेत पाठवून दिले. आणि त्या महासभेत धोरण ठरवण्यात आले आणि निर्णय आधीच घेतला व निविदा ७ वर्षाची काढली. आम्ही लोकप्रतीनिधी ५ वर्षे असतो. महाराष्ट्रात अशा कुठल्याही पध्दतीचा घनकचरा व्यवस्थान असू दे किंवा अन्य ठेका असू दे यामध्ये कुठलीही निविदा ७ वर्षाची काढली जात नाही. निविदा काढत असतांना पण त्याचा एक वर्षाचा परफॉरमन्स कसा आहे त्यानुसार मुदतवाढ द्यायची असते. ७ वर्षाचा बेकायदेशिरपणे ठेका दिला. आणि १४ व्या वित्त आयोगाच्या ज्या अटी शर्ती त्याचे पूर्णपणे भंग प्रशासनाने केल्या. त्या महासभेला मी अनुपस्थित होतो. आणि महासभेकडून मंजूरी बेकायदेशिर घेतली. हा प्रथम मुद्दा आणि दुसरी गोष्ट स्थायी समितीने यांना मंजूरी दिली तत्कालीन सभापती संजय जाधव यांनी सांगीतले की ६ महिन्याच्या कार्य अहवालानुसार पुढे त्यांना मुदतवाढ देण्यात यावी. आज पर्यंत स्थायी समिती समोर कुठल्याही पध्दतीचा अहवाल आलेला नाही. यामध्ये संघटितपणे प्रशासनाच्या मान्यतेने किंवा दूर्लक्षपणे आर्थिक लयलूट मनपामध्ये आली आहे. हा आर्थिक गुन्हा आहे. मान्यता नसलेल्या निविदा प्रक्रीयेला मंजूरी देऊन प्रशासनाने दर महिन्याला लाखो रुपयाचे बिले या ठिकाणी काढले गेले आहे. आणि याबाबत मी वेळोवेळी ६ पत्र प्रशासनाला व आयुक्तांना दिलेले आहे. ६ पत्रांपैकी १ ही पत्राचे उत्तर मला मिळाले नाही. २ पत्रांचे उत्तर दिले आणि स्वत: मान्य केले की चुका झाल्या आहे. माझी विनंती आहे आपण जसे वॉटरग्रेसला टर्मीनेट करुन सर्व गोष्टी वसुल करतोय तर यात पहिल्या महिन्यापासून ते आजपर्यंत जे बिले या संस्थेला अदा केले आहे त्या सर्व बिलांची चौकशी झाली पाहिजे. आणि बेकायदेशिर ठरावावर बिले

अदा केली असेल जे जे कोणी याला जबाबदार असतील त्यांनी संघटीत गुन्हेगारी केली आहे. आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या माध्यमातून २५ लाखाच्या पुढे आले तर आर्थिक गुन्हा विभाग यात हस्तक्षेप करु शकतो. जर प्रशासन याबाबत कारवाई करत नसेल तर मी स्वत: प्रशासनाला पण आणि स्वयंभूवाल्याला पण कामाला संस्थेवर झाला आहे. चुकीच्या पध्दतीने बिले काढून, अटी शर्तीचे उल्लंघन केले म्हणून त्या ठिकाणी न्यायालयाने आदेश केला आणि न्यायालयाने आयुक्तांना सुध्दा आरोपी केले आहे. मी त्याची कागदे, कात्रणे वेळोवेळी प्रशासनाला दिली आहे. जे बिले ४० ते ५० लाखचे असले पाहिजे ते ७०-७५ लाखाचे झाले आहे. आणि या स्वयंभू संस्थेने काम सोडून दिले आहे. आणि त्या ठिकाणी मालेगावची व्यकती काम करत आहे. मी कुठलाही आरोप पुरावे असल्याशिवाय करत नाही. माझ्याजवळ सक्षम असा पुरावा आहे. शासनाचा उद्देश आहे कचरा कमी झाला पाहिजे या एजन्सीला दिल्यामुळे स्वयंभु जेव्हा स्वत: काम पाहत होती त्यावेळेस धुळे शहरातला सुका कचरा कमी होत होता. आणि आता सुका कचरा २०० टनांवर गेला आहे. अचानक कचरा का वाढला? त्याचे बिले आपण देणार आहे का? आणि बेकायदेशिर देत असतील त्याची जबाबदारी प्रशासन घेणार आहे का? माझी विनंती आहे मागील दोन-तीन मिटींगपूर्वी विषय आणला होता. त्या ठिकाणी सिसिटीव्ही कॅमेरे बंद आहे. ते दुरुस्ती करण्यासाठी आमच्याकडून खर्चाला मंजूरी घेतली. ते तात्काह देणे गरजेचे होते म्हणून ती दिली. तेथे सिसिटीव्ही कॅमेरे बंद आहे याचा अर्थ काय होतो? बेकायदेशिरपणे वजन न केलेला कचरा वजन कचरा वजन करत होता. या ठिकाणी आर्थिक घोटाळा झाला आहे. यांचे कुठलेही बिल अदा करण्यात येऊ नये. माझी मागणी आहे या स्वयंभू एजन्सीला काळया यादीत टाकण्यात यावे. त्यांनी अटी शर्तीचा भंग केला आहे. करारनाम्याचा भंग केला आहे. दुसऱ्या एजन्सीला काम करायला दिले आहे. यांनी धुळे मनपाच्या शासनाच्या गाईडलाईननुसार जो धनादेश दिला जातो त्यामध्ये भ्रष्टाचार संगनमत करुन केला आहे. यांच्यावर संघटित गुन्हे दाखल झाले पाहिजे. आता प्रशासनाच्या हातात कारभार जाणार आहे. यावर कुठल्याही लोक प्रतिनिधीचे वचक राहणार नाही. सर्व जीपीएस सिस्टीम बंद आहे. याचा कारभार माईनकरांकडे होता त्यांनी त्यावेळेस जे वजन ६५ टन जात होते कारभार माईनकरांकडे दिल्यामुळे झालेलया बिलामध्ये प्रचंड तफावत आली. बिल कमी झाले. मनपाचे हित त्यामध्ये जपले गेले. परंतु माईनकरांची त्यावेळी तक्रार आयुक्तांकडे करण्यात आली. आणि तत्कालीन आयुक्तांनी त्यांची जबाबदारी काढून घेतली. साळवे साहेब या ठिकाणी खुलासा करावा. माझ्या काही शंका आहे. खुलासा सादर करतांना आपल्यावर जबाबदारी येणार नाही याची काळजी घ्यावी. साळवे साहेब त्यांनी एमएलपी सादर करणे बंधनकारक होते का? ६ महिन्याचा ठराव दिला त्यामध्ये काय नमूद केले आहे. आतापर्यंत किती नोटीस दिल्या आहे? किती वेळा दंडात्मक कारवाई केली आहे?

म.साळवे — नुकताच माझ्याकडे १ महिन्यापासून हा चार्ज आला आहे. त्या अनुषंगाने मी सर्व कागदपत्रे तपासले असता मागील २ वर्षापासून ज्या ज्या वेळी त्याने अटी शर्तीचा भंग केला आहे त्या त्या वेळी नोटीस दिल्या आहे. ट्रॅक्टर आले नाही, घंटागाडया आल्या नाही त्या अटी नमूद केल्या त्या बाबत आपण दंडात्मक कारवाई केली आहे. एमएलपी बाबत आपण त्याला नोटीस पण बजावली आहे.

म.सुनिल बैसाणे — प्रशासनाच्या माध्यमातून त्याला वेळोवेळी सांगण्यात आले आहे. एमएलपी च्या बाबत एमएलपी करण्याचा उद्देश शासनाचा का असतो एमएलपी सादर करणे म्हणजे काय ?

म.साळवे — एमएलपी म्हणजे मायक्रो लेव्हल प्लॅन. कचऱ्याचे मूल्यांकन करायचे की कचरा कमी कसा होईल. आपल्याकडे डोअर टू डोअर कलेक्शन होते. प्रत्येक व्यक्ती हा किती कचरा जनरेट करतो. त्यानुसार एक वर्षाचे टारगेट राहते.

म.सुनिल बैसाणे — आपण जेव्हा निविदा प्रक्रीया केली त्यावेळी २० वर्षाचा डीपीआर तयार केला होता. २०१६ पासून पुढे २० वर्षे तर तुमचा डीपीआर करण्याचा उद्देश काय असतो.

म.साळवे — आपण २० वर्षामध्ये तपशिलवार अहवाल अभ्यास असतो. त्यात नमूद असते काय करायचे आहे.

म.सुनिल बैसाणे — नमुद केल्याप्रमाणे तुमचे काम होते आहे काय?

म.साळवे — बऱ्याचशा घंटागाडया सुरु आहे.

म.सुनिल बैसाणे — महाराष्ट्र शासनाने तुम्हाला उद्देश दिले आहे ओला कचरा व सुका कचरा ओला कचऱ्याला बिल जास्त भेटते का सुका कचऱ्याला जास्त भेटते.

म.साळवे — दोघा कचऱ्यांना एकच दर आहे.

म.सुनिल बैसाणे — जर सुका कचऱ्याला जास्त असेल आणि ओल्या कचऱ्याला कमी असेल तर तुमच्यावर काय कारवाई करावी?

म.साळवे — आपल्या अॅग्रीमेंटमध्ये ओला कचरा आणि सुका कचरा एकच रेट मध्ये जातो.

म.सुनिल बैसाणे — शासनाच्या काय गाईडलाईन आहे. ओला कचरा वेगळा करणे की एकत्र करुन बिले करणे.

म.साळवे — आपण सेग्रेगेशन करतो.

म.सुनिल बैसाणे — वजन करतांना ओल्या कचऱ्याचे करता का सुक्या कचऱ्याचे करता? तसे होते का वजन काटयावर आता मालेगाव वाल्याने चालू केले आहे सध्याची वजनाची स्थिती काय आहे? वजन किती यायला पाहिजे होते.

म.साळवे — सध्याच्या वजनाच्या बाबत १९० टनाच्या आसपास जाते. २०१६ च्या डिपीआर नुसार १६९ मेट्रीक टन हा अपेक्षित होता. २०२३ पर्यंत दर वर्ष १०% वाढ धरली आहे. तो २०० टन पर्यंत यायला पाहिजे होता.

म.सनिल बैसाणे — यामध्ये मी अंकगणीत तज्ञ नाही. माझे मॅडमांना प्रश्न आहे तुमच्याकडे जबाबदारी आल्यापासून किती वेळा घनकचरा व्यवस्थापनाच्या ठिकाणी भेटी दिल्या?

म.उपायुक्त — मी सर्व प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे देते. २०१६ स्वच्छ भारत अभियानामध्ये तरतुद केली आहेकी, शून्य कचरा व्यवस्थापनामध्ये असे प्रत्यक्ष त्या ठिकाणी करायचे आहे. शून्य कचरा व्यवस्थापन मध्ये अनेक पातळयांवर वेगवेगळया यंत्रणा मॉनिटरींग करत असतात. त्याचे मॉनिटरींग इंडीपेडन्टली होऊ शकत नाही हे शासनाने गृहीत धरलेले असते. कारण अनेक प्रकारचे कामे मनपात येत असतात. आणि कर्मचाऱ्यांची एफिशिएन्सी व कर्मचाऱ्यांची उपलब्धता हा पण विषय आहे. त्यामुळे शासनाने बाहेरच्या संस्थांना येण्यासाठी परमिशन आपल्याला दिली आहे. त्यानुसार आपण काही कारणांनी मागील काळात स्वयंभुची नियुक्ती केली असेल. स्वयंभुलाच नियुक्त केले याची आता चर्चा करता येणार नाही. मागे जाऊन त्याचा अभ्यास करुन ते पहावे लागेल. त्याचा करार कुठल्याही स्तरावर रद्द करता येऊ शकतो. स्वयंभूच असा काही विषय नाही. तुम्ही जे म्हणालात त्याने मालेगांव स्थित नामक संस्थेस नियुक्त केले आहे. त्याने पेपरवर आपल्याला इंटीमेशन दिलेले नाही की, आम्ही हे काम स्वत: करतोय किंवा दुसऱ्याकडून करुन घेतोय. प्रशासनाला तो कळवू शकत नाही. पण प्रशासनाच्या जर लक्षात आले तो इतरांच्या मार्फत करतोय किंवा काही तक्रारी प्राप्त झाल्याबाबत चौकशी करुन त्याला जाब विचारु शकतो. आणि त्याचा खुलासा नाही आला तर त्याला टर्मीनेट करु शकतो. डी पी आर बद्दल आपण विचारले डी पी आर हा डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट असतो. तो २० वर्षापर्यंतच्या भविष्यासाठी बनवला असतो. त्या प्रोजेक्ट रिपोर्ट मध्ये त्या प्रोजेक्ट साठी तुम्ही काय काय छोटया छोटया गोष्टी केल्या आहे त्या सगळया दिलेल्या असतात. त्या सुका कचरा आणि ओला कचरा याचे दोन भाग करतात. ओल्या कचऱ्यामध्ये सर्व प्रकारचा कचरा ओला कचरा या भागात गोळा केला जातो. त्यात केमिकल टाकतात. त्या फवारणी करु खतात रुपांतर करतात. त्या खतांच्या गोण्या भरुन बाजारात

शासनाने दिलेल्या दराने विकत असतो ही प्रोसेस फक्त ओल्या कचऱ्याची आहे. मागच्या वेळी जेव्हा माझ्याकडे चार्ज होता त्यावेळी मी या सर्व गोष्टीमध्ये लक्ष घतले होते. डेपोवर पाहणी केली होती. तेथे बऱ्याच बऱ्याच गोण्या होत्या त्या रिकाम्या पडल्या होत्या. त्या गोण्या शिवण्याचे मशिन बंद पडल्यापासून अनेक छोटया छोटया तक्रारी होत्या. त्या तक्रारी सोडवून शेतकऱ्यांना विकल्याही होत्या. त्याच्या पावत्या सुध्दा मी चेक केल्या होत्या. त्याचा रेग्युलर भरणा होतोय याचे ही मी स्वत: खात्री केली होती नंतरच्या काळात सनेर साहेबांकडे चार्ज गेला. मधल्या काळात चार्ज नसल्यामुळे मी फॉलो करु नाही शकले. आता मागच्या २ महिन्यापासून तो चार्ज माझ्याकडे आला आहे. परंतु डेपोचा पार्ट माझ्याकडे नाही तो शिंदे साहेबांकडे आहे. मी माझे काम फक्त कर्मचारी पुरवणे. साफ सफाई करुन घेणे. रस्ते, गटर ज्या काही स्वच्छतेच्या गोष्टी असतील, ट्री प्लांटेशन, कटींग या सर्व गोष्टी मी करुन घेणार आहे? अतिक्रमणामध्ये लोकं देणे, मलेरियामध्ये लोकं देणे आस्थापना रिलेटेड ज्या गोष्टी आहेत त्या मी करते. त्या व्यतीरिक्त स्वयंभूच्या गाडयांवर मॉनिटरींग करणे हा एक पार्ट आमच्याकडे होता. आता डोअर टु डोअर कलेक्शन रेग्युलर बेसिस होते आहे. ज्या भागात होत नाही. त्यासाठी आम्ही त्याला वारंवार फोन, मॅसेजेस करत असतो. सर्व एस आय ला १९ प्रभागांमध्ये नियुक्त केले आहे. रिपोर्टींग वर आम्ही प्राधान्याने लक्ष घालत असतो. सुका कचरा सेग्रेगेट वर आम्ही प्राधान्याने लक्ष घालत असतो. सुका कचरा सेग्रेगेट होत नाही पुरेशा प्रमाणात त्याचे प्रमाण कमी करायला मनपा कमी पडते आहे. हे प्राशासन म्हणून आम्ही मान्य करतो. सुक्या कचऱ्याचे वेगवेगळे भाग करणे अपेक्षित होते. त्यामध्ये काच,रबर, बॉटल, मेटल, टायर वेगवेगळया प्रकारचा कचरा अशा सगळया गोष्टी होत्या त्या वेगळया करणे आवश्यक होते. जे डेपोवरील काम आहे ते आता किती झाले माहित नाही. त्यामुळे सुक्या कचऱ्या बद्दल मी जास्त भाष्य करु शकत नाही.

म.सुनिल बैसाणे — शासनाचा उद्देश सुका आणि ओला कचऱ्याबाबत काय आहे? ओला कचरा कमी झाला पाहिजे की वाढला पाहिजे किंवा सुका कचरा कमी झाला पाहिजे का वाढला पाहिजे?

म. उपायुक्त — कचरा वाढत पण नाही आणि कमी पण होत नाही. प्रत्येक व्यक्तीमागे किती कचरा निर्माण होतो हे शासनाने अभ्यास पूर्वक आपल्याला सांगितले आहे. त्यामध्ये जो कचरा निघतोय त्याची विल्हेवाट योग्य प्रकारे लावणे हे महत्वाचे आहे.

म.सुनिल बैसाणे — सुका कचरा वाढला पाहिजे का कमी झाला पाहिजे?

म. उपायुक्त — अर्थात कमी झाला पाहिजे.

म. सुनिल बैसाणे — आत येथे कमी होतांना दिसतोय की वाढतांना दिसतोय.

म.उपायुकत — रेकॉर्डवर मॅन्यूप्यूलेशन होत असेल. प्रत्यक्षात काम होते नागरिकांकडून त्यात तफावत आहे.

म.सुनिल बैसाणे — तुमच्यावर कामाचा बोजा असू शकतो पण मी घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यासक आहे. मी एक नंबर देतो त्या नागरिकाने मला ६ तासाचा व्हिडीओ पाठवला आहे. एखादा नागरिक लोकप्रतिनिधीकडून अपेक्षा व्यक्त करतो कारण लोकप्रतिनिधी प्रश्न मांडतो म्हणून. माझ्याकडे सहा तासाचा व्हिडीओ आहे. वजन जेथे होते तिथला मी स्मना. सचिवांना विनंती केली होती. महासभेत ती रेकॉर्डींग दाखवू द्या. त्यांनी सांगीतले ६ तासाचा व्हिडीओ जास्त आहे. कोरम पूर्ण होणार नाही. सभागृहाला विनंती आहे मी करत असलेला आरोप चुकीचा असेल जी काही रिकव्हरी असेल ती माझ्याकडून करण्यात यावी. रोडावर ढिगारे पडलेले असतात.

म.उपायुक्त — शिदेसाहेब डेपोवर पाहणी करा.

म.सुनिल बैसाणे — माझी विनंती आहे, मान्यता दिल्यापासून सर्व धनादेशाची चौकशी झाली पाहिजे. त्याला कुठलेही बिल अदा करण्यात येऊ नये. तसेच ही एजन्सी ब्लॅक लिस्टेड करण्यात यावी. महासभेने नविन निविदा

प्रक्रीया करण्यासाठी सांगितले आहे. परंतु नविन निविदा प्रक्रीया केली तर ही संस्था यात सहभागी होऊ शकते. याला कायस्वरुपी ब्लॅकलिस्ट करावे. अशी विनंती करतो. आणि माझ्या विनंती नुसार योग्य निर्णय घ्याल अशी अपेक्षा करतो. त्यात ज दोषी असतील त्यांच्यावर गुन्हे नोंदवण्यात यावे.

म.सभापती

सन्मा. सदस्यांच्या मागणीनुसार घनकचरा संकलनाबाबतच्या स्वयंभू ट्रान्सपोर्ट पुणे यांच्या कार्यप्रणाली बाबत महासभेने नवि निविदा करण्यास महासभेने मान्यता दिली आहे. धनादेशाच्या बाबत शंका उपस्थित केली असल्याने दिलेल्या आदेशाच्या तारखेपासून ते आजपावेतो सर्व बिलांची चौकशी करुन कारवाई करणे योग्य होईल व अटी शर्तीचा भंग केलेला असल्यास सर्व रकमांची वसुली संस्थेकडून करण्यात यावी. तसेच कायदेशिर कारवाई करण्यात यावी. तसेच सदर संस्थेला काळया यादीत टाकणेबाबत योग्य ती कायदेशीर कार्यवाही प्रशासनामार्फत टाकण्यात यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२८ दिनांक २१/१२/२०२३

आपण शहरातील सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत आपणास मे.स्वंयभ्रू ट्रान्सपोर्ट,पुणे यांच्या कामाच्या कार्यष्दतीबाबत अनेक वेळा पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. याबाबत आपण मला उत्तर देण्यात आलेले नाही अथवा या विषयावर साधक-बाधक चर्चा देखील करण्यात आलेली नाही.

ज्याअर्थी मी धुळे महानगरपालिकेस मे.स्वंयभ्रू ट्रान्सपोर्ट,पुणे हे अटी व शर्तीनुसार काम करीत नाही आहे हे मी आपणास माझ्या पत्रामध्ये वारंवार आपल्याला अवगत करून दिले आहे. मात्र अद्यापपावेतो प्रशासनाने याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

ज्याअर्थी सदर संस्थेला प्रशासनाने कार्यदेश देण्यात आलेला आहे. त्यापासून ते आजपर्यंत लेखा विभागाने महिन्यानुसार किती देयक देण्यात आलेले आहे. याबाबत माहिती देण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे सदर संस्थेला देण्यक हे १५ व्या वित्त आयोगातून देण्यात येत आहे. तथापी आजच्या तारखेला वित्त आयोगाची रक्कम पुरेशी शिल्लक नाही मग सदर देयकाची रक्कम आपण कोणत्या निधीमधून देण्यात येणार आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

ज्याअर्थी सदर संस्थेस कार्यादेश दिल्यापासून 7 वर्षासाठी काम देण्यात आलेले आहे. सदर संस्थेने मालेगांव स्थित नामक संस्थेस धुळे शहरातील घनकचरा संकलन बहतूकीसाठी देण्यात आलेले आहे असे माझ्या लक्ष्यात आले आहे. तथापि केलेल्य करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार असे सदर संस्था करु शकते का? जर केले असेल तर याता आपण कोणती कार्यवाही करणार आहे कारण हा प्रश्न शहरातील प्रत्येक नागरीकांचा आरोग्याशी निगडीत आहे त्याचप्रमाणे सदर संस्थेने अद्यापपर्यंत MLP सादर केली नाही आहे तसेच सदर संस्थेत कामाचा कार्यादेश दिल्यापासून 6 महिन्याच्या आत में स्थायी समितीला घनकचा भाचा मूल्यमापन अहवाल सादर करणे आवश्यक होते समय अ मागील दीड वर्षापासून सादर कलेला नाही, याबाबत आपण सदर संस्थेवर कार्यवाही केली आहे का ?

ज्याअर्थी शहरातीलघनकचरा व्यवस्थापन अतर्गतकचरा संकास्त व वाहतूक करण्याकामी धुळे मनपाने स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे या संस्थेसोबत 7 वर्षासाठी करार करण्यात आलेला आहे. सदर मक्ता देऊन जवळपास दीड वर्ष पूर्ण झाले आहे सदर मक्ता हा शहरातील नागरिकाच्या आरोग्याशी व मुलभूत सेवेशी निगडीत असल्याने अटी व शर्तीनुसार यासस्थ कामाचा दर्जाबाबत मुल्यमापन करणे आवश्यक आहे असे दिलेल्या कार्यादेशमध्ये नमूट करण्यात आले आहे. तथापी अद्यापपर्यंत आपण याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यावाहीची दखल घेतली नाही.

सबब भी या संस्थेच्या कामाबाबत अटी व शर्तीमध्ये दिलेल्यानुसार कामकाज होल नाही आहे याबाबत मी अनेक वेळा पत्र व्यवहार करून प्रशासनास अवगत केले होते तसे नगर विकास विभागाने

देखील शहरातील घनकचरा व्यवस्थापनबाबत काम समाधानकारक अथवा अनियमिता होत असेल तर चौकशी केल्याशिवाय आपण देयक अदा करू नये यासदर्भीय नगर विकास विभागाने विविध शासन निर्णय/परिपत्रक निर्गमित केले आहे. तथापी या सर्व बाबीकडे आपण केराची टोपली दाखविली आहे. तसेच शासनाने दिलेल्या निधीची विनियोग कशाप्रकार करावे यासाठी मार्गदर्शक तत्वे आखून दिलेले आहे.

त्याअर्थी आपण सदर संस्थेची अटी व शर्ती काम करीत आहे किंवा नाही याबाबत चौकशी करावी व चौकशी केल्याशिवाय आपण सदर संस्थेचे देयक अदा करू नये जर आपण सस्थेचे देयक अदा केले तर आपल्या विरुद्ध नगर विकास विभाग यानी दि. 20 मे, 2019 च्या शासन निर्णयाप्रमाने शहरातील घनकचरा संकलन, वाहतूक ही कामे खाजगीरित्या (Outsourcing) ने कंत्राटदारामार्फत करून घेत असताना त्यासाठी संबंधित काटदारासोबत केलेवा अटी व शर्तीनुसार ही सर्व कामे करून घेणे आवश्यक आहे व त्यानुसार देयक अदा करण्यापूर्वी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कामे झाल्याची खातरजमा करणे संबंधित आयुक्त महानगरपालिका यांच्यावर बंधनकारक आहे करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन झाल नसतानाही व प्रत्येक टप्यावर आवश्यक त्या यत्रणामार्फत त्या ल्या टप्याचे काम झालाच प्रामाणिकरण झाल्याची खातरजमा करावी, अशाप्रकारे खातरजमा न करता कोणतेही देयक अदा केले आणार नाही या सर्व बाबीची पूर्तता करणे आवश्यक आहे. या सर्व बाबीची पूर्तता न केल्यास कंत्राटदाराचे देयक अदा केल्यास संबंधित आयुक्त, महानगरपालिका याना व्यक्ति जबाबदा धरण्यात येईल व त्यांच्या विरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करण्यात येईल असे नमूद आहे तरी याबाबत आपण नॉद घ्यावी असे पत्र सादर केलेले आहे.

सन्मा.सदस्यांच्या मागणीनुसार घनकचरा संकलनाबाबतच्या स्वयंभू ट्रान्सपोर्ट पुणे यांच्या कार्यप्रणाली बाबत महासभेने नवि निविदा करण्यास महासभेने मान्यता दिली आहे. धनादेशाच्या बाबत शंका उपस्थित केली असल्याने दिलेल्या आदेशाच्या तारखेपासून ते आजपावेतो सर्व बिलांची चौकशी करुन कारवाई करणे योग्य होईल व अटी शर्तीचा भंग केलेला असल्यास सर्व रकमांची वसुली संस्थेकडून करण्यात यावी. तसेच कायदेशिर कारवाई करण्यात यावी. तसेच सदर संस्थेला काळया यादीत टाकणेबाबत योग्य ती कायदेशीर कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात यावी.

सुचक:- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे
अनुमोदक:- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजूर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२२१ पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील १३ व्हॉलमन व १ कनिष्ठ अभियंता यांना ६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सौ.कल्याणी अंपळकर विषय मंजूर करण्यात यावा.

म.फातमा नुरूल अमीन विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२९ दिनांक २१/१२/२०२३

पाणीपुरवठा विभागाकडील खालील नमुद १ ते १४ एकत्रित मानधनावरील कर्मचारी यांना पुढील ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणेबाबत सदर ठरावानुसार मंजुरी देण्यात आली होती. १ ते १३ व्हॉलमन व १ कनिष्ठ अभियंता यांना एकत्रित मानधनावर पुढील ६ महिनेकरीता नवीन नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांची मुदत दि. ९/१/२०२४ व दि ५/१२/२०२३ रोजी संपुष्ठात येत आहे.

अ.क्र	कर्मचा-याचे नाव	एकत्रित मानधन दरमहा	मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक
१	दिपक छगन बागुल	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
२	सैय्यद इमरान अली जाफर अली	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
३	तुषार गिरीश चौधरी	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
४	शिंदे दिनेश रामसिंग	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
५	चंद्रकांत मोतीलाल फुलपगारे	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
६	हेमराज भाईदास कोळी	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
७	प्रमोद विठठल सोनवणे	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
८	गणेश शंकर बिरारी	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
९	किरण राजेंद्र फुलपगारे	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
१०	योगेश भानुदास वाखारकर	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
११	ज्ञानेश्वर तुकाराम सैंदाणे	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
१२	प्रणय राजेंद्र लहामगे	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
१३	रणदिवे राहुल अरुणराव	रु १४०००/-	दि.९/१/२०२४
१४	श्री मोहित अकील मुजावर	रु २००००/-	दि ५/१२/२०२३

मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार मानधनावरील १३ व्हॉलमन व १ कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार में. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील १३ व्हॉलमन व १ कनिष्ठ अभियंता यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- श्रीमती अन्सारी फातमा नुरूल अमीन

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ३३ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
मंगळवार दिनांक २६/१२/२०२३
वेळ :- दुपारी १-०० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.**३३** आज मंगळवार दिनांक **२६/१२/२०२३** रोजी **दुपारी १-०० वाजता** सौ. किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. या सभेचे इतिवृत्त

या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
४	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
५	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
६	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
७	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
८	श्री.अन्सारी वसीम खलील	सदस्य
९	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
१०	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या
११	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	डॉ.संगीता नांदूरकर	उपायुक्त
२	श्री.अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरिक्षक
३	श्री. मनोज अरविंद बाघ	नगरसचिव
४	डॉ.एम.आर. शेख	आरोग्याधिकारी
५	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
६	श्री.संजय मोरे	कार्यालयीन अधिक्षक
७	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
८	श्री. राजेश गायकवाड	मनपा शिक्षण मंडळ

९	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग
१०	श्री.शिरिष जाधव	अधिक्षक,मालमत्ता कर विभाग
११	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभागप्रमुख
१२	श्री.चंद्रकांत जाधव	मलेरिया पर्यवेक्षक

म. सभापती सन्मा.सदस्य,मा. उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म.सभापती दिनांक २७/१२/२०२३ रोजी अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेचा लोकार्पण सोहळा हा महत्वाचा कार्यक्रम असल्याने व सदर कार्यक्रमास आपल्या पक्षाचे वरिष्ठ नेते उपस्थित राहणार असल्याने कार्यक्रमाच्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने सर्व अधिकारी व्यस्त आहेत. त्यामुळे अधिकारी बैठकीस उपस्थित नाहीत यामुळे आजची स्थायी समितीची सभा तहकुब करण्यात येत आहे. तहकुब सभेचे वेळ व तारीख कळविण्यात येईल.

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरूवार दिनांक २८/१२/२०२३
वेळ :- दुपारी ४-३० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.**३३** दि.२६/१२/२०२३ रोजीची तहकुब करण्यात आलेली साप्ताहिक सभा आज गुरूवार दिनांक **२८/१२/२०२३** रोजी **दुपारी ४-३० वाजता** सौ. किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात भरली.

या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	**सदस्यांचे नांव**	**हुद्दा**
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
६	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
७	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
८	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
९	श्री.बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य
१०	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
११	श्री.अन्सारी वसीम खलील	सदस्य

१२	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
१३	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या
१४	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती करूणा डहाळे	अति.आयुक्त
२	श्री.अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरिक्षक
३	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी
४	श्री.नवनीत सोनवणे	कार्यकारी अभियंता,पा.पु.विभाग
५	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
६	डॉ.एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
७	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
८	श्री.लक्ष्मण पाटील	मुख्य स्वच्छता निरीक्षक
९	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
१०	श्री.संजय मोरे	कार्यालयीन अधिक्षक
११	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१२	श्री.एन.के.बागूल	विद्युत अभियंता
१३	श्री.चंद्रकांत उगले	सहाय्यक अभियंता, पा.पु.विभाग
१४	श्री.किशोर सुडके	परवाना व बाजार विभागप्रमुख
१५	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१६	श्री. राजेश गायकवाड	लेखापाल,मनपा शिक्षण मंडळ
१७	श्री.शिरिष जाधव	अधिक्षक,मालमत्ता कर विभाग
१८	श्री.प्रसाद जाधव	अतिक्रमण विभागप्रमुख
१९	श्री.हेमंत पावटे	कनिष्ठ अभियंता
२०	श्री.संभाजी सुडके	प्र.वाहन विभाग प्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य,मा. अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचे कोरम पुर्ण झालेले आहे नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-२२२ — प्र.क्र.७ साक्री रोड नेहरू पुतळा जवळील संभाजी नगर भागात प्रवेशव्दारसाठी अडथळा ठरणाऱ्या एल.टी.लाईन व एच.टी.लाईन स्थलांतरीत करणेकामी रू.२,७६,०४१/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यात यावा.

म.हर्षकुमार रेलन — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३० दिनांक २८/१२/२०२३

सन्मा.सदस्य श्री. सुनील तुळशीराम बैसाणे यांच्या पत्रानुसार प्र. क्र.०७ साक्रीरोड नेहरुपुतळाजवळील संभाजी नगर भागात प्रवेशद्वार बांधणेचे काम मंजूर झाले आहे. तसेच प्रवेशद्वाराचे काम सुरु देखील झालेले आहे. परंतु सदर प्रवेशद्वारावरून महाराष्ट्र वीज वितरण कंपनीची LT लाईन, HT लाईन गेलेली असल्याने सदर काम होणे शक्य नाही. त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता अडथळा असलेले LT लाईन, HT लाईन स्थलांतरित करणे अत्यंत गरजेच होते. त्यानुसार सदर कामी १.३ % सुपरविजन चार्जेस सह अंदाजपत्रक महावितरण कंपनी कडून मागविण्यात आले असून, अंदाजपत्रकिय तांत्रिक मान्यता महावितरण कंपनी कडून प्राप्त आहे.

तसेच प्रवेशद्वारावरील बांधकाम त्वरीत सुरु करावयाच्या अनुषंगाने अडथळा असलेले LT लाईन, HT लाईन स्थलांतरित करणे गरजेच होते. सदरच्या अनुषंगिक कामासाठी संदर्भ २ नुसार १.३% सुपरविजन चार्जेस सह अंदाजपत्रक रक्कम रु.**२,७६,०४१/-** मात्र तांत्रिक मान्यता महावितरण कंपनी मा. अधीक्षक अभियंता कडून प्राप्त आहे. सदरचे काम महावितरण कंपनीच्या अंदाजपत्रकानुसार करण्यात आले आहे. निगडीत असून, सदर ठिकाणी बोअरिंग तात्काळ करणे गरजेचे आहे.असे संदर्भीय पत्रानुसार कळविले आहे.

सदरचे कामी LT लाईन, HT लाईन स्थलांतरित करणे बाबी समाविष्ट असून,सदर कामासाठी शासन महावितरण कंपनी मा. अधीक्षक अभियंता कडूनप्राप्त अंदाजपत्रक नुसार **अंदाजपत्रकीय रक्कम रू. २,७६,०४१/-** मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार**दिवे व साहित्य** निधीतून कामासाठी रू. **१ कोटी रु** मात्र तरतूद आहे.सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

करिता उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम **रु.२,७६,०४१/-** मात्र खर्च अपेक्षित असून,सदरचे काम हे विना निविदा **मे.आकाश इंटरप्रायजेस,धुळे** यांचे कडून करून घेण्यात आले.करिता सदर कामी **कार्योत्तर मंजुरी** करिता सदरचे काम **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये** आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्र.क्र.७ साक्री रोड नेहरू पुतळा जवळील संभाजी नगर भागात प्रवेशव्दारसाठी अडथळा ठरणाऱ्या एल.टी.लाईन व एच.टी.लाईन स्थलांतरीत करणेचे काम **मे.आकाश इंटरप्रायजेस,धुळे** यांचे कडून करून घेण्यात आले. सदर कामी झालेल्या रक्कम रू.२,७६,०४१/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२२३ प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील अवधान येथील महादेव मंदिर येथे सुशोभिकरण करणेचे कामाचे निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.वंदना थोरात विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३१ दिनांक २८/१२/२०२३

प्रादेशिक पर्यटन विकास योजना अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील अवधान येथे महादेव मंदिर येथे सुशोभिकरण करणे कामास म.अवर सचिव , पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग , महाराष्ट्र शासन यांच्या कडील शासन निर्णय क्र. टीडीएस २०२३ / ०८ / प्र.क्र. ३४६ / पर्यटन दि.१०/११/२०२३ अन्वये उक्त कामाच्या व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९४७/२३-२४ दि.२१/०३/२३अन्वये रक्कम रु.४९,८७,३१५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ ६७७ /२०२३-२४ दि.२४/११/२०२३ अन्वये दि.२५/११/२०२३ रोजी दैनिक हिंदुस्तान टाईम्स / लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१५/१२/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	रामेश्वर ट्रेडर्स	शे.४.००% जास्तीने	
२	एकविरा कन्सट्रक्शन	शे.५.००% जास्तीने	
३	यासीन अब्दुल जब्बार शेख	अंदाजपत्रकीय दराने	**सर्वात कमी दर**

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **यासीन अब्दुल जब्बार शेख** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम

भरलेली आहे. सबब कंत्राटदार **यासीन अब्दुल जब्बार शेख** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **यासीन अब्दुल जब्बार शेख** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.वंदना विक्रम थोरात

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२२४ प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत अवधान येथील धनदाई माता मंदिर येथे पेव्हर ब्लॉक, फाऊनटेन बांधकाम करणेचे कामाचे निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सौ.सुरेखा उगले विषय मंजूर करण्यात यावा.

म.सौ.कल्याणी अंपळकर विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३२ दिनांक २८/१२/२०२३

प्रादेशिक पर्यटन विकास योजना अंतर्गत अवधान येथे धनदाई माता मंदिर येथे पेव्हर ब्लॉक, फाऊनटेन बांधकाम करणे कामास म.अवर सचिव , पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग , महाराष्ट्र शासन यांच्या कडील शासन निर्णय क्र. टीडीएस २०२३ / ०८ / प्र.क्र. ३४६ / पर्यटन दि.१०/११/२०२३ अन्वये उक्त कामाच्या व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३७९/२०२३-२४ दि.२३/११/२३ अन्वये रक्कम रु.१,२५,१२,०१४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ ६७७ /२०२३-२४ दि.२४/११/२०२३ अन्वये दि.२५/११/२०२३ रोजी दैनिक हिंदुस्तान टाईम्स / लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१५/१२/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	रामेश्वर ट्रेडर्स	शे.४.००% जास्तीने	
२	एकविरा कन्सट्रक्शन	शे.५.००% जास्तीने	
३	यासीन अब्दुल जब्बार शेख	अंदाजपत्रकीय दराने	**सर्वात कमी दर**

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **यासीन अब्दुल जब्बार शेख** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **यासीन अब्दुल जब्बार शेख** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **यासीन अब्दुल जब्बार शेख** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.सुरेखा चंद्रकांत उगले

अनुमोदक :- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२२५ धुळे मनपाच्या विविध विभागातील मानधनावरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे धुळे महानगरपालिकेतील मानधन तत्वावर जे कर्मचारी आहे त्यांच्या मानधन वाढ करणे कामी सभागृह नेत्या भारतीताई माळी यांनी विनंती केली होती की, त्यांच्या कामानुसार त्यांना मानधन मिळत नाही. त्यानंतर आलेल्या मानधन वाढीच्या प्रस्तावावर बोलत असतांना अस्थापना विभागातील कर्मचारी /अधिकारी जे कोणी संबंधीत असतील त्यांना प्रशासनाच्या वतीने खुलासा करण्यासाठी बोलवावे. मोरे साहेब आपण विषय पत्रीकेवरील विषयाचे तुम्ही वाचन केले असेल. त्या कर्मचाऱ्यांची प्रशासनाकडे मागणी आहे त्यानुसार मा. आयुक्त महोदयांनी १००० रुपये वेतनवाढ करण्यासाठी नमूद केले आहे. मला विचारायचे आहे आत जे कर्मचारी आहे त्यांना किती वेतन देण्यात येत आहे.

म.संजय मोरे कनिष्ठ अभियंता -२००००/-, लिपिक टंकलेखक-१५०००/-, वाहनचालक-१५५००/-, स्वच्छता निरिक्षक-१५५००/-,गाळणी चालक-१४०००/-, गाळणी निरिक्षक-१४०००/-, पंप ऑपरेटर-१४०००/-, फिटर-१४०००/-, विजतंत्री-१४०००/-, औषध निर्माता-१५७००/-,

एएनएम-१५५००/-, स्टाफ नर्स-१९०००/-, व्हॉल्वमन-१४०००/-, दाई-१३०००/-, बालवाडी शिक्षीका-१३०००/-, बालवाडी मदतनीस-९२५०/- असे मानधन देत आहोत.

म.सुनिल बैसाणे — शासनाच्या आस्थापना खर्च किती आहे?

म.संजय मोरे — ४८% च्या वर आहे.

म.सुनिल बैसाणे — आपण या ठिकाणी नमूद केले आहे. यापेक्षा जास्त वाढ झाल्यास शासनाची परवानगी घ्यावी लागेल. शासनाने आपल्याला १२६ पदांसाठी मान्यता दिली आहे. त्यासाठी शासनाने शिथिलता दिली आहे का?

म.संजय मोरे — हो २०२३ ला शिथिलता दिली आहे. आणि फक्त १२६ पदांसाठी आहे.

म.सुनिल बैसाणे — कर्मचाऱ्यांना किमान वेतन आयोग लागू आहे. त्यामध्ये काय आहे? किमान वेतन आयोगानुसार किती पगार दिला गेला पाहिजे.

म.संजय मोरे — सरासरी २१-२२ हजार रुपये पगार दिला गेला पाहिजे. किमन वेतन कायद्यानुसार त्यात कुशल, अकुशल, अर्धकुशल असे टप्पे आहे.

म.सुनिल बैसाणे — कुशल कर्मचारी वेतन किती? अकुशल कर्मचारी वेतन किती?

म. संजय मोरे — सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडून पत्र मिळाले की, त्यानुसार कार्यवाही करावी लागते.

म.सुनिल बैसाणे — आपल्याला शासनाचे मार्गदर्शन आहे. आपण संस्थेकडून जे काम करतो त्यात कामगारांच्या विमा असेल व शासनाने ज्या अटी शर्ती दिलेल्या आपण त्याला बांधील असतो. मनपा ही शासनाची यंत्रणा आहे. तर शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार करणे योग्य असेल किंवा काय? त्या पध्दतीने यांच्यवर अन्याय झाला आहे.

म.संजय मोरे — आस्थापना खर्चाची टक्केवारी ही पाहावी लागते.

म.सुनिल बैसाणे — आपणच सांगीतले आस्थापना खर्च शिथिल करण्यात आला आहे.

म.संजय मोरे — ते फक्त १२६ पदांच्या पदभरती करता आहे.

म.सुनिल बैसाणे — मग हे पदे आहेत ते त्यामध्ये समाविष्ठ नाही का?

म.संजय मोरे — त्यामध्ये काही पदे आहेत. कनिष्ठ अभियंता आहे. लिपिक टंकलेखक आहे. काही पदे त्यात समाविष्ठ नाही.

म.सुनिल बैसाणे — किमान वेतन कायदा लावला तर त्यांना किती वेतनवाढ होईल?

म.संजय मोरे — त्यांना ७ वा वेतन नुसार दिला जाईल.

म.सुनिल बैसाणे — आता तेच काम यांच्याकडून करुन घेतोय ना? काम हे कामगार आहे रोजगार हमीचे? किमान वेतन कायद्यानुसार त्यांना पगार दिला गेला पाहिजे. आपण त्यांना त्यांच्या हक्कापासून डावलतो आहे. आपल्याला शासनाने शिथिलता दिली आहे. म्हणून सभापती महोदया आपल्याला नम्र विनंती आहे. आपल्याला शासनाच्या ज्या मार्गदर्शक सूचना आहे. त्या सुचनेचे आपण पालन करुन कोणत्याही कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही. याबाबत दक्षता घेऊन जो कार्यालयीन टिपनी त्यामध्ये आयुक्त यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या मागणीनुसार त्यांना वेतनवाढ करण्यात यावी अशी विनंती करतो.

म.नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल — विषय मंजूर करावा.

म.सभापती

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार मानधनावरील कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानुसार मानधन वाढ होणे आवश्यक आहे. तथापी मनपा आस्थापना खर्च लक्षात घेता याबाबत मानधनवाढीबाबत समन्वयाने निर्णय होणे गरजेचे आहे. उक्त कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीबाबत मा.आयुक्त यांच्याशी चर्चा करून मानधन वाढ करणेस मान्यता देण्यात येत आहे.सदर मानधन वाढ दि.०१ जानेवारी २०२४ पासून लागू करण्यात यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३३ दिनांक २८/१२/२०२३

धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील कर्मचारी यांनी मानधन वेतनात वाढ करणे किंवा किमान वेतन कायदयानुसार वेतनात वाढ करण्याबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

तसेच सन्मा.सभागृह नेत्या श्रीमती भारती अशोक माळी, यांनी धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी (लिपीक टंकलेखक, व्हॉलमन, फीटर, वाहन चालक, गाळणी निरीक्षक , पंप ऑपरेटर, स्वच्छता निरीक्षक, दाई, विजतंत्री, गाळणी चालक) हे गेली ७ ते ८ वर्षापासून मनपात कार्यरत आहेत. सदर कर्मचारी अत्यंत प्रमाणीक आहेत. सदर कर्मचा-यांना सदयस्थिती दिले जाणारे मानधन अत्यंत कमी असल्याने दैनंदीन जीवन उपभोगास अत्यंत अल्प असल्यामुळे त्यांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे तसेच जळगांव व इतर मनपात मानधनावरील कर्मचा-यांना किमान वेतन कायदयानुसार मानधन हे २१०००/- ते २५०००/- रुपये देण्यात येत आहे, असे पत्रात नमुद केले आहे.

सन्मा. नगरसेवक श्रीमती भारती माळी यांनी नमुद केल्यानुसार जळगांव महानगरपालिकेमध्ये मानधनावरील विजतंत्री, स्वच्छता निरीक्षक, लिपीक टंकलेखक यांना रु. २१०००/- मात्र एकत्रित मानधन देण्यात येत आहे. तसेच कनिष्ठ अभियंता यांना रु २२०००/- मानधन देण्यात येत आहे. असे नमुद केलेले आहे.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांच्या अभिप्रायानुसार मा आयुक्त सो यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहे.मागील वर्षी मानधन वाढ झालेली दिसून येते प्रस्तावित केल्याप्रमाणे एकदम वाढ न करता रक्कम रु. १०००/- ने सर्वांना मानधनात वाढ करावी हे योग्य वाटते, तरी सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे निर्णयार्थ ठेवणेपूर्वी तक्त revise करुन फेर सादर करणेबाबत आदेशीत केलेले आहे .

त्यानुसार मा आयुक्त सो यांनी वरिल प्रमाणे दिलेल्या निर्देशानुसार खालील प्रमाणे प्रस्तावित करणेत येत आहे.

मानधनावरील कार्यरत कर्मचारी यांचा तपशिल					
अ क्र	**पदाचे नाव**	**एकुण संख्या**	**सद्यस्थित असलेले मानधन**	**मा आयुक्त सो यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तावित मानधन वाढ**	**मासिक खर्चात होणारी वाढ (एकुण कर्मचारी संख्या X केलेली वाढ)**
१	२	३	४	५	६
१	कनिष्ठ अभियंता	१४	२०,०००/-	१०००/-	१४ X रु. १००० = **रु. १४,०००/-**
२	लिपीक टंकलेखक	२४	१५,०००/-	१०००/-	२४Xरु.१०००= **रु. २४०००/-**

	(कॉम्प्युटर ऑपरेटर)				
३	वाहन चालक	१५	१५,५००/-	१०००/-	१५ X रु. १०००= **रु. १५०००/-**
४	स्वच्छता निरीक्षक	२	१५,५००/-	१०००/-	२ X रु. १००० = **रु. २०००/-**
५	गाळणी चालक	६	१४,०००/-	१०००/-	६ X रु.१०००= **रु. ६०००/-**
६	गाळणी निरीक्षक	३	१४,०००/-	१०००/-	३ X रु.१००० = **रु. ३०००/-**
७	पंप ऑपरेटर	१०	१४,०००/-	१०००/-	१० X रु. १००० = **रु. १००००/-**
८	फीटर	१	१४,०००/-	१०००/-	१ X रु. १००० = **रु. १०००/-**
९	विजतंत्री	६	१४,०००/-	१०००/-	६ X रु. १००० = **रु.६०००/-**
१०	औषध निर्माता	३	१५,७००/-	१०००/-	३ X रु. १००० = **रु. ३०००/-**
११	ए एन एम	८	१५,५००/-	१०००/-	८ X रु. १००० = **रु. ८०००/-**
१२	स्टॉफ नर्स	३	१९,०००/-	१०००/-	३ X रु. १००० = **रु. ३०००/-**
१३	व्हॉलमन	१७	१४,०००/-	१०००/-	१७ X रु. १००० = **रु. १७,०००/-**
१४	दाई	२	१३,०००/-	१०००/-	२ X रु.१००० = **रु.२०००/-**
१५	बालवाडी शिक्षीका (मनपाकडे वर्ग)	५	१३,०००/-	१०००/-	५ X रु. १००० = **रु. ५,०००/-**
१६	बालवाडी मदतनीस (मनपाकडे वर्ग)	५	९,२५०/-	१०००/-	५ X रु. १००० = **रु. ५०००/-**
				दरमहा एकुण वाढ	**रु. १,२४,०००/-**

उक्त मानधनावरील कर्मचारी यांचा तक्त्यात रकाना क्र ५ मध्ये नमुद नुसार मानधन वाढ केल्यास दरमहा **रु. १,२४,०००/-** खर्चात वाढ होणार आहे तसेच वार्षिक खर्चात **रु.१४,८८,०००/-** वाढ होणार आहे.

तरी रकाना क्र. ५ मध्ये प्रस्तावित केले नुसार मानधनावरील कर्मचा-यांना यांना मानधन वाढ करणेबाबत धोरणात्मक व आर्थिक बाब असल्याने सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार मानधनावरील कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानुसार मानधन वाढ होणे आवश्यक आहे. तथापी मनपा आस्थापना खर्च लक्षात घेता याबाबत मानधनवाढीबाबत समन्वयाने निर्णय होणे गरजेचे आहे. उक्त कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीबाबत मा.आयुक्त यांच्याशी चर्चाकरून मानधन वाढ करणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर मानधन वाढ दि.०१ जानेवारी २०२४ पासून लागू करण्यात यावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे

अनुमोदक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२२६	मनपा क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा निधी अंतर्गत ०१ ते १३ ठिकाणी विविध (रस्ते करणे, गटारी करणे, वॉल कंपाऊंड करणे, बगीचा करणे, ग्रंथालय बांधणे ई.) कामाचे निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.हर्षकुमार रेलन	हा जो विषय आला आहे त्यामध्ये जी कामे दिली आहे १ ते १३ कामांची मला प्रशासनाला विचारणा करायची आहे. शितल कॉलनी कोणत्या प्रभागात आहे?
म.सहा. अभियंता	शितल कॉलनी प्रभाग क्र.७ मध्ये आहे. ज्यावेळी प्रशासकीय मान्यता झाली त्यामध्ये प्रभाग क्र.६ असा उल्लेख आलेला आहे.
म.हर्षकुमार रेलन	सभापती महोदया, अति. आयुक्त महोदया, आपण या खुलाशाने समाधानी आहात का ? याचे टेंडरही झाले आहे.
म.अति. आयुक्त	टेंडरवर याच पध्दतीने झाले आहे का?
म.सहा. अभियंता	टेंडरवर याच पध्दतीने आहे शासनाकडून प्रशासकीय मान्यता भेटली त्यावरही प्र.क्र.६ असा उल्लेख होता.
म. हर्षकुमार रेलन	प्रभाग क्र. ६ मध्ये शितल कॉलनीच नाही.
म.सहा. अभियंता	महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिल्यामूळे नावात बदल करण्याचा आपल्याला अधिकार नाही.
म.अति. आयुक्त	प्रस्तावच चुकीचा गेला आहे का?
म.हर्षकुमार रेलन	आपण यांच्या खुलाशाने समाधानी आहात का? टेंडर होऊन गेले. ते मंजूर होऊन गेले. आपल्याकडे मंजूरी करता प्रस्ताव आला आहे. काय करावे याबाबत? ती कॉलनीच नाही प्रभाग क्र. ६ मध्ये काम कसे करणार? कोण करणार?
म. सहा.अभियंता	प्रभाग क्र.६ मधील हे तीन कामेबाजूला ठेऊन. महाराष्ट्र शासनाकडून दुरुस्तीकरुन घेता येईल.
म.हर्षकुमार रेलन	पण माझे म्हणने आहे ते काम झालेले आहे. प्रभाग क्र. ७ मधील जरी शितल कॉलनी असली तेथील महादेव मंदीराचे सुशोभिकरण झाले आहे. मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन होणार होते परंतु ते आले नाही. मा. कॅबिनेट मंत्री दादा भुसे यांनी त्यांचे उद्घाटन केले आहे.
म.सभापती	अति. आयुक्त महोदया, आजच्या आजच त्या कामाची जबाबदारी निश्चीत करा.
म.हर्षकुमार रेलन	मागेपण आमच्या ७ नंबर प्रभागात रस्त्याचे काम झाले होते. वर्क ऑर्डर बाकी होती. त्यामध्ये मी विनंती केली होती. त्यामुळे दर्जाहिन काम झाले आहे. आपण पाहणी करावी. पैसे जनतेचे गेले आहे. आपण तेथे व्हीजीट केली का?
म.सहा. अभियंता	शिंदे साहेब त्या प्रभागात समक्षपाहणी केली आहे. त्याकामाबाबत ठेकेदाराला नोटीस देखील केली आहे.
म.हर्षकुमार रेलन	तेथील काम दर्जाहिन झाले आहे. नोटीस देऊन काय होणार आहे. वर्क ऑर्डरपूर्वीच काम करुन टाकले आहे. तेथे कोणीच गेलेले नाही. कोटयावधीची कामे होत आहे. कोणी लक्ष द्यायला तयार नाही. ही शेवटची सभा आहे. यापुढे काय होईल ते माहित नाही. आम्ही जरी नगरसेवक पदी नसलो तरी आम्ही येथे येऊ. लोकांच्या प्रश्नावर आम्हाला बोलावेच लागेल. आपण या उत्तरावर समाधानी आहात का? प्रभाग क्र. ६ शितल कॉलनी नाही, आणि यापूर्वीच ते कामे झाले आहे.

म.सभापती	सन्मा. सदस्य जे प्रश्न विचारत आहे त्यावर समाधानकारक उत्तर दिलेले नाही.
म.अति. आयुक्त	बांधकाम विभागाचे शहर अभियंताउपस्थित नसल्यामुळे उगले याचे उत्तर देतील तथापि यादी मधील ११,१२,१३ हे जे कामे आहे त्याचे शुध्दीपत्रक केले नाही तसेच शासनाकडून याची दुरुस्ती करावी लागणार आहे. त्यामुळे या तिनही कामांना सध्या स्थायी मध्ये मंजूरी न देता हे तहकूब ठेण्यात यावे.
म.हर्षकुमार रेलन	पुढे काय होईल याचे. यात १२ क्रमांकाचे काम आहे. त्यात १ कोटी ३६ लाखाची ग्रथांलय बांधण्यासाठी तेथे जागाच नाही आहे. मी त्या भागातील नगरसेवक आहे. प्रस्ताव कसा तयार केला? कसे टेंडर निघाले? पाहणी केली नाही. ओपन स्पेस किती आहे? १०% च्या वर तेथे काम होऊ शकत नाही. कोठे बांधायची इमारत?
म. सभापती	उगले साहेब हे कामे तपासून घ्यावे. त्याचे शुध्दीपत्रकही तयार करुन घ्या. आणि हे जर कामे झाले असतील तेही तपासून घ्या. झाले नसतील त्याचा ही आढावा घ्या.
म.हर्षकुमार रेलन	आमच्या प्रभागात अजून एक काम झाले आहे. काही दिवसापूर्वी डांबरी रस्ता झाला आहे. गणेश कॉलनी च्या कोपऱ्यावर मागील वर्षी टेंडर मंजूर झाले आहे. परंतु ते काम झालेले नव्हते त्याचे बिल अदा केलेले आहे. पण त्यावर परत नविन काम दाखवून डांबरी रस्ता केला. किती लेअर केले? किती लेअर होते?
म.सभापती	उगले साहेब मागेही तुम्हाला आदेश केले होते. बिल अदा करु नये.
म. हर्षकुमार रेलन	बिल अदा करणे हा विषय पुढे येईल परंतु काम झाले कसे?
म.सहा. अभियंता	मागील स्थायी समिती मध्ये सन्मा. सदस्यांनी हा प्रश्न मांडला होता. आम्ही समक्ष शिंदे साहेब सोबत त्या कामाच्या ठिकाणी पाहणी केली होती. संबंधीत ठेकेदाराला नोटीस ही दिली होती. आम्ही वर्क ऑर्डर देतांना जे काम ठेकेदार सुरु करणार आहे. ते काम कनिष्ठ अभियंता यांना बोलवल्या शिवाय कुठलेही काम सुरु करण्यात येऊ नये असे संबंधीत ठेकेदाराला आदेश केले आहे. संबंधीत ठेकेदाराने ज्यावेळी काम चालू केले त्यावेळी कनिष्ठ अभियंता यांना बोलवले नव्हते त्यामुळे त्यांना नोटीस देखील काढली आहे.
म.हर्षकुमार रेलन	ज्याने काम केले तो ठेकेदारच नाही. ते काम माझ्या वार्डातील आहे. मला माहित आहे त्याला विचारले तुम्ही कसे काय काम करता आहात. त्याने सांगितले ठेकेदाराने माझ्याकडे दिले आहे. त्यांचे काहीतरी जॉईंट व्हेनचर आहे. ते काम एका रात्रीतून झाले आहे.
म.सहा. अभियंता	ते काम एका दिवसातून झालेले नाही. ठेकेदाराचे जॉईंट व्हेनचर आहे तो दुसऱ्या ठेकेदाराकडून ते काम करुन घेऊ शकतो.
म.हर्षकुमार रेलन	त्यामध्ये वेगवेगळया कंडीशन असतात.
म.अति. आयुक्त	सदर कामाचे देयेके देण्यात येऊ नये.
म.हर्षकुमार रेलन	मागील ५ वर्षात हे जसे प्रशासन चालले ते तसेच चालू आहे. आम्ही नागरिकांचे प्रश्न मांडतो त्यांची उत्तरे मिळत नाही. कशी चालेल ही महापालिका? अति.आयुक्त महोदया आपण स्वत: व्हिजीट करावी तेथे.
म.अति. आयुक्त	महोदया ठिक आहे आम्ही तेथे पाहणी करु
म.नरेंद्र चौधरी	विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३४ दिनांक २८/१२/२०२३

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा अंतर्गत ०१ ते १३ ठिकाणी विविध (रस्ते करणे, गटारी करणे, बॉल कंपाऊंड करणे, बगीचा करणे, ग्रंथालय बांधणे ई.) कामास म. जिल्हाधिकारी सो.,यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष—५/ नपाप्र / बांध / १३८३ दि. ०४/१२/२०२३ अन्वये ७,९९,९९,९९७/- प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र/१७०ते१८२ दि. ०६/०९/२०२३ अन्वये ७,९९,९९,९९७/- तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ ७३१ / २०२३-२४ दि.०६/१२/२०२३ अन्वये दि.०७/१२/२०२३ रोजी दैनिक लोकमत / पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२०/१२/२०२३ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.अे. बी. वाघ	अंदाजपत्रकीय दराने	**सर्वात कमी दर**
२	मे.स्मित कन्सट्रक्शन	शे.२.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.अे. बी. वाघ** यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.अे. बी. वाघ** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती पुढे सदर करणेस मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.अे.बी.वाघ** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच बांधकाम विभागामार्फत सादर झालेल्या कार्यालयीन अहवालात प्र.क्र.७ ऐवजी प्र.क्र.६ असा उल्लेख आहे याबाबत खातरजमा व पडताळणी करावी. तसेच याबाबत आवश्यक ती दुरूस्ती करण्याची जबाबदारी प्रशासनाची राहिल. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण झाल्यास प्रशासन जबाबदार राहील.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२२७	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) सन २०२३-२४ अंतर्गत नगरोत्थान महाभियान रस्ते विकास प्रकल्प अंतर्गत १ ते ६० कामे करणेबाबत निविदा दर मागविण्यात आले त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.
म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.सुनिल बैसाणे	सभापती महोदया, हर्ष भैयांनी जे मुद्दे उपस्थित केले त्या मूद्यांचा सारांश पाहीला तर आपण स्थायी समितीमध्ये चुकीच्या कामांना मंजूरी दिली गेली असेले किंवा देण्यात आली असेल. आपल्या उद्देशाने पालन होत नसेल तर त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या विभागाची आहे. आणि त्या विभागाने त्या पध्दतीने करुन घेणे गरजेचे आहे. आणि वर्क ऑर्डर दिलेले कामांची मुदती मध्ये करणे योग्य आहे. या सर्व गोष्टींचा प्रशासनाने अभ्यास करुन त्याबाबतचा धनादेशाचा विचार करावा. आणि शासनाने निधी दिला आहे. त्या निधीचा चांगल्या पध्दतीने विनियोग होण्यासाठी प्रशासनाने काळजी घेणे गरजेचे आहे. हर्षभैया धन्यवाद तुम्ही चांगल्या विषय मांडला. आपण शेवटच्या टप्प्या मध्ये आलो आहे. आपल्याला ४.५ ते ५ वर्षात किती कोटी मदत आली हे सर्वांना माहित आहे. जे विषय प्रलंबित होते त्या विषयांना मंजूरी मिळण्यापर्यंत सर्वच स्तरावर प्रयत्न केले. तरी त्या विषयांना अडचणी आलेल्या आहेत. परंतु सभागृहाला सांगु इच्छितो जरी आम्हाला अडचणी आल्या असतील पण असे कोणी समजू नये आमचा कार्यकाळ संपला. सभापती महोदया आपला कार्यकाळ संपलेला नाही. सभापतींचा कार्यकाळ हा एक वर्षाचा असतो. आपला कार्यकाळ संपायला अवधी आहे. सुट्टीच्या दिवशीच्या व्यतीरिक्त किंवा सुटी मध्ये सुध्दा सभा घेऊ शकतो. शनिवारी दुसरा आणि चौथा शनिवारी सुटी असते. येणारा शनिवार हा पाचवा आहे. शासनाला योग्य वाटते म्हणून मुख्यमंत्री महोदय सुटीच्या दिवशीपण व्ही.सी. घेतात. महाराष्ट्राच्या जनतेला न्याय देण्यासाठी या गोष्टी करत असतात. आम्ही सुध्दा नागरिकांच्या प्रश्नांवर सभागृहात बोलत असतो. २४ तासाच्या आत ३ दिवस सलग्न आपण स्थायी बैठक घेऊ शकतो. आता कोरोनाचाही कार्यकाळ चालू आहे. आमचा कार्यकाळ जरी संपला तरी कायदा आम्हाला कळतो. विषय क्र. २२७ वर मला काही प्रश्न उपस्थित करायचे आहे. आपण ३०% हमी दिली शासनाला ती कुठल्या आधारावर दिली याबाबतचा खुलासा करावा. ही टिपनी करतांना शब्दांची रचना इकडे तिकडे करु नका. ही टिपनी महत्वाची आहे.
म.मु.लेखाधिकारी	हाजो राज्यस्तरावर प्रकल्प महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगोरोत्थान त्या अंतर्गत जी मूळ टिपनी असते ती मूळे टिपनी अद्याप पर्यंत माझ्याकडे आलेली नाही.
म.सुनिल बैसाणे	कारण हे विचारण्याचे कारण असे आपण ३०% जी हमी घेतली शासनाची म्हणजे ७०% राज्य शासन आणि ३०% मनपा हिस्सा तर हमी घेत असतांना आतापर्यंत किती दायीत्व ते सांगु शकता का? मनपावर किती दायीत्व आहे अंदाजे?
म.मु.लेखाधिकारी	१०० कोटीचे दायीत्व आहे सर्व योजनेचे धरुन
म.सुनिल बैसाणे	एवढे करत असतांना किती वर्षात परतफेड करु शकतो याची.
म.मु.लेखाधिकारी	ते मनपाच्या उत्पन्नावर अवलंबून आहे.

म.सुनिल बैसाणे ३०% हमी प्रशासनाने घेतली आहे. म्हणजे आपले उत्पन्न एवढे आहे म्हणून या योजनेसाठी हमी पत्र दिली आहे. तर अंदाजे शंभर कोटी फेडण्यासाठी किती वर्षे लागू शकतात.

म.मु.लेखाधिकारी तेच म्हणतोय किती वर्षे लागतील हे उत्पन्नावर आधारित आहे. उत्पन्न जर चांगले आले तर एक वर्षात ही फेडून होईल.

म.सुनिल बैसाणे मला उत्पन्नाची हमी कुठल्या आधारवर दिली हे मला विचारायचे आहे. त्यासाठी टिपनी आवश्यक की सर्व तपासून करता?

म.मु.लेखाधिकारी विभागाने कुठल्या आधारावर दिले ते मलाही माहित नाही. कारण माझ्या रिमार्कसाठी फाईल आली नाही.

म.सुनिल बैसाणे मला ते उत्तर अपेक्षित यासाठी आहे समजा मी बाजारात गेलो तर माझ्या खिशात २०० रुपये आहे. परंतु मला २०० रुपया व्यतीरिक्त अजून ५०-६० रुपयाचे जास्तीचे घ्यायचे आहे. माझा पगार येतो हजार रुपये मी हजार रुपयातून ते देऊ शकतो. हजार रुपये माझे दायित्व आहे. तसे जर आपण १०० कोटीची हमी दिली आहे तर उत्पन्न, घरपट्टी असेल किंवा शासन काही अनुदान देणार आहे का? शासनाच्या अनुदानातुन १०० कोटीचे दायित्व स्वीकारले आहे का? दायित्व असेल काही ना काही तरी?

म.मु.लेखाधिकारी दायित्व साधारणत: १०० कोटी दायित्व मी सांगतोय ते याच वर्षी नाही वर्षानुवर्षे ज्या प्र.मा. येतात त्या आधारावर सांगतोय. हे दायित्व आपण कसे फेडू शकतो किंवा काय यासाठी दैनंदिन उत्पन्न किती त्या आधारावर निर्णय घेणे योग्य आहे.

म.सुनिल बैसाणे आपला बजेट किती आहे?

म.मु.लेखाधिकारी ९६७ कोटी

म.सुनिल बैसणे बजेट सादर करतांना उत्पन्नाच्या सर्वबाबी दाखवाव्या लागतील जर आपण हिस्सा किती वर्षात भरु शकतो याबाबतचा आपल्या जवळ लेखा लेखा नसेल तर नगरोत्थान किंवा इतर हे कुठल्या आधारावर भरणार आहे? जर हे दायित्व स्वीकारतांना आपण शासनाची फसवणूक तर करत नाही ना? जर शासनाची फसवणूक केली असेल तर सभापती महोदया आपल्याला अधिकार आहे की वस्तुस्थिती शासनाला कळवणे तुमची मुदत संपली अथवा नसेल संपली. देशाचे पंतप्रधान यांनी सांगितल्या प्रमाणे ना खाऊंगा ना खाने दुंगा लेखाधिकारी साहेब जे दायित्व असेल या दायित्वाची परतफेड करु शकलो नाही तर येणाऱ्या सर्व योजनांना मंजूरी देऊन काम करणे योग्य होईल किंवा कसे?

म.मु.लेखाधिकारी आपण मागे एकदा महासभेत विषय मंजूर केला आहे १०० कोटी कर्जाचा.

म.सुनिल बैसाणे आता पर्यंत कुठल्या कुठल्या योजनेचे किती कर्ज घेतले आहे?

म.मु.लेखाधिकारी सद्यस्थितीत ते सांगू शकत नाही.

म.सुनिल बैसाणे मजिप्राचे कर्ज आपल्यावर आहे. तापी जी पाणीपरुवठा योजना आहे त्याचे थकीत कर्ज आहे आणि ते थकीत कर्ज आपण फेडू शकलो नाही म्हणून अनेक योजनांमध्ये सहभाग घेतांना अडचणी येतात. जर आपण त्या योजनांची परतफेड आज रोजी पर्यंत करु शकलो नसेल तर १०० कोटीचे कर्ज २०० कोटीचे कर्ज घेणार असाल तर ते फेडण्याची जबाबदारी सुध्दा मनपाची आहे. आपण त्या बाबतीत निर्णय नाही घेऊ शकत. जर आधी घेतलेले कर्ज आजपर्यंत फेडू

शकलो नाही आणि पुन्हा घेण्यासाठी प्रयत्न करत असाल ते अयोग्य आहे. शासनाची फसवणूक करतांना आपण स्वत:ची फसवणूक करतोय. म्हणून शासनाला कळवले पाहिजे. तात्कालीन ज्यांनी कुणी हमी पत्र दिले असेल ते तपासणे फार गरजेचे आहे. आणि जर मान्यता देत असाल सभागृहाच्या संमतीने ते देणे योग्य आहे किंवा काय? जो पर्यंत आपले घेतलेले कर्ज निरंक होत नाही तो पर्यंत कुठलेही कर्ज घेण्यास आपण पात्र नाही. मा. सभापती महोदया आपल्याला विनंती आहे. दायित्व खूप जास्त आहे विकासकामे करणे गरजेचे आहे अनेक नागरिकांच्या आपल्याकडून अपेक्षा आहे. राष्ट्रीय पक्ष सुध्दा घरपट्टी, पाणी पट्टी च्या बाबतीत आंदोलने करत आहे. जर नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन शासनाने काही निर्णय घेतला तर या सर्व हमी घेतल्या आहे, उत्पन्न येणार आहे त्या आधारावर हमी घेतल्या तर अनेक योजना आपल्या माथ्यावर पडणार आहे. ६४ कोटीचे कामे येणाऱ्या काळात अपेक्षित होत्या परंतु काही त्रुटया उपस्थित केल्या आणि तो विषय विषयपत्रीकेवर येता किंवा नाही याबाबतची शंका आहे मला. परंतु कुठलेही विषय प्रशासन स्तरावर मंजूर झाले तर याबाबतीत तर अनेक पत्रकार, विरोधी पक्षांनी पण बोलून दाखवले न्यायालयीन वाद सुध्दा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या विषयाबाबत प्रशासनाने दायित्व स्विकारणे आणि दायित्व किती आहे याच्या आधारावर निर्णय घेणे या कामांना मंजूरी देत असतांना रिपिट कामे येणार नाही याची तपासणी करुन मंजूरी सभागृहाच्या सहमतीने करावी.

म.सौ.कल्याणी अंपळकर विषय मंजूर करण्यात यावा.

म.सौ.वंदना भामरे विषय मंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३५ दिनांक २८/१२/२०२३

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) सन २०२३-२४ अंतर्गत नगरोत्थान महाभियान रस्ते विकास प्रकल्प अंतर्गत १ ते ६० कामे करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.१९५ दि.२२/१२/२०२२ नगर विकास महाराष्ट्र शासन दि.२५ सप्टेंबर, २०२३ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३८,९७,९९,५४२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत म.कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, धुळे यांचे पत्र जा.क्र./का-२/रास्ते -३/धुळे मनपा/१३५७ दि.१५०३/२०२३ व १८६४ दि.२०/०४/२०२३ अन्वये रक्कम रु.३२,८५,९३,००१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बां.वि./शुद्धी पत्रक/१९९/२० दि.२२/११/२०२३ रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम्स / लोकमत (धुळे,जळगाव,नंदुरबार)/नवभारत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२८/११/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.एस.बी.देशमुख	शे.३.०० % जास्तीने	
२	श्री.शिव कन्सट्रक्शन, जे.व्ही.	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.शिव कन्सट्रक्शन, जे.व्ही.** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **३२,३५,५७,२७८/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले. वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.शिव कन्सट्रक्शन, जे.व्ही** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.शिव कन्सट्रक्शन, जे.व्ही** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.शिव कन्सट्रक्शन,जे.व्ही** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच याबाबत मुख्यलेखाधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी ३०% मनपा हिस्सा अदा करणेबाबत हमीपत्र दिलेले असल्याची खात्री करण्यात यावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहिल. तसेच सदर कामे इतर योजनेत समाविष्ट नसल्याबाबत प्रशासनाने खात्री करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सुचक :- सौ.कल्याणी सतिष अंपळकर

अनुमोदक :- सौ.वंदना विक्रम थोरात

सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

विशेष स्थायी समिती सभा क्रमांक ३४ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
शुक्रवार दिनांक २९/१२/२०२३
वेळ :- दुपारी ४-३० वाजतां

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची विशेष सभा क्रमांक ३४ शुक्रवार **दिनांक २९/१२/२०२३ रोजी दुपारी ४-३० वाजता** सौ. किरण राकेश कुलेवार सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात भरली. या सभेचे इतिवृत्त

या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्रीमती कुलेवार किरण राकेश	सभापती
२	श्री.चौधरी नरेंद्र रूपला	सदस्य
३	श्री.रेलन हर्षकुमार राधेश्याम	सदस्य
४	श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद	सदस्य
५	श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा	सदस्या
६	श्री. जाधव विजय बापू	सदस्य
७	श्री. बागुल दगडू भिमा	सदस्य
८	श्री.ठाकरे रंगनाथ रतन	सदस्य
९	श्री.बैसाणे सुनिल तुळशिराम	सदस्य
१०	श्रीमती अंपळकर कल्याणी सतिष	सदस्या
११	श्री.अन्सारी वसीम खलील	सदस्य
१२	श्रीमती.अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्य
१३	श्रीमती थोरात वंदना विक्रम	सदस्या
१४	श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्रीमती करूणा डहाळे	अति.आयुक्त
२	श्री.अतुल अंबादास गावडे	मुख्य लेखापरिक्षक
३	श्री.गजानन पाटील	मुख्य लेखाधिकारी

४	श्री.नवनीत सोनवणे	कार्यकारी अभियंता,पा.पु.विभाग
५	श्रीमती पल्लवी शिरसाठ	करमूल्य निर्धारण व करसंकलन अधिकारी
६	श्री. मनोज अरविंद वाघ	नगरसचिव
७	डॉ.एम.आर. शेख	प्र.आरोग्याधिकारी
८	श्री.राजेश वसावे	सहा.आरोग्याधिकारी
९	श्री.लक्ष्मण पाटील	मुख्य स्वच्छता निरीक्षक
१०	श्री.चंद्रकांत मोरे	प्र.लेखापाल
११	श्री.संजय मोरे	कार्यालयीन अधिक्षक
१२	श्री.कमलेश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१३	श्री.प्रकाश सोनवणे	कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग
१४	श्री.गितेश सोनार	कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग
१५	श्री.चंद्रकांत उगले	सहाय्यक अभियंता, पा.पु.विभाग
१६	श्री.किशोर सुडके	परवाना व बाजार विभागप्रमुख
१७	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१८	श्री.कैलास लहामगे	अधिक्षक, बांधकाम विभाग
१९	श्री. राजेश गायकवाड	लेखापाल,मनपा शिक्षण मंडळ
२०	श्री.चंद्रकांत जाधव	मलेरिया पर्यवेक्षक
२१	श्री.हेमंत पावटे	कनिष्ठ अभियंता
२२	श्री.संभाजी सुडके	प्र.वाहन विभाग प्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य,मा. अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करते. सभेचे कोरम पुर्ण झालेले आहे. नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — **वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.**

विषय क्रमांक:- २२८ — **मनपा क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा निधी अंतर्गत 01 ते 26 ठिकाणी कामे करणे निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.**

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — या कामांच्या बाबतीत कालमर्यादा दिलेली आहे. ४ महिने रस्ते, गटारी आणि ६ महिने अभ्यासिका इतर कामांसाठी या निविदा प्रक्रीये मध्ये दिलेले आहे. कामाच्या नावात काही त्रुटी किंवा काही असेल ते त्या त्या विभागाने करुन घ्यायचे आहे. सभापती महोदया, दर मंजूरी देत असतांना प्रशासनाच्या कार्यालयीन टिपनी नुसार मंजुरी देतआहे. अति. आयुक्त महोदया, मी जो उपस्थित केलेला मुद्दा होता त्या मुद्दयांच्या आधारे दोषींवर गुन्हे दाखल केले पाहिजे. याबाबत आपण निर्णय घ्यायचा आहे. आपण कामे ५ वर्षात केले मी हा विषय मांडणार नव्हतो. परंतु सभागृहाला माहिती मिळावी व विषय मांडत असतांना कुठल्याही हेतुने मांडत

नव्हतो.भूखंडाच्या बाबतीत बोललो असेल, ठेकेदारांच्या बाबीत बोललो असेल, अधिकाऱ्यांच्या बाबतीत बोललो असेल, कार्यपध्दतीच्या बाबतीत बोललो असेल, बोलत असतांना मला नागरिकांद्वारे लोक प्रतिनिधी म्हणून देण्यात आलेला अधिकार होता. त्या अधिकाराने आणि संविधानाने मला स्वत:चे सार्वभौमत्व सिध्द करण्यासाठी दिला होता. परंतु काही भूखंड माफीया, ठेकेदार काही धुळे शहरातील नामांकित लोक यांच्या डोळयामध्ये खुपत होतो. काही लोकांनी सांगितले मला तुम्ही सांभाळून रहा. ते तुम्हाला कमी जास्त करु शकतात. त्या कमी जास्त करणाऱ्या लोकांना माझी सूचना आहे, विनंती आहे. तुम्हाला जे करायचे ते तुम्ही करावे. मी धुळे जिल्हयातील पोलिस अधिक्षकांना निवेदन देऊन आलो आहे. लोक प्रतिनिधी काम करत असतांना अडचणी येतात अनेक चांगले कामे आपण केलेले आहे. प्रशासनाला विनंती आहे. काही राहिलेले विषय असतील. येणाऱ्या काळात मंजूरी द्यावी. आयुक्त मॅडम या कामात तत्पर आहे. आपण या १ ते २६ कामांच्या दर मंजूरीला या निविदेप्रमाणे कार्यकाळानुसार मंजूरी द्यावी.

म.नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यात यावा.

म.दगडू बागूल — विषय मंजूर करावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३६ दिनांक २९/१२/२०२३

धुळे महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास अंतगर्त १ ते २६ कामे करणेम. जिल्हाधिकारी सो. यांचे जा.क्रं.१२/क/कक्ष/५/बांध/१४८/ व ११४९/२०२३ दि.२९/११/२०२३ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ९,१३,४५,१७७/- व ८४,९८,००२/- एकुण ९,९८,४३,१७९/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता, मनपा, धुळे धुळे यांचे पत्र क्रं १३४/१३५/१३६/ १३७/१३८/१३९/१४०/१४१/१४२/१४३/१४४/१४५/१४६/१४७/१४८/१४९/१५०/१५१/१५२/ १५३/१५४/*१५५/१५६/१५७/दि.०१/०९/२०२३व २१४/२१५ दि.२०/०९/२०२३अन्वये रक्कम रु. ९,७६,००,७१९/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे. सुंदर माधव कंट्रक्शन	शे. २% जास्तीने	
२	रामेश्वर ट्रेडर्स	अंदाजपत्रक दर	सर्वात कमी दर

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्रं. धुमपा/बांवि/९४ दिनांक ३०/११/२०२३ अन्वये रोजी दै. मिडडे व दिव्य मराठी या वृत्तपत्रातजाहिर निविदा प्रसिध्द करणेत येवून दि. १३/१२/२०२३ पर्यंत निविदा दर मागविण्यांत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पध्दतीने बयाना रक्कम भरुन निविदा दर सादर केलेली आहेत.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून रामेश्वर ट्रेडर्स यांची निवदा सर्वात न्युनतम दराने ९,९८,४३,१७७/- इतक्या रकमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे. वरील प्रमाणे

निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **रामेश्वर ट्रेडर्स यांचे दर अंदाजपत्रक दराने आहे. व** त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार रामेश्वर ट्रेडर्स यांचे अंदाजपत्रकीय दर मे. स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **रामेश्वर ट्रेडर्स** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक :- श्री.दगडू भिमा बागूल

सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे